| उपचारविधि-सामान्य अभिनयाचा प्रकृतिनुसार उपयोग | १५१-१५६ | ६०६-६०८ |
| 'कामा'ची उत्पत्ती व प्रकार | १५७-१६० | ६०८-६१० |
| काम्या दृष्टी | १६१ | ६१० |
| ललिता दृष्टी | १६२ | ६१० |
| मुखराग | १६३ | ६११ |
| मदनाने आतुर वेश्यांचे भाव | १६४-१६५ | ६११ |
| कुलीन स्त्रीची इंगिते | १६६-१६८ | ६१२ |
| 'कामा'च्या दहा अवस्था | १६९-१७२ | ६१३ |
| अभिलाषा | १७३-१७४ | ६१४-६१५ |
| चिंतन | १७५-१७६ | ६१५-६१६ |
| अनुस्मृति | १७७-१७८ | ६१६ |
| गुणकीर्तन | १७९-१८० | ६१७ |
| उद्वेग | १८१-१८२ | ६१८ |
| विलाप | १८३-१८४ | ६१९ |
| उन्माद | १८५-१८६ | ६१९-६२० |
| व्याधि | १८७-१८८ | ६२०-६२१ |
| जडता | १८९-१९० | ६२१ |
| मरण | १९१-१९२ | ६२२ |
| कामी स्त्रीपुरुषांचा अभिनय | १९३-१९९ | ६२३-५२५ |
| दूतीद्वारे कामुकसंदेश | २००-२०१ | ६२५ |
| सम्यक् अभ्यन्तरविधि | २०२-२०८ | ६२६-६२८ |
| वासक वृत्तान्त | २०९-२१० | ६२९ |
| अष्ट नायिका | २११-२१२ | ६३० |
| १. वासकसज्जा | २१३ | ६३० |
| २. विरहोत्कंठिता | २१४ | ६३१ |
| ३. स्वाधीनपतिका | २१५ | ६३१ |
| ४. कलहांतरिता | २१६ | ६३२ |
| ५. खंडिता | २१७ | ६३२ |
| ६. विप्रलब्धा | २१८ | ६३२ |
| ७. प्रोषितभर्तृका | २१९ | ६३३ |
| ८. अभिसारिका | २२०-२२१ | ६३३-६३४ |

| | | |
|---|---|---|
| अष्टनायिकांचे अनुभाव | २२२-२३२ | ६३४-६३७ |
| रतिक्रीडेसाठी प्रयोग | २३३-२३७ | ६३८-६४० |
| रतिक्रीडेच्या वेळी स्त्रियांचा आहार्य | २३८-२४२ | ६४०-६४१ |
| प्रियकराची वाट पाहतानाचा अभिनय | २४३-२५२ | ६४२-६४५ |
| विविध संकेत व अनुभाव | २५३-२५७ | ६४५-६४६ |
| प्रियकराच्या आगमनावेळीचा अभिनय | २५८-२६४ | ६४७-६४८ |
| प्रेमामध्ये ईर्ष्येची चार कारणे व अभिनय | २६५-२७० | ६४९-६५१ |
| विप्रिय | २७१ | ६५१ |
| विप्रियाचा अभिनय | २७२ | ६५२ |
| मन्यु | २७३ | ६५२ |
| मन्युचा अभिनय | २७४-२८२ | ६५२-६५५ |
| नायक-नायिकेच्या प्रतिक्रिया | २८३-२९१ | ६५५-६५८ |
| शृंगारयुक्त वातावरणासाठीचे उपकरण | २९२-२९६ | ६५८-६६० |
| रंगमंचावरील प्रतिबंधित दृश्यांचे नियम | २९७-३०० | ६६०-६६१ |
| स्त्रियांद्वारे प्रियकराविषयीची संबोधने | ३०१-३०३ | ६६१-६६२ |
| प्रिय | ३०४ | ६६२ |
| कान्त | ३०५ | ६६३ |
| विनीत | ३०६ | ६६३ |
| नाथ | ३०७ | ६६४ |
| स्वामी | ३०८ | ६६४ |
| जीवित | ३०९ | ६६४ |
| नंदन | ३१०-३११ | ६६५ |
| दु:शील | ३१२ | ६६५ |
| दुराचारी | ३१३ | ६६६ |
| शठ | ३१४ | ६६६ |
| वाम | ३१५ | ६६६ |
| विकत्थन | ३१६ | ६६७ |
| निर्लज्ज | ३१७ | ६६७ |
| निष्ठुर | ३१८-३१९ | ६६८ |
| शृंगाररसातील वचनविधी | ३२०-३२३ | ६६८-६६९ |
| दिव्यांगनांचे भाव | ३२४-३३२ | ६७०-६७२ |

## तेविसावा अध्याय


| | श्लोक संख्या | पृष्ठ |
|---|---|---|
| **वैशिकोपचार** | **१-८०** | **६७५-७०४** |
| वैशिक पुरुषाचे स्वरूप | १-२ | ६७५ |
| वैशिक पुरुषाचे गुण | ३-७ | ६७५-६७६ |
| वैशिक पुरुषाच्या मित्राचे सहा गुण | ८ | ६७७ |
| दूतीची लक्षणे | ९-१४ | ६७७-६७९ |
| समागमाची योग्य वेळ | १५-१७ | ६८० |
| अनुरक्त व विरक्त स्त्रियांची लक्षणे | १८-२६ | ६८०-६८२ |
| नायिकेचे हृदय जिंकण्याचे उपाय | २७-३४ | ६८३-६८५ |
| स्त्रियांचे तीन प्रकार | ३५ | ६८६ |
| उत्तमा स्त्री | ३६-३८ | ६८६ |
| मध्यमा स्त्री | ३९-४० | ६८७ |
| अधमा स्त्री | ४१ | ६८८ |
| स्त्रीयौवनाचे टप्पे | ४२ | ६८८ |
| स्त्री तारुण्याचा पहिला टप्पा | ४३ | ६८९ |
| स्त्री तारुण्याचा दुसरा टप्पा | ४४ | ६८९ |
| स्त्री तारुण्याचा तिसरा टप्पा | ४५ | ६९० |
| स्त्री तारुण्याचा चौथा टप्पा | ४६ | ६९० |
| स्त्री तारुण्याच्या चार टप्प्यांतील अनुभव | ४७-५२ | ६९१-६९२ |
| कामतंत्रामध्ये पुरुषांचे पाच प्रकार | ५३ | ६९३ |
| चतुर पुरुष | ५४ | ६९३ |
| ज्येष्ठ पुरुष | ५५ | ६९४ |
| उत्तम पुरुष | ५६ | ६९४ |
| मध्यम पुरुष | ५७-५८ | ६९५ |
| अधम पुरुष | ५९-६० | ६९५ |
| संप्रवृत पुरुष | ६१-६२ | ६९६ |
| विविध चारित्र्य असलेल्या स्त्रियांशी कामक्रिया | ६३-६५ | ६९७-६९८ |
| साम | ६६ | ६९८ |
| प्रदान | ६७ | ६९८ |

| | | |
|---|---|---|
| दंड | ६८ | ६९९ |
| भेद | ६९ | ६९९ |
| दंड | ७० | ७०० |
| नायिकेला हळुवारपणे ताडन | ७१ | ७०० |
| नायिकेची उपेक्षा | ७२ | ७०० |
| वैशिक व वेश्या | ७३-८० | ७०१-७०४ |


## चोविसावा अध्याय


| | श्लोक संख्या | पृष्ठ |
|---|---|---|
| **प्रकृती** | **१-८९** | **७०७-७३७** |
| त्रिविध प्रकृती | १ | ७०७ |
| पुरुष प्रकृतीचे प्रकार | | ७०७ |
| उत्तम प्रकृती | २-३ | ७०७ |
| मध्यम प्रकृती | ४ | ७०८ |
| अधम प्रकृती | ५-८ | ७०८-७०९ |
| स्त्री प्रकृतीचे प्रकार | | ७१० |
| उत्तम प्रकृती | ९-१० | ७१० |
| मध्यम प्रकृती | ११ | ७१० |
| अधम प्रकृती | १२ | ७११ |
| नपुंसक, अधम व संकीर्ण पात्र | १३-१५ | ७११-७१२ |
| चार प्रकारचे नायक | १६ | ७१२ |
| नायक प्रकार | १७-१९ | ७१३ |
| विदूषकांचे प्रकार | २०-२२ | ७१४ |
| नायिकांचे प्रकार | २३-२५ | ७१५-७१६ |
| प्रजेचे गमनागमन | २६-२७ | ७१६ |
| राजांचे उपचार (गमनागमन) | २८-२९ | ७१७ |
| राजाच्या अंतःपुरातील स्त्रीविभाग | ३०-३२ | ७१७ |
| १. महादेवी | ३३-३५ | ७१८ |
| २. देवी | ३६-३७ | ७१९ |
| ३. स्वामिनी | ३८-३९ | ७२० |
| ४. स्थापिता | ४०-४२ | ७२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | भोगिनी | ४३ | ७२२ |
| ६. | शिल्पकारिणी | ४४-४५ | ७२२ |
| ७. | नाटकीया | ४६ | ७२३ |
| ८. | नर्तकी | ४७-५१ | ७२३-७२४ |
| ९. | अनुचारिका | ५२ | ७२५ |
| १०. | परिचारिका | ५३-५४ | ७२५ |
| ११. | संचारिका | ५५-५६ | ७२६ |
| १२. | प्रेपणकारिका | ५७ | ७२६ |
| १३. | महत्तरा | ५८ | ७२७ |
| १४. | प्रतिहारी | ५९ | ७२७ |
| १५. | कुमारी | ६० | ७२८ |
| १६. | वृद्धा | ६१ | ७२८ |
| १७. | आयुक्तिका | ६२-६४ | ७२८-७२९ |
| राजाच्या अंत:पुरातील स्त्रियांची लक्षणे | | ६५-७२ | ७२९-७३१ |
| बाह्योपचार | | ७३ | ७३२ |
| बाह्यपरिवार | | ७४-७५ | ७३२ |
| राजा | | ७६-७९ | ७३३ |
| मंत्री | | ८०-८१ | ७३४ |
| सचिव | | ८२-८३ | ७३५ |
| न्यायाधीश | | ८४-८५ | ७३५-७३६ |
| राजकुमारांची रक्षा करणारे अधिकारी | | ८६-८८ | ७३६ |
| सभासद | | ८९ | ७३७ |

**श्लोकार्धानुक्रम:** **७३८-७९८**

# तेरावा अध्याय - कक्ष्याविभाग (भूमिक्षेत्राचे विभाग)

नाट्यशास्त्राच्या सहाव्या अध्यायामध्ये, नाट्याची अकरा अंगे संग्रहाच्या वर्णनामध्ये सांगितली आहेत. त्यापैकी नाट्याचे अकरावे अंग म्हणजे 'रंग'. या रंगभूमीच्या स्पष्टीकरणासाठी भरताने कक्ष्यांची म्हणजेच रंगमंचावरील भूमिक्षेत्रांचे वर्णन तेराव्या अध्यायात केले आहे.

रंगपीठावर देशप्रदेश इत्यादींची कल्पना करून बाह्य व आभ्यंतर कक्ष्येचा (क्षेत्राचा) वापर करावा. रंगपीठावरील परिक्रमेनुसार अपेक्षित क्षेत्रविभाग सांगण्यात आलेले आहेत. या कक्ष्याविभागात घर, नगर, उद्यान, रतिस्थल, नदी, आश्रम, वन, पृथ्वी, समुद्र, त्रिभूवन, भारतदेश, इतर देश, सात खंड, विविध पर्वत, रसातल, दैत्यलोक, सर्पलोक, रतिगृह, भवने इत्यादींचा समावेश आहे.

ज्या प्रमुख पात्रांनी पूर्वीच रंगमंचावर प्रवेश केला असेल, त्या पात्रांना 'आभ्यंतर' समजावे. जे नाट्याला आरंभ झाल्यानंतर कक्ष्याभागात प्रवेश करतात त्या पात्रांना 'बाह्य' समजावे. आभ्यंतर पात्रे रंगमंचावर ज्या ठिकाणी वावरतात त्या भागास 'आभ्यंतर कक्ष्या' असे म्हणतात आणि बाह्य पात्र रंगमंचावरील ज्या ठिकाणी वावरतात त्यास 'बाह्य कक्ष्या' असे म्हणतात. या अध्यायामध्ये पात्रांनी प्रवेश व निकास कसा करावा यासाठीचे नियम सांगितले आहेत. पूर्व पश्चिम इत्यादी दिशांविषयी मार्गदर्शनही केले आहे. नाटकाच्या इतिवृत्तानुसार जेथे जेथे बातमी पसरवणे अपेक्षित आहे त्यामध्ये येणारे जे जे देश, प्रदेश, स्थान, भवन इत्यादी सर्व ठिकाणे रंगमंचावर दाखवता येणे शक्य आहे.

या अध्यायात दिवस, महिना, वर्ष इत्यादींच्या कालमापनानुसार कार्य पूर्ण कसे करावे याविषयीचे मार्गदर्शन केले आहे. त्यानंतर दिव्य, अदिव्य, मनुष्य इत्यादी पात्रांच्या गतिप्रयोगानुसार कक्ष्याविभाग सांगितले आहेत. रंगमंडपावरच्या परिक्रमणानुसार भूमीचे तीन विकल्प सांगितले आहेत जसे विकृष्टा, मध्या आणि संनिकृष्टा.

या अध्यायामध्ये विविध पर्वतांची नावे सांगून तेथे निवास करणाऱ्या दिव्य लोकांची यादी दिली आहे. या पर्वताच्या नावांवरून तत्कालीन जम्बूद्वीपाचे ज्ञान होते. तसेच या दिव्यपात्रांचे सर्व भाव मनुष्यांप्रमाणे दर्शवावे असे सांगितले आहे. डोळ्यांनी दर्शविलेला भाव अंगांद्वारे व्यक्त होत असतो म्हणून संग्रहाच्या अकरा अंगांपैकी आवंती, दाक्षिणात्या, पांचाली आणि औढ्रमागधी या चार

प्रकारच्या वृत्तींचे वर्णन इथे केले आहे. पृथ्वीवर वेगवेगळ्या देशांमध्ये प्रचलित अशा वेशभूषा, भाषा, समाजातील आचारविचार, शास्त्रीय ज्ञान आणि उपजीविका यांविषयी जी सांगते ती 'वृत्ति' होय आणि ज्या विशिष्ट पद्धतीने ती अभिव्यक्त केली जाते त्यास 'प्रवृत्ति' म्हणतात. वृत्तींच्या आधाराने होणाऱ्या प्रयोगांवरून भौगोलिक प्रांत सांगितले गेले आहेत. या भौगोलिक प्रांतांवरूनच चार प्रकारच्या प्रवृत्तींचा जन्म झाला आणि त्यांचा प्रयोग होऊ लागला. दक्षिण समुद्र आणि विंध्य पर्वताच्या मध्ये येणाऱ्या सर्व प्रदेशातील पात्रांच्या अभिनयासाठी दाक्षिणात्य प्रवृत्तींचा वापर करावा असे सांगितले गेले आहे. पश्चिमकडील देश जसे आवंती, विदिशा, सौराष्ट्र, मालव, सैंधव इत्यादी ठिकाणी निवास करणाऱ्या पात्रांसाठी नियमांनुसार आवंती प्रवृत्तीचा प्रयोग करावा. अंग, वंग, कलिंग, वत्स, मगध, नेपाल इत्यादी पूर्व दिशेकडील सर्व प्रदेशांमध्ये निवास करणाऱ्या पात्रांसाठी औढ्रमागधी प्रवृत्तीचा प्रयोग करावा. तसेच पांचाल, शूरसेन, कश्मीर, हस्तिनापूर, हिमालय पर्वतावरील आणि गंगा नदीच्या उत्तर दिशेमध्ये निवास करणाऱ्या पात्रांसाठी पांचाली प्रवृत्तीचा प्रयोग करावा. ही प्रवृत्ती धारण केलेल्या पात्रांनी प्रदक्षिणाक्रम अर्थात उजव्या बाजूने आणि अप्रदक्षिणाक्रम म्हणजे डाव्या बाजूने अशा दोन प्रकारे रंगमंचावर प्रवेश करावा.

भरताने खास आवर्जून नमूद केले आहे की कथावस्तूचा अर्थ समजून घेऊन सभा, देश, काल आणि अर्थविशेषाची अभिव्यक्ती लक्षात ठेवून नाटकाचा प्रयोग करणाऱ्यांनी या सर्व वृत्तीप्रवृत्तींचा एकत्र प्रयोग करावा. याच अध्यायात भरताने आविध्य व सुकुमार नाट्याची व्याख्यादेखील केली आहे. अध्यायाच्या शेवटी लोकधर्मी आणि नाट्यधर्मी अंगांचे थोडक्यात वर्णन केले आहे.

## चौदावा अध्याय - वाचिकाभिनयातील संस्कृत पाठ्य

नाट्यप्रयोगामध्ये वाणी अर्थात वाचिक अभिनयावर विशेष लक्ष द्यावे कारण 'वाणी' हे नाटकाचे शरीर मानले गेले आहे. वाद्य हे सर्व प्रयोगांचा आधारस्तंभ असलेल्या गीताचे अनुकरण करतात आणि वाणी स्वत: अभिनय रूप असल्यामुळे 'वाणी'ला नाट्याचे शरीर म्हणून ओळखले जाते. कवींनी काव्यरचना करताना, नाटककारांनी नाटक लिहिताना आणि नटाने नाट्यप्रयोगाच्या वेळी या वाणीवर विशेष भर द्यावा. वाणी हे नाट्याचे शरीर आहे आणि आंगिक, आहार्य व सात्त्विक अभिनय हे वाक्याच्या अर्थालाच अभिव्यक्त करतात. वाणी हे संपूर्ण विश्वाच्या निर्मितीचे मूळ आहे.

वाचिक अभिनय हा आगम, नाम, आख्यात, क्रियापद, निपात, उपसर्ग, समास, तद्धित, संधि, वचन, विभक्ति आणि उपसर्ग इत्यादी दहा अंगांनी युक्त असतो. पाठ्याचे संस्कृत आणि प्राकृत असे दोन प्रकार सांगून भरताने स्वर, व्यंजन, संधि, विभक्ति इत्यादी दहा अंगानी युक्त अशा संस्कृत पाठ्याचे विस्तृत विवेचन या अध्यायामध्ये केले आहे. संधि, विभक्ती इत्यादी व्याकरणशास्त्राच्या संकल्पनांचे भरताने केलेले विवरण हे व्याकरणशास्त्राचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फारच उपयुक्त आहे. व्याकरणशास्त्राच्या अध्ययनाद्वारे कवींनी पदबंध म्हणजे छंदोबद्ध काव्याची किंवा चूर्ण म्हणजे गद्याची रचना करावी असे सांगितले आहे. त्यानंतर प्रतिचरण एकाक्षर असलेल्या वृत्तापासून ते २६ अक्षरे असलेल्या वृत्तांची एकूण संख्या यात दिली आहे. शरीराश्रय आणि दिशाश्रय ही छंदांची दोन आश्रयस्थाने सांगून गायत्री, त्रिष्टुभ, जगती इत्यादी छंदाचे वर्णन केले आहे. पुढे या वृत्तांचे तीन गण दिव्य, दिव्येतर आणि दिव्यमानुप या गणांचा उल्लेख केला आहे. यानंतर भरताने त्रिके, संपद, विराम, पाद, देवता, स्थान, अक्षर, वर्ण, स्वर, विधि, आणि वृत्त या छंद:शास्त्रातील संकल्पनाही स्पष्ट केल्या आहेत. याशिवाय वैदिक छंदाच्या विशिष्ट समूहातील वृत्तसंख्येमागील गणितही समजावून सांगितले आहे.

याप्रमाणे लघुगुरू अक्षरांना ध्यानात ठेवून कवीने स्वत:च्या काव्यरचनेमध्ये आणि नाट्यरचनेमध्ये त्यांचा प्रयोग करावा असे सांगितले आहे. नाट्याचे लेखक, दिग्दर्शक, नट, रसिक इत्यादी सर्वांसाठी अत्यंत उपयुक्त असलेला, व्याकरणशास्त्र आणि छंद:शास्त्राची बैठक असलेला हा अध्याय विपयांचा आणि कलांचा परस्पर संबंध व महत्त्व सिद्ध करतो यात शंका नाही.

## पंधरावा अध्याय - छंदोविचिति

वाचिक अभिनयाविपयी चौदाव्या अध्यायामध्ये जे सांगितले त्याचाच विस्तार आहे हा पंधरावा अध्याय. भरताने प्रतिचरण सहा अक्षरे असलेली वृत्त जसे तनुमध्या, मकरशीर्षा, मालिनी, मालती यांची माहिती उदाहरणांसह दिली आहे. प्रतिचरण सात अक्षरे असलेली उद्धता, भ्रमरमालिका, आठ अक्षरे असलेली सिंहलेखा, मत्तचेष्टित, विद्युन्माला, चित्तविलासित ही वृत्ते उदाहरणांसह स्पष्ट केली आहेत. भरताने 'यति'च्या आधारे समवृत्तांची ६ ते २६ अक्षरे असलेल्या सर्व वृत्तांची लक्षणे सोदाहरण स्पष्ट केली आहेत व त्यानंतर त्रिकांद्वारे विपम आणि अर्धसम वृत्तांची लक्षणे देखील सांगितली आहेत. यानंतर भरताने पथ्या, विपुला, चपला, मुखचपला आणि

जघनचपला ही पाच आर्यावृत्ते सोदाहरण स्पष्ट केली आहेत . तसेच या आर्यावृत्तांचे यती व मात्रांनुसार होणारे भेद, विकल्प आणि तसेच गुणांवर आधारित लक्षणे आणि नियम उदाहरणांसह नमूद केले आहेत . भरताच्या मते ही सर्वच वृत्ते नाट्यामध्ये सौंदर्य निर्माण करीत नसली तरी शेवटी त्याने स्पष्टच म्हटले आहे की विविध छंदामधून उत्पन्न होणाऱ्या या निरनिराळ्या वृत्तांच्या साहाय्याने छत्तीस लक्षणांनी युक्त असा काव्यबंधाची रचना नाटककारांनी करावी .

## सोळावा अध्याय - काव्याची भूषणे

काव्यामध्ये भाव आणि अर्थाच्या परितुष्टीसाठी ३६ आभूषणांचा वापर केला जातो आणि रसांप्रमाणे त्यांचा योग्य प्रयोग केला जातो . म्हणूनच भरताने वाचिक अभिनयाच्या छंद, वृत्त अध्यायानंतर काव्याच्या या ३६ आभूषणांचे वर्णन सोळाव्या अध्यायात केले आहे .

भरताने नाटकाश्रित असलेल्या उपमा, रूपक, दीपक आणि यमक या चार अलंकाराची लक्षणे आणि त्यांचे प्रकार उदाहरणांसह दिले आहेत . काव्याचा उचित अर्थबोध व्हावा म्हणून भरताने छंद, वृत्त, अलंकार, आभूषण, गुणदोष या सर्वांचे वर्णन केले आहे . या अध्यायामध्ये गूढार्थ, अर्थांतर, अर्थहीन, भिन्नार्थ, एकार्थ, अभिप्लुतार्थ, न्याय, विषम, विसंधि आणि शब्दच्युत हे दहा काव्यदोष समजावून सांगितले आहेत . याउलट श्लेष, प्रसाद, समता, समाधि, माधुर्य, ओज, सौकुमार्य, अर्थव्यक्ती, उदारता आणि कांति हे काव्याचे दहा गुण विशद केले आहेत .

त्यानंतर भरत काव्यरचनेसंबंधी विशेष नियम सांगतो . रसानुसार लघुगुरू अक्षरांचा वापर, विशेष छंदाचा प्रयोग, विशिष्ट शब्दांचा वापर आणि तसेच प्रेक्षकांसाठी योग्य असे नाटक कसे असावे याविषयीचे विवेचन विशेष अध्ययनीय आहे, जे या अध्यायाच्या शेवटी दिले आहे .

## सतरावा अध्याय - काकुस्वरव्यंजन (भाषाविधान)

भरताने यापूर्वीच्या अध्यायांमध्ये नाट्याला योग्य अशा संस्कृत पाठ्याविषयी सांगितले . आता या अध्यायामध्ये त्याने प्राकृत पाठ्याची लक्षणे सांगितली आहेत . प्राकृत पाठ्याविषयी सांगताना भरताने स्पष्ट म्हटले आहे की जे संस्कृत पाठ्याच्या विरुद्ध आहे, संस्कार नसलेले आणि गुणरहित आहे आणि देशप्रांतानुसार विविध स्वरूपात असणारे असे ते पाठ्य त्यास 'प्राकृत पाठ्य' असे म्हणतात .

या प्राकृत पाठ्याचे भरताने तीन प्रकार सांगितले आहेत ते म्हणजे तत्सम, विभ्रष्ट आणि देशीगत. प्राकृत भाषेची वर्णव्यवस्था, स्वर, व्यंजन, संस्कृतातून प्राकृतामध्ये परिवर्तन, वर्णाचा विशिष्ट प्रयोग इत्यादी भाषाप्रयोगाचे नियम भरताने या अध्यायामध्ये विस्तृतपणे सांगितले आहेत. त्यानंतर प्राकृत भाषेतील जोडाक्षरांचे नियम सांगितले आहेत.

यानंतर भरताने प्रादेशिक भाषांचे विवेचन केले आहे. दशरूपकामध्ये जेथे संस्कृत आणि प्राकृत भाषांचा वापर केला जातो, तेथे प्रयोगानुसार वापरात येणाऱ्या चार प्रकारच्या भाषा म्हणजे अतिभाषा, आर्यभाषा, जातिभाषा आणि योन्यन्तरी भाषा यांची माहिती दिली आहे. थोडक्यात, संयुक्त अशी ती अतिभाषा, सम्यक न्यायप्रतिष्ठित ती आर्यभाषा, म्लेंच्छशब्दांनी युक्त अशी ती जातिभाषा आणि ग्राम्य व वन्य पशुपक्ष्यांची भाषा म्हणजे योन्यन्तरी भाषा. या सर्व भाषा नाटकामध्ये कोणत्या पात्रांनी, नटांनी, अथवा नटींनी कश्या वापराव्या याविषयीचे तपशीलवार वर्णन केले आहे. अर्थात संस्कृत आणि प्राकृत भाषांचा वापर सांगितल्यानंतर भरताने असे म्हटले आहे की काव्यामध्ये सर्वच शुद्ध जातींच्या पात्रांसाठी शौरसेनी भाषेचाच वापर करावा. नाटक हे भिन्न भिन्न देशातील भाषांमध्ये रचलेले असते. तरीही प्रयोग करणाऱ्यांनी स्थानप्रदेशानुसार त्या त्या देशभाषेचा वापर करावा. कारण ज्या प्रदेशामध्ये नाट्यप्रयोग होणार असेल तेथील लोकांना नाट्याशी जोडण्यासाठी त्या विशिष्ट देशाच्या भाषेचाही वापर करणे अत्यंत महत्त्वाचे असते. मागधी, अवंतिजा, प्राच्या, शौरसेनी, अर्धमागधी, वाल्हीका आणि दाक्षिणात्य या सात देशभाषा भरताने सांगितल्या आहेत आणि वनवासी लोकांच्या शकार, आभीर, चांडाल, शबर, द्रमिल, आंध्रज आणि हीन अशा सात विभाषा अर्थात अपभ्रष्ट भाषाही सांगितल्या आहेत. नाटकामध्ये कोणत्या पात्राने कोणती भाषा केव्हा वापरावी याचे सविस्तर वर्णन भरताने या अध्यायामध्ये केले आहे.

याठिकाणी काशी संस्करणानुसार 'भाषाविधान' नावाचा सतरावा अध्याय संपतो आणि ६४ व्या श्लोकापासून १८ वा अध्याय सुरू होतो. परंतु स्वीकृत गायकवाड ओरिएण्टल सीरिजच्या प्रतिनुसार याच १७ व्या अध्यायात पुढे उत्तम, मध्यम आणि अधम पात्रांनी नाटकामध्ये श्रेष्ठ पात्रांना आणि हीन पात्रांना उद्देशून कोणते संबोधन योजावे याविषयी सांगितले आहे. त्यानंतर स्त्रियांना संबोधताना कोणत्या शब्दांचा प्रयोग करावा तेदेखील सांगण्यात आले आहे.

पुरुषपात्रनामविधि या शीर्षकांतर्गत काव्यामध्ये कवींनी ब्राम्हणक्षत्रियवैश्यांची नावे त्यांच्या गोत्र आणि कर्मानुसार ठेवावीत असे सांगितले आहे. म्हणजे, त्यांच्या नावासमोर शर्मा, वर्मा, दत्त इत्यादी शब्दप्रयोग करावा. तसेच राजपत्नींची नावे विजयाची सूचना देणारी असावीत जसे विजयवती इत्यादी. वैश्यांच्या नावापुढे दत्ता, सेना, मित्रा इत्यादी शब्दांचा वापर करावा. उदाहरणार्थ वसंतसेना इत्यादी.

यानंतर पाठ्याचे गुण अर्थात सात स्वर, तीन स्थाने, चार वर्ण, दोन काकू, सहा अलंकार आणि सहा अंगांचे विस्तृत विवेचन करून त्यांचे विनियोगदेखील सांगितले आहेत. विविध भाव आणि रसांमध्ये त्यांचा प्रयोग सांगून पाठ्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे. या अध्यायामध्ये भरताने स्पष्ट केले आहे की नाट्यविद्वानांनी दशरूपक विधानामध्ये कला, स्वर, ताल आणि लयीने युक्त असलेल्या पाठाचा यथायोग्य प्रयोग करावा.

## अठरावा अध्याय – दशरूपक निरूपण

प्रस्तुत अध्यायामध्ये भरताने नामशः, कार्यशः आणि प्रयोगशः दशरूपकांचे वर्णन केले आहे. लक्षणांनुसार नाट्याचे नाटक, प्रकरण, अंक, व्यायोग, भाण, समवकार, वीथी, प्रहसन, डिम आणि ईहामृग हे दहा प्रकार मानले जातात. काव्याची जननी असलेल्या वृत्तींच्या प्रयोगामुळेच हे दशरूपक निर्माण झाले आहे. त्यातील नाटक आणि प्रकरण हे सर्ववृत्तींपासून उत्पन्न होतात. तर वीथी, समवकार, ईहामृग, भाण, व्यायोग, प्रहसन आणि डिम या रूपकांमध्ये कैशिकीवृत्तीचा वापर केला जात नाही. दशरूपकातील कथावस्तू, गणनकाल, पात्र, चरित्र, वर्णने, गुण, अंक, प्रवेशक, पदे, रस, भाव, इत्यादींचे विस्तृत वर्णन या अध्यायात केले आहे. इतकेच नव्हे तर रंगमंचावर केवळ चार किंवा पाच पात्रे असावीत, काव्यबंधाची रचना गाईच्या शेपटीच्या अग्रभागाप्रमाणे असावी यांसारख्या अनेक सूचना भरताने या अध्यायात दिल्या आहेत. समवकार रूपकांची व्याख्या करताना नाडीप्रमाण, कालप्रमाण, विद्रव, कपटाचे तीन प्रकार, त्रिविध शृंगार इत्यादींचे प्रयोजन सांगून नाट्यामध्ये त्यांचा वापर कसा करावा ते स्पष्ट केले आहे.

शेवटी, वीथी रूपकाची १३ अंगे उद्घात्यक, अवलगित, अवस्पंदित, नाली, असत्प्रलाप, वाक्केली, प्रपंच , मृदव, अधिवल, छल, व्याहार, त्रिगत आणि गंड यांचे विशेष वर्णन या अध्यायात केले आहे.

## एकोणीसावा अध्याय - संधिनिरूपण

कथावस्तू अथवा इतिवृत्ताला नाट्याचे शरीर मानले गेले आहे. भरताने या अध्यायात इतिवृत्ताचे विभाग पंचसंधींद्वारे स्पष्ट केले आहेत. साधारणपणे इतिवृत्ताचे दोन प्रकार असतात त्यातील प्रथम 'आधिकारिक' म्हणजे मुख्य आणि दुसरा 'प्रासंगिक' म्हणजे गौण. उत्कर्षाचा विचार करून फलप्राप्ती व्हावी म्हणून जे इतिवृत्त रचले जाते ते 'आधिकारिक' होय आणि याच मुख्य प्रसंगाची पूर्तता होण्यासाठी जे अन्य प्रसंग रचले जातात, त्यांना 'प्रासंगिक' इतिवृत्त असे म्हणतात.

भरताने याठिकाणी कामाच्या दहा अवस्था सांगितल्या आहेत. तसेच फलारंभ, प्रयत्न, प्राप्तिसंभव, नियतफलप्राप्ती आणि फलयोग या नाट्याच्या पाच अवस्था स्पष्ट केल्या आहेत. फलाची इच्छा असणाऱ्यांनी कोणत्याही कार्याच्या या पाच विविध अवस्था समजून घ्याव्यात. रूपकामधील इतिवृत्तामध्ये सर्व संधींचा वापर करावा परंतु काही विशेष कारणांमुळे संध्यंग कमी असले तरी चालेल.

ज्याप्रमाणे इतिवृत्तामध्ये आरंभ इत्यादी पाच अवस्था असतात त्याचप्रमाणे बीज, बिंदू, पताका, प्रकरी आणि कार्य अशा पाच अर्थप्रकृती देखील असतात. विधीनुसार रूपकांमध्ये या अर्थ प्रकृतींचा वापर करावा असे या अध्यायात नमूद केले आहे. तत्पश्चात् चार पताका आणि पाच संधी भरताने स्पष्ट केल्या आहेत. मुखसंधी, प्रतिमुखसंधी, गर्भसंधी, विमर्शसंधी व निर्वहणसंधी या पंचसंधींच्या विवेचनानंतर संधीची अंगे व त्या अंगांची सहा प्रयोजने या अध्यायात सांगितली आहेत. कवींनी संधिप्रदेशामध्ये युक्तिनुसार तसेच रसांप्रमाणे या संध्यंगांचा प्रयोग करावा असे नमूद केले आहे. मुखसंधीची बारा अंगे आहेत. जसे - उपक्षेप, परिकर, परिन्यास, विलोभन, युक्ति, प्राप्ती, समाधान, विधान, परिभावना, उदभेद, करण आणि भेद. तसेच प्रतिमुखसंधीची तेरा अंगे, गर्भ संधीची बारा अंगे, विमर्शसंधीची पंधरा अंगे आणि निर्वहणसंधीची चौदा अंगे मिळून पंचसंधीची एकूण ६४ अंगे सांगितली आहेत.

नाटकामध्ये इतिवृत्ताची फलप्राप्ती योग्य पद्धतीने होण्यासाठी कवींनी या सिद्धी देणाऱ्या संध्यंगांचा उपयोग करावा असे सांगितले आहे. या अध्यायाच्या शेवटी भरत पुन्हा 'नाटक' शब्दाची व्याख्या करतो. भरताने याठिकाणी विशेष नमूद केले आहे की भविष्यकाळात म्हणजेच पुढच्या येणाऱ्या युगामध्ये कदाचित बहुतांश लोक मूर्ख असतील किंवा कदाचित अल्पबुद्धी अर्थात कनिष्ठ

दर्जाचे असतील म्हणून नाटककाराने खूपच मेहनत घेऊन काळजीपूर्वक संध्यांगांसह इतिवृत्त तयार करावे .

## विसावा अध्याय - वृत्तिविकल्पन

भरताने या अध्यायामध्ये भारती, सात्त्वती, कैशिकी आणि आरभटी या वृत्तींविषयी सखोल स्पष्टीकरण केले आहे. कथावस्तूचा उगम, काव्याची निर्मिती आणि वृत्तींच्या उत्पत्तिविषयीचे कथानक या अध्यायात सांगितले आहे. श्रीविष्णूंचे मधुकैटभाशी जे युद्ध झाले त्यातून वृत्तींची निर्मिती झाली आणि त्यानंतर या दोघांच्या बाहुयुद्धाच्या वेळी सर्व प्रकारचे शस्त्र सोडले गेले त्यास 'न्याय' असे म्हटले आहे. अंगहार हे न्यायातून उत्पन्न होतात असाही उल्लेख याठिकाणी आढळतो .

नाटकाच्या निमिर्तीसाठी उपयोगी अशी भारतीवृत्ती ऋग्वेदातून, सात्त्वतीवृत्ती यजुर्वेदातून, कैशिकीवृत्ती सामवेदातून आणि आरभटीवृत्ती अथर्ववेदातून निर्माण झाली आहे .

ज्यात भाषा प्रमुख आहे ती 'भारती'वृत्ती असते. तिचे चार अंश आहेत. ते म्हणजे प्ररोचना, आमुख, वीथी आणि प्रहसन . पुढे आमुखाची पाच अंगे सांगितली आहेत . ती पुढीलप्रमाणे उद्घात्यक, कथोद्घात, प्रयोगातिशय, प्रवृत्तक आणि अवलगित .

सत्त्वगुणाने व सात्त्विक न्यायाने युक्त अशी जी वृत्ती असते तिला 'सात्त्वती वृत्ती' म्हटले आहे. नाट्यजाणकरांनी सात्त्वती वृत्तीचे चार प्रकार सांगितले आहेत. ते म्हणजे उत्थापक, परिवर्तक, संलापक आणि संघात्य .

जी सुकुमार आणि मनोहर वेशभूषेमुळे अतिशय सुंदर असते. तसेच स्त्रीपात्रांनी युक्त, नृत्यगीतांसह, रतिक्रीडा व शृंगाररसाला साजेशी वर्तणूक ज्यात असते तिला 'कैशिकीवृत्ती' म्हणतात . नर्म, नर्मस्फुंज, नर्मस्फोट आणि नर्मगर्भ असे कैशिकीवृतीचे चार प्रकार सांगितले गेले आहेत .

उद्धट पुरुषांचे क्रोध आवेग इत्यादींचे प्रमाण ज्या वृत्तीमध्ये अधिक प्रमाणात असते अशी दांभिक, फसवणूक करणारी, असत्य बोलणारी ती 'आरभटी वृत्ती' असते. संक्षिप्तक, अवपात, वस्तूत्थापन आणि संफेट हे आरभरी वृत्तीचे चार प्रकार आहेत. अध्यायाच्या शेवटी भरताने वृत्तीनुसार रसांचा कसा प्रयोग करावा ते स्पष्ट केले आहे .

## एकविसावा अध्याय - आहार्य अभिनय

नेपथ्यातून निर्माण झालेला विधी म्हणजे आहार्य अभिनय . एखाद्या नाटकाचा संपूर्ण प्रयोग हा आहार्य अभिनयावर आधारित असतो . आहार्य अभिनयामुळे नाटकातील एखादे विशिष्ट पात्र चटकन समजते . या अध्यायात भरताने पुस्त, अलंकार, अंगरचना आणि सज्जीव ही चार प्रकारची नेपथ्ये सांगितली आहेत .

विविध मोजमाप आणि रूपानुसार पुस्तचे तीन प्रकार सांगितले आहे . ते म्हणजे संधिम, व्याजिम आणि वेष्टिम . फुलांच्या माळा, दागिने आणि रेशमी वस्त्रे यांचा अनेक प्रकारे वापर करणे त्याला अलंकार म्हटले आहे . या माळांचे आणि अलंकारांचे विविध प्रकार भरताने सांगितले आहेत . वेष्टिम, वितन, संघात्य, ग्रंथिम आणि प्रालंबित अशा पाच प्रकारच्या माळा असतात . तसेच अलंकारांचे आवेध्य, बंधनीय, क्षेप्य आणि आरोप्य असे चार प्रकार सांगितले आहेत . त्यानंतर शिरोभूषणे, कर्णभूषणे, कंठभूषणे, अंगुलिभूषणे, बाहुनाली भूषणे, मणिबंध, कर्पूर, वक्ष, कटी, शिर, कर्ण, कपोल, दंत, ओष्ठ, दंड, वक्ष, स्तन, गुल्फ, पाद इत्यादी शरीराच्या प्रत्येक अवयवास अलंकृत करणाऱ्या आभूषणांची जणू यादीच भरताने या अध्यायात दिली आहे . शिवाय आभूषणांविषयीचे सर्व नियमदेखील सांगितले आहेत . ही सर्व आभूषणे स्वत:च्या आवडीप्रमाणे बनवू नयेत तर ते नियमानुसार असावेत कारण वेगवेगळ्या विभागांनुसार तयार केलेले अलंकार हे नेहमी शरीराची शोभा वाढवतात .

भरताने मानवांसाठी व दिव्य पात्रांसाठी वापरल्या जाणाऱ्या अलंकारांविषयी वेगवेगळे नियम सांगितले आहेत . दिव्यांगना, यक्षिणी, नागिणी, अप्सरा, मुनिकन्या, सिद्धस्त्रिया, राक्षसी, देवांगना इत्यादी स्त्रियांची वेशभूषा, केशभूषा, अलंकारांची विस्तृत चर्चा या अध्यायात करण्यात आली आहे . आवंती, गौड, ईशान्येकडील देश, दक्षिणात्य प्रदेशातील स्त्रियांच्या केशभूषा आणि वेशभूषांचे देखील वर्णन या अध्यायात करण्यात आले आहे . अशा रीतीने नेपथ्याच्या बाबतीत नाटककाराने नाट्यशास्त्रानुसारच प्रयोग करावा असे भरत सांगतो कारण जर नेपथ्य देशप्रांतानुसार नसेल तर नाटकाचे सौंदर्य उजळून दिसणार नाही .

यानंतर भरत विविध रंग सफेद, निळा, पिवळा आणि लाल इत्यादींची एक विशिष्ट वर्णभाषा सांगतो . सर्व रंगामध्ये निळ्या रंगाला बलवान समजले जाते म्हणूनच विविध रंगाच्या संयोगाने उत्पन्न

होणारा हा वर्णविधी भरताने विस्तारपूर्वक सांगितला आहे . हा वर्णविधि नीट समजून नाट्यविद्वानांनी यथायोग्य रीतीने त्या विशिष्ट रंगाचा प्रयोग शरीरावर करावा . नटाने नाटकातील पात्राच्या विशिष्ट स्वभावानुसार रंगाद्वारे आणि वेशभूषेद्वारे स्वत:चा मूळ रंग झाकून भूमिकेनुसार वेशपालट करावा .

त्यानंतर भरताने सजीव आणि निर्जीव जीवांची विशेष व्याख्या केली आहे . पर्वत, नदी, समुद्र, वाहन तसेच विविध प्रकारचे शस्त्र यांना भरताने सजीवच म्हटले आहे . उदात्त आणि दिव्य अशा भारतीय तत्त्वज्ञानाचे दर्शन या अध्यायामध्ये होते .

नाटकाच्या प्रयोगामध्ये देश, काल, कर्म, जाती आणि पृथ्वीवरील मूळ स्थान समजून पात्रानुसार वेशभूषा, रंग, आभूषणे इत्यादी परिधान करावे . या अध्यायात भरताने आहार्य अभिनयाविषयी अत्यंत सूक्ष्मपणे विवरण केले आहे . त्याने शुद्ध, विचित्र, श्याम व रोमश अशा चार प्रकारच्या मिश्या सांगितल्या आहेत आणि तसेच कोणत्या पात्रासाठी कोणती मिशी योग्य आहे हेदेखील सांगितले आहे . त्यानंतर भरताने शुद्ध, मलिन आणि विचित्र असे तीन प्रकारचे वेश आणि त्यांचे विनियोग सांगितले आहेत तसेच विविध पात्रांनी कोणत्या रंगाचे वेश परिधान करावेत हे सुद्धा सांगितले आहे . भरताने दिव्य पात्रांसाठी आणि मनुष्यांसाठी देश, जाती आणि वयानुसार नाटकावर आधारित मुकुट, अर्धमुकुट, मुंडन, पगडी इत्यादी सांगितले आहे

असा प्रकारे कथावस्तूनुसार देश, जाती, विविध अवस्था तसेच आभूषणे, रंग, वस्त्र, माळा इत्यादींचा विविध प्रकारे विचार करून त्या त्या पात्राचा वेष करावा . नाटकातील रस आणि भाव यांना सर्वप्रथम दृष्टीद्वारे व्यक्त करावे आणि नंतरचअंगाद्वारे प्रदर्शित करावे, असा नियम देखील सांगितला आहे .

नाट्यामध्ये रंगमंचावर प्राण्यांच्या प्रवेशाला भरत 'सजीव' म्हणतात . हे तीन प्रकारचे असतात . जसे चतुष्पद, द्विपद, आणि अपद म्हणजेच पाय नसलेले . युद्धप्रसंगी वापरण्यात येणारी विविध प्रकारची आयुधे आणि त्यांचे मोजमाप याविषयी भरताने केलेले विवरण अध्ययनीय आहे . जर्जर आणि दंडकाष्ठाची लक्षणे आणि त्यांचे मोजमापही स्पष्ट केले आहे .

अध्यायाच्या शेवटी मुखवटा बनविण्याचा विधि, त्याचा प्रयोग व विनियोग सांगण्यात आला आहे . नाट्योपकरणांविषयी भरताने सांगितले आहे की नाटकामध्ये काही उपकरणे लोकधर्मी तर

अन्य काही उपकरणे नाट्यधर्मीनुसार असावीत . ही सर्व उपकरणे हलकी असावीत आणि ती कशी बनवावीत याची विस्तारपूर्वक माहिती या अध्यायात दिली आहे . भरतमतानुसार, रंगमंचावर नटांनी योग, विद्या, शिक्षा आणि मायेच्या बळावर आयुधांचा व उपकरणांचा प्रयोग करावा .

## बावीसावा अध्याय - सामान्य अभिनय

भरताने नाट्यात सत्त्वावर आधारित आंगिक, वाचिक आणि सात्त्विक अभिनयातून निर्माण होणाऱ्या सामान्य अभिनयाचे विवेचन या अध्यायात केले आहे . या अभिनयाचे तीन प्रकार सांगितले आहेत ते म्हणजे ज्येष्ठ, मध्य आणि अधम . स्त्रीपुरुषांचे अलंकार जे भाव आणि रस यांवर आधारित असतात त्यांचे विस्तृत वर्णन या अध्यायात केले आहे . स्त्रियांचे तीन अंगज अलंकार जसे भाव, हाव, हेला सांगितल्यानंतर भरताने स्त्रियांचे दहा स्वभावज अलंकार सांगितले आहेत जसे लीला, विलास, विच्छित्ति, विभ्रम, किलकिंचित, मोट्टायित, कुट्टमित, विब्बोक, ललित, विहत . यानंतर स्त्रियांचे सात अयत्नज अलंकार सांगितले आहेत . अयत्नज म्हणजे विशेष प्रयत्न न करता सहज होणारे अलंकार . जसे शोभा, क्रांति, दीप्ती, माधुर्य, धैर्य, प्रागल्भ्य आणि औदार्य . या गुणांचे वर्णन करून त्यांचा शृंगारात्मक सुकुमार प्रयोगामध्ये कसा उपयोग करावा हेदेखील भरताने सांगितले आहे .

यानंतर भरत पुरुषांच्या आठ सात्त्विक भेदांचे वर्णन करतो . ते पुढीलप्रमाणे शोभा, विलास, माधुर्य, स्थैर्य, गांभीर्य, लालित्य, तेज आणि औदार्य . सामान्य अभिनयाच्या व्याख्येनुसार भरताने प्रथम शरीराने केल्या जाणाऱ्या अभिनयाचे सहा प्रकार सांगितले आहेत . ते म्हणजे वाक्य, सूचा, अंकुर, शाखा, नाट्यायित आणि निवृत्त्यंकुर . पुढे वाचिकाभिनयाचेच आलाप, विलाप, प्रलाप, अनुलाप, संलाप, अपलाप, संदेश, अतिदेश, निर्देश, उपदेश, अपदेश आणि व्यपदेश या बारा संज्ञांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे . वाचिक अभिनयाचे सात प्रकार भरताने सांगितले आहेत . ते म्हणजे प्रत्यक्ष, परोक्ष, तीन कालकृत (वर्तमान, भूत आणि भविष्य), आत्मस्थ आणि परस्थ आणि याद्वारेच विविध अभिनयांची निर्मिती होत असते . विद्वानांनी रस, भाव यांनी युक्त, नाजूक आंगिक हालचाली करून तसेच ललित हस्तसंचाराद्वारे सामान्य अभिनय करावा . भरताने या नाट्याचे आभ्यंतर नाट्य आणि बाह्य नाट्य हे दोन भेद सांगितले आहेत . त्यानंतर पुढे पंच ज्ञानेंद्रिय व त्यांचे विषय जसे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचा अभिनय कसा करावा? पाच इंद्रिये आणि मन हे सामान्य अभिनयाचे मूळ कसे आहे ते स्पष्ट केले आहे . तसेच इष्टभाव, अनिष्टभाव, मध्यस्थ भाव, आत्मस्थ-परस्थ अर्थ, इच्छा, काम, शुभशृंगार, इत्यादी संज्ञा भरताने स्पष्ट केल्या आहेत .

यापुढे भरताने स्त्री स्वभावाची अनन्यसाधारण आणि विलक्षण माहिती 'शीला' या शीर्षकांतर्गत दिली आहे. स्त्री ही सुखाचे मूळ आहे आणि त्यांचे विविध प्रकारचे स्वभाव असतात. त्यामुळे भरताने स्त्रीस्वभावाचे वर्णन देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, नाग, पक्षी, पिशाच्च, चित्ता, नर, वानर, हत्ती, हरिण, मासा, उंट, मगर, गाढव, वराह, घोडा, म्हैस, बकरी, गाय इत्यादींच्या स्वभावानुसार केले आहे. शेवटी भरताने असे म्हटले आहे की नाटकामध्ये सत्त्वाचा आधार घेऊन स्त्रियांच्या विविध स्वभावांचे प्रदर्शन करावे. नाटकाच्या इतिवृत्तातील स्त्रीपुरुषांच्या कामोपभोगाचे जे अभ्यंतर आणि बाह्य प्रकार सांगितले आहेत त्याचा उपचारविधिदेखील या अध्यायात सांगण्यात आला आहे. उत्तम, मध्यम आणि अधम 'कामा'ची व्याख्या सोदाहरण दिली आहे. काम्यादृष्टी, ललितादृष्टी, मुखराग, वेश्यांचे मनोभाव इत्यादींची लक्षणे सांगण्यात आली आहेत. यानंतर भरताने कामाच्या दहा अवस्था सांगितल्या आहेत. जसे अभिलाषा, चिंतन, अनुस्मृति, गुणकीर्तन, उद्वेग, विलाप, उन्माद, व्याधि, जडता आणि मरण. या दहा अवस्थांची लक्षणे सांगून त्यांचा अभिनय कसा करावा याविषयीचे वर्णन केले आहे.

यानंतर पुढे भरताने रतिच्या अवस्थानुसार आणि प्रसिद्ध अशा आठ नायिकांचे वर्णन केले आहे. जसे वासकसज्जा, विरहोत्कंठिता, स्वाधीनपतिका, कलहांतरिता, खंडिता, विप्रलब्धा, प्रोषितभर्तृका, आणि अभिसारिका. या सर्व अष्टनायिकांची लक्षणे व कामतंत्रातील त्यांच्या अनुभावांचे वर्णन करण्यात याठिकाणी करण्यात आले आहे. नाट्यधर्म जाणणाऱ्या नायक व नायिकेने कामावस्थेत कसे वागावे आणि रंगमंचावर काय करू नये याचेही सखोल विवेचन करण्यात आले आहे. स्त्रियांनी कामुक झाल्यावर आणि समागमाच्या वेळी प्रियकराला कोणत्या शब्दाने संबोधावे याची तपशीलवार यादी भरताने दिली आहे. तसेच राजाच्या अंत:पुरातील कामोपचाराचे वर्णन या अध्यायात करण्यात आले आहे.

## तेवीसावा अध्याय - वैशिकोपचार

वेश्या व्यवसायामध्ये जो कुशल आहे आणि जो परस्त्रीशी रतिक्रीडेमध्ये चतुर आहे अशा व्यक्तिला 'वैशिक' असे म्हणतात. जो सर्व कलांनी युक्त असतो, शिल्पकलेमध्ये हुशार असतो आणि स्त्रियांचे चित्त हरण करतो त्या पुरुषाला वैशिक असे म्हणतात. वैशिक पुरुषांचे ३३ गुण या अध्यायात सांगितले आहेत आणि त्याच्या मित्राचे सहा गुण सांगितले आहेत. यानंतर प्रेमासारखे

अत्यंत नाजुक विषयाचे कार्य सोपविण्यासाठी कोणाला दूतीकार्यासाठी निवडावे अशा स्त्रियांच्या गुणांचे वर्णन केले आहे . दूतीने कोणते कार्य कसे करावे हेही स्पष्ट केले आहे .

यानंतर भरताने अनुरक्ता, विरक्ता व कामुकता यांची व्याख्या दिली आहे . नारीला संतुष्ट कसे करावे हे सांगून भरत स्त्रियांच्या तीन प्रकृती सांगतो . त्या म्हणजे उत्तमा, मध्यमा आणि अधमा . वेश्यांची प्रकृती ही त्यांच्या स्वभावानुसार असते . स्त्रीतारुण्याचे चार टप्पे भरताने सांगितले आहेत आणि तसेच पुरुषांच्या पाच प्रकारांचे चतुर, उत्तम, मध्यम, नीच आणि संप्रवृत्त यांचे वर्णन करतो .

स्त्रियांशी संबंध जोडताना पुरुषाने साम, प्रदान, भेद, दंड तर कधी कधी उपेक्षेचा वापर करावा असे सांगितले आहे . सामादिंचा प्रयोग झाल्यावरही नायिका प्राप्त होत नसेल तर बुद्धिमान नायकाने तिची उपेक्षा करावी . तिच्या मागे लागू नये .

अशा प्रकारे जिच्या हृदयातील इच्छा अव्यक्त आहेत, त्या नाना स्वभाव असलेल्या स्त्रियांना आधी समजून घ्यावे आणि त्यानंतर आशय व भावाभाव जाणून स्त्रियांच्या कृतींद्वारा कामतंत्राचा विचार करून मगच पुरुषांनी नारीच्या जवळ जावे . स्त्रियांशी वैशिकाने कसा व्यवहार ठेवावा हे सर्व भरताने या अध्यायात सांगितले आहे .

## चोवीसावा अध्याय - 'पुरुष स्त्री उपचार'

या अध्यायामध्ये उत्तम, मध्यम आणि अधम पुरुषांचे व स्त्रियांचे तीन प्रकारचे स्वभाव सांगितले आहेत . प्रत्येक व्यक्तिच्या चारित्र्यानुसार त्याची प्रकृती ठरते . त्यानुसार नायकाचे चार प्रकार सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे धीरोद्धत, धीरललित, धीरोदात्त आणि धीरप्रशांत . नायकाच्या प्रेमविषयामध्ये नातं निर्माण करण्यासाठी नाट्यसंधिमध्ये अत्यंत उपयोगी पात्र म्हणजे विदूषक . या विदूषकाचेही चार प्रकार सांगितले आहेत . जसे देवजा, राजा, अमात्य आणि ब्राह्मण . यासाठी क्रमश: ऋषि, द्विज, राजजीवी आणि शिष्य यांनाच विदूषक नेमावे असे सांगितले आहे .

यानंतर भरताने दिव्या, नृपपत्नी, कुलांगना आणि गणिका अशा विविध प्रकृती असणाऱ्या नायिकांची लक्षणे सांगून ह्या नायिका धीर, ललित, उदात्त आणि निभृत अशा चार प्रकारच्या असतात असे सांगितले आहे .

राजाच्या गमनागमनास 'आभ्यंतर उपचार' असे म्हणतात आणि राजाहून वेगळ्यांचे गमनागमन होत असेल तर त्यास 'बाह्य उपचार' असे म्हणतात. राजांचे उपचार, राजांच्या अंत:पुरातील स्त्री विभाग, महादेवी, देवी, स्वामिनी, स्थापिता, भोगिनी, शिल्पकारिका, नाटकीया, नर्तकी, अनुचारिका, परिचारिका, संचालिका, प्रेषणकारिका, महत्तरा, प्रतिहारी, कुमारी, वृद्धा, आयुक्तिका इत्यादी स्त्रियांची लक्षणे गुणदोषासह दिली आहेत. अंत:पुरात कोणत्या स्त्रियांनी वावर करावा, राजमहालातील स्त्रियांनी सोबत पाठविण्यासाठी आणि मुलींच्या रक्षणासाठी कोणास नियुक्त करावे हेदेखील स्पष्ट केले आहे. आभ्यंतर उपचाराविषयी सांगून झाल्यानंतर अन्यपुरुषांद्वारे होणाऱ्या बाह्योपचाराविषयी भरताने सविस्तर वर्णन केले आहे. यामध्ये राजा, मंत्री, सचिव, न्यायाधीश इत्यादींची लक्षणे दिलेली आहेत.

---

# तेरावा अध्याय

# कक्ष्या, प्रवृत्ति आणि धर्मी



॥ श्री: ॥

# भरतमुनिविरचितं नाट्यशास्त्रम्

## तेरावा अध्याय

## कक्ष्या, प्रवृत्ति आणि धर्मी

**❖ भूमिक्षेत्राचे विभाग ❖**

**ये तु पूर्व मया प्रोक्तास्त्रयो वै नाट्यमण्डपा: |**
**तेषां विभागं विज्ञाय तत: कक्ष्यां प्रयोजयेत् || १ ||**

**पदच्छेद:** – ये तु पूर्वम् मया प्रोक्ता: त्रय: वै नाट्यमण्डपा: |
तेषाम् विभागम् विज्ञाय तत: कक्ष्याम् प्रयोजयेत् || १ ||

**अन्वय:** – पूर्वम् तु ये मया त्रय: नाट्यमण्डपा: प्रोक्ता: तेषाम् विभागम् विज्ञाय तत: कक्ष्याम् प्रयोजयेत् |

**अर्थ** – मी पूर्वी सांगितलेल्या तीन प्रकारच्या रंगमंचांचे (रंगमंडपांचे) जे विवेचन केले आहे, त्या रंगमंचांचे रंगशीर्ष इत्यादी विशिष्ट विभाग प्रथम समजून घ्यावेत आणि त्यानंतर कक्ष्येचा (क्षेत्राचा) वापर करावा.

**ये नेपथ्यगृहद्वारे मया पूर्व प्रकीर्तिते |**
**तयोर्भाण्डस्य विन्यासो मध्ये काय: प्रयोक्तृभि: || २ ||**

**पदच्छेद:** – ये नेपथ्यगृहद्वारे मया पूर्वम् प्रकीर्तिते |
तयो: भाण्डस्य विन्यास: मध्ये कार्य: प्रयोक्तृभि: || २ ||

**अन्वय:** – पूर्वम् मया ये नेपथ्यगृहद्वारे प्रकीर्तिते तयो: मध्ये प्रयोक्तृभि: भाण्डस्य विन्यास: कार्य: |

**अर्थ** – पूर्वी (दुसऱ्या अध्यायात) मी जे नेपथ्यगृहाचे दोन दरवाजे सांगितले आहेत, त्या दोन दरवाजांमधील जागेत नाट्याचा प्रयोग करणाऱ्यांनी 'भाण्ड' (वाद्ये) ठेवावीत.

**कक्ष्याविभागो निर्देश्यो रङ्गपीठपरिक्रमात् |**
**परिक्रमेण रङ्गस्य ह्यन्या कक्ष्या भवेदिह || ३ ||**

**पदच्छेद :-** कक्ष्याविभाग : निर्देश्य : रङ्गपीठपरिक्रमात् |
परिक्रमेण रङ्गस्य हि अन्या कक्ष्या भवेत् इह || ३ ||

**अन्वय : -** रङ्गपीठपरिक्रमात् कक्ष्याविभाग : निर्देश्य : | इह परिक्रमेण हि रङ्गस्य अन्या कक्ष्या भवेत् |

**अर्थ -** रंगपीठावरील परिक्रमेनुसार अपेक्षित क्षेत्रविभाग सांगण्यात यावे आणि तसेच परिक्रमाद्वारे रंगपीठातील इतर क्षेत्रांचेही (कक्ष्यांचे) विवेचन करावे .

**कक्ष्याविभागे ज्ञेयानि गृहाणि नगराणि च |**
**उद्यानारामसरितस्त्वाश्रमा अटवी तथा || ४ ||**
**पृथिवी सागराश्चैव त्रैलोक्यं सचराचरम् |**
**वर्षाणि सप्तद्वीपाश्च पर्वता विविधास्तथा || ५ ||**
**अलोकश्चैव लोकश्च रसातलमथापि च |**
**दैत्यनागालयाश्चैव गृहाणि भवनानि च || ६ ||**

**पदच्छेद :-** कक्ष्याविभागे ज्ञेयानि गृहाणि नगराणि च |
उद्यान-आराम-सरित : तु आश्रमा : अटवी तथा || ४ ||
पृथिवी सागरा : च एव त्रैलोक्यम् सचराचरम् |
वर्षाणि सप्तद्वीपा : च पर्वता : विविधा : तथा || ५ ||
अलोक : च एव लोक : च रसातलम् अथ अपि च |
दैत्य-नाग-आलया : च एव गृहाणि भवनानि च || ६ ||

**अन्वय : -** कक्ष्याविभागे गृहाणि, नगराणि, उद्यान-आराम-सरित :, आश्रमा :, अटवी, पृथिवी, सागरा :, सचराचरम् त्रैलोक्यम्, वर्षाणि, सप्तद्वीपा :, विविधा : पर्वता :, अलोक :, लोक :, रसातलम्, दैत्यनागालया :, गृहाणि भवनानि च ज्ञेयानि |

**अर्थ** - कक्ष्याविभागात घर, नगर, उद्यान, रतिस्थल, नदी, आश्रम, वन, पृथ्वी, समुद्र, सचराचर त्रिभुवन, भारतवर्ष इत्यादी सगळे देश, सात खंड, विविध पर्वत, लोक आणि अलोक, रसातल, दैत्यलोक आणि सर्पलोक, रतिगृह, भवने इत्यादींचा समावेश आहे .

**नगरे वा वने वापि वर्षे वा पर्वतेऽपि वा |**
**यत्र वार्ता प्रवर्तेत तत्र कक्ष्यां प्रयोजयेत् || ७ ||**

**पदच्छेद:** - नगरे वा वने वा अपि वर्षे वा पर्वते अपि वा |
यत्र वार्ता प्रवर्तेत तत्र कक्ष्याम् प्रयोजयेत् || ७ ||

**अन्वय:** - नगरे, वने, वर्षे, पर्वते वा यत्र वार्ता प्रवर्तेत तत्र कक्ष्याम् प्रयोजयेत् |

**अर्थ** - नगरामध्ये, वनामध्ये, भारत देशामध्ये किंवा पर्वतावर जिथे जिथे वातमी पसरणे अपेक्षित आहे, तिथे तिथे कक्ष्येचा वापर करावा .

**❖ बाह्य, मध्यम, अभ्यन्तर भाग ❖**

**बाह्यं वा मध्यमं वापि तथैवाभ्यन्तरं पुन: |**
**दूरं वा सन्निकृष्टं वा देशं तु परिकल्पयेत् || ८ ||**

**पदच्छेद:** - बाह्यम् वा मध्यमम् वा अपि तथा एव आभ्यन्तरम् पुन: |
दूरम् वा सन्निकृष्टम् वा देशम् तु परिकल्पयेत् || ८ ||

**अन्वय:** - बाह्यम्, मध्यमम्, आभ्यन्तरम् वा पुन: दूरम् सन्निकृष्टम् वा देशम् तु परिकल्पयेत् |

**अर्थ** - रंगपीठाच्या बाहेर, मध्यभागी, आतमध्ये अशा तीन भागांमध्ये दूर अथवा जवळ असलेल्या देशाची कल्पना करावी .

**पूर्वप्रविष्टा ये रङ्गं ज्ञेयास्तेऽभ्यन्तरा बुधै: |**
**पश्चात्प्रविष्टा विज्ञेया कक्ष्याभागे तु बाह्यत: || ९ ||**

**पदच्छेद:** - पूर्वप्रविष्टा: ये रङ्गम् ज्ञेया: ते अभ्यन्तरा: बुधै: |
पश्चात् प्रविष्टा: विज्ञेया: कक्ष्याभागे तु बाह्यत: || ९ ||

**अन्वय: -** ये रङ्गम् पूर्वप्रविष्टा: ते अभ्यन्तरा: इति बुधै: ज्ञेया: | (ये) पश्चात् कक्ष्याभागे प्रविष्टा: ते तु बाह्यत: विज्ञेया: |

**अर्थ -** ज्या प्रमुख पात्रांनी पूर्वीच रंगमंचावर प्रवेश केला असेल, त्या पात्रांना विद्वानांनी 'अभ्यंतर' समजावे आणि जे नंतर कक्ष्या भागात प्रवेश घेतात त्यांना 'बाह्य' समजावे .

**तेषां तु दर्शनेच्छुर्य: प्रविशेद्रङ्गमण्डलम् |**
**दक्षिणाभिमुख: सोऽथ कुर्यादात्मनिवेदनम् || १० ||**

**पदच्छेद: -** तेषाम् तु दर्शनेच्छु: य: प्रविशेत् रङ्गमण्डलम् |
दक्षिणाभिमुख: स: अथ कुर्यात् आत्मनिवेदनम् || १० ||

**अन्वय: -** अथ तेषाम् तु य: दर्शनेच्छु: रङ्गमण्डलम् प्रविशेत् दक्षिणाभिमुख: स: आत्मनिवेदनम् कुर्यात् |

**अर्थ -** त्यापैकी प्रेक्षकांना पाहण्याची इच्छा असणारा जो रंगमंडपात प्रवेश करतो त्याने दक्षिणाभिमुख होऊन आत्मनिवेदनास आरंभ करावा . (नंतर प्रेक्षकाभिमुख व्हावे . )

**❖ पूर्वदिशा लक्षण ❖**

**यतोमुखं भवेद्भाण्डं द्वारं नेपथ्यकस्य च |**
**सा मन्तव्या तु दिक्पूर्वा नाट्ययोगेन नित्यश: || ११ ||**

**पदच्छेद: -** यतोमुखम् भवेत् भाण्डम् द्वारम् नेपथ्यकस्य च |
सा मन्तव्या तु दिक् पूर्वा नाट्ययोगेन नित्यश: || ११ ||

**अन्वय: -** यतोमुखम् (यस्याम् दिशि) भाण्डम् नेपथ्यकस्य द्वारम् च भवेत् सा तु नाट्ययोगेन नित्यश: 'पूर्वा दिक्' मन्तव्या |

**अर्थ -** ज्या दिशेला अभिमुख होऊन वाद्यवृंद बसले असतील आणि तसेच ज्या दिशेला नेपथ्यगृहाचे दार असेल, नाट्यगृहामध्ये त्या दिशेला 'पूर्व दिशा' मानावे .

### ❖ प्रवेश व बाहेर जाण्याची विधि ❖

**निष्क्रामेद्यश्च तस्माद्वै स तेनैव तथा व्रजेत् |**
**यतस्तस्य कृतं तेन पुरुषेण निवेदनम् || १२ ||**

**पदच्छेद :-** निष्क्रामेत् य : च तस्मात् वै स : तेन एव तथा व्रजेत् |
यत : तस्य कृतम् तेन पुरुषेण निवेदनम् || १२ ||

**अन्वय : -** य : यस्मात् (मार्गात्) निष्क्रामेत् च स : तेन एव (मार्गेण) तथा व्रजेत् | यत : तेन पुरुषेण तस्य निवेदनम् कृतम् |

**अर्थ -** नट ज्या दिशेने बाहेर जाईल, त्या दिशेनेच त्याने प्रवेश करावा, कारण त्या व्यक्तीने त्या मार्गाचा अवलंब केला होता .

**निष्क्रान्तोऽर्थवशाच्चापि प्रविशेद्यदि तद्गृहम् |**
**यत: प्राप्त: स पुरुषस्तेन मार्गेण निष्क्रमेत् || १३ ||**

**पदच्छेद :-** निष्क्रान्त : अर्थवशात् च अपि प्रविशेत् यदि तत् गृहम् |
यत : प्राप्त : स : पुरुष : तेन मार्गेण निष्क्रमेत् || १३ ||

**अन्वय : -** निष्क्रान्त : (नट :) यदि अर्थवशात् तत् गृहम् (रङ्गम्) प्रविशेत् (तर्हि) स : पुरुष : यत : (यस्मात् रङ्गपीठम्) प्राप्त : (आगत :) तेन मार्गेण (एव स :) निष्क्रामेत् |

**अर्थ -** बाहेर गेलेल्या नटास काही कारणामुळे रंगमंचावर पुन्हा प्रवेश करायचा असेल तर ज्या मार्गाने रंगमंचावर त्याने प्रवेश केला त्याच मार्गाने बाहेर जावे .

**अथवार्थवशाच्चापि तेनैव सह गच्छति |**
**तथैव प्रविशेद्रङ्गमेकाकी सहितोऽपि वा || १४ ||**

**पदच्छेद :-** अथवा अर्थवशात् च अपि तेन एव सह गच्छति |
तथा एव प्रविशेत् रङ्गम् एकाकी सहित : अपि वा || १४ ||

**अन्वय : -** अथवा अर्थवशात् (नट :) तेन (केनापि अपरेण नटेन) सह गच्छति (तर्हि) स : एकाकी सहित : वा तथा एव रङ्गम् प्रविशेत् |

**अर्थ** - किंवा काही कारणासाठी जेव्हा नट एखाद्या सोबत ज्या मार्गाने बाहेर जातो तेव्हा त्याने एकटे किंवा त्या माणसाबरोबर त्याच मार्गाने प्रवेश करावा.

**तयोश्चापि प्रविशतोः कक्ष्यामन्यां विनिर्दिशेत्।**
**परिक्रमेण रङ्गस्य त्वन्या कक्ष्या विधीयते ॥ १५ ॥**

**पदच्छेद :-** तयोः च अपि प्रविशतोः कक्ष्याम् अन्याम् विनिर्दिशेत्।
परिक्रमेण रङ्गस्य तु अन्या कक्ष्या विधीयते ॥ १५ ॥

**अन्वय :-** अपि च तयोः प्रविशतोः अन्याम् कक्ष्याम् विनिर्दिशेत्। रङ्गस्य परिक्रमेण तु अन्या कक्ष्या विधीयते।

**अर्थ** - आणि तसेच दोन्ही पात्रे प्रवेश करताना दुसरी कक्ष्या सूचित करावी. रंगमंचावर परिक्रमण करून दुसरी कक्ष्या सांगता येते.

**समैश्च सहितो गच्छेन्नीचैश्च परिवारितः।**
**अथ प्रैषणिकाश्चापि निर्देश्या ह्यग्रतो गतौ ॥ १६ ॥**

**पदच्छेद :-** समैः च सहितः गच्छेत् नीचैः च परिवारितः।
अथ प्रैषणिकाः च अपि निर्देश्याः हि अग्रतः गतौ ॥ १६ ॥

**अन्वय :-** गतौ (नटः) समैः सहितः गच्छेत् नीचैः च परिवारितः (भूत्वा) गच्छेत्। अथ प्रैषणिकाः (नटस्य) अग्रतः निर्देश्याः।

**अर्थ** - गतीच्या दृष्टीने नटाने समान स्तर असलेल्या पात्रांसोबत एकत्र चालावे आणि अधम पात्रांसोबत लवाजमा सोबत घेऊन चालावे. तसेच सेवकांनी नटाच्या पुढे चालावे असे सूचित केले आहे.

### ❖ विकृष्टा, मध्या व सन्निकृष्टा भूमी ❖

**सैव भूमिस्तु बहुभिर्विकृष्टा स्यात्परिक्रमैः।**
**मध्या वा संनिकृष्टा वा तेषामेवं विकल्पयेत् ॥ १७ ॥**

**पदच्छेद :-** सा एव भूमि : तु बहुभि : विकृष्टा स्यात् परिक्रमै : |
मध्या वा संनिकृष्टा वा तेषाम् एवम् विकल्पयेत् || १७ ||

**अन्वय : -** बहुभि : परिक्रमै : सा एव तु भूमि : विकृष्टा मध्या वा संनिकृष्टा वा स्यात् | तेषाम् एवम् विकल्पयेत् |

**अर्थ -** परिक्रमणानुसार भूमीचे वेगवेगळे विकल्प आहेत . जसे - रंगमंडपाच्या जमिनीवर जर खूपच परिक्रमण करावे लागत असेल तर ती भूमी विकृष्टा, जर तुलनेने कमी परिक्रमण असेल तर ती 'मध्या' भूमी आणि जर थोडेसेच परिक्रमण करावे लागत असेल तर ती 'सन्निकृष्टा' भूमी म्हणून ओळखली जाते .

**❖ देवपात्रांचे गमन ❖**

**नगरे वा वने वापि पर्वते सागरेऽपि वा |**
**दिव्यानां गमनं कार्यं वर्षे द्वीपेऽपि वा पुन: || १८ ||**
**आकाशेन विमानेन माययाप्यथवा पुन: |**
**विविधाभि: क्रियाभिर्वा नानार्थाभि: प्रयोगत: || १९ ||**

**पदच्छेद :-** नगरे वा वने वा अपि पर्वते सागरे अपि वा |
दिव्यानाम् गमनम् कार्यम् वर्षे द्वीपे अपि वा पुन : || १८ ||
आकाशेन विमानेन मायया अपि अथवा पुन : |
विविधाभि : क्रियाभि : वा नानार्थाभि : प्रयोगत : || १९ ||

**अन्वय : -** प्रयोगत : नगरे, वने, पर्वते, सागरे, वर्षे, द्वीपे वा आकाशेन विमानेन मायया अथवा विविधाभि : नानार्थाभि : क्रियाभि : दिव्यानाम् गमनम् कार्यम् |

**अर्थ -** नाट्यप्रयोगानुसार नगर, जंगल, पर्वत, समुद्र, भारत इत्यादी देश तसेच द्वीप इत्यादी सर्व ठिकाणी आकाशात भ्रमण करणाऱ्या विमानांद्वारे किंवा मायेद्वारे अदृश्य राहून अथवा विविध हेतुपुरस्सर क्रियांद्वारे देवयोनीतील पात्रांनी गमन करावे .

**नाटके च्छन्नवेषाणां दिव्यानां भूमिसंचर: |**
**मानुषै: कारणादेषां यथा भवति दर्शनम् || २० ||**

**पदच्छेद :-** नाटके छन्नवेषाणाम् दिव्यानाम् भूमिसंचर : |
मानुषै : कारणात् एषाम् यथा भवति दर्शनम् || २० ||

**अन्वय : -** नाटके छन्नवेषाणाम् दिव्यानाम् भूमिसंचर : भवेत् यथा मानुषै : कारणात् एषाम् दर्शनम् भवति |

**अर्थ -** नाटकात अव्यक्त देह असणाऱ्या देवयोनीतील पात्रांनी पृथ्वीवर मनुष्यरूपाने संचार करावा; कारण, वरदान इत्यादी मानवी कारणांमुळेच या दिव्यपात्रांचे मनुष्यरूपामध्ये दर्शन होते .

**भारते त्वथ हैमे वा हरिवर्ष इलावृते |**
**रम्ये किम्पुरुषे वापि कुरुषूत्तरकेषु वा || २१ ||**
**दिव्यानां छन्दगमनं वर्षेष्वेतेषु कीर्तितम् |**
**भारते मानुषाणां तु गमनं संविधीयते || २२ ||**

**पदच्छेद :-** भारते तु अथ हैमे वा हरिवर्षे इलावृते |
रम्ये किम्पुरुषे वा अपि कुरुषु उत्तरकेषु वा || २१ ||
दिव्यानाम् छन्दगमनम् वर्षेषु एतेषु कीर्तितम् |
भारते मानुषाणाम् तु गमनम् संविधीयते || २२ ||

**अन्वय : -** अथ दिव्यानाम् छन्दगमनम् भारते, हैमे, हरिवर्षे, इलावृते, रम्ये किम्पुरुषे, उत्तरेकेषु कुरुष वा एतेषु वर्षेषु कीर्तितम् | मानुषाणाम् गमनम् तु भारते संविधीयते |

**अर्थ -** भारतदेश, हिमालय, हरिदेश, इलावृतदेश, रमणीय किन्नर प्रदेश अथवा उत्तरेतील कुरुप्रदेशामध्ये या सर्वठिकाणी देवयोनीतील पात्रांचे गमन प्रसिद्धच आहे . परंतु, मानवांचे गमन केवळ भारतदेशामध्ये सांगण्यात आले आहे .

**विकृष्टं यस्तु गच्छेद्धि देशं कार्यवशान्नर : |**
**अङ्कच्छेदे तमन्यस्मिन्निर्दिशेद्धि प्रवेशके || २३ ||**

**पदच्छेद :-** विकृष्टम् य : तु गच्छेत् हि देशम् कार्यवशात् नर : |
अङ्कच्छेदे तम् अन्यस्मिन् निर्दिशेत् हि प्रवेशके || २३ ||

**अन्वय: -** कार्यवशात् य: नर: (नट:) विकृष्टम् देशम् गच्छेत् तम् अङ्कच्छेदे अन्यस्मिन् प्रवेशके निर्दिशेत्|

**अर्थ -** काही कारणास्तव, एखादा नट दूर देशी गेला असेल तर आधीचा अंक संपल्यावर पुढील अंकाच्या सुरुवातीस प्रवेशकाद्वारे त्याच्याविषयी निर्देश करावा.

**❖ अंकच्छेद आणि काळाचे नियम ❖**

**अह्न: प्रमाणं गत्वा तु कार्यलाभं विनिर्दिशेत् |**
**तथालाभे तु कार्येऽस्या अङ्कच्छेदो विधीयते || २४ ||**

**पदच्छेद: -** अह्न: प्रमाणम् गत्वा तु कार्यलाभम् विनिर्दिशेत्|
तथा अलाभे तु कार्ये अस्या: अङ्कच्छेद: विधीयते || २४ ||

**अन्वय: -** अह्न: प्रमाणम् गत्वा कार्यलाभम् विनिर्दिशेत्| तथा अलाभे तु कार्ये अस्या: अङ्कच्छेद: विधीयते|

**अर्थ -** दिवसाच्या कालमापनानुसार कार्यसिद्धीचा निर्देश करावा. जर तेवढ्या वेळात कुठल्याही प्रकारचा लाभ मिळत नसेल तर तो अंक तेथेच संपवावा असे सांगण्यात आले आहे.

**क्षणो मुहूर्तो यामो वा दिवसो वापि नाटके |**
**एकाङ्के संविधातव्यो बीजस्यार्थवशानुग: || २५ ||**

**पदच्छेद: -** क्षण: मुहूर्त: याम: वा दिवस: वा अपि नाटके|
एकाङ्के संविधातव्य: बीजस्य अर्थवशानुग: || २५ ||

**अन्वय: -** नाटके बीजस्य अर्थवशानुग: (य: कोऽपि) क्षण: मुहूर्त: याम: दिवस: वा (भवेत् स:) एकाङ्के एव संविधातव्य:|

**अर्थ -** नाटकाच्या कथाबीजानुसार जर कथानक क्षणभर (१ मिनिट ३६ सेकंद), मुहूर्तभर (४८ मिनिटे), प्रहरभर (३ तास) किंवा दिवसभर (५ प्रहर = १५ तास) असेल तर ते कथानक एकाच अंकात संपवावे.

**अङ्कच्छेदे तु निर्वृत्तं मासं वा वर्षमेव वा |**
**नोर्ध्वं वर्षात्प्रकर्तव्यं कार्यमङ्कसमाश्रयम् || २६ ||**

**पदच्छेद :-** अङ्कच्छेदे तु निर्वृत्तम् मासम् वा वर्षम् एव वा |
न ऊर्ध्वम् वर्षात् प्रकर्तव्यम् कार्यम् अङ्कसमाश्रयम् || २६ ||

**अन्वय : -** मासम् (यावत् कार्यम्), वर्षम् (यावत् कार्यम्) वा अङ्कच्छेदे निर्वृत्तम् (भवेत्) | अङ्कसमाश्रयम् कार्यम् वर्षात् ऊर्ध्वम् न प्रकर्तव्यम् |

**अर्थ -** महिन्याभराचे कार्य अथवा संपूर्ण वर्षभराचे कार्य अंकाच्या शेवटी संपवावे. एका अंकामध्ये निर्दिष्ट केलेले कार्य एका वर्षापेक्षा अधिक नसावे. म्हणजेच एकापेक्षा अधिक वर्षांमधील घटना सांगावयाच्या असतील तर अधिक अंकांचा प्रयोग करावा.

**एवं तु भारते वर्षे कक्ष्या : कार्या : प्रयोगत : |**
**मानुषाणां गतिर्या तु दिव्यानां तु निबोधत || २७ ||**

**पदच्छेद :-** एवम् तु भारते वर्षे कक्ष्या : कार्या : प्रयोगत : |
मानुषाणाम् गति : या तु दिव्यानाम् तु निबोधत || २७ ||

**अन्वय : -** एवम् तु भारते वर्षे प्रयोगत : कक्ष्या : कार्या : | या मानुषाणाम् गति :, (सा कथिता) | अधुना तु दिव्यानाम् गति : निबोधत |

**अर्थ -** याप्रमाणे भारतदेशामध्ये प्रयोगानुसार कक्ष्येचे विभाग करावेत. ही मनुष्यांची गती सांगितली. आता, दिव्यपात्रांची गती जाणून घ्या.

**❖ हिमालय आणि हेमकूट पर्वतावर निवास करणारे ❖**

**हिमवत्पृष्ठसंस्थे तु कैलासे पर्वतोत्तमे |**
**यक्षाश्च गुह्यकाश्चैव धनदानुचराश्च ये || २८ ||**
**रक्षोभूतपिशाचाश्च सर्वे हैमवता : स्मृता : |**
**हेमकूटे च गन्धर्वा विज्ञेया : साप्सरोगणा : || २९ ||**

**पदच्छेद :-** हिमवत्पृष्ठसंस्थे तु कैलासे पर्वतोत्तमे |
यक्षा : च गुह्यका : च एव धनद-अनुचरा : च ये || २८ ||
रक्षो-भूत-पिशाचा : च सर्वे हैमवता : स्मृता : |
हेमकूटे च गन्धर्वा : विज्ञेया : साप्सरो-गणा : || २९ ||

**अन्वय :** - हिमवत्पृष्ठसंस्थे पर्वतोत्तमे कैलासे ये यक्षा: गुह्यका: (ते) धनद-अनुचरा:, तथा च रक्षो-भूत-पिशाचा: (ते) सर्वे हैमवता: स्मृता:, हेमकूटे च साप्सरो-गणा: गन्धर्वा: विज्ञेया: |

**अर्थ** - हिमालय पर्वताच्या पृष्ठभागावर असणाऱ्या श्रेष्ठ कैलास पर्वतावर राहणारे यक्ष, गुह्यक इत्यादी हे कुबेराचे अनुचर आहेत. तसेच राक्षस, भूत, पिशाच इत्यादी सगळे हैमवत म्हणजेच हिमालय पर्वतावर राहणारे आहेत आणि अप्सरांसोबत गंधर्व हेमकूट पर्वतावर राहतात, असे जाणावे.

**❖ निषध आणि महामेरू पर्वतावर निवास करणारे ❖**

**सर्वे नागाश्च निषधे शेषवासुकितक्षका: |**
**महामेरौ त्रयस्त्रिंशज्ज्ञेया देवगणा बुधै: || ३० ||**

**पदच्छेद :-** सर्वे नागा : च निषधे शेष-वासुकि-तक्षका : |
महामेरौ त्रयस्त्रिंशत् ज्ञेया : देवगणा : बुधै : || ३० ||

**अन्वय :** - शेष-वासुकि-तक्षका: सर्वे नागा: निषधे (प्रान्तस्थे पर्वते) वसन्ति तथा च त्रयस्त्रिंशत् देवगणा : महामेरौ (पर्वते निवसन्ति इति) बुधै : ज्ञेया : |

**अर्थ** - शेष, वासुकी, तक्षक इत्यादी सर्व नाग निषध पर्वतावर राहतात आणि तेहतीस देवतांचे समूह या महामेरू पर्वतावर निवास करतात, असे बुद्धिमान लोकांनी जाणावे.

**❖ नीलगिरि आणि श्वेत पर्वतावर निवास करणारे ❖**

**नीले तु वैडूर्यमये सिद्धा ब्रह्मर्षयस्तथा |**
**दैत्यानां दानवानां च श्वेतपर्वत उच्यते || ३१ ||**

**पदच्छेद :-** नीले तु वैडूर्यमये सिद्धा : ब्रह्मर्षय : तथा |
दैत्यानाम् दानवानाम् च श्वेतपर्वत : उच्यते || ३१ ||

**अन्वय : -** नीले वैडूर्यमये तु सिद्धा : ब्रह्मर्षय : (निवसन्ति) तथा दैत्यानाम् दानवानाम् च (निवास :) श्वेतपर्वत : (इति) उच्यते |

**अर्थ -** वैदूर्यमणी असलेल्या नीलगिरीवर सिद्ध आणि ब्रह्मर्षींचा निवास आहे तसेच दैत्य आणि दानवांचे निवासस्थान म्हणजे श्वेतपर्वत होय .

**❖ शृंगवान पर्वतावर निवास करणारे ❖**

**पितरश्चापि विज्ञेया : शृङ्गवन्तं समाश्रिता : |**
**इत्येते पर्वता : श्रेष्ठा दिव्यावासा भवन्ति हि || ३२ ||**

**पदच्छेद :-** पितर : च अपि विज्ञेया : शृङ्गवन्तम् समाश्रिता : |
इति एते पर्वता : श्रेष्ठा : दिव्यावासा : भवन्ति हि || ३२ ||

**अन्वय : -** अपि च पितर : शृङ्गवन्तम् समाश्रिता : विज्ञेया : | इति एते श्रेष्ठा : पर्वता : दिव्यावासा : (दिव्यानाम् आवासा :) हि भवन्ति |

**अर्थ -** पितरांना शृंगवान पर्वताचे निवासी समजावे . अशाप्रकारे, हे श्रेष्ठ पर्वत दिव्यपात्रांचे निवासस्थान सांगितले गेले आहेत .

**❖ जम्बूद्वीपावर निवास करणारे ❖**

**तेषां कक्ष्याविभागश्च जम्बूद्वीपे भवेदयम् |**
**तेषां न चेष्टितं कार्यं स्वै : स्वै : कर्मपराक्रमै : || ३३ ||**
**परिच्छेदविशेषस्तु तेषां मानुषलोकवत् |**
**सर्वे भावास्तु देवानां कार्या मानुषसंश्रया : || ३४ ||**

**पदच्छेद :-** तेषाम् कक्ष्याविभाग : च जम्बूद्वीपे भवेत् अयम् |
तेषाम् न चेष्टितम् कार्यम् स्वै : स्वै : कर्मपराक्रमै : || ३३ ||

परिच्छेदविशेष: तु तेषाम् मानुषलोकवत् |
सर्वे भावा: तु देवानाम् कार्या: मानुषसंश्रया: || ३४ ||

**अन्वय: -** तेषाम् (दिव्यानाम्) अयम् कक्ष्याविभाग: जम्बूद्वीपे भवेत् | स्वै: स्वै: कर्मपराक्रमै: तेषाम् (दिव्यानाम्) चेष्टितम् न कार्यम् | तेषाम् परिच्छेदविशेष: (परिचार:) तु मानुषलोकवत् (यथा मनुष्यलोके भवति तथैव) भवेत् (यत:) देवानाम् तु सर्वे भावा: मानुषसंश्रया: कार्या: |

**अर्थ -** त्या दिव्यपात्रांचे कक्ष्याविभाग जम्बूद्वीपावर असावेत. स्वत:च्या कर्म आणि पराक्रमानुसार त्यांच्या क्रिया नसाव्यात. त्यांचे फिरणे इत्यादी क्रिया ह्या मानवी असाव्यात कारण, दिव्यपात्रांचे सर्व भाव मनुष्यांप्रमाणेच दर्शवावे.

**❖ भावाभिव्यक्ति ❖**

**तेषां त्वनिमिषत्वं यत्तन्न कार्यं प्रयोक्तृभि: |**
**इह भावा रसाश्चैव दृष्ट्यामेव प्रतिष्ठिता: || ३५ ||**
**दृष्ट्या हि सूचितो भाव: पश्चादङ्गैर्विभाव्यते |**

**पदच्छेद: -** तेषाम् तु अनिमिषत्वम् यत् तत् न कार्यम् प्रयोक्तृभि: |
इह भावा: रसा: च एव दृष्ट्याम् एव प्रतिष्ठिता: || ३५ ||
दृष्ट्या हि सूचित: भाव: पश्चात् अङ्गै: विभाव्यते |

**अन्वय: -** तेषाम् (दिव्यानाम्) तु यत् अनिमिषत्वम् तत् प्रयोक्तृभि: न कार्यम् | इह (अभिनये) भावा: रसा: च दृष्ट्याम् एव प्रतिष्ठिता: | दृष्ट्या हि सूचित: भाव: पश्चात् अङ्गै: विभाव्यते |

**अर्थ -** दिव्यपात्रांच्या अनिमेषत्वाचा (पापण्यांची उघडझाप न होणे याचा) अभिनय नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी करू नये. (अर्थात दिव्य पात्रांचा अभिनय करणाऱ्या नटाने पापण्यांची उघडझाप केल्यास काहीच हरकत मानू नये. कारण) अभिनयामध्ये सर्व भाव हे दृष्टीवरच अवलंबून असतात. डोळ्यांनी दर्शिलेला भाव नंतर अंगांद्वारे व्यक्त होतो.

**एवं कक्ष्याविभागस्तु मया प्रोक्तो द्विजोत्तमा: |**
**पुनश्चैव प्रवक्ष्यामि प्रवृत्तीनां तु लक्षणम् || ३६ ||**

**पदच्छेद :-** एवम् कक्ष्याविभाग: तु मया प्रोक्त: द्विजोत्तमा: |
पुन: च एव प्रवक्ष्यामि प्रवृत्तीनाम् तु लक्षणम् || ३६ ||

**अन्वय: -** हे द्विजोत्तमा:, एवम् मया कक्ष्याविभाग: प्रोक्त: | अधुना पुन: एव प्रवृत्तीनाम् लक्षणम् च प्रवक्ष्यामि |

**अर्थ -** अशा रीतीने हे उत्तम ब्राह्मणांनो, कक्ष्याविभागाचे वर्णन माझ्याकडून पूर्ण झाले . आता पुन्हा एकदा प्रवृत्तींचे लक्षण सांगतो .

**❖ चतुर्विध प्रवृत्तींचे निरूपण ❖**

**चतुर्विधा प्रवृत्तिश्च प्रोक्ता नाट्यप्रयोक्तृभि: |**
**आवन्ती दाक्षिणात्या च पाञ्चाली चौढ्रमागधी || ३७ ||**

**पदच्छेद :-** चतुर्विधा प्रवृत्ति: च प्रोक्ता नाट्यप्रयोक्तृभि: |
आवन्ती दाक्षिणात्या च पाञ्चाली च औढ्रमागधी || ३७ ||

**अन्वय: -** नाट्यप्रयोक्तृभि: चतुर्विधा प्रवृत्ति: प्रोक्ता यथा आवन्ती, दाक्षिणात्या, पाञ्चाली औढ्रमागधी च |

**अर्थ -** नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी चार प्रकारच्या प्रवृत्ती सांगितल्या आहेत . जसे १) आवंती २) दाक्षिणात्य ३) पांचाली आणि ४) औढ्रमागधी .

**अत्राह -** प्रवृत्तिरिति कस्मात्?

**अन्वय:** - यस्मात् प्रातिपदिकार्थयोगात् धातु-छन्दो-निरुक्त-युक्त्या च पदे निपतन्ति तस्मात् निपाताः तु प्रोक्ताः।

**अर्थ** - प्रातिपदिकाच्या अर्थाशी जोडले गेल्याने, धातु, छंद, निरुक्त इत्यादींशी संबंध असल्याने शब्दामध्ये येऊन ते पडतात, म्हणून त्यास 'निपात' असे म्हणतात.

❖ प्रत्यय ❖

**प्रत्ययविभागजनितैः प्रकर्षसंयोगसत्त्ववचनैश्च।**
**यस्मात्पूरयतेऽर्थान् प्रत्यय उक्तस्ततस्तस्मात् ॥ ३४॥**

**पदच्छेद :-** प्रत्ययविभागजनितैः प्रकर्षसंयोगसत्त्ववचनैः च |
यस्मात् पूरयते अर्थान् प्रत्ययः उक्तः ततः तस्मात् || ३४ ||

**अन्वय: -** यस्मात् च प्रत्ययविभागजनितैः प्रकर्षसंयोगसत्त्ववचनैः अर्थान् पूरयते ततः तस्मात् प्रत्ययः उक्तः |
(सत्त्वं तद्भावः यथा सूक्तस्य स्वभावः सौक्त्यम् | - अ . भा . )
(वचनं प्रवचनं काठकम् आदि | - अ . भा . )

**अर्थ -** ज्याच्यामुळे प्रत्ययाचा विभाग केल्यानंतर प्रकर्ष, संयोग, सत्त्व (त्या विशिष्ट वस्तूचा स्वभाव) आणि वचन (व्याख्या, प्रवचन इत्यादी) यांद्वारे अर्थ पूर्ण केला जातो, म्हणूनच त्यांना 'प्रत्यय' असे म्हणतात .

❖ तद्धित ❖

**लोके प्रकृतिप्रत्ययविभागसंयोगसत्त्ववचनेषु |**
**तांस्तान् पूर्यन्तेऽर्थास्तेषु हि तद्धितस्तस्मात् || ३५ ||**

**पदच्छेद :-** लोके प्रकृति-प्रत्यय-विभाग-संयोग-सत्त्व-वचनेषु |
तान् तान् पूर्यन्ते अर्थान् तेषु तद्धितः तस्मात् || ३५ ||

**अन्वय: -** लोके तेषु प्रकृति-प्रत्यय-विभाग-संयोग-सत्त्व-वचनेषु तान् तान् अर्थान् पूर्यन्ते तस्मात् (स) तद्धितः (इति ख्यातः) |
(तस्मै प्रातिपदिकार्थाय हितस्सः प्रातिपदिकार्थं यश्च वा स्वामीकुरुते | - अ . भा . )

**अर्थ -** या विश्वामध्ये प्रकृती आणि प्रत्यय यांचा वियोग, प्रकृती आणि प्रत्यय यांचा संयोग, सत्त्व (त्या विशिष्ट वस्तूचा स्वभाव), वचन (व्याख्या, प्रवचन) इत्यादींद्वारे शब्दाचा तो तो अर्थ पूर्ण केला जातो म्हणून त्यास 'तद्धित' असे म्हणावे .
(तस्मै हितः तद्धितः | तस्मै म्हणजे प्रातिपदिकाचा अर्थ व्यक्त करण्यासाठी जो प्रत्यय ठेवला जातो, त्या प्रत्ययास तद्धित प्रत्यय म्हणावे . )

❖ विभक्ति ❖

**एकस्य बहूनां वा धातोर्लिङ्गस्य वा पदानां वा |**
**विभजन्त्यर्थं यस्मिन् विभक्तयस्तेन ताः प्रोक्ताः || ३६ ||**

**पदच्छेद :** - एकस्य बहूनाम् वा धातो : लिङ्गस्य वा पदानाम् वा |
विभजन्ति अर्थम् यस्मिन् विभक्तय : तेन ता : प्रोक्ता : || ३६ ||

**अन्वय :** - विभक्तय : एकस्य बहूनाम् वा धातो : लिङ्गस्य पदानाम् वा अर्थम् यस्मिन् विभजन्ति तेन ता : (विभक्तय : इति) प्रोक्ता : |

**अर्थ** - एक किंवा अनेक धातूंचा, लिंगाचा, अथवा पदांचा अर्थ ज्याच्या साहाय्याने विभक्त केला जातो म्हणजेच वेगळा दर्शविला जातो, त्यांना 'विभक्ति' असे म्हणतात .

**❖ संधि ❖**

**विशिष्टास्तु स्वरा यत्र व्यञ्जनं वापि योगत : |**
**सन्धीयते पदे यस्मात्तस्मात्सन्धि : प्रकीर्तित : || ३७ ||**

**पदच्छेद :** - विशिष्टा : तु स्वरा : यत्र व्यञ्जनम् वा अपि योगत : |
सन्धीयते पदे यस्मात् तस्मात् सन्धि : प्रकीर्तित : || ३७ ||

**अन्वय :** - पदे यत्र विशिष्टा : स्वरा : व्यञ्जनम् वा योगत : यस्मात् सन्धीयते तस्मात् सन्धि : प्रकीर्तित : | (पद इत्येकपदे नित्या संहितेत्याह | - अ . भा . )

**अर्थ** - एखाद्या पदामध्ये जिथे विशिष्ट स्वर किंवा व्यंजन यांचा संयोग झाल्यामुळे ज्याद्वारे वर्ण एकमेकांच्या अत्यंत जवळ ठेवले जातात, त्यास 'संधि' असे म्हणतात . ('पद' या शब्दातून असे सुचवले आहे की एकाच पदामध्ये संहिता म्हणजेच संधी हा नित्यच करावा . )

**वर्णपदक्रमसिद्ध : पदैकयोगाच्च वर्णयोगाच्च |**
**सन्धीयते च यस्मात्तस्मादुपदिश्यते सन्धि : || ३८ ||**

**पदच्छेद :** - वर्णपदक्रमसिद्ध : पदैकयोगात् च वर्णयोगात् च |
सन्धीयते च यस्मात् तस्मात् उपदिश्यते सन्धि : || ३८ ||

**अन्वय :** - पदैकयोगात् वर्णयोगात् च यस्मात् सन्धीयते तस्मात् सन्धि : उपदिश्यते | (अयम् सन्धि :) वर्णपदक्रमसिद्ध : (अस्ति) |

**अर्थ** - एक पदाचा अन्य पदाशी संबंध आल्यानंतर आणि तसेच एका वर्णाचा अन्य वर्णाशी संबंध आल्यानंतर ज्याच्या साहाय्याने ती पदे अथवा ते वर्ण एकत्र ठेवले जातात, त्यास 'संधि' असे म्हटले जाते . या संधीमध्ये वर्ण आणि पदाचा क्रम निश्चित असतो .

**❖ समास ❖**

**लुप्तविभक्तिर्नाम्नामेकार्थं संहरत्समासोऽपि |**
**तत्पुरुषादिस्तज्ज्ञैर्निर्दिष्टष्षड्विधो विप्रा: ‖ ३९ ‖**

**पदच्छेद: -** लुप्तविभक्ति: नाम्नाम् एकार्थम् संहरत्-समास: अपि |
तत्पुरुषादि: तज्ज्ञै: निर्दिष्ट: षड्विध: विप्रा: ‖ ३९ ‖

**अन्वय: -** हे विप्रा:, नाम्नाम् लुप्तविभक्ति: एकार्थम् संहरत्समास: अपि तज्ज्ञै: तत्पुरुषादि: षड्विध: निर्दिष्ट: |

**अर्थ** - हे विद्वानांनो, नामांच्या विभक्तींचा लोप करून, त्याच एका अर्थाला एकत्र बांधणारा 'समास' तत्पुरुष इत्यादी नावांनी प्रसिद्ध असून तो सहा प्रकाराचा असतो, असे निर्दिष्ट केले आहे .

**❖ निबद्ध काव्य ❖**

**एभि: शब्दविधानैर्विस्तारव्यञ्जनार्थसंयुक्तै: |**
**पदबन्धा: कर्तव्या निबद्धबन्धास्तु चूर्णा वा ‖ ४० ‖**

**पदच्छेद: -** एभि: शब्दविधानै: विस्तारव्यञ्जनार्थसंयुक्तै: |
पदबन्धा: कर्तव्या: निबद्धबन्धा: तु चूर्णा: वा ‖ ४० ‖

**अन्वय: -** एभि: विस्तारव्यञ्जनार्थसंयुक्तै: शब्दविधानै: तु (कविभि:) पदबन्धा: निबद्धबन्धा: चूर्णा: वा कर्तव्या: | (निबद्धो भाविच्छन्दोविधिना बद्ध: संघट्टनायुत: | - अ . भा . )

**अर्थ** - अशा या व्यंजनांच्या विस्तृत अर्थाने युक्त असलेल्या व्याकरणशास्त्राच्या अध्ययनाद्वारे कवींनी पदबंध म्हणजेच छन्दोबद्ध काव्याची किंवा चूर्ण म्हणजेच गद्याची रचना करावी .

### ❖ निबद्ध काव्य ❖

**विभक्त्यन्तं पदं ज्ञेयं निबद्धं चूर्णमेव च |**
**तत्र चूर्णपदस्येह संविबोधत लक्षणम् || ४१ ||**

**पदच्छेद : -** विभक्त्यन्तम् पदम् ज्ञेयम् निबद्धम् चूर्णम् एव च |
तत्र चूर्णपदस्य इह संविबोधत लक्षणम् || ४१ ||

**अन्वय : -** विभक्त्यन्तम् पदम् | (पदैः रचितम् काव्यम् द्विविधम्-) निबद्धम् चूर्णम् च इति ज्ञेयम् | तत्र इह चूर्णपदस्य लक्षणम् संविबोधत |

**अर्थ -** विभक्तीने (विभक्तीच्या प्रत्ययाने) शेवट होणारे म्हणजेच सुबन्त, तिङन्त यांना 'पद' असे म्हणतात. पद म्हणजेच काव्य हे दोन प्रकारचे असतात - निबद्धकाव्य आणि चूर्ण काव्य. निबद्ध म्हणजे छंदोबद्ध रचना. आता चूर्णपदाची लक्षणे मी सांगतो.

### ❖ चूर्णपद ❖

**अनिबद्धपदं छन्दोविधानानियताक्षरम् |**
**अर्थापेक्ष्यक्षरस्यूतं ज्ञेयं चूर्णपदं बुधैः || ४२ ||**

**पदच्छेद : -** अनिबद्धपदम् छन्दोविधान-अनियताक्षरम् |
अर्थ-अपेक्ष्यक्षर-स्यूतम् ज्ञेयम् चूर्णपदम् बुधैः || ४२ ||

**अन्वय : -** चूर्णपदम् अनिबद्धपदम् छन्दोविधान-अनियताक्षरम् अर्थ-अपेक्ष्यक्षर-स्यूतम् (च वर्तते इति) बुधैः ज्ञेयम् |
(अर्थः शृङ्गारवीरादिः, तत् अपेक्ष्यक्षराणि परिमितानि भूयांसि वा, स्यूतानि यत्रेति असमास-संघटनात्मकम् उक्तम् इति | इदं तु केवलं पठनकर्मत्वात् गद्यम् इति उच्यते | - अ. भा.)

**अर्थ -** चूर्णपद हे छंदोबद्ध पद्य नसते. छन्दःशास्त्रामध्ये सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये प्रत्येक चरणात विशिष्ट अक्षरे नसतात. त्यामध्ये शृंगार, वीर इत्यादी रसांना अभिव्यक्त करणारे कमीअधिक शब्दप्रयोग असतात. समासप्रचुर वाक्यरचना यामध्ये नसते, असे विद्वानांनी जाणून घ्यावे. केवळ वाचनक्रियेशी याचा संबंध असल्याने त्यास 'गद्य' असे म्हणतात.

**❖ निबद्ध काव्य ❖**

**निबद्धाक्षरसंयुक्तं यतिच्छेदसमन्वितम्|**
**निबद्धं तु पदं ज्ञेयं प्रमाणनियतात्मकम्||४३||**

**पदच्छेद :-** निबद्धाक्षर-संयुक्तम् यतिच्छेद-समन्वितम्|
निबद्धम् तु पदम् ज्ञेयम् प्रमाण-नियतात्मकम्||४३||

**अन्वय :-** निबद्धाक्षरसंयुक्तम् यतिच्छेदसमन्वितम् प्रमाणनियतात्मकम् पदम् तु निबद्धम् (इति) ज्ञेयम्। (यतिर्विरामः| छेदस्तत्कृतः पदविभागः| पादसंख्यया सामान्यलक्षणम् आह - प्रमाणेन श्रोत्रेन्द्रियेण नियत आत्मा यत्र, श्रव्यम् इत्यर्थः|- अ.भा.)

**अर्थ -** छंदांच्या नियमांनुसार विशिष्ट अक्षरांनी युक्त, यतिस्थानाद्वारे होणारा जो पदच्छेद त्याने युक्त असलेले आणि श्रवणीय असणारे काव्य हे निबद्ध काव्य होय, असे जाणावे.

**❖ छंद आणि वृत्त व्याख्या ❖**

**एवं नानार्थसंयुक्तैः पादैर्वर्णविभूषितैः|**
**चतुर्भिस्तु भवेद्युक्तं छन्दो वृत्ताभिधानवत्||४४||**

**पदच्छेद :-** एवम् नानार्थसंयुक्तैः पादैः वर्णविभूषितैः|
चतुर्भिः तु भवेत् युक्तम् छन्दः वृत्त-अभिधानवत्||४४||

**अन्वय :-** एवम् नानार्थसंयुक्तैः वर्णविभूषितैः चतुर्भिः पादैः युक्तम् छन्दः भवेत्| (तदेव) वृत्ताभिधानवत् (अस्ति)|

**अर्थ -** याप्रमाणे विविध प्रकारच्या अर्थांनी युक्त, वर्णांनी सुशोभित चार चरणांनी युक्त जो तयार होतो, त्यास छंद म्हणावे. या छंदालाच 'वृत्त' देखील म्हणतात.

**❖ छंदांचे प्रकार ❖**

**षड्विंशतिः स्मृतान्येभिः पादैश्छन्दांसि संख्यया|**
**सममर्धसमं चैव तथा विषममेव च ||४५||**
**छन्दोयुक्तं समासेन त्रिविधं वृत्तमिष्यते |**

**पदच्छेद :-** षड्विंशति : स्मृतानि एभि : पादै : छन्दांसि संख्यया |
सम‌म् अर्धसमम् च एव तथा विषमम् एव च || ४५ ||
छन्दोयुक्तम् समासेन त्रिविधम् वृत्तम् इष्यते |

**अन्वय :-** एभि: पादै: संख्यया षड् विंशति: छन्दांसि स्मृतानि | समम् अर्धसमम् तथा च विषमम् (एवम्) त्रिविधम् छन्दोयुक्तम् वृत्तम् समासेन इष्यते |

**अर्थ -** याप्रमाणे पादांच्या संख्येप्रमाणे, छंदाचे २६ प्रकार सांगितले आहेत . सम, अर्धसम आणि विषम असे छंदांनी युक्त असलेल्या वृत्तांचे तीन प्रकार थोडक्यात सांगितले आहेत .

**नानावृत्तविनिष्पन्ना शब्दस्यैषा तनु: स्मृता || ४६ ||**
**छन्दोहीनो न शब्दोऽस्ति न च्छन्दश्शब्दवर्जितम् |**
**एवं तूभयसंयोगो नाट्यस्योद्योतक: स्मृत: || ४७ ||**

**पदच्छेद :-** नानावृत्तविनिष्पन्ना शब्दस्य एषा तनु : स्मृता || ४६ ||
छन्दोहीन : न शब्द : अस्ति न छन्द : शब्दवर्जितम् |
एवम् तु उभयसंयोग : नाट्यस्य उद्योतक : स्मृत : || ४७ ||

**अन्वय :-** नानावृत्तविनिष्पन्ना एषा शब्दस्य तनु: (इति) स्मृता | छन्दोहीन: शब्द: न (अस्ति) शब्दवर्जितम् छन्द : न अस्ति | एवम् तु उभयसंयोग : नाट्यस्य उद्योतक : स्मृत : |

**अर्थ -** विविध प्रकारच्या वृत्तांनी उत्पन्न होणाऱ्या यास शब्दाचे 'शरीर' असे म्हटले आहे . छंदाशिवाय असा कोणताही शब्द नाही आणि शब्दाशिवाय कोणताही छंद नाही . म्हणून दोघांचा संयोग हा नाट्याला तेज प्रदान करणारा आहे, असे म्हटले गेले आहे .

**❖ उक्तापासून मालावृत्त पर्यंत छंदांची लक्षणे ❖**

**एकाक्षरं भवेदुक्तमत्युक्तं द्व्यक्षरं भवेत् |**
**मध्यं त्र्यक्षरमित्याहु: प्रतिष्ठा चतुरक्षरा || ४८ ||**

**पदच्छेद :-** एकाक्षरम् भवेत् उक्तम् अत्युक्तम् द्व्यक्षरम् भवेत् |
मध्यम् त्र्यक्षरम् इति आहु: प्रतिष्ठा चतुरक्षरा || ४८ ||

**अन्वय:** - एकाक्षरम् उक्तम् भवेत् | द्व्यक्षरम् अत्युक्तम् भवेत् | त्र्यक्षरम् मध्यम् चतुरक्षरा (च) प्रतिष्ठा इति आहु:|

**अर्थ** - एका अक्षराच्या छंदाला 'उक्त', दोन अक्षरांच्या छंदाला 'अत्युक्त', तीन अक्षरांच्या छंदाला 'मध्य' आणि चार अक्षरांच्या छंदाला 'प्रतिष्ठा' म्हणतात.

**सुप्रतिष्ठा भवेत्पञ्च षड्गायत्री भवेदिह |**
**सप्ताक्षरा भवेदुष्णिगष्टौ चानुष्टुबिष्यते || ४९ ||**

**पदच्छेद:** - सुप्रतिष्ठा भवेत् पञ्च षड्गायत्री भवेत् इह |
सप्ताक्षरा भवेत् उष्णिग् अष्टौ च अनुष्टुप् इष्यते || ४९ ||

**अन्वय:** - इह पञ्च सुप्रतिष्ठा भवेत् | षड्गायत्री भवेत् | सप्ताक्षरा उष्णिग् भवेत् | अष्टौ च अनुष्टुप् इष्यते |

**अर्थ** - पाच अक्षरांच्या छंदाला 'सुप्रतिष्ठा', सहा अक्षरांच्या छंदाला 'गायत्री', सात अक्षरांच्या छंदाला 'उष्णिक्', आठ अक्षरांच्या छंदाला 'अनुष्टुभ्' असे म्हणतात.

**नवाक्षरा तु बृहती पङ्क्तिश्चैव दशाक्षरा |**
**एकादशाक्षरा त्रिष्टुब्जगती द्वादशाक्षरा || ५० ||**

**पदच्छेद:** - नवाक्षरा तु बृहती पङ्क्ति: च एव दशाक्षरा |
एकादशाक्षरा त्रिष्टुप् जगती द्वादशाक्षरा || ५० ||

**अन्वय:** - नवाक्षरा बृहती एव दशाक्षरा च पङ्क्ति: | एकादशाक्षरा त्रिष्टुप् द्वादशाक्षरा (च) जगती (उच्यते) |

**अर्थ** - नऊ अक्षरांच्या छंदाला 'बृहती', दहा अक्षरांच्या छंदाला 'पंक्ति', अकरा अक्षरांच्या छंदाला 'त्रिष्टुप्', बारा अक्षरांच्या छंदाला 'जगती' म्हणतात.

**त्रयोदशाऽतिजगती शक्वरी तु चतुर्दशा |**
**अतिशक्वरी दशपञ्चा षोडशाष्टि: प्रकीर्तिता || ५१ ||**

**पदच्छेद :-** त्रयोदशा अतिजगती शक्वरी तु चतुर्दशा |
अतिशक्वरी दशपञ्चा षोडशा अष्टि: प्रकीर्तिता || ५१ ||

**अन्वय: -** त्रयोदशा अतिजगती चतुर्दशा शक्वरी अतिशक्वरी दशपञ्चा षोडशा अष्टि: (इति) प्रकीर्तिता |

**अर्थ -** तेरा अक्षरांच्या छंदाला 'अतिजगती', चौदा अक्षरांच्या छंदाला 'शक्वरी', पंधरा अक्षरांच्या छंदाला 'अतिशक्वरी', सोळा अक्षरांच्या छंदाला 'अष्टि' असे म्हणतात .

**तथा सप्तदशात्यष्टि: धृतिरष्टादशाक्षरा |**
**एकोनविंशातिधृति: कृतिर्विंशतिरेव च || ५२ ||**

**पदच्छेद :-** तथा सप्तादशा अत्यष्टि: धृति: अष्टादशाक्षरा |
एकोनविंशा अतिधृति: कृति: विंशति: एव च || ५२ ||

**अन्वय: -** तथा सप्तादशा अत्यष्टि: अष्टादशाक्षरा धृति: एकोनविंशा अतिधृति: विंशति: (च) कृति: (एव स्यात्) |

**अर्थ -** सतरा अक्षरांच्या छंदाला 'अत्यष्टि', अठरा अक्षरांच्या छंदाला 'धृति', एकोणीस अक्षरांच्या छंदाला 'अतिधृति', वीस अक्षरांच्या छंदाला 'कृति' असे म्हणतात .

**प्रकृतिस्त्वेकविंशति: द्वाविंशत्याकृतिस्तथा |**
**विकृति: स्यात् त्रयोविंशा चतुर्विंशा च संकृति: || ५३ ||**

**पदच्छेद :-** प्रकृति: च एकविंशति: द्वाविंशति-आकृति: तथा |
विकृति: स्यात् त्रयोविंशा चतुर्विंशा च संकृति: || ५३ ||

**अन्वय: -** एकविंशति: प्रकृति: द्वाविंशति-आकृति: त्रयोविंशा विकृति: चतुर्विंशा च संकृति: (स्यात्) |

**अर्थ -** एकवीस अक्षरांच्या छंदाला 'प्रकृति', बावीस अक्षरांच्या छंदाला 'आकृति', तेवीस अक्षरांच्या छंदाला 'विकृति', चोवीस अक्षरांच्या छंदाला 'संकृति' असे म्हणतात .

**पञ्चविंशत्यतिकृतिः षड्विंशत्युत्कृतिर्भवेत्।**
**अतोऽधिकाक्षरं छन्दो मालावृत्तमिति स्मृतम्॥ ५४॥**

**पदच्छेदः -** पञ्चविंशति-अतिकृतिः षड्विंशति-उत्कृतिः भवेत्।
अतः अधिकाक्षरम् छन्दः मालावृत्तम् इति स्मृतम्॥ ५४॥

**अन्वयः -** पञ्चविंशत्यतिकृतिः षड्विंशत्युत्कृतिः भवेत्। अतः अधिकाक्षरम् छन्दः 'मालावृत्तम्' इति स्मृतम्।

**अर्थ -** पंचवीस अक्षरांच्या छंदाला 'अतिकृति', सव्वीस अक्षराच्या छंदाला 'उत्कृति' असे म्हणतात. त्यापेक्षा अधिक अक्षरे असलेल्या छंदाला 'मालावृत्त' असे म्हटले गेले आहे.

**❖ अगणित वृत्तसंख्या ❖**

**छन्दसां तु तथा ह्येते भेदाः प्रस्तारयोगतः।**
**असंख्येयप्रमाणानि वृत्तान्याहुरतो बुधाः॥ ५५॥**

**पदच्छेदः -** छन्दसाम् तु तथा हि एते भेदाः प्रस्तारयोगतः।
असंख्येयप्रमाणानि वृत्तानि आहुः अतः बुधाः॥ ५५॥

**अन्वयः -** तथा हि छन्दसाम् एते भेदाः प्रस्तारयोगतः (सन्ति)। अतः बुधाः असंख्येयप्रमाणानि वृत्तानि आहुः।

**अर्थ -** छंदांचे हे विविध प्रकार प्रस्तारांद्वारे तयार होऊ शकतात आणि म्हणूनच बुद्धिमान लोक वृत्तांची संख्या अगणित आहे असे म्हणतात.

**गायत्रीप्रभृतिस्त्वेषां प्रमाणं संविधीयते।**
**प्रयोगजानि सर्वाणि प्रायशो न भवन्ति हि॥ ५६॥**

**पदच्छेदः -** गायत्रीप्रभृतिः तु एषाम् प्रमाणम् संविधीयते।
प्रयोगजानि सर्वाणि प्रायशः न भवन्ति हि॥ ५६॥

**अन्वय:** - गायत्रीप्रभृति: तु एषाम् (छन्दसाम्) प्रमाणम् संविधीयते | हि प्रायश: सर्वाणि (छन्दांसि) प्रयोगजानि न भवन्ति |

**अर्थ** - यापैकी गायत्री इत्यादी प्रमुख छंदांची संख्या सांगत आहोत. कारण बहुतांश सर्वच छंदाचा प्रयोग होतोच असे नाही.

**❖ गायत्रीची आणि उष्णिकाची वृत्तसंख्या ❖**

**वृत्तानि च चतु:षष्टि गायत्र्यां कीर्तितानि तु |**
**शतं विंशतिरष्टौ च वृत्तान्युष्णिगथोच्यते || ५७ ||**

**पदच्छेद:** - वृत्तानि च चतु:षष्टि: गायत्र्याम् कीर्तितानि तु |
शतम् विंशति: अष्टौ च वृत्तानि उष्णिक् अथ उच्यते || ५७ ||

**अन्वय:** - गायत्र्याम् चतु:षष्टि: वृत्तानि कीर्तितानि | अथ च उष्णिक् शतम् अष्टौ विंशति: च वृत्तानि उच्यते |

**अर्थ** - (प्रतिचरण ६ अक्षरे असलेल्या) 'गायत्री'मध्ये चौसष्ट (६४) प्रकारची वृत्ते असतात आणि (प्रतिचरण ७ अक्षरे असलेल्या) 'उष्णिक्'मध्ये एकशे अठ्ठावीस (१२८) वृत्त सांगितली आहेत.

**❖ अनुष्टुभ् आणि बृहती छंदांमधील वृत्तांचे प्रकार ❖**

**षट्पञ्चाशच्छते द्वे च वृत्तानामप्यनुष्टुभि |**
**शतानि पञ्च वृत्तानां बृहत्यां द्वादशैव च || ५८ ||**

**पदच्छेद:** - षट्पञ्चाशत् शते द्वे च वृत्तानाम् अपि अनुष्टुभि |
शतानि पञ्च वृत्तानाम् बृहत्याम् द्वादश एव च || ५८ ||

**अन्वय:** - अनुष्टुभि वृत्तानाम् (संख्या) द्वे शते, षट्पञ्चाशत् अपि च बृहत्याम् पञ्च शतानि, द्वादश च (इति) वृत्तानाम् (संख्या स्यात्) |

**अर्थ** - (प्रतिचरण ८ अक्षरे असलेल्या) 'अनुष्टुभ्' मध्ये वृत्तांचे दोनशे छप्पन्न (२५६) प्रकार आणि (प्रतिचरण ९ अक्षरे असलेल्या) 'बृहती' मध्ये वृत्तांचे पाचशे बारा (५१२) प्रकार सांगितले आहेत.

**❖ पंक्ति आणि त्रिष्टुभ छंदांमधील वृत्तांचे प्रकार ❖**

**पङ्क्त्यां सहस्रं वृत्तानां चतुर्विंशतिरेव तु |**
**त्रैष्टुभे द्वे सहस्रे च चत्वारिंशत्तथाष्ट च ‖ ५९ ‖**

**पदच्छेद:** - पङ्क्त्याम् सहस्रम् वृत्तानाम् चतुर्विंशति: एव तु |
त्रैष्टुभे द्वे सहस्रे च चत्वारिंशत् तथा अष्ट च ‖ ५९ ‖

**अन्वय:** - पङ्क्त्याम् वृत्तानाम् (संख्या) सहस्रम्, चतुर्विंशति: एव | तथा च त्रैष्टुभे (वृत्तानाम् संख्या) द्वे सहस्रे, अष्ट चत्वारिंशत् च (इति) |

**अर्थ** - (प्रतिचरण १० अक्षरे असलेल्या) 'पंक्ति' मध्ये वृत्तांचे एक हजार चोवीस (१०२४) प्रकार आणि (प्रतिचरण ११ अक्षरे असलेल्या) 'त्रिष्टुभ्' मध्ये वृत्तांचे दोन हजार अठ्ठेचाळीस (२०४८) प्रकार होऊशकतात.

**❖ जगती छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**सहस्राण्यथ चत्वारि नवतिश्च षडुत्तरा |**
**जगत्यां समवर्णानां वृत्तानामिह सर्वश: ‖ ६० ‖**

**पदच्छेद:** - सहस्राणि अथ चत्वारि नवति: च षडुत्तरा |
जगत्याम् समवर्णानाम् वृत्तानाम् इह सर्वश: ‖ ६० ‖

**अन्वय:** - अथ इह जगत्याम् समवर्णानाम् वृत्तानाम् सर्वश: चत्वारि सहस्राणि, षडुत्तरा नवति: च (प्रकारा: सन्ति) |

**अर्थ** - समान वर्ण असलेल्या (प्रतिचरण १२ अक्षरे असलेल्या) 'जगती' छंदामध्ये वृत्तांचे चार हजार शहाण्णव (४०९६) प्रकार होऊ शकतात.

❖ अतिजगती छंदामध्यील वृत्तांचे प्रकार ❖

**शतमष्टौ सहस्त्राणि द्व्यधिका नवति: पुन:|**
**जगत्यामतिपूर्वायां वृत्तानां सर्वशो भवेत् || ६१ ||**

**पदच्छेद: -** शतम् अष्टौ सहस्राणि द्व्यधिका नवति: पुन:|
जगत्याम् अतिपूर्वायाम् वृत्तानाम् सर्वश: भवेत् || ६१ ||

**अन्वय: -** पुन: अतिपूर्वायाम् जगत्याम् सर्वश: वृत्तानाम् अष्टौ सहस्राणि, शतम्, द्व्यधिका नवति: भवेत्|

**अर्थ -** (प्रतिचरण १३ अक्षरे असलेल्या) 'अतिजगती' छंदामध्ये वृत्तांचे आठ हजार एकशे ब्याण्णव (८,१९२) प्रकार होतात .

❖ शक्वरी छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖

**शतानि त्रीण्यशीतिश्च सहस्त्राण्यपि षोडश|**
**वृत्तानि चैव चत्वारि शक्वर्या: परिसंख्यया || ६२ ||**

**पदच्छेद: -** शतानि त्रीणि अशीति: च सहस्राणि अपि षोडश|
वृत्तानि च एव चत्वारि शक्वर्या: परिसंख्यया || ६२ ||

**अन्वय: -** शक्वर्या: परिसंख्यया षोडश सहस्राणि, त्रीणि शतानि, अशीति:, चत्वारि च वृत्तानि (भवेत)|

**अर्थ -** (प्रतिचरण १४ अक्षरे असलेल्या) 'शक्वरी' छंदामध्ये मोजून सोळा हजार तीनशे चौऱ्याऐंशी (१६,३८४) वृत्तप्रकार होतात .

❖ अतिशक्वरी छंदामध्ये वृत्तांचे प्रकार ❖

**द्वात्रिंशच्च सहस्राणि सप्त चैव शतानि च |**
**अष्टौ षष्टिश्च वृत्तानि ह्याश्रयन्त्यतिशक्वरीम् || ६३ ||**

**पदच्छेद :-** द्वात्रिंशत् च सहस्राणि सप्त च एव शतानि च |
अष्टौ षष्टि: च वृत्तानि हि आश्रयन्ति अतिशक्वरीम् || ६३ ||

**अन्वय :-** द्वात्रिंशत् सहस्राणि, सप्त शतानि, षष्टि:, अष्टौ च वृत्तानि हि अतिशक्वरीम् आश्रयन्ति |

**अर्थ -** बत्तीस हजार सातशे अडुसष्ट (३२,७६८) वृत्तांनी (प्रतिचरण १५ अक्षरे असलेल्या) 'अतिशक्वरी' छंदाचा आश्रय घेतला आहे .

**❖ अष्टि छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**पञ्चषष्टिसहस्राणि सहस्रार्धं च संख्यया |**
**षट्त्रिंशच्चैव वृत्तानि तथाष्ट्यां गदितानि तु || ६४ ||**

**पदच्छेद :-** पञ्चषष्टिसहस्राणि सहस्रार्धं च संख्यया |
षट्त्रिंशत् च एव वृत्तानि तथा अष्ट्याम् गदितानि तु || ६४ ||

**अन्वय :-** तथा तु अष्ट्याम् संख्यया पञ्चषष्टिसहस्राणि, सहस्रार्धम्, षट्त्रिंशत् च वृत्तानि गदितानि |

**अर्थ -** (प्रतिचरण १६ अक्षरे असलेल्या) 'अष्टि' छंदामध्ये पासष्ठ हजार पाचशे छत्तीस (६५,५३६) वृत्तप्रकार सांगितले आहेत .

**❖ अत्यष्टि छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**एकत्रिंशत्सहस्राणि वृत्तानां च द्विसप्तति: |**
**तथा शतसहस्रं च छन्दस्यत्यष्टिसंज्ञिते || ६५ ||**

**पदच्छेद :-** एकत्रिंशत् सहस्राणि वृत्तानाम् च द्विसप्तति: |
तथा शतसहस्रम् च छन्दसि अत्यष्टिसंज्ञिते || ६५ ||

**अन्वय :-** तथा अत्यष्टिसंज्ञिते छन्दसि वृत्तानाम् शतसहस्रम्, एकत्रिंशत् सहस्राणि, द्विसप्तति: च (संख्या स्यात्) |

**अर्थ -** (प्रतिचरण १७ अक्षरे असलेल्या) 'अत्यष्टि' छंदामध्ये वृत्तांचे एक लाख एकतीस हजार बाहत्तर (१,३१,०७२) प्रकार होतात .

**धृत्यामपि हि पिण्डेन वृत्तान्याकल्पितानि तु |**
**तज्ज्ञैः शतसहस्रे द्वे शतमेकं तथैव च || ६६ ||**
**द्विषष्टिश्च सहस्राणि चत्वारिंशच्च योगतः |**
**चत्वारि चैव वृत्तानि समसंख्याश्रयाणि तु || ६७ ||**

**पदच्छेद :-** धृत्याम् अपि हि पिण्डेन वृत्तानि आकल्पितानि तु |
तज्ज्ञैः शतसहस्रे द्वे शतम् एकम् तथा एव च || ६६ ||
द्विषष्टिः च सहस्राणि चत्वारिंशत् च योगतः |
चत्वारि च एव वृत्तानि समसंख्याश्रयाणि तु || ६७ ||

**अन्वय :-** धृत्याम् पिण्डेन योगतः द्वे शतसहस्रे, द्विषष्टिः सहस्राणि, एकम् शतम्, चत्वारिंशत्, चत्वारि च समसंख्याश्रयाणि वृत्तानि तज्ज्ञैः आकल्पितानि |

**अर्थ -** (प्रतिचरण १८ अक्षरे असलेल्या) 'धृति' छंदामध्ये समसंख्येचा आश्रय घेतलेली एकूण दोन लाख बासष्ठ हजार एकशे चव्वेचाळीस (२,६२,१४४) वृत्त तज्ज्ञांनी सांगितली आहेत .

**❖ अतिधृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**अतिधृत्यां सहस्राणि चतुर्विंशतिरेव च |**
**तथा शतसहस्राणि पञ्च वृत्तशतद्वयम् || ६८ ||**
**अष्टाशीतिश्च वृत्तानि वृत्तज्ञैः कथितानि च |**

**पदच्छेद :-** अतिधृत्याम् सहस्राणि चतुर्विंशतिः एव च |
तथा शतसहस्राणि पञ्च वृत्तशतद्वयम् || ६८ ||
अष्टाशीतिः च वृत्तानि वृत्तज्ञैः कथितानि च |

**अन्वय :-** वृत्तज्ञैः अतिधृत्याम् पञ्च शतसहस्राणि, चतुर्विंशतिः सहस्राणि, वृत्तशतद्वयम्, अष्टाशीतिः च वृत्तानि कथितानि |

**अर्थ** - वृत्त जाणकारांनी (प्रतिचरण १९ अक्षरे असलेल्या) 'अतिधृति' छंदामध्ये पाच लाख चोवीस हजार दोनशे अठ्ठयाऐंशी (५,२४,२८८) प्रकार सांगितले आहेत .

**❖ कृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**कृतौ शतसहस्राणि दश प्रोक्तानि संख्यया || ६९ ||**
**चत्वारिंशत्तथाष्टौ च सहस्राणि शतानि च |**
**पञ्च षट्सप्ततिश्चैव वृत्तानां परिमाणत: || ७० ||**

**पदच्छेद :** - कृतौ शतसहस्राणि दश प्रोक्तानि संख्यया || ६९ ||
चत्वारिंशत् तथा अष्टौ सहस्राणि शतानि च |
पञ्चषट् सप्तति : च एव वृत्तानाम् परिमाणत : || ७० ||

**अन्वय :** - कृतौ परिमाणत : संख्यया वृत्तानाम् दश शतसहस्राणि, अष्टौ चत्वारिंशत् सहस्राणि, पञ्च शतानि, षट्सप्तति : च प्रोक्तानि |

**अर्थ** - (प्रतिचरण २० अक्षरे असलेल्या) 'कृति' छंदामध्ये वृत्तांचे एकूण दहा लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे शहात्तर (१०,४८,५७६) प्रकार सांगितले आहेत .

**❖ प्रकृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**तथा शतसहस्राणां प्रकृतौ विंशतिर्भवेत् |**
**सप्त वै गदितान्यत्र नवतिश्चैव संख्यया || ७१ ||**
**सहस्राणि शतं चैकं द्विपञ्चाशत्तथैव च |**
**वृत्तानि परिमाणेन वृत्तज्ञैर्गदितानि तु || ७२ ||**

**पदच्छेद :** - तथा शतसहस्राणाम् प्रकृतौ विंशति : भवेत् |
सप्त वै गदितानि अत्र नवति : च एव संख्यया || ७१ ||
सहस्राणि शतम् च एकम् द्विपञ्चाशत् तथा एव च |
वृत्तानि परिमाणेन वृत्तज्ञै : गदितानि तु || ७२ ||

**अन्वय :** - प्रकृतौ संख्यया शतसहस्राणाम् विंशति : भवेत् | तथा च सप्तनवति : सहस्राणि, एकम् शतम्, द्विपञ्चाशत् च वृत्तानि परिमाणेन वृत्तज्ञै : अत्र गदितानि |

**अर्थ** - (प्रतिचरण २१ अक्षरे असलेल्या) प्रकृति छंदामध्ये एकूण वीस लाख सत्याण्णव हजार एकशे बावन (२०,९७,१५२) वृत्तप्रकार वृत्त जाणकारांनी सांगितले आहेत.

**❖ आकृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**चत्वारिंशत्तथैकं च सहस्राणां शतानि तु |**
**तथा चेह सहस्राणि नवतिश्चतुरुत्तरा || ७३ ||**
**शतत्रयं समाख्यातं ह्याकृत्यां चतुरुत्तरम् |**

**पदच्छेद:** - चत्वारिंशत् तथा एकम् च सहस्राणाम् शतानि तु |
तथा च इह सहस्राणि नवति: चतुरुत्तरा || ७३ ||
शतत्रयम् समाख्यातम् हि आकृत्याम् चतुरुत्तरम् |

**अन्वय:** - आकृत्याम् एकम् चत्वारिंशत् सहस्राणाम् शतानि, चतुरुत्तरा नवति: सहस्राणि, चतुरुत्तरम् शतत्रयम् (इति) इह समाख्यातम् |

**अर्थ** - (प्रतिचरण २२ अक्षरे असलेल्या) 'आकृति' छंदामध्ये वृत्तांचे एकेचाळीस लाख चौऱ्याण्णव हजार तीनशे चार (४१,९४,३०४) प्रकार याठिकाणी सांगितले आहेत.

**❖ विकृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**ज्ञेया शतसहस्राणामशीतिस्त्र्यधिका बुधै: || ७४ ||**
**अष्टाशीति सहस्राणि वृत्तानां षट्छतानि च |**
**अष्टौ चैव तु वृत्तानि विकृत्यां गदितानि तु || ७५ ||**

**पदच्छेद:** - ज्ञेया शतसहस्राणाम् अशीति: त्र्यधिका बुधै: || ७४ ||
अष्टाशीति सहस्राणि वृत्तानाम् षट् शतानि च |
अष्टौ च एव तु वृत्तानि विकृत्याम् गदितानि तु || ७५ ||

**अन्वय:** - विकृत्याम् वृत्तानाम् शतसहस्राणाम् त्र्यधिका अशीति:, अष्टाशीति सहस्राणि, षट् शतानि अष्टौ एव च तु वृत्तानि गदितानि (तानि) तु बुधै: ज्ञेया |

**अर्थ** - (प्रतिचरण २३ अक्षरे असलेल्या) 'विकृति' छंदामध्ये वृत्तांचे त्र्याऐंशी लाख अठ्ठयाऐंशी हजार सहाशे आठ (८३,८८,६०८) प्रकार होतात. हे प्रकार विद्वानांनी जाणून घ्यावेत.

**❖ संकृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**तथा शतसहस्राणि सप्तषष्टिश्च सप्तति:|**
**सप्त चैव सहस्राणि षोडश द्वे शते तथा || ७६ ||**
**कोटिश्चैवेह वृत्तानि संकृतौ कथितानि वै |**

**पदच्छेद:** - तथा शतसहस्राणि सप्तषष्टि: च सप्तति:|
सप्त च एव सहस्राणि षोडश द्वे शते तथा || ७६ |||
कोटि: च एव इह वृत्तानि संकृतौ कथितानि वै |

**अन्वय:** - संकृतौ कोटि:, सप्तषष्टि: शतसहस्राणि, सप्त सप्तति: सहस्राणि, द्वे शते, षोडश वृत्तानि इह कथितानि |

**अर्थ** - (प्रतिचरण २४ अक्षरे असलेल्या) 'संकृति' छंदामध्ये एक करोड सदुसष्ठ लाख सत्यात्तर हजार दोनशे सोळा (१,६७,७७,२१६) वृत्तप्रकार याठिकाणी सांगितले आहेत.

**❖ अभिकृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**कोटित्रयं चाभिकृत्यां पञ्चत्रिंशदि्भरन्वितम् || ७७ ||**
**पञ्चाशदि्भ: सहस्रैश्च चतुर्भिरधिकैस्तथा |**
**चतुष्टयं शतानां च द्वात्रिंशदि्भ: समन्वितम् || ७८ ||**

**पदच्छेद:** - कोटित्रयम् च अभिकृत्याम् पञ्चत्रिंशदि्भ: अन्वितम् || ७७ ||
पञ्चाशदि्भ: सहस्रै: च चतुर्भि: अधिकै: तथा |
चतुष्टयम् शतानाम् च द्वात्रिंशदि्भ: समन्वितम् || ७८ ||

**अन्वय:** - अभिकृत्याम् कोटित्रयम्, पञ्चत्रिंशद्भि: (शतसहस्रै:) अन्वितम्, पञ्चाशद्भि: चतुर्भि: सहस्रै:, द्वात्रिंशद्भि: अधिकै: समन्वितम् शतानाम् चतुष्टयम् च (इति प्रकारा: भवन्ति)|

**अर्थ** - (प्रतिचरण २५ अक्षरे असलेल्या) 'अभिकृति' छंदामध्ये वृत्तांचे तीन करोड पस्तीस लाख चोपन्न हजार चारशे बत्तीस (३,३५,५४,४३२) प्रकार होतात .

**❖ उत्कृति छंदामधील वृत्तांचे प्रकार ❖**

**षट्कोटयस्तथोत्कृत्यां लक्षाणामेकसप्तति:|**
**चतुष्षष्टि: शतान्यष्टौ सहस्राण्यष्ट एव तु || ७९ ||**

**पदच्छेद:** - षट्कोटय: तथा उत्कृत्याम् लक्षाणाम् एकसप्तति:|
चतुष्षष्टि: शतानि अष्टौ सहस्राणि अष्ट एव तु || ७९ ||

**अन्वय:** - तथा उत्कृत्याम् षट्कोटय:, लक्षाणाम् एकसप्तति:, अष्टौ सहस्राणि, अष्ट शतानि, चतुष्षष्टि: (च वृत्तानि उक्तानि)|

**अर्थ** - (प्रतिचरण २६ अक्षरे असलेल्या) 'उत्कृति' छंदामध्ये सहा करोड एकाहत्तर लाख आठ हजार आठशे चौसष्ठ (६,७१,०८,८६४) वृत्तप्रकार सांगितले आहेत .

**उक्ताद्युत्कृतिपर्यन्तं वृत्तसंख्यां विचक्षण:|**
**एतेन च विकल्पेन वृत्तेष्वेतेषु निर्दिशेत् || ८० ||**

**पदच्छेद:** - उक्तादि-उत्कृतिपर्यन्तम् वृत्तसंख्याम् विचक्षण:|
एतेन च विकल्पेन वृत्तेषु एतेषु निर्दिशेत् || ८० ||

**अन्वय:** - विचक्षण: उक्तादि-उत्कृतिपर्यन्तम् वृत्तसंख्याम् एतेन विकल्पेन एतेषु वृत्तेषु निर्दिशेत्|

**अर्थ** - विद्वान व्यक्तीने उक्तापासून ते उत्कृतिपर्यंतच्या वृत्तांची संख्या जाणून योग्य विकल्पाद्वारे त्या त्या वृत्तांमध्येच त्याचा प्रयोग करावा .

**❖ गणन पद्धतीनुसार वृत्त ❖**

**सर्वेषां छन्दसामेवं वृत्तानि कथितानि वै |**
**तिस्र: कोटयो दश तथा सहस्राणां शतानि तु || ८१ ||**

**चत्वारिंशत्तथा द्वे च सहस्राणि दशैव तु |**
**सप्तभि: सहितान्येव सप्त चैव शतानि च || ८२ ||**
**षड्विंशतिरिहान्यानि व्याख्यातानि समासत: |**
**समानि गणनायुक्तिमाश्रित्य कथितानि वै || ८३ ||**

**पदच्छेद: -** सर्वेषाम् छन्दसाम् एवम् वृत्तानि कथितानि वै |
तिस्र: कोट्य: दश तथा सहस्राणाम् शतानि तु || ८१ ||
चत्वारिंशत् तथा द्वे च सहस्राणि दश एव तु |
सप्तभि: सहितानि एव सप्त च एव शतानि च || ८२ ||
षड्विंशति: इह अन्यानि व्याख्यातानि समासत: |
समानि गणनायुक्तिम् आश्रित्य कथितानि वै || ८३ ||

**अन्वय: -** एवम् सर्वेषाम् छन्दसाम् तिस्र: दश कोट्य:, द्वे चत्वारिंशत् सहस्राणाम् शतानि, सप्तभि: सहितानि दश सहस्राणि, सप्त शतानि षड्विंशति: च वृत्तानि कथितानि | इह गणनायुक्तिम् आश्रित्य अन्यानि समानि वृत्तानि समासत: व्याख्यातानि |

**अर्थ -** याप्रमाणे सर्व छंदाच्या वृत्तांची एकूण संख्या तेरा करोड बेचाळीस लाख सतरा हजार सातशे सव्वीस (१३,४२,१७,७२६) अशी आहे. याठिकाणी गणनापद्धतीनुसार अन्य समवृत्तांविषयी थोडक्यात सांगितले आहे. (याठिकाणी गायत्रीपासून सर्व वृत्तप्रकारांची एकूण संख्या १३,४२,१७,६६४ आणि उक्तापासून सुप्रतिष्ठापर्यंतचे ६२ वृत्तप्रकार असे मिळून एकूण वृत्तसंख्या १३,४२,१७,७२६ अशी होते.)

**❖ त्रिक ❖**

**सर्वेषां छन्दसामेवं त्रिकैर्वृत्तं प्रयोजयेत् |**
**ज्ञेया ह्यष्टौ त्रिकास्तत्र संज्ञाभि: स्थानमक्षरम् || ८४ ||**

**पदच्छेद: -** सर्वेषाम् छन्दसाम् एवम् त्रिकै: वृत्तम् प्रयोजयेत् |
ज्ञेया: हि अष्टौ त्रिका: तत्र संज्ञाभि: स्थानम् अक्षरम् || ८४ ||

**अन्वय: -** एवम् सर्वेषाम् छन्दसाम् त्रिकै: वृत्तम् प्रयोजयेत् | अष्टौ हि त्रिका: ज्ञेया: तत्र संज्ञाभि: स्थानम् अक्षरम् (च अपि ज्ञेयम्) |

**अर्थ** - याप्रमाणे सर्वच छंदांबाबत त्रिकांद्वारे वृत्ताचा प्रयोग केला जातो . त्रिक हे आठ आहेत आणि त्याच्या संज्ञेनुसार स्थान आणि अक्षरही जाणून घ्यावे .

**त्रीण्यक्षराणि विज्ञेयस्त्रिकांश: परिकल्पित: |**
**गुरुलघ्वक्षरकृत: सर्ववृत्तेषु नित्यश: || ८५ ||**

**पदच्छेद: -** त्रीणि अक्षराणि विज्ञेय: त्रिकांश: परिकल्पित: |
गुरुलघ्वक्षरकृत: सर्ववृत्तेषु नित्यश: || ८५ ||

**अन्वय: -** त्रीणि अक्षराणि परिकल्पित: सर्ववृत्तेषु गुरुलघ्वक्षरकृत: त्रिकांश: नित्यश: विज्ञेय: |

**अर्थ** - तीन अक्षरांना प्रमाण म्हणून मानला गेलेला, सर्व वृत्तांमध्ये गुरू आणि लघु अक्षरांनी तयार झालेला त्रिकांच्या प्रकारांना नेहमी जाणून घ्यावे .

**❖ गुरू व लघुची लक्षणे ❖**

**गुरुपूर्वो भकार: स्यान्मकारस्य गुरुत्रयम् |**
**जकारो गुरुमध्यस्तु सकारोऽन्तगुरुस्तथा || ८६ ||**
**लघुमध्यस्तु रेफ: स्यात्तकारोऽन्तलघुस्तथा |**
**लघुपूर्वो यकारस्तु नकारस्तु लघुत्रयम् || ८७ ||**

**पदच्छेद: -** गुरुपूर्व: भकार: स्यात् मकारस्य गुरुत्रयम् |
जकार: गुरुमध्य: तु सकार: अन्तगुरु: तथा || ८६ ||
लघुमध्य: तु रेफ: स्यात् तकार: अन्तलघु: तथा |
लघुपूर्व: यकार: तु नकार: तु लघुत्रयम् || ८७ ||

**अन्वय: -** गुरुपूर्व: भकार: मकारस्य गुरुत्रयम् स्यात् | जकार: तु गुरुमध्य: तथा सकार: अन्तगुरु: लघुमध्य: तु रेफ: अन्तलघु: तकार: तथा लघुपूर्व: यकार: तु लघुत्रयम् तु नकार: स्यात् |

**अर्थ** - ज्यामध्ये पहिला वर्ण गुरू आणि बाकीचे लघू असतात तो 'भ' गण होय - (ISS)
तीनही वर्ण गुरू असल्यास तो 'म' गण होय - (III)
जर मध्यभागी गुरू असेल तर तो 'ज' गण गण - (SIS)
शेवटी गुरू असल्यास तो 'स' गण - (SSI)

मध्यभागी लघु असल्यास तो 'र' गण - (ISI)
अंती लघु असल्यास तो 'त' गण - (IIS)
सुरूवातीस लघु असल्यास तो 'य' गण - (SII)
तीनही वर्ण लघु असल्यास 'न' गण - (SSS)
हे आठ प्रकारचे त्रिक आहेत .

**एते ह्यष्टौ त्रिका नाम्ना विज्ञेया : ब्रह्मसम्भवा : |**
**लाघवार्थं पुनरमी छन्दोमानमवेक्ष्य च || ८८ ||**

**पदच्छेद : -** एते हि अष्टौ त्रिका : नाम्ना विज्ञेया ब्रह्मसम्भवा : |
लाघवार्थम् पुन : अमी छन्दोमानम् अवेक्ष्य च || ८८ ||

**अन्वय : -** एते हि अष्टौ ब्रह्मसम्भवा : त्रिका : नाम्ना विज्ञेया : | छन्दोमानम् अवेक्ष्य च पुन : अमी लाघवार्थम् विज्ञेया : |

**अर्थ -** ब्रह्माद्वारे उत्पन्न झालेले हे आठ त्रिक नावानुसार जाणून घ्यावे . छंदांचे मोजमाप पाहून पुन्हा संक्षेप साधण्यासाठी हे पुन्हा जाणून घ्यावेत .

**एभ्यो विनिर्गताश्चान्या जातयोऽथ समादय : |**
**अस्वरा : सस्वराश्चैव प्रोच्यन्ते वृत्तलक्षणै : || ८९ ||**

**पदच्छेद : -** एभ्य : विनिर्गता : च अन्या जातय : अथ समादय : |
अस्वरा : सस्वरा : च एव प्रोच्यन्ते वृत्तलक्षणै : || ८९ ||

**अन्वय : -** अथ एभ्य : अन्या समादय : जातय : विनिर्गता : | वृत्तलक्षणै : अस्वरा : सस्वरा : च प्रोच्यन्ते |

**अर्थ -** या त्रिकांच्या आधारे इतर सम, (अर्धसम, विषम इत्यादी) जाती निर्माण झाल्या आहेत . वृत्त-लक्षण-विद्वानांनी यांस अस्वर आणि सस्वर असेही म्हटले आहे .

**गुर्वेकं ग् इति विज्ञेयं तथा लघु ल् इति स्मृतम् |**
**नियत : पदविच्छेदो यतिरित्यभिधीयते || ९० ||**

**पदच्छेद: -** गुरु एकम् गइति विज्ञेयम् तथा लघु ल् इति स्मृतम् |
नियत: पदविच्छेद: यति: इति अभिधीयते || ९० ||

**अन्वय: -** ग् इति एकम् गुरु विज्ञेयम् तथा ल् इति लघु स्मृतम् | नियत: पदविच्छेद: यति: इति अभिधीयते |

**अर्थ -** 'ग'या एका वर्णाला 'गुरु' म्हणावे आणि 'ल' वर्णाला 'लघू' समजावे. योग्य स्थानी केलेला पदविच्छेद 'यति' या नावाने ओळखला जातो.

**गुरु दीर्घं प्लुतं चैव संयोगपरमेव च |**
**सानुस्वारविसर्गं च तथान्त्यं च लघु क्वचित् || ९१ ||**

**पदच्छेद: -** गुरु दीर्घम् प्लुतम् च एव संयोगपरम् एव च |
सानुस्वारविसर्गम् च तथा अन्त्यम् च लघु क्वचित् || ९१ ||

**अन्वय: -** दीर्घम्, प्लुतम्, संयोगपरम्, सानुस्वारविसर्गम्, क्वचित् अन्त्यम् च लघु गुरु (भवति) |

**अर्थ -** दीर्घस्वर, प्लुतस्वर, जोडाक्षरापूर्वीचा वर्ण, अनुस्वार आणि विसर्गयुक्त वर्ण, पादांच्या शेवटी येणारा लघु वर्णदेखील गुरू होतो.

**❖ गायत्री इत्यादी छंदामध्ये त्रिकादिगण संख्या ❖**

**गायत्र्यां द्वौ त्रिकौ ज्ञेयावुष्णिगेकाक्षराधिका |**
**अनुष्टुब्द्व्यधिका चैव बृहत्यां च त्रिकास्त्रय: || ९२ ||**

**पदच्छेद: -** गायत्र्याम् द्वौ त्रिकौ ज्ञेयौ उष्णिक् एकाक्षराधिका |
अनुष्टुप् द्व्यधिका च एव बृहत्याम् च त्रिका: त्रय: || ९२ ||

**अन्वय: -** गायत्र्याम् द्वौ त्रिकौ ज्ञेयौ उष्णिक् एकाक्षराधिका | अनुष्टुप् द्व्यधिका एव च बृहत्याम् च त्रय: त्रिका: (सन्ति) |

**अर्थ -** 'गायत्री' छंदामध्ये प्रतिचरण दोन त्रिके असतात. 'उष्णिक्' छंदामध्ये प्रतिचरण दोन त्रिके आणि एक अक्षर अधिक असते. 'अनुष्टुभ्' छंदामध्ये दोन त्रिके आणि दोन अक्षरे अधिक म्हणजेच प्रतिचरण ८ अक्षरे असतात. तसेच 'बृहती' छंदामध्ये तीन त्रिके म्हणजेच प्रतिचरण ९ अक्षरे असतात.

**एकाक्षराधिका पङ्क्तिस्त्रिष्टुप् च द्व्यधिकाक्षरा |**
**चतुस्त्रिका तु जगती सैकातिजगती पुन: || ९३ ||**

**पदच्छेद: -** एकाक्षराधिका पङ्क्ति: त्रिष्टुप् च द्व्यधिकाक्षरा |
चतुस्त्रिका तु जगती सा एका अतिजगती पुन: || ९३ ||

**अन्वय: -** एकाक्षराधिका पङ्क्ति:, द्व्यधिकाक्षरा त्रिष्टुप्, चतुस्त्रिका जगती, पुन: एका सा अतिजगती (भवति) |

**अर्थ -** 'पंक्ति' छंदामध्ये तीन त्रिके आणि एक अक्षर अधिक म्हणजेच प्रतिचरण १० अक्षरे असतात. 'त्रिष्टुभ्' छंदामध्ये तीन त्रिके आणि दोन अक्षरे अधिक म्हणजेच प्रतिचरण ११ अक्षरे असतात. 'जगती' छंदामध्ये चार त्रिके म्हणजेच प्रतिचरण १२ अक्षरे असतात आणि 'अतिजगती' छंदामध्ये चार त्रिके आणि १ अक्षर अधिक म्हणजेच प्रतिचरण १३ अक्षरे असतात.

**शक्वरी द्व्यधिका पञ्चत्रिका ज्ञेयातिशक्वरी |**
**एकाधिकाक्षराष्टिश्च द्व्यधिकात्यष्टिरुच्यते || ९४ ||**

**पदच्छेद: -** शक्वरी द्व्यधिका पञ्चत्रिका ज्ञेया अतिशक्वरी |
एकाधिकाक्षरा अष्टि: च द्व्यधिका अत्यष्टि: उच्यते || ९४ ||

**अन्वय: -** द्व्यधिका शक्वरी, पञ्चत्रिका अतिशक्वरी ज्ञेया | एकाधिकाक्षरा अष्टि: द्व्यधिका च अत्यष्टि: उच्यते |

**अर्थ -** 'शक्वरी' छंदामध्ये चार त्रिके आणि दोन अक्षरे अधिक म्हणजेच प्रतिचरण १४ अक्षरे असतात. 'अतिशक्वरी' छंदामध्ये पाच त्रिके म्हणजेच प्रतिचरण १५ अक्षरे असतात. 'अष्टि' छंदामध्ये पाच त्रिके आणि एक अक्षर अधिक म्हणजेच प्रतिचरण १६ अक्षरे असतात. 'अत्यष्टि' छंदामध्ये पाच त्रिके आणि दोन अक्षरे अधिक म्हणजेच प्रतिचरण १७ अक्षरे असतात.

**षट्त्रिकास्तु धृति: प्रोक्ता सैका चातिधृतिस्तथा |**
**कृतिश्च द्व्यधिका प्रोक्ता प्रकृत्यां सप्त वै त्रिका: || ९५ ||**

**पदच्छेद :-** पट्त्रिका : तु धृति : प्रोक्ता सा एका च अतिधृति : तथा |
कृति : च द्व्यधिका प्रोक्ता प्रकृत्याम् सप्त वै त्रिका : || ९५ ||

**अन्वय : -** धृति : पट्त्रिका : तथा च सा (धृति :) एकाधिका चेत् अतिधृति : प्रोक्ता | कृति : च द्व्यधिका प्रोक्ता प्रकृत्याम् सप्त त्रिका : (सन्ति) |

**अर्थ -** 'धृति' छंदामध्ये सहा त्रिके म्हणजेच प्रतिचरण १८ अक्षरे असतात. 'अतिधृति' छंदामध्ये सहा त्रिके आणि एक अक्षर अधिक म्हणजेच प्रतिचरण १९ अक्षरे असतात. 'कृति' छंदामध्ये सहा त्रिके आणि दोन अक्षरे अधिक म्हणजेच प्रतिचरण २० अक्षरे असतात. 'प्रकृति' छंद सात त्रिकांचा असतो. म्हणजेच त्यामध्ये प्रतिचरण २१ अक्षरे असतात.

**आकृतिस्त्वधिकैकेन द्व्यधिका विकृतिस्तथा |**
**संकृत्यां तु त्रिका ह्यष्टौ सैका त्वभिकृतिर्भवेत् |**
**उत्कृतिर्द्व्यधिका चैव विज्ञेया गणमानत: || ९६ ||**

**पदच्छेद :-** आकृति : तु अधिक-एकेन द्व्यधिका विकृति : तथा |
संकृत्याम् तु त्रिका : हि अष्टौ सा एका तु अभिकृति : भवेत् |
उत्कृति : द्व्यधिका च एव विज्ञेया गणमानत : || ९६ ||

**अन्वय : -** अधिक-एकेन तु आकृति : तथा द्व्यधिका विकृति : भवेत् | संकृत्याम् तु अष्टौ त्रिका : सा हि एका तु अभिकृति : (भवेत्) | उत्कृति : च गणमानत : द्व्यधिका एव विज्ञेया |

**अर्थ -** 'आकृति' छंदामध्ये सात त्रिके आणि एक अक्षर अधिक म्हणजेच प्रतिचरण २२ अक्षरे असतात. 'विकृति' छंदामध्ये सात त्रिके आणि दोन अक्षरे अधिक म्हणजेच प्रतिचरण २३ अक्षरे असतात. 'संकृति' छंदामध्ये आठ त्रिके म्हणजेच प्रतिचरण २४ अक्षरे असतात. 'अभिकृति' छंदामध्ये आठ त्रिके आणि एक अक्षर अधिक म्हणजेच प्रतिचरण २५ अक्षरे असतात आणि 'उत्कृति' छंदामध्ये आठ त्रिके आणि दोन अक्षरे अधिक म्हणजेच प्रतिचरण २६ अक्षरे असतात.

**❖ छंद:शास्त्रातील नियम ❖**

**गुर्वेकं ग इति प्रोक्तं गुरुणी गाविति स्मृतौ |**
**लघ्वेकं ल इति ज्ञेयं लघुनी लाविति स्मृतौ || ९७ ||**

**पदच्छेद :-** गुरु एकम् ग इति प्रोक्तम् गुरुणी गौ इति स्मृतौ |
लघु एकम् ल इति ज्ञेयम् लघुनी लौ इति स्मृतौ || ९७ ||

**अन्वय : -** एकम् गुरु 'ग' इति प्रोक्तम् | गुरुणी 'गौ' इति स्मृतौ | एकम् लघु 'ल' इति ज्ञेयम् | लघुनी 'लौ' इति स्मृतौ |

**अर्थ -** एका गुरू वर्णाला 'ग' (ऽ) असे म्हटले गेले आहे. दोन गुरू वर्णांना 'गौ' (ऽऽ)असे म्हटले जाते. एका लघू वर्णाला 'ल' (।) असे म्हटले गेले आहे आणि दोन लघू वर्णांना 'लौ' (।।) समजावे.

**सम्पद्विरामपादाश्च देवता स्थानमक्षरम् |**
**वर्ण : स्वरा विधिर्वृत्तमिति छन्दोगतो विधि : || ९८ ||**

**पदच्छेद :-** सम्पद्-विराम-पादा : च देवतास्थानम् अक्षरम् |
वर्ण : स्वरा : विधि : वृत्तम् इति छन्दोगत : विधि : || ९८ ||

**अन्वय : -** सम्पद् विरामपाद: देवता स्थानम् अक्षरम् वर्ण: स्वरा: विधि: वृत्तम् इति छन्दोगत: विधि: |

**अर्थ -** या संपद, विराम, पाद, देवता, स्थान, अक्षर, वर्ण, स्वर, विधि आणि वृत्त हे छंद:शास्त्रातील नियम आहेत.

**❖ संपद् ❖**

**नैवातिरिक्तं हीनं वा यत्र संपद्यतेऽक्षरम् |**
**विधाने छन्दसामेषा संपदित्यभिसंज्ञिता || ९९ ||**

**पदच्छेद :-** न एव अतिरिक्तम् हीनम् वा यत्र संपद्यते अक्षरम् |
विधाने छन्दसाम् एषा संपद् इति अभिसंज्ञिता || ९९ ||

**अन्वय: -** यत्र अतिरिक्तम् एव हीनम् वा अक्षरम् न संपद्यते | एषा छन्दसाम् विधाने संपद् इति अभिसंज्ञिता |

**अर्थ -** जिथे वर्णांची संख्या ठराविक संख्येपेक्षा अधिकही नाही किंवा कमीही नाही तेव्हा छंद:शास्त्रामध्ये त्या नियमास 'संपद्' असे म्हटले आहे .

**❖ विराम ❖**

**यत्रार्थस्य समाप्ति: स्यात्स विराम इति स्मृत: |**
**पादश्च पद्यतेर्धातोश्चतुर्भाग: प्रकीर्तित: || १०० ||**

**पदच्छेद: -** यत्र अर्थस्य समाप्ति: स्यात् स: विराम: इति स्मृत: |
पाद: च पद्यते: धातो: चतुर्भाग: प्रकीर्तित: || १०० ||

**अन्वय: -** यत्र अर्थस्य समाप्ति: स्यात् स: विराम: इति स्मृत: | पद्यते: धातो: ( पाद: इति शब्दस्य व्युत्पत्ति: भवति | ) पाद: चतुर्भाग: च प्रकीर्तित: |

**अर्थ -** जेथे अर्थ संपतो त्यास 'विराम' असे म्हणतात . 'पाद' हा शब्द पद्-पद्यते या धातुवरून तयार होतो . पाद म्हणजे छंदोबद्ध पद्याचा एक चतुर्थांश भाग असे प्रसिद्धच आहे .

**❖ आश्रयस्थानांप्रमाणे छंदांचे वर्णन ❖**

**अग्न्यादिदैवतं प्रोक्तं स्थानं द्विविधमुच्यते |**
**शरीराश्रयसंभूतं दिगाश्रयमथापि च || १०१ ||**

**पदच्छेद: -** अग्नि-आदि-दैवतम् प्रोक्तम् स्थानम् द्विविधम् उच्यते |
शरीर-आश्रय-संभूतम् दिग्-आश्रयम् अथ अपि च ||१०१||

**अन्वय: -** अग्नि-आदि-दैवतम् प्रोक्तम् | अथ स्थानम् द्विविधम् उच्यते शरीर-आश्रय-संभूतम् अपि च दिग्-आश्रयम् (इति ) |

**अर्थ -** अग्नी इत्यादी या छंदांचे देव आहेत . या छंदांची दोन आश्रयस्थाने आहेत .
१ ) शरीराच्या आश्रयाने असलेले
२ ) दिशांच्या आश्रयाने असणारे .

**शारीरं मन्त्रसंभूतं छन्दो गायत्रसंज्ञितम् |**
**क्रुष्टे मध्यं दिनं प्रोक्तं त्रैष्टुभं परिकीर्त्यते || १०२ ||**

**पदच्छेद :-** शारीरम् मन्त्रसंभूतम् छन्द : गायत्रसंज्ञितम् |
क्रुष्टे मध्यम् दिनम् प्रोक्तम् त्रैष्टुभम् परिकीर्त्यते || १०२ ||

**अन्वय :** - गायत्रसंज्ञितम् छन्द: शारीरम् मन्त्रसंभूतम् (च अस्ति) | क्रुष्टे मध्यम् दिनम् त्रैष्टुभम् परिकीर्त्यते इति प्रोक्तम् |

**अर्थ** - शरीराच्या आश्रयाने असणारा आणि मंत्रांनी निर्माण होणारा छंद 'गायत्री' होय . क्रुष्ट म्हणजेच उच्चस्वरात दुपारी गायला जाणारा छंद 'त्रिष्टुप्' समजावा .

**तृतीयसवनं चापि शीर्षण्यं जागतं हि यत् |**
**ह्रस्वं दीर्घं प्लुतं चैव त्रिविधं चाक्षरं स्मृतम् || १०३ ||**

**पदच्छेद :-** तृतीयसवनम् च अपि शीर्षण्यम् जागतम् हि यत् |
ह्रस्वम् दीर्घम् प्लुतम् च एव त्रिविधम् च अक्षरम् स्मृतम् || १०३ ||

**अन्वय :** - यत् तृतीयसवनम् जागतम् हि शीर्षण्यम् (उच्यते) | अक्षरम् त्रिविधम् स्मृतम्- ह्रस्वम् दीर्घम् प्लुतम् च |

**अर्थ** - तृतीय प्रहरामध्ये गायला जाणारा 'जगती' छंद हा सर्वोत्कृष्ट म्हटला गेला आहे . अक्षर हे तीन प्रकारांचे असतात . ह्रस्व, दीर्घ आणि प्लुत .

**श्वेतादयस्तथा वर्णा विज्ञेयाश्छन्दसामिह |**
**तारश्चैव हि मन्द्रश्च मध्यमश्च त्रिधा स्वर : || १०४ ||**

**पदच्छेद :-** श्वेत-आदय : तथा वर्णा : विज्ञेया : छन्दसाम् इह |
तार : च एव हि मन्द्र : च मध्यम : च त्रिधा स्वर : || १०४ ||

**अन्वय :** - इह छन्दसाम् श्वेत-आदय : वर्णा : विज्ञेया : | तथा हि स्वर : त्रिधा (वर्तते यथा) तार : मन्द्र : मध्यम : च |

**अर्थ** - या ठिकाणी छंदांचे श्वेत इत्यादी वर्ण जाणून घ्यावेत . तसेच स्वर हे तीन प्रकारचे असतात . जसे तारस्वर, मंद्रस्वर आणि मध्यस्वर .

**ध्रुवाविधाने चैवास्य संप्रवक्ष्यामि लक्षणम् |**
**विधिर्गणकृतश्चैव तथा चार्थकृतोऽपि च || १०५ ||**

**पदच्छेद : -** ध्रुवाविधाने च एव अस्य संप्रवक्ष्यामि लक्षणम् |
विधि : गणकृत : च एव तथा च अर्थकृत : अपि च || १०५ ||

**अन्वय : -** अस्य (स्वरस्य) एव लक्षणम् ध्रुवाविधाने संप्रवक्ष्यामि | तथा च गणकृत : अर्थकृत : च विधि : (अस्ति) |

**अर्थ -** ध्रुवा विधानामध्ये मी याची (स्वराची) लक्षणे तुम्हाला सांगीन . विधी हा दोन प्रकारचा असतो १) गणकृत आणि २) अर्थकृत .

**वृत्तमर्धसमं चैव समं विषममेव च |**
**छन्दसो यस्य पादे स्याद्धीनं वाऽधिकमेव वा |**
**अक्षरं निचृदिति प्रोक्तं भूरिक्चेति द्विजोत्तमा : || १०६ ||**

**पदच्छेद : -** वृत्तम् अर्धसमम् च एव समम् विषमम् एव च |
छन्दस : यस्य पादे स्यात् हीनम् वा अधिकम् एव वा |
अक्षरम् निचृत् इति प्रोक्तम् भूरिक् च इति द्विजोत्तमा : || १०६ ||

**अन्वय : -** वृत्तम् अर्धसमम् समम् विषमम् च | हे द्विजोत्तमा :, यस्य छन्दस : पादे हीनम् वा अधिकम् (अक्षरम्) स्यात् | तत् अक्षरम् निचृत् भूरिक् च इति प्रोक्तम् |

**अर्थ -** वृत्त हे तीन प्रकारचे असतात १) सम २) अर्धसम आणि ३) विषम . हे उत्तम ब्राह्मणांनो, ज्या छंदाच्या चरणामध्ये एक अक्षर कमी असेल तर त्या छंदास 'निचृत्' किंवा एक अक्षर अधिक असेल तर त्या छंदास 'भूरिक्' असे म्हटले जाते .

(जसे - 'निचृद्गायत्री छन्द :' असे म्हटले तर समजावे त्या सूक्तामध्ये किंवा मंत्रामध्ये २४ ऐवजी २३ अक्षरे असतात . 'तत्सवितुर्वरेण्यम् | भर्गो देवस्य धीमहि | धियो यो न : प्रचोदयात् || यामध्ये पहिल्या चरणामध्ये ७ अक्षरे आहेत आणि अन्य चरणांमध्ये ८ अक्षरे . याचप्रमाणे २४ ऐवजी २५ अक्षरे असतील तर त्या छंदास 'भूरिग्गायत्री छन्द :' असे म्हणतात . )

**अक्षराभ्यां यदा द्वाभ्यामधिकं हीनमेव वा |**
**तच्छन्दो नामतो ज्ञेयं स्वराडथ विराडपि || १०७ ||**

**पदच्छेद :-** अक्षराभ्याम् यदा द्वाभ्याम् अधिकम् हीनम् एव वा |
तत् छन्द : नामत : ज्ञेयम् स्वराट् अथ विराट् अपि || १०७ ||

**अन्वय : -** यदा द्वाभ्याम् अक्षराभ्याम् हीनम् अधिकम् वा (अस्ति) अथ तत् छन्द : नामत : विराट् स्वराट् वा अपि ज्ञेयम् |

**अर्थ -** एखाद्या छंदामध्ये दोन अक्षरे कमी असतील तर तो छंद 'विराट्' आणि दोन अक्षरे अधिक असतील तर तो 'स्वराट्' या नावाने ओळखले जातात .

(जसे - २४ ऐवजी २२ अक्षरे असतील तर त्या छंदास 'विराट्गायत्री छंद :' असे म्हणतात . २४ ऐवजी २६ अक्षरे असतील तर त्या छंदास 'स्वराट्गायत्री छंद :' असे म्हणतात . )

**सर्वेषामेव वृत्तानां तज्ज्ञैर्ज्ञेया गणास्त्रय : |**
**दिव्यो दिव्येतरश्चैव दिव्यमानुष एव च || १०८ ||**

**पदच्छेद :-** सर्वेषाम् एव वृत्तानाम् तज्ज्ञै : ज्ञेया : गणा : त्रय : |
दिव्य : दिव्येतर : च एव दिव्यमानुष : एव च || १०८ ||

**अन्वय : -** सर्वेषाम् एव वृत्तानां त्रय : गणा : तज्ज्ञै : ज्ञेया : - दिव्य :, दिव्येतर :, दिव्यमानुष : च (इति) ||

**अर्थ -** विद्वानांनी सर्व वृत्तांचे तीन गण मानावेत . हे तीन गण म्हणजे १) दिव्य २) दिव्येतर आणि ३) दिव्यमानुष .

**❖ दिव्य गण ❖**

**गायत्र्युष्णिगनुष्टुप्च बृहती पङ्क्तिरेव च |**
**त्रिष्टुप्च जगती चैव दिव्योऽयं प्रथमो गण : || १०९ ||**

**पदच्छेद :-** गायत्री उष्णिक् अनुष्टुप् च बृहती पङ्क्ति : एव च |
त्रिष्टुप् च जगती च एव दिव्य : अयम् प्रथम : गण : || १०९ ||

**अन्वय:** - गायत्री उष्णिक् अनुष्टुप् बृहती पङ्क्ति: त्रिष्टुप् जगती च अयं प्रथम: दिव्य: गण: (अस्ति)।

**अर्थ** - गायत्री, उष्णिक, अनुष्टुप, बृहती, पंक्ति, त्रिष्टुप् आणि जगती हे सात छंद ज्या वर्गात येतात तो पहिला 'दिव्य गण' होय.

**❖ दिव्येतर गण ❖**

**तथातिजगती चैव शक्वरी चातिशक्वरी।**
**अष्टिरत्यष्टिरपि च धृतिश्चातिधृतिर्गण:॥ ११०॥**

**पदच्छेद:** - तथा अतिजगती च एव शक्वरी च अतिशक्वरी।
अष्टि: अत्यष्टि: अपि च धृति: च अतिधृति: गण:॥ ११०॥

**अन्वय:** - तथा अतिजगती शक्वरी अतिशक्वरी अष्टि: अत्यष्टि: धृति: अतिधृति: (इति द्वितीय: दिव्येतर:) गण:।

**अर्थ** - तसेच अतिजगती, शक्वरी, अतिशक्वरी, अष्टि, अत्यष्टि, धृति आणि अतिधृति हे सात छंद ज्या गणामध्ये येतात तो दुसरा 'दिव्येतर गण' होय.

**❖ दिव्यमानुष गण ❖**

**कृतिश्च प्रकृतिश्चैव ह्याकृतिर्विकृतिस्तथा।**
**संकृत्यभिकृती चैव ह्युत्कृतिर्दिव्यमानुष:॥ १११॥**

**पदच्छेद:** - कृति: च प्रकृति: च एव हि आकृति: विकृति: तथा।
संकृति: अभिकृति: च एव हि उत्कृति: दिव्यमानुष:॥ १११॥

**अन्वय:** - कृति: प्रकृति: आकृति: विकृति: संकृति: अभिकृति: उत्कृति: च (इति तृतीय:) दिव्यमानुष: (गण:)।

**अर्थ** - कृति, प्रकृति, आकृति, विकृति, संकृति, अभिकृति, आणि उत्कृति हे छंद ज्या गणात येतात तो तिसरा 'दिव्यमानुष गण' होय.

**एतेषां छन्दसां भूय: प्रस्तारविधिसंश्रयम्।**
**लक्षणं संप्रवक्ष्यामि नष्टमुद्दिष्टमेव च ॥ ११२ ॥**

**पदच्छेद: -** एतेषाम् छन्दसाम् भूय: प्रस्तारविधिसंश्रयम्।
लक्षणम् संप्रवक्ष्यामि नष्टम् उद्दिष्टम् एव च ॥ ११२ ॥

**अन्वय: -** एतेषाम् छन्दसाम् प्रस्तारविधिसंश्रयम् नष्टम् उद्दिष्टम् च (एतयो:) लक्षणम् भूय: संप्रवक्ष्यामि।

**अर्थ -** या छंदांच्या प्रस्तारविधिवर आधारित असलेल्या 'नष्ट' आणि 'उद्दिष्ट' यांची लक्षणे सांगीन.

**❖ प्रस्तारविधि ❖**

**प्रस्तारोऽक्षरनिर्दिष्ट: मात्रोक्तश्च तथैव हि।**
**द्विकौ ग्लाविति वर्णोक्तौ मिश्रौ चेत्यपि मात्रिकौ ॥ ११३ ॥**

**पदच्छेद: -** प्रस्तार: अक्षरनिर्दिष्ट: मात्रा-उक्त: च तथा एव हि।
द्विकौ ग्लौ इति वर्ण-उक्तौ मिश्रौ चेतअपि मात्रिकौ ॥ ११३ ॥

**अन्वय: -** प्रस्तार: हि अक्षरनिर्दिष्ट: मात्रोक्त: च। द्विकौ ग्लौ इति मिश्रौ वर्णोक्तौ चेत् मात्रिकौ अपि (स्त:)।

**अर्थ -** प्रस्तार दोन प्रकारचा असतो - १) अक्षरनिर्दिष्ट म्हणजेच वर्णानुसार छंदप्रस्तार २) मात्रोक्त म्हणजे मात्रांनुसार छंदप्रस्तार. 'द्विकौ ग्लौ। ८.२०' या पिंगलाच्या सूत्राद्वारे जे गुरु आणि लघू वर्ण सांगितले गेले ते अक्षरगणवृत्त आणि मात्रावृत्त या दोघांनाही लागू होतात.

**गुरोरधस्तादाद्यस्य प्रस्तारे लघु विन्यसेत्।**
**अग्रतस्तु समादेया गुरव: पृष्ठतस्तथा ॥ ११४ ॥**
**प्रथमं गुरुभिर्वर्णैर्लघुभिस्त्ववसानजम्।**
**वृत्तं तु सर्वच्छन्दस्सु प्रस्तारविधिरेव तु ॥ ११५ ॥**

**पदच्छेद:** - गुरो: अधस्तात् आद्यस्य प्रस्तारे लघु विन्यसेत्|
अग्रत: तु समादेया: गुरव: पृष्ठत: तथा || ११४ ||
प्रथमम् गुरुभि: वर्णै: लघुभि: तु अवसानजम्|
वृत्तम् तु सर्वच्छन्दस्सु प्रस्तारविधि: एव तु || ११५ ||

**अन्वय:** - प्रस्तारे आद्यस्य गुरो: अधस्तात् लघु विन्यसेत् | (द्वितीयप्रस्तारे) अग्रत: तु गुरव: पृष्ठत: समादेया: | तथा प्रथमम् गुरुभि: लघुभि: वर्णै: तु अवसानजम् | सर्वच्छन्दस्सु तु प्रस्तारविधि: वृत्तम् |

**अर्थ** - प्रस्तार करताना सुरूवातीच्या गुरूच्या खाली लघूचा वापर करावा. द्वितीय प्रस्तारामध्ये, पूर्वीचा प्रस्तार पुन्हा खाली मांडून त्यापुढे गुरू वर्ण ठेवावेत. म्हणजेच आरंभ गुरू वर्णांनी करावा आणि नंतर खाली लघू वर्ण शेवटपर्यंत लिहावेत. याचप्रमाणे सर्वच छंदामधील वृत्तांचा हा प्रस्तारविधि सांगून झाला. उदा.

| | |
|---|---|
| आद्यप्रस्तार | ग |
| | ल |
| द्वितीयप्रस्तार | ग ग |
| | ल ग |
| | ग ल |
| | ल ल |
| तृतीयप्रस्तार | ग ग ग |
| | ल ग ग |
| | ग ल ग |
| | ल ल ग |
| | ग ग ल |
| | ल ग ल |
| | ग ल ल |
| | ल ल ल |

**अथवा**

**गुर्वधस्ताल्लघुं न्यस्य तथा द्विद्वि यथोदितम् |**
**न्यस्येत्प्रस्तारमार्गोऽयमक्षरोक्तस्तु नित्यश: || ११६ ||**

**पदच्छेद: -** गुरु-अधस्तात् लघुम् न्यस्य तथा द्विद्वि यथा उदितम् |
न्यस्येत् प्रस्तारमार्ग: अयम् अक्षरोक्त: तु नित्यश: || ११६ ||

**अन्वय: -** गुरु-अधस्तात् लघुम् न्यस्य यथा उदितम् तथा द्विद्वि न्यस्येत् | अयम् तु नित्यश: अक्षरोक्त: प्रस्तारमार्ग: (अस्ति) |

**अर्थ -** गुरु वर्णाच्या खाली लघु वर्ण ठेवून जसे म्हटले तसे दोनदोन वर्ण ठेवावेत. ही तर अक्षरांसाठी सांगितलेली प्रस्ताराची नेहमीची पद्धत आहे.

**❖ मात्राच्छंद ❖**

**मात्रासंख्याविनिर्दिष्टो गणो मात्राविकल्पित: |**
**मिश्रौ ग्लाविति विज्ञेयौ पृथग्लक्ष्यविभागत: || ११७ ||**
**मात्रागणो गुरुश्चैव लघुनी चैव लक्षित: |**
**आर्याणां तु चतुर्मात्राप्रस्तार: परिकल्पित: || ११८ ||**

**पदच्छेद: -** मात्रासंख्या-विनिर्दिष्ट: गण: मात्राविकल्पित: |
मिश्रौ ग्लौ इति विज्ञेयौ पृथक् लक्ष्यविभागत: || ११७ ||
मात्रागण: गुरु: च एव लघुनी च एव लक्षित: |
आर्याणाम् तु चतुर्मात्रा-प्रस्तार: परिकल्पित: || ११८ ||

**अन्वय: -** मात्रासंख्या-विनिर्दिष्ट: मात्राविकल्पित: गण: (अस्ति) | लक्ष्यविभागत: ग्लौ मिश्रौ पृथक् इति विज्ञेयौ | मात्रागण: गुरु: लघुनी एव च लक्षित: | आर्याणाम् तु चतुर्मात्राप्रस्तार: परिकल्पित: |

**अर्थ -** मात्रिक छंदांमध्ये मात्रांच्या संख्येप्रमाणे गण ओळखला जातो. लक्ष्य विभागानुसार 'ग्लौ' म्हणजे 'द्विकौ ग्लौ | ८.२०'
'मिश्रौ' म्हणजे 'मिश्रौ च | ८.२१' आणि 'पृथक्' म्हणजे 'पृथग्ला मिश्रा: | ८.२२' या पिंगलसूत्रांचा उपयोग करावा.

मात्रा गण एक गुरू किंवा दोन लघु वर्णांनी दर्शविला जातो. आर्या वृत्तांमध्ये चार मात्रांच्याद्वारे प्रस्तार कल्पिला जातो. (याठिकाणी आर्या नवधा म्हणजे नऊ प्रकारच्या असल्याने बहुवचनाचा वापर केला आहे.)

**गीतकप्रभृतीनां तु पञ्चमात्रस्तथेष्यते |**
**वैतालीयं पुरस्कृत्य षण्मात्राद्यास्तथैव च || ११९ ||**

**पदच्छेद: -** गीतकप्रभृतीनाम् तु पञ्चमात्र: तथा इष्यते |
वैतालीयम् पुरस्कृत्य षट्-मात्रा-आद्या: तथा एव च || ११९ ||

**अन्वय: -** तथा गीतकप्रभृतीनाम् तु पञ्चमात्र: (प्रस्तार:) इष्यते | तथा एव च वैतालीयम् पुरस्कृत्य षट्-मात्रा-आद्या: (प्रस्तार:) इष्यते |

**अर्थ -** आणि गीतक इत्यादी मध्ये पाच मात्रांचा प्रस्तार होतो. आणि वैतालीय इत्यादी छंदांमध्ये सहा मात्रांचा प्रस्तार होतो.

**त्र्यक्षरास्तु त्रिका ज्ञेया लघुगुर्वक्षरान्विता: |**
**मात्रागणविभागस्तु गुरुलघ्वक्षराश्रय: || १२० ||**

**पदच्छेद: -** त्र्यक्षरा: तु त्रिका: ज्ञेया: लघु-गुरु-अक्षर-अन्विता: |
मात्रागण-विभाग: तु गुरु-लघु-अक्षर-आश्रय: || १२० ||

**अन्वय: -** लघु-गुरु-अक्षर-अन्विता: त्र्यक्षरा: तु त्रिका: (इति) ज्ञेया: | मात्रागणविभाग: तु गुरु-लघु-अक्षर-आश्रय: (भवति) |

**अर्थ -** गुरू-लघु अक्षरांच्या आश्रयी असलेल्या तीन अक्षरांच्या वर्गाला 'त्रिक' म्हणून ओळखावे आणि मात्रागणांचा विभाग देखील गुरू-लघु अक्षरांच्या आधारावर असतो.

**❖ वृत्तप्रत्ययविधि ❖**

**अथ उद्दिष्टम् |**
**अन्त्याद्द्विगुणितादूपादद्विद्विरेकं गुरोहरेत् |**
**द्विगुणं च लघो: कृत्वा संख्यां पिण्डेन निर्दिशेत् || १२१ ||**

**पदच्छेद :** - अन्त्यात् द्विगुणितात् रूपात् द्विद्वि : एकम् गुरो : हरेत् |
द्विगुणम् च लघो : कृत्वा संख्याम् पिण्डेन निर्दिशेत् || १२१ ||

**अन्वय :** - द्विगुणितात् अन्त्यात् रूपात् द्विद्वि : गुरो : एकम् हरेत् | लघो : द्विगुणम् च कृत्वा संख्याम् पिण्डेन निर्दिशेत् |

**अर्थ** - (एखाद्या वृत्ताचा जो लघुगुरूक्रम आहे तो नेमका कोणत्या क्रमांकावर उपलब्ध होईल हे शोधणे म्हणजे त्या वृत्ताचे 'उद्दिष्ट' काढणे. हा क्रमांक शोधण्यासाठी सर्वप्रथम तो लघुगुरूक्रम लिहावा.) त्यानंतर पहिल्या अक्षरावर १ लिहावे. नंतर पुढील अक्षरावर अंक लिहिताना पूर्वीच्या संख्येला २ या संख्येने गुणाकार करून मगच ती संख्या त्या त्या अक्षरावर लिहावी. अशी क्रिया अंतिम अक्षरापर्यंत करावी. यानंतर, लघु अक्षरावरील सर्व संख्येची बेरीज करून त्यामध्ये १ मिळवावा. अशा रीतीने ते वृत्त कोणत्या क्रमांकावर आहे हे चटकन कळते.

**आद्यं सर्वगुरु ज्ञेयं वृत्तं तु समसंज्ञितम् |**
**कोशे तु सर्वलघ्वन्तं मिश्रै : शेषाणि सर्वत : || १२२ ||**

**पदच्छेद :** - आद्यम् सर्वगुरु ज्ञेयम् वृत्तम् तु समसंज्ञितम् |
कोशे तु सर्वलघ्वन्तम् मिश्रै : शेषाणि सर्वत : || १२२ ||

**अन्वय :** - समसंज्ञितम् वृत्तं (यत्र) आद्यं सर्वगुरु ज्ञेयम्। सर्वलघ्वन्तम्, कोशे शेषाणि सर्वत : मिश्रै : (वर्णै : भवन्ति) |
(कोश इत्याद्यन्तयोर्मध्यगो भेदगण : | अ. भा.)

**अर्थ** - समवृत्तामधील पहिल्या रचनेमध्ये सर्व गुरू वर्ण असतात तसेच अंतिम रचनेमध्ये सर्व लघु वर्ण असतात आणि कोशामधील रचनांमध्ये मिश्र स्वरूपामध्ये लघुगुरूक्रम असतो हे सर्वांनी जाणून घ्यावे.
('कोश' याचा अर्थ प्रथम आणि अंतिम रचनेच्या मध्यभागी असणाऱ्या सर्व संरचना.)

**वृत्तानां तु समानानां संख्यां संयोज्य तावतीम् |**
**राश्यूनामर्धविषमां समासादभिनिर्दिशेत् || १२३ ||**

**पदच्छेद :** - वृत्तानाम् तु समानानाम् संख्याम् संयोज्य तावतीम् |
राश्यूनाम् अर्धविषमाम् समासात् अभिनिर्दिशेत् || १२३ ||

**अन्वय :** - समानानाम् वृत्तानाम् तु तावतीम् संख्याम् संयोज्य अर्धविषमाम् राश्यूनाम् समासात् अभिनिर्दिशेत् |

**अर्थ** - अर्धविषम म्हणजेच अर्धसमवृत्त . अर्धसमवृत्तांच्या एकूण संरचना किती? हे शोधायचे असेल तर समवृत्तांच्या एकूण संरचनेच्या संख्येस त्याच संख्येने गुणावे . त्यानंतर, जितक्या संख्येने गुणले तेवढी संख्या आलेल्या उत्तरातून वजा करावी म्हणजे अर्धसम वृत्तांच्या एकूण संरचनांची संख्या मिळते . जसे - अनुष्टुप् छंदामध्ये समवृत्तांच्या एकूण २५६ संरचना होतात . याच छंदामधील अर्धसमवृत्तांच्या संरचनांची संख्या हवी असेल तर पुढील प्रक्रिया करावी .

२५६ × २५६ = ६५५३६ - २५६ = ६५२८० . अशा रीतीने, अनुष्टुपछंदामध्ये अर्धसमवृत्तांच्या ६५२८० संरचना होतात .

**एकादिकां तथा संख्यां छन्दसो विनिवेश्य तु |**
**यावत्पूर्वं तु पूर्वेण पूरयेदुत्तरं गणम् || १२४ ||**

**पदच्छेद :** - एकादिकाम् तथा संख्याम् छन्दस : विनिवेश्य तु |
यावत् पूर्वम् तु पूर्वेण पूरयेत् उत्तरम् गणम् || १२४ ||

**अन्वय :** - तथा छन्दस : एकादिकाम् संख्याम् तु विनिवेश्य यावत् तु पूर्वम् पूर्वेण उत्तरम् गणम् पूरयेत् |

**अर्थ** - जोपर्यंत चरण पूर्ण होत नाही तोपर्यंत अक्षरांवर एक, दोन, तीन, चार इत्यादी संख्या लिहावी . पहिल्या संख्येपासून शेवटच्या संख्येपर्यंत बेरीज करावी . त्यामध्ये एक संख्या जोडावी . याप्रमाणे समवृत्तांची संख्या सांगितली .

**समानां विषमाणां च संगुणय्य तथा स्फुटम् |**
**राश्यूनमभिजानीयाद्विषमाणां समासत : || १२५ ||**

**पदच्छेद :** - समानाम् विषमाणाम् च संगुणय्य तथा स्फुटम् |
राशी-ऊनम् अभिजानीयात् विषमाणां समासत : || १२५ ||

**अन्वय :** - तथा समानां विषमाणां च स्फुटम् संगुणय्य द्विषमाणां राशी समासत : ऊनम् अभिजानीया |

**अर्थ** - याप्रमाणे सम आणि विषम मात्रांच्या एकूण संख्यांचा गुणाकार करून एकत्र करावी व त्यातून विषम छंदांची मात्रा कमी करावी तेव्हा (राशि-संख्या) मात्रांची संख्या कळते .

**एवं कृत्वा तु सर्वेषां परेषां पूर्वपूरणम् |**
**नैधनादेकमेकं तु प्रातिलोम्यक्रियात्मकम् || १२६ ||**

**पदच्छेद :** - एवम् कृत्वा तु सर्वेषाम् परेषाम् पूर्वपूरणम् |
नैधनात् एकम् एकम् तु प्रातिलोम्यक्रियात्मकम् || १२६ ||

**अन्वय :** - एवं तु परेषां सर्वेषां पूर्वपूरणम् कृत्वा नैधनाद् एकम् एकं तु प्रातिलोम्यक्रियात्मकम् |

**अर्थ** - याप्रमाणे सर्व स्थानांवर उत्तरवर्ती संख्येस पूर्ववर्ती संख्येशी गुणाकार करून क्रमानुसार शेवटच्या संख्येतून एक-एकास (विपरीती)-विरूद्ध प्रक्रिया करत विसर्जित करून हटवावे .

**सर्वेषां छन्दसां न्यस्य लघ्वक्षरविनिश्चयम् |**
**जानीत समवृत्तानां संख्यां संक्षेपतस्तथा || १२७ ||**

**पदच्छेद :** - सर्वेषाम् छन्दसाम् न्यस्य लघ्वक्षरविनिश्चयम् |
जानीत समवृत्तानाम् संख्याम् संक्षेपत : तथा || १२७ ||

**अन्वय :** - तथा सर्वेषां छन्दसां लघ्वक्षरविनिश्चयम् न्यस्य समवृत्तानां संख्यां संक्षेपत : जानीत |

**अर्थ** - याप्रमाणे समवृत्त सर्व छंदाच्या लघु अक्षर आणि त्यांची संख्या थोडक्यात समजून घ्यावी .

**❖ नष्ट आणि उद्दिष्ट प्रकिया ❖**

**वृत्तार्धपरिमाणं तु छित्वार्धेन यथाक्रमम् |**
**न्यसेल्लघु तथा सैकमक्षरं गुरु चाप्यथ || १२८ ||**

**एवं विन्यस्य वृत्तानां नष्टोद्दिष्टविभागत:|**
**लघ्वादीनि गुरूण्यस्मिन्नक्षराणि निवेशयत्|| १२९ ||**

**पदच्छेद: -** वृत्तार्धपरिमाणम् तु छित्वा अर्धेन यथाक्रमम्|
न्यसेत् लघु तथा सैकम् अक्षरम् गुरु च अपि अथ || १२८ ||
एवं विन्यस्य वृत्तानाम् नष्टोद्दिष्टविभागत:|
लघ्वादीनि गुरूणि अस्मिन् अक्षराणि निवेशयत् || १२९ ||

**अन्वय: -** वृत्तार्धपरिमाणं तु यथाक्रमम् अर्धेन छित्वा सैकम् लघु तथा अपि च गुरु अक्षरं न्यसेत्| अथ एवं नष्टोद्दिष्टविभागत: विन्यस्य वृत्तानां लघ्वादीनि गुरूणि अक्षराणि अस्मिन् निवेशयत्|

**अर्थ -** वृत्ताचे परिमाण (मोजमाप) म्हणजेच सर्व प्रकारांना अर्ध्यातून तोडावे (अर्ध करावे) क्रमानुसार एक लघु आणि एक गुरू आणावेत. ह्या प्रमाणे करत-करत नष्ट आणि उद्दिष्ट प्रक्रियातील सर्व छंदांच्या गुरू आणि लघु अक्षरांना दाखवावे.

**इति छन्दांसि यानीह मयोक्तानि द्विजोत्तमा:|**
**वृत्तान्येतेषु नाट्येऽस्मिन्प्रयोज्यानि निबोधत|| १३० ||**

**पदच्छेद: -** इति छन्दांसि यानि इह मया उक्तानि द्विजोत्तमा:|
वृत्तानि एतेषु नाट्ये अस्मिन् प्रयोज्यानि निबोधत || १३० ||

**अन्वय: -** द्विजोत्तमा:, यानि छन्दांसि इह मया उक्तानि एतेषु वृत्तानि अस्मिन् नाट्ये प्रयोज्यानि (इति) निबोधत|

**अर्थ -** हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो, जे छंद याठिकाणी माझ्याकडून सांगितले गेले त्यापैकी वृत्तांचाच या नाट्यामध्ये प्रयोग करावा असे जाणून घ्यावे.

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे वाचिकाभिनये छन्दोविधानं नाम चतुर्दशोऽध्याय: ||**

**|| अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील वाचिक अभिनयाशी संबंधित 'छंदोविधान' नावाचा चौदावा अध्याय संपला ||**

# पंधरावा अध्याय

## छंदोविचिति



# पंधरावा अध्याय

## छंदोविचिति

**छन्दांस्येवं हि यानीह मयोक्तानि द्विजोत्तमा:|**
**वृत्तानि तेषु नाट्येऽस्मिन्प्रयोज्यानि निबोधत ||१||**

**पदच्छेद: -** छन्दांसि एवम् हि यानि इह मया उक्तानि द्विजोत्तमा:|
वृत्तानि तेषु नाट्ये अस्मिन् प्रयोज्यानि निबोधत ||१||

**अन्वय: -** द्विजोत्तमा:, एवम् हि मया यानि छन्दांसि इह उक्तानि तेषु अस्मिन् नाट्ये प्रयोज्यानि वृत्तानि निबोधत|

**अर्थ -** हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो, अशाप्रकारे मी जे छंद याठिकाणी सांगितले त्यातील नाट्यामध्ये वापरली जाणारी वृत्ते जाणून घ्या.

**||प्रतिचरण सहा अक्षरे ||**

**❖ तनुमध्या वृत्त ❖**

**अथ तनुमध्यावृत्तम्-**
**आद्ये पुनरन्त्ये द्वे द्वे गुरूणी चेत्|**
**सा स्यात्तनुमध्या गायत्रसमुत्था || २ ||**

**पदच्छेद: -** आद्ये पुन: अन्त्ये द्वे द्वे गुरूणी चेत्|
सा स्यात् तनुमध्या गायत्रसमुत्था || २ ||

**अन्वय: -** (यत्र) आद्ये पुन: (च) अन्त्ये द्वे द्वे गुरूणी (अक्षराणि) चेत् सा गायत्रसमुत्था 'तनुमध्या' स्यात्| (यथा -)

**अर्थ -** ज्याच्या प्रत्येक चरणामध्ये सुरुवातीला आणि शेवटी दोन गुरू वर्ण असतील आणि बाकीचे वर्ण लघू असतील, त्या गायत्री छंदातून उत्पन्न होणाऱ्या या वृत्ताला 'तनुमध्या' असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**सन्त्यक्तविभूषा भ्रष्टाञ्जननेत्रा |**
**हस्तार्पितगण्डा किं त्वं तनुमध्या || ३ ||**

**पदच्छेद : -** सन्त्यक्त-विभूषा भ्रष्ट-अञ्जन-नेत्रा |
हस्त-अर्पित-गण्डा किम् त्वम् तनुमध्या || ३ ||

**अन्वय : -** सन्त्यक्त-विभूषा भ्रष्ट-अञ्जन-नेत्रा हस्त-अर्पित-गण्डा किं त्वम् तनुमध्या (असि) |

**अर्थ -** आभूषणांचा त्याग करणारी, अंजनरहित नेत्र असलेली, गालावर जिचे दोन्ही हात आहेत अशी तू 'तनुमध्या' म्हणजे कृशोदरी आहेस का?

**❖ मकरकशीर्षा वृत्त ❖**

**अथ मकरकशीर्षा -**
**लघुगण आदौ भवति चतुष्क: |**
**गुरुयुगमन्त्ये मकरकशीर्षा || ४ ||**

**पदच्छेद : -** लघुगण: आदौ भवति चतुष्क: |
गुरुयुगम् अन्त्ये मकरकशीर्षा || ४ ||

**अन्वय : -** (यत्र) आदौ चतुष्क: लघुगण: अन्त्ये (च) गुरुयुगम् भवति (सा) मकरकशीर्षा |
(यथा -)

**अर्थ -** ज्या वृत्ताच्या सुरुवातीला चार वर्ण लघू आणि शेवटचे दोन वर्ण गुरू असतील त्या वृत्तास 'मकरकशीर्षा' असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**स्वयमुपयान्तं भजसि न कान्तम् |**
**भयकरि किं त्वं मकरकशीर्षा || ५ ||**

**पदच्छेद : -** स्वयम् उपयान्तम् भजसि न कान्तम् |
भयकरि किम् त्वम् मकरशीर्षा || ५ ||

**अन्वय : -** स्वयम् उपयान्तम् कान्तम् (त्वम्) न भजसि | हे भयकरि, किम् त्वम् मकरकशीर्षा (असि) ?

**अर्थ** - स्वत:हून जवळ आलेल्या प्रियकरास तू रिझवत नाहीस! हे भय निर्माण करणाऱ्या प्रिये, तू 'मकरकशीर्षा' म्हणजेच मगरीप्रमाणे मस्तक असणारी आहेस की काय?

**❖ मालिनी वृत्त ❖**

**अथ मालिनीवृत्तम्-**
**एकमात्रं षट्के स्याद् द्वितीयं पादे |**
**ख्यातरूपा वृत्ते मालिनी सा नाम्ना || ६ ||**

**पदच्छेद:** - एकमात्रम् षट्के स्यात् द्वितीयम् पादे |
ख्यातरूपा वृत्ते मालिनी सा नाम्ना || ६ ||

**अन्वय:** - षट्के पादे द्वितीयम् अक्षरम् एकमात्रम् यदि स्यात् सा वृत्ते मालिनी नाम्ना ख्यातरूपा (अस्ति) | (अन्यत् च)

**अर्थ** - सहा अक्षरांच्या चरणांमध्ये जेव्हा दुसरे अक्षर लघू असते, तेव्हा छंद:शास्त्रामध्ये ते वृत्त 'मालिनी' या नावाने प्रसिद्ध आहे.
(अन्य व्याख्या पुढीलप्रमाणे - )

**षडक्षरकृते पादे लघु यत्र द्वितीयकम् |**
**शेषाणि तु गुरूणि स्युर्मालिनी सा मता यथा || ७ ||**

**पदच्छेद:** - षडक्षरकृते पादे लघु यत्र द्वितीयकम् |
शेषाणि तु गुरूणि स्यु: मालिनी सा मता यथा || ७ ||

**अन्वय:** - षडक्षरकृते पादे यत्र द्वितीयकम् लघु, शेषाणि तु गुरूणि स्यु: सा 'मालिनी' मता | यथा -

**अर्थ** - जेव्हा सहा अक्षरांच्या चरणामध्ये दुसरे अक्षर लघू असते आणि बाकीची सर्व अक्षरे गुरू असतात तेव्हा त्या वृत्तास 'मालिनी' असे म्हणावे. उदाहरणार्थ -

**स्नानगन्धाधिक्यैर्वस्त्रभूषायोगै: |**
**व्यक्तमेवासी त्वं मालिनी प्रख्याता || ८ ||**

**पदच्छेद :-** स्नान-गन्ध-आधिक्यै : वस्त्र-भूषा-योगै : |
व्यक्तम् एव असौ त्वम् मालिनी प्रख्याता || ८ ||

**अन्वय : -** स्नान-गन्ध-आधिक्यै : वस्त्र-भूषा-योगै : व्यक्तम् असौ त्वम् मालिनी एव प्रख्याता |

**अर्थ -** स्नान, सुगंधित द्रव्ये, अत्तर इत्यादींद्वारे तसेच सुंदर कपडे आणि आभूषणांद्वारे स्पष्टच होत आहे की तू 'मालिनी' सारखी भासते आहेस !

**❖ मालती वृत्त ❖**

**अथ मालतीवृत्तम्-**
**द्वितीयं पञ्चमं चैव लघु यत्र प्रतिष्ठितम् |**
**शेषाणि च गुरूणि स्युर्मालती नाम सा यथा || ९ ||**

**पदच्छेद :-** द्वितीयम् पञ्चमम् च एव लघु यत्र प्रतिष्ठितम् |
शेषाणि च गुरूणि स्यु : मालती नाम सा यथा || ९ ||

**अन्वय : -** यत्र द्वितीयम् पञ्चमम् च लघु एव प्रतिष्ठितम् शेषाणि च गुरूणि स्यु: सा मालती नाम (अस्ति) | यथा -

**अर्थ -** ज्याच्या प्रत्येक चरणामध्ये दुसरे आणि पाचवे अक्षर लघू असेल आणि उरलेली अक्षरे गुरू असतील तर त्या वृत्तास 'मालती' असे म्हणतात .
उदाहरणार्थ -

**शोभते बद्धया षट्पदाविद्धया |**
**मालतीमालया मानिनी लीलया || १० ||**

**पदच्छेद :-** शोभते बद्धया षट्पद-आविद्धया |
मालतीमालया मानिनी लीलया || १० ||

**अन्वय : -** बद्धया षट्पद-आविद्धया मालतीमालया मानिनी लीलया शोभते |

**अर्थ -** चांगल्या प्रकारे गुंफलेल्या आणि भुंग्यांनी वेढलेल्या मालती फुलांच्या माळेमुळे मानिनी नायिका सहज शोभून दिसते .

**|| प्रतिचरण सात अक्षरे ||**

**❖ उद्धता वृत्त ❖**

**अथ उद्धतावृत्तम्-**
**द्वितीयं च चतुर्थं च पञ्चमं च यदा लघु |**
**यस्या: सप्ताक्षरे पादे ज्ञेया सा तूद्धता यथा || ११ ||**

**पदच्छेद: -** द्वितीयम् च चतुर्थम् च पञ्चमम् च यदा लघु |
यस्या: सप्ताक्षरे पादे ज्ञेया सा तु उद्धता यथा || ११ ||

**अन्वय: -** यस्या: सप्ताक्षरे पादे यदा द्वितीयम् चतुर्थं पञ्चमम् च (अक्षरम्) लघु (भवेत्) सा तु उद्धता ज्ञेया | यथा -

**अर्थ -** जेव्हा सात अक्षरे असलेल्या चरणामध्ये दुसरे, चौथे आणि पाचवे अक्षर लघू असेल आणि शेष अक्षरे गुरू असतील तर त्या वृत्तास 'उद्धता' असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**दन्तघातकृताङ्कं व्याकुलालकशोभम् |**
**शंसतीव तवास्यं निर्दयं रतयुद्धम् || १२ ||**

**पदच्छेद: -** दन्तघात-कृताङ्कम् व्याकुल-अलक-शोभम् |
शंसति इव तव आस्यम् निर्दयम् रतयुद्धम् || १२ ||

**अन्वय: -** दन्तघात-कृताङ्कम् व्याकुल-अलक-शोभम् तव आस्यम् निर्दयम् रतयुद्धम् इव शंसति |

**अर्थ -** रतिक्रीडेमुळे दातांनी चावा घेतल्याचे निशाण असलेला आणि केस विस्कटल्यामुळे सुंदर दिसणारा तुझा चेहरा निर्दयी प्रणययुद्धाची जणू ग्वाही देत आहे .

**❖ भ्रमरमालिका वृत्त ❖**

**अथ भ्रमरमालिकावृत्तम्-**
**आदौ द्वे निधने चैव गुरुणी यत्र वै सदा |**
**पादे सप्ताक्षरे ज्ञेया नाम्ना भ्रमरमालिका || १३ ||**

**पदच्छेद : -** आदौ द्वे निधने च एव गुरुणी यत्र वै सदा |
पादे सप्ताक्षरे ज्ञेया नाम्ना भ्रमरमालिका || १३ ||

**अन्वय : -** सप्ताक्षरे पादे यत्र सदा एव आदौ निधने च द्वे गुरुणी (सा) भ्रमरमालिका (इति) नाम्ना ज्ञेया | (यथा -)

**अर्थ -** सात अक्षरे असलेल्या चरणामध्ये जेव्हा पहिली दोन व शेवटची दोन अक्षरे गुरु असतात आणि शेष अक्षरे लघू असतात तेव्हा त्या वृत्तास 'भ्रमरमालिका' या नावाने ओळखावे. उदाहरणार्थ -

**नानाकुसुमचित्रे प्राप्ते सुरभिमासे |**
**एषा भ्रमति मत्ता कान्ते भ्रमरमाला || १४ ||**

**पदच्छेद : -** नानाकुसुमचित्रे प्राप्ते सुरभिमासे |
एषा भ्रमति मत्ता कान्ते भ्रमरमाला || १४ ||

**अन्वय : -** कान्ते, नानाकुसुमचित्रे सुरभिमासे प्राप्ते एषा मत्ता भ्रमरमाला भ्रमति |

**अर्थ -** हे कान्ते ! विविध प्रकारच्या फुलांनी बहरलेल्या अशा या चैत्र महिन्याच्या आगमनाने मत्त झालेली ही भुंग्याची माळ इथे तेथे फिरत आहे.

**|| प्रतिचरण आठ अक्षरे ||**

**❖ सिंहलेखा वृत्त ❖**

**अथ सिंहलेखावृत्तम्-**
**आद्यं तृतीयमन्त्यं च पञ्चमं सप्तमं यथा |**
**गुरूण्यष्टाक्षरे पादे सिंहलेखेति सा स्मृता || १५ ||**

**पदच्छेद : -** आद्यम् तृतीयम् अन्त्यम् च पञ्चमम् सप्तमम् यथा |
गुरूणि अष्टाक्षरे पादे सिंहलेखा इति सा स्मृता || १५ ||

**अन्वय : -** अष्टाक्षरे पादे आद्यम् तृतीयम् पञ्चमम् सप्तमम् अन्त्यम् च गुरूणि (सन्ति) सा 'सिंहलेखा' इति स्मृता | यथा -

**अर्थ** - जेव्हा आठ अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिले, तिसरे, पाचवे, सातवे आणि आठवे अक्षर गुरू असेल तर त्या वृत्तास 'सिंहलेखा' असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**यत्त्वया ह्यनेकभावैश्चेष्टितं रह: सुगात्रि ! |**
**तन्मनो मम प्रविष्टं वृत्तमत्र सिंहलेखम् || १६ ||**

**पदच्छेद:** - यत् त्वया हि अनेकभावै: चेष्टितम् रह: सुगात्रि ! |
तत् मन: मम प्रविष्टम् वृत्तम् अत्र सिंहलेखम् || १६ ||

**अन्वय:** - सुगात्रि! यत् हि रह: त्वया अनेकभावै: चेष्टितम् तत् मम मन: प्रविष्टम् अत्र सिंहलेखम् (इव) वृत्तम् |

**अर्थ** - हे सुंदर काया असलेल्या कन्ये, विविध भावांनी युक्त अशा ज्या क्रिया तू एकांतामध्ये केल्यास, त्यांनी माझ्या मनात प्रवेश केला आहे. सिंहाने नखांनी केलेल्या ओरखड्याप्रमाणे तुझे हे आचरण आहे जे माझ्या मनाला त्रास देत आहे. (याठिकाणी सिंहलेखा हे वृत्त आहे.)

**❖ मत्तचेष्टित वृत्त ❖**

**अथ मत्तचेष्टितवृत्तम्-**
**चतुर्थं च द्वितीयं च षष्ठमष्टममेव च |**
**गुरूण्यष्टाक्षरे पादे यत्र तन्मत्तचेष्टितम् || १७ ||**

**पदच्छेद:** - चतुर्थम् च द्वितीयम् च षष्ठम् अष्टमम् एव च |
गुरूणि अष्टाक्षरे पादे यत्र तत् मत्तचेष्टितम् || १७ ||

**अन्वय:** - अष्टाक्षरे पादे यत्र द्वितीयम् चतुर्थ षष्ठम् अष्टमम् च गुरूणि (सन्ति) तत् मत्तचेष्टितम् (वृत्तम् इति कथ्यते) | (यथा -)

**अर्थ** - जेव्हा आठ अक्षराच्या चरणामध्ये दुसरे, चौथे, सहावे आणि आठवे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्यास 'मत्तचेष्टित' वृत्त असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**मदावघूर्णितेक्षणं विलम्बिताकुलालकम् |**
**असंस्थितै : पदै : प्रिया करोति मत्तचेष्टितम् || १८ ||**

**पदच्छेद : -** मद-अवघूर्णित-ईक्षणम् विलम्वित-आकुल-अलकम् |
असंस्थितै : पदै : प्रिया करोति मत्तचेष्टितम् || १८ ||

**अन्वय : -** असंस्थितै : पदै : मद-अवघूर्णित-ईक्षणम् विलम्वित-आकुल-अलकम् प्रिया मत्तचेष्टितम् करोति |

**अर्थ -** अस्थिर पावलांनी, डोळ्यांनी वारंवार दृष्टिक्षेप करीत, केसांतील गुंता सावरत प्रेयसी उन्मत्त क्रिया करीत आहे .

**❖ विद्युन्माला वृत्त ❖**

**अथ विद्युन्मालावृत्तम्-**
**अष्टाक्षरकृते पादे सर्वाण्येव भवन्ति हि |**
**गुरूणि यस्मिन्सा नाम्ना विद्युन्मालेति कीर्तिता || १९ ||**

**पदच्छेद : -** अष्टाक्षरकृते पादे सर्वाणि एव भवन्ति हि |
गुरूणि यस्मिन् सा नाम्ना विद्युन्माला इति कीर्तिता || १९ ||

**अन्वय : -** यस्मिन् अष्टाक्षरकृते पादे सर्वाणि अक्षराणि गुरूणि एव भवन्ति सा 'विद्युन्माला' इति नाम्ना कीर्तिता | यथा -

**अर्थ -** आठ अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये सर्व अक्षरे 'गुरू' असतील तेव्हा ते वृत्त 'विद्युन्माला' या नावाने ओळखले जाते . उदाहरणार्थ -

**साम्भोनादैरानर्दद्भि : श्यामाम्भोदैर्व्याप्ते व्योम्नि |**
**आदित्यांशुस्पर्द्धिन्येषा दिक्षु भ्रान्ता विद्युन्माला || २० ||**

**पदच्छेद : -** स-अम्भो-नादै : आनर्दद्भि : श्याम-अम्भोदै : व्याप्ते व्योम्नि |
आदित्य-अंशु-स्पर्द्धिनी एषा दिक्षु भ्रान्ता विद्युन्माला || २० ||

**अन्वय: -** आनर्दद्भि : साम्भोनादै : श्यामाम्भौदै : व्याप्ते व्योम्नि एषा आदित्यांशुस्पर्द्धिनी विद्युन्माला दिक्षु भ्रान्ता |

**अर्थ -** गर्जना करणाऱ्या आणि पाण्याने भरलेल्या अशा सावळ्या मेघांनी दाटून आलेल्या आकाशामध्ये, सूर्यकिरणांशी स्पर्धा करणारी ही 'विद्युन्माला' (वीजेची माळ) दहाही दिशांमध्ये पसरत आहे .

**❖ चित्तविलासित वृत्त ❖**

**अथ चित्तविलासितवृत्तम्-**
**पञ्चमं सप्तमं चान्त्यं गुरु पादेऽष्टके तथा |**
**छन्दोज्ञैर्ज्ञेयमेतत्तु वृत्तं चित्तविलासितम् || २१ ||**

**पदच्छेद: -** पञ्चमम् सप्तमम् च अन्त्यम् गुरु पादे अष्टके तथा |
छन्दोज्ञै: ज्ञेयम् एतत् तु वृत्तम् चित्तविलासितम् || २१ ||

**अन्वय: -** अष्टके पादे, पञ्चमम् सप्तमम् तथा च अन्त्यम् अक्षरम् गुरु अस्ति चेत् एतत् वृत्तम् छन्दोज्ञै: 'चित्तविलासितम्' इति ज्ञेयम् |

**अर्थ -** आठ अक्षरे असलेल्या चरणामध्ये, पाचवे, सातवे आणि शेवटचे म्हणजेच आठवे अक्षर जर गुरू असेल आणि शेष अक्षरे लघू असतील तर त्यास छंद:शास्त्राच्या जाणकारांनी 'चित्तविलासित' वृत्त म्हणून ओळखावे .

**स्मितवशविप्रकाशैर्दशनपदैरमीभि: |**
**वरतनु ! पूर्णचन्द्रं तव मुखमावृणोति || २२ ||**

**पदच्छेद: -** स्मितवश-विप्रकाशै : दशन-पदै : अमीभि : |
वरतनु! पूर्णचन्द्रम् तव मुखम् आवृणोति || २२ ||

**अन्वय: -** हे वरतनु! स्मितवश-विप्रकाशै : अमीभि : दशनपदै : तव मुखम् पूर्णचन्द्रम् आवृणोति |

**अर्थ -** हे उत्तम काया असणाऱ्या सुंदरी, हसताना प्रकाशमान झालेल्या या दंतावलीमुळे तुझा चेहरा पौर्णिमेच्या चंद्रालाही झाकाळत आहे .

**||प्रतिचरण नऊ अक्षरे||**

**❖ मधुकरी वृत्त ❖**

**अथ मधुकरीवृत्तम्-**
**नवाक्षरकृते पादे त्रीणि स्युर्नैधनानि च |**
**गुरूणि यस्या: सा नाम्ना ज्ञेया मधुकरी यथा || २३ ||**

**पदच्छेद: -** नव-अक्षर-कृते पादे त्रीणि स्यु: नैधनानि च |
गुरूणि यस्या: सा नाम्ना ज्ञेया मधुकरी यथा || २३ ||

**अन्वय: -** नवाक्षरकृते पादे यस्या: नैधनानि त्रीणि अक्षराणि गुरूणि स्यु: | सा मधुकरी नाम्ना ज्ञेया | यथा -

**अर्थ -** नऊ अक्षरे असणाऱ्या चरणातील शेवटची तीन अक्षरे गुरू असतील आणि शेष लघू असतील तर ते वृत्त 'मधुकरी' या नावाने ओळखले जावे. उदाहरणार्थ -

**कुसुमितमभिपश्यन्ती विविधतरुगणैश्छन्नम् |**
**वनमतिशयगन्धाढ्यं भ्रमति मधुकरी हृष्टा || २४ ||**

**पदच्छेद: -** कुसुमितम् अभिपश्यन्ती विविध-तरु-गणै: छन्नम् |
वनम् अतिशय-गन्ध-आढ्यम् भ्रमति मधुकरी हृष्टा || २४ ||

**अन्वय: -** विविधतरुगणै: छन्नम्, अतिशय-गन्ध-आढ्यम्, कुसुमितम् वनम् अभिपश्यन्ती हृष्टा मधुकरी भ्रमति |

**अर्थ -** विविध वृक्षांनी दाटलेल्या, उग्र सुगंधाने भरून गेलेल्या, फुलांनी बहरलेल्या वनाला पाहत आनंदित झालेली मधमाशी मध गोळा करण्यासाठी इकडेतिकडे फिरत आहे.

**||प्रतिचरण दहा अक्षरे ||**

**❖ उत्पलमालिका वृत्त ❖**

**अथ उत्पलमालिकावृत्तम्-**
**दशाक्षरकृते पादे त्रीण्यादौ त्रीणि नैधने |**
**यस्या गुरूणि सा ज्ञेया पङ्क्तिरुत्पलमालिका || २५ ||**

**पदच्छेद :-** दश-अक्षर-कृते पादे त्रीणि आदौ त्रीणि नैधने |
यस्या : गुरूणि सा ज्ञेया पङ्क्ति : उत्पलमालिका || २५ ||

**अन्वय :-** दश-अक्षर-कृते पादे यस्या : आदौ त्रीणि नैधने (च) त्रीणि अक्षराणि गुरूणि (सन्ति चेत्) सा 'उत्पलमालिका पङ्क्ति :' (इति) ज्ञेया |

**अर्थ -** दहा अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये सुरुवातीची तीन अक्षरे आणि शेवटची तीन अक्षरे जेव्हा गुरू असतात आणि मध्यभागी असलेली चार अक्षरे लघू असतात तेव्हा त्या वृत्तास 'उत्पलमल्लिका' किंवा 'उत्पलमाला पंक्ति' असे म्हणतात .

**अस्मिंस्ते शिरसि तदा कान्ते वैडूर्यस्फटिकसुवर्णाढ्ये |**
**शोभां स्वां न वहति तां बद्धा सुश्लिष्टा कुवलयमालेयम् || २६ ||**

**पदच्छेद :-** अस्मिन् ते शिरसि तदा कान्ते वैडूर्य-स्फटिक-सुवर्ण-आढ्ये |
शोभाम् स्वाम् न वहति ताम् बद्धा सुश्लिष्टा कुवलय-माला इयम् || २६ ||

**अन्वय :-** कान्ते अस्मिन् वैडूर्य-स्फटिक-सुवर्णाढ्ये ते शिरसि (यदा) इयम् सुश्लिष्टा कुवलयमाला बद्धा तदा (तत्) ताम् स्वाम् शोभाम् न वहति |

**अर्थ -** हे कांते, वैडूर्य स्फटिक सुवर्ण इत्यादींनी बनवलेले अलंकार तुझ्या मस्तकावर सजवले असले तरी, नीलकमलांनी गुंफलेली ही माळ जेव्हा डोक्यावर माळतेस तेव्हा ते अलंकारदेखील या माळेपुढे फिके पडतात .

### ❖ शिखिसारिणी वृत्त ❖

**अथ शिखिसारिणीवृत्तम्-**
**द्वितीयं च चतुर्थं च षष्ठमष्टममेव च |**
**ह्रस्वं दशाक्षरे पादे यत्र सा शिखिसारिणी || २७ ||**

**पदच्छेद: -** द्वितीयम् च चतुर्थम् च षष्ठम् अष्टमम् एव च |
ह्रस्वम् दशाक्षरे पादे यत्र सा शिखिसारिणी || २७ ||

**अन्वय: -** दशाक्षरे पादे यत्र द्वितीयम् चतुर्थम् षष्ठम् अष्टमम् च ह्रस्वम् (अस्ति चेत्) सा 'शिखिसारिणी' |

**अर्थ -** दहा अक्षरे असलेल्या चरणामध्ये दुसरे, चौथे, सहावे आणि आठवे अक्षर जर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरु असतील तर त्या वृत्तास 'शिखिसारिणी' असे म्हणतात.

**नैव तेऽस्ति सङ्गमो मनुष्यैर्नापि कामभोगचिह्नमन्यत् |**
**गर्भिणीव दृश्यसे ह्यनार्ये ! किं मयूरसारिणी त्वमेवम् || २८ ||**

**पदच्छेद: -** न एव ते अस्ति सङ्गम: मनुष्यै: न अपि कामभोगचिह्नम् अन्यत् |
गर्भिणी इव दृश्यसे हि अनार्ये ! किम् मयूरसारिणी त्वम् एवम् || २८ ||

**अन्वय: -** अनार्ये ! ते मनुष्यै: सङ्गम: एव न अस्ति | अन्यत् कामभोगचिह्नम् अपि न (अस्ति), गर्भिणी इव हि दृश्यसे | एवम् किम् त्वम् मयूरसारिणी (असि)?

**अर्थ -** हे उन्मत्त नारी, तुझी पुरुषांशी भेट झाली नाही. इतर कामभोगाचे लक्षणही शरीरावर दिसत नाही. जणू गर्भ धारण केल्याप्रमाणेच खरोखर वाटत आहेस. मग तू मोरासमान का चालत आहेस? (तू 'मयूरसारिणी' आहेस का? )

**॥ प्रतिचरण अकरा अक्षरे ॥**

**❖ दोधक वृत्त ❖**

**अथ दोधकवृत्तम्-**
**आद्यं चतुर्थमन्त्यं च सप्तमं दशमं तथा ।**
**गुरूणि त्रैष्टुभे पादे यत्र स्युर्दोधकं तु तत् ॥ २९ ॥**

**पदच्छेद :-** आद्यम् चतुर्थम् अन्त्यम् च सप्तमम् दशमम् तथा ।
गुरूणि त्रैष्टुभे पादे यत्र स्यु : दोधकम् तु तत् ॥ २९ ॥

**अन्वय :-** त्रैष्टुभे पादे, यत्र आद्यम् चतुर्थम् अन्त्यम् सप्तमम् तथा च दशमम् गुरूणि स्यु : तत् तु दोधकम् । यथा -

**अर्थ -** त्रिष्टुभच्या म्हणजेच अकरा अक्षरे असलेल्या चरणामधील पहिले, चौथे, सातवे, दहावे आणि शेवटचे अक्षर गुरू असेल तर त्यास 'दोधक' छंद असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**प्रस्खलिताग्रपदप्रविचारं मत्तविघूर्णितगात्रविलासम् ।**
**पश्य विलासिनि ! कुञ्जरमेतं दोधकवृत्तमयं प्रकरोति ॥ ३० ॥**

**पदच्छेद :-** प्रस्खलित-अग्रपद-प्रविचारम् मत्त-विघूर्णित-गात्र-विलासम् ।
पश्य विलासिनि ! कुञ्जरम् एतम् दोधकवृत्तम् अयम् प्रकरोति ॥ ३० ॥

**अन्वय :-** विलासिनि ! प्रस्खलित-अग्रपद-प्रविचारम् मत्त-विघूर्णित-गात्र-विलासम् एतम् कुञ्जरम् पश्य । अयम् दोधकवृत्तम् प्रकरोति ।

**अर्थ -** हे विलासिनी प्रिये, अडखळणाऱ्या पावलांनी पुढे जाणाऱ्या, उन्मत्तपणे शरीर जमिनीवर लोळून आनंद घेणाऱ्या या हत्तीला पहा . हा चोराप्रमाणे आचरण करीत आहे . (हे दोधकवृत्त आहे . )

### ❖ मोटक वृत्त ❖

**अथ मोटकवृत्तम्-**
**आदौ द्वौ पञ्चमं चैवाप्यष्टमं नैधनं तथा |**
**गुरूण्येकादशे पादे यत्र तन्मोटकं यथा || ३१ ||**

**पदच्छेद : -** आदौ द्वौ पञ्चमम् च एव अपि अष्टमम् नैधनम् तथा |
गुरूणि एकादशे पादे यत्र तत् मोटकम् यथा || ३१ ||

**अन्वय : -** एकादशे पादे आदौ द्वौ, पञ्चमम्, अष्टमम् तथा नैधनम् यत्र गुरूणि (सन्ति) तत् मोटकम् यथा (कथ्यते) |

**अर्थ -** अकरा अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये सुरुवातीची दोन अक्षरे, पाचवे अक्षर, आठवे आणि शेवटचे अक्षर जर गुरु असतील आणि उरलेली अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'मोटक' असे म्हणतात . उदाहरणार्थ -
(दोधक आणि मोटक ही दोन्ही वृत्ते परस्परांसाठी अनुलोम-विलोम सदृश आहेत . म्हणजे डावीकडून उजवीकडे म्हटले तर दोधकवृत्त होते आणि तीच रचना उजवीकडून डावीकडे म्हटली की मोटकवृत्त होते . )

**एषोऽम्बुदनिस्वनतुल्यरव: क्षीब: स्खलमानविलम्बगति: |**
**श्रुत्वा घनगर्जितमद्रितटे वृक्षान प्रतिमोटयति द्विरद: || ३२ ||**

**पदच्छेद : -** एष: अम्बुद-निस्वन-तुल्य-रव: क्षीव: स्खलमान-विलम्ब-गति: |
श्रुत्वा घन-गर्जितम् अद्रि-तटे वृक्षान् प्रतिमोटयति द्विरद: || ३२ ||

**अन्वय : -** एष: अम्बुदनिस्वनतुल्यरव: क्षीव: स्खलमानविलम्बगति: द्विरद: अद्रितटे घनगर्जितम् श्रुत्वा वृक्षान् प्रतिमोटयति |

**अर्थ -** वर्षाऋतूतील मेघांच्या आवाजासमान आवाज असणारा, दारू प्यायलेला, अडखळणारा, हळूहळू चालणारा, लांब टोकदार सुळे असणारा हा हत्ती पर्वतरांगांवरील मेघगर्जना ऐकून येथील वृक्षांना उखडतो आहे .

❖ **इन्द्रवज्रा वृत्त** ❖

**अथ इन्द्रवज्रावृत्तम्-**
**नवमं सप्तमं षष्ठं तृतीयं च भवेल्लघु |**
**एकादशाक्षरे पादे इन्द्रवज्रेति सा यथा || ३३ ||**

**पदच्छेद :** - नवमम् सप्तमम् षष्ठम् तृतीयम् च भवेत् लघु |
एकादशाक्षरे पादे इन्द्रवज्रा इति सा यथा || ३३ ||

**अन्वय :** - एकादशाक्षरे पादे, तृतीयम् षष्ठम् सप्तमम् नवमम् च लघु भवेत् सा इन्द्रवज्रा इति (कथ्यते) | यथा -

**अर्थ** - अकरा अक्षरे असलेल्या चरणामध्ये तिसरे ,सहावे, सातवे आणि नववे अक्षर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरू असतील तर त्यास 'इन्द्रवज्रा' वृत्त असे म्हणतात .

**त्वं दुर्णिरीक्ष्या दुरतिप्रसादा दु:खैकसाध्या कठिनस्वभावा |**
**सर्वास्ववस्थासु च कामतन्त्रे योग्यासि किं वा बहुनेन्द्रवज्रा || ३४ ||**

**पदच्छेद :** - त्वम् दुर्णिरीक्ष्या दुरतिप्रसादा दु:खैकसाध्या कठिनस्वभावा |
सर्वासु अवस्थासु च कामतन्त्रे योग्या असि किम् वा बहुना इन्द्रवज्रा || ३४ ||

**अन्वय :** - सर्वासु अवस्थासु कामतन्त्रे च त्वम् दुर्णिरीक्ष्या दुरतिप्रसादा दु:खैकसाध्या कठिनस्वभावा असि | किम् बहुना वा? इन्द्रवज्रा इति योग्या असि |

**अर्थ** - सगळ्या अवस्थांमध्ये आणि कामक्रीडेतही तू न्याहाळण्याजोगी नसतेस . लवकर प्रसन्न होत नाहीस . फार कष्टाने तू वश होतेस . खरंच किती कठोरस्वभाव आहेत तुझा! आणखी काय बोलावं? तुझं नाव 'इन्द्रवज्रा' आहे (इंद्राच्या वज्रासमान कठीण स्वभाव असणारी) ते योग्यच आहे .

❖ **उपेन्द्रवज्रा वृत्त** ❖

**अथ उपेन्द्रवज्रावृत्तम्-**
**एभिरेव तु संयुक्ता लघुभिस्त्रैष्टुभी यथा |**
**उपेन्द्रवज्रा विज्ञेया लघ्वादाविह केवलम् || ३५ ||**

**पदच्छेद :-** एभि : एव तु संयुक्ता लघुभि : त्रैष्टुभी यथा |
उपेन्द्रवज्रा विज्ञेया लघु आदौ इह केवलम् || ३५ ||

**अन्वय :-** एभि : एव लघुभि : त्रैष्टुभी संयुक्ता | किन्तु इह, केवलम् आदौ लघु (अस्ति चेत् सा) उपेन्द्रवज्रा विज्ञेया | यथा -

**अर्थ -** अकरा अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये इंद्रवज्राप्रमाणे त्याच ठिकाणी लघुवर्ण असतील आणि केवल पहिले अक्षर लघू असेल तर ते वृत्त 'उपेन्द्रवज्रा' होय .

(अकरा अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिले, तिसरे, सहावे, सातवे आणि नववे अक्षर लघू असते आणि बाकीची अक्षरे गुरू असतात . तेच 'उपेन्द्रवज्रा' वृत्त होय . )

**प्रिये ! श्रिया वर्णविशेषणेन स्मितेन कान्त्या सुकुमारभावात् |**
**अमी गुणा रूपगुणानुरूपा भवन्ति ते किं त्वमुपेन्द्रवज्रा || ३६ ||**

**पदच्छेद :-** प्रिये ! श्रिया वर्ण-विशेषणेन स्मितेन कान्त्या सुकुमार-भावात् |
अमी गुणा : रूप-गुण-अनुरूपा : भवन्ति ते किम् त्वम् उपेन्द्रवज्रा || ३६ ||

**अन्वय :-** प्रिये! श्रिया वर्णविशेषणेन स्मितेन कान्त्या सुकुमारभावात् ते अमी गुणा : रूपगुणानुरूपा : भवन्ति | किम् त्वम् उपेन्द्रवज्रा (असि) ?

**अर्थ -** हे प्रिये, रूपसौंदर्याने, विशेष गोऱ्या रंगामुळे, सुंदर स्मित हास्यामुळे, उत्तम शरीरकांतीमुळे आणि सुकुमार भावांमुळे तुझे हे गुण तुझ्या रूपाला आणि गुणांना साजेसे आहेत . खरं सांग तू 'उपेन्द्रवज्रा' आहेस का? (तू त्या इंद्रवज्रेसारखी म्हणजेच इंद्राच्या वज्रासमान कठोर हृदय असणारी नाहीस ना?)

**❖ रथोद्धता वृत्त ❖**

**अथ रथोद्धता -**
**आद्यं तृतीयमन्त्यं च सप्तमं नवमं तथा |**
**गुरूण्येकादशे पादे यत्र सा तु रथोद्धता || ३७ ||**

**पदच्छेद :-** आद्यम् तृतीयम् अन्त्यम् च सप्तमम् नवमम् तथा |
गुरूणि एकादशे पादे यत्र सा तु रथोद्धता || ३७ ||

**अन्वय: -** एकादशे पादे, यत्र आद्यम् तृतीयम् सप्तमम् नवमम् अन्त्यम् च गुरूणि (सन्ति) सा तु रथोद्धता (भवति)|

**अर्थ -** अकरा अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिले, तिसरे, सातवे, नववे आणि शेवटचे म्हणजेच अकरावे अक्षर गुरू असेल आणि इतर अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'रथोद्धता' असे म्हणतात .

**किं त्वया सुभट ! दूरवर्जितं नात्मनो न सुहृदां प्रियं कृतम्|**
**यत्पलायनपरायणस्य ते याति धूलिरधुना रथोद्धता || ३८ ||**

**पदच्छेद: -** किम् त्वया सुभट ! दूरवर्जितम् न आत्मन: न सुहृदाम् प्रियम् कृतम्|
यत् पलायनपरायणस्य ते याति धूलि: अधुना रथोद्धता || ३८ ||

**अन्वय: -** सुभट ! किम् त्वया (समराङ्गणम्) दूरवर्जितम्? न आत्मन:, न सुहृदाम् प्रियम् कृतम्, यत् पलायनपरायणस्य ते रथोद्धता धूलि: अधुना याति|

**अर्थ -** हे उत्कृष्ट सैनिका, तू दूरूनच युद्धभूमीचा त्याग का केलास? असं करून तू स्वत:चे किंवा मित्रांचे कोणाचेच भले केले नाहीस, कारण युद्धभूमीतून पळून जात असताना तुझ्या रथाद्वारे उडणारी धूळ अजूनही जातेच आहे .

**❖ स्वागता वृत्त ❖**

**अथ स्वागतावृत्तम्-**
**आद्यं तृतीयमन्त्यं च सप्तमं दशमं गुरु |**
**यस्यास्तु त्रैष्टुभे पादे विज्ञेया स्वागता हि सा || ३९ ||**

**पदच्छेद: -** आद्यम् तृतीयम् अन्त्यम् च सप्तमम् दशमम् गुरु|
यस्या: तु त्रैष्टुभे पादे विज्ञेया स्वागता हि सा || ३९ ||

**अन्वय: -** त्रैष्टुभे पादे, यस्या: आद्यम् तृतीयम् अन्त्यम् सप्तमम् दशमम् च गुरु (अस्ति) सा तु हि स्वागता विज्ञेया|

**अर्थ** - त्रिष्टुभ् जातीतील वृत्ताच्या म्हणजेच अकरा अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये पहिले, तिसरे, सातवे, दहावे आणि शेवटचे म्हणजेच अकरावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'स्वागता' असे म्हणतात .
(रथोद्धता आणि स्वागता या वृत्तांमध्ये लघुगुरुक्रम हा एक भेद वगळता समानच आहे . रथोद्धतामध्ये नववे अक्षर गुरू तर स्वागतामध्ये नववे अक्षर लघु असते . )

**अद्य मे सफलमायतनेत्रे जीवितं मदनसंश्रयभावम् |**
**आगतासि भवनं मम यस्मात्स्वागतं तव वरोरु निषीद || ४० ||**

**पदच्छेद :** - अद्य मे सफलम् आयतनेत्रे जीवितम् मदनसंश्रयभावम् |
आगता असि भवनम् मम यस्मात् स्वागतम् तव वरोरु निषीद || ४० ||

**अन्वय :** - (हे) आयतनेत्रे, अद्य मे मदनसंश्रयभावम् जीवितम् सफलम् (अभवत्) यस्मात् (त्वम्) मम भवनम् आगता असि | (हे) वरोरू, तव स्वागतम् (अस्तु) | (त्वम्) निषीद |

**अर्थ** - हे विशाल नेत्र असणाऱ्या प्रिये, कामदेवाला अधीन झालेलं माझं जीवन आज सफल झालं आहे, कारण तू माझ्या घरी आली आहेस . हे उत्तमांक असणाऱ्या प्रियतमे, तुझे स्वागत आहे . तू बैस .

### ❖ शालिनी वृत्त ❖

**अथ शालिनी -**
**षष्ठं च नवमं चैव लघुनी त्रैष्टुभे यदि |**
**गुरूण्यन्यानि पादे तु सा ज्ञेया शालिनी यथा || ४१ ||**

**पदच्छेद :** - षष्ठम् च नवमम् च एव लघुनी त्रैष्टुभे यदि |
गुरूणि अन्यानि पादे तु सा ज्ञेया शालिनी यथा || ४१ ||

**अन्वय :** - त्रैष्टुभे पादे यदि षष्ठम् च नवमम् च एव लघुनी अन्यानि गुरूणि (सन्ति) सा तु शालिनी ज्ञेया | यथा -

**अर्थ** - त्रिष्टुभ् जातीच्या म्हणजेच अकरा अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये सहावे व नववे अक्षर लघू असेल आणि बाकीची सर्व अक्षरे गुरू असतील तर त्या वृत्तास 'शालिनी' असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**दु:शीलं वा निर्गुणं वापरं वा**
**लोके धैर्यादप्रियं न ब्रवीषि |**
**तस्माच्छीलं साधुहेतो: सुवृत्तं**
**माधुर्यात्स्यात्सर्वथा शालिनी त्वम् || ४२ ||**

**पदच्छेद: -** दु:शीलम् वा निर्गुणम् वा अपरम् वा लोके धैर्यात् अप्रियम् न ब्रवीषि |
तस्मात् शीलम् साधुहेतो: सुवृत्तम् माधुर्यात् स्यात् सर्वथा शालिनी त्वम् || ४२ ||

**अन्वय: -** हे प्रिये, (अस्मिन्) लोके धैर्यात् (त्वम्) दु:शीलम् निर्गुणम् अपरम् वा अप्रियम् न ब्रवीषि | तस्मात् साधुहेतो: माधुर्यात् (च तव) शीलम् सुवृत्तम् स्यात् | त्वम् सर्वथा शालिनी (असि) |

**अर्थ** - हे प्रिये, तू धैर्यशाली आहेस कारण त्यामुळे तू या जगात चारित्र्यहीन, गुणहीन किंवा इतरांना आवडणार नाही अशी भाषा बोलत नाहीस. त्यामुळे तुझ्या या चांगुलपणामुळे आणि गोडव्यामुळे तुझे चारित्र्य चांगल्या स्वभावाने परिपूर्ण झाले आहे. अशा प्रकारे तू सर्वथा शालिन झाली आहेस.

**|| प्रतिचरण बारा अक्षरे ||**

**❖ तोटक वृत्त ❖**

**अथ तोटकवृत्तम्-**
**तृतीयं चैव षष्ठं च नवमं द्वादशं तथा |**
**गुरूणि जागते पादे यत्र तत्तोटकं भवेत् || ४३ ||**

**पदच्छेद :-** तृतीयम् च एव षष्ठम् च नवमम् द्वादशम् तथा |
गुरूणि जागते पादे यत्र तत् तोटकम् भवेत् || ४३ ||

**अन्वय :-** जागते पादे, यत्र तृतीयम् षष्ठम् नवमम् तथा च द्वादशं गुरूणि (सन्ति) तत् तोटकं भवेत् |

**अर्थ -** जगती जातीच्या म्हणजेच बारा अक्षरे असलेल्या चरणामध्ये तिसरे, सहावे, नववे आणि बारावे अक्षर गुरू असेल आणि उरलेली अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'तोटक' असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**किमिदं कपटाश्रयदुर्विषहं**
**बहुशाठ्यमथोल्बणरूक्षकथम् |**
**स्वजनप्रियसज्जनभेदकरं**
**ननु तोटकवृत्तमिदं कुरुषे || ४४ ||**

**पदच्छेद :-** किम् इदम् कपट-आश्रय-दुर्विषहम् बहुशाठ्यम् अथ उल्बणरूक्षकथम् |
स्वजन-प्रिय-सज्जन-भेदकरम् ननु तोटकवृत्तम् इदम् कुरुषे || ४४ ||

**अन्वय :-** ननु इदम् कपट-आश्रय-दुर्विषहम् बहुशाठ्यम् अथ उल्बणरूक्षकथम् स्वजनप्रियसज्जनभेदकरम् तोटकवृत्तम् इदम् किम् कुरुषे? (तोटकस्य छेदकस्य वृत्तं चेष्टितम् |)

**अर्थ -** खरोखरच हे कपटाच्या आश्रयी गेलेले, असह्य असे, प्रचंड धूर्तता असणारे, तसेच अत्यंत रूक्ष शब्दांचा प्रयोग करणारे, नातेवाईक प्रियलोक आणि सज्जन यांना एकमेकांपासून दूर करणारे, एखाद्या घरफोड्याप्रमाणे असे हे तू आचरण का बरे करीत आहेस?

**❖ कुमुदप्रभा वृत्त ❖**

**अथ कुमुदप्रभावृत्तम्-**
**आद्यं तृतीयमन्त्यं च पञ्चमं षष्ठमेव च |**
**तथोपान्त्यं जगत्यां च गुरु चेत्कुमुदप्रभा || ४५ ||**

**पदच्छेद :-** आद्यम् तृतीयम् अन्त्यम् च पञ्चमम् षष्ठम् एव च |
तथा उपान्त्यम् जगत्याम् च गुरु चेत् कुमुदप्रभा || ४५ ||

**अन्वय :-** जगत्याम्, आद्यम् तृतीयम् अन्त्यम् च पञ्चमम् षष्ठम् एव च तथा च उपान्त्यम् गुरु चेत् कुमुदप्रभा (वृत्तम् भवति) |

**अर्थ -** जगती जातीच्या म्हणजेच बारा अक्षरे असणाऱ्या चरणातील पहिले, तिसरे, पाचवे, सहावे, अकरावे आणि बारावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'कुमुदप्रभा' असे म्हणतात.

**मन्मथेन विद्धा सललितभावा**
**नृत्तगीतयोगा प्रविकसिताक्षी |**
**निन्द्यमद्य किं त्वं विगलितशोभा**
**चन्द्रपादयुक्ता कुमुदवती च || ४६ ||**

**पदच्छेद :-** मन्मथेन विद्धा सललित-भावा नृत्तगीतयोगा प्रविकसित-अक्षी |
निन्द्यम् अद्य किम् ? त्वम् विगलितशोभा चन्द्रपादयुक्ता कुमुदवती च || ४६ ||

**अन्वय :-** मन्मथेन विद्धा, सललितभावा, नृत्तगीतयोगा, प्रविकसिताक्षी, त्वम् अद्य किम् निन्द्यम् (असि)? (येन) त्वम् विगलितशोभा, कुमुदवती, चन्द्रपादयुक्ता (जाता असि) |

**अर्थ -** कामदेवाच्या बाणांनी तू घायाळ झाली आहेस. ललित भाव व्यक्त होत आहेत. नृत्य आणि गीत यांचा योग तू साधत आहेस. तुझे नेत्र विस्फारून गेले आहेत. पण आज तुझी कोणी निंदा केली का? ज्यामुळे तुझे सौंदर्य गळून गेले आहे. कमलिनीच्या देठाप्रमाणे सुकून गेली आहेस. चंद्रकलेप्रमाणे क्षीण झाली आहेस.

**❖ कुमुदनिभा वृत्त ❖**

**यदि खलु पादे न्यौ त्रिकौ यथा यौ**
**यतिरपि वर्णै: षड्भिरेव चेत्स्यात्|**
**जगति विधाने नित्यसंनिविष्टा**
**कुमुदनिभा सा नामत: प्रसिद्धा || ४७ ||**

**पदच्छेद : -** यदि खलु पादे न्यौ त्रिकौ यथा यौं यति : अपि वर्णै : षड्भि : एव चेत् स्यात् |
जगति विधाने नित्यसंनिविष्टा कुमुदनिभा सा नामत : प्रसिद्धा || ४७ ||

**अन्वय : -** पादे यदि खलु न्यौ यौं (न य र य) त्रिकौ अपि च षड्भि : एव वर्णै : यति : चेत् जगति विधाने नित्यसंनिविष्टा सा कुमुदनिभा नामत : प्रसिद्धा स्यात् |

**अर्थ -** ज्या वृत्ताच्या प्रत्येक चरणामध्ये न, य, र, य हे त्रिक असतील आणि सहा अक्षरांनी यति असेल तर जगती जातीमध्ये नित्य प्रविष्ट असलेले हे वृत्त 'कुमुदनिभा' या नावाने प्रसिद्ध होईल . उदाहरणार्थ -

(या वृत्ताचे लक्षण प्रथमत: त्रिकांच्या अथवा गणांच्या स्वरूपात आढळते . अन्यत्र जवळजवळ सर्वच ठिकाणी भरत अक्षरसंख्येनुसारच वृत्ताचे लक्षण सांगतो . उपरोक्त लक्षण हेच त्या वृत्ताचे उदाहरणदेखील आहे . )

**कुमुदनिभा त्वं कामबाणविद्धा**
**किमिति नतभ्रू: शीतवातदग्धा |**
**मृदुनलिनीव पाण्डुवक्त्रशोभा**
**कथमपि जाता ह्यग्रत : सखीनाम् || ४८ ||**

**पदच्छेद : -** कुमुदनिभा त्वम् कामबाणविद्धा, किम् इति ? नतभ्रू : शीतवातदग्धा |
मृदुनलिनी इव पाण्डुवक्त्रशोभा कथम् अपि जाता हि अग्रत : सखीनाम् || ४८ ||

**अन्वय : -** कामबाणविद्धा त्वम् 'कुमुदनिभा' | किम् इति ? नतभ्रू: शीतवातदग्धा मृदुनलिनी इव पाण्डुवक्त्रशोभा (असि) | सखीनाम् अग्रत : कथमपि जाता |

**अर्थ -** कामदेवांच्या बाणांनी घायाळ झालेली तू 'कुमुदनिभा' म्हणजेच कमळासमान कोमल झाली आहेस . अगं काय हे ? तुझ्या भुवया झुकल्या आहेत . शीतल वारा तुझ्या शरीराला दाह देत आहे . कोमल कमलिनीप्रमाणे तुझा चेहरा पांढरा फटफटीत झाला आहे आणि सखींच्या पुढे तू कशीबशी येत आहेस .

**❖ चन्द्रलेखा वृत्त ❖**

**अथ चन्द्रलेखावृत्तम्-**
**द्वादशाक्षरके पादे सप्तमं दशमं लघु |**
**आदौ पञ्चाक्षरच्छेदश्चन्द्रलेखा तु सा यथा ||४९||**

**पदच्छेद : -** द्वादशाक्षरके पादे सप्तमम् दशमम् लघु |
आदौ पञ्चाक्षरच्छेद : चन्द्रलेखा सा यथा ||४९||

**अन्वय : -** द्वादशाक्षरके पादे सप्तमम् दशमम् लघु, आदौ पञ्चाक्षरच्छेद :, सा चन्द्रलेखा | यथा -

**अर्थ -** बारा अक्षरे असलेल्या चरणामध्ये जेव्हा सातवे व दहावे अक्षर लघू आणि बाकीची अक्षरे गुरू असतात, तसेच पहिल्या पाच अक्षरांनंतर यति असते, ते वृत्त 'चन्द्रलेखा' होय .

**वक्त्रं सौम्यं ते पद्मपत्रायताक्षं**
**कामस्यावासं सुनासोच्चप्रहासम् |**
**कामस्यापीदं काममाहर्तुकामं**
**कान्ते ! कान्त्या त्वं चन्द्रलेखेव भासि ||५०||**

**पदच्छेद : -** वक्त्रम् सौम्यम् ते पद्मपत्र-आयत-अक्षम् कामस्य आवासम् सुनासा-उच्चप्रहासम् |
कामस्य अपि इदम् कामम् आहर्तुकामम् कान्ते ! कान्त्या त्वम् चन्द्रलेखा इव भासि ||५०||

**अन्वय : -** पद्मपत्रायताक्षम् कामस्य आवासम् (इव) सुनासा-उच्चप्रहासम् (च) इदम् ते सौम्यम् वक्त्रम् कामस्य अपि कामम् आहर्तु- कामम् (अस्ति) | हे कान्ते, त्वम् कान्त्या चन्द्रलेखा इव भासि |

**अर्थ -** कमलपत्राप्रमाणे विस्तृत नेत्र असणारे, कामदेवाचे निवासस्थान असणारे, सुंदर नाक असणारे आणि उच्चकोटीचे हास्य असणारे तुझे हे कोमल मुखकमल कामदेवाचेही चित्त निश्चितच आकर्षून घेणारे आहे . हे कांते, तुझी कांती चंद्रकोरीसमान तेजस्वी भासत आहेस .

### ❖ प्रमिताक्षरा वृत्त ❖

**अथ प्रमिताक्षरावृत्तम्-**
**तृतीयमन्त्यं नवमं पञ्चमं च यदा गुरु |**
**द्वादशाक्षरके पादे यत्र सा प्रमिताक्षरा ||५१||**

**पदच्छेद :** - तृतीयम् अन्त्यम् नवमम् पञ्चमम् च यदा गुरु |
द्वादशाक्षरके पादे यत्र सा प्रमिताक्षरा ||५१||

**अन्वय :** - द्वादशाक्षरके पादे यत्र तृतीयम् पञ्चमम् नवमम् अन्त्यम् च यदा गुरु (अस्ति) सा प्रमिताक्षरा (भवति) | यथा -

**अर्थ** - बारा अक्षरे असलेल्या चरणातील तिसरे, पाचवे, नववे व शेवटचे म्हणजेच बारावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'प्रमिताक्षरा' असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**स्मितभाषिणी ह्यचपलापरुषा**
**निभृतापवादविमुखी सततम् |**
**अपि कस्यचिद्युवतिरस्ति सुखा**
**प्रमिताक्षरा स हि पुमाञ्जयति ||५२||**

**पदच्छेद :** - स्मितभाषिणी हि अचपला अपरुषा निभृता अपवादविमुखी सततम् |
अपि कस्यचित् युवति : अस्ति सुखा प्रमिताक्षरा स हि पुमान् जयति ||५२||

**अन्वय :** - स्मितभाषिणी, अचपला, अपरुषा, सततम् निभृता, अपवादविमुखी, सुखा, प्रमिताक्षरा (च) कस्यचित् युवति : अस्ति स हि पुमान् जयति |

**अर्थ** - ज्याची प्रेयसी चेहऱ्यावर स्मित हास्य करीत बोलते . चंचल नसते . कठोरवाणी बोलत नाही . नेहमी शांत आणि अपवादापासून दूर असते . जी सुख देणारी आणि मोजकेच शब्द बोलते म्हणजे मितभाषी आहे, तोच पुरुष या जगात विजयी होतो .

### ❖ वंशस्थ वृत्त ❖

**अथ वंशस्थवृत्तम्-**
**द्वितीयमन्त्यं दशमं चतुर्थं पञ्चमाष्टमे |**
**गुरूणि द्वादशे पादे वंशस्था जगती तु सा || ५३ ||**

**पदच्छेद :-** द्वितीयम् अन्त्यम् दशमम् चतुर्थम् पञ्चम-अष्टमे |
गुरूणि द्वादशे पादे वंशस्था जगती तु सा || ५३ ||

**अन्वय :-** द्वादशे पादे द्वितीयम् चतुर्थम् पञ्चमाष्टमे दशमम् अन्त्यम् गुरूणि (सन्ति) सा तु जगती वंशस्था |

**अर्थ -** बारा अक्षरे असलेल्या चरणामध्ये जर दुसरे, चौथे, पाचवे, आठवे, दहावे आणि बारावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्या वृत्ताला 'वंशस्थ' म्हणतात जे 'जगती' या जातीमध्ये येते .

**न मे प्रिया त्वं बहुमानवर्जिता**
**प्रियं प्रिया ते परुषाभिभाषिणी |**
**तथा च पश्याम्यहमद्य विग्रहं**
**ध्रुवं हि वंशस्थगतिं करिष्यति || ५४ ||**

**पदच्छेद :-** न मे प्रिया त्वम् बहुमान-वर्जिता प्रियम् प्रिया ते परुष-अभिभाषिणी |
तथा च पश्यामि अहम् अद्य विग्रहम् ध्रुवम् हि वंशस्थ-गतिम् करिष्यति || ५४ ||

**अन्वय :-** बहुमानवर्जिता त्वम् मे न प्रिया | परुषाभिभाषिणी ते प्रियम् प्रिया | तथा च अहम् अद्य विग्रहम् पश्यामि | ध्रुवम् हि वंशस्थ-गतिम् करिष्यति |

**अर्थ -** तू मानिनी नाहीस म्हणून मला तू नाही आवडत . कठोरवाणीचा प्रयोग करणे तुला अतिशय आवडते . आज मी ते वाग्युद्ध पाहणारच आहे, जे नक्कीच वंशपरंपरेनुसार परिणाम करणारे असेल .

❖ हरिणप्लुता वृत्त ❖

**अथ हरिणप्लुतावृत्तम्-**
**चतुर्थमन्त्यं दशमं सप्तमं च यदा गुरु |**
**भवेद्धि जागते पादे तदा स्याद्धरिणप्लुता ||५५||**

**पदच्छेद :-** चतुर्थम् अन्त्यम् दशमम् सप्तमम् च यदा गुरु |
भवेत् हि जागते पादे तदा स्यात् हरिणप्लुता ||५५||

**अन्वय :-** जागते पादे यदा चतुर्थम् सप्तमम् दशमम् अन्त्यम् च गुरु भवेत् तदा (सा) हरिणप्लुता स्यात् | यथा -

**अर्थ -** जगती जातीच्या अर्थात बारा अक्षरे असलेल्या चरणामध्ये चौथे, सातवे, दहावे आणि शेवटचे म्हणजेच बारावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास ' हरिणप्लुता' म्हटले जाते . उदाहरणार्थ -

**परुषवाक्यकशाभिहता त्वया**
**भयविलोकनपार्श्वनिरीक्षणा |**
**वरतनु: प्रततप्लुतसर्पणै-**
**रनुकरोति गतैर्हरिणप्लुतम् || ५६ ||**

**पदच्छेद :-** परुष-वाक्य-कशा-अभिहता त्वया भय-विलोकन-पार्श्व-निरीक्षणा |
वरतनु : प्रतत-प्लुत-सर्पणै : अनुकरोति गतै : हरिणप्लुतम् ||५६||

**अन्वय :-** त्वया परुष-वाक्य-कशा-अभिहता भय-विलोकन-पार्श्व-निरीक्षणा वरतनु: प्रतत-प्लुत-सर्पणै : गतै : हरिणप्लुतम् अनुकरोति |

**अर्थ -** तुझ्या कठोर शाब्दिक चाबकाच्या फटक्यांनी घायाळ झालेली, घाबरून पाहत आजूबाजूला न्याहाळणारी ती सुंदरी लांब उड्या मारून जाणाऱ्या हरिणीच्या गतीचे अनुकरण करीत आहे .

❖ **कामदत्ता वृत्त** ❖

**अथ कामदत्तावृत्तम्-**
**सप्तमं नवमं चान्त्यमुपान्त्यं च यदा गुरु |**
**द्वादशाक्षरके पादे कामदत्तेति सा यथा || ५७ ||**

**पदच्छेद :** - सप्तमम् नवमम् च अन्त्यम् उपान्त्यम् च यदा गुरु |
द्वादशाक्षरके पादे कामदत्ता इति सा यथा || ५७ ||

**अन्वय :** - यदा द्वादशाक्षरके पादे सप्तमम् नवमम् उपान्त्यम् अन्त्यम् च गुरु (अस्ति) सा कामदत्ता इति (कथ्यते) | यथा -

**अर्थ** - बारा अक्षरे असलेल्या चरणामध्ये जेव्हा सातवे, नववे, अकरावे आणि शेवटचे म्हणजेच बारावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'कामदत्ता' असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**करजपदविभूषिता यथा त्वं**
**सुदति दशनविक्षताधरा च |**
**गतिरपि चरणावलग्नमन्दा**
**त्वमसि मृगनिभाक्षि कामदत्ता || ५८ ||**

**पदच्छेद :** - करज-पद-विभूषिता यथा त्वम् सुदति ! दशनविक्षताधरा च |
गति : अपि चरण-अवलग्न-मन्दा त्वम् असि मृग-निभ-अक्षि ! कामदत्ता || ५८ ||

**अन्वय :** - त्वम् करजपदविभूषिता | सुदति ! दशनविक्षताधरा (असि) | मृगनिभाक्षि ! अपि च (तव) गति : चरणावलग्नमन्दा (अस्ति) त्वम् (खलु) कामदत्ता असि | यथा -

**अर्थ** - नखांच्या ओरखड्यांनी तू अलंकृत झाली आहेस . हे सुंदर दंतावली असणाऱ्या प्रिये, तुझ्या ओठांवर दातांची खूण आहे . हे मृगनयनी, तुझं चालणंदेखील हळूवार झाले आहे . तू खरंच 'कामदत्ता' आहेस . प्रत्यक्ष कामदेवानेच मला तू दिली आहेस .

❖ **अप्रमेया वृत्त** ❖

**आद्यं चतुर्थं दशमं सप्तमं च यदा लघु |**
**पादे तु जागते यस्या अप्रमेया तु सा यथा ||५९||**

**पदच्छेद: -** आद्यम् चतुर्थम् दशमम् सप्तमम् च यदा लघु |
पादे तु जागते यस्या: अप्रमेया तु सा यथा ||५९||

**अन्वय: -** यस्या: जागते पादे आद्यम् चतुर्थम् दशमम् तु सप्तमम् च यदा लघु (अस्ति) सा तु अप्रमेया (कथ्यते) | यथा -

**अर्थ -** जगती जातीच्या म्हणजेच बारा अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिले, चौथे, सातवे आणि दहावे अक्षर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरू असतील तर त्या वृत्तास 'अप्रमेया' असे म्हणतात.

**न ते काचिदन्या समा दृश्यते स्त्री**
**नृलोके विशिष्टा गुणैरद्वितीयै: |**
**त्रिलोक्यां गुणाग्र्यान् समाहृत्य सर्वान्**
**जगत्यप्रमेयाऽसि सृष्टा विधात्रा || ६० ||**

**पदच्छेद: -** न ते काचित् अन्या समा दृश्यते स्त्री नृलोके विशिष्टा गुणै: अद्वितीयै: |
त्रिलोक्याम् गुणाग्र्यान् समाहृत्य सर्वान् जगति अप्रमेया असि सृष्टा विधात्रा || ६० ||

**अन्वय: -** नृलोके ते समा अद्वितीयै: गुणै: विशिष्टा काचिद् अन्या स्त्री न दृश्यते | विधात्रा त्रिलोक्याम् सर्वान् गुणाग्र्यान् समाहृत्य सृष्टा (अत: त्वम्) जगति अप्रमेया असि |

**अर्थ -** या मानवलोकामध्ये तुझ्या समान अद्वितीय गुणांनी युक्त अशी दुसरी स्त्री दिसत नाही कारण विधात्याने त्रैलोक्यातील सर्व श्रेष्ठ गुण एकत्र करून तुला घडवलं आहे. म्हणूनच तू या संपूर्ण जगात अनाकलनीय आहे.

❖ पद्मिनी वृत्त ❖

**अथ पद्मिनीवृत्तम्-**
**द्वितीयं पञ्चमं चैव ह्यष्टमैकादशे तथा |**
**पादे यत्र लघूनि स्यु: पद्मिनी नाम सा यथा || ६१ ||**

**पदच्छेद: -** द्वितीयम् पञ्चमम् च एव हि अष्टम-एकादशे तथा |
पादे यत्र लघूनि स्यु: पद्मिनी नाम सा यथा || ६१ ||

**अन्वय: -** पादे यत्र द्वितीयम् पञ्चमम् अष्टम-एकादशे च लघूनि एव स्यु:, सा पद्मिनी नाम | यथा -

**अर्थ -** बारा अक्षरे असलेल्या चरणातील दुसरे, पाचवे, आठवे आणि अकरावे अक्षर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरू असतील तर त्यास 'पद्मिनी' वृत्त म्हणतात .

**देहतोयाशया वक्त्रपद्मोज्ज्वला**
**नेत्रभृङ्गाकुला दन्तहंसस्मिता |**
**केशपाशच्छदा चक्रवाकस्तनी**
**पद्मिनीव प्रिये भासि मे सर्वदा || ६२ ||**

**पदच्छेद: -** देह-तोय-आशया वक्त्र-पद्म-उज्ज्वला नेत्र-भृङ्ग-आकुला दन्त-हंस-स्मिता |
केश-पाश-छदा चक्रवाक-स्तनी पद्मिनी इव प्रिये भासि मे सर्वदा || ६२ ||

**अन्वय: -** प्रिये, देहतोयाशया वक्त्रपद् मोज्ज्वला नेत्रभृङ्गाकुला दन्तहंसस्मिता केशपाशच्छदा चक्रवाकस्तनी (त्वम्) सर्वदा मे पद्मिनी इव भासि |

**अर्थ -** हे प्रिये ! तुझे शरीर सरोवरासमान निर्मळ आहे . तुझे मुख विकसित कमळासारखे सुंदर आहे . तुझे डोळे भुंग्याप्रमाणे कासावीस आहेत . तुझी दंतपंक्ती हंसासमान स्मितहास्य करणारी आहे . तुझे केस जाळ्यासमान मला त्यात अडकवणारे आहेत आणि चक्रवाक पक्ष्यांच्या जोडीसमान तुझे पुष्ट आणि सुंदर स्तन आहेत . खरंच हे प्रिये, तू मला कमलिनीसमान भासत आहेस .

**फुल्लपद्मानना त्वं द्विरेफेक्षणा**
**केशपत्रच्छदा चक्रवाकस्तनी |**
**पीततोयावली बद्धकाञ्चीगुणा**
**पद्मिनीव प्रिये ! भासि नीरे स्थिता || ६३ ||**

**पदच्छेद : -** फुल्ल-पद्म-आनना त्वम् द्विरेफ-ईक्षणा केश-पत्र-छदा चक्रवाक-स्तनी |
पीत-तोयावली बद्ध-काञ्ची-गुणा पद्मिनी इव प्रिये ! भासि नीरे स्थिता || ६३ ||

**अन्वय : -** प्रिये ! फुल्लपद्मानना द्विरेफेक्षणा केशपत्रच्छदा चक्रवाकस्तनी पीततोयावली बद्धकाञ्चीगुणा त्वम् नीरे स्थिता पद्मिनी इव भासि |

**अर्थ -** हे प्रिये ! तुझा चेहरा प्रफुल्लित कमळासमान सुंदर आहे . तुझे डोळे भुंग्यासमान चंचल आहेत . तुझे केस कमळाच्या पानांसमान विशाल आणि मला झाकून टाकणारे आहेत . चक्रवाक पक्ष्यांची जोडी तुझे स्तन आहेत . तू सरोवरातील पाणी प्राशन करतेस . कमलदेठांची जणू मेखला तू धारण केली आहेस . खरंच तू मला पाण्यात असलेल्या कमलिनीसमान दिसत आहेस .

गायकवाड सीरिज मध्ये 'पद्मिनी' या वृत्ताचे आणखी एक लक्षण दिले आहे .

**रास्त्रिका सागराख्या निविष्टा यदा**
**स्यात् त्रिके च त्रिके युक्तरूपा यति:|**
**सन्निविष्टा जगत्यास्ततस्सा बुधै-**
**र्नामतश्चापि संकीर्त्यते पद्मिनी ||**

**पदच्छेद : -** रा : त्रिका : सागराख्या : निविष्टा : यदा स्यात् त्रिके च त्रिके युक्तरूपा यति : |
सन्निविष्टा जगत्या : तत : सा बुधै : नामत : च अपि संकीर्त्यते पद्मिनी ||

**अन्वय : -** यदा सागराख्या : रा : त्रिका : निविष्टा : , यति : त्रिके त्रिके च युक्तरूपा स्यात् |
तत : जगत्या : सन्निविष्टा सा बुधै : नामत : 'पद्मिनी' इति संकीर्त्यते ||

**अर्थ** - ज्या वृत्ताच्या प्रत्येक चरणामध्ये चार (कारण या भूतलावर चार समुद्र आहेत म्हणून चार) 'र' त्रिके असतील आणि तीन तीन अक्षरांवर यती असेल, तेव्हा जगती जातीत असलेल्या या वृत्तास विद्वान 'पद्मिनी' या नावाने ओळखतात. (पदिमनी या वृत्तालाच 'स्रग्विणी' या नावानेही ओळखले जाते. वरील लक्षण हेच त्या वृत्ताचे उदाहरण आहे.)

**❖ पुट वृत्त ❖**

**अथ पुट वृत्तम्-**
**आदौ षट्दशमं चैव पादे यत्र लघून्यथ |**
**शेषाणि तु गुरूणि स्युर्जागते पुटसंज्ञिता || ६४ ||**

**पदच्छेद :** - आदौ षट्दशमम् च एव पादे यत्र लघूनि अथ |
शेषाणि तु गुरूणि स्यु : जागते पुटसंज्ञिता || ६४ ||

**अन्वय :** - अथ यत्र जागते पादे आदौ षट्-दशमम् लघूनि (तथा) शेषाणि गुरूणि स्यु : तदा 'पुट' इति संज्ञिता |

**अर्थ** - जगती छंदातील म्हणजेच बारा अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिली सहा अक्षरे आणि दहावे अक्षर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरू असतील तर त्या वृत्तास 'पुट' असे म्हणतात.

**उपवनसलिलानां बालपद्मै-**
**र्भ्रमरपरभृतानां कण्ठनादै: |**
**मदनमदविलासै: कामिनीनां**
**कथयति पुटवृत्तं पुष्पमास: || ६५ ||**

**पदच्छेद :** - उपवन-सलिलानाम् बालपद्मै : भ्रमर-परभृतानाम् कण्ठनादै : |
मदनमद-विलासै : कामिनीनाम् कथयति पुटवृत्तम् पुष्पमास : || ६५ ||

**अन्वय :** - उपवनसलिलानाम् बालपद्मै :, भ्रमरपरभृतानाम् कण्ठनादै :, कामिनीनाम् मदनमदविलासै :, पुष्पमास : पुटवृत्तम् कथयति |

**अर्थ** - वनातील सरोवरामध्ये उमललेल्या नवीन कमळांमुळे, भृंगे आणि कोकिळ यांच्या आवाजामुळे, आणि कामिनी स्त्रियांच्या उन्मत्त क्रीडेमुळे चैत्रमास म्हणजेच वसंतऋतू 'प्रेमीयुगलांची कथा' (पुटवृत्त) सांगत आहे .

**|| प्रतिचरण तेरा अक्षरे ||**

**❖ प्रभावती वृत्त ❖**

**अथ प्रभावतीवृत्तम्-**
**द्वितीयान्त्ये चतुर्थं च नवमैकादशे गुरु |**
**विच्छेदोऽतिजगत्यां तु चतुर्भि: सा प्रभावती || ६६ ||**

**पदच्छेद: -** द्वितीय-अन्त्ये चतुर्थम् च नवम-एकादशे गुरु |
विच्छेद: अतिजगत्याम् तु चतुर्भि: सा प्रभावती || ६६ ||

**अन्वय: -** अतिजगत्याम् यदा द्वितीय-अन्त्ये चतुर्थम् च नवम-एकादशे गुरु: अस्ति | तथा चतुर्भि: तु विच्छेद: , सा प्रभावती (भवति) | यथा -

**अर्थ** - जेव्हा अतिजगती जातीमध्ये म्हणजेच तेरा अक्षरे असलेल्या प्रत्येक चरणातील दुसरे, चौथे, नववे, अकरावे आणि बारावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील आणि चार अक्षरांनी यती येईल, तेव्हा त्या वृत्तास 'प्रभावती' वृत्त असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**कथं न्विदं कमलविशाललोचने !**
**गृहं घनै: पिहितकरे दिवाकरे |**
**अचिन्तयन्त्यभिनववर्षविद्युतस्-**
**त्वमागता सुतनु ! यथा प्रभावती || ६७ ||**

**पदच्छेद: -** कथम् नु इदम् कमलविशाललोचने ! गृहम् घनै: पिहितकरे दिवाकरे |
अचिन्तयन्ती अभिनववर्षविद्युत: त्वम् आगता सुतनु ! यथा प्रभावती || ६७ ||

**अन्वय:** - हे कमलविशाललोचने! घनै: पिहितकरे दिवाकरे अभिनववर्षविद्युत: अचिन्तयन्ती, हे सुतनु ! यथा प्रभावती (तथा) त्वम् कथम् नु इदम् गृहम् आगता | यथा -

**अर्थ** - हे कमळासमान विशाल नेत्र असणाऱ्या प्रिये, आकाशात मेघांनी सूर्य झाकल्यावर म्हणजेच एकाएकी दिवसा अंधार झाल्यावर पहिल्या पावसामध्ये कडाडणाऱ्या वीजेची पर्वा न करता, हे सुंदरी, तू त्या उपेसमान कशी काय या घरी आलीस?

**❖ प्रहर्षिणी वृत्त ❖**

**अथ प्रहर्षिणीवृत्तम्-**
**त्रीण्यादावष्टमं चैव दशमं नैधनद्वयम् |**
**गुरूण्यतिजगत्यां तु त्रिभिश्छेदै: प्रहर्षिणी || ६८ ||**

**पदच्छेद:** - त्रीणि आदौ अष्टमम् च एव दशमम् नैधनद्वयम् |
गुरूणि अतिजगत्याम् तु त्रिभि: छेदै: प्रहर्षिणी || ६८ ||

**अन्वय:** - अतिजगत्याम् आदौ त्रीणि, अष्टमम्, दशमम् नैधनद्वयम् च गुरूणि (भवन्ति तथा) त्रिभि: छेदै: (सा) प्रहर्षिणी (भवति) |

**अर्थ** - अतिजगती जातीच्या म्हणजेच तेरा अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये सुरूवातीची तीन अक्षरे, आठवे, दहावे व शेवटची दोन अक्षरे म्हणजेच बारावे व तेरावे अक्षर गुरू असेल आणि शेष अक्षरे लघू असतील आणि तसेच तीन अक्षरांनी यति असल्यास, त्या वृत्तास 'प्रहर्षिणी' असे म्हणतात .

**भावस्थैर्मधुरकथै: सुभाषितैस्त्वं**
**साटोपस्खलितविलम्बितैर्गतैश्च |**
**शोभाढ्यैर्हरसि मनांसि कामुकानां**
**सुव्यक्तं ह्यतिजगती प्रहर्षिणी च || ६९ ||**

**पदच्छेद:** - भावस्थै: मधुरकथै: सुभाषितै: त्वम् साटोप-स्खलित-विलम्बितै: गतै: च |
शोभाढ्यै: हरसि मनांसि कामुकानाम् सुव्यक्तम् हि अतिजगती प्रहर्षिणी च || ६९ ||

**अन्वय: -** त्वम् भावस्थैः मधुरकथैः सुभाषितैः साटोपस्खलितविलम्बितैः गतैः शोभाढ्यैः च कामुकानाम् मनांसि हरसि | सुव्यक्तम् हि (त्वम्) अतिजगती प्रहर्षिणी च (असि) |

**अर्थ -** हे प्रिये ! तू तुझ्या भावप्रधान गोड वाणीने सांगितलेल्या सुवचनांमुळे, अभिमानाने अडखळणाऱ्या तुझ्या हळूवार गतीमुळे आणि सौंदर्याची खाण असल्याकारणाने तू कामीजनांचे चित्त आकर्षून घेत आहेस. खरंच हे स्पष्टच आहे की, तू या लौकिक जगाहून वेगळी म्हणजे दिव्य आहेस आणि सर्वांना त्वरित आनंद देणारीही आहेस.

### ❖ मत्तमयूरक वृत्त ❖

**अथ मत्तमयूरकवृत्तम्-**
**षष्ठं च सप्तमं चैव दशमैकादशे लघु |**
**त्रयोदशाक्षरे पादे ज्ञेयं मत्तमयूरकम् || ७० ||**

**पदच्छेद: -** षष्ठम् च सप्तमम् च एव दशमैकादशे लघु |
त्रयोदशाक्षरे पादे ज्ञेयम् मत्तमयूरकम् || ७० ||

**अन्वय: -** त्रयोदशाक्षरे पादे षष्ठम् सप्तमम् दशमैकादशे च लघु (चेत् तत् वृत्तम्) मत्तमयूरकम् (इति) ज्ञेयम् |

**अर्थ -** तेरा अक्षरे असणाऱ्या चरणामध्ये सहावे, सातवे, दहावे आणि अकरावे अक्षर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरू असतील तर त्या वृत्तास 'मत्तमयूरक' म्हणून ओळखावे.

**विद्युन्नद्धाः सेन्द्रधनूरञ्जितदेहा**
**वातोद्धूताः श्वेतबलाकाकृतशोभाः |**
**एते मेघा गर्जितनादोज्ज्वलचिह्नाः**
**प्रावृट्कालं मत्तमयूरान् कथयन्ति || ७१ ||**

**पदच्छेद: -** विद्युत्-नद्धाः सेन्द्रधनु-रञ्जितदेहाः वात-उद्धूताः श्वेतबलाका-कृतशोभाः |
एते मेघाः गर्जित-नाद-उज्ज्वल-चिह्नाः प्रावृट्कालम् मत्तमयूरान् कथयन्ति || ७१ ||

**अन्वय: -** विद्युन्नद्धाः सेन्द्रधनूरञ्जितदेहाः वातोद्धूताः श्वेतबलाकाकृतशोभाः गर्जितनादोज्ज्वल चिह्नाः एते मेघाः प्रावृट्कालम् मत्तमयूरान् कथयन्ति ।

**अर्थ -** ज्यांमध्ये वीजा दडून बसल्या आहेत, इंद्रधनुष्यामुळे ज्यांची काया रंगलेली आहे, जे वायुमुळे आकाशात संचार करीत आहेत, शुभ्र बगळयांच्या माळेमुळे ज्यांना शोभा प्राप्त झाली आहे, असे हे गर्जना करणारे आणि मांगल्याचं प्रतीक असणारे मेघ, मदमस्त मयूरांना वर्षाऋतूची जणू सूचनाच देत आहेत.

**॥ प्रतिचरण चौदा अक्षरे ॥**

**❖ वसंततिलका वृत्त ❖**

**अथ वसन्ततिलकावृत्तम्-**
**आदौ द्वे चतुर्थं चाप्यष्टमैकादशे गुरु ।**
**अन्त्योपान्त्ये च शक्वर्यां वसन्ततिलका यथा ॥ ७२ ॥**

**पदच्छेद: -** आदौ द्वे चतुर्थम् च अपि अष्टम-एकादशे गुरु ।
अन्त्य-उपान्त्ये च शक्वर्याम् वसन्ततिलका यथा ॥ ७२ ॥

**अन्वय: -** शक्वर्याम् आदौ द्वे, चतुर्थम्, अष्टमैकादशे अपि च अन्त्योपान्त्ये गुरु (चेत्) (सा) वसन्ततिलका (इति कथ्यते) । यथा -

**अर्थ -** शक्वरी जातीतील म्हणजेच चौदा अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिले, दुसरे, चौथे, आठवे, अकरावे, तेरावे आणि चौदावे अक्षर गुरू असेल आणि शेष अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'वसंततिलका' असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**चित्रैर्वसन्तकुसुमैः कृतकेशहस्ता**
**स्रग्दाममाल्यरचनासुविभूषिताङ्गी ।**
**नानावतंसकविभूषितकर्णपाशा**
**साक्षाद्वसन्ततिलकेव विभाति नारी ॥ ७३ ॥**

**पदच्छेद : -** चित्रै: वसन्त-कुसुमै: कृतकेश-हस्ता स्रग्-दाम-माल्य-रचना-सुविभूषित-अङ्गी | नाना-अवतंसक-विभूषित-कर्ण-पाशा साक्षात् वसन्ततिलका इव विभाति नारी || ७३ ||

**अन्वय : -** वसन्तकुसुमै: चित्रै: कृतकेशहस्ता स्रग्-दाम-माल्य-रचना-सुविभूषित-अङ्गी नाना-अवतंसक-विभूषित-कर्ण-पाशा नारी साक्षात् वसन्ततिलका इव विभाति |

**अर्थ -** वासंतिक फुलांनी जिचे केस सजविले आहेत, फुलांच्या माळांनी जिचे शरीर अत्यंत सुशोभित केले आहे, अनेक प्रकारच्या कर्णाभूषणांनी किंवा नागपाशाच्या फुलांनी तयार केलेली कर्णाभूषणे जिने धारण केलेली अशी ही स्त्री साक्षात् वसंततिलकेप्रमाणे सुंदर दिसत आहे.

### ❖ असंबाधा वृत्त ❖

**अथ असम्बाधावृत्तम्-**
**पञ्चादौ शक्वरी पादे गुरूणि त्रीणि नैधने |**
**पञ्चाक्षरादौ च यतिरसंबाधा तु सा यथा || ७४ ||**

**पदच्छेद : -** पञ्च-आदौ शक्वरी पादे गुरूणि त्रीणि नैधने |
पञ्च-अक्षर-आदौ च यति: असंबाधा तु सा यथा || ७४ ||

**अन्वय : -** शक्वरी पादे पञ्चादौ नैधने त्रीणि च गुरूणि यति: तु पञ्चाक्षरादौ (अस्ति) सा यथा असंबाधा (भवति) |

**अर्थ -** शक्वरी जातीच्या म्हणजेच चौदा अक्षरे असलेल्या चरणामध्ये सुरुवातीची पाच अक्षरे आणि शेवटची तीन अक्षरे गुरू असतील व शेष अक्षरे लघू असतील आणि पाच अक्षरांनंतर यति असते त्या वृत्तास 'असंबाधा' असे म्हणतात.

**मानी लोकज्ञ: श्रुतबलकुलशीलाढ्यो**
**यस्मिन्सम्मानं न सदृशमनुपश्येद्धि |**
**गच्छेत्तं त्यक्त्वा तं द्रुतगतिरपरं**
**देशं कीर्णा नानार्थैरवनिरियमसंबाधा || ७५ ||**

**पदच्छेद : -** मानी लोकज्ञ : श्रुत-बल-कुल-शील-आढ्य : यस्मिन् सम्मानम् न सदृशम् अनुपश्येत् हि |
गच्छेत् तम् त्यक्त्वा तम् द्रुतगति : अपरम् देशम् कीर्णा नानार्थै : अवनि : इयम् असंबाधा || ७५ ||

**अन्वय : -** मानी लोकज्ञ : श्रुतबलकुलशीलाढ्य : यस्मिन् सदृशम् सम्मानम् न अनु पश्येद् (चेत्) तम् त्यक्त्वा द्रुतगति : तम् अपरम् देशम् गच्छेत् | नानार्थै : हि कीर्णा इयम् अवनि : असंबाधा (अस्ति) |

**अर्थ -** लोकवृत्ताला जाणणारे, शास्त्र बल कुळ आणि शीलसंपन्न मानी पुरुषांना योग्य असा मान मिळत नसेल तर त्यांनी त्या ठिकाणावरून निघून जावे; कारण विविध अर्थांनी परिपूर्ण अशी ही पृथ्वी खूप विस्तृत आहे .

**❖ शरभा वृत्त ❖**

**अथ शरभावृत्तम्-**
**चत्वार्यादौ गुरूणि स्युर्दशमैकादशे तथा |**
**अन्त्योपान्त्ये च शक्वर्या : पादे तु शरभा यथा || ७६ ||**

**पदच्छेद : -** चत्वारि आदौ गुरूणि स्यु : दशम-एकादशे तथा |
अन्त्य-उपान्त्ये च शक्वर्या : पादे तु शरभा यथा || ७६ ||

**अन्वय : -** शक्वर्या : पादे आदौ चत्वारि तथा दशमैकादशे अन्त्योपान्त्ये च गुरूणि स्यु : (सा) तु शरभा (वर्तते) | यथा -

**अर्थ -** शक्वरी जातीतील म्हणजे चौदा अक्षरे असलेल्या चरणातील सुरुवातीची चार अक्षरे, दहावे, अकरावे, तेरावे व चौदावे अक्षर गुरू असेल व उरलेली अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'शरभा' असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**एषा कान्ता व्रजति ललितं वेपमाना**
**गुल्मैश्छन्नं वनमभिनवै : संप्रविद्धम् |**
**हा हा कष्टं किमिदमिति नो वेद्मि मूढो**
**व्यक्तं कान्ते ! शरभललिता त्वं करोषि || ७७ ||**

**पदच्छेद :-** एषा कान्ता व्रजति ललिता वेपमाना गुल्मै : छन्नम् वनम् अभिनवै : संप्रविद्धम् |
हा हा कष्टम् किम् इदम् इति नो वेद्मि मूढ : व्यक्तम् कान्ते ! शरभललिता त्वम् करोषि || ७७ ||

**अन्वय :** - एषा ललिता वेपमाना कान्ता गुल्मै : छन्नम् अभिनवै : संप्रविद्धम् वनम् व्रजति | हा हा किम् इदम् कष्टम्? इति अहममूढ: नो वेद्मि | हे कान्ते ! व्यक्तम् अस्ति अत्र यत् त्वम् शरभललिता करोषि |

**अर्थ** - ही कांता, ललित गतीने कंपित शरीराने कोमल फुलांची आरास असलेल्या वनामध्ये जात आहे . अरेरे ! किती हा त्रास ? मला मूर्खाला खरंच हे कळतच नाही . हे कान्ते, हे तर स्पष्टच आहे की हत्तीच्या पिल्लासमान ललित क्रिया तू करीत आहेस .
(मंदाक्रांता वृत्तातील अकराव्या बाराव्या आणि तेराव्या अक्षराचा लोप केला की जे वृत्त मिळते ते शरभावृत्त होय . )

**|| प्रतिचरण पंधरा अक्षरे ||**

**❖ नांदीमुखी वृत्त ❖**

**अथ नान्दीमुखीवृत्तम्-**
**आदौ षट्दशमं चैव लघु चैव त्रयोदशम् |**
**यत्रातिशाक्वरे पादे ज्ञेया नान्दीमुखी तु सा || ७८ ||**

**पदच्छेद :-** आदौ षट् दशमम् च एव लघु च एव त्रयोदशम् |
यत्र अतिशाक्वरे पादे ज्ञेया नान्दीमुखी तु सा || ७८ ||

**अन्वय :** - अतिशाक्वरे पादे यत्र आदौ षट् दशमम् त्रयोदशम् लघु (अस्ति) सा तु नान्दीमुखी ज्ञेया | यथा -

**अर्थ** - अतिशक्वरी जातीतील म्हणजेच १५ अक्षरे असलेल्या चरणामध्ये जेव्हा पहिली सहा अक्षरे, दहावे आणि तेरावे अक्षर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरू असतील तर त्या वृत्तास 'नान्दीमुखी' असे म्हणतात .

**न खलु तव कदाचित्क्रोधताम्रायताक्षं**
**भ्रुकुटिवलिभङ्गं दृष्टपूर्वं मयास्यम् |**

**किमिह बहुभिरुक्तैर्या ममेच्छा हृदिस्था**
**त्वमसि मधुरवाक्या देवि ! नान्दीमुखीव ||७९||**

**पदच्छेद :-** न खलु तव कदाचित् क्रोध-ताम्र-आयत-अक्षम् भ्रुकुटिवलि-भङ्गम् दृष्टपूर्वम् मया आस्यम्|
किम् इह बहुभि: उक्तै: या मम इच्छा हृदिस्था त्वम् असि मधुरवाक्या देवि ! नान्दीमुखी इव ||७९||

**अन्वय :-** देवि ! क्रोध-ताम्र-आयत-अक्षम् भ्रुकुटिवलि-भङ्गम् तव आस्यम् खलु मया न कदाचित् दृष्टपूर्वम्| किम् इह बहुभि: उक्तै:? या मम हृदिस्था इच्छा त्वम् मधुरवाक्या नान्दीमुखी इव असि|

**अर्थ -** हे देवी, रागाने डोळे लाल आणि मोठे झाले आहेत किंवा भुवया वक्र झाल्या आहेत असे तुझ्या चेहऱ्यावर मी कधीही पाहिले नाही. आता आणखी यापेक्षा तुला अधिक काय सांगू? माझ्या हृदयात जी इच्छा आहे ती म्हणजे गोड वाणीने बोलणारी नांदीमुखीप्रमाणे असणारी तूच आहेस.
(हेच वृत्त मालिनी या नावाने प्रसिद्ध आहे.)

**||प्रतिचरण सोळा अक्षरे||**

**❖ इभललित वृत्त ❖**

**अथ इभललितवृत्तम्-**
**आद्यं चतुर्थं षष्ठं च नैधनं च यदा गुरु|**
**षोडशाक्षरके पादे यत्रेभललितं तु तत्||८०||**

**पदच्छेद :-** आद्यम् चतुर्थम् षष्ठम् च नैधनम् च यदा गुरु|
षोडशाक्षरके पादे यत्र इभललितम् तु तत्||८०||

**अन्वय :-** यदा षोडशाक्षरके पादे आद्यम् चतुर्थम् षष्ठम् च नैधनम् च यत्र गुरु तत् तु इभललितम् (भवति)|

**अर्थ -** सोळा अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिले, चौथे, सहावे आणि शेवटचे अक्षर गुरू असेल आणि शेष अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'इभललित' असे म्हणतात .

**तोयधरै: सुधीरघनपटुपटहरवै:**
**सर्जकदम्बनीपकुटचकुसुमसुरभि: |**
**कन्दलसेन्द्रगोपकरचितमवनितलं**
**वीक्ष्य करोत्यसौ वृषभगजविलसितकम् ||८१||**

**पदच्छेद: -** तोयधरै: सुधीर-घन-पटु-पटह-रवै: सर्ज-कदम्ब-नीप-कुटज-कुसुम-सुरभि:| कन्दल-सेन्द्रगोपक-रचितम् अवनितलम् वीक्ष्य करोति असौ वृषभगज-विलसितकम् ||८१||

**अन्वय: -** सुधीर-घन-पटु-पटह-रवै: तोयधरै: सर्ज-कदम्ब-नीप-कुटज-कुसुम-सुरभि: कन्दल-सेन्द्रगोपक-रचितम् अवनितलम् वीक्ष्य असौ वृषभगज-विलसितकं करोति |

**अर्थ -** नगाऱ्याच्या आवाजाप्रमाणे अत्यंत गंभीर ध्वनी असलेल्या ढगांनी व्यापलेल्या, तसेच सज, कदंब, नीप आणि कुटज फुलांच्या सुगंधाने दरवळलेल्या आणि केळफूल व सेंद्रगोप (लाल रंगाच्या किड्यांनी) भरलेल्या पृथ्वीला पाहून तो नायक शक्तिशाली हत्तीप्रमाणे कृती करू लागला .

### ❖ ललितप्रवर वृत्त ❖

**अथ ललितप्रवरवृत्तम्-**
**आद्यात्पराणि वै पञ्च द्वादशं सत्रयोदशम् |**
**अन्त्योपान्त्ये च दीर्घाणि ललितप्रवरं हि तत् ||८२||**

**पदच्छेद: -** आद्यात् पराणि वै पञ्च द्वादशं सत्रयोदशम् | अन्त्योपान्त्ये च दीर्घाणि ललितप्रवरं हि तत् ||८२||

**अन्वय: -** आद्यात् पराणि पञ्च द्वादशं सत्रयोदशम् अन्त्योपान्त्ये च दीर्घाणि (सन्ति) तत् हि ललितप्रवरम् |

**अर्थ** - ज्या वृत्ताच्या प्रत्येक पादाच्या पहिल्या अक्षरानंतरची पाच अक्षरे, बारावे, तेरावे, पंधरावे आणि सोळावे अक्षर दीर्घ म्हणजेच गुरू असतील आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर ते 'ललितप्रवर' वृत्त होते .
(शिखरिणीवृत्तातील अंतिम दोन लघु वर्णांचा एक गुरु वर्ण केला की जे वृत्त मिळते ते 'ललितप्रवर' वृत्त होय . )

**नखालीढं गात्रं दशनखचितं चोष्ठगण्डं**
**शिर:पुष्पोन्मिश्रं प्रविलुलितकशालकान्तम्|**
**गति: खिन्ना चेयं वदनमपि संभ्रान्तनेत्रं**
**अहो श्लाघ्यं वृत्तं प्रवरललितं कामचेष्टम् || ८३ ||**

**पदच्छेद: -** नख-आलीढम् गात्रम् दशन-खचितम् च ओष्ठ-गण्डम्
शिर: पुष्प-उन्मिश्रम् प्रविलुलित-कशा-अलकान्तम् |
गति: खिन्ना च इयम् वदनम् अपि संभ्रान्त-नेत्रम्
अहो श्लाघ्यम् वृत्तम् प्रवरललितम् कामचेष्टम् || ८३ ||

**अन्वय: -** नखालीढम् गात्रम्, दशनखचितम् ओष्ठगण्डम्, पुष्पोन्मिश्रम् शिर:, प्रविलुलितकशालकान्तम्, इयम् खिन्ना गति: संभ्रान्तनेत्रम् वदनम् | अहो प्रवरललितम् कामचेष्टम् वृत्तम् श्लाघ्यम् |

**अर्थ** - नायिकेचे शरीर नखक्षतांनी युक्त आहे . ओठांवर आणि गालांवर दंतक्षत आहेत . डोक्यावरची फुले विस्कटलेली आहेत व केस विस्कटलेले आहेत . तिची गती हळूवार आणि अडखळते आहे आणि संभ्रमित नेत्र असलेला असा तिचा चेहरा आहे . अहो खरंच ! तिची कामक्रीडा किती ललित आणि श्लाघनीय आहे !

**||प्रतिचरण सतरा अक्षरे ||**

### ❖ शिखरिणी वृत्त ❖

**अथ शिखरिणीवृत्तम् -**
**आद्यात्पराणि पञ्चाथ द्वादशं सत्रयोदशम् |**
**अन्त्यं सप्तदशे पादे शिखरिण्यां गुरूणि च ||८४||**

**पदच्छेद : -** आद्यात् पराणि पञ्च अथ द्वादशम् सत्रयोदशम् |
अन्त्यम् सप्तदशे पादे शिखरिण्याम् गुरूणि च || ८४ ||

**अन्वय : -** अथ सप्तदशे पादे शिखरिण्याम् आद्यात् पराणि पञ्च द्वादशम् सत्रयोदशम् अन्त्यम् च गुरूणि (सन्ति) |

**अर्थ -** सतरा अक्षरे असलेल्या शिखरिणीवृत्तातील चरणामध्ये पहिल्या अक्षरानंतरची पाच अक्षरे, (म्हणजे दुसरे, तिसरे, चवथे, पाचवे, सहावे,) बारावे, तेरावे आणि शेवटचे म्हणजेच सतरावे अक्षर गुरू असते .

**महानद्या भोगं पुलिनमिव ते भाति जघनं**
**तथास्यं नेत्राभ्यां भ्रमरसहितं पङ्कजमिव |**
**तनुस्पर्शच्छायं सुतनु सुकुमारो न परुष:**
**स्तनाभ्यां तु ताभ्यां त्वं शिखरिणि सुपीनासि वनिते ||८५||**

**पदच्छेद : -** महानद्या : भोगम् पुलिनम् इव ते भाति जघनम्
तथा आस्यम् नेत्राद्वयम् भ्रमरसहितम् प'जम् इव |
तनु-स्पर्श-छायम् सुतनु सुकुमार : न परुष :
स्तनाभ्याम् ताभ्याम् त्वम् शिखरिणि सुपीना असि वनिते ||८५||

**अन्वय : -** महानद्या : भोगम् पुलिनम् इव ते जघनम् तथा नेत्राद्वयम् आस्यम् भ्रमरसहितम् पङ्कजम् इव भाति | हे सुतनु, तनुस्पर्शच्छायम् सुकुमार :, परुष : न (अस्ति) | शिखरिणि वनिते, ताभ्याम् स्तनाभ्याम् त्वम् सुपीना असि |

**अर्थ** - हे प्रिये, तुझ्या जांघा महानदीच्या पुरासमान दीर्घ आहेत. नेत्रसौंदर्याने संपन्न असा तुझा चेहरा भुंग्यांनी युक्त अशा कमळासमान भासत आहे. हे सुन्दरी, तुझ्या शरीराचा स्पर्श सावलीसमान अतिशय कोमल आहे, कठोर नाही. हे शिखरिणी वनिते ! तुझ्या त्या स्तनांमुळे तू अत्यंत पुष्ट दिसत आहेस.

**❖ वृषभचेष्टित वृत्त ❖**

**अथ वृषभचेष्टितवृत्तम्-**
**यत्र पञ्च लघून्यादौ त्रयोदशचतुर्दशे |**
**षोडशैकादशे चैव तत्स्याद्वृषभचेष्टितम् || ८६ ||**

**पदच्छेद :** - यत्र पञ्च लघूनि आदौ त्रयोदश-चतुर्दशे |
षोडश-एकादशे च एव तत् स्यात् वृषभचेष्टितम् || ८६ ||

**अन्वय :** - यत्र आदौ पञ्च, त्रयोदश-चतुर्दशे, षोडश-एकादशे च लघूनि एव (सन्ति) तत् (वृत्तम्) वृषभचेष्टितम् स्यात् |

**अर्थ** - ज्या वृत्ताच्या सुरुवातीची पाच अक्षरे, अकरावे, तेरावे, चौदावे आणि सोळावे अक्षर लघू असेल व बाकीची अक्षरे गुरू असतील तर त्यास 'वृषभचेष्टितम्' वृत्त म्हणतात. उदाहरणार्थ -

**जलधररवं श्रुत्वा श्रुत्वा मदोच्छ्रयदर्पितो**
**विलिखति महीं शृङ्गाक्षेपैर्वृषः प्रतिनद्य च |**
**स्वयुवतिवृतो गोष्ठाद्गोष्ठं प्रयाति च निर्भयो |**
**वृषभललितं चित्रं वृत्तं करोति च शाद्वले || ८७ ||**

**पदच्छेद :** - जलधर-रवम् श्रुत्वा श्रुत्वा मद-उच्छ्रय-दर्पितः विलिखति महीम् शृङ्ग-आक्षेपैः वृषः प्रतिनद्य च |
स्वयुवति-वृतः गोष्ठात् गोष्ठम् प्रयाति च निर्भयः | वृषभललितम् चित्रम् वृत्तम् करोति च शाद्वले || ८७ ||

**अन्वय: -** जलधर-रवं श्रुत्वा श्रुत्वा मद-उच्छ्रय-दर्पित: वृष: प्रतिनद्य शृङ्ग-आक्षेपै: महीं च विलिखति | निर्भय: स्वयुवति-वृत: गोष्ठात् गोष्ठं च प्रयाति शाद्वले च वृषभललितं चित्रं वृत्तं करोति |

**अर्थ -** मेघगर्जना वारंवार ऐकून मदाने उत्कंठित होऊन हा उन्मत्त बैल (वृषभ) प्रतिगर्जना करून शिंगांनी जमीन उकरून काढीत आहे आणि निर्भय होऊन स्वत:च्या तरुण गाईंनी वेढलेला तो बैल एका गोठ्यातून दुसऱ्या गोठ्यात वेगाने जात आहे आणि हिरवळीवर येऊन विविध ललित लीला करीत आहे.

**❖ श्रीधरा वृत्त (मन्दाक्रान्ता वृत्त) ❖**

**अथ श्रीधरावृत्तम्-**
**चत्वार्यादौ च दशमं गुरु यत्र त्रयोदशम् |**
**चतुर्दशं तथान्त्ये द्वे चैकादशमथापि च ||८८||**
**यदा सप्तदशे पादे शेषाणि च लघून्यथ |**
**भवन्ति यस्मिन्सा ज्ञेया श्रीधरा नामतो यथा ||८९||**

**पदच्छेद: -** चत्वारि आदौ च दशमम् गुरु यत्र त्रयोदशम् |
चतुर्दशम् तथा अन्त्ये द्वे च एकादशम् अथ अपि च ||८८||
यदा सप्तदशे पादे शेषाणि च लघूनि अथ |
भवन्ति यस्मिन् सा ज्ञेया श्रीधरा नामत: यथा ||८९||

**अन्वय: -** अथ आदौ चत्वारि च दशमम् त्रयोदशम् चतुर्दशम् तथा अन्त्ये द्वे च अपि च एकादशम् यत्र गुरु | अथ यदा सप्तदशे पादे शेषाणि च यस्मिन् लघूनि भवन्ति सा नामत: श्रीधरा ज्ञेया | यथा -

**अर्थ -** जेव्हा सतरा अक्षरे असलेल्या चरणातील सुरुवातीची चार अक्षरे, दहावे, अकरावे, तेरावे, चौदावे आणि शेवटची दोन अक्षरे म्हणजेच सोळावे आणि सतरावे अक्षर गुरु असेल तर त्यास 'श्रीधरा' वृत्त म्हणावे. उदाहरणार्थ -

(पिंगल इत्यादी आचार्यांनी 'श्रीधरा' किंवा 'श्रीधरी' वृत्तालाच 'मंदाक्रांता' असे नाव दिले आहे. शालिनीवृत्तामधील चौथ्या अक्षरानंतर सहा लघु अक्षरे मिसळली की मंदाक्रांता वृत्त होते.)

**स्नानैश्चूर्णै सुखसुरभिभिर्गन्धवासैश्च धूपैः**
**पुष्पैश्चान्यैः शिरसि रचितैर्वस्त्रयोगैश्च तैस्तैः।**
**नानारत्नैः कनकखचितैरङ्गसंभोगसंस्थै**
**र्व्यक्तं कान्ते ! कमलनिलया श्रीधरेवातिभासि ॥ ९० ॥**

**पदच्छेदः -** स्नानैः चूर्णैः सुख-सुरभिभिः गन्धवासैः च धूपैः
पुष्पैः च अन्यैः शिरसि रचितैः वस्त्रयोगैः च तैः तैः।
नानारत्नैः कनक-खचितैः अङ्ग-संभोग-संस्थैः
व्यक्तं कान्ते ! कमल-निलया श्रीधरा इव अतिभासि ॥ ९० ॥

**अन्वयः -** कान्ते! सुखसुरभिभिः स्नानैः चूर्णैः, गन्धवासैः धूपैः च, शिरसि रचितैः पुष्पैः च, अन्यैः वस्त्रयोगैः, कनकखचितैः नानारत्नैः, तैः तैः अङ्गसंभोगसंस्थैः व्यक्तम् (यत् त्वम्) कमलनिलया श्रीधरा इव अतिभासि।

**अर्थ -** हे कांते, सुखदायी सुगंधित स्नानीय उटण्यामुळे, सुगंधी धूपामुळे, डोक्यात माळलेल्या फुलांमुळे, विविध रंगांची वस्त्रे धारण केल्यामुळे, अनेक रत्नजडित सुवर्णालंकारांमुळे हे स्पष्टच आहे की तू जणु काही कमळामध्ये निवास करणाऱ्या लक्ष्मीप्रमाणेच अतिशय शोभून दिसत आहेस.

**❖ वंशपत्रपतित वृत्त ❖**

**अथ वंशपत्रपतितवृत्तम्-**
**आद्यं चतुर्थं षष्ठं च दशमं नैधनं गुरु।**
**तद्वंशपत्रपतितं दशभिः सप्तभिर्यतिः ॥ ९१ ॥**

**पदच्छेद : -** आद्यम् चतुर्थम् षष्टम् च दशमम् नैधनम् गुरु |
तद् वंशपत्रपतितम् दशभि : सप्तभि : यति : || ९१ ||

**अन्वय : -** आद्यम् चतुर्थम् षष्टम् दशमम् नैधनम् च गुरु (तथा च) दशभि : सप्तभि : यति : (अस्ति) तत् वंशपत्रपतितम्(भवति) |

**अर्थ -** ज्या वृत्ताच्या प्रत्येक चरणातील पहिले, चौथे, सहावे, दहावे आणि शेवटचे अक्षर गुरू असेल तसेच दहा आणि सातव्या अक्षरांनंतर यति असेल तर त्यास 'वंशपत्रपतितम्' वृत्त असे म्हणतात .

**एष गजोऽद्रिमस्तकतटे कलभपरिवृत:**
**क्रीडति वृक्षगुल्मगहने कुसमभरनते |**
**मेघरवं निशम्य मुदित: पवनजवसम:**
**सुन्दरि ! वंशपत्रपतितं पुनरपि कुरुते || ९२ ||**

**पदच्छेद : -** एष : गज : अद्रि-मस्तक-तटे कलभ-परिवृत :
क्रीडति वृक्ष-गुल्म-गहने कुसम-भर-नते |
मेघरवम् निशम्य मुदित : पवन-जव-सम :
सुन्दरि ! वंशपत्रपतितम् पुन : अपि कुरुते || ९२ ||

**अन्वय : -** हे सुन्दरि! एष: कलभपरिवृत: गज: वृक्षगुल्मगहने कुसमभरनते अद्रिमस्तकतटे क्रीडति। मेघरवम् निशम्य मुदित : पवनजवसम : (स :) वंशपत्रपतितम् पुन : अपि कुरुते |

**अर्थ -** हे सुंदरी ! बालहत्तींनी वेढलेला हत्ती फुलांच्या भाराने झुकलेल्या घनदाट वृक्ष आणि झाडी असलेल्या या डोंगरावरच्या माथ्यावर क्रीडा करीत आहे आणि मेघांचा गडगडाट ऐकून अत्यंत प्रसन्न होऊन वाऱ्याच्या वेगासमान वांबूच्या झाडांची पाने खाली टाकत आहे .

### ❖ विलम्बितगति वृत्त (पृथ्वी वृत्त) ❖

**अथ विलम्बितगतिवृत्तम्-**
**द्वितीयमन्त्यं षष्ठं चाप्यष्टमं द्वादशं तथा |**
**चतुर्दशं पञ्चदशं पादे सप्तदशाक्षरे || ९३ ||**
**भवन्ति यत्र दीर्घाणि शेषाणि च लघून्यथ |**
**विलम्बितगति: सा तु विज्ञेया नामतो यथा || ९४ ||**

**पदच्छेद: -** द्वितीयम् अन्त्यम् षष्ठम् च अपि अष्टमम् द्वादशम् तथा |
चतुर्दशम् पञ्चदशम् पादे सप्तदशाक्षरे || ९३ ||
भवन्ति यत्र दीर्घाणि शेषाणि च लघूनि अथ |
विलम्बितगति: सा तु विज्ञेया नामत: यथा || ९४ ||

**अन्वय: -** अथ सप्तदशाक्षरे पादे, द्वितीयम् षष्ठम् अष्टमम् द्वादशम् चतुर्दशम् पञ्चदशम् अन्त्यम् (च) यत्र दीर्घाणि, शेषाणि च लघूनि भवन्ति सा तु नामत: विलम्बितगति: इति विज्ञेया | यथा-

**अर्थ -** जेव्हा सतरा अक्षरांच्या पादातील दुसरे, सहावे, आठवे, बारावे, चौदावे, पंधरावे आणि शेवटचे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे जर लघू असतील तर त्यास 'विलंबितगति' वृत्त असे म्हणतात . उदाहरणार्थ -
(हेच वृत्त अन्य ग्रंथांमध्ये 'पृथ्वी' या नावाने प्रसिद्ध आहे . )

**विघूर्णितविलोचना पृथुविकीर्णहारा पुन:**
**प्रलम्बरशना चलत्स्खलितपादमन्दक्लमा |**
**न मे प्रियमिदं जनस्य बहुमानरागेण यन्-**
**मदेन विवशा विलम्बितगति: कृता त्वं प्रिये || ९५ ||**

**पदच्छेद :-** विघूर्णित-विलोचना पृथु-विकीर्ण-हारा पुन:
प्रलम्ब-रशना चलत्-स्खलित-पाद-मन्द-क्लमा |
न मे प्रियम् इदम् जनस्य बहुमान-रागेण
यत् मदेन विवशा विलम्बितगति: कृता त्वम् प्रिये || ९५ ||

**अन्वय :-** (त्वम्) विघूर्णितविलोचना, पृथु-विकीर्ण-हारा, प्रलम्बरशना, चलत्-स्खलित-पाद-मन्द-क्लमा (असि) | प्रिये, इदम् मे न प्रियम् यत् जनस्य बहुमानरागेण मदेन विवशा त्वम् विलम्बितगति: कृता |

**अर्थ -** तुझे नेत्र व्याकुळ झाले आहेत . मोठा हार विस्कटला आहे . कंबर शिथिल झाली आहे . चालताना पाय अडखळत असल्याने पायाची गती मंद झाली आहे आणि पाय थकलेले दिसत आहेत . हे प्रिये, हे मला नाही आवडले की तू व्यक्तिवरच्या अतिमान, प्रेम आणि मदाने विवश होऊन मंदगती आणखीनच विलंबित केली आहेस .

**|| प्रतिचरण अठरा अक्षरे ||**

**❖ चित्रलेखा वृत्त ❖**

**अथ चित्रलेखावृत्तम्-**
**पञ्चादौ पञ्चदशकं द्वादशैकादशे गुरू |**
**चतुर्दशं तथान्त्ये द्वे चित्रलेखा धृतौ स्मृता || ९६ ||**

**पदच्छेद :-** पञ्च आदौ पञ्चदशकम् द्वादशैकादशे गुरू |
चतुर्दशम् तथा अन्त्ये द्वे चित्रलेखा धृतौ स्मृता || ९६ ||

**अन्वय :-** धृतौ आदौ पञ्च, द्वादशैकादशे, चतुर्दशम्, पञ्चदशकम् तथा (च) अन्त्ये द्वे गुरू (चेत् सा) चित्रलेखा स्मृता |

**अर्थ -** धृति जातीच्या म्हणजेच अठरा अक्षरे असलेल्या चरणामध्ये जेव्हा पाचवे, अकरावे, बारावे, चौदावे, पंधरावे, सतरावे आणि शेवटचे म्हणजेच अठरावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील त्यास 'चित्रलेखा' वृत्त असे म्हटले जाते .
(मंदाक्रांतावृत्तामध्येच पाचव्या स्थानावर एक गुरुवर्ण अधिक घेतला की चित्रलेखावृत्त होते . )

**नानारत्नाढ्यैर्बहुभिरधिकं भूषणैरङ्गसंस्थै**
**र्नानागन्धाढ्यैर्मदनजननैरङ्गरागैश्च हृद्यैः |**
**केशैः स्नानाढ्यैः कुसुमभरितैर्वस्त्ररागैश्च तैस्तैः**
**कान्ते ! संक्षेपात् किमिह बहुना चित्रलेखेव भासि || ९७ ||**

**पदच्छेदः -** नानारत्नाढ्यैः बहुभिः अधिकम् भूषणैः अङ्गसंस्थैः
नानागन्धाढ्यैः मदनजननैः अङ्गरागैः च हृद्यैः |
केशैः स्नानाढ्यैः कुसुमभरितैः वस्त्ररागैः च तैः तैः
कान्ते ! संक्षेपात् किम् इह बहुना चित्रलेखा इव भासि || ९७ ||

**अन्वयः -** नानारत्नाढ्यैः बहुभिः अधिकम् भूषणैः, अङ्गसंस्थैः नानागन्धाढ्यैः मदनजननैः हृद्यैः च अङ्गरागैः, स्नानाढ्यैः कुसुमभरितैः केशैः, तैः तैः वस्त्ररागैः च संक्षेपात् किम् इह बहुना? हे कान्ते! चित्रलेखा इव भासि |

**अर्थ -** विविध अनेक रत्नजडित अलंकारांमुळे, शरीरावर लेप दिलेल्या अनेक सुगंधांनी युक्त कामवर्धक सुंदर लेपांमुळे, स्नान केल्यानंतर विविध फुलांनी ओले केस सजविल्यामुळे आणि त्या त्या रंगीबेरंगी सुंदर वस्त्रांमुळे हे कांते ! थोडक्यात अजून तुझ्याबद्दल काय सांगायचे? तू जणू काही चित्रलेखेप्रमाणे शोभून दिसत आहेस .

**|| प्रतिचरण एकोणीस अक्षरे ||**

**❖ शार्दूलविक्रीडित वृत्त ❖**

**अथ शार्दूलविक्रीडितम्-**
**अन्त्यं सप्तदशं चैव षोडशं सचतुर्दशम् |**
**त्रयोदशं द्वादशं च षष्ठमष्टममेव च || ९८ ||**
**त्रीण्यादौ च गुरूणि स्युर्यस्मिंस्त्वेकोनविंशके |**
**पादे लघूनि शेषाणि शार्दूलक्रीडितं तु तत् || ९९ ||**

**पदच्छेदः -** अन्त्यम् सप्तदशम् च एव षोडशम् सचतुर्दशम् |
त्रयोदशम् द्वादशम् च षष्ठम् अष्टमम् एव च || ९८ ||

त्रीणि आदौ च गुरूणि स्यु: यस्मिन् अस्तु एकोनविंशके |
पादे लघूनि शेषाणि शार्दूलक्रीडितम् तु तत् || ९९ ||

**अन्वय:** - एकोनविंशके पादे आदौ त्रीणि अन्त्यम् सप्तदशम् एव च षोडशम् सचतुर्दशम् त्रयोदशम् द्वादशम् च षष्ठम् अष्टमम् एव च गुरूणि शेषाणि च यस्मिन् लघूनि स्यु: तत् तु शार्दूलक्रीडितम् अस्तु |

**अर्थ** - जेव्हा अतिधृति जातीच्या म्हणजेच एकोणीस अक्षरे असलेल्या चरणामध्ये पहिली तीन अक्षरे तसेच सहावे, आठवे, बारावे, तेरावे, चौदावे, सोळावे, सतरावे आणि शेवटचे म्हणजेच एकोणीसावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्या वृत्तास 'शार्दूलविक्रीडित' असे म्हणतात .

**नानाशस्त्रशतघ्नितोमरहता: प्रभ्रष्टसर्वायुधा:**
**निर्भिन्नोदरपादबाहुवदना निर्णाशिता: शत्रव: |**
**धैर्योत्साहपराक्रमप्रभृतिभिस्तैर्विचित्रैर्गुणै**
**वृत्तं ते रिपुघाति भाति समरे शार्दूलविक्रीडितम् || १०० ||**

**पदच्छेद:** - नाना-शस्त्र-शतघ्नि-तोमर-हता: प्रभ्रष्ट-सर्व-आयुधा:
निर्भिन्न-उदर-पाद-बाहु-वदना: निर्-नाशिता: शत्रव: |
धैर्य-उत्साह-पराक्रम-प्रभृतिभि: तै: विचित्रै: गुणै:
वृत्तं ते रिपु-घाति भाति समरे शार्दूलविक्रीडितम् || १०० ||

**अन्वय:** - नाना-शस्त्र-शतघ्नि-तोमर-हता:, प्रभ्रष्ट-सर्व-आयुधा:, निर्भिन्न-उदर-पाद-बाहु-वदना: शत्रव: निर्णाशिता: | धैर्य-उत्साह-पराक्रम-प्रभृतिभि: तै: विचित्रै: गुणै: रिपुघाति ते शार्दूलविक्रीडितम् वृत्तम् समरे भाति |

**अर्थ** - (हे राजन् !) तुझे शत्रुदल विविध शस्त्र, तोफा, भाले इत्यादींनी घायाळ झाले आहेत . सर्व आयुधे मोडली आहेत . पोट, पाय, हात, मुख पूर्णपणे धडापासून वेगळे झाले आहेत . तुझ्या शत्रूंचा सर्वनाश झाला आहे . हे राजन् ! धैर्य, उत्साह, पराक्रम इत्यादी अनेक गुणांमुळे रणांगणामध्ये शत्रूंचा नाश करणारे तुझे हे चरित्र सिंहाच्या क्रीडेप्रमाणे शोभून दिसत आहे .

**||प्रतिचरण वीस अक्षरे ||**

**❖ सुवदना वृत्त ❖**

**अथ सुवदनावृत्तम्-**
**चत्वार्यादौ च षष्ठं च सप्तमं सचतुर्दशम् |**
**तथा पञ्चदशं चैव षोडशं नैधनं तथा || १०१ ||**
**एतानि च गुरूणि स्यु: शेषानि तु लघून्यथ |**
**पादे यत्र कृतौ ज्ञेया नाम्ना सुवदना तु सा || १०२ ||**

**पदच्छेद: -** चत्वारि आदौ च षष्ठम् सप्तमम् सचतुर्दशम् |
तथा पञ्चदशम् च एव षोडशम् नैधनम् तथा || १०१ ||
एतानि च गुरूणि स्यु: शेषानि तु लघूनि अथ |
पादे यत्र कृतौ ज्ञेया नाम्ना सुवदना तु सा || १०२ ||

**अन्वय: -** अथ कृतौ पादे यत्र आदौ चत्वारि षष्ठम् सप्तमम् सचतुर्दशम् पञ्चदशम् षोडशम् नैधनम् एतानि गुरूणि, शेषानि तु लघूनि च स्यु:, सा तु नाम्ना 'सुवदना' (अस्ति) | यथा -

**अर्थ -** कृति जातीच्या म्हणजे वीस अक्षरे असलेल्या चरणामध्ये सुरुवातीची चार अक्षरे, सहावे, चौदावे, पंधरावे, सोळावे आणि शेवटचे म्हणजे विसावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्यास 'सुवदना' वृत्त असे म्हणतात. (स्रग्धरा आणि सुवदनावृत्तातील पहिली चौदा अक्षरे समानच आहेत.) उदाहरणार्थ -

**नेत्रे लीलालसान्ते कमलदलनिभे भ्रूचापविनते**
**रक्तोष्ठं पीनमध्यं समसहितघना: स्निग्धाश्च दशना: |**
**कर्णावंसप्रलम्बौ चिबुकमपि नतं घोणा सुरुचिरा**
**व्यक्तं त्वं मर्त्यलोके वरतनु ! विहितास्येका सुवदना || १०३ ||**

**पदच्छेद: -** नेत्रे लीला-लसान्ते कमलदल-निभे भ्रूचाप-अविनते
रक्तोष्ठम् पीनमध्यम् समसहित-घना: स्निग्धा: च दशना: |

कर्णौ अंसप्रलम्बौ चिबुकम् अपि नतम् घोणा सुरुचिरा
व्यक्तम् त्वम् मर्त्यलोके वरतनु ! विहिता असि एका सुवदना || १०३ ||

**अन्वय: -** वरतनु! कमलदल-निभे भ्रूचाप-अविनते लीला-अलसान्ते नेत्रे रक्तोष्ठम् पीनमध्यम् समसहितघना: स्निग्धा: दशना: अंसप्रलम्बौ कर्णौ नतम् चिबुकम् अपि (च) सुरुचिरा घोणा (अस्ति) | त्वम् मर्त्यलोके एका सुवदना व्यक्तम् विहिता असि |

**अर्थ -** हे सुंदरी ! कमलपत्रांप्रमाणे विशाल असणारे, धनुष्यासमान कमानदार भुवया असणारे, विविध लीलांमुळे अतिशय झुकलेले तुझे दोन्ही नेत्र आहेत . ओठ लाल आहेत . कंबर स्थूल आहे . दात समान, एकमेकांच्या जवळ, मजबूत आणि चकचकीत आहेत . कानातील आभूषणे गळून पडली आहेत . हनुवटी खाली झुकलेली आहे . नाक अत्यंत सरळ व सुंदर आहे . हे वरतनु ! या मृत्युलोकात विधात्याने तुला 'सुवदना' (सुमुखीच) बनविले अहे .

**|| प्रतिचरण एकवीस अक्षरे ||**

**❖ स्रग्धरा वृत्त ❖**

**अथ स्रग्धरावृत्तम्-**
**चत्वार्यादौ च षष्ठं सप्तमं सचतुर्दशम् |**
**अष्टादशं सप्तदशं तथा पञ्चदशं पुन: || १०४ ||**
**अन्त्योपान्त्ये गुरूण्यत्र लघून्यन्यानि सर्वदा |**
**एकविंशतिके पादे स्रग्धरा नाम सा यथा || १०५ ||**

**पदच्छेद: -** चत्वारि आदौ च षष्ठम् सप्तमम् सचतुर्दशम् |
अष्टादशम् सप्तदशम् तथा पञ्चदशम् पुन: || १०४ ||
अन्त्योपान्त्ये गुरूणि अत्र लघूनि अन्यानि सर्वदा |
एकविंशतिके पादे स्रग्धरा नाम सा यथा || १०५ ||

**अन्वय: -** एकविंशतिके पादे आदौ चत्वारि षष्ठम् सप्तमम् च सचतुर्दशम् अष्टादशम् सप्तदशम् तथा पञ्चदशम् पुन: अन्त्योपान्त्ये गुरूणि अन्यानि अत्र लघूनि (सन्ति) सा सर्वदा स्रग्धरा यथा नाम (कथ्यते) |

**अर्थ** - अतिकृति जातीच्या म्हणजेच एकवीस अक्षरे असलेल्या चरणातील प्रथम चार अक्षरे, सहावे, सातवे, चौदावे, पंधरावे, सतरावे, अठरावे, विसावे आणि एकविसावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची लघू असतील तर त्यास 'स्रग्धरा' वृत्त असे म्हणतात .

**चुताशोकारविन्दैः कुरवकतिलकैः कर्णिकारैः शिरीषैः**
**पुन्नागैः पारिजातैर्बकुलकुवलयैः किंशुकैः सातिमुक्तैः।**
**एतैर्नानाप्रकारैः बहुलसुरभिभिर्विप्रकीर्णैश्च तैस्तै**
**र्वासन्तैः पुष्पवृन्दैर्नरवर! वसुधा स्रग्धरेवाद्य भाति ॥ १०६ ॥**

**पदच्छेदः** - चुत-अशोक-अरविन्दैः कुरवक-तिलकैः कर्णिकारैः शिरीषैः
पुन्नागैः पारिजातैः वकुल-कुवलयैः किंशुकैः स-अतिमुक्तैः।
एतैः नानाप्रकारैः बहुलसुरभिभिः विप्रकीर्णैः च तैः तैः
वासन्तैः पुष्पवृन्दैः नरवर ! वसुधा स्रग्धरा एव अद्य भाति ॥ १०६ ॥

**अन्वयः** - नरवर! चुत-अशोक-अरविन्दैः कुरवक-तिलकैः कर्णिकारैः शिरीषैः पुन्नागैः पारिजातैः वकुल-कुवलयैः किंशुकैः स-अतिमुक्तैः च एतैः नानाप्रकारैः वासन्तैः तैः तैः बहुलसुरभिभिः पुष्पवृन्दैः विप्रकीर्णैः अद्य वसुधा स्रग्धरा एव भाति।

**अर्थ** - हे श्रेष्ठ मानवा ! आंबा, अशोक, अरविंद, कुरवक, तिलक, कर्णिकार, शिरीष, पुन्नाग, पारिजात, वकुळ, किंशभ अतिमुक्त इत्यादी विविध प्रकारच्या वासंतिक फुलांनी आणि पुष्कळ सुगंधी फुलांच्या ताटव्यांनी बहरल्यामुळे ही वसुंधरा आज फुलांची माळ धारण केलेल्या नायिकाप्रमाणे भासत आहे .

**॥ प्रतिचरण बावीस अक्षरे ॥**

**❖ मद्रक वृत्त ❖**

**अथ मद्रकम्-**
**चतुर्थमाद्यं षष्ठं च दशमं द्वादशं तथा।**
**षोडशाष्टादशे चैव नैधनं च गुरूण्यथ ॥ १०७ ॥**

**द्वाविंशत्यक्षरे पादे शेषाणि च लघून्यथ |**
**भवन्ति यत्र तज्ज्ञेयं मद्रकं नामतो यथा || १०८ ||**

**पदच्छेद : -** चतुर्थम् आद्यम् षष्ठम् च दशमम् द्वादशम् तथा |
षोडशाष्टादशे च एव नैधनम् च गुरूणि अथ || १०७ ||
द्वाविंशत्यक्षरे पादे शेषाणि च लघूनि अथ |
भवन्ति यत्र तत् ज्ञेयम् मद्रकम् नामत : यथा || १०८ ||

**अन्वय : -** अथ द्वाविंशत्यक्षरे पादे आद्यम् चतुर्थम् षष्ठम् दशमम् द्वादशम् षोडश-अष्टादशे एव च नैधनम् च गुरूणि अथ शेषाणि च यत्र लघूनि भवन्ति तत् मद्रकम् यथा नामत : ज्ञेयम् |

**अर्थ -** जेव्हा बावीस अक्षरे असलेल्या चरणातील पहिले, चौथे, सहावे, दहावे, बारावे, सोळावे, अठरावे आणि बावीसावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तेव्हा त्यास 'मद्रक' वृत्त असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**उत्प्लुतमेकहस्तचरणं द्वितीयकररेचितं सुविनतं**
**वंशमृदङ्गवाद्यमधुरं विचित्रकरणानुगं बहुविधम् |**
**मद्रकमेतदद्य सुभगे ! विदग्धगतिचेष्टितै : सुललितै**
**र्नृत्यसि विभ्रमाकुलपदं विविक्तरसभावितं शशिमुखि ! || १०९ ||**

**पदच्छेद : -** उत्प्लुतम् एक-हस्त-चरणम् द्वितीय-कर-रेचितम् सुविनतम्
वंश-मृदङ्ग-वाद्य-मधुरम् विचित्र-करण-अनुगम् बहुविधम् |
मद्रकम् एतत् अद्य सुभगे ! विदग्ध-गति-चेष्टितै : सुललितै :
नृत्यसि विभ्रम-आकुल-पदम् विविक्त-रस-भावितम् शशिमुखि ! || १०९ ||

**अन्वय : -** सुभगे! शशिमुखि! उत्प्लुतम् एक-हस्त-चरणम् सुविनतम् द्वितीय-कर-रेचितम् वंश-मृदङ्ग-वाद्य-मधुरम् विचित्र-करण-अनुगम् एतत् बहुविधम् विभ्रम-आकुल-पदम् विविक्त-रस-भावितम् मद्रकम् विदग्ध-गति-चेष्टितै : सुललितै : अद्य नृत्यसि |

**अर्थ -** हे सुभगे ! हे चंद्रमुखी, एक हात आणि एक पाय उचलून, दुसरा हात रेचित करून झुकवलास . बासरी, मृदंग इत्यादी वाद्यांद्वारे मधुर संगीतासह विविध करणांनी युक्त, हे

अनेक प्रकारे व्याकुळ होऊन भ्रांतीयुक्त पाऊले टाकत आहेस. तू आज अनेक रस आणि भावांनी परिपूर्ण असे मद्रकनृत्य विदग्धगतिद्वारे आणि ललितक्रियांद्वारे करीत आहेस.

**||प्रतिचरण तेवीस अक्षरे||**

**❖ अश्वललित वृत्त ❖**

**अथ अश्वललितम्-**
**अन्त्यमेकोनविंशं च सप्तमं सत्रयोदशम् |**
**एकादशं सप्तदशं पञ्चमं च गुरूण्यथ || ११० ||**
**शेषाणि च लघूनि स्युर्विकृत्याश्चरणे बुधै:|**
**वृत्तं तदश्वललितं विज्ञेयं नामतो यथा || १११ ||**

**पदच्छेद: -** अन्त्यम् एकोनविंशम् च सप्तमम् सत्रयोदशम् |
एकादशम् सप्तदशम् पञ्चमम् च गुरूणि अथ ||११०||
शेषाणि च लघूनि स्यु: विकृत्या: चरणे बुधै:|
वृत्तम् तत् अश्वललितम् विज्ञेयम् नामत: यथा ||१११||

**अन्वय: -** अथ विकृत्या: चरणे पञ्चमम् सप्तमम् एकादशम् सत्रयोदशम् सप्तदशम् एकोनविंशम् अन्त्यम् च गुरूणि, शेषाणि लघूनि स्यु: तत् वृत्तम् बुधै: अश्वललितम् नामत: यथा विज्ञेयम्|

**अर्थ -** जेव्हा विकृति छंदातील तेवीस अक्षरे असलेल्या चरणामध्ये पाचवे, सातवे, अकरावे, तेरावे, सतरावे, एकोणीसावे आणि शेवटचे म्हणजे तेवीसावे अक्षर गुरू असेल आणि बाकीची अक्षरे लघू असतील तर त्यास 'अश्वललित' वृत्त असे म्हणतात. उदाहरणार्थ -
(मद्रक आणि अश्वललित या वृत्तांमधील लघुगुरूक्रम बहुतांशकरून सारखाच आहे. केवळ एकच भेद आहे. मद्रकवृत्तात पहिले अक्षर गुरू असते आणि अश्वललितवृत्तात गुरूऐवजी दोन लघू अक्षरे येतात. त्यामुळे मद्रकामध्ये २२ अक्षरे तर अश्वललितमध्ये २३ अक्षरे येतात.)

**विविधतुरङ्गनागरथयौधसंकुलमलं बलं समुदितं**
**शरशतशक्तिकुन्तपरिधासियष्टिविततं बहुप्रहरणम् |**
**रिपुशतमुक्तशस्त्ररवभीतशङ्किभटं भयाकुलदिशं**
**कृतमभिवीक्ष्य संयुगमुखे समर्पितगुणं त्वयाश्वललितम् || ११२ ||**

**पदच्छेद : -** विविध-तुरङ्ग-नाग-रथ-यौध-संकुलमलम् बलम् समुदितम्
शर-शत-शक्ति-कुन्त-परिध-असि-यष्टि-विततम् बहु-प्रहरणम् |
रिपु-शत-मुक्त-शस्त्र-रव-भीत-शङ्कित-भटम् भय-आकुल-दिशम्
कृतम् अभिवीक्ष्य संयुग-मुखे समर्पित-गुणम् त्वया अश्वललितम् || ११२ ||

**अन्वय : -** विविध-तुरङ्ग-नाग-रथ-यौध-संकुलमलम् समुदितम् बलम्, शर-शत-शक्ति-कुन्त-परिध-असि-यष्टि-विततम् बहु-प्रहरणम् रिपु-शत-मुक्त-शस्त्र-रव-भीत-शङ्कित-भटम् भय-आकुल-दिशम् अभिवीक्ष्य संयुगमुखे त्वया अश्वललितम् समर्पितगुणम् कृतम् |

**अर्थ -** विविध घोडे, हत्ती, रथ आणि योद्ध्यांनी परिपूर्ण असे सैन्य पाहून तसेच शेकडो बाणांची शक्ती, भाले, ढाली-तलवारी, काठ्या इत्यादी शस्त्रांनी युक्त असलेले, पुष्कळ अस्त्रांनी युक्त सैन्य पाहून तसेच शत्रूसैन्यांद्वारे सोडलेल्या हजारो शस्त्रांच्या आवाजामुळे भयाने व्याकुळ झालेले योद्धे पाहून आणि भयाने व्याप्त चहुदिशा पाहून युद्धभूमीवर तू जी घोड्यावर स्वार झाली आहेत, अशी तो अवर्णनीय आहेत .

**|| प्रतिचरण चोवीस अक्षरे ||**

**❖ मेघमाला वृत्त ❖**

**अथ मेघमालावृत्तम्-**
**षडादावष्टमं चैव ह्येकादशचतुर्दशे |**
**विंशं सप्तदशं चैव त्रयोविंशं तथैव च || ११३ ||**
**एतानि च लघूनि स्यु : शेषाण्यथ गुरूणि च |**
**चतुर्विंशतिके पादे मेघमालेति सा यथा || ११४ ||**

**पदच्छेद:** - षट् आदौ अष्टमम् च एव हि एकादश-चतुर्दशे |
विंशम् सप्तदशम् च एव त्रयोविंशम् तथा एव च || ११३ ||
एतानि च लघूनि स्यु: शेषाणि अथ गुरूणि च |
चतुर्विंशतिके पादे मेघमाला इति सा यथा || ११४ ||

**अन्वय:** - चतुर्विंशतिके पादे आदौ षड् अष्टमम् एकादश-चतुर्दशे सप्तदशम् विंशम् त्रयोविंशम् एतानि लघूनि, अथ शेषाणि गुरूणि च स्यु: सा मेघमाला इति (कथ्यते) | यथा -

**अर्थ** - जेव्हा चोवीस अक्षर असलेल्या चरणामधील सुरूवातीची सहा अक्षरे, आठवे, अकरावे, चौदावे, सतरावे, विसावे, आणि तेवीसावे अक्षर लघू असेल आणि बाकीची अक्षरे गुरू असल्यास त्यास 'मेघमाला' वृत्त असे म्हणतात .

**पवनबलसमाहृता तीव्रगम्भीरनादा बलाकावलीमेखला**
**क्षितिधरसदृशोच्चरूपा महानीलधुमाञ्जनाभाम्बुगर्भोद्भवा |**
**सुरपतिधनुरुज्ज्वलाबद्धकक्ष्या तडिद्द्योतसन्नाहपट्टोज्वला**
**गगनतलविसारिणी प्रावृषेण्या दृढं मेघमालाधिकं शोभते || ११५ ||**

**पदच्छेद:** - पवन-बल-समाहृता तीव्र-गम्भीर-नादा बलाक-आवली-मेखला
क्षितिधर-सदृश-उच्चरूपा महानील-धुम-अञ्जन-आभा अम्बु-गर्भ-उद्भवा |
सुरपति-धनु:-उज्ज्वल-आबद्ध-कक्ष्या तडित्-द्योत-सन्नाह-पट्ट-उज्वला
गगन-तल-विसारिणी प्रावृषेण्या दृढम् मेघमाला अधिकम् शोभते || ११५ ||

**अन्वय:** - पवन-बल-समाहृता, तीव्र-गम्भीर-नादा, बलाक-आवली-मेखला, क्षितिधर-सदृश-उच्चरूपा, महानील-धुम-अञ्जन-आभा, अम्बु-गर्भ-उद्भवा, सुरपति-धनु:-उज्ज्वल-आबद्ध-कक्ष्या, तडित्-द्योत-सन्नाह-पट्ट-उज्वला, गगन-तल- विसारिणी प्रावृषेण्या मेघमाला अधिकम् दृढम् शोभते |

**अर्थ** - वाऱ्याच्या वेगाने एकत्र आणलेली, तीव्र व गंभीर नाद असणारी, बगळ्यांची माळ मेखलेसमान धारण करणारी, पर्वतासमान उत्तुंग रूप असणारी, निळ्या रंगाच्या धुक्याने भरलेले आणि काजळाप्रमाणे काळ्या रंगाचे असणारी, पाण्याने पूर्ण भरलेली, इंद्रधनुष्य हेच उज्ज्वल कमरबंध असणारी, वीजेच्या चमकण्याने उत्तम कवच आणि पट्टा धारण केलेली, आकाशात पसरलेली ही वर्षाऋतुतील मेघमाला अत्यंत सुंदर दिसत आहे .

**||प्रतिचरण पंचवीस अक्षरे||**

**❖ क्रौंचपादी वृत्त ❖**

**अथ क्रौञ्चपादीवृत्तम्-**
**आद्यं चैव चतुर्थं च पञ्चमं षष्ठमेव च |**
**नवमं दशमं चैव नैधनं च भवेद्गुरु ||११६||**
**लघून्यन्यानि शेषाणि पादे स्यु: पञ्चविंशतिके |**
**वृत्तज्ञै: सा तु विज्ञेया क्रौञ्चपादीति नामत: ||११७||**

**पदच्छेद: -** आद्यम् च एव चतुर्थम् च पञ्चमम् षष्टम् एव च |
नवमम् दशमम् च एव नैधनम् च भवेत् गुरु ||११६||
लघूनि अन्यानि शेषाणि पादे स्यु: पञ्चविंशके |
वृत्तज्ञै: सा तु विज्ञेया क्रौञ्चपादी इति नामत: ||११७||

**अन्वय: -** पञ्चविंशके पादे आद्यम् चतुर्थम् पञ्चमम् षष्टम् नवमम् दशमम् नैधनम् च गुरु भवेत्, अन्यानि शेषाणि लघूनि स्यु: | सा तु वृत्तज्ञै: 'क्रौञ्चपादी' इति नामत: विज्ञेया | यथा -

**अर्थ -** जेव्हा पंचवीस अक्षराच्या वृत्तातील प्रत्येक चरणामधील पहिले, चौथे, पाचवे, सहावे, नववे, दहावे आणि शेवटचे म्हणजे पंचवीसावे अक्षर गुरु असेल आणि शेष अक्षरे लघू असतील तर विद्वान त्या वृत्ताला 'क्रौंचपदी' वृत्त असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**य: किल दाक्षं विद्रुतसोमं क्रतुवरमचमसमपगतकलशं**
**पातितयूपं क्षिप्तचषालं विचयनमसमिधमसमयशुकचरुकम् |**
**कार्मुकमुक्तेनाशु चकार व्यपगतसुरगणपितृगणमिषुणा |**
**नित्यमसौ ते दैत्यगणारि: प्रदहतु मखमिव रिपुगणमखिलम् ||११८||**

**पदच्छेद: -** य: किल दाक्षम् विद्रुत-सोमम् क्रतुवरम् अचमसम् अपगत-कलशम्
पातित-यूपम् क्षिप्त-चषालम् विचयनम् असमिधम् असमय-शुक-चरुकम् ।|
कार्मुक-मुक्तेन आशु चकार व्यपगत-सुरगण-पितृगणम् इषुणा |
नित्यम् असौ ते दैत्यगण-अरि: प्रदहतु मखम् इव रिपुगणम् अखिलम् ||११८||

**अन्वय: -** य: किल कार्मुकमुक्तेन इषुणा दाक्षम् विदुतसोमम्, क्रतुवरम् अचमसम्, अपगत-कलशम्, पातित-यूपम्, क्षिप्त-चषालम्, विचयनम् असमिधम्, असमय-शुक-चरुकम्, व्यपगत-सुरगण-पितृगणम् नित्यम् आशु चकार | असौ दैत्यगणारि: मखम् इव ते अखिलम् रिपुगणम् प्रदहतु |

**अर्थ -** खरोखर दक्षाच्या यज्ञामध्ये पिनाक धनुष्यातून सोडलेल्या बाणाद्वारे सोमाला ज्याने उद्‌ध्वस्त केले. श्रेष्ठ यज्ञास दर्वीरहित केले. कलश उडवून लावला. यज्ञातील स्तंभ उखडले. पिण्याची पात्रे (चषक) फेकली. गोळा केलेल्या समिधांचा नाश केला. हिरवा ऊस लगेचच उधळून लावला. देवता आणि पितरांचा नाश केला. असा हा राक्षसकुळाचा शत्रू असलेला शिव त्या यज्ञाप्रमाणेच तुझ्या सर्व शत्रूंना भस्मसात करो.

**||प्रतिचरण सव्वीस अक्षरे||**

**❖ भुजंगविज्रंभित वृत्त ❖**

**अथ भुजङ्गविजृम्भितवृत्तम् -**
**अष्टावादौ गुरूणि स्युस्तथा चैकोनविंशकम् |**
**एकविंशं च विज्ञेयं चतुर्विंशं सनैधनम् ||११९||**
**एतानि गुरुसंख्यानि शेषाणि च लघून्यथ |**
**षड्विंशत्यक्षरे पादे तद्भुजङ्गविजृम्भितम् || १२० ||**

**पदच्छेद: -** अष्टौ आदौ गुरूणि स्यु: तथा च एकोनविंशकम् |
एकविंश च विज्ञेयम् चतुर्विंशम् सनैधनम् || ११९ ||
एतानि गुरुसंख्यानि शेषाणि च लघूनि अथ |
षड्विंशति-अक्षरे पादे तत् भुजङ्गविजृम्भितम् || १२० ||

**अन्वय: -** अथ षड्विंशति अक्षरे पादे आदौ अष्टौ गुरूणि स्यु: तथा च एकोनविंशकम् एकविंशम् चतुर्विंशम् सनैधनम् एतानि गुरुसंख्यानि, शेषाणि च लघूनि (स्यु:) तत् भुजङ्गविजृम्भितम् (भवति) |

**अर्थ** - उत्कृति जातीच्या म्हणजेच सव्वीस अक्षरे असलेल्या चरणातील सुरुवातीची आठ अक्षरे गुरु आणि तसेच एकोणीस, एकवीस, चोवीस व सव्वीसावे अक्षर गुरु असेल आणि बाकीची अक्षरे लघु असतील तर त्यास 'भुजंगविजृंभित' वृत्त असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**रूपोपेतां देवै: सृष्टां समदगजविलसितगतिं निरीक्ष्य तिलोत्तमां**
**प्रादक्षिण्यात्प्राप्तां द्रष्टुं बहुवदनमचलनयनं शिर: कृतवान्हरि:|**
**दीर्घ नि:श्वस्यान्तर्गूढं स्तनवदनजघनरुचिरां निरीक्ष्य तथा पुन:**
**पृष्ठे न्यस्तं देवेन्द्रेण प्रवरमणिकनकवलयं भृजङ्गविजृम्भितम्||१२१||**

**पदच्छेद: -** रूप-उपेताम् देवै: सृष्टाम् समद-गज-विलसित-गतिम् निरीक्ष्य तिलोत्तमाम्
प्रादक्षिण्यात् प्राप्ताम् द्रष्टुम् बहुवदनम् अचलनयनम् शिर: कृतवान् हरि:|
दीर्घम् नि:श्वस्य अन्तर्गूढम् स्तन-वदन-जघन-रुचिराम् निरीक्ष्य तथा पुन:
पृष्ठे न्यस्तम् देवेन्द्रेण प्रवर-मणि-कनक-वलयं भृजङ्ग-विजृम्भितम्||१२१||

**अन्वय: -** रूपोपेताम्, देवै: सृष्टाम्, समद-गज-विलसित-गतिम्, तिलोत्तमाम् निरीक्ष्य प्रादक्षिण्यात् प्राप्ताम् ताम् द्रष्टुम् हरि: बहुवदनम् अचलनयनम् शिर: कृतवान् | स्तनवदनजघनरुचिराम् निरीक्ष्य अन्तर्गूढम् दीर्घम् नि:श्वस्य देवेन्द्रेण पुन: भृजङ्गविजृम्भितम् प्रवरमणि-कनक-वलयम् पृष्ठे न्यस्तम्|

**अर्थ** - सौंदर्याने परिपूर्ण असलेल्या, देवांद्वारे निर्माण केलेल्या, मदमस्त हत्तीसमान गती असलेल्या तिलोत्तमेला न्याहाळून प्रदक्षिणा करायला आलेल्या त्या परम सुंदरीला पाहण्यासाठी हरिने म्हणजेच इंद्राने असंख्य मुख असणारे आणि असंख्य अचल नेत्र असणारे स्वत:चे मस्तक स्थिर केले आणि त्यानंतर देवेंद्राने अंतर्गूढ भावांनी दीर्घ उसासा टाकून सुंदर स्तन, चेहरा आणि मांड्या असलेल्या त्या तिलोत्तमेला पाहून सापाच्या डोक्यावरून निसटलेला उत्तम मणि आणि सोन्याचे कडे परिधान केलेला स्वत:चा हात तिच्या पाठीवर ठेवला.

### ❖ दंडक वृत्त ❖

**अथ दण्डकम्-**

**दण्डकं नाम विज्ञेयमुत्कृतेरधिकाक्षरम् |**
**वृत्तं मालादिकं तस्मान्नोक्तं चादौ गुहादिना ॥१२२॥**

**पदच्छेद :** - दण्डकम् नाम विज्ञेयम् उत्कृते : अधिक-अक्षरम् |
वृत्तम् माला-आदिकम् तस्मात् न उक्तम् च आदौ गुह-आदिना ॥१२२॥

**अन्वय :** - उत्कृते : अधिकाक्षरम् दण्डकम् नाम विज्ञेयम् | मालादिकम् वृत्तम् एतत् तस्मात् गुह-आदि-आचार्यै : आदौ न उक्तम् |

**अर्थ** - उत्कृति जातीच्या चरणामध्ये एक अक्षर अधिक असेल तर त्यास 'दंडक' वृत्त समजावे . याचेच 'माला' वगैरे भेद होतात . हे गुह इत्यादी आचार्यांनी सुरूवातीस सांगितले नाही . ('भुजंगविजृंभित' या वृत्तामध्ये शेवटी एक गुरू अक्षर अधिक घेतले की 'दंडक' वृत्त होते .)

**मुदितजनपदाकुला स्फीतसस्याकरा भूतधात्री भवन्तं समभ्यर्चति**
**द्विरदकरविलुप्तहिन्तालतालीवनास्त्वां नमस्यन्ति विन्ध्यादय : पर्वता :|**
**स्फुटितकलशशुक्तिनिर्गीर्णमुक्ताफलैरूर्मिहस्तैर्नमस्यन्ति व : सागरा :**
**मुदितजलचराकुला : संप्रकीर्णमला : कीर्तयन्तीव कीर्तिं महानिम्नगा : ॥१२३॥**

**पदच्छेद :** - मुदित-जनपद-आकुला स्फीत-सस्य-आकरा भूत-धात्री भवन्तम् समभ्यर्चति
द्विरद-कर-विलुप्त-हिन्ताल-ताली-वना : त्वाम् नमस्यन्ति विन्ध्य-आदय : पर्वता :|
स्फुटित-कलश-शुक्ति-निर्गीर्ण-मुक्ताफलै : ऊर्मि-हस्तै : नमस्यन्ति व : सागरा :
मुदित-जलचर-आकुला : संप्रकीर्ण-अमला : कीर्तयन्ति इव कीर्तिम् महानिम्नगा : ॥१२३॥

**अन्वय :** - मुदित-जनपद-आकुला स्फीत-सस्य-आकरा भूत-धात्री भवन्तम् समभ्यर्चति | द्विरद-कर-विलुप्त-हिन्ताल-ताली-वना : विन्ध्य-आदय : पर्वता : त्वाम् नमस्यन्ति | स्फुटित-कलश-शुक्ति-निर्गीर्ण-मुक्ताफलै : ऊर्मि-हस्तै : सागरा : व : नमस्यन्ति | मुदित-जलचर-आकुला : संप्रकीर्ण-अमला : महानिम्नगा : कीर्तिम् इव कीर्तयन्ति |

**अर्थ** - धनधान्याने समृद्ध असलेली, आनंदी गावांनी वेढलेली, प्राणिमात्रांसाठी असलेली ही पृथ्वी तुमची पूजा-अर्चना करते. हत्तींनी आपल्या सोंडेने ज्या पर्वतांवरील खजूर आणि तालवृक्षांची जंगले विलुप्त केली, असे विंध्य इत्यादी पर्वत तुला नमस्कार करीत आहेत. कलशांप्रमाणे मोठ्या आकाराचे शिंपले फुटल्यामुळे त्यातून बाहेर आलेले मोती ज्या लाटांप्रमाणे असलेल्या विशाल हातांमध्ये आहेत त्या हातांनी हे चारही समुद्र तुम्हांला नमस्कार करतात. आनंदी जलचर ज्यामध्ये संचार करतात अशा स्वच्छ पाण्याने भरून वाहणाऱ्या महानद्या जणू काही तुमच्या यशाचे गीत गात आहेत.

(अन्य सर्व वृत्तांच्या उदाहरणांमध्ये त्या त्या वृत्ताचे नाव नमूद केलेले आहे. परंतु प्रस्तुत उदाहरणामध्ये 'दंडक' या वृत्ताच्या नावाच्या उल्लेख आढळत नाही.)

### ❖ विषम आणि अर्धसमवृत्तांची लक्षणे ❖

**एतानि समवृत्तानि मयोक्तानि द्विजोत्तमा:|**
**विषमार्धसमानां तु पुनर्वक्ष्यामि लक्षणम् ॥ १२४ ॥**

**पदच्छेद:** - एतानि समवृत्तानि मया उक्तानि द्विजोत्तमा:|
विषम-अर्धसमानाम् तु पुन: वक्ष्यामि लक्षणम् ॥ १२४ ॥

**अन्वय:** - द्विजोत्तमा:! मया एतानि समवृत्तानि उक्तानि, विषम-अर्धसमानाम् तु लक्षणम् पुन: वक्ष्यामि |

**अर्थ** - हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो, समवृत्तांची ही लक्षणे मी तुम्हाला सांगितली. आता विषम आणि अर्धसमवृत्तांची लक्षणे मी तुम्हांला सांगीन.

**यत्र पादास्तु विषमा नानावृत्तसमुद्भवा:|**
**ग्रथिता: पादयोगेन तद्वृत्तं विषमं स्मृतम् ॥ १२५ ॥**

**पदच्छेद:** - यत्र पादा: तु विषमा: नानावृत्त-समुद्भवा:|
ग्रथिता: पादयोगेन तत् वृत्तम् विषमम् स्मृतम् ॥ १२५ ॥

**अन्वय: -** यत्र नानावृत्त-समुद्‌भवा : विषमा : पादा : पादयोगेन ग्रथिता :, तत् वृत्तम् विषमम् स्मृतम् |

**अर्थ -** जेथे अनेक वृत्तांमध्ये उत्पन्न होणारे एकेक चरण घेऊन चार विषम चरण एकत्र घेतले जात असतील, तर त्यास विषमवृत्त म्हणतात .

**❖ विषमवृत्त ❖**

**द्वौ समौ द्वौ च विषमौ वृत्तेऽर्धविषमे तथा |**
**सर्वपादैश्च विषमैर्वृत्तं विषममुच्यते ‖ १२६ ‖**

**पदच्छेद: -** द्वौ समौ द्वौ च विषमौ वृत्ते अर्धविषमे तथा |
सर्वपादै : च विषमै : वृत्तम् विषमम् उच्यते ‖ १२६ ‖

**अन्वय: -** अर्धविषमे वृत्ते द्वौ (पादौ) समौ द्वौ च विषमौ (भवत:) | तथा च विषमै: सर्वपादै: विषमम् वृत्तम् उच्यते |

**अर्थ -** अर्धसमवृत्तामध्ये दोन चरण म्हणजे पहिला-तिसरा आणि दुसरा-चौथा चरण सम असतो आणि दोन चरण म्हणजे पहिला-दुसरा आणि तिसरा-चौथा विषम असतो . जेव्हा चारही पद विषम असतात तेव्हा त्यास 'विषम' वृत्त असे म्हणतात .

**❖ अर्धसमवृत्त ❖**

**ह्रस्वाद्यमथ दीर्घाद्यं दीर्घ ह्रस्वमथापि वा |**
**युग्मौजविषमै: पादैर्वृत्तमर्धसमं भवेत् ‖ १२७ ‖**

**पदच्छेद: -** ह्रस्वाद्यम् अथ दीर्घाद्यम् दीर्घ ह्रस्वम् अथ अपि वा |
युग्मौजविषमै : पादै : वृत्तम् अर्धसमम् भवेत् ‖ १२७ ‖

**अन्वय: -** अथ ह्रस्वाद्यम् दीर्घाद्यम् अथ अन्यम् दीर्घ ह्रस्वम् वा, युग्मौजविषमै : पादै : वृत्तम् अर्धसमम् भवेत् |

**अर्थ -** जेव्हा सुरुवातीचे दोन चरण लहान किंवा मोठे असेल आणि दुसरे चरण दीर्घ किंवा ह्रस्व असेल तर युग्म, ओज आणि विषम चरणांनी निर्माण झालेले वृत्त 'अर्धसम' म्हणून ओळखले जाते .

**पादे सिद्धे समं सिद्धं विषमं सार्वपादिकम्।**
**द्वयोरर्धसमं विद्यादेष छेदस्तु पादश: ॥ १२८ ॥**

**पदच्छेद: -** पादे सिद्धे समम् सिद्धम् विषमम् सार्वपादिकम्।
द्वयो: अर्धसमम् विद्यात् एष: छेद: तु पादश: ॥ १२८ ॥

**अन्वय: -** सिद्धे पादे सार्वपादिकम् समम् विषमम् सिद्धमद्वयो: अर्धसमम् विद्यात् एष: छेद: तु पादश: (भवति)।
(सिद्ध इति लक्षिते। छेद इति पादेषु विभाग इत्यर्थ:। - अ. भा.)

**अर्थ -** पादांची लक्षणे सांगताना जेव्हा सर्व चरण समान असतील तर ते समवृत्त होते. सर्व चरण विषम असल्यास त्याला विषमवृत्त म्हटले आहे आणि कुठल्याही दोन पादामध्ये साम्य किंवा वैषम्य आढळल्यास ते अर्धसम वृत्त होते. यांमध्ये चरणांनुसार वृत्तांचे विभाग होतात.

**छेदतस्तु मया प्रोक्तं समवृत्तविकल्पनम्।**
**त्रिकैर्विषमवृत्तानां संप्रवक्ष्यामि लक्षणम् ॥ १२९ ॥**

**पदच्छेद: -** छेदत: तु मया प्रोक्तम् समवृत्तविकल्पनम्।
त्रिकै: विषमवृत्तानाम् संप्रवक्ष्यामि लक्षणम् ॥ १२९ ॥

**अन्वय: -** मया छेदत: तु समवृत्तविकल्पनम् प्रोक्तम्। त्रिकै: विषमवृत्तानाम् लक्षणम् संप्रवक्ष्यामि।

**अर्थ -** मी चरणांच्या विभागांच्या आधारे समवृत्तांची लक्षणे या पूर्वी सांगितली. आता मी त्रिकांद्वारे विषमवृत्तांची लक्षणे सांगीन.

**❖ पथ्या वृत्त ❖**

**अथ पथ्यावृत्तम्-**
**सौ गौ तु प्रथमे पादे स्रौ ल्गौ चापि द्वितीयके।**
**युग्मेऽर्धविषमे पादे ज्ञेया पथ्या तु सा त्रिकै: ॥ १३० ॥**

**पदच्छेद : -** सौ गौ तु प्रथमे पादे स्रौ ल्गौ च अपि द्वितीयके |
युग्मे अर्धविषमे पादे ज्ञेया पथ्या तु सा त्रिकैः ||१३०||

**अन्वय : -** प्रथमे पादे तु सौ गौ, द्वितीयके पादे स्रौ ल्गौ अर्धविषमे पादे युग्मे सा तु पथ्या त्रिकैः ज्ञेया |

**अर्थ -** जेव्हा पहिल्या पादामध्ये दोन सगण आणि दोन गुरू असतील आणि दुसऱ्या पादामध्ये सगण, रगण, लघु आणि गुरू असतील, याचप्रमाणे तिसरा आणि चौथा चरण असेल तर त्यास 'पथ्या' छंद असे म्हणतात. उदाहरणार्थ -

(अनुष्टुभजातीत हे वृत्त येते. या अर्धसमवृत्तामध्ये सर्व चरणांमधील आठ अक्षरे असतात. परंतु पहिल्या-तिसऱ्या आणि दुसऱ्या-चौथ्या चरणांमध्ये लघुगुरूक्रम वेगळा असतो. प्रथम आणि तृतीय चरणामध्ये स स ग ग हा क्रम असतो तर द्वितीय आणि चतुर्थ चरणांमध्ये स र ल ग असा क्रम असतो. वरील लघुगुरूक्रम पाहता पथ्या हे अर्ध समवृत्त आणि अनुष्टुभजातीत येणारे 'श्लोक' नावाचे वृत्त हे समानच आहे. जसे -
श्लोके षष्ठं गुरुर्ज्ञेयं सर्वत्र लघु पञ्चमम् |
द्विचतुष्पादयोर्ह्रस्वं सप्तमं दीर्घमन्ययोः || )

**प्रियदैवतमित्राऽसि प्रियसंबन्धिबान्धवा |**
**प्रियदानरता पथ्या दयिते ! त्वं प्रियासि मे ||१३१||**

**पदच्छेद : -** प्रियदैवतमित्रा असि प्रियसंबन्धिबान्धवा |
प्रियदानरता पथ्या दयिते ! त्वम् प्रिया असि मे ||१३१||

**अन्वय : -** दयिते ! त्वम् प्रियदैवतमित्रा प्रियसंबन्धिबान्धवा प्रियदानरता पथ्या असि | अतः त्वम् मे प्रिया असि |

**अर्थ -** हे भार्ये, तुला देव आणि मित्र प्रिय आहेत. माझे नातेवाईक आणि बंधुभगिनी तुला आवडतात, तू दान देण्यामध्ये उत्सुक असतेस, योग्य मार्गाचे पालन करतेस, म्हणून तू मलादेखील अत्यंत प्रिय आहेस.

### ❖ सर्वविषमपथ्या वृत्त ❖

**अथ सर्वविषमपथ्या -**
**म्री गौ तु प्रथमे पादे य्सौ ल्गौ च द्वितीयके |**
**पादे भ्रौ ल्गौ तृतीये च चतुर्थे तु तसौ लगौ ||१३२||**

**पदच्छेद:** - म्री गौ तु प्रथमे पादे य्सौ ल्गौ च द्वितीयके |
पादे भ्रौ ल्गौ तृतीये च चतुर्थे तु तसौ लगौ ||१३२||

**अन्वय:** - प्रथमे पादे म्री गौ, द्वितीयके पादे य्सौ ल्गौ, तृतीये भ्रौ ल्गौ च, चतुर्थे तु तसौ लगौ |

**अर्थ** - जेव्हा अनुष्टुभ् जातीतील पहिल्या चरणामध्ये म र ग ग, दुसऱ्या चरणामध्ये य स ल ग असतील, तिसऱ्या पादामध्ये र भ ल ग असतील आणि चौथ्या चरणामध्ये त स ल ग असतील तर त्यास 'सर्वविषमचरण' पथ्या वृत्त म्हणतात .
(यामध्ये प्रत्येक चरणामध्ये आठ अक्षरे असतात . परंतु प्रत्येक चरणामध्ये लघुगुरुक्रम वेगवेगळा असतो . म्हणूनच ते विषमवृत्त होय . )

**अथ सर्वविषमा पथ्या -**
**नैवाचारो न ते मित्रं न संबन्धिगुणप्रिया |**
**सर्वथा सर्वविषमा पथ्या न भवसि प्रिये ! ||१३३||**

**पदच्छेद:** - न एव आचार: न ते मित्रम् न संबन्धिगुणप्रिया |
सर्वथा सर्वविषमा पथ्या न भवसि प्रिये ! ||१३३||

**अन्वय:** - ते न एव आचार: न मित्रम् न संबन्धिगुणप्रिया सर्वथा सर्वविषमा (अत:) प्रिये ! पथ्या न भवसि |

**अर्थ** - तुझे आचार-विचार काही चांगले नाहीत . कोणी तुझा मित्र नाही . तुला कोणत्याही नातेवाईकांचे गुण आवडत नाहीत . तू सर्वांसाठी सर्वप्रकारे विषम आहेस, म्हणूनच हे प्रिये, तू माझ्यासाठी मंगलकारी नाहीस .

**❖ विपरीत पथ्या ❖**

**अथ विपरीतपथ्या -**
**अयुजोर्लक्षणं ह्येतद्विपरीतं तु यत्र च |**
**पथ्या हि विपरीता सा विज्ञेया नामतो यथा ||१३४||**

**पदच्छेद: -** अयुजो: लक्षणम् हि एतत् विपरीतम् तु यत्र च |
पथ्या हि विपरीता सा विज्ञेया नामत: यथा ||१३४||

**अन्वय: -** अयुजो: च एतत् विपरीतम् तु हि यत्र लक्षणम् (अस्ति) सा हि नामत: 'विपरीता पथ्या' इति विज्ञेया | यथा -

**अर्थ -** ज्याच्या प्रथम आणि तृतीय चरणामध्ये वरील सांगितलेल्या पथ्यावृत्तापेक्षा वेगळी लक्षणे असतील तर त्यास 'विपरीतपथ्या' वृत्त समजावे .

(पथ्यावृत्तामध्ये प्रथम आणि तृतीय चरणामध्ये 'स स ग ग' हा क्रम असतो . द्वितीय आणि चतुर्थ चरणामध्ये 'स र ल ग' हा क्रम असतो . या श्लोकामध्ये दिलेल्या व्याख्येनुसार प्रथम आणि तृतीय चरणामध्ये कोणतेही अन्य लक्षण असावे आणि द्वितीय व चतुर्थ चरणामध्ये तोच क्रम अपेक्षित आहे . परंतु खाली दिलेल्या उदाहरणातील प्रथम चरणात 'ज स ल ग', द्वितीय चरणात 'स र ल ग', तृतीय चरणात 'स र ग ल' आणि चतुर्थ चरणात 'र र ल ग' हा क्रम आढळतो . परिणामी अधोनिर्दिष्ट उदाहरण हे विपरीतपथ्येचे नसून विषमपथ्येचे उदाहरण असल्याचे आढळते . )

**कृतेन रमणस्य किं सखि! रोषेण तेऽप्यर्थम्|**
**विपरीता न पथ्यासि त्वं जडे! केन मोहिता ||१३५||**

**पदच्छेद: -** कृतेन रमणस्य किम् सखि ! रोषेण ते अपि अर्थम् |
विपरीता न पथ्या असि त्वम् जडे! केन मोहिता ||१३५||

**अन्वय: -** सखि ! रमणस्य कृतेन रोषेण ते किम् अर्थम्? विपरीता (अत:) न पथ्या असि | जडे! केन त्वम् मोहिता ?

**अर्थ** - हे सखी ! प्रियकरावर क्रोध करून तुला काय मिळणार? याप्रमाणे विपरीत (उलट) आचरण केल्याने तू अप्रिय झाली आहेस. हे मूढ प्रिये, तू कोणामुळे मोहित झाली आहेस?

**❖ अनुष्टुप्-चपला ❖**

**अथ अनुष्टुप्चपला -**
**चतुर्थादक्षराद्यत्र त्रिलघु स्यादयुक्तत: |**
**अनुष्टुप्चपला सा तु विज्ञेया नामतो यथा || १३६ ||**

**पदच्छेद: -** चतुर्थात् अक्षरात् यत्र त्रिलघु स्यात् अयुक्तत: |
अनुष्टुप्-चपला सा तु विज्ञेया नामत: यथा || १३६ ||

**अन्वय: -** यत्र अयुक्तत: चतुर्थात् अक्षरात् त्रिलघु स्यात् सा तु नामत: अनुष्टुप्-चपला विज्ञेया | यथा -

**अर्थ** - जेव्हा अनुष्टुप् छंदाच्या प्रथम आणि तृतीय चरणामधील चौथ्या अक्षरानंतर पाचवे, सहावे आणि सातवे वर्ण लघु असेल तर त्यास 'अनुष्टुप्-चपला' वृत्त म्हणतात. उदाहरणार्थ -

**न खल्वस्या: प्रियतम: श्रोतव्यं व्याहृतं सख्या |**
**नारदस्य प्रतिकृति: कथ्यते चपला हीयम् || १३७ ||**

**पदच्छेद: -** न खलु अस्या: प्रियतम: श्रोतव्यम् व्याहृतम् सख्या |
नारदस्य प्रतिकृति: कथ्यते चपला हि इयम् || १३७ ||

**अन्वय: -** सख्या व्याहृतम् श्रोतव्यम् (यत्) अस्या: खलु प्रियतम: न (अस्ति) | हि इयम् चपला नारदस्य प्रतिकृति: कथ्यते |

**अर्थ** - मैत्रिणीचे असे बोलणे मी ऐकले की या कन्येचा कोणीही प्रियकर नाही. कारण ती 'चपला' जणू नारदाची प्रतिकृतीच आहे (म्हणजेच भांडखोर अथवा भांडण लावणारी आहे) असे म्हटले जाते.

### ❖ विपुला ❖

**अथ विपुला -**

**विपुला तु युजि ज्ञेया लघुत्वात्सप्तमस्य तु |**
**सर्वत्र सप्तमस्यैव केषांचिद्विपुला यथा || १३८ ||**

**पदच्छेद :-** विपुला तु युजि ज्ञेया लघुत्वात् सप्तमस्य तु |
सर्वत्र सप्तमस्य एव केषांचित् विपुला यथा || १३८ ||

**अन्वय :-** सप्तमस्य तु लघुत्वात् युजि विपुला ज्ञेया | केषांचित् तु सर्वत्र सप्तमस्य एव विपुला | यथा-

**अर्थ -** जेव्हा अनुष्टुप् छंदाच्या सम म्हणजेच दुसऱ्या व चौथ्या चरणातील सातवे अक्षर लघू असेल तर त्यास 'विपुला' वृत्त म्हणतात. अन्य विद्वानांच्या मते, जर सर्व म्हणजे चारही चरणातील सातवे अक्षर लघू असेल तर त्यास 'विपुला' वृत्त म्हणतात. (कालिदासविरचित 'श्रुतबोध' या ग्रंथामध्ये विपुला हे वृत्त 'पद्य' या नावाने नमूद केले आहे.) उदाहरणार्थ -

**संक्षिप्ता वज्रवन्मध्ये हि हेमकुम्भनिभस्तनी |**
**विपुलाऽसि प्रिये! श्रोण्यां पूर्णचन्द्रनिभानने || १३९ ||**

**पदच्छेद :-** संक्षिप्ता वज्रवन्मध्ये हि हेमकुम्भनिभस्तनी |
विपुला असि प्रिय! श्रोण्यां पूर्णचन्द्रनिभानने || १३९ ||

**अन्वय :-** पूर्णचन्द्रनिभानने प्रिये! (त्वम्) वज्रवन्मध्ये संक्षिप्ता, हेमकुम्भनिभस्तनी, श्रोण्याम् हि विपुला असि |

**अर्थ -** हे पौर्णिमेच्या चंद्रासमान मुख असणाऱ्या प्रिये ! वज्रासमान मध्यभागी बारीक अशी तुझी कंबर आहे. सुवर्णघटासमान तुझे स्तन आहेत आणि नितंब स्थूल आहेत.

**विपुलाचे द्वितीय उदाहरण पुढीलप्रमाणे -**

**गङ्गेव मेघोपगमे आप्लावितवसुन्धरा |**
**कूलवृक्षानारुजन्ती स्रवन्ती विपुलाचलात् || १४० ||**

**पदच्छेद :-** गङ्गा इव मेघ-उपगमे आप्लावित-वसुन्धरा |
कूलवृक्षान् आरुजन्ती स्रवन्ती विपुल-अचलात् || १४० ||

**अन्वय :-** मेघ-उपगमे आप्लावित-वसुन्धरा, कूलवृक्षान् आरुजन्ती, विपुल-अचलात् स्रवन्ती गङ्गा इव (असि) |

**अर्थ -** हे प्रिये ! मेघ आल्यामुळे (वर्षाऋतुमध्ये) पृथ्वीला पुलकित करीत, किनाऱ्यावरील वृक्षांचा संहार करीत, मोठमोठ्या पर्वतांवरून वाहणाऱ्या गंगा नदीप्रमाणे तू आहेस .

**विपुलाचे तृतीय उदाहरण पुढीलप्रमाणे -**

**आगता मेघसमये भीरु भीरुकुलोद्‌गते |**
**एकरात्रौ परगृहं चोरि बन्धनमर्हसि || १४१ ||**

**पदच्छेद :-** आगता मेघसमये भीरु भीरुकुलोद्‌गते |
एकरात्रौ परगृहम् च उरि बन्धनम् अर्हसि || १४१ ||

**अन्वय :-** भीरुकुलोद्‌गते भीरु! मेघसमये एकरात्रौ परगृहम् आगता (अत:) उरि च बन्धनम् अर्हसि |

**अर्थ -** भयभीत होणाऱ्या लोकांच्या कुळात जन्माला आलेल्या हे भयग्रस्त प्रिये, वर्षाऋतूमध्ये एका रात्री तू परक्याच्या घरात आली आहेस म्हणून तुला उराशी कवटाळणे योग्य आहे .

**एवं विविधयोगास्तु पथ्यापादा भवन्ति हि |**
**युग्मौजविषमै: पादै: शेषैरन्यैस्त्रिकैरथ || १४२ ||**
**गुर्वन्तक: सर्वलघुस्त्रिको नित्यं हि नेष्यते |**
**प्रथमादक्षराद्यत्र चतुर्थात्प्राग्लघु: स्मृत: || १४३ ||**

**पदच्छेद : -** एवम् विविध-योगा : तु पथ्या-पादा : भवन्ति हि |
युग्म-ओज-विषमै : पादै : शेषै : अन्यै : त्रिकै : अथ || १४२ ||
गुर्वन्तक : सर्वलघु : त्रिक : नित्यम् हि न इष्यते |
प्रथमात् अक्षरात् यत्र चतुर्थात् प्राग्लघु : स्मृत : || १४३ ||

**अन्वय : -** अथ एवम् तु हि युग्मौजविषमै : पादै : शेषै : अन्यै : त्रिकै : विविधयोगा : पथ्यापादा : भवन्ति | नित्यम् हि सर्वलघु : त्रिक : गुर्वन्तक : न इष्यते | यत्र प्रथमात् चतुर्थात् अक्षरात् 'प्राग्लघु :' न स्मृत : |
(सगुर्वन्त इति गुर्वन्त : 'स :' सर्वलघु : 'न :', त्रिकौ नेष्यते | प्रथमात् अक्षरात् अनन्तर : चतुर्थात् अक्षरात् ऊर्ध्व तु प्राग्लघु : 'य'कार : तु न इष्यते | एतानि न प्रयोज्यानि इत्यर्थ : | - अ . भा . )

**अर्थ -** अशाप्रकारे, युग्म ओज विषम चरणांनी तसेच शेष अन्य त्रिकांद्वारे विविध रूपांनी युक्त असे पथ्यावृत्ताचे चरण असतात . यामध्ये सर्व लघु असलेले त्रिक म्हणजे 'न'गण आणि शेवटी गुरू असलेले त्रिक म्हणजे 'स'गण नसावे ज्यामध्ये पहिल्या अक्षरानंतर आणि चौथ्या अक्षरांपूर्वी कुठेही 'य'गण नसावा .

### ❖ वक्त्र ❖

**अथ वक्त्रम्-**
**पथ्यापादं समास्थाप्य त्रीण्यन्ते तु गुरूण्यथ |**
**भवन्ति पादे सततं बुधैस्तद्वक्त्रमुच्यते || १४४ ||**

**पदच्छेद : -** पथ्यापादम् समास्थाप्य त्रीणि अन्ते तु गुरूणि अथ |
भवन्ति पादे सततम् बुधै : तत् वक्त्रम् उच्यते || १४४ ||

**अन्वय : -** अथ पथ्यापादम् समास्थाप्य अन्ते पादे तु त्रीणि गुरूणि भवन्ति तत् बुधै : सततम् वक्त्रम् उच्यते |

**अर्थ -** जेव्हा पथ्यावृत्ताचे चरण घेऊन शेवटची तीन अक्षरे गुरू केली तर त्यास बुद्धिमान नेहमीच 'वक्त्र' किंवा 'पथ्यावक्त्र' असे म्हणतात . उदाहरणार्थ -

**दन्तक्षताधरं सुभ्रु! जागरग्लाननेत्रं च |**
**रतिसंभोगखिन्नं ते दर्शनीयतरं वक्त्रम् ॥ १४५ ॥**

**पदच्छेद :-** दन्तक्षताधरम् सुभ्रु! जागरग्लाननेत्रम् च |
रतिसंभोगखिन्नम् ते दर्शनीयतरम् वक्त्रम् ॥ १४५ ॥

**अन्वय :-** सुभ्रु! दन्तक्षताधरम् जागरग्लाननेत्रम् रतिसंभोगखिन्नम् च ते वक्त्रम् दर्शनीयतरम् (अस्ति) |

**अर्थ -** हे सुंदर भृकुटी असणाऱ्या प्रिये, दातांच्या व्रणांनी युक्त असे अधर ओष्ठ असलेला, जागरणामुळे ग्लानीपूर्ण नेत्र असलेला आणि रतिसंभोगाने थकलेला तुझा चेहरा खरंच किती दर्शनीय आहे गं!

**इत्येषा सर्वविषमा नामतोऽनुष्टुबुच्यते |**
**तद्विदां मतवैषम्यं त्रिकादक्षरतस्तथा ॥ १४६ ॥**

**पदच्छेद :-** इति एषा सर्वविषमा नामत: अनुष्टुप् उच्यते |
तत्-विदाम् मत-वैषम्यम् त्रिकात् अक्षरत: तथा ॥ १४६ ॥

**अन्वय :-** इति सर्वविषमा एषा नामत: अनुष्टुप् (इति) उच्यते | त्रिकात् अक्षरत: तद्विदाम् मतवैषम्यम् (अस्ति) |

**अर्थ -** याप्रमाणे ही सर्व विषमवृत्ते 'अनुष्टुप्' नावाने ओळखली जातात. ही वृत्ते त्रिकांद्वारे ओळखली जावीत की अक्षरांद्वारे ओळखली जावीत याविषयी विद्वानांमध्ये एकमत होत नाही.

**❖ वानवासिका ❖**

**अथ वानवासिका -**
**पादे षोडशमात्रास्तु गाथांशकविकल्पिता: |**
**चतुर्भिरंशकैर्ज्ञेया वृत्तज्ञैर्वानवासिका ॥ १४७ ॥**

**पदच्छेद :-** पादे षोडशमात्रा: तु गाथांशकविकल्पिता: |
चतुर्भि: अंशकै: ज्ञेया वृत्तज्ञै: वानवासिका ॥ १४७ ॥

**अन्वय: -** गाथांशकविकल्पिता : षोडशमात्रा : पादे तु चतुर्भि : अंशकै : वानवासिका वृत्तज्ञै : ज्ञेया |

**अर्थ -** गाथेच्या अंशातून कल्पित सोळा मात्रांच्या चरणाला चार विभागात विभागून त्रिकांद्वारे स्पष्टीकरण केल्यास त्या वृत्ताला वृत्तवेत्यांनी 'वानवासिका' असे समजावे .

**असंस्थितपदा सुविह्वलाङ्गी मदस्खलितचेष्टितैर्मनोज्ञा |**
**क्व यास्यसि वरोरु! सुरतकाले विषमा किं वानवासिका त्वम् ‖ १४८ ‖**

**पदच्छेद: -** असंस्थित-पदा सुविह्वल-अङ्गी मद-स्खलित-चेष्टितै : मनोज्ञा |
क्व यास्यसि वरोरु! सुरत-काले विषमा किम् वानवासिका त्वम् ‖ १४८ ‖

**अन्वय: -** हे वरोरु! मद-स्खलित-चेष्टितै: असंस्थित-पदा सुविह्वल-अङ्गी मनोज्ञा (त्वम्) सुरतकाले क्व यास्यसि? किम् त्वम् विषमा वानवासिका (असि) |

**अर्थ -** हे उत्तमांक असणाऱ्या प्रिये, मदोन्मत्त अंगचेष्टेने अडखळत जाणारी, शरीराने अत्यंत विह्वळणारी, सुंदर दिसणारी तू या रतिक्रीडेच्या वेळेस तू कुठे निघालीस? तू विषमा म्हणजे विरागिणी वनवासिनी आहेस का ?

**❖ केतुमती ❖**

**अथ केतुमती -**
**स्जौ स्गौ च प्रथमे पादे तथा चैव तृतीयके |**
**केतुमत्यां गणा : प्रोक्ता : भ्रौ न्गौ गश्च सदा बुधै : ‖ १४९ ‖**

**पदच्छेद: -** स्जौ स्गौ च प्रथमे पादे तथा च एव तृतीयके |
केतुमत्याम् गणा : प्रोक्ता : भ्रौ न्गौ गश्च सदा बुधै : ‖ १४९ ‖

**अन्वय: -** केतुमत्याम् प्रथमे तृतीयके च पादे स्जौ स्गौ तथा च (द्वितीये चतुर्थे पादे) भ्रौ न्गौ ग: च गणा : बुधै : सदा प्रोक्ता : |

**अर्थ -** 'केतुमती' वृत्तामध्ये पहिल्या आणि तिसऱ्या चरणामध्ये 'स ज स ग' हा क्रम असेल (१० अक्षरे) आणि तसेच दुसऱ्या व चौथ्या चरणामध्ये 'भ र न ग ग' हे गण (११ अक्षरे) असतात, असे बुद्धिमानांनी नेहमीच म्हटले आहे .

**स्फुरिताधरं चकितनेत्रं रक्तकपोलमम्बुजदलाक्षम्।**
**किमिदं रुषापहृतशोभं केतुमतीसमं वद मुखं ते ॥ १५० ॥**

**पदच्छेद :-** स्फुरित-अधरम् चकित-नेत्रम् रक्त-कपोलम् अम्बुज-दल-अक्षम्।
किम् इदम् रुषा-अपहृत-शोभम् केतुमती-समम् वद मुखम् ते ॥ १५० ॥

**अन्वय :-** स्फुरिताधरम् चकितनेत्रम् रक्तकपोलम् अम्बुजदलाक्षम् रुषापहृतशोभम् केतुमतीसमम् ते मुखम् (जातम् अस्ति)। किम् इदम् (अस्ति तत्) वद।

**अर्थ -** हे देवी, तुझे ओठ थरथरत आहेत. नेत्र चकित झाले आहेत. गाल लाल झाले आहेत. कमलपत्राप्रमाणे तुझे नेत्र विशाल झाले आहेत. क्रोधामुळे तुझं सौंदर्य नाहीसे झाले आहे. अग्निच्या ज्वालेसमान तुझा चेहरा लाललाल झाला आहे. अगं सगळं काय आहे? सांग ना मला.

**❖ अपरवक्त्र ❖**

**अथ अपरवक्त्रम्-**
**वक्त्रस्यापरपूर्वस्य चादौ नौ रो लगौ त्रिका:।**
**नजौ जरौ द्वितीये च शेषाग्रं पुनरेव तु ॥ १५१ ॥**

**पदच्छेद :-** वक्त्रस्य अपरपूर्वस्य च आदौ नौ र: लगौ त्रिका:।
नजौ जरौ द्वितीये च शेषाग्रम् पुन: एव तु ॥ १५१ ॥

**अन्वय :-** अपरपूर्वस्य वक्त्रस्य आदौ नौ र: लगौ च त्रिका: द्वितीये च नजौ जरौ पुन: एव तु शेषाग्रम् (तथैव भवति)।

**अर्थ -** अपरवक्त्रवृत्ताच्या पहिल्या चरणामध्ये 'न र ल ग' हे त्रिक असतात आणि दुसऱ्या चरणामध्ये 'न ज ज र' हे त्रिक असतात. शेष चरण तसेच असतात.
(अपरवक्त्राच्या पहिल्या आणि तिसऱ्या चरणामध्ये ८ अक्षरे तसेच दुसऱ्या आणि चौथ्या चरणामध्ये १२ अक्षरे असतात. त्यांचा लघुगुरुक्रम क्रमश: 'न र ल ग' आणि 'न ज ज र' असा असतो. पुढील श्लोकामध्ये हीच पुनरावृत्ती आढळते.)

**प्रथमे च तृतीये नौ रलौ गश्च प्रकीर्तित:|**
**गणाश्चापरवक्त्रे तु नजौ जौ द्विचतुर्थयो:||१५२||**

**पदच्छेद:-** प्रथमे च तृतीये नौ रलौ ग: च प्रकीर्तित:|
गणा: च अपरवक्त्रे तु नजौ जौ द्विचतुर्थयो:||१५२||

**अन्वय: -** अपरवक्त्रे प्रथमे तृतीये च नौ रलौ ग: च द्विचतुर्थयो: तु नजौ जौ च गणा: प्रकीर्तित:|

**अर्थ -** अपरवक्त्र वृत्ताच्या पहिल्या व तिसऱ्या चरणामध्ये 'न र ल ग' आणि दुसऱ्या व चौथ्या चरणामध्ये 'न ज र र' हे गण असतात. उदाहरणार्थ -

**सुतनु! जलपरीतलोचनं जलदनिरुद्धमिवेन्दुमण्डलम् |**
**किमिदमपरवक्त्रमेव ते शशिवदनेऽद्य मुखं पराङ्मुखम्||१५३||**

**पदच्छेद:-** सुतनु! जलपरीतलोचनम् जलदनिरुद्धम् इव इन्दुमण्डलम्|
किम् इदम् अपरवक्त्रम् एव ते शशिवदने अद्य मुखम् पराङ्मुखम्||१५३||

**अन्वय: -** सुतनु! जलदनिरुद्धम् इन्दुमण्डलम् इव जलपरीतलोचनम्| हे शशिवदने, किम् इदम् ते अपरवक्त्रम् यत् अद्य (तव) मुखम् पराङ्मुखम् एव (दृश्यते)|

**अर्थ -** हे सुंदरी, पाण्याने भरलेल्या मेघांनी अडविलेल्या चंद्रबिंबासमान तुझ्या डोळ्यांत अश्रू का बरं दाटले आहेत? हे चंद्रमुखी, हा तुझा दुसराच चेहरा आहे जो आज पराङ्मुख झाला आहे.

**❖ पुष्पिताग्रा ❖**

**अथ पुष्पिताग्रा -**
**नौ यौं तु प्रथमे पादे न्जौ ज्रौ गश्च तथापरे|**
**यत्र तत्पुष्पिताग्रा स्याद्यदि शेषं तु पूर्ववत्||१५४||**

**पदच्छेद:-** नौ यौं तु प्रथमे पादे न्जौ जौ ग: च तथा अपरे|
यत्र तत् पुष्पिताग्रा स्यात् यदि शेषं तु पूर्ववत्||१५४||

**अन्वय: -** यत्र प्रथमे पादे तु नौ र्यौ तथा अपरे च न्जौ जौ ग: यदि शेषं तु पूर्ववत् (अस्ति) तत् पुष्पिताग्रा स्यात्|

**अर्थ -** ज्याच्या प्रथम पादामध्ये 'न न र य' हे गण असतात आणि दुसऱ्या पादामध्ये 'न ज ज र ग' हे गण असतात तसेच तिसऱ्या आणि चौथ्या चरणामध्ये वरीलप्रमाणेच गण असतात तेव्हा त्यास 'पुष्पिताग्रा' वृत्त असे म्हणतात .

(पुष्पिताग्रा या अर्धसमवृत्तामध्ये प्रथम-तृतीय चरणांत १२ अक्षरे आणि द्वितीय-चतुर्थ चरणांत १३ अक्षरे असतात . गण तर या पूर्वीच सांगितले आहेत) उदाहरणार्थ -

**पवनबलविधूतचारुशाखं प्रमुदितकोकिलकण्ठनादरम्यम्|**
**मधुकरपरिगीयमानशब्दं वरतनु ! पश्य वनं सुपुष्पिताग्रम्||१५५||**

**पदच्छेद: -** पवन-बल-विधूत-चारु-शाखम् प्रमुदित-कोकिल-कण्ठ-नाद-रम्यम्|
मधुकर-परिगीयमान-शब्दम् वरतनु ! पश्य वनम् सुपुष्पिताग्रम्||१५५||

**अन्वय: -** वरतनु! पवन-बल-विधूत-चारु-शाखम् प्रमुदित-कोकिल-कण्ठ-नाद-रम्यम् मधुकर-परिगीयमान-शब्दम् सुपुष्पिताग्रम् वनम् पश्य|

**अर्थ -** हे वरतनु! वाऱ्याच्या वेगाने वृक्षांच्या सुंदर फांद्या डोलत असणारे, कोकिळच्या मधुर गायनाने रमणीय वातावरण असलेले, भुंग्यांचा गोड गुंजारव जिथे पसरला आहे, असे सुंदर फुलांनी श्रेष्ठ झालेले वन तू पहा !

**❖ उद्गता ❖**

**अथ उद्गता -**
**स्जौ स्लौ चादौ यथा न्सौ ज्गौ भ्नौ ज्लौ गश्च तथा पुन:|**
**स्जौ स्जौ गश्च त्रिका ह्येते उद्गताया: प्रकीर्तिता: || १५६ ||**

**पदच्छेद: -** स्जौ स्लौ च आदौ यथा न्सौ ज्गौ भ्नौ ज्लौ ग: च तथा पुन:|
स्जौ स्जौ ग: च त्रिका: हि एते उद्गताया: प्रकीर्तिता: ||१५६||

**अन्वय:** - यथा आदौ स्जौ स्लौ, न्सौ ज्गौ, भ्नौ ज्लौ ग:, स्जौ स्जौ ग: च एते उद्गताया: त्रिका: हि प्रकीर्तिता:|

**अर्थ** - ज्याच्या पहिल्या पादामध्ये 'स ज स ल' आणि दुसऱ्या पादामध्ये 'न ज स ग' हे त्रिक असतील. तिसऱ्या चरणामध्ये 'भ न ज ल ग' आणि शेवटी चौथ्या चरणामध्ये 'स ज स ज ग' असल्यास ते 'उद्गता' वृत्त होते. उदाहरणार्थ -

**तव रोमराजिरतिभाति सुतनु ! मदनस्य मञ्जरी |**
**नाभिकमलविवरोत्पतिता भ्रमरावलीव कुसुमात्समुद्गता || १५७ ||**

**पदच्छेद:** - तव रोमराजि: अतिभाति सुतनु ! मदनस्य मञ्जरी |
नाभि-कमल-विवर-उत्पतिता भ्रमरावली इव कुसुमात् समुद्गता || १५७ ||

**अन्वय:** - सुतनु ! कुसुमात् समुद्गता भ्रमरावली इव तव नाभि-कमल-विवर-उत्पतिता रोमराजि: अतिभाति। (सत्यमेव त्वम्) मदनस्य मञ्जरी (इव असि) |

**अर्थ** - हे सुंदरी ! फुलातून बाहेर आलेल्या भुंग्यांच्या रांगेप्रमाणे कमलासमान सुंदर असलेल्या तुझ्या नाभीच्या विवरातून बाहेर आलेली हे असंख्य रोम अत्यंत शोभून दिसतात. तू खरोखरंच कामदेवाची नवीन पालवी आहेस.

### ❖ ललिता ❖

**अथ ललिता -**
**स्जौ स्लौ च ततो न्सौ ज्गौ नौ सौ चेति तृतीयके |**
**स्जौ स्जौ गश्च चतुर्थे तु ललिताया गणा: स्मृता: || १५८ ||**

**पदच्छेद:** - स्जौ स्लौ च तत: न्सौ ज्गौ नौ सौ च इति तृतीयके |
स्जौ स्जौ ग: च चतुर्थे तु ललिताया: गणा: स्मृता: || १५८ ||

**अन्वय:** - (प्रथमे) स्जौ स्लौ च तत: (द्वितीये) न्सौ ज्गौ च तृतीयके नौ सौ इति चतुर्थे तु स्जौ स्जौ ग: च ललिताया: गणा: स्मृता: |

**अर्थ** - प्रथम चरणात 'स ज स ल', द्वितीय चरणामध्ये 'न स ज ग', तृतीय चरणामध्ये 'न न स स' आणि चौथ्या चरणामध्ये 'स ज स ज ग' हे ललितावृत्ताचे गण आहेत.

**ललिताकुलभ्रमितचारुवसनकरचारुपल्लवा |**
**प्रविकसितकमलकान्तिमुखी प्रविभासि देवि सुरतश्रमातुरा || १५९ ||**

**पदच्छेद :-** ललित-आकुल-भ्रमित-चारु-वसन-कर-चारु-पल्लवा |
प्रविकसित-कमल-कान्ति-मुखी प्रविभासि देवि सुरत-श्रम-आतुरा || १५९ ||

**अन्वय :-** देवि, ललित-आकुल-भ्रमित-चारु-वसन-कर-चारु-पल्लवा प्रविकसित-कमल-कान्ति-मुखी (त्वम्) सुरतश्रमातुरा प्रविभासि |

**अर्थ -** हे सुंदरी! ललित आणि व्याकुळपणे फिरणारी, सुंदर वस्त्र आणि सुंदर हस्तपालवी असणारी, उमललेल्या कमळासमान चेहऱ्यावर तेज असणारी, सुरतश्रमामुळे (संभोगामुळे) थकलेली तू अतिशय शोभून दिसत आहेस .

**एवमेतानि वृत्तानि समानि विषमाणि च |**
**नाटकाद्येषु काव्येषु प्रयोक्तव्यानि सूरिभि : || १६० ||**

**पदच्छेद :-** एवम् एतानि वृत्तानि समानि विषमाणि च |
नाटक-आद्येषु काव्येषु प्रयोक्तव्यानि सूरिभि : || १६० ||

**अन्वय :-** एवम् एतानि समानि विषमाणि च वृत्तानि सूरिभि : नाटकाद्येषु काव्येषु प्रयोक्तव्यानि |

**अर्थ -** याप्रमाणे ही समवृत्ते आणि विषमवृत्ते विद्वानांनी काव्य आणि नाटक इत्यादींमध्ये वापरावी .

**सन्त्यन्यान्यपि वृत्तानि यान्युक्तानीह पण्डितै : |**
**न च तानि प्रयोज्यानि न शोभां जनयन्ति हि || १६१ ||**

**पदच्छेद :-** सन्ति अन्यानि अपि वृत्तानि यानि उक्तानि इह पिण्डश : |
न च तानि प्रयोज्यानि न शोभाम् जनयन्ति हि || १६१ ||

**अन्वय :-** अन्यानि अपि वृत्तानि सन्ति यानि इह पण्डितै : उक्तानि | (किन्तु) तानि न प्रयोज्यानि (यत : तानि) हि शोभाम् न जनयन्ति |

**अर्थ -** इतरही अनेक वृत्ते आहेत जी या प्रकरणात पंडितांनी सांगितली आहेत . परंतु त्यांचा प्रयोग करू नये कारण ती वृत्ते काव्यामध्ये सौंदर्य निर्माण करीत नाहीत .

**यान्यत: परमत्र स्युर्गीतके तानि योजयेत् |**
**ध्रुवायोगे तु वक्ष्यामि तेषां चैव विकल्पनम् || १६२ ||**

**पदच्छेद: -** यानि अत: परम् स्यु: गीतके तानि योजयेत् |
ध्रुवायोगे तु वक्ष्यामि तेषाम् च एव विकल्पनम् || १६२ ||

**अन्वय: -** अत: परम् यानि (वृत्तानि) स्यु: तानि गीतके योजयेत् | ध्रुवायोगे तु तेषाम् च एव विकल्पनम् वक्ष्यामि |

**अर्थ -** यापुढे जी वृत्ते सांगितली जातील त्यांचा गीतरचनेसाठी प्रयोग करावा. 'ध्रुवा' विषयी स्पष्टीकरणाच्या वेळी त्यांच्या सर्व प्रकारांचे वर्णन करीन.

**वृत्तलक्षणमेवं तु समासेन मयोदितम् |**
**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि ह्यार्याणामपि लक्षणम् || १६३ ||**

**पदच्छेद: -** वृत्तलक्षणम् एवम् तु समासेन मया उदितम् |
अत: ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि हि आर्याणाम् अपि लक्षणम् || १६३ ||

**अन्वय: -** एवम् तु मया समासेन वृत्तलक्षणम् उदितम् | अत: ऊर्ध्वम् आर्याणाम् अपि लक्षणम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ -** याप्रमाणे थोडक्यात मी तुम्हाला वृत्तांचे लक्षण सांगितले. यानंतर पुढे मी तुम्हांला आर्यांची लक्षणे सांगीन.

**❖ आर्यावृत्ताची लक्षणे ❖**

**|| अथ आर्यावृत्तप्रकरणम् ||**
**पथ्या च विपुला चैव चपला मुखतोऽपरा |**
**जघने चपला चैव आर्या: पञ्च प्रकीर्तिता: || १६४ ||**

**पदच्छेद: -** पथ्या च विपुला च एव चपला मुखत: अपरा |
जघने चपला च एव आर्या: पञ्च प्रकीर्तिता: || १६४ ||

**अन्वय: -** पथ्या, विपुला, मुखत: चपला, अपरा च जघने चपला एव पञ्च आर्या: प्रकीर्तिता: |

**अर्थ -** पथ्या, विपुला, चपला, मुखचपला आणि जघनचपला हे पाच आर्यावृत्त सांगितले आहेत.

**आसां तु संप्रवक्ष्यामि यतिमात्राविकल्पनम् |**
**लक्षणं नियमं चैव विकल्पगुणसंश्रयम् || १६५ ||**

**पदच्छेद: -** आसाम् तु संप्रवक्ष्यामि यतिमात्राविकल्पनम् |
लक्षणम् नियमम् च एव विकल्पगुणसंश्रयम् || १६५ ||

**अन्वय: -** आसाम् यतिमात्राविकल्पनम् विकल्पगुणसंश्रयम् लक्षणम् नियमम् च संप्रवक्ष्यामि |

**अर्थ -** आता मी तुम्हांला या आर्यावृत्तांचे यती व मात्रांनुसार भेद-विभाग, तसेच विकल्प आणि गुणांवर आधारित लक्षणे आणि नियम सांगीन.

**❖ यतिनियम ❖**

**यतिश्छेदस्तु विज्ञेयश्चतुर्मात्रो गण: स्मृत: |**
**द्वितीयान्त्यौ युजौ पादावयुजौ त्वपरौ स्मृतौ || १६६ ||**

**पदच्छेद: -** यति: छेद: तु विज्ञेय: चतुर्मात्र: गण: स्मृत: |
द्वितीयान्त्यौ युजौ पादौ अयुजौ तु अपरौ स्मृतौ || १६६ ||

**अन्वय: -** यति: छेद: तु विज्ञेय: | चतुर्मात्र: गण: स्मृत: | द्वितीयान्त्यौ पादौ युजौ अपरौ तु अयुजौ स्मृतौ |

**अर्थ -** पादाच्या विभागांना 'यति' म्हणतात. गण हा चार मात्रांचा असतो. दुसऱ्या आणि चौथ्या चरणाला 'युक्' (समपाद) म्हणतात आणि पहिल्या व तिसऱ्या चरणाला 'अयुक्' (विषमपाद) असे म्हणतात.

(चार मात्रांचा एक समूह/गण होतो. आर्या या मात्रावृत्तामध्ये एकूण ६० मात्रा असतात. प्रथम-द्वितीय चरण मिळून ३० मात्रा आणि तृतीय-चतुर्थ मिळून ३० मात्रा होतात. चार मात्रांचा एक समूह/गण केल्यास प्रथम-द्वितीय चरणामध्ये एकूण ८

समूह/गण होतात. ज्यामध्ये चार मात्रा असणारे सात गण आणि आठव्या गणात केवळ दोनच मात्रा शिल्लक राहतात. उदा. ४ ४ ४ ४ ४ ४ ४ २ = ३० मात्रा. यामध्ये जो आठवा गण ज्यामध्ये केवळ दोनच मात्रा शिल्लक राहतात त्याला 'गण' न म्हणता 'अर्ध गण' म्हणावे. विद्वानांच्या मते, गुरूवर्णाच्या दोन मात्रा आणि लघुवर्णाची एक मात्रा असते. त्यानुसार चार मात्रा असणारा जो 'एक गण' तो पाच प्रकारे रचता येतो. जसे -

१. ग ग = ४ मात्रा
२. ल ल ग = ४ मात्रा
३. ल ग ल = ४ मात्रा
४. ग ल ल = ४ मात्रा
५. ल ल ल ल = ४ मात्रा.

| | |
|---|---|
| ४ ४ ४ ४ प्रथमचरण | ४ ४ ४ २ द्वितीयचरण |
| ४ ४ ४ ४ तृतीयचरण | ४ ४ ४ २ चतुर्थचरण |

यामध्ये प्रथम चार गणांचा अयुक् पाद आणि शेवटच्या चार गणांचा युक्पाद होतो. म्हणजेच ४ ४ ४ ४ (१६) एवढ्या मात्रा प्रथम-तृतीय चरणामध्ये असतात आणि ४४४२ (१४) एवढ्या मात्रा द्वितीय-चतुर्थ चरणामध्ये असतात.)

**गुरुमध्यविहीनस्तु चतुर्गणसमन्वितः |**
**अयुग्गणो विधातव्यो युग्गणस्तु यथेप्सितः || १६७ ||**

**पदच्छेद:-** गुरुमध्यविहीन: तु चतुर्गणसमन्वित:|
अयुग्गण: विधातव्य: युग्गण: तु यथा ईप्सित: || १६७ ||

**अन्वय: -** चतुर्गणसमन्वित: अयुग्गण: गुरुमध्यविहीन: तु विधातव्य: | यथेप्सित: युग्गण: तु (विधातव्य:)|

**अर्थ -** चारमात्रांचे चार गण असलेल्या 'अयुक' चरणांमध्ये गुरुमध्य अर्थात् 'ज' गण नसावा. 'युक्' चरणांच्या बाबतीत कवीने स्वत:च्या इच्छेप्रमाणे पाच प्रकारच्या चारमात्रिक गणांचा प्रयोग करावा.

**षष्ठो वै द्विविकल्पस्तु नैधनो ह्येकसंस्थित:|**
**पश्चादर्धे तु षष्ठ: स्यादेकमात्रस्तु केवल: || १६८ ||**

**पदच्छेद : -** षष्ठ : वै द्विविकल्प : तु नैधन : हि एकसंस्थित : |
पश्चात् अर्धे तु षष्ठ : स्यात् एकमात्र : तु केवल : || १६८ ||

**अन्वय : -** षष्ठ: (गण :) वै द्विविकल्प: (अस्ति) । पश्चात् अर्धे तु षष्ठ: केवल: तु एकमात्र: स्यात् | नैधन : (अष्टम :) तु हि एकसंस्थित : (भवति) |

**अर्थ -** आर्यावृत्तामध्ये जो सहावा गण आहे तो दोन प्रकारे लिहिता येतो . पहिला प्रकार म्हणजे 'ल ग ल' म्हणजेच 'ज' त्रिक . दुसरा प्रकार म्हणजे 'ल ल ल ल' ज्यामध्ये सर्वलघु वर्ण मिळून चार मात्रा होतात . शेवटच्या आठव्या गणामध्ये केवळ एकच वर्ण असतो, परिणामी त्यामध्ये दोन मात्रा असणारा हा एकच गुरुवर्ण असतो .

**द्विविकल्पस्तु षष्ठो यो गुरुमध्यो भवेत्तु स : |**
**तथा सर्वलघुश्चैव यति: संख्यासमाश्रिता || १६९ ||**

**पदच्छेद : -** द्विविकल्प : तु षष्ठ : य : गुरुमध्य : भवेत् तु स : |
तथा सर्वलघु : च एव यति : संख्यासमाश्रिता || १६९ ||

**अन्वय : -** य : षष्ठ : (गण :) द्विविकल्प : - स : गुरुमध्य : भवेत् (अथवा) सर्वलघु : एव (भवति) | यति : संख्यासमाश्रिता (भवति) |

**अर्थ -** आर्यावृत्तामध्ये जो सहावा गण आहे तो दोन प्रकारे लिहिता येतो . पहिला प्रकार म्हणजे 'ल ग ल' म्हणजेच 'ज' त्रिक जो 'गुरुमध्य' आहे . दुसरा प्रकार म्हणजे 'ल ल ल ल' ज्यामध्ये सर्वलघु वर्ण मिळून चार मात्रा होतात . 'यति' ही विशिष्ट संख्येनंतरच असते .

**द्वितीयादिलघुर्ज्ञेय : सप्तमे पञ्चमे यति : |**
**प्रथमादिरथान्त्ये च पञ्चमे वा विधीयते || १७० ||**

**पदच्छेद : -** द्वितीय-आदिलघु : ज्ञेय : सप्तमे पञ्चमे यति : |
प्रथम-आदि : अथ अन्त्ये च पञ्चमे वा विधीयते || १७० ||

**अन्वय : -** सप्तमे पञ्चमे द्वितीयादिलघु: (आदिलघौ द्वितीयात् अनन्तरम्) यति: ज्ञेय: | अथ च पञ्चमे अन्त्ये वा प्रथमादि: (आदौ लघु : चेत् प्रथमात् अनन्तरम्) विधीयते |

**अर्थ** - जेव्हा पाचवा किंवा सातवा गण आदिलघु (ल ल ग) असतो तेव्हा, दुसऱ्या अक्षरानंतर म्हणजेच दुसऱ्या 'ल' नंतर यति घ्यावी . थोडक्यात, १८ व्या किंवा २६ व्या मात्रेनंतर यति घ्यावी .

अथवा जेव्हा पाचवा किंवा शेवटच्या (आठवा गण हा अर्धगण आहे . त्यामुळे सातवा गण हाच शेवटचा पूर्णगण मानावा . ) म्हणजेच सातवा गण आदिलघु (ल ल ग) असतो तेव्हा, पहिल्या अक्षरानंतर म्हणजेच पहिल्या 'ल' नंतर यति घ्यावी . थोडक्यात, १७ व्या किंवा २५ व्या मात्रेनंतर यति घ्यावी .

### ❖ पथ्या व विपुलाची लक्षणे ❖

**गणेषु त्रिषु पादस्य यस्या : पथ्या तु सा भवेत् |**
**अतश्च विपुलान्या तु विज्ञेयाऽयतिलक्षणा || १७१ ||**

**पदच्छेद : -** गणेषु त्रिषु पादस्य यस्या : पथ्या तु सा भवेत् |
अत : च विपुला अन्या तु विज्ञेया अयतिलक्षणा || १७१ ||

**अन्वय : -** यस्या : पादस्य त्रिषु गणेषु (यति: भवति) सा तु 'पथ्या' भवेत् | अन्या अयतिलक्षणा 'विपुला' विज्ञेया |

**अर्थ** - ज्यामध्ये तीन गणांच्या नंतर म्हणजे १२ मात्रांनंतर यति असते ते आर्यावृत्त 'पथ्या' होय . अन्य ज्यामध्ये कुठेही यति नसते ते 'विपुला' आर्यावृत्त होय .
(मागे अनुष्टुभ्प्रकरणात विपुला हे वृत्त आलेले आहे . त्यामध्ये प्रतिचरण आठ अक्षरे असतात . परंतु प्रस्तुत ठिकाणी विपुला आर्यावृत्त हे मात्रावृत्त आहे . )

### ❖ चपला ❖

**अयुज: सर्वगुरवो गुरुमध्या गणा युज: |**
**यस्या : स्यु : पादयोगे तु विज्ञेया चपला हि सा || १७२ ||**

**पदच्छेद : -** अयुज : सर्वगुरव : गुरुमध्या : गणा : युज : |
यस्या : स्यु : पादयोगे तु विज्ञेया चपला हि सा || १७२ ||

**अन्वय : -** यस्या : पादयोगे अयुज : सर्वगुरव : युज : गुरुमध्या : गणा : स्यु : सा हि तु चपला विज्ञेया |

**अर्थ -** ज्याच्या चरणातील विषम गणामध्ये (१, ३, ५, ७) सर्व अक्षरे गुरू असतील आणि सम गणामध्ये (२, ४, ६) मध्ये गुरुमध्ये (ल ग ल) गण असेल तर त्यास 'चपला' आर्या म्हणावे .

### ❖ पूर्वार्ध व उत्तरार्धविषयी ❖

**त्रिंशदाद्ये तु विज्ञेय : सप्तविंशति : चापरे |**
**उभयोरर्धयोर्ज्ञेयो मात्रापिण्डो विभागश : || १७३ ||**

**पदच्छेद : -** त्रिंशत् आद्ये तु विज्ञेय : सप्तविंशति : च अपरे |
उभयो : अर्धयो : ज्ञेय : मात्रापिण्ड : विभागश : || १७३ ||

**अन्वय : -** आद्ये तु त्रिंशत् अपरे च सप्तविंशति : विज्ञेय : | उभयो : अर्धयो : मात्रापिण्ड : विभागश : ज्ञेय : |

**अर्थ -** उत्तमार्येच्या पूर्वार्धात तीस मात्रा असतात आणि उत्तरार्धात सत्तावीस मात्रा असतात हे जाणून घ्यावे . दोन्ही पूर्वार्धातील आणि उत्तरार्धातील मात्रासमूह त्याच्या विभागानुसार जाणून घ्यावा .
( जसे , पूर्वार्ध = १२ + १८ आणि उत्तरार्ध = १२ + १५ )

**त्रिंशत्तस्याश्च यदि स्युरेतानि द्विगुणानि तु |**
**त्रीण्यक्षराणि चान्यानि न्यस्य संख्याविभागश : || १७४ ||**
**एतानि लघुसंज्ञानि निर्दिष्टानि समासत: |**
**सर्वेषां चैवमार्याणामक्षराणां यथाक्रमम् || १७५ ||**

**पदच्छेद : -** त्रिंशत् तस्या : च यदि स्यु : एतानि द्विगुणानि तु |
त्रीणि अक्षराणि च अन्यानि न्यस्य संख्याविभागश : || १७४ ||
एतानि लघुसंज्ञानि निर्दिष्टानि समासत : |
सर्वेषाम् च एवम् आर्याणाम् अक्षराणाम् यथाक्रमम् || १७५ ||

**अन्वय: -** तस्या: (उत्तमार्याया:) त्रिंशत् मात्रा: स्यु: | संख्याविभागश: अन्यानि त्रीणि च अक्षराणि न्यस्य यदि एतानि द्विगुणानि (तदा मूलत: आर्या इति मात्रावृत्तम् भवति) | एतानि समासत: लघुसंज्ञानि निर्दिष्टानि | एवम् यथाक्रमम् सर्वेषाम् आर्याणाम् अक्षराणाम् च (लक्षणानि मया उक्तानि) |

**अर्थ -** त्या उत्तमार्येच्या पूर्वार्धामध्ये तीस मात्रा असतात. उत्तरार्धात २७ मात्रा असल्याने संख्येच्या विभागानुसार आणखी तीन अक्षरे जर जोडली तर पूर्वार्ध आणि उत्तरार्ध मिळून द्विगुणित म्हणजेच दुप्पट मात्रा अर्थात साठ मात्रा होतात. उत्तरार्धामध्ये ही जोडलेली तीन अक्षरे थोडक्यात लघुसंज्ञक समजावी. अशा प्रकारे सर्व आर्यांची आणि अक्षरगणवृत्तांची लक्षणे मी क्रमानुसार सांगितली (श्लोक १७६, १७७, १७८, १७९ यामधील विषय १६८, १६९, १७०, १६७ या श्लोकांमध्ये क्रमश: स्पष्ट करण्यात आलेला आहे.)

### ❖ पथ्या आणि विपुलाची लक्षणे ❖

**प्रथमतृतीयौ पादौ द्वादशमात्रौ भवेत्तु सा पथ्या |**
**विपुलान्या खलु गदिता पूर्वोदितलक्षणोपेता || १८० ||**

**पदच्छेद: -** प्रथमतृतीयौ पादौ द्वादशमात्रौ भवेत् तु सा पथ्या |
विपुला अन्या खलु गदिता पूर्वो-उदित-लक्षण-उपेता || १८० ||

**अन्वय: -** प्रथमतृतीयौ पादौ द्वादशमात्रौ सा तु पथ्या भवेत् | पूर्वो-उदित-लक्षण-उपेता अन्या खलु विपुला गदिता |

**अर्थ -** पहिला आणि तिसरा चरण जर बारा मात्रांचा असेल तर त्यास 'पथ्या' वृत्त असे म्हणतात आणि पूर्वी सांगितलेल्या लक्षणाप्रमाणे 'विपुला' ही वेगळीच असते ज्यामध्ये यति नसते.

**पथ्या यथा -**
**रक्तमृदुपद्मनेत्रा सितदीर्घबहुलमृदुकेशी |**
**कस्य तु पृथुमृदुजघना तनुबाह्वंसोदरी पथ्या || १८१ ||**

**पदच्छेद :** - रक्त-मृदु-पद्म-नेत्रा सित-दीर्घ-बहुल-मृदु-केशी |
कस्य तु पृथु-मृदु-जघना तनु-बाहु-अंस-उदरी पथ्या || १८१ ||

**अन्वय :** - रक्त-मृदु-पद्म-नेत्रा, सित-दीर्घ-बहुल-मृदु-केशी, पृथु-मृदु-जघना तनु-बाहु-अंस-उदरी कस्य तु (खलु एषा) पथ्या ?

**अर्थ** - लालसर कोमल कमळासमान नेत्र असणारी, काळेभोर लांब दाट व कोमल केस असणारी, विशाल आणि कोमल जांघा असणारी, शरीर बाहु खांदे उदर अतिशय सुंदर असणारी ही कन्या कोणाच्या हृदयमार्गावर विराजमान आहे ?

**विपुला यथा -**

**विपुलजघनवदनस्तननयनैस्ताम्राऽधरोष्ठकरचरणै: |**
**आयतनासागण्डैर्ललाटकर्णै: शुभा कन्या || १८२ ||**

**पदच्छेद :** - विपुल-जघन-वदन-स्तन-नयनै : ताम्र-अधरोष्ठ-कर-चरणै : |
आयत-नासा-गण्डै : ललाट-कर्णै : शुभा कन्या || १८२ ||

**अन्वय :** - विपुल-जघन-वदन-स्तन-नयनै :, ताम्र-अधरोष्ठ-कर-चरणै :, आयत-नासा-गण्डै :, ललाट-कर्णै : कन्या (इयम्) शुभा (भवति) |

**अर्थ** - जिचे नितंब, चेहरा, स्तन, नेत्र विशाल असतील, अधरोष्ठ हात पाय केशरी वर्णाचे असतील, नाक गाल कपाळ आणि कान भरीव असतील ती कन्या शुभ असते .

**❖ चपला ❖**

**द्वितीयश्च चतुर्थश्च गुरुमध्यगतो भवेत् |**
**उभयोरर्धयोर्यत्र विज्ञेया चपला यथा || १८३ ||**

**पदच्छेद :** - द्वितीय : च चतुर्थ : च गुरुमध्यगत : भवेत् |
उभयो : अर्धयो : यत्र विज्ञेया चपला यथा || १८३ ||

**अन्वय :** - यत्र उभयो : अर्धयो : द्वितीय : च चतुर्थ : च (गण :) गुरुमध्यगत : भवेत् (सा) चपला विज्ञेया | यथा -

**अर्थ** - जेव्हा दोन्ही अर्ध्या भागामध्ये म्हणजेच पूर्वार्धात किंवा उत्तरार्धात दुसरे व चौथे गण मध्यगुरू (जगण) असेल, त्याला 'चपला' आर्या म्हणतात .

**यथा**

**उद्भटगामिनी परुषभाषिणी कामचिह्नकृतवेषा |**
**जानाति मांसयुक्ता सुराप्रिया सर्वतश्चपला || १८४ ||**

**पदच्छेद: -** उद्भटगामिनी परुषभाषिणी कामचिह्नकृतवेषा |
जानाति मांसयुक्ता सुराप्रिया सर्वत: चपला || १८४ ||

**अन्वय: -** उद्भटगामिनी परुषभाषिणी कामचिह्नकृतवेषा मांसयुक्ता सुराप्रिया चपला सर्वत: जानाति |

**अर्थ -** उद्धत चालणारी, कठोर वचन बोलणारी, कामोपभोगाचे चिह्न आणि वेष धारण करणारी, पुष्टांग असलेली, मदिरा प्रिय असलेली चंचल नायिका सर्व काही जाणते .
(वरील उदाहरणामध्ये उत्तरार्धातील द्वितीय आणि चतुर्थ गणामध्ये 'ज'गण आढळतो . हे जघनचपलावृत्ताचे उदाहरण आहे ज्याचे सोदाहरण लक्षण पुन्हा एकदा पुढे देण्यात आलेले आहे . )

**❖ मुखचपला आणि जघनचपला ❖**

**पूर्वार्धे लक्षणं ह्येतदस्या: सा च मुखेन तु |**
**पश्चिमार्धे तु चपला यस्या: सा जघनेन तु || १८५ ||**

**पदच्छेद: -** पूर्वार्धे लक्षणम् हि एतद् अस्या: सा च मुखेन तु |
पश्चिमार्धे तु चपला यस्या: सा जघनेन तु || १८५ ||

**अन्वय: -** अस्या: एतत् तु लक्षणम् पूर्वार्धे हि सा च मुखेन यस्या: तु पश्चिमार्धे तु सा जघनेन चपला (भवेत्) |

**अर्थ -** चपलाचे हे लक्षण पूर्वार्धात असेल तर त्यास 'मुखचपला' असे म्हणतात आणि उत्तरार्धात दिसले तर त्यास 'जघनचपला' असे म्हणतात .

**मुखचपला यथा -**

**आर्या मुखे तु चपला तथापि चार्या न मे यत: सा तु |**
**दक्षा गृहकृत्येषु तथा दु:खे भवति दु:खार्ता || १८६ ||**

**पदच्छेद :-** आर्या मुखे तु चपला तथा अपि चार्या न मे यत: सा तु |
दक्षा गृहकृत्येषु तथा दु:खे भवति दु:खार्ता || १८६ ||

**अन्वय : -** मे आर्या मुखे तु चपला तथापि सा चार्या न (चपला) यत: सा गृहकृत्येषु दक्षा तथा दु:खे दु:खार्ता भवति |

**अर्थ -** माझी बायको तोंडाने खूप वाचाळ आहे परंतु स्वभावाने ती चंचल नाही कारण ती घरकामांमध्ये जागरूक आहे आणि माझ्या दु:खात दु:खी होणारी आहे .

**जघनचपला यथा -**

**वरमृगनयने ! चपलासि वरोरु ! शशाङ्कदर्पणनिभास्ये ! |**
**कामस्य सारभूतेन पूर्णमदचारुजघनेन || १८७ ||**

**पदच्छेद :-** वर-मृग-नयने ! चपला असि वरोरु ! शशाङ्क-दर्पण-निभ-आस्ये ! |
कामस्य सारभूतेन पूर्ण-मद-चारु-जघनेन || १८७ ||

**अन्वय : -** वरमृगनयने ! वरोरु ! शशाङ्कदर्पणनिभास्ये ! कामस्य सारभूतेन पूर्ण -मद-चारु-जघनेन (त्वम्) 'चपला' असि |

**अर्थ -** हे श्रेष्ठ मृगनयनी, हे उत्तमांक प्रिये, हे चंद्रासमान शुभ्र आणि आरशासमान नितळ चेहरा असलेल्या सुंदरी, कामक्रीडेचे सार असलेल्या, कामरसाचा परमोच्च आनंद देणाऱ्या तुझ्या या सुंदर जांघांमुळे तू चंचल झाली आहेस .

**❖ सर्वचपला ❖**

**सर्वचपला यथा -**

**उभयोरर्धयोरेतल्लक्षणं दृश्यते यदि |**
**वृत्तज्ञै: सा तु विज्ञेया सर्वतश्चपला सखि || १८८ ||**

**पदच्छेद :-** उभयो : अर्धयो : एतत् लक्षणम् दृश्यते यदि |
वृत्तज्ञै : सा तु विज्ञेया सर्वत : चपला सखि || १८८ ||

**पदच्छेद :** - उभयो : अर्धयो : एतत् लक्षणम् दृश्यते यदि |
वृत्तज्ञै : सा तु विज्ञेया सर्वत : चपला सखि || १८८ ||

**अन्वय :** - सखि यदि उभयो : अर्धयो : एतत् लक्षणम् दृश्यते सा तु वृत्तज्ञै : सर्वत : चपला विज्ञेया |

**अर्थ** - जेव्हा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध दोन्हींमध्ये 'चपला'ची लक्षणे दिसली तर वृत्त जाणणारी लोक त्याला 'सर्वचपला' असे म्हणतात .

**❖ उत्तमा ❖**

**कार्यौ द्वादशमात्रौ च पादावाद्यौ तृतीयकौ |**
**अष्टादश द्वितीयं च तथा पञ्चदशोत्तमा || १८९ ||**

**पदच्छेद :** - कार्यौ द्वादशमात्रौ च पादौ आद्यौ तृतीयकौ |
अष्टादश द्वितीयम् च तथा पञ्चदश उत्तमा || १८९ ||

**अन्वय :** - आद्यौ तृतीयकौ च पादौ द्वादशमात्रौ कार्यौ द्वितीयम् च अष्टादश तथा (चतुर्थ) पञ्चदश (सा) उत्तमा (भवेत्) |

**अर्थ** - जेव्हा पहिल्या आणि तिसऱ्या चरणामध्ये बारा मात्रा असतील आणि दुसऱ्या पादामध्ये अठरा आणि चौथ्या पादामध्ये पंधरा मात्रा असल्यास त्याला 'उत्तमा' आर्या म्हणतात .
(यस्या : पादे प्रथमे द्वादशमात्रास्तथा तृतीयेऽपि | अष्टादश द्वितीये चतुर्थके पञ्चदश साऽऽर्या || हे आर्येचे लक्षण सर्वविदितच आहे . भरताने या आर्येला 'उत्तमार्या' असे म्हटले आहे, जिचे लक्षण तो अनुष्टुभ् छंदामध्ये देतो . )

**❖ आर्यावृत्तामध्ये प्रस्तारविधी ❖**

**चतु :पञ्चप्रकाराणां चतुष्काणां विशेषत : |**
**प्रस्तारयोगमासाद्य बाहुल्यं संप्रदर्शयेत् || १९० ||**

**पदच्छेद :** - चतु :पञ्चप्रकाराणाम् चतुष्काणाम् विशेषत : |
प्रस्तारयोगम् आसाद्य बाहुल्यम् संप्रदर्शयेत् || १९० ||

**अन्वय: -** एवम् च विशेषत: चतु: पञ्चप्रकाराणाम् चतुष्काणाम् प्रस्तारयोगम् आसाद्य बाहुल्यम् संप्रदर्शयेत्|

**अर्थ -** अशा प्रकारे, आर्यावृत्तामध्ये विषम स्थानावर असलेल्या पाच प्रकारच्या गणांचे आणि सम स्थानावर असलेल्या चार प्रकारच्या गणांचे प्रस्तारविधीद्वारे असंख्य प्रकार दर्शवावेत.

**पञ्चपञ्चाशदन्त्या तु त्रिंशदाद्या तथैव च |**
**आर्या त्वक्षरपिण्डेन विज्ञेयात्र प्रयोक्तृभि: || १९१ ||**

**पदच्छेद: -** पञ्चपञ्चाशत् अन्त्या तु त्रिंशत् आद्या तथा एव च |
आर्या तु अक्षरपिण्डेन विज्ञेया अत्र प्रयोक्तृभि: || १९१ ||

**अन्वय: -** अन्त्या आर्या तु पञ्चपञ्चाशत् अक्षराणि वर्त्तते तथा एव आद्या त्रिंशत् अक्षरानि (सन्ति) | अत्र तु प्रयोक्तृभि: अक्षरपिण्डेन आर्या विज्ञेया |

**अर्थ -** आर्येच्या शेवटच्या प्रकारामध्ये पंचावन्न अक्षरे असतात आणि आर्येच्या पहिल्या तीस अक्षरे असतात. याठिकाणी छंदप्रयोक्त्या विद्वानांनी अक्षरसमूहाद्वारे आर्यावृत्तास समजले पाहिजे.

**त्रिंशतस्त्वथ वर्णेभ्यो लघुवर्णत्रयं भवेत् |**
**शेषाणि गुरुसंख्यानि ह्येवं सर्वत्र निर्दिशेत् || १९२ ||**

**पदच्छेद: -** त्रिंशत: तु अथ वर्णेभ्य: लघुवर्णत्रयम् भवेत् |
शेषाणि गुरुसंख्यानि हि एवम् सर्वत्र निर्दिशेत् || १९२ ||

**अन्वय: -** अथ त्रिंशत: तु वर्णेभ्य: लघुवर्णत्रयम् शेषाणि हि गुरुसंख्यानि भवेत् | एवम् सर्वत्र निर्दिशेत् |

**अर्थ -** जेव्हा आर्येच्या पहिल्या प्रकारामध्ये तीस अक्षरे असतात तेव्हा एका गणात तीन लघू अक्षरे असावीत आणि शेष सर्व गुरू अक्षरे असावीत. अशा प्रकारे सर्वत्र निर्देश करावा.

(उत्तमार्येमध्ये १२ + १८ आणि १२ + १५ अशा मात्रा असतात . पूर्वार्धात सर्वगुरू चार मात्रांचे सात गण आणि एक गुरू वर्ण मिळून ३० मात्रा होतात . उत्तरार्धात मात्र सर्वगुरू असणाऱ्या चार मात्रांचे सहा गण आणि तीन लघू वर्ण असलेला एक गण असे मिळून २७ मात्रा होतात . )

**सर्वेषां जातिवृत्तानां पूर्वमुत्तरसंख्यया |**
**विकल्पं गणनां कृत्वा संख्यां पिण्डेन निर्दिशेत् || १९३ ||**

**पदच्छेद : -** सर्वेषाम् जातिवृत्तानाम् पूर्वम् उत्तरसंख्यया |
विकल्पगणनाम् कृत्वा संख्याम् पिण्डेन निर्दिशेत् || १९३ ||

**अन्वय : -** सर्वेषाम् जातिवृत्तानाम् पूर्वम् उत्तरसंख्यया विकल्पगणनाम् कृत्वा संख्या पिण्डेन निर्दिशेत् |

**अर्थ -** सर्व मात्रावृत्तांच्या पूर्वी असलेल्या संख्येचा नंतर असलेल्या संख्येबरोबर गुणाकार करून समूह बनवून मग संख्या सांगाव्यात .

**आर्यागीतिरथार्धे च केवलं त्वष्टभिर्गणैः |**
**इतरार्धे तु षष्ठस्तु न लघुर्गण इष्यते || १९४ ||**

**पदच्छेद : -** आर्यागीतिः अथ अर्धे च केवलम् तु अष्टभिः गणैः |
इतरार्धे तु षष्ठः तु न लघुः गणः इष्यते || १९४ ||

**अन्वय : -** अथ आर्यागीतिः अर्धे तु केवलम् अष्टभिः गणैः (युक्ता अस्ति) | इतरार्धे तु षष्ठः 'न' लघुः गणः इष्यते |

**अर्थ -** आर्यागीतिच्या पूर्वभागामध्ये केवळ आठ गण असतात आणि उत्तरार्धात सहाव्या गणामध्ये सर्वलघु असणारा 'नगण' असावा .

**वृत्तैरेवं तु विविधैर्नानाछन्दस्समुद्भवैः ।**
**काव्यबन्धास्तु कर्त्तव्याः षट्त्रिंशल्लक्षणान्विताः ॥१९५॥**

**पदच्छेदः -** वृत्तैः एवम् तु विविधैः नानाछन्दस्-समुद्भवैः ।
काव्यबन्धाः तु कर्त्तव्याः षट्त्रिंशत् लक्षणान्विताः ॥१९५॥

**अन्वयः -** एवम् तु विविधैः नानाछन्दस्समुद्भवैः वृत्तैः षट्त्रिंशत् लक्षणान्विताः काव्यबन्धाः तु कर्त्तव्याः ।

**अर्थ -** अशा प्रकारे विविध छंदांमधून उत्पन्न होणाऱ्या वेगवेगळ्या वृत्तांद्वारे छत्तीस लक्षणांनी युक्त असा काव्यबंधाची रचना करावी .

**॥ इति भारतीये नाट्यशास्त्रे छन्दोविचितिर्नाम पञ्चदशोऽध्यायः ॥**

**॥ अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील 'छंदोविचिति' नावाचा पंधरावा अध्याय संपला ॥**

# सोळावा अध्याय

# काव्यलक्षण



# सोळावा अध्याय

## काव्यलक्षण

❖ काव्यातील आभूषणे ❖

||अथ काव्यविभूषणानि||

**विभूषणं चाक्षरसंहतिश्च शोभाभिमानौ गुणकीर्तनं च |**
**प्रोत्साहनोदाहरणे निरुक्तं गुणानुवादोऽतिशयश्च हेतुः || १ ||**
**सारूप्यमिथ्याध्यवसायसिद्धिपदोच्चयाक्रन्दमनोरथाश्च |**
**आख्यानयाच्आप्रतिषेधपृच्छादृष्टान्तनिर्भासनसंशयाश्च || २ ||**
**आशीःप्रियोक्तिःकपटःक्षमा च प्राप्तिश्च पश्चात्तपनं तथैव |**
**अर्थानुवृत्तिर्ह्युपपत्तियुक्ती कार्योऽनुनीतिः परिदेवनं च || ३ ||**
**षट्त्रिंशदेतानि हि लक्षणानि प्रोक्तानि वै भूषणसंमितानि |**
**काव्येषु भावार्थगतानि तज्ज्ञैः सम्यक्प्रयोज्यानि यथारसं तु || ४ ||**

**पदच्छेदः –** विभूषणम् च अक्षरसंहतिः च शोभा-अभिमानौ गुणकीर्तनम् च |
प्रोत्साहन-उदाहरणे निरुक्तम् गुण-अनुवादः अतिशयः च हेतुः || १ ||
सारूप्य-मिथ्या-अध्यवसाय-सिद्धि-पदोच्चय-आक्रन्द-मनोरथाः च |
आख्यान-याच्आ-प्रतिषेध-पृच्छा-दृष्टान्त-निर्भासन-संशयाः च || २ ||
आशीः प्रियोक्तिः कपटः क्षमा च प्राप्तिः च पश्चात्तपनम् तथा एव |
अर्थानुवृत्तिः हि उपपत्ति-युक्ती कार्यः अनुनीतिः परिदेवनम् च || ३ ||
षट्त्रिंशत् एतानि हि लक्षणानि प्रोक्तानि वै भूषणसंमितानि |
काव्येषु भावार्थगतानि तज्ज्ञैः सम्यक् प्रयोज्यानि यथारसम् तु || ४ ||

**अन्वयः –** विभूषणम् च अक्षरसंहतिः च शोभा-अभिमानौ गुणकीर्तनम् च प्रोत्साहन-उदाहरणे निरुक्तम् गुणानुवादः अतिशयः च हेतुः सारूप्य-मिथ्या-अध्यवसाय-सिद्धि-पदोच्चय -आक्रन्द-मनोरथा च आख्यान-याच्आ- प्रतिषेध-पृच्छा-दृष्टान्त- निर्भासन-संशयाः च आशीः प्रियोक्तिः कपटः क्षमा च प्राप्तिः च पश्चात्तपनम् तथा एव अर्थानुवृत्तिः हि

उपपत्ति-युक्ती कार्य: अनुनीति: परिदेवनम् च एतानि हि वै भूषणसंमितानि षट्त्रिंशत् लक्षणानि प्रोक्तानि | काव्येषु भावार्थगतानि एतानि भूषणानि तज्ज्ञै: यथारसम् सम्यक् प्रयोज्यानि |

**अर्थ** – १. विभूषण २. अक्षरसंहति ३. शोभा ४. अभिमान ५. गुणकीर्तन ६. प्रोत्साहन ७. उदाहरण ८. निरुक्त ९. गुणानुवाद १०. अतिशय ११. सहेतु १२. सारूप्य १३. मिथ्या-अध्यवसाय १४. सिद्धि १५. पदोच्चय १६. आक्रंद १७. मनोरथ १८. आख्यान १९. याच्ञा २०. प्रतिषेध २१. पृच्छा २२. दृष्टांत २३. निर्भासन २४. संशय २५. आशी २६. प्रियोक्ति २७. कपट २८. क्षमा २९. प्राप्ति ३०. पश्चात्ताप ३१. अर्थानुवृत्ति ३२. उपपत्ति ३३. सूक्ति ३४. कार्य ३५. अनुनीति ३६. परिदेवन ही छत्तीस लक्षणे आभूषणांप्रमाणे शोभून दिसतात. काव्यामध्ये भाव आणि अर्थ यांसाठी वरील आभूषणांचा वापर विद्वानांनी रसांप्रमाणे करावा.

(याठिकाणी भाव विभाव अनुभाव व्यभिचारी भाव यांचे जे अर्थ ते स्थायी भावाला रसामध्ये परिणत करीत असतात. म्हणूनच त्याचा सम्यक् प्रयोग विद्वानांनी करावा.)

(याठिकाणी विशेष गोष्ट नमूद करावीशी वाटते. ती म्हणजे सर्वसाधारणपणे भरतमुनींनी लक्षणे सांगण्यासाठी अनुष्टुभ् छंदाचा वापर केलेला दिसतो. परंतु या अध्यायातील एक ते चार श्लोकांमध्ये काव्यलक्षणे सांगण्यासाठी पहिल्या तीन श्लोकांमध्ये त्रिष्टुभ् परिवारातील 'उपजाति' आणि शेवटच्या श्लोकामध्ये त्याच परिवारातील 'इन्द्रवज्रा' वृत्ताचा प्रयोग केल्याचे आढळते.)

### ❖ विभूषण ❖

**अथ भूषणम्-**
**अलङ्कारैर्गुणैश्चैव बहुभि: समलङ्कृतम् |**
**भूषणैरिव विन्यस्तैस्तद् भूषणमिति स्मृतम् ||५||**

**पदच्छेद: –** अलङ्कारै: गुणै: च एव बहुभि: समलङ्कृतम् |
भूषणै: इव विन्यस्तै: तत् भूषणम् इति स्मृतम् ||५||

(भूषणै: कटकादिभि: विभज्य स्थानदेशकालदशापुरुपादिविभागं विचार्य न्यस्तैरिव गुणालङ्कारैर्यदलङ्करणं तद् भूषणं नाम लक्षणं, कविव्यापार:, तदद्वारेण शब्दार्थ व्यापारावपि | - अ. भा.)

**अन्वय:** – भूषणै: विन्यस्तै: इव बहुभि: अलङ्कारै: गुणै: एव च समलङ्कृतम् तत् 'भूषणम्' इति स्मृतम् |

**अर्थ** – ज्याप्रमाणे शरीर कर्णभूषणे कंकण इत्यादी विविध अलंकार परिधान केल्यामुळे शोभून दिसते त्याचप्रमाणे भाषेतील अनेक अलंकारांनी आणि गुणांनी काव्य जर अलंकृत असेल तर त्या काव्याच्या लक्षणास 'भूषण' असे म्हटले आहे.

(ज्याप्रमाणे कंकण, कुंडल इत्यादी अलंकारांना विभाजित करून स्थान, देश, काल अवस्था आणि पुरुष इत्यादी विभागांचा विचार करून ज्या गुण आणि अलंकार याद्वारे काव्य अलंकृत केले जाते त्या लक्षणास 'भूषण' असे म्हणतात. याला अभिनवाने कविव्यापार असे म्हटले आहे. त्याच रीतीने शब्द आणि अर्थ यांना 'व्यापार' असे म्हटले आहे.)

**❖ अक्षर संहति ❖**

**अथ अक्षरसङ्घातम्-**
**यत्राल्पैरक्षरै: श्लिष्टैर्विचित्रमुपवर्ण्यते |**
**तमप्यक्षरसङ्घातं विद्याल्लक्षणसंज्ञितम् || ६ ||**

**पदच्छेद:** – यत्र अल्पै: अक्षरै: श्लिष्टै: विचित्रम् उपवर्ण्यते |
तम् अपि अक्षरसङ्घातम् विद्यात् लक्षणसंज्ञितम् || ६ ||

**अन्वय:** – यत्र श्लिष्टै: अल्पै: अक्षरै: विचित्रम् उपवर्ण्यते तम् लक्षणसंज्ञितम् 'अक्षरसङ्घातम्' इति विद्यात् |

(अक्षरशब्देन यदृच्छाशब्दप्राधान्यम् | तथा हि मानिनीत्यक्षराणि ईर्ष्याविप्रलम्भे, तरुणी इति आभिलापिके, वरतनुरिति संभोगे विभावतां तामेव प्रापयन्ति | - अ. भा.)

**अर्थ** – जेव्हा श्लेषयुक्त अशा मोजक्या अक्षरांद्वारे विविध अर्थांचे विवरण केले जाते, त्या काव्यलक्षणाला 'अक्षरसंघात' असे जाणावे.

(काव्यामध्ये विशिष्ट शब्दांचा प्रयोग यदृच्छेने करणे या लक्षणास 'अक्षरसंहति' असे म्हटले आहे. अक्षर हा शब्द प्रबळ इच्छाशक्ती दर्शवितो. तो प्रवृत्तिनिमित्त मानायला हवा. अक्षरबाहुल्याद्वारे उदाहरणांना समजणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. जसे - 'मानिनी' हा शब्द ईर्ष्या आणि विप्रलम्भ सुचवितो. 'तरुणी' हा शब्द अभिलाषा सूचित करतो आणि 'वरतनु' हा अक्षरसंघात संभोगातील वैभवाचे दर्शन घडवितो.)

**❖ शोभा ❖**

**अथ शोभा -**
**सिद्धैरर्थैः समं कृत्वा ह्यसिद्धोऽर्थः प्रसाध्यते।**
**यत्र श्लक्ष्णा विचित्रार्था सा शोभेत्यभिधीयते॥७॥**

**पदच्छेदः -** सिद्धैः अर्थैः समम् कृत्वा हि असिद्धः अर्थः प्रसाध्यते।
यत्र श्लक्ष्णा विचित्रा अर्था सा शोभा इति अभिधीयते॥७॥

**अन्वयः -** यत्र सिद्धैः अर्थैः समम् कृत्वा असिद्धः हि अर्थः प्रसाध्यते सा श्लक्ष्णा विचित्रार्था 'शोभा' इति अभिधीयते। (अशोभनोऽप्यर्थोऽमुना नयेन शोभेत इति शोभा इयम् उक्ता। - अ. भा.)

**अर्थ -** जेव्हा ज्ञात असलेल्या शब्दाच्या अर्थाशी तुलना करून अज्ञात शब्दांचा अर्थ समजला जातो तेव्हा त्या लक्षणीय आणि सुंदर अर्थास 'शोभा' असे म्हणतात. केवळ इतकेच नव्हे तर सुशोभित नसलेल्या अर्थालादेखील ज्याद्वारे सुंदर केले जाते त्यास 'शोभा' असे म्हणतात.

**❖ अभिमान ❖**

**अथ अभिमानः -**
**धार्यमाणस्तु बहुभिर्वचनैः कार्ययुक्तिभिः।**
**न यः पर्यवतिष्ठते सोऽभिमानस्तु संज्ञितः॥८॥**

**पदच्छेद :–** धार्यमाण : तु बहुभि : वचनै : कार्ययुक्तिभि : |
न य : पर्यवतिष्ठेत स : अभिमान : तु संज्ञित : || ८ ||

**अन्वय : –** बहुभि : वचनै : कार्ययुक्तिभि : तु धार्यमाण : य : (अर्थ:) न पर्यवतिष्ठेत स : तु अभिमान : संज्ञित : |
(एतदेव सादृश्यनाम्नापि अन्यै : उक्तम् | दृष्टश्रुतानुभूतार्थकथनादिसमुद्भवम् | सादृश्यं क्षोभजननं सारूप्यमिति संज्ञितम् || इति || अ . भा .)

**अर्थ –** अनेक वाक्ये आणि परिणामांच्या युक्ति-प्रयुक्तिंद्वारे व्यक्त होणारा जो अर्थ मान्य केला जात नाही त्याला 'अभिमान' असे म्हटले गेले आहे .
(यालाच 'सादृश्य' या नावाने अन्यत्र ओळखले जाते . पूर्वी पाहिलेले, ऐकलेले, अनुभव सांगणे यामुळे जे क्षोभास कारणीभूत होते त्यास 'सादृश्य' असे म्हणावे, ज्याला 'सारूप्य' असेही म्हटले गेले आहे . )

### ❖ गुणकीर्तन ❖

**अथ गुणकीर्तनम्-**
**कीर्त्यमानैर्गुणैर्यत्र विविधार्थसमुद्भवैः |**
**दोषा न परिकथ्यन्ते तज्ज्ञेयं गुणकीर्तनम् || ९ ||**

**पदच्छेद :–** कीर्त्यमानै : गुणै : यत्र विविधार्थसमुद्भवै : |
दोषा : न परिकथ्यन्ते तत् ज्ञेयम् गुणकीर्तनम् || ९ ||

**अन्वय : –** यत्र विविधार्थसमुद्भवै :, कीर्त्यमानै : गुणै : दोषा : न परिकथ्यन्ते तत् गुणकीर्तनम् ज्ञेयम् |

**अर्थ –** जेव्हा वैविध्यपूर्ण अर्थ व्यक्त होतो आणि गुणांचे वर्णन केले जाते . दोष सांगितले जात नाहीत त्यास 'गुणकीर्तन' असे जाणावे .

**लोके गुणातिरिक्तानां बहूनां यत्र नामभि : |**
**एकोऽभिशब्द्यते यस्तु विज्ञेयं गुणकीर्तनम् || १० ||**

**पदच्छेद :** – लोके गुण-अतिरिक्तानाम् बहूनाम् यत्र नामभि : |
एक : अभिशब्द्यते य : तु विज्ञेयम् गुणकीर्तनम् || १० ||

**अन्वय :** – लोके गुण-अतिरिक्तानाम् बहूनाम् राज्ञानाम् नामभि : यत्र य : एक : अभिशब्द्यते (तत्र) तु 'गुणकीर्तनम्' विज्ञेयम् | (अथ गुणकीर्तनम्- कीर्त्यमानैर्गुणैरित्यादि | यथा -
पृथुरसि गुणैर्मूर्त्या रामो नलो भरतो भवान् महति समरा शत्रुघ्नस्त्वं तथा जनक : स्थितो |
इति सुचरितैर्मूर्ति विभ्रच्चिरन्तनभूभृतां कथमसि न मान्धाता देवस्त्रिलोकविजय्यपि ॥
अत्र ये विविधा येऽर्था: पृथुरामप्रभृतयस्तत्समुद्भवैर्गुणै: कीर्त्यमानैस्तद्गतां दोषा न परिकल्पते | तथा हि पृथुरसीत्युक्ते तथा दोषा अपि केचिद्बलाद्भूमिदोहनप्रभृतय: प्रतीयेरन्, नलोऽसीति द्यूतव्यसनितापि | एवमन्यत्र | - अ . भा . )

**अर्थ** – या भूलोकामध्ये अत्यंत गुणी आणि अनेक राजांच्या नावांनी जेव्हा एकाविषयी सांगितले जाते त्यास 'गुणकीर्तन' असे म्हणतात . (जसे - हे राजा, तुम्ही गुणांमध्ये पृथुसमान आहात . शरीरयष्टिने राम, नल अथवा भरतासमान आहात . महायुद्धात शत्रुघ्नासारखे आहात . मर्यादा व धैर्यपालनामध्ये राजा जनकासमान आहात . यामध्ये गुणांचे वर्णन अपेक्षित आहे . त्यांचे दोष ग्राह्य नाहीत . उदा . पृथुचा भूमिदोहनदोष किंवा नलाचा द्यूतासक्तीदोष अपेक्षित नाही . - अ . भा . )

### ❖ प्रोत्साहन ❖

**अथ प्रोत्साहनम्-**
**उत्साहजननै : स्पष्टैरर्थैरौपम्यसंश्रयै : |**
**प्रसिद्धैरुपगूढञ्च ज्ञेयं प्रोत्साहनं बुधै : || ११ ||**

**पदच्छेद :** – उत्साहजननै : स्पष्टै : अर्थै : औपम्यसंश्रयै : |
प्रसिद्धै : उपगूढम् च ज्ञेयम् प्रोत्साहनम् बुधै : || ११ ||

**अन्वय :** – काव्ये यत् उपगूढम् तत् औपम्यसंश्रयै : उत्साहजननै : प्रसिद्धै : स्पष्टै : अर्थै : बुध्यते तत् बुधै : 'प्रोत्साहनम्' इति ज्ञेयम् |

**अर्थ** – काव्यामध्ये जो गूढ अर्थ असतो, तो उपमेचा आधार घेऊन उत्साहजनक, प्रसिद्ध आणि स्पष्ट अर्थाद्वारे व्यक्त केला जातो, त्यास बुद्धिमान लोकांनी 'प्रोत्साहन' असे म्हटले आहे.

**❖ उदाहरण ❖**

**अथ उदाहरणम्-**
**यत्रैकस्यापि शब्दस्य दर्शनात्सुबहून्यपि |**
**यान्ति सिद्धिमनुक्तानि तदुदाहरणं स्मृतम् || १२ ||**

**पदच्छेद :** – यत्र एकस्य अपि शब्दस्य दर्शनात् सुबहूनि अपि |
यान्ति सिद्धिम् अनुक्तानि तत् उदाहरणम् स्मृतम् || १२ ||

**अन्वय :** – यत्र एकस्य अपि शब्दस्य दर्शनात् सुबहूनि अनुक्तानि अपि सिद्धिम् यान्ति तत् 'उदाहरणम्' स्मृतम् |

**अर्थ** – जिथे एकाच शब्दाच्या प्रयोगाने (दर्शनाने किंवा ज्ञानाने) इतर न सांगितलेल्या अनेक गोष्टी व्यक्त होतात त्यास 'उदाहरण' असे म्हटले गेले आहे.

**❖ निरुक्त ❖**

**अथ निरुक्तम्-**
**निरुक्तं द्विविधं प्रोक्तं तथ्यं चाऽतथ्यमेव वा |**
**सिद्धिप्रसाधितं तथ्यमतथ्यं चाप्रसाधितम् || १३ ||**

**पदच्छेद :** – निरुक्तम् द्विविधम् प्रोक्तम् तथ्यम् च अतथ्यम् एव वा |
सिद्धिप्रसाधितम् तथ्यम् अतथ्यम् च अप्रसाधितम् || १३ ||

**अन्वय :** – निरुक्तम् द्विविधम् प्रोक्तम् तथ्यम् च अतथ्यम् एव वा | सिद्धिप्रसाधितम् तथ्यम् अतथ्यम् च अप्रसाधितम् | (अन्यत्र पाठ : - निरवद्यस्य वाक्यस्य पूर्वोक्तार्थप्रसिद्धये | यदुच्यते तु वचनम् निरुक्तम् तदुदाहृतम् ||- अ . भा . )

**अर्थ** – निरुक्त दोन प्रकारचे सांगितले आहेत. तथ्य आणि अतथ्य. रूपसिद्धिंद्वारे शब्दांची व्युत्पत्ती सांगितली जाते ते 'तथ्य' निरुक्त होय आणि रूपसिद्धिंद्वारे शब्दांची व्युत्पत्ती सांगितली जात नाही ते 'अतथ्य' निरुक्त होय.

(अन्य ठिकाणी असा पाठ आढळतो. जिथे आधी सांगितलेल्या शब्दाच्या अर्थ प्राप्तीसाठी निर्दोष वाक्य सांगितले जाते त्या वाक्यास निरुक्त असे म्हणतात. - अ. भा.)

### ❖ गुणानुवाद आणि अतिशय ❖

**अथ गुणानुवाद: अतिशय: च -**
**गुणानुवादो हीनानामुत्तमैरुपमाकृत: |**
**उत्तमार्थविशेषो य: स चाप्यतिशय: स्मृत: || १४ ||**

**पदच्छेद:** – गुणानुवाद: हीनानाम् उत्तमै: उपमाकृत: |
उत्तमार्थविशेष: य: स: च अपि अतिशय: स्मृत: || १४ ||

**अन्वय:** – हीनानाम् उत्तमै: उपमाकृत: 'गुणानुवाद:' (भवति) |। अपि च, य: उत्तमार्थविशेष: स: 'अतिशय:' (इति) स्मृत: | (उत्तमार्थाद्विशिष्ट इति उक्तादप्यर्थाद्विशेष: | अ. भा.)

**अर्थ** – जेव्हा कुठल्यातरी अधम वस्तूची किंवा व्यक्तीची एखाद्या उत्तम वस्तु वा व्यक्तिबरोबर तुलना केली जाते तर त्याला 'गुणानुवाद' असे म्हणतात.

जेव्हा सांगितलेल्या अर्थातून एखादा विशिष्ट अर्थ व्यक्त होत असेल तर त्यास 'अतिशय' असे म्हणतात.

### ❖ हेतु ❖

**अथ हेतु: -**
**बहूनां भाषमाणानामेकस्यार्थविनिर्णयात् |**
**सिद्धोपमानवचनं हेतुरित्यभिसंज्ञित: || १५ ||**

**पदच्छेद :–** बहूनाम् भाषमाणानाम् एकस्य अर्थविनिर्णयात् |
सिद्ध-उपमान-वचनम् हेतु : इति अभिसंज्ञित : || १५ ||

**अन्वय : –** 'बहूनाम् भाषमाणानाम्' एकस्य अर्थविनिर्णयात् सिद्ध-उपमान-वचनम् 'हेतु :' इति अभिसंज्ञित : |

**अर्थ –** जेव्हा 'काही लोकांच्या मते' 'अनेकांच्या मतानुसार' अशा शब्दांद्वारे विशिष्ट अर्थ व्यक्त होत असताना 'मन्येऽहम्' 'इति मे मति :' 'माझ्या मते' असे म्हणून स्वत :चा एक विशिष्ट अर्थ माहित असलेल्या उपमांद्वारे स्पष्ट केला जातो तेव्हा त्यास 'हेतु' म्हणून ओळखावे .

**❖ सारूप्य ❖**

**अथ सारूप्यम्-**
**अपदेशस्तु परोक्षो यस्मादुत्पद्यतेऽनुकरणेन |**
**लक्षणसमानकरणात्सारूप्यं तत्तु निर्देश्यम् || १६ ||**

**पदच्छेद :–** अपदेश : तु परोक्ष : यस्मात् उत्पद्यते अनुकरणेन |
लक्षण-समान-करणात् सारूप्यम् तत् तु निर्देश्यम् || १६ ||

**अन्वय : –** अनुकरणेन यस्मात् परोक्ष : अपदेश : उत्पद्यते, लक्षणसमानकरणात् तत् 'सारूप्यम्' तु निर्देश्यम् |

**अर्थ –** अनुकरण शैलीद्वारे ज्यामुळे दृष्टीच्या पलिकडे असणारा उपदेश अधिक स्पष्ट होतो, त्याला समान लक्षण असल्याने 'सारूप्य' असे म्हणतात .

**❖ मिथ्याध्यवसाय ❖**

**अथ मिथ्याध्यवसाय : -**
**अभूतपूर्वैर्यत्रार्थैस्तत्तुल्यार्थस्य निर्णय : |**
**स मिथ्याध्यवसायस्तु प्रोच्यते काव्यलक्षणम् || १७ ||**

**पदच्छेद :–** अभूतपूर्वै : यत्र अर्थै : तत्-तुल्यार्थस्य निर्णय : |
स : मिथ्या-अध्यवसाय : तु प्रोच्यते काव्यलक्षणम् || १७ ||

**अन्वय : –** यत्र अभूतपूर्वै : अर्थै : तत्तुल्यार्थस्य निर्णय : (भवति) स : तु 'मिथ्या-अध्यवसाय :' (इति) काव्यलक्षणम् प्रोच्यते |

**अर्थ –** जेव्हा अभूतपूर्व अर्थांद्वारे तुल्यवळ अर्थ सांगितला जातो, तेव्हा त्याला 'मिथ्याध्यवसाय' असे काव्याचे लक्षण म्हणतात .

**❖ सिद्धि ❖**

**अथ सिद्धि : -**

**बहूनां तु प्रधानानां मध्ये यन्नाम कीर्त्यते |**
**एकार्थसाधनकृतं सा सिद्धिरिति कीर्त्यते || १८ ||**

**पदच्छेद : –** बहूनाम् तु प्रधानानाम् मध्ये यत् नाम कीर्त्यते |
एक-अर्थ-साधनकृतम् सा सिद्धि : इति कीर्त्यते || १८ ||

**अन्वय : –** बहूनाम् प्रधानानाम् मध्ये यत् एकार्थसाधनकृतम् सा 'सिद्धि :' इति कीर्त्यते |
(भद्रेश्वर : सुरसरित्स भवानहं च त्रैलोक्यसारमिह संप्रति जीवलोके | भद्रेश्वर : सुरवरेषु सरित्सु गङ्गा त्वं पार्थिवेष्वहमतीव सुदु:खितेषु || अत्र भवानहं चेत्यप्रसिद्धमध्ये उपात्तमसाधारण्यसिद्धिं विधत्ते || - अ . भा . )

**अर्थ –** जेव्हा अनेक प्रचलित शब्दार्थांमध्ये एका अप्रचलित किंवा सामान्य शब्दाद्वारे शब्दाच्या अर्थसिद्धिचा हेतू स्पष्ट होतो, तेव्हा त्यास सिद्धि असे म्हणतात .
(उदाहरणार्थ – हे राजन् भद्रेश्वर, सुरनदी, तुम्ही आणि मी या जीवलोकामध्ये त्रिलोकाचे साररूपी आहोत . देवतांमध्ये शिव, नद्यांमध्ये गंगा, राजांमध्ये तुम्ही आणि दु:खी लोकांमध्ये मी आहे . याठिकाणी शिव आणि गंगा हे प्रचलित आहेत आणि त्यांच्याद्वारे अप्रचलित अशा तुम्ही आणि मी चे असाधारणत्व स्पष्ट होते . यालाच सिद्धी असे म्हणतात . - अ . भा . )

**❖ पदोच्चय ❖**

**अथ पदोच्चयम्-**
**गुणैर्बहुभिरेकार्थैः पदैर्यः सम्प्रशस्यते ।**
**पदोच्चयं तु तं विद्यान्नानार्थग्रथनात्मकम् ॥ १९ ॥**

**पदच्छेदः-** गुणैः बहुभिः एकार्थैः पदैः यः सम्प्रशस्यते ।
पदोच्चयम् तु तम् विद्यात् नानार्थ-ग्रथनात्मकम् ॥ १९ ॥

**अन्वयः -** एकार्थैः बहुभिः गुणैः पदैः यः सम्प्रशस्यते तम् नानार्थ-ग्रथनात्मकम् 'पदोच्चयम्' इति विद्यात् । (पदानाम् उच्चयः उत्कर्षणं चयः बाहुल्यं यत्रेति पदोच्चयः । - अ. भा.)

**अर्थ -** एकाच अर्थाला व्यक्त करणाऱ्या परंतु अनेक गुणांना प्रकट करणाऱ्या शब्दांनी ज्याची प्रशंसा केली जाते त्या विविध अर्थाला एकत्र आणणाऱ्या लक्षणास 'पदोच्चय' असे समजावे.

(जिथे उत्कृष्ट शब्दांचे बाहुल्य असते त्यास पदोच्चय असे म्हणतात. - अ. भा.)

❖ आक्रंद ❖

**अथ आक्रन्दः-**
**आत्मभावमुपन्यस्य परसादृश्ययुक्तिभिः ।**
**तीव्रार्थभाषणं यत्स्यादाक्रन्दः स तु कीर्तितः ॥ २० ॥**

**पदच्छेदः-** आत्मभावम् उपन्यस्य पर-सादृश्य-युक्तिभिः ।
तीव्र-अर्थ-भाषणम् यत् स्यात् आक्रन्दः सः तु कीर्तितः ॥ २० ॥

**अन्वयः -** आत्मभावम् पर-सादृश्य-युक्तिभिः उपन्यस्य यत् तीव्रार्थभाषणम् स्यात् सः तु 'आक्रन्दः' इति कीर्तितः ।

**अर्थ -** स्वतःच्या मनोभावांना विविध युक्तींद्वारे इतरांशी तुलना करून जी अत्यंत कठोरपणे स्पष्टोक्ती केली जाते त्यास 'आक्रंद' असे म्हणतात.

### ❖ मनोरथ ❖

**अथ मनोरथ:-**
**हृदयस्थस्य भावस्य सुश्लिष्टार्थप्रदर्शनम्।**
**अन्यापदेशकथनैर्मनोरथ इति स्मृत: ॥ २१ ॥**

**पदच्छेद:-** हृदयस्थस्य भावस्य सुश्लिष्ट-अर्थ-प्रदर्शनम्।
अन्य-अपदेश-कथनै: मनोरथ: इति स्मृत: ॥२१॥

**अन्वय: -** अन्य-अपदेश-कथनै: हृदयस्थस्य भावस्य सुश्लिष्ट-अर्थ-प्रदर्शनम् 'मनोरथ:' इति स्मृत:।

**अर्थ -** दुसऱ्यांची वाक्ये आहेत असे सांगून स्वत:च्या हृदयातील भावांना श्लेषाचा आधार घेऊन अर्थ प्रकट करणे म्हणजे 'मनोरथ' होय.

### ❖ आख्यान ❖

**अथ आख्यानम्-**
**अपृष्टैरथवा पृष्टैर्निर्णय: क्रियते तु य:।**
**आख्यानमिति तज्ज्ञेयं लक्षणं नाटकाश्रयम्॥२२॥**

**पदच्छेद:-** अपृष्टै: अथवा पृष्टै: निर्णय: क्रियते तु य:।
आख्यानम् इति तत् ज्ञेयम् लक्षणम् नाटकाश्रयम्॥२२॥

**अन्वय: -** अपृष्टै: अथवा पृष्टै: य: निर्णय: क्रियते तत् नाटकाश्रयम् लक्षणम् तु 'आख्यानम्' इति ज्ञेयम्।
(पृष्टैरपृष्टैरपि इत्यादौ उक्तिप्रयुक्तौ प्रश्नसदृशैर्वा शक्याशक्यवस्तु-अभिधानैर्यत्र निर्णय:।-अ.भा.)

**अर्थ -** नाटकामध्ये उक्तिप्रयुक्तीद्वारे म्हणजेच प्रश्नोत्तराच्या स्वरूपामध्ये कोणत्याही वाक्याच्या अर्थाविषयी जेव्हा निर्णय घेतला जातो, त्या नाटकाशी संबंधित असलेल्या लक्षणास 'आख्यान' असे म्हणतात.

**❖ याच्आ ❖**

**अथ याच्आ -**
**आदौ यत्क्रोधजननमन्ते हर्षप्रवर्धनम् |**
**यत्र प्रियं पुनर्वाक्यं सा याच्आ परिकीर्तिता || २३ ||**

**पदच्छेद :-** आदौ यत् क्रोध-जननम् अन्ते हर्ष-प्रवर्धनम् |
यत्र प्रियम् पुन : वाक्यम् सा याच्आ परिकीर्तिता || २३ ||

**अन्वय : -** आदौ यत् क्रोध-जननम् अन्ते हर्ष-प्रवर्धनम् पुन: प्रियम् वाक्यम् यत्र (अस्ति) सा 'याच्आ' परिकीर्तिता |

**अर्थ -** आधी राग व्यक्त होतो आणि शेवटी आनंद वाढविणारा असतो याशिवाय गोड वाक्यरचनाही असते, यालाच 'याच्आ' असे म्हणतात .

(पारसनाथ द्विवेदी यांच्या मते, याच्आविषयी अन्य मत - जेथे स्वत:कडून किंवा दूताद्वारे काहीतरी लाभ मिळेल अशी आशा दाखवून कोणत्यातरी विशिष्ट कन्येची मागणी केली जाते, त्याला याच्आ असे म्हणतात . )

**❖ प्रतिषेध ❖**

**अथ प्रतिषेध :-**
**कार्येषु विपरीतेषु यदि कश्चित् प्रवर्तते |**
**निवार्यते च कार्यज्ञै : प्रतिषेध : प्रकीर्तित : || २४ ||**

**पदच्छेद :-** कार्येषु विपरीतेषु यदि कश्चित् प्रवर्तते |
निवार्यते च कार्यज्ञै : प्रतिषेध : प्रकीर्तित : || २४ ||

**अन्वय : -** यदि कश्चित् विपरीतेषु कार्येषु प्रवर्तते कार्यज्ञै: निवार्यते च (तर्हि स:) प्रतिषेध: प्रकीर्तित : |

**अर्थ -** जर कोणी एक व्यक्ती वाईट कार्यामध्ये प्रवृत्त होत असेल आणि कार्यकुशल लोकांकडून ते अधम कार्य करण्यापासून तो थांवविला जात असेल तर त्याला 'प्रतिषेध' असे म्हणतात .

### ❖ पृच्छा ❖

**अथ पृच्छा -**

**यत्राकारोद्भवैर्वाक्यैरात्मानमथवा परम् |**
**पृच्छन्निवाभिधत्तेऽर्थं सा पृच्छेत्यभिसंज्ञिता || २५ ||**

**पदच्छेद : –** यत्र आकार-उद्भवै : वाक्यै : आत्मानम् अथवा परम् |
पृच्छन् इव अभिधत्ते अर्थं सा पृच्छा इति अभिसंज्ञिता || २५ ||

**अन्वय : –** यत्र आकार-उद्भवै : वाक्यै : आत्मानम् अथवा परम् पृच्छन् इव अर्थम् अभिधत्ते सा 'पृच्छा' इति अभिसंज्ञिता | (अत्र आकारेण-अभिप्राय-सूचकेन काकु-आदिना उद्भूतानि द्योतित-शक्तिकानि वाक्यानि इति भाव : | अ . भा .)

**अर्थ –** जिथे संकेतसूचक वाक्यांद्वारे (आकार आणि अभिप्रायसूचक काकु इत्यादींद्वारे उत्पन्न वाक्यांनी) स्वत :ला किंवा दुसऱ्याला विचारत विचारत काहीतरी अर्थ सांगितला जात असेल तर त्याला 'पृच्छा' असे म्हणतात .

### ❖ दृष्टांत ❖

**अथ दृष्टान्त : -**

**विद्वान् पूर्वोपलब्धौ यत्समत्वमुपपादयेत् |**
**निदर्शनकृतस्तज्ज्ञै : स दृष्टान्त इति स्मृत : || २६ ||**

**पदच्छेद : –** विद्वान् पूर्वोपलब्धौ यत् समत्वम् उपपादयेत् |
निदर्शनकृत : तज्ज्ञै : स : दृष्टान्त : इति स्मृत : || २६ ||

**अन्वय : –** विद्वान् तज्ज्ञै : निदर्शनकृत : पूर्वोपलब्धौ यत् समत्वम् उपपादयेत् स : 'दृष्टान्त :' इति स्मृत : |

**अर्थ –** जेव्हा विद्वान लोक विविध उदाहरणांद्वारे उपलब्ध असलेल्या वस्तुशी त्या उदाहरणांचे साम्य दर्शवितात तेव्हा त्याला 'दृष्टांत' असे म्हणतात .

**❖ निर्भासन ❖**

**अथ निर्भासनम्-**
**अनेकयुक्तिमद्वाक्यमनेकार्थप्रसाधकम्।**
**अनेकवाक्यसंयुक्तं तन्निर्भासनमुच्यते ॥ २७॥**

**पदच्छेद :-** अनेक-युक्तिमत् वाक्यम् अनेक-अर्थ-प्रसाधकम्।
अनेक-वाक्य-संयुक्तम् तत् निर्भासनम् उच्यते ॥ २७॥

**अन्वय : -** अनेक-युक्तिमत् अनेक-अर्थ-प्रसाधकम् अनेक-वाक्य-संयुक्तम् वाक्यम् तत् 'निर्भासनम्' उच्यते। (ईप्सितार्थप्रसिद्ध्यर्थं कीर्त्यन्ते यत्र सूरिभिः। प्रयोजनान्यनेकानि सा मालेत्यभिसंज्ञिता ॥ – अ. भा.)

**अर्थ -** एकाच व्यक्तीविषयी अनेक युक्तिपूर्ण, विविध अर्थ प्रकट करणारे तसेच अनेक वाक्यांनी युक्त अशी विशेषणांची मालिका असेल तर त्यास 'निर्भासन' असे म्हणतात. (इच्छित अर्थाच्या प्राप्तीसाठी पूर्वसूरींनी अनेक प्रयोजने सांगितली आहेत त्याला 'माला' असेही म्हणतात.)

**❖ संशय ❖**

**अथ संशयः-**
**अपरिज्ञाततत्त्वार्थं यत्र वाक्यं समाप्यते ।**
**सोऽनेकत्वाद्विचाराणां संशयः परिकीर्तितः ॥ २८॥**

**पदच्छेद :-** अपरिज्ञात-तत्त्वार्थम् यत्र वाक्यम् समाप्यते।
सः अनेकत्वात् विचाराणाम् संशयः परिकीर्तितः ॥ २८॥

**अन्वय : -** यत्र विचाराणाम् अनेकत्वात् अपरिज्ञात-तत्त्वार्थम् वाक्यम् समाप्यते सः 'संशयः' परिकीर्तितः।

(अथाशी: - यथाशास्त्रार्थसम्पन्नामित्यादिना | यथा - पादावग्रथितया मुहु: स्तनभरेणानीतया नम्रताम् | शम्भो सस्पृहलोचनत्रयपथं यान्त्या तदाराधने | ह्रीमत्या शिरसीहित: सपुलकस्वेदोदगमोत्कम्पया- विश्लिष्यन्कुसुमाञ्जलिगिरिजया क्षिप्तोऽन्तरे पातु व: || सर्व वचनं न चाशी:, अलङ्कार: ? लक्षणं स्तुत्या एव वर्णनीयत्वात् || - अ.भा.)

**अर्थ** - जेव्हा अनेक विचारांमुळे तत्त्वार्थ कळत नाही आणि वाक्य संपते, तेव्हा त्याला 'संशय' असे म्हणतात.

(पाठभेदानुसार त्याची दुसरी व्याख्यापण आहे. दुसऱ्या पुरुषाची केलेली प्रसंशा ऐकून ज्याच्या मनात ईर्ष्या उत्पन्न होते आणि पहिल्या आणि दुसऱ्या वाक्यामध्ये विरोधाभास असेल तर त्यास 'संशय' असे म्हणतात.- अ.भा.)

**❖ आशीर्वाद ❖**

**अथ आशी:-**
**यत्र शास्त्रार्थसम्पन्नां मनोरथसमुद्भवाम् |**
**अप्रार्थनीयमन्यां वा विदुस्तामाशिषं बुधा: || २९ ||**

**पदच्छेद:** - यथा शास्त्रार्थ-सम्पन्नाम् मनोरथ-समुद्भवाम् |
अप्रार्थनीयम् अन्यत् वा विदु: ताम् आशिषम् बुधा: || २९ ||

**अन्वय:** - यत्र शास्त्रार्थसम्पन्नाम् मनोरथसमुद्भवाम् अन्याम् वा अप्रार्थनीयाम् ताम् बुधा: आशिषम् विदु:|

**अर्थ** - शास्त्रार्थाने परिपूर्ण असणारे, कुठल्याही प्रकारच्या मनोरथामुळे किंवा अन्य कारणामुळे उत्पन्न होणारे, तसेच जे मागितले जात नाही त्याला विद्वान लोक 'आशीर्वाद' असे म्हणतात.

(काहींच्या मते, हा अलंकार लक्षण नाही. कारण येथे स्तुतीचेच वर्णन आहे. म्हणून आशीच्या स्थानावर 'निदर्शन' असा पाठभेद आढळतो. जेथे अतिअपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रसिद्ध आचार्यांची प्रशंसा केली जाते, त्याला 'निदर्शन' असे म्हणतात.)

**❖ प्रियवचन ❖**

**अथ प्रियवचनम् -**
**आदौ यत्क्रोधजननमन्ते हर्षप्रवर्धनम् |**
**तत्प्रियं वचनं ज्ञेयमाशीर्वादसमन्वितम् || ३० ||**

**पदच्छेद :-** आदौ यत् क्रोध-जननम् अन्ते हर्ष-प्रवर्धनम् |
तत् प्रियम् वचनम् ज्ञेयम् आशीर्वाद-समन्वितम् || ३० ||

**अन्वय : -** यत् (वाक्यम्) आदौ क्रोधजननम् अन्ते हर्षप्रवर्धनम् (तथा च) आशीर्वादसमन्वितम् (अस्ति) तत् प्रियं वचनं ज्ञेयम् |

**अर्थ -** ज्या वाक्यामध्ये आधी राग प्रकट होतो आणि शेवटी आनंद वाढतो तसेच जे वाक्य आशीर्वादयुक्त असते त्यास 'प्रियवचन' किंवा 'प्रियोक्ती' असे म्हणतात .

**❖ कपटसंघात ❖**

**अथ कपटसङ्घात :-**
**छलयुक्त्या त्वन्येषामभिसन्धानाभिभावकं कपटम् |**
**द्वित्रिप्रयोगयुक्तौ विज्ञेय: कपटसङ्घात: || ३१ ||**

**पदच्छेद :-** छलयुक्त्या तु अन्येषाम् अभिसन्धान-अभिभावकम् कपटम् |
द्वित्रिप्रयोगयुक्तौ विज्ञेय : कपटसङ्घात : || ३१ ||

**अन्वय : -** छलयुक्त्या तु अन्येषाम् अभिसन्धान-अभिभावकम् कपटम् द्वि-त्रि-प्रयोग-युक्तौ चेत् स: 'कपटसङ्घात:' विज्ञेय: |

**अर्थ -** छलयुक्त कृतीद्वारे इतरांना फसविणे किंवा तिरस्कार करणे असा जो भाव असतो त्यास 'कपट' असे म्हणतात आणि त्याचा दोन तीन वेळा प्रयोग केल्यास त्याला 'कपटसंघात' असे म्हणतात .

(अभिनवगुप्ताने कपटाचे तीन प्रकार सांगितले आहेत . वस्तुक्रमोद्भूत, दैवाद्भूत आणि शत्रुकृत .

कथावस्तुनुसार उत्पन्न होणारे कपटाचे उदाहरण - मालतीमाधवामध्ये मकरंद मालतीचा वेष धारण करतो. दैवोद्भूत कपटाचे उदाहरण - नागानंद नाटकामध्ये जीमूतवाहन शंखाचूडाचा छल करतो. शत्रुकृत कपटाचे उदाहरण - छलितराम नाटकामध्ये लवणासुर राक्षस मंथरा आणि कैकेयीचा वेष धारण करतो.)

(दुर्जनोदाहृतैरिति दुर्जनोक्तैर्वचनैः क्रोधजननैः सभायां ताडितोऽपि यः पुरुषोऽक्रोधनः स एव क्षमावान् | तद्वर्णनोचितः कविव्यापारः क्षमेत्यर्थः | अनेन च यथोचिताभिन्नवृत्तिसंचयः सर्वो विभावाद्युचितो निर्वर्त्यमानः काव्यलक्षणत्वेन सूचितः | — अ.भा.)

भोजराजाच्या मतानुसार, जेव्हा दिव्य किंवा अदिव्य रूप धारण करून किंवा वेषपरिवर्तन करून एखाद्या विद्वान नसलेल्या व्यक्तीला फसविले जाते तेव्हा त्यास कपट असे म्हणतात.

**❖ क्षमा ❖**

**अथ क्षमा -**

**दुर्जनोदाहृतै रुक्षैः सभामध्येऽभिताडितः |**
**अक्रोधः क्रोधजननैर्वाक्यैर्यः सा क्षमा भवेत् || ३२ ||**

**पदच्छेदः -** दुर्जन-उदाहृतैः रुक्षैः सभामध्ये अभिताडितः |
अक्रोधः क्रोधजननैः वाक्यैः यः सा क्षमा भवेत् || ३२ ||

**अन्वयः -** सभामध्ये दुर्जन-उदाहृतैः रूक्षैः क्रोधजननैः वाक्यैः अभिताडितः अपि यः अक्रोधः (अस्ति) सा 'क्षमा' भवेत् |

**अर्थ -** सभेमध्ये दुर्जनांद्वारे म्हटल्या गेलेल्या रुक्ष आणि क्रोधजनक वाक्यांद्वारे अपमानित होऊनही क्रोधित न होणे, याला 'क्षमा' असे म्हणतात.

**❖ प्राप्ति ❖**

**अथ प्राप्ति:-**

**दृष्ट्वैवावयवं किञ्चिद्भावो यत्रानुमीयते |**

**प्राप्तिं तामभिजानीयाल्लक्षणं नाटकाश्रयम् || ३३ ||**

**पदच्छेद: -** दृष्ट्वा एव अवयवम् किञ्चित् भाव: यत्र अनुमीयते |
प्राप्तिम् ताम् अभिजानीयात् लक्षणम् नाटकाश्रयम् || ३३ ||

**अन्वय: -** यत्र किञ्चित् अवयवम् एव दृष्ट्वा भाव: अनुमीयते ताम् नाटकाश्रयम् लक्षणम् 'प्राप्तिम्' इति अभिजानीयात् | (अवयवमिति नपुंसकेऽपि भवति)

**अर्थ -** जेव्हा एखादा अवयव पाहून विशिष्ट भावाचे अनुमान करता येते त्या लक्षणास नाटकामध्ये 'प्राप्ति' असे म्हणतात.

**❖ पश्चात्ताप ❖**

**अथ पश्चात्ताप:-**

**अकार्यं सहसा कृत्वाऽकृत्वा कार्यमथापि वा |**

**सन्तापो मनसो यस्तु पश्चात्ताप: प्रकीर्तित: || ३४ ||**

**पदच्छेद: -** अकार्यम् सहसा कृत्वा अकृत्वा कार्यम् अथ अपि वा |
सन्ताप: मनस: य: तु पश्चात्ताप: प्रकीर्तित: || ३४ ||

**अन्वय: -** सहसा अकार्यम् कृत्वा अपि वा कार्यम् अकृत्वा य: मनस: सन्ताप: (स:) तु 'पश्चात्ताप:' प्रकीर्तित: |

**अर्थ -** घाईघाईने करण्यास अयोग्य असे एखादे कार्य केले किंवा करण्यास योग्य असे कार्य केले नाही तर मनात जो संताप होतो त्याला 'पश्चात्ताप' असे म्हणतात.

### ❖ अनुवृत्ति ❖

**अथ अनुवृत्तिः-**
**प्रश्रयेणार्थसंयुक्तं यत्परस्यानुवर्तनम् |**
**स्नेहाद्दाक्षिण्ययोगाद्वा सानुवृत्तिस्तु संज्ञिता || ३५ ||**

**पदच्छेद:-** प्रश्रयेण अर्थसंयुक्तम् यत् परस्य अनुवर्तनम् |
स्नेहात् दाक्षिण्ययोगात् वा सा अनुवृत्तिः तु संज्ञिता || ३५ ||

**अन्वय: -** प्रश्रयेण स्नेहात् दाक्षिण्ययोगात् वा यत् परस्य अर्थसंयुक्तम् अनुवर्तनम् सा 'अनुवृत्तिः' इति संज्ञिता | (उभयोः प्रीतिजननो विरुद्धाभिनिवेशयोः | अर्थ प्रसादजनको ज्ञेयस्त्वनुनयो बुधैः ||—अ.भा.)

**अर्थ -** जेव्हा पणय, स्नेह किंवा दाक्षिण्यभावाने दुसऱ्याचे सार्थ अनुकरण केले जाते, त्याला 'अनुवृत्ति' असे म्हटले आहे.

(दुसऱ्या काही विद्वानांनी 'अनुवृत्ति'च्या ऐवजी 'अनुनय' सांगितले आहे. त्याची व्याख्या पुढीलप्रमाणे - परस्पर विरुद्ध स्वभाव असलेल्या दोन व्यक्तींच्या प्रेमाला उत्पन्न करणारे आहे आणि त्यांना साजेसा अर्थ प्राप्त करवून देणारे आहे, त्याला विद्वानांनी 'अनुनय' असे म्हटले आहे.- अ.भा.)

### ❖ उपपत्ति ❖

**अथ उपपत्तिः-**
**प्राप्तानां यत्र दोषाणां क्रियते शमनं पुनः |**
**सा ज्ञेया ह्युपपत्तिस्तु लक्षणं नाटकाश्रयम् || ३६ ||**

**पदच्छेद:-** प्राप्तानाम् यत्र दोषाणाम् क्रियते शमनम् पुनः |
सा ज्ञेया हि उपपत्तिः तु लक्षणम् नाटकाश्रयम् || ३६ ||

**अन्वय: -** (अत्र) नाटकाश्रयम् (उपपत्ति) लक्षणम् (कथ्यते) | यत्र प्राप्तानाम् दोषाणाम् पुनः शमनम् क्रियते सा 'उपपत्तिः' (इति) ज्ञेया | (अन्ये त्वधीयते — परिगृह्य तु शास्त्रार्थं यद्वाक्यमभिधीयते | विद्वन्मनोहरं स्वन्तमुपदिष्टं तदुच्यते || - अ.भा.)

**अर्थ** – आता नाटकातील उपपत्तिचे लक्षण सांगण्यात येत आहे. जेथे झालेल्या दोषांना शांत केले जाते त्याला 'उपपत्ति' असे म्हणतात.
(अन्य मताप्रमाणे, जिथे शास्त्राचा अर्थ ग्रहण करून शेवटी विद्वानांना आकर्षित करणारे जे सुखद वाक्य असते त्यास 'उपदिष्ट' म्हणावे. – अ. भा.)

**❖ युक्ति ❖**

**अथ युक्ति:-**
**साध्यते योऽर्थसम्बन्धो महद्‌भि: समवायत:।**
**परस्परानुकूल्येन सा युक्ति: परिकीर्तिता ॥ ३७ ॥**

**पदच्छेद: –** साध्यते य: अर्थसम्बन्ध: महद्‌भि: समवायत:।
परस्परानुकूल्येन सा युक्ति: परिकीर्तिता ॥ ३७ ॥

**अन्वय: –** महद्‌भि: परस्परानुकूल्येन समवायत: य: अर्थसम्बन्ध: साध्यते सा 'युक्ति:' परिकीर्तिता। (एकीय: पाठ: – अभूतपूर्वो ह्यर्थो य: सादृश्यात्परिकल्पित:। लोकस्य हृदयग्राही सोऽभिप्राय इतीरित: ॥ – अ. भा.)

**अर्थ** – जेव्हा महान लोक एकमेकांच्या अनुकूलतेनुसार समवायसंबंधाने अर्थाचा जो संबंध लावतात, त्यास 'युक्ति' असे म्हणावे.
(पाठभेदानुसार 'युक्ति'च्या ऐवजी 'अभिप्राय' असा भेद आढळतो. जो अभूतपूर्व अर्थ सादृश्यामुळे कल्पित असतो आणि तसेच लोकांच्या हृदयाला स्पर्श करणारा असतो, त्याला 'अभिप्राय' म्हणावे. – अ. भा.)

**❖ कार्य ❖**

**अथ कार्यम्-**
**यत्रापसारयन् दोषं गुणमर्थेन योजयेत्।**
**गुणाभिवादं दोषान् वा कार्य तल्लक्षणं विदु: ॥ ३८ ॥**

**पदच्छेद :-** यत्र अपसारयन् दोषम् गुणम् अर्थेन योजयेत् |
गुणाभिवादम् दोषान् वा कार्यम् तत् लक्षणम् विदु : || ३८ ||

**अन्वय : -** यत्र दोषम् अपसारयन् अर्थेन गुणम् योजयेत् वा गुणाभिवादम् दोषान् (अर्थेन योजयेत्) तत् कार्यम् | एतदेव तस्य लक्षणम् विदु : | (एतत् कैश्चित् गहनम् इत्युक्तम् | - अ . भा . )

**अर्थ** - जेव्हा एखाद्या वस्तूच्या किंवा व्यक्तिच्या दोषांना दूर करून त्याचे गुण प्रकट केले जातात किंवा गुणांना दूर करून दोष प्रकट केले जातात त्याला 'कार्य' असे म्हणावे . हेच त्याचे लक्षण होय .

(काही विद्वानांनी याला 'गहन'असे म्हटले आहे . - अ . भा . ) अन्यत्र या लक्षणाचे 'गर्हण' असेही नाव आढळते . काही लोक यास अर्थापत्ती असेही म्हणतात .

### ❖ अनुनीति ❖

**अथ अनुनीति :-**
**अपूर्वक्रोधजनितमपराधं प्रमुज्य यत् |**
**सेवार्थं मधुरं वाक्यं सानुनीति : प्रकीर्तिता || ३९ ||**

**पदच्छेद :-** अपूर्वक्रोधजनितम् अपराधम् प्रमुज्य यत् |
सेवार्थम् मधुरम् वाक्यम् सा अनुनीति : प्रकीर्तिता || ३९ ||

**अन्वय : -** अपूर्वक्रोधजनितम् अपराधम् प्रमुज्य यत् सेवार्थम् मधुरम् वाक्यम् (कथ्यते) सा 'अनुनीति:' इति प्रकीर्तिता | (अन्ये पठन्ति - वाक्यै: सातिशयैर्युक्तो वाक्यार्थ: सप्रसाधकै : | लोकप्रसिद्धैर्बहुभि : प्रसिद्धिरिति कीर्तिता || - अ . भा . )

**अर्थ** - जेथे अतिशय क्रोधामुळे उत्पन्न झालेल्या अपराधाचे परिमार्जन करून सेवेसाठी जे गोड वाक्य सांगितले जाते त्याला 'अनुनीति' असे म्हणतात .

(इतरांच्या मते, अनेक लोकप्रसिद्ध विद्वानांद्वारे अतिरिक्त सांगितलेल्या गोष्टींनी युक्त असा जो वाक्यार्थ त्यास 'प्रसिद्धि' असे म्हणतात .- अ . भा . )

**❖ परिदेवन ❖**

**अथ परिदेवनम् -**
**दोषैर्यदन्यनामोक्तै: प्रसिद्धार्थै: प्रयोजयेत् |**
**अन्यत्रार्थेन सम्बद्धं ज्ञेयं तत् परिदेवनम् || ४० ||**

**पदच्छेद: -** दोषै: यत् अन्यनाम-उक्तै: प्रसिद्धार्थै: प्रयोजयेत् |
अन्यत्र अर्थेन सम्बद्धम् ज्ञेयम् तत् परिदेवनम् || ४० ||

**अन्वय: -** यत् अन्यनामोक्तै: प्रसिद्धार्थै: दोषै: अन्यत्र अर्थेन सम्बद्धम् प्रयोजयेत् तत् 'परिदेवनम्' ज्ञेयम् | (अन्ये पठन्ति - परदोषैर्विचित्रार्थैर्यत्रात्मा परिकीर्त्यते | अनुक्तोऽन्योऽपि वा कश्चित्स तु क्षोभ इतीरित: || - अ. भा. )

**अर्थ -** दुसऱ्यांच्या नामोल्लेखाने सांगितल्या गेलेल्या ज्ञात दोषांशी सार्थपणे एखाद्याचे दोष जोडले गेल्यास त्याला 'परिदेवन' म्हणतात.
(याठिकाणी इतरांच्या मते - जेव्हा विविध अर्थ असलेल्या दुसऱ्यांच्या दोषांमुळे अदृश्य किंवा दुसऱ्याच वस्तुविषयी सांगितले जाते तेव्हा त्याला 'क्षोभ' असे म्हणतात.
यालाच 'अनुक्तसिद्धि' देखील म्हणतात. जेथे काहीही न सांगता केवळ प्रस्ताव मांडूनच फक्त संपूर्ण अर्थ कळतो. - अ. भा. )

**❖ अलंकाराचे निरूपण ❖**

**अर्थालङ्कारनिरूपणम्-**
**उपमा रूपकं चैव दीपकं यमकं तथा |**
**अलङ्कारास्तु विज्ञेयाश्चत्वारो नाटकाश्रया: || ४१ ||**

**पदच्छेद: -** उपमा रूपकम् च एव दीपकम् यमकम् तथा |
अलङ्कारा: तु विज्ञेया: चत्वार: नाटकाश्रया: || ४१ ||

**अन्वय: -** उपमा रूपकम् दीपकम् तथा च यमकम् (एते) चत्वार: अलङ्कारा: नाटकाश्रया: विज्ञेया: |

**अर्थ** – उपमा, रूपक, दीपक आणि यमक असे चार अलंकार नाटकाश्रित आहेत, ते जाणून घ्यावे .




**❖ उपमा अलंकाराचे लक्षण ❖**

**अथ उपमा –**
**यत्किञ्चित्काव्यबन्धेषु सादृश्येनोपमीयते |**
**उपमा नाम सा ज्ञेया गुणाकृतिसमाश्रया || ४२ ||**

**पदच्छेद :** – यत् किञ्चित् काव्यबन्धेषु सादृश्येन उपमीयते |
उपमा नाम सा ज्ञेया गुण-आकृति-समाश्रया || ४२ ||

**अन्वय :** – काव्यबन्धेषु यत् किञ्चित् सादृश्येन उपमीयते सा गुण-आकृति-समाश्रया 'उपमा' नाम ज्ञेया |

**अर्थ** – जेव्हा काव्यप्रबंधामध्ये कुठल्यातरी वस्तूला सादृश्यानुसार उपमा दिली जाते, त्या गुण किंवा आकृतीवर आधारित असलेल्या अलंकारास 'उपमा अलंकार' समजावे .

**एकस्यैकेन सा कार्या ह्यनेकेनाथवा पुन: |**
**अनेकस्य तथैकेन बहूनां बहुभिस्तथा || ४३ ||**

**पदच्छेद :–** एकस्य एकेन सा कार्या हि अनेकेन अथवा पुन: |
अनेकस्य तथा एकेन बहूनाम् बहुभि: तथा || ४३ ||

**अन्वय : –** एकस्य एकेन सह अथवा एकस्य अनेकेन सह तथा अनेकस्य एकेन सह तथा बहूनाम् बहुभि: सह सा उपमा कार्या |

**अर्थ –** एका वस्तूची एकाशी तुलना करावी किंवा एकाची अनेकांबरोबर तुलना करावी तसेच अनेकांची एकाशी तसेच अनेकांची अनेकांशी तुलना करावी .

**तुल्यं ते शशिना वक्त्रमित्येकेऽनेकसंश्रया |**
**शशाङ्कवत्प्रकाशन्ते ज्योर्तीषीति भवेत्तु या || ४४ ||**
**एकस्यानेकविषया सोपमा परिकीर्तिता |**
**श्येनबर्हिणगृध्राणां तुल्यार्थमिति या भवेत् || ४५ ||**
**एकस्य बहुभि: सा स्यादुपमा नाटकाश्रया |**
**बहूनां बहुभिर्ज्ञेया घना इव गजा इति || ४६ ||**

**पदच्छेद :–** तुल्यम् ते शशिना वक्त्रम् इति एके अनेकसंश्रया |
शशाङ्कवत् प्रकाशन्ते ज्योर्तीषि इति भवेत् तु या || ४४ ||
एकस्य अनेकविषया सा उपमा परिकीर्तिता |
श्येनबर्हिणगृध्राणाम् तुल्यार्थम् इति या भवेत् || ४५ ||
एकस्य बहुभि : सा स्यात् उपमा नाटकाश्रया |
बहूनाम् बहुभि : ज्ञेया घना : इव गजा : इति || ४६ ||

**अन्वय : –** ते वक्त्रम् शशिन: तुल्यम् इति एका (उपमा भवेत्) | शशाङ्कवत् ज्योर्तीषि प्रकाशन्ते इति या तु अनेकसंश्रया उपमा भवेत् | श्येनबर्हिणगृध्राणाम् तुल्यार्थम् इति या भवेत् सा एकस्य अनेकविषया उपमा परिकीर्तिता सा एकस्य बहुभि: नाटकाश्रया उपमा स्यात् | घना : इव गजा : इति बहूनां बहुभि : ज्ञेया |

**अर्थ –** 'तुझा चेहरा चंद्रासारखा आहे.' येथे एका बरोबर एकाची उपमा दिली आहे. 'चंद्रासमान नक्षत्रे प्रकाशमय आहेत.' येथे अनेक नक्षत्रांची तुलना एका चंद्राबरोबर केली आहे.

'ससाणा, मोर आणि गिधाडाप्रमाणे असलेले नेत्र' येथे एका डोळ्याची अनेकांबरोबर उपमा आहे .

आणि, 'असंख्य हत्ती अनेक ढगांप्रमाणे दिसत आहेत .' येथे अनेकांची अनेकांशी असणारी समानता प्रस्थापित केली आहे .

**❖ उपमेचे पाच प्रकार ❖**

**प्रशंसा चैव निन्दा च कल्पिता सदृशी तथा |**
**या किञ्चित्सदृशी ज्ञेया सोपमा पञ्चधा बुधैः || ४७ ||**

**पदच्छेद : –** प्रशंसा च एव निन्दा च कल्पिता सदृशी तथा |
या किञ्चित्सदृशी ज्ञेया सा उपमा पञ्चधा बुधैः || ४७ ||

**अन्वय : –** या प्रशंसा निन्दा कल्पिता सदृशी तथा किञ्चित्सदृशी सा उपमा पञ्चधा इति बुधैः ज्ञेया |

**अर्थ –** प्रशंसा, निंदा, कल्पिता, सादृश्य आणि किंचित्सदृशी हे उपमेचे पाच प्रकार आहेत असे बुद्धिमानांनी जाणून घ्यावे .

**❖ प्रशंसोपमा ❖**

**प्रशंसा यथा -**
**दृष्ट्वा तु तां विशालाक्षीं तुतोष मनुजाधिपः |**
**मुनिभिः साधितां कृच्छ्रात् सिद्धिं मूर्तिमतीमिव || ४८ ||**

**पदच्छेद : –** दृष्ट्वा तु ताम् विशालाक्षीम् तुतोष मनुजाधिपः |
मुनिभिः साधिताम् कृच्छ्रात् सिद्धिम् मूर्तिमतीम् इव || ४८ ||

**अन्वय : –** मुनिभिः कृच्छ्रात् साधिताम् सिद्धिम् मूर्तिमतीम् इव ताम् विशालाक्षीम् दृष्ट्वा मनुजाधिपः तु तुतोष | (उपमानस्य प्राशस्त्यात् प्रशंसोपमा एव सर्वत्र | - अ . भा . )

**अर्थ –** मुनींद्वारे अत्यंत कष्टाने प्राप्त झालेल्या मूर्तिमंत सिद्धिप्रमाणे त्या विशाल नेत्र असणाऱ्या पत्नीला पाहून राजाला अत्यंत आनंद झाला .

(उपमानाच्या प्रशंसेमुळे याला प्रशंसोपमा असे म्हणतात . - अ . भा . )

**❖ निंदोपमा ❖**

**निन्दा यथा -**
**सा तं सर्वगुणैर्हीनं सस्वजे कर्कशच्छविम् |**
**वने कण्टकिनं वल्ली दावदग्धमिव द्रुमम् || ४९ ||**

**पदच्छेद : -** सा तम् सर्वगुणै : हीनम् सस्वजे कर्कशच्छविम् |
वने कण्टकिनम् वल्ली दावदग्धम् इव द्रुमम् || ४९ ||

**अन्वय : -** वने कण्टकिनम् दावदग्धम् द्रुमम् वल्ली इव सा सर्वगुणै : हीनम् कर्कशच्छविम् तम् सस्वजे|

**अर्थ -** ज्याप्रमाणे वनामध्ये काटेरी आणि वणव्याने भाजलेल्या वृक्षाला नाजूक वेल आलिंगन देते त्याप्रमाणे एकही गुण नसलेल्या, विकृत देह असलेल्या पुरुषाला त्या नायिकेने आलिंगन दिले .

(उपमानाची निंदा होत असेल तर त्याला 'प्रशंसोपमा' असे म्हणतात . - पारसनाथ द्विवेदी)

**❖ कल्पितोपमा ❖**

**कल्पिता यथा -**
**क्षरन्तो दानसलिलं लीलामन्थरगामिन: |**
**मतङ्गजा विराजन्ते जङ्गमा इव पर्वता : || ५० ||**

**पदच्छेद : -** क्षरन्त : दानसलिलम् लीलामन्थरगामिन : |
मतङ्गजा : विराजन्ते जङ्गमा : इव पर्वता : || ५० ||

**अन्वय : -** दानसलिलं क्षरन्त : लीलामन्थरगामिन : मतङ्गजा :, जङ्गमा : पर्वता : इव, विराजन्ते |
(एवमत्र सदृशेन कल्पित : स : | अ . भा . )

**अर्थ -** गंडस्थलावरून मदस्राव होत असलेले तसेच लीलायुक्त मंदगतीने चालत असलेले मतंगज जणू काही पुढे सरकणाऱ्या पर्वतासमान शोभून दिसत आहेत .

(सादृश्याशी सादृश्याची कल्पना म्हणजे कल्पितोपमा | - अ . भा . पर्वतांची तुलना हत्तींबरोबर केली आहे कारण त्यासमान अन्य उपमान शक्य नाही . )

### ❖ सादृशी उपमा ❖

**सादृशी यथा -**
**यत्त्वयाऽद्य कृतं कर्म परचित्तानुरोधिना |**
**सदृशं तत्तवैव स्यादतिमानुषकर्मण: || ५१ ||**

**पदच्छेद :** - यत् त्वया अद्य कृतम् कर्म परचित्त-अनुरोधिना |
सदृशम् तत् तव एव स्यात् अतिमानुषकर्मण : || ५१ ||

**अन्वय :** - अद्य परचित्त-अनुरोधिना त्वया यत् कर्म कृतम् तत् तव कर्म अतिमानुषकर्मण: एव सदृशम् स्यात् इति | (यत्रोपमेयस्यैव उपमानता सेयं सदृशी | अ . भा . )

**अर्थ** - आज शत्रूचेही मन वळविण्याचे जे कार्य तुम्ही केले आहे ते तुमचे कार्य अतिमानवी व्यक्तीच्या कमा समानच आहे .
(जेव्हा उपमान आणि उपमेय हे तुल्यबळ होते तेव्हा त्यास सादृशी उपमा असे म्हणतात . यामध्ये अतिमानवीकृत्याप्रमाणे शत्रूचे मन वळविण्याचे कठीण काम केले आहे . )

### ❖ किंचित्सदृशी उपमा ❖

**किञ्चित्सदृशी यथा -**
**संपूर्णचन्द्रवदना नीलोत्पलदलेक्षणा |**
**मत्तमातङ्गगमना संप्राप्तेयं सखी मम || ५२ ||**

**पदच्छेद :** - संपूर्ण-चन्द्र-वदना नील-उत्पल-दल-ईक्षणा |
मत्त-मातङ्ग-गमना संप्राप्ता इयम् सखी मम || ५२ ||

**अन्वय :** - संपूर्ण-चन्द्र-वदना नील-उत्पल-दल-ईक्षणा मत्त-मातङ्ग-गमना इयम् मम सखी संप्राप्ता |
(किञ्चित् सदृशमित्थम् उपमानं भवति | अ . भा . )

**अर्थ** - पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे चेहरा असलेली, निळ्या कमळाच्या पाकळ्यांप्रमाणे नेत्र असलेली, उन्मत्त हत्तीणीसमान चाल असणारी ही माझी सखी आली .
(थोडक्यात व्यक्त होणारी उपमेलाच 'किंचित्सदृशी' असे म्हणतात . )

**उपमाया बुधैरेते भेदाः ज्ञेयाः समासतः |**
**शेषा ये लक्षणैर्नोक्तास्ते ग्राह्याः काव्यलोकतः ||५३||**

**पदच्छेदः –** उपमायाः बुधैः एते भेदाः ज्ञेयाः समासतः |
शेषाः ये लक्षणैः न उक्ताः ते ग्राह्याः काव्यलोकतः ||५३||

**अन्वयः –** एते उपमायाः भेदाः बुधैः समासतः ज्ञेयाः | ये शेषाः भेदाः लक्षणैः न उक्ताः ते काव्यलोकतः (काव्यात् लोकात् च – अ. भा.) ग्राह्याः |

**अर्थ –** याप्रमाणे उपमा अलंकाराचे प्रकार विद्वानांनी जाणून घ्यावे. उरलेल्या ज्या प्रकारांची लक्षणे येथे सांगितली नाहीत ते प्रकार अन्य काव्यातून आणि लोकव्यवहारातून जाणून घ्यावेत.

**❖ दीपक अलंकार ❖**

**अथ दीपकम् -**
**नानाधिकरणार्थानां शब्दानां संप्रदीपकम् |**
**एकवाक्येन संयुक्तं तद्दीपकमुच्यते ||५४||**

**पदच्छेदः –** नाना-अधिकरण-अर्थानाम् शब्दानाम् संप्रदीपकम् |
एकवाक्येन संयुक्तम् तत् दीपकम् उच्यते ||५४||

**अन्वयः –** नाना-अधिकरण-अर्थानाम् शब्दानाम् एकवाक्येन संयुक्तम् संप्रदीपकम् तत् दीपकम् उच्यते |

**अर्थ –** वेगवेगळ्या विभक्तींमुळे वेगवेगळे अर्थ असलेले शब्द जर एकाच वाक्यात दर्शविले असतील त्यास 'दीपक अलंकार' असे म्हणतात.

**प्रसृतं मधुरं चापि गुणैः सर्वैरलंकृतम् |**
**काव्ये यन्नाटके विप्रास्तद्दीपकमिति स्मृतम् ||५५|| यथा -**

**पदच्छेदः –** प्रसृतम् मधुरम् च अपि गुणैः सर्वैः अलंकृतम् |
काव्ये यन्नाटके विप्राः तत् दीपकम् इति स्मृतम् ||५५|| यथा -

**अन्वय:** – (हे) विप्रा:, काव्ये नाटके (च) यत् प्रसृतम् मधुरम्, अपि च सर्वै: गुणै: अलंकृतम् तत् दीपकम् इति स्मृतम्। यथा -

**अर्थ** – हे ब्राह्मणांनो, काव्यात आणि नाटकात जे मधुर रूपाने दिसून येईल आणि सर्व गुणांनी व अलंकारांनी शोभून दिसत असेल त्याला 'दीपक अलंकार' असे म्हणतात. उदाहरणार्थ -

**सरांसि हंसै: कुसुमैश्च वृक्षा:**
**मत्तैर्द्विरेफैश्च सरोरुहाणि ।**
**गोष्ठीभिरुद्यानवनानि चैव**
**तस्मिन्न शून्यानि सदा क्रियन्ते ॥५६॥**

**पदच्छेद:** – सरांसि हंसै: कुसुमै: च वृक्षा: मत्तै: द्विरेफै: च सरोरुहाणि।
गोष्ठीभि: उद्यान-वनानि च एव तस्मिन् न शून्यानि सदा क्रियन्ते॥५६॥

**अन्वय:** – सरांसि हंसै:, वृक्षा: कुसुमै:, सरोरुहाणि मत्तै: द्विरेफै:, उद्यान-वनानि गोष्ठीभि: च व्याप्तानि। तस्मिन् पुरे किमपि सदा शून्यानि न क्रियन्ते।

**अर्थ** – तलाव हंसांनी, झाडे फुलांनी, कमळे उन्मत्त भुंग्यांनी आणि बागा, वने ही संमेलनाने कायम व्याप्त असतात. त्या शहरामध्ये निर्जन असे काहीच दिसत नाही.

### ❖ रूपक अलंकार ❖

**अथ रूपकम्-**
**स्वविकल्पेन रचितं तुल्यावयवलक्षणम् ।**
**किञ्चित्सादृश्यसम्पन्नं यद्रूपं रूपकं तु तत्॥५७॥**

**पदच्छेद:** – स्वविकल्पेन रचितम् तुल्य-अवयव-लक्षणम्।
किञ्चित् सादृश्य-सम्पन्नम् यत् रूपम् रूपकम् तु तत्॥५७॥

**अन्वय:** – स्वविकल्पेन रचितम् तुल्य-अवयव-लक्षणम् किञ्चित् सादृश्य-सम्पन्नम् यत् रूपम् तत् तु रूपकम् (अस्ति)।

**अर्थ** – स्वत:च्याच पर्यायी व्यक्तिमत्त्वापासून बनलेले, अवयवांची समान लक्षणे असणारे आणि थोडे फार समान असणारे जे रूप त्याला 'रूपक' म्हणतात.

**नानाद्रव्यानुरागाद्यैर्यदौपम्यगुणाश्रयम् |**
**रूपनिर्वर्णनायुक्तं तद्रूपकमिति स्मृतम् || ५८ ||**

**पदच्छेद:** – नाना-द्रव्य-अनुराग-आद्यै: यत् औपम्य-गुण-आश्रयम् |
रूप-निर्वर्णन-आयुक्तम् तत् रूपकम् इति स्मृतम् || ५८ ||

**अन्वय:** – अन्यत्र, नाना-द्रव्य-अनुराग-आद्यै: औपम्य-गुण-आश्रयम् यत् रूप-निर्वण न-आयुक्तम् तत् 'रूपकम्' इति स्मृतम् | यथा -

**अर्थ** – पाठभेदानुसार, विविध वस्तूंचा जिव्हाळा इत्यादींमुळे उपमा इत्यादी गुणांचा आश्रय घेऊन ज्यामध्ये विशिष्ट रूपाचे वर्णन केले असेल त्याला 'रूपक' म्हणावे. उदाहरणार्थ -

**पद्माननास्ता: कुमुदप्रहासा विकासिनीलोत्पलचारुनेत्रा: |**
**वापीस्त्रियो हंसकुलै: स्वनद्भिर् विरेजुरन्योन्यमिवाह्वयन्त्य: || ५९ ||**

**पदच्छेद:** – पद्म-आनना: ता: कुमुद-प्रहासा: विकासि-नील-उत्पल-चारु-नेत्रा: |
वापी-स्त्रिय: हंस-कुलै: स्वनद्भि: विरेजु: अन्योन्यम् इव आह्वयन्त्य: || ५९ ||

**अन्वय:** – हंसकुलै: स्वनद्भि: इव ता: पद्मानना: कुमुद-प्रहासा: विकासि-नील-उत्पल-चारु-नेत्रा: वापीस्त्रिय: अन्योन्यम् आह्वयन्त्य: विरेजु: |

**अर्थ** – ज्याप्रमाणे हंससमूह स्वत:च्या आवाजाने एकमेकांना बोलावतात त्याप्रमाणे कमळासमान मुख असलेल्या, कळीसमान हास्य असलेल्या, उमललेल्या नीलकमलासमान नेत्र असलेल्या, तलावाजवळील स्त्रिया, एकमेकांना बोलावताना अतिशय सुंदर दिसत आहेत.

(अशा रीतीने अर्थालंकाराविषयी चर्चा केली. त्यानंतर आता शब्दालंकाराचे विवेचन करीत आहोत.)

### ❖ यमक अलंकार ❖

**अथ यमकम्-**
**शब्दाभ्यासस्तु यमकं पादादिषु विकल्पितम् |**
**विशेषदर्शनं चास्य गदतो मे निबोधत ||६०||**

**पदच्छेद :-** शब्दाभ्यास : तु यमकम् पादादिषु विकल्पितम् |
विशेषदर्शनम् च अस्य गदत : मे निबोधत || ६० ||

**अन्वय : -** शब्दाभ्यास : तु यमकम् | पादादिषु विकल्पितम् विशेषदर्शनम् च अस्य लक्षणम् गदत : मे निबोधत | (शब्दशब्देन वाक्यं पदं तदेकदेशवर्णम् इति सर्वं गृह्यते | पादादिषु आदिग्रहणं तथा मध्यान्तरादिषु विकल्पितवचनात् नास्ति स्थापननियम : | विशेषदर्शन मिति विशेषाणाम् उद्देशलक्षणानाम् इत्यर्थ : - अ . भा . )

**अर्थ -** शब्दांची पुनरावृत्ती म्हणजे यमक होय . यमक पादाच्या आरंभी, मध्ये किंवा शेवटी असू शकतो . त्याचे स्थान निश्चित नाही . अशा या यमकाचे विशिष्ट लक्षण सांगणाऱ्या माझे बोलणे नीट समजून घ्या . (याठिकाणी शब्द या शब्दाने वाक्य, पद, पदाचा एक भाग असलेला वर्ण हे सर्व गृहीत धरले जाते . )

### ❖ यमक अलंकाराचे प्रकार ❖

**पादान्तयमकं चैव काञ्चीयमकमेव च |**
**समुद्गयमकं चैव विक्रान्तयमकं तथा || ६१ ||**
**यमकं चक्रवालं च सन्दष्टयमकं तथा |**
**पदादियमकं चैव तथाम्रेडितमेव च ||६२||**
**चतुर्व्यवसितं चैव मालायमकमेव च |**
**एतद्दशविधं ज्ञेयं यमकं नाटकाश्रयम् || ६३ ||**

**पदच्छेद :-** पादान्तयमकम् च एव काञ्चीयमकम् एव च |
समुद्गयमकम् च एव विक्रान्तयमकम् तथा || ६१ ||

यमकम् चक्रवालम् च सन्दष्टयमकम् तथा |
पदादियमकम् च एव तथा आम्रेडितम् एव च || ६२ ||
चतुर्व्यवसितम् च एव मालायमकम् एव च |
एतद् दशविधम् ज्ञेयम् यमकम् नाटकाश्रयम् || ६३ ||

**अन्वय:** – पादान्तयमकम् काञ्चीयमकम् समुद्गयमकम् विक्रान्तयमकम् चक्रवालम् यमकम् सन्दष्टयमकम् पदादियमकम् आम्रेडितम् चतुर्व्यवसितम् मालायमकम् च एतत् दशविधम् नाटकाश्रयम् यमकम् ज्ञेयम् |

**अर्थ** – पादांत यमक, कांची यमक, समुद्र यमक, विक्रांत यमक, चक्रवाल यमक, संदष्ट यमक, पादादि यमक, आम्रेडित यमक, चतुर्व्यवसित यमक आणि माला यमक ही नाटकामधील दहा यमके आहेत .

**❖ पादांत यमक ❖**

**चतुर्णा यत्र पादानामन्ते स्यात्सममक्षरम् |**
**तद्वै पादान्तयमकं विज्ञेयं नामतो यथा || ६४ || यथा -**

**पदच्छेद:** – चतुर्णाम् यत्र पादानाम् अन्ते स्यात् समम् अक्षरम् |
तत् वै पादान्तयमकम् विज्ञेयम् नामत: यथा || ६४ || यथा -

**अन्वय:** – यत्र चतुर्णाम् पादानाम् अन्ते समम् अक्षरम् स्यात् तत् पादान्तयमकम् यथा नामत: विज्ञेयम् | (अक्षरमिति एकमनेकं च संहृतम् | - अ . भा . ) यथा -

**अर्थ** – ज्याच्या चारही पादांच्या शेवटी समान अक्षर किंवा समान पद असेल तर त्याला ‘पादांत यमक’ म्हणावे . (याठिकाणी अक्षर म्हणजे एक आणि अनेक अशा दोन्ही प्रकारे घ्यायचे आहे | - अ . भा . ) उदाहरणार्थ -

**दिनक्षयात्संहृतरश्मिमण्डलं दिवीव लग्नं तपनीयमण्डलम् |**
**विभाति ताम्रं दिवि सूर्यमण्डलं यथा तरुण्या: स्तनभारमण्डलम् || ६५ ||**

**पदच्छेद :** – दिन-क्षयात् संहृत-रश्मि-मण्डलम् दिवि इव लग्नम् तपनीय-मण्डलम् |
विभाति ताम्रम् दिवि सूर्यमण्डलम् यथा तरुण्या : स्तन-भार-मण्डलम् || ६५ ||

**अन्वय :** – दिन-क्षयात् दिवि ताम्रम् संहृत-रश्मि-मण्डलम् सूर्यमण्डलम् दिवि लग्नम् तपनीय-मण्डलम् इव यथा तरुण्या : स्तन-भार-मण्डलम् विभाति |

**अर्थ** – दिवस मावळल्याने आकाशातील सूर्याचे लाल मंडल स्वत :च्या प्रकाशकिरणांना संकुचित करून आकाशात जणू सोन्याच्या गोळ्यासारखे दिसत आहे जसे तरुणीचे स्तनभारमंडल शोभून दिसते . (येथे प्रत्येक पादाच्या शेवटी 'मण्डलम्' शब्द आला आहे . )

**लोकानां प्रभविष्णुर्दैत्येन्द्रगदानिपातनसहिष्णु : |**
**जयति सुरदैत्यजिष्णुर्भगवानसुरवरमथनकारी विष्णु : || ६६ ||**

**पदच्छेद :** – लोकानाम् प्रभविष्णु : , दैत्येन्द्र-गदा-निपातन-सहिष्णु : |
जयति सुर-दैत्य-जिष्णु : , भगवान् असुर-वर-मथनकारी विष्णु : || ६६ ||

**अन्वय :** – लोकानाम् प्रभविष्णु :, दैत्येन्द्र-गदा-निपातन-सहिष्णु :, सुरदैत्यजिष्णु :, असुर-वर-मथनकारी भगवान् विष्णु : जयति |

**अर्थ** – लोकांना प्रभावित करणारे, दैत्यराज (हिरण्यकशिपु आणि हिरण्याक्ष) यांच्या गदांच्या प्रहाराला सहजतेने निष्प्रभ करणारे, देव आणि दैत्यांना जिंकणारे, असुरांचे निर्दालन करणारे भगवान विष्णु विजयी होतात . ('ष्णु' हे प्रत्येक चरणाच्या शेवटी आलेले आहे)

**❖ काञ्ची यमक ❖**

**पादस्यान्ते तथा चादौ स्यातां तत्र समे पदे |**
**तत्काञ्चीयमकं चैव विज्ञेयं सूरिभिर्यथा || ६७ ||**

**पदच्छेद :** – पादस्य अन्ते तथा च आदौ स्याताम् तत्र समे पदे |
तत् काञ्चीयमकम् च एव विज्ञेयम् सूरिभि : यथा || ६७ ||

**अन्वय : –** पादस्य अन्ते तथा च आदौ तत्र समे पदे स्याताम् तत् एव च सूरिभिः काञ्चीयमकम् यथा विज्ञेयम् |

**अर्थ –** चरणाच्या आरंभी आणि शेवटी समान पदे असतील त्याला 'कांची यमक' म्हणतात. उदाहरणार्थ

**यामं यामं चन्द्रवतीनां द्रवतीनां**
**व्यक्ता व्यक्ता सारजनीनां रजनीनाम् |**
**फुल्ले फुल्ले सम्भ्रमरे वाऽभ्रमरे वा**
**रामा रामा विस्मयते च स्मयते च || ६८ ||**

**पदच्छेद : –** यामम् यामम् चन्द्रवतीनाम् द्रवतीनाम् व्यक्ता व्यक्ता सारजनीनाम् रजनीनाम् |
फुल्ले फुल्ले सम्भ्रमरे वा अभ्रमरे वा रामा रामा विस्मयते च स्मयते च || ६८ ||

**अन्वय : –** चन्द्रवतीनाम् रजनीनाम् यामम् यामम् द्रवतीनाम् सारजनीनाम् व्यक्ता व्यक्ता रामा रामा (नायिका) सम्भ्रमरे फुल्ले (पुष्पे) स्मयते वा अभ्रमरे फुल्ले वा विस्मयते च |

**अर्थ –** चांदण्या रात्रीच्या प्रत्येक प्रहरामध्ये विरघळणाऱ्या मदरसाने भरलेल्या तरुणींच्या घोळक्यामध्ये अत्यंत मुक्तपणे वागणारी नायिका भुंगा असलेल्या फुलावर हसते आणि भुंगा नसलेल्या फुलाकडे पाहून आश्चर्यचकित होते.

**❖ समुद्ग यमक ❖**

**अर्धेनैकेन यद्वृत्तं सर्वमेव समाप्यते |**
**समुद्गयमकं नाम तज्ज्ञेयं पण्डितैर्यथा || ६९ ||**

**पदच्छेद : –** अर्धेन एकेन यत् वृत्तम् सर्वम् एव समाप्यते |
समुद्गयमकम् नाम तत् ज्ञेयम् पण्डितैः यथा || ६९ ||

**अन्वय : –** यत् एकेन अर्धेन सर्वम् एव वृत्तम् समाप्यते तत् पण्डितैः समुद्गयमकम् नाम ज्ञेयम् | यथा –

**अर्थ –** जिथे नुसते पूर्वार्धाने संपूर्ण माहिती संपते त्याला विद्वानांनी 'समुद्ग यमक' म्हटले आहे.

**केतकीकुसुमपाण्डुरदन्त: शोभते प्रवरकाननहस्ती |**
**केतकीकुसुमपाण्डुरदन्त: शोभते प्रवरकाननहस्ती || ७०||**

**पदच्छेद: –** केतकी-कुसुम-पाण्डुर-दन्त: शोभते प्रवर-कानन-हस्ती |
केतकी-कुसुम-पाण्डुर-दन्त: शोभते प्रवर-कानन-हस्ती || ७०||

**अन्वय: –** केतकी-कुसुम-पाण्डुर-दन्त: प्रवर-कानन-हस्ती शोभते | केतकी-कुसुम-पाण्डुर-दन्त: प्रवर-कानन- हस्ती (प्रवर: काननस्थित: हस्ती यस्मिन् स: पर्वत:)शोभते |

**अर्थ –** केतकी फुलांसारखे शुभ्र दात असलेला एक श्रेष्ठ जंगली हत्ती शोभून दिसतो . केतकी फुलांसारखे शुभ्र दात असलेला एक श्रेष्ठ जंगली हत्ती ज्यावर राहतो तो पर्वत शोभून दिसतो . (येथे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध सारखाच आहे; परंतु अर्थवैविध्य आहे . )

**❖ विक्रांत यमक ❖**

**एकैकं पादमुत्क्रम्य द्वौ पादौ सदृशौ यदा |**
**विक्रान्तयमकं नाम तद्विज्ञेयमिदं यथा || ७१ ||**

**पदच्छेद: –** एकैकम् पादम् उत्क्रम्य द्वौ पादौ सदृशौ यदा |
विक्रान्तयमकम् नाम तत् विज्ञेयम् इदम् यथा || ७१ ||

**अन्वय: –** यदा एकैकम् पादम् उत्क्रम्य द्वौ पादौ सदृशौ तत् इदम् विक्रान्तयमकम् नाम विज्ञेयम् | यथा

**अर्थ –** जेव्हा एक एक (पहिला आणि तिसरा) चरण सोडून दोन चरण (दुसरा आणि चौथा) समान असेल तर त्यास 'विक्रांतयमक' असे म्हणतात .

**स पूर्व वारणो भूत्वा <u>द्विशृङ्ग इव पर्वत:</u> |**
**अभवद्दन्तवैकल्या<u>द्विशृङ्ग इव पर्वत:</u> || ७२ ||**

**पदच्छेद: –** स: पूर्वम् वारण: भूत्वा द्विशृङ्ग: इव पर्वत: |
अभवत् दन्तवैकल्यात् विशृङ्ग: इव पर्वत: || ७२ ||

**अन्वय: –** पूर्वम् स: वारण: द्विशृङ्ग: पर्वत: इव भूत्वा दन्तवैकल्यात् विशृङ्ग: पर्वत: इव अववत्|

**अर्थ** – पूर्वी हा हत्ती दोन शिखर असलेल्या उंच पर्वतासारखा दिसत होता आता मात्र दात नसल्यामुळे तो हत्ती शिखरविहीन पर्वताप्रमाणे दिसत आहे. (येथे मूळ श्लोकामध्ये पहिला आणि तिसरा चरण सोडला तर दुसरा आणि चौथा चरण समान असल्याप्रमाणे वाटत आहे.)

**❖ चक्रवाल यमक ❖**

**प्रथमा व्याख्या -**

**पूर्वस्यान्तेन पादस्य परस्यादिर्यदा समः |**
**चक्रवच्चक्रवालं तु विज्ञेयं नामतो यथा || ७३ ||**

**पदच्छेद:** – पूर्वस्य अन्तेन पादस्य परस्य आदि: यदा सम: |
चक्रवत् चक्रवालम् तु विज्ञेयम् नामत: यथा || ७३ ||

**अन्वय:** – यदा पूर्वस्य पादस्य अन्तेन परस्य आदि: चक्रवत् सम: (भवेत् तदा तत्) नामत: चक्रवालम् विज्ञेयम् | यथा -

**अर्थ** – जेव्हा पहिल्या चरणाचा शेवटचा शब्द आणि दुसऱ्या चरणाचा आरंभीचा शब्द चक्रासमान सारखा होतो तेव्हा त्यास 'चक्रवालयमक' समजावे. उदाहरणार्थ -

**द्वितीया व्याख्या -**

**तुल्यात्पादद्वयादन्त्यादेकेनादिर्यदा समः |**
**सर्वत्र चक्रवालं तु तद्विज्ञेयं बुधैर्यथा || ७४ ||**

**पदच्छेद:** – तुल्यात् पादद्वयात् अन्त्यात् एकेन आदि: यदा सम: |
सर्वत्र चक्रवालम् तु तत् विज्ञेयम् बुधै: यथा || ७४ ||

**अन्वय:** – यदा सर्वत्र तुल्यात् पादद्वयात् अन्त्यात् एकेन आदि: सम: तत् तु बुधै: चक्रवालम् विज्ञेयम् | यथा -

**अर्थ** – जेव्हा दोन समान चरणाच्या शेवटच्या भागाशी पुढील चरणाच्या सुरुवातीचा भाग समान असेल तर त्यास विद्वानांनी 'चक्रवालयमक' म्हटले आहे. उदाहरणार्थ -

**शैला यथा शत्रुभिराहताहता हताश्च भूयस्त्वनुपुङ्खगै: खगै: |**
**खगैश्च सर्वैर्युधि सञ्चिताश्चिताश्चिताधिरूढा निहितास्तलैस्तलै: || ७५ ||**

**पदच्छेद: –** शैला : यथा शत्रुभि : आहताहता : हता : च भूय : तु अनुपुङ्खगै : खगै : |
खगै : च सर्वै : युधि सञ्चिता : चिता : चिताधिरूढा : निहिता : तलै : तलै : || ७५ ||

**अन्वय: –** यथा अनुपुङ्खगै : खगै : शैला : आहता : हता : च तथा युधि शत्रुभि : एते सञ्चिता : चिता : चिताधिरूढा : शैला : तलै : तलै : निहिता : |

**अर्थ –** ज्याप्रमाणे ससाण्याच्या मागे जाणाया पक्ष्यांनी अनेक पर्वत उदध्वस्त करावेत त्याप्रमाणे शत्रुंनी त्यांच्या सर्व प्रकारच्या बाणांनी युद्धात पर्वतावर राहणाऱ्या सर्वांना एकत्र केले, निवडले आणि चितेवर जळत असलेल्या त्यांना पर्वताच्या पायथ्याशी ढकलून दिले .
('शैला यथा' ह्या श्लोकाच्या पहिल्या पादाचे शेवटचे पद 'हता:' आहे आणि दुसऱ्या पादाच्या सुरुवातीला पण 'हता:' आहे . तिसऱ्या पादाच्या शेवटी 'चिता:' आणि चौथ्या पादाची सुरुवात 'चिता:' ने होत आहे . अशाप्रमाणे ते शेवटचे पद पुन्हा सुरुवातीला येत आहे म्हणून हे 'चक्रवालयमक' आहे . )

**❖ संदष्ट यमक ❖**

**आदौ द्वे यत्र पादे तु भवेतामक्षरे समे |**
**सन्दष्टयमकं नाम विज्ञेयं नामतो यथा || ७६ ||**

**पदच्छेद: –** आदौ द्वे यत्र पादे तु भवेताम् अक्षरे समे |
सन्दष्टयमकम् नाम विज्ञेयम् नामत : यथा || ७६ ||

**अन्वय: –** यत्र पादे आदौ द्वे अक्षरे समे भवेताम् तत् नामत : 'सन्दष्टयमकम्' नाम इति विज्ञेयम् | यथा

**अर्थ –** जेव्हा चरणाच्या सुरुवातीलाच दोन अक्षरांची पुनरावृत्ती असेल तर विद्वानांनी त्यास 'संदष्ट यमक' असे म्हटले आहे . उदाहरणार्थ -

**पश्य पश्य रमणस्य मे गुणान्येन येन वशगां करोति माम् |**
**येन येन हि ममैति दर्शनं तेन तेन वशगां करोति माम् || ७७ ||**

**पदच्छेद :–** पश्य पश्य रमणस्य मे गुणान् येन येन वशगाम् करोति माम् |
येन येन हि मम एति दर्शनम् तेन तेन वशगाम् करोति माम् || ७७ ||

**अन्वय : –** पश्य मे रमणस्य गुणान् पश्य येन येन माम् वशगां करोति | येन येन हि मम दर्शनम् एति तेन तेन माम् वशगाम् करोति |

**अर्थ –** बघा माझ्या प्रियकराची गुणवत्ता बघा, ज्याने मला वश केले आहे . जसे जसे त्याचे गुण मला दिसतात तशी तशी मी त्यांच्या अधिकच प्रभावाखाली जाते . (यात प्रथम चरणामध्ये 'पश्य, पश्य', दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणामध्ये 'येन येन' व चौथ्या चरणामध्ये 'तेन तेन' पदांच्या पुनरावृत्तीमुळे हे 'संदष्ट यमक' आहे . )

**❖ पादादि यमक ❖**

**आदौ पादस्य तु यत्र स्यात्समावेशसमाक्षर: |**
**पादादियमकं नाम तद्विज्ञेयं बुधैर्यथा || ७८ ||**

**पदच्छेद :–** आदौ पादस्य तु यत्र स्यात् समावेशसमाक्षर : |
पादादियमकम् नाम तत् विज्ञेयम् बुधै : यथा || ७८ ||

**अन्वय : –** यत्र आदौ पादस्य तु समावेशसमाक्षर : स्यात् तत् बुधै : 'पादादियमकम्' नाम विज्ञेयम् | यथा –

**अर्थ –** जेव्हा प्रत्येक चरणाच्या सुरुवातीस विशिष्ट शब्दाची पुनरावृत्ती आढळते, त्याला विद्वानांनी 'पादादियमक' असे म्हटले आहे . उदाहरणार्थ –

**<u>विष्णु:</u> सृजति भूतानि <u>विष्णु:</u> संहरते प्रजा: |**
**<u>विष्णु:</u> प्रसूते त्रैलोक्यं <u>विष्णुर्</u>लोकाधिदैवतम् || ७९ ||**

**पदच्छेद :–** विष्णु : सृजति भूतानि विष्णु : संहरते प्रजा : |
विष्णु : प्रसूते त्रैलोक्यम् विष्णु : लोकाधिदैवतम् || ७९ ||

**अन्वय : –** विष्णु : भूतानि सृजति | विष्णु : प्रजा : संहरते | विष्णु : त्रैलोक्यम् प्रसूते | विष्णु : लोकाधिदैवतम् |

**अर्थ** – विष्णू सर्व प्राणिमात्र निर्माण करतात . विष्णू प्रजेचा नाश करतो . विष्णूच त्रैलोक्याला उत्पन्न करतो आणि विष्णूच संपूर्ण लोकांचा अधिपति आहे . (सर्वोच्च देवता आहे) (येथे प्रत्येक चरणाच्या सुरुवातीला 'विष्णू' हा शब्द आला आहे, म्हणून त्याला 'पादादि यमक' असे म्हणतात . )

**❖ आम्रेडित यमक ❖**

**पादस्यान्तं पदं यत्र द्विर्द्विरेकमिहोच्यते |**
**ज्ञेयमाम्रडितं नाम यमकं तत्र सूरिभि: || ८० ||**

**पदच्छेद:** – पादस्य अन्तम् पदम् यत्र द्वि: द्वि: एकम् इह उच्यते |
ज्ञेयम् आम्रडितम् नाम यमकम् तत्र सूरिभि: || ८० ||

**अन्वय:** – यत्र इह पादस्य अन्तम् एकम् पदम् द्वि: द्वि: उच्यते तत्र सूरिभि: आम्रडितम् नाम यमकम् ज्ञेयम् |

**अर्थ** – जेव्हा प्रत्येक चरणाच्या शेवटी एका शब्दाची पुनरावृत्ती झाली असेल तर त्यास 'आम्रेडित यमक' असे म्हणतात .

**विजृम्भितं नि:श्वसितं मुहुर्मुहु: कथं विधेयं स्मरणं पदे पदे |**
**यथा च ते ध्यानमिदं पुन: पुनर्ध्रुवंगता ते रजनी विना विना || ८१ ||**

**पदच्छेद:** – विजृम्भितम् नि:श्वसितम् मुहु: मुहु: कथम् विधेयम् स्मरणम् पदे पदे |
यथा च ते ध्यानम् इदम् पुन: पुन: ध्रुवंगता ते रजनी विना विना || ८१ ||

**अन्वय:** – विजृम्भितम् नि:श्वसितम् मुहु: मुहु: भवति | पदे पदे कथम् स्मरणम् विधेयम्? यथा, इदम् पुन: पुन: ते ध्यानम् तथापि ते रजनी (मया) विना (सत्यम् मया) विना ध्रुवंगता (खलु) |

**अर्थ** – जांभई आणि नि:श्वास वारंवार येत आहे . क्षणोक्षणी तुझी आठवण कशी करायची? आणि बघ ना ! जरी वारंवार तुझी आठवण आली तरी तुझी रात्र मात्र माझ्या विना गेलीच ना !

(प्रत्येक चरणाच्या शेवटी क्रमश: मुहु: मुहु:, पदे पदे, पुन: पुन:, विना विना या शब्दांची पुनरावृत्ती झाली आहे म्हणून हे 'आम्रेडित यमक' आहे.)

### ❖ चतुर्व्यवसित यमक ❖

**सर्वे पादा: समा यत्र भवन्ति नियताक्षरा: |**
**चतुर्व्यवसितं नाम तद्विज्ञेयं बुधैर्यथा || ८२ ||**

**पदच्छेद: –** सर्वे पादा: समा: यत्र भवन्ति नियताक्षरा: |
चतुर्व्यवसितम् नाम तत् विज्ञेयम् बुधै: यथा || ८२ ||

**अन्वय: –** यत्र नियताक्षरा: सर्वे पादा: समा: भवन्ति तत् यमकम् 'चतुर्व्यवसितम्' नाम बुधै: विज्ञेयम् | यथा -

**अर्थ –** विशिष्ट अक्षरे असलेले सर्व चरण समान असतील तर त्यास बुद्धिमानांनी 'चतुर्व्यवसित यमक' समजावे. उदाहरणार्थ -

**वारणानामयमेव कालो वारणानामयमेव काल: |**
**वारणानामयमेव कालो वारणानायमेव काल: || ८३ ||**

**पदच्छेद: –** वारणानाम् अयम् एव काल: वारणानाम् अयम् एव काल: |
वारणानाम् अयम् एव काल: वारणानाम् अयम् एव काल: || ८३ ||

**अन्वय: –** अयम् एव वारणानाम् काल: | अयम् एव वारणानाम् काल: | अयम् एव वारणानाम् काल: | अयम् एव वारणानाम् काल: |

**अर्थ –** वेलाच्या फुलांचा हाच योग्य काळ म्हणजेच शरद ऋतु आहे. वारण म्हणजे हत्तींची मदोन्मत्त व्हायची हीच योग्य वेळ आहे. शत्रूंच्या अडथळ्याचे निवारण करणारा असा हा काळ आहे. युद्धातील वेळेचा अपव्यय म्हणून हा चिंतेचा विषय आहे. (या श्लोकातील चार ही चरण समान आहेत; परंतु अर्थवैविध्य आहे.)

**❖ माला यमक ❖**

**नानारूपै: स्वरैर्यत्र यत्रैकं व्यञ्जनं भवेत् |**
**तन्मालायमकं नाम विज्ञेयं पण्डितैर्यथा || ८४ ||**

**पदच्छेद :** – नानारूपै : स्वरै : यत्र यत्र एकम् व्यञ्जनम् भवेत् |
तत् मालायमकम् नाम विज्ञेयम् पण्डितै : यथा || ८४ ||

**अन्वय :** – यत्र नानारूपै : स्वरै : यत्र एकम् व्यञ्जनम् भवेत् तत् मालायमकम् नाम यमकम् पण्डितै : विज्ञेयम् | यथा -

**अर्थ** – जेव्हा विविध स्वर आणि एक व्यंजन निरंतर येत असेल तर विद्वानांनी त्याला 'माला यमक' असे म्हटले आहे . उदाहरणार्थ -

**लली बली हली माली खेली माली सली जली |**
**खलो बलोऽबलो माली मुसली त्वभिरक्षतु || ८५ ||**

**पदच्छेद :** – लली बली हली माली खेली माली सली जली |
खल : बल : अबल : माली मुसली तु अभिरक्षतु || ८५ ||

**अन्वय :** – लली बली हली माली खेली माली सली जली बल : अबल : वा खल : माली मुसली तु अभिरक्षतु |

**अर्थ** – अतिशय लाडावलेला, बलवान, नांगर घेतलेला, विष्णूचा अवतार असणारा, खेळकर स्वभाव असणारा, शेतात राबणारा, शुनकप्रिय असणारा, यमुनेच्या पाण्यात विहार करणारा, बलवान् अथवा निर्बल लोकांचा शत्रू असणारा, माळ धारण केलेला, गदा हाती असलेला असा हा बलराम सर्वांचे रक्षण करो .

**असौ हि रामा रतिविग्रहप्रिया रह:प्रगल्भा रमणं मनोगतम् |**
**रतेन रात्रिं रमयेत्परेण वा न चेदुदेष्यत्यरुण: पुरोरिपु: || ८६ ||**

**पदच्छेद :** – असौ हि रामा रतिविग्रहप्रिया रह : प्रगल्भा रमणम् मनोगतम् |
रतेन रात्रिम् रमयेत् परेण वा न चेत् उदेष्यति अरुण : पुरा : रिपु : || ८६ ||

**अन्वय : –** असौ हि रामा रतिविग्रहप्रिया | प्रगल्भा रात्रिं रह : मनोगतम् रमणम् परेण रतेन रमयेत् चेत् वा रिपु : अरुण : पुर : न उदेष्यति |

**अर्थ –** या स्त्रीस शारीरिकसंबंधामध्ये आवड आहे . ही प्रगल्भ स्त्री एकांतात रात्रीच्या वेळी स्वत:च्या प्रियकराला तोपर्यंत उत्तमरीत्या रतिक्रियेचा आनंद देते, जोपर्यंत शत्रुरूपी सूर्याचा उदय होत नाही . (याठिकाणी 'र' या अक्षराची पुनरावृत्ती आढळते . )

**स पुष्कराक्ष: क्षतजेक्षिताक्ष: क्षरत्क्षतेभ्य: क्षतजं दुरीक्ष: |**
**क्षतैर्गवाक्षैरिव संवृताङ्ग: साक्षात् सहस्त्राक्ष इवावभाति || ८७ ||**

**पदच्छेद : –** स : पुष्कराक्ष : क्षतजेक्षिताक्ष : क्षरत्क्षतेभ्य : क्षतजम् दुरीक्षम् |
क्षतै : गवाक्षै : इव संवृताङ्ग : साक्षात् सहस्त्राक्ष : इव अवभाति || ८७ ||

**अन्वय : –** स: पुष्कराक्ष: क्षतजेक्षिताक्ष: क्षतेभ्य: क्षरत् क्षतजम् दुरीक्ष: गवाक्षै: इव क्षतै: संवृताङ्ग : साक्षात् सहस्त्राक्ष : इव अवभाति |

**अर्थ –** निळ्या रंगाच्या कमळाप्रमाणे डोळे असलेला, रक्ताने स्नान केल्याप्रमाणे डोळे असलेला, जखमांतून वाहणाऱ्या रक्ताकडे दुर्लक्ष करणारा, खिडकीप्रमाणे जखमांनी झाकलेले अंग असलेला हा वीर जणु काही साक्षात इंद्रासारखाच दिसत आहे . (याठिकाणी 'क्ष' या अक्षराची पुनरावृत्ती आढळते . )

**❖ दहा काव्यदोष ❖**

**एभिरर्थक्रियापेक्षै: काव्यं कुर्यात्तु लक्षणै: |**
**अत:परं प्रवक्ष्यामि काव्यदोषान् गुणांस्तथा || ८८ ||**

**पदच्छेद : –** एभि : अर्थक्रियापेक्षै : काव्यम् कुर्यात् तु लक्षणै : |
अत :परम् प्रवक्ष्यामि काव्ये दोषान् गुणान् तथा || ८८ ||

**अन्वय : –** अर्थक्रियापेक्षै : एभि : लक्षणै : तु काव्यम् कुर्यात् | अत :परम् काव्ये दोषान् तथा गुणान् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** अर्थ व्यक्त होणाऱ्या क्रियापदांप्रमाणे वरील लक्षणांनी युक्त अशी काव्याची निर्मिती करावी . यानंतर आता मी काव्यातील दोष आणि गुणांचे वर्णन करीन .

**गूढार्थमर्थान्तरमर्थहीनं भिन्नार्थमेकार्थमभिप्लुतार्थम् |**
**न्यायादपेतं विषमं विसन्धि शब्दच्युतं वै दश काव्यदोषा: || ८९ ||**

**पदच्छेद: –** गूढार्थम् अर्थान्तरम् अर्थहीनम् भिन्नार्थम् एकार्थम् अभिप्लुतार्थम् |
न्यायाद् अपेतम् विषमम् विसन्धि: शब्दच्युतम् वै दश काव्यदोषा: || ८९ ||

**अन्वय: –** गूढार्थम् अर्थान्तरम् अर्थहीनम् भिन्नार्थम् एकार्थम् अभिप्लुतार्थम् न्यायात् अपेतम् विषमम् विसन्धि: शब्दच्युतम् वै दश काव्यदोषा: (सन्ति) |

**अर्थ –** गूढार्थ, अर्थान्तर, अर्थहीन, भिन्नार्थ, एकार्थ, अभिप्लुतार्थ, न्यायादपेत, विषम, विसंधि आणि शब्दच्युत हे दहा काव्यदोष आहेत .

**❖ गूढार्थ दोष आणि अर्थांतर दोष ❖**

**पर्यायशब्दाभिहितं गूढार्थमिति संज्ञितम् |**
**अवर्ण्यं वर्ण्यते यत्र तदर्थान्तरमिष्यते || ९० ||**

**पदच्छेद: –** पर्यायशब्द-अभिहितम् गूढार्थम् इति संज्ञितम् |
अवर्ण्यम् वर्ण्यते यत्र तत् अर्थान्तरम् इष्यते || ९० ||

**अन्वय: –** पर्यायशब्द-अभिहितम् गूढार्थम् इति संज्ञितम् | यत्र अवर्ण्यम् वर्ण्यते तत् अर्थान्तरम् इष्यते |

**अर्थ –** जेव्हा पर्यायवाची शब्दांद्वारे काही विषय सांगितला जातो तेव्हा तेथे 'गूढार्थदोष' असतो . अवर्णनीय विषयाचे वर्णन जेथे केले असेल, त्याला 'अर्थांतरदोष' म्हणतात . (गूढार्थदोष = दशरथाचे वर्णन करताना जर एखाद्याने 'दश' ऐवजी एकाधिकनव आणि 'रथ' ऐवजी विमान असे शब्दप्रयोग लक्षात ठेवून 'दशरथ' ऐवजी एकाधिकनवविमान असे म्हटले तर त्या काव्यामध्ये गूढार्थदोष गणला जातो .
अर्थांतरदोष = चिंता, मोह इत्यादी अवर्णनीय भावांना शरीर असल्याप्रमाणे वर्णन करणे हा अर्थांतरदोष मानला जातो . - अ . भा . )

### ❖ अर्थहीन दोष आणि भिन्नार्थ दोष ❖

**अर्थहीनं त्वसम्बद्धं सावशेषार्थमेव च |**
**भिन्नार्थमभिविज्ञेयमसभ्यं ग्राम्यमेव च || ९१ ||**

**पदच्छेद:** – अर्थहीनम् तु असम्बद्धम् सावशेषार्थम् एव च |
भिन्नार्थम् अभिविज्ञेयम् असभ्यम् ग्राम्यम् एव च || ९१ ||

**अन्वय:** – असम्बद्धम् सावशेषार्थम् च 'अर्थहीनम्' (अस्ति) | असभ्यम् ग्राम्यम् च 'भिन्नार्थम्' अभिविज्ञेयम् |

**अर्थ** – जेथे असंबद्ध किंवा अवशेष अर्थ असेल तेव्हा त्याला 'अर्थहीनदोष' म्हणावे.
असभ्य आणि ग्राम्य भाषा असेल तर त्याला 'भिन्नार्थदोष' समजावे.

(अर्थहीनदोष = अद्यापि स्मरसि रसालसं मनो मे मुग्धाया: स्मरचतुराणि | या वाक्याचा अर्थ करतेवेळी 'हे रसालसं मे मन:, अद्यापि त्वं मुग्धाया: स्मरचतुराणि स्मरसि | 'हे रसाच्या बाबतीत आळशी असणाऱ्या, अरसिक असणाऱ्या माझ्या मना, अजूनही तू त्या नारीची कामप्रचुर अशी चतुर वाक्ये का बरं आठवतोयंस?' जर व्यक्ती कामरसाविषयी अरसिक असेल तर कामप्रचुर वाक्य तो का बरं आठवेल? अशा रीतीने याठिकाणी अर्थहीनत्वाची आपत्ती ओढावते.

भिन्नार्थदोष = भिन्नार्थदोष हा तीन प्रकारचा असतो.

१. जेव्हा एखाद्या वाक्याचा अर्थ अगम्य असतो, तेव्हा काव्यास भिन्नार्थदोष लागतो. अर्थप्राप्तीसाठी दूर असलेल्या शब्दांशी संबंध जोडावा लागतो. उदाहरणार्थ-

ज्वरं भुञ्जीत सञ्जातमलपाकं चिरस्थितम् |
अजादुग्धोदनं हन्यात् त्रिदोषोत्कोपसंभवम् ||

याठिकाणी 'ज्वरं भुञ्जीत' आणि 'अजादुग्धोदनं' हन्यात् असा संबंध जोडला तर अर्थ कळतच नाही की नेमके काय म्हणायचे आहे. त्रिदोष घालविण्यासाठी ताप घ्या आणि शेळीच्या दुधाचा भात वर्ज्य करावा असा अर्थ बुद्धीला पटत नाही. तेव्हा 'अजादुग्धोदनं भुञ्जीत' आणि 'चिरस्थितम् सञ्जातमलपाकं त्रिदोषोत्कोपसंभवम् ज्वरं हन्यात्' असा अन्वय केला तर अर्थ कळतो. शेळीचे दूध मिश्रित केलेला भात खा

आणि शरीरात मल आणि पाक स्वरूपात चिरकाळ राहिलेला, त्रिदोषांना कारणीभूत होणारा ताप घालवा .

२. जेव्हा असभ्य वाक्याचा प्रयोग केला जातो तेव्हा त्या रचनेस भिन्नार्थदोष लागतो . जसे- 'भद्रं भजस्व मामिदं ते दास्यामि' | माझ्यासारख्या चांगल्या माणसाला रिझवलंस तर मी तुला हे धन/वस्तु देईन .

३. एखाद्या विषयी कथन करत असताना जेव्हा अन्य व्यक्तीला प्रदर्शित केले जाते तेव्हा भिन्नार्थदोष लागतो . जसे- "स्याच्चेदेष न रावण:" इत्युक्त्वा "क्व नु पुन: सर्वत्र सर्वे गुणा:" "हा रावण नसता तर" असे म्हणून "कुठे पुन्हा सगळे गुण सगळ्यांमध्ये असतात?" यामध्ये रोख रावणाकडे आहे पण पुढील वाक्यामुळे लगेच रोख ते विशिष्ट गुण असणाऱ्या व्यक्तीकडे जातो . हा भिन्नार्थदोष होय . - अ . भा . )

**विवक्षितोऽन्य एवार्थो यत्रान्यार्थेन विद्यते |**
**भिन्नार्थ तदपि प्राहु: काव्यं काव्यविचक्षणा: || ९२ ||**

**पदच्छेद: –** विवक्षित: अन्य: एव अर्थ: यत्र अन्यार्थेन विद्यते |
भिन्नार्थम् तत् अपि प्राहु: काव्यम् काव्यविचक्षणा: || ९२ ||

**अन्वय: –** यत्र विवक्षित: अन्य: एव अर्थ: अन्यार्थेन विद्यते तत् अपि काव्यविचक्षणा: भिन्नार्थम् काव्यं प्राहु: |

**अर्थ –** जेव्हा वक्त्याला अपेक्षित अर्थ एक असतो आणि वाक्यातून कुठलातरी भलताच अर्थ निघतो तेव्हा त्याला विद्वानांनी 'भिन्नार्थदोष' म्हटले आहे .

**❖ एकार्थ दोष आणि अभिप्लुतार्थ दोष ❖**

**अविशेषाभिधानं यत्तदेकार्थमिति स्मृतम् |**
**अभिप्लुतार्थ विज्ञेयं यत्पदेन समस्यते || ९३ ||**

**पदच्छेद: –** अविशेषाभिधानम् यत् तत् एकार्थम् इति स्मृतम् |
अभिप्लुतार्थम् विज्ञेयम् यत् पदेन समस्यते || ९३ ||

**अन्वय:** – यत् अविशेषाभिधानम् तत् एकार्थम् इति स्मृतम् | यत् पदेन समस्यते (तत्) अभिप्लुतार्थम् विज्ञेयम् |

**अर्थ** – अविशेष म्हणजे ज्यात काही विशेष किंवा विलक्षण अर्थ नाही अशा रचनेला 'एकार्थ दोष' असे म्हटले आहे. (काव्यामध्ये अभिधेपेक्षा लक्षणेला अथवा व्यंजनेला अधिक महत्त्व दिले जाते. कुन्देन्दुहारहरहाससितम् इत्यादी रचनेमध्ये राजाचे यश कसे आहे हे सांगण्यासाठी कुंदफुले, चंद्र, हार, शंकर, हास्य यांची उपमा देत ते यश यांप्रमाणे शुभ्र आहे असे म्हटले गेले आहे. परंतु इतक्या उपमांचा वापर एकच गोष्ट सांगण्यासाठी केला आहे. त्यातून अन्य कोणताही विलक्षण अर्थ ध्वनित होत नाही म्हणून यांसारख्या रचनेला एकार्थदोष लागतो. काव्य हे शास्त्राप्रमाणे सांगायचे नसते. कोणाला काहीतरी विशेष समजावे म्हणून सांगितले जाते. – अ. भा.)

जेथे प्रत्येक चरणामध्ये वाक्याचा अर्थ संपतो त्याला 'अभिप्लुतार्थदोष' असे म्हणतात.

(जसे स राजा नीतिकुशला: सर: कुमुदशोभितम् |

सर्वप्रिया वसन्तश्रीर्गीष्मे मालतिकागम: || या काव्यरचनेत एकसूत्रता, सहसंबंध तसेच समान गोष्ट आढळत नाही. तो राजा नीतिशास्त्रात पारंगत आहे. तलाव कमळांनी शोभून दिसत आहे. वसंत ऋतूचे सौंदर्य सर्वांना आवडते. ग्रीष्म ऋतुमध्ये मालती फुले बहरून येतात. या चारही वाक्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. म्हणूनच याला 'अभिप्लुतार्थदोष' असे म्हणतात. – अ. भा.)

### ❖ न्यायादपेत दोष आणि विषम दोष ❖

**न्यायादपेतं विज्ञेयं प्रमाणपरिवर्जितम् |**
**वृत्तभेदो भवेद्यत्र विषमं नाम तद्भवेत् || ९४ ||**

**पदच्छेद:** – न्यायात् अपेतम् विज्ञेयम् प्रमाणपरिवर्जितम् |
वृत्तभेद: भवेत् यत्र विषमम् नाम तत् भवेत् || ९४ ||

**अन्वय:** – प्रमाणपरिवर्जितम् 'न्यायादपेतम्' विज्ञेयम् | यत्र वृत्तभेद: भवेत् तत् 'विषमम्' नाम (दोष:) भवेत् |

अर्थ – प्रमाणाशिवाय विषयाचे वर्णन केले तर त्या काव्यास 'न्यायादपेतदोष' लागतो. (देश, काळ यांच्याशी सुसंगत नसणारे आणि कला, शास्त्र इत्यादींच्या विरुद्ध जाणारे जे वर्णन ते न्यायादपेत होय. जसे

सुवीरेष्वस्ति नगरी मथुरा नाम विश्रुता |

अक्षोटनारिकेलाढ्या यस्या: पर्यन्तभूमय: || अत्यंत वीरपुरुषांमध्ये मथुरा नावाची नगरी नावाजलेली आहे जिची भूमी अक्रोड आणि नारळाच्या झाडांनी परिपूर्ण व्यापलेली आहे. आता मगधप्रांतात नारळाची झाडे असणे हे भौगोलिक स्थिती आणि प्रांतवैशिष्ट्याविरुद्ध आहे. म्हणूनच या काव्यास न्यायादपेतदोष लागतो. - अ. भा.)

जेथे वृत्ताच्या चरणांमध्ये फरक असेल तर त्यास 'विषमदोष' म्हणतात. (उदा.

अयि पश्यसि सौधमाश्रिताम्

अविरलसुमनोमालभारिणीम्

या रचनेमध्ये पहिल्या चरणामध्ये दहा अक्षरे आणि दुसऱ्या चरणात बारा अक्षरे आहेत. इथे वृत्तभेद असल्याने या काव्याला विषमदोष लागतो. - अ. भा.)

### ❖ विसंधि दोष आणि शब्दच्युतक दोष ❖

**अनुपश्लिष्टशब्दं यत्तद्विसन्धीति कीर्तितम् |**
**शब्दच्युतं च विज्ञेयमशब्दस्वरयोजनात् || ९५ ||**
**एते दोषास्तु विज्ञेया: सूरिभिर्नाटकाश्रया: |**

**पदच्छेद:** – अनुपश्लिष्टशब्दम् यत् तत् विसन्धि इति कीर्तितम् |
शब्दच्युतम् च विज्ञेयम् असब्दस्वरयोजनात् || ९५ ||
एते दोषा: तु विज्ञेया: सूरिभि: नाटकाश्रया: |

**अन्वय:** – यत् अनुपश्लिष्टशब्दम् तत् विसन्धि इति कीर्तितम् | अशब्दस्वरयोजनात् च शब्दच्युतम् विज्ञेयम् | सूरिभि: एते नाटकाश्रया: दोषा: (विज्ञेया:) |

अर्थ – जेथे शब्द जोडलेला नसतो तेथे 'विसंधि' नामक दोष होतो.
विसंधि तीन प्रकारचा असतो.

१ ) दोन वर्ण किंवा दोन पदांमधील संधी

२ ) विचारांमधील एकता

३ ) परस्पर एकमेकांत विलीन होणे

जेथे शब्द आणि स्वराशिवाय काव्यरचना झाली असेल तर तेथे 'शब्दच्युतकदोष' समजावा .

विद्वानांनी नाटकाश्रित या दहा दोषांना समजून घ्यावे .

### ❖ काव्याचे गुण ❖

**गुणा विपर्ययादेषां माधुर्यौदार्यलक्षणा : || ९६ ||**

**पदच्छेद : –** गुणा : विपर्ययात् एषाम् माधुर्यौदार्यलक्षणा : || ९६ ||

**अन्वय : –** एषाम् विपर्ययात् माधुर्यौदार्यलक्षणा : गुणा : विज्ञेया : |

**अर्थ –** याउलट माधुर्य, औदार्य इत्यादी काव्याचे गुणदेखील जाणून घ्यावेत .

**श्लेष : प्रसाद : समता समाधिर्माधुर्यमोज : पादसौकुमार्यम् |**
**अर्थस्य च व्यक्तिमुदारता च कान्तिश्च काव्यस्य गुणा दशैते || ९७ ||**

**पदच्छेद : –** श्लेष : प्रसाद : समता समाधि : माधुर्यम् ओज : पादसौकुमार्यम् |
अर्थस्य च व्यक्ति : उदारता च कान्ति : च काव्यस्य गुणा दश एते || ९७ ||

**अन्वय : –** श्लेष : प्रसाद : समता समाधि : माधुर्यम् ओज : पादसौकुमार्यम् अर्थस्य च व्यक्ति : उदारता च कान्ति : च एते काव्यस्य गुणा दश (सन्ति) |

**अर्थ –** श्लेष, प्रसाद, समता, समाधि, माधुर्य, ओज, पादसौकुमार्य, अर्थव्यक्ती, उदारता, आणि कांति ही हे दहा काव्याचे गुण आहेत .

### ❖ श्लेष ❖

**ईप्सितेनार्थजातेन सम्बद्धानां परस्परम् |**
**श्लिष्टता या पदानां हि श्लेष इत्यभिधीयते || ९८ ||**

**पदच्छेद:** – ईप्सितेन अर्थजातेन सम्बद्धानाम् परस्परम् |
शिलष्टता या पदानाम् हि श्लेष: इति अभिधीयते || ९८ ||

**अन्वय:** – ईप्सितेन अर्थजातेन परस्परम् सम्बद्धानाम् पदानाम् या शिलष्टता स श्लेष: इति अभिधीयते |

**अर्थ** – अपेक्षित अर्थाद्वारे एकमेकांशी संबंधित असलेल्या शब्दांमध्ये जी एकवाक्यता असते त्याला 'श्लेष' असे म्हणतात .

**विचारगहनं यत्स्यात्स्फुटं चैव स्वभावत: |**
**स्वत: सुप्रतिबद्धं च शिलष्टं तत्परिकीर्त्यते || ९९ ||**

**पदच्छेद:** – विचारगहनम् यत् तत् स्यात् स्फुटम् च एव स्वभावत: |
स्वत: सुप्रतिबद्धम् च शिलष्टम् तत् परिकीर्त्यते || ९९ ||

**अन्वय:** – यत् विचारगहनम् स्वभावत: स्फुटम् स्वत: सुप्रतिबद्धम् च स्यात् तत् शिलष्टम् इति परिकीर्त्यते |

**अर्थ** – ज्या रचनेमध्ये गूढ विचार असतो परंतु स्वाभाविकरीत्या स्पष्ट असतो आणि तो एकमेकांत चांगल्या रीतीने गुंफलेला असतो त्याला 'श्लेष' म्हणावे .

**❖ प्रसाद ❖**

**अप्यनुक्तो बुधैर्यत्र शब्दोऽर्थो वा प्रतीयते |**
**सुखशब्दार्थसंयोगात् प्रसाद: परिकीर्त्यते || १०० ||**

**पदच्छेद:** – अपि अनुक्त: बुधै: यत्र शब्द: अर्थ: वा प्रतीयते |
सुख-शब्द-अर्थ-संयोगात् प्रसाद: परिकीर्त्यते || १०० ||

**अन्वय:** – अनुक्त: अपि यत्र सुखशब्दार्थसंयोगात् शब्द: अर्थ: वा बुधै: प्रतीयते (तत्) प्रसाद: परिकीर्त्यते |

**अर्थ** – जेथे सांगितले नसतानाही शब्द आणि अर्थाच्या सुखकारी संयोगामुळे शब्द किंवा अर्थ बुद्धिमानांना लगेच कळतो त्याला 'प्रसाद' गुण म्हणतात .

**❖ समता ❖**

**नातिचूर्णपदैर्युक्ता न च व्यर्थाभिधायिभि: |**
**दुर्बोधनैश्च न कृता समत्वात्समता मता || १०१ ||**

**पदच्छेद: –** न अतिचूर्णपदै: युक्ता न च व्यर्थ-अभिधायिभि: |
दुर्बोधनै: च न कृता समत्वात् समता मता || १०१ ||

**अन्वय: –** न अतिचूर्णपदै: न च व्यर्थाभिधायिभि: न च दुर्बोधनै: युक्ता समत्वात् कृता 'समता' मता |

**अर्थ –** ज्यामध्ये सामासिक पदे नसतील आणि ज्यामध्ये व्यर्थ अर्थ नसेल आणि जे दुर्बोध असा शब्दांनी युक्त नसेल अशा सहजगम्य गुणामुळे त्याला 'समता' असे म्हणतात .

**अन्योन्यसदृशा यत्र तथा ह्यन्योन्यभूषणा: |**
**अलङ्कारा गुणाश्चैव समा: स्यु: समतामता: || १०२ ||**

**पदच्छेद: –** अन्योन्यसदृशा: यत्र तथा हि अन्योन्यभूषणा: |
अलङ्कारा: गुणा: च एव समा: स्यु: समतामता: || १०२ ||

**अन्वय: –** यत्र अलङ्कारा: गुणा: च अन्योन्यसदृशा तथा अन्योन्यभूषणा: समा: च ते 'समता' मता: स्यु: |

**अर्थ –** जेथे गुण आणि अलंकार समान असून दोघेही एकमेकांसारखे असतील आणि एकमेकांची शोभा वाढवत असतील तर त्या गुणास 'समता' असे म्हटले जाते .

**❖ समाधी ❖**

**अभियुक्तैर्विशेषस्तु योऽर्थस्येहोपलक्ष्यते |**
**तेन चार्थेन सम्पन्न: समाधि: परिकीर्तित: || १०३ ||**

**पदच्छेद: –** अभियुक्तै: विशेष: तु य: अर्थस्य इह उपलक्ष्यते |
तेन च अर्थेन सम्पन्न: समाधि: परिकीर्तित: || १०३ ||

**अन्वय: –** अभियुक्तै: तु अर्थस्य य: विशेष: इह उपलक्ष्यते तेन च अर्थेन सम्पन्न: समाधि: परिकीर्तित: |

**अर्थ** – जेव्हा प्रतिभाशाली व्यक्तींद्वारे विशेष अर्थ सांगितला जातो, तो विशेष अर्थ व्यक्त करणाऱ्या गुणाला 'समाधि' असे म्हणतात.

**उपमास्विह दृष्टानामर्थानां यत्नतस्तथा |**
**प्राप्तानां चातिसंक्षेपात्समाधिर्निर्णयो यत: || १०४ ||**

**पदच्छेद:** – उपमासु इह दृष्टानाम् अर्थानाम् यत्नत: तथा |
प्राप्तानाम् च अपि संक्षेपात् समाधि: निर्णय: यत: || १०४ ||

**अन्वय:** – उपमासु इह दृष्टानाम् तथा च यत्नत: प्राप्तानाम् अर्थानाम् संक्षेपात् यत: समाधि: निर्णय: |

**अर्थ** – उपमा इत्यादींमध्ये दृष्ट आणि प्रयत्नांनी जो अर्थ प्राप्त होतो त्याच्या मर्यादेमुळे या गुणाला 'समाधि' असे म्हणतात.

**❖ माधुर्य ❖**

**बहुशो यच्छ्रुतं वाक्यमुक्तं वापि पुन: पुन: |**
**नोद्वेजयति यस्माद्धि तन्माधुर्यमिति स्मृतम् || १०५ ||**

**पदच्छेद:** – बहुश: यत् श्रुतम् वाक्यम् उक्तम् वा अपि पुन: पुन: |
न उद्वेजयति यस्मात् हि तत् माधुर्यम् इति स्मृतम् || १०५ ||

**अन्वय:** – बहुश: श्रुतम् अपि पुन: पुन: उक्तम् वा यत् वाक्यम् न उद्वेजयति यस्मात् हि तत् 'माधुर्यम्' इति स्मृतम् |

**अर्थ** – अनेक वेळा ऐकून किंवा खूप वेळा सांगूनदेखील जे वाक्य उद्वेग अथवा संताप उत्पन्न करत नाही त्याला 'माधुर्य' असे म्हणतात.

**❖ ओज ❖**

**समासवद्भिर्विविधैर्विचित्रैश्च पदैर्युतम् |**
**सानुस्वारैरुदारैश्च तदोज: परिकीर्त्यते || १०६ ||**

**पदच्छेद:** – समासवद्भि : विविधै : विचित्रै : च पदै : युतम् |
सानुस्वारै : उदारै : च तत् ओज : परिकीर्त्यते || १०६ ||

**अन्वय:** – समासवद्भि: विविधै: विचित्रै: च सानुस्वारै: उदारै: च पदै: युतम् तत् 'ओज:' परिकीर्त्यते |

**अर्थ** – जेथे समासयुक्त, विविध, विचित्र, अनुस्वारासह आणि उदार पदांनी युक्त असे काव्य असेल तेथे 'ओज' गुण समजावा.

**अवगीतोऽपि हीनोऽपि स्यादुदात्तावभासक: |**
**यत्र शब्दार्थसम्पत्तिस्तदोज: परिकीर्तितम् || १०७ ||**

**पदच्छेद:** – अवगीत : अपि हीन : अपि स्यात् उदात्तअवभासक : |
यत्र शब्दार्थसम्पत्ति : तत् ओज : परिकीर्तितम् || १०७ ||

**अन्वय:** – अवगीत: अपि, हीन: अपि यत्र शब्दार्थसम्पत्ति: उदात्तावभासक: स्यात् तत् 'ओज:' इति परिकीर्तितम् |

**अर्थ** – काव्यरचना जरी निंदेस पात्र किंवा नैराश्यजनक असली तरीही शब्द आणि त्यांची अर्थ संपदा उदात्त अर्थाला व्यक्त करत असेल तर त्याला 'ओज' गुण असे म्हणतात.

**❖ सौकुमार्य ❖**

**सुखप्रयोज्यैर्यच्छब्दैर्युक्तं सुश्लिष्टसन्धिभि: |**
**सुकुमारार्थसंयुक्तं सौकुमार्य तदुच्यते || १०८ ||**

**पदच्छेद:** – सुख-प्रयोज्यै : यत् शब्दै : युक्तम् सुश्लिष्ट-सन्धिभि : |
सुकुमार-अर्थ-संयुक्तम् सौकुमार्यम् तत् उच्यते || १०८ ||

**अन्वय:** – सुश्लिष्टसन्धिभि : सुखप्रयोज्यै : शब्दै : सुकुमारार्थसंयुक्तम् यत् युक्तम् तत् 'सौकुमार्यम्' इति उच्यते |

**अर्थ** – अतिशय सुंदर संधियुक्त आणि सुखकारक शब्दांच्या वापराद्वारे अत्यंत कोमल अर्थ ज्या गुणामुळे व्यक्त होतो त्याला 'सौकुमार्य' असे म्हणतात.

### ❖ अर्थव्यक्ती ❖

**सुप्रसिद्धाभिधाना तु लोककर्मव्यवस्थिता |**
**या क्रिया क्रियते काव्ये सार्थव्यक्ति: प्रकीर्त्यते || १०९ ||**

**पदच्छेद:** – सुप्रसिद्ध-अभिधाना तु लोक-कर्म-व्यवस्थिता |
या क्रिया क्रियते काव्ये सा अर्थव्यक्ति: प्रकीर्त्यते || १०९ ||

**अन्वय:** – या सुप्रसिद्धाभिधाना क्रिया तु लोककर्मव्यवस्थिता क्रियते सा काव्ये 'अर्थव्यक्ति:' इति प्रकीर्त्यते |

**अर्थ** – जनमानसात अत्यंत प्रसिद्ध क्रिया जी लोककर्माद्वारे व्यक्त केली जाते तेव्हा तिला काव्यामध्ये 'अर्थव्यक्ती' असे म्हणतात .

**यस्यार्थानुप्रवेशेन मनसा परिकल्प्यते |**
**अनन्तरं प्रयोगस्तु साऽर्थव्यक्तिरुदाहृता || ११० ||**

**पदच्छेद:** – यस्य अर्थानुप्रवेशेन मनसा परिकल्प्यते |
अनन्तरम् प्रयोग: तु सा अर्थव्यक्ति: उदाहृता || ११० ||

**अन्वय:** – यस्य तु अर्थानुप्रवेशेन मनसा परिकल्प्यते अनन्तरम् प्रयोग: भवति सा 'अर्थव्यक्ति:' इति उदाहृता |

**अर्थ** – ज्या शब्दाचा अर्थ आधी थेट मनात जाऊन रुजतो, त्यानंतर त्याचा प्रयोग होतो त्या गुणास 'अर्थव्यक्ती' असे म्हणतात . (या गुणाद्वारे काव्यात अभिधेला अधिक प्राधान्य असते . - अ . भा . )

### ❖ उदारता ❖

**दिव्यभावपरीतं यच्छृङ्गाराद्भुतयोजितम् |**
**अनेकभावसंयुक्तमुदारत्वं प्रकीर्तितम् || १११ ||**

**पदच्छेद:** – दिव्य-भाव-परीतम् यत् शृङ्गार-अद्भुत-योजितम् |
अनेकभाव-संयुक्तम् उदारत्वम् प्रकीर्तितम् || १११ ||

**अन्वय:** – यत् दिव्यभावपरीतम् शृङ्गार-अद्भुत-योजितम् अनेकभाव-संयुक्तम् उदारत्वम् प्रकीर्तितम्।

**अर्थ** – जी रचना दिव्यभावांनी युक्त असते, शृंगार आणि अद्भुत रसाने युक्त असते आणि अनेक भावांचा त्यात समावेश असतो, त्या गुणाला 'उदारता' गुण म्हणतात.

**अनेकार्थविशेषैर्यत्सूक्तैः सौष्ठवसंयुतैः।**
**उपेतमतिचित्रार्थैरुदात्तं तच्च कीर्त्यते॥ ११२॥**

**पदच्छेद:** – अनेक-अर्थविशेषैः यत् सूक्तैः सौष्ठवसंयुतैः।
उपेतम् अतिचित्र-अर्थैः उदात्तम् तत् च कीर्त्यते॥ ११२॥

**अन्वय:** – यत् अनेकार्थविशेषैः सौष्ठवसंयुतैः सूक्तैः अतिचित्रार्थैः उपेतम् तत् च 'उदात्तम्' इति कीर्त्यते।

**अर्थ** – अनेक विशिष्ट अर्थांनी, सौष्ठवयुक्त सुंदर वचनांनी, खूप वैविध्यपूर्ण अर्थांनी जो युक्त असतो अशा गुणाला 'उदात्त' असे म्हणतात.

**❖ कांती ❖**

**यन्मनःश्रोत्रविषयमाह्लादयति हीन्दुवत्।**
**लीलाद्यर्थोपपन्नां वा तां कान्तिं कवयो विदुः॥ ११३॥**

**पदच्छेद:** – यत् मनः-श्रोत्र-विषयम् आह्लादयति हि इन्दुवत्।
लीला-आदि-अर्थ-उपपन्नाम् वा ताम् कान्तिम् कवयः विदुः॥ ११३॥

**अन्वय:** – यत् लीला-आदि-अर्थ-उपपन्नाम् मनः-श्रोत्र-विषयम् हि वा इन्दुवत् आह्लादयति ताम् कवयः कान्तिम् विदुः।

**अर्थ** – जी लीला इत्यादी अर्थांनी युक्त असते. चंद्राप्रमाणे मनाला आणि कानांना जी आनंद देते त्या गुणाला कविवर्य 'कांति' असे म्हणतात.

**❖ कांत ❖**

**यो मन:श्रोत्रविषय: प्रसादजनको भवेत् |**
**शब्दबन्ध: प्रयोगेण स कान्त इति भण्यते || ११४ ||**

**पदच्छेद:** – य: मन:-श्रोत्र-विषय: प्रसादजनक: भवेत् |
शब्दबन्ध: प्रयोगेण स: कान्त: इति भण्यते || ११४ ||

**अन्वय:** – य: शब्दबन्ध: प्रयोगेण मन:-श्रोत्र-विषय: प्रसादजनक: भवेत् स: कान्त: इति भण्यते |

**अर्थ** – जो स्वत:च्या शब्दप्रयोगाने मन आणि कर्ण यांचा विषय होऊन आनंद निर्माण करतो त्याला 'कांत' असे म्हटले जाते.

**एवमेते ह्यलङ्कारा गुणा दोषाश्च कीर्तिता: |**
**प्रयोगमेषां च पुनर्वक्ष्यामि रससंश्रयम् || ११५ ||**

**पदच्छेद:** – एवम् एते हि अलङ्कारा: गुणा: दोषा: च कीर्तिता: |
प्रयोगम् एषाम् च पुन: वक्ष्यामि रससंश्रयम् || ११५ ||

**अन्वय:** – एवम् एते हि अलङ्कारा: गुणा: दोषा: च कीर्तिता: एषाम् च रससंश्रयम् प्रयोगम् पुन: वक्ष्यामि |

**अर्थ** – अशाप्रकारे हे अलंकार, गुण आणि दोष मी सांगितले आहेत. आता, रसानुसार त्यांचा वापर तुम्हाला सांगीन.

**❖ काव्यरचनेविषयी विशेष नियम ❖**

**लघ्वक्षरप्रायकृतमुपमारूपकाश्रयम् |**
**काव्यं कार्यं नाट्यज्ञैर्वीररौद्राद्भुताश्रयम् || ११६ ||**

**पदच्छेद:** – लघु-अक्षर-प्राय-कृतम् उपमा-रूपक-आश्रयम् |
काव्यम् कार्यम् नाट्यज्ञै: वीर-रौद्र-अद्भुत-आश्रयम् || ११६ ||

**अन्वय:** – नाट्यज्ञै: लघु-अक्षर-प्राय-कृतम् उपमा-रूपक-आश्रयम् वीर-रौद्र-अद्भुत-आश्रयम् काव्यम् कार्यम् |

**अर्थ** – नाट्यविद्वानांनी बहुधा लघु अक्षरांनी युक्त असलेल्या, उपमा-रूपक इत्यादी अलंकारांचा आश्रय घेतलेल्या आणि वीर, रौद्र व अद्भुत रसांनी युक्त अशा काव्याची निर्मिती करावी .

(म्हणजेच वीर, रौद्र व अद्भुत रसांची निर्मिती करण्यासाठी त्यांना पोषक अशा लघु अक्षरांचा अधिक प्रयोग करावा आणि उपमा-रूपक इ. अलंकारांचाही वापर करावा .)

**गुर्वक्षरप्रायकृतं बीभत्से करुणे तथा |**
**कदाचिद्रौद्रवीराभ्यां यदाधर्षणजं भवेत् || ११७ ||**

**पदच्छेद:** – गुरु-अक्षर-प्राय-कृतम् बीभत्से करुणे तथा |
कदाचित् रौद्र-वीराभ्याम् यदा आधर्षणजम् भवेत् || ११७ ||

**अन्वय:** – बीभत्से करुणे तथा कदाचित् रौद्र-वीराभ्याम् यदा आधर्षणजम् (तदा) गुरु-अक्षर-प्राय-कृतम् भवेत् |

**अर्थ** – बीभत्स आणि करुण रसामध्ये तर कधी कधी वीर आणि रौद्र रसामध्येही जर शाब्दिक अपमान असेल तेथे गुरु अक्षरांचा वापर करून रचना करावी .

### ❖ रसानुसार विशेष छंदाचा प्रयोग ❖

**रूपदीपकसंयुक्तमार्यावृत्तसमाश्रयम् |**
**शृङ्गारे च रसे कार्यं मृदुवृत्तं तथैव च || ११८ ||**

**पदच्छेद:** – रूपदीपक-संयुक्तम् आर्यावृत्त-समाश्रयम् |
शृङ्गारे च रसे कार्यम् मृदुवृत्तम् तथा एव च || ११८ ||

**अन्वय:** – शृङ्गारे च रसे रूपदीपक-संयुक्तम् आर्यावृत्त-समाश्रयम् तथा एव च मृदुवृत्तम् कार्यम् |

**अर्थ** – शृंगाररसामध्ये रूपक आणि दीपक अलंकारांनी युक्त आणि आर्यावृत्तावर आधारित असलेल्या कोमल वृत्ताचा वापर करावा .

**उत्तरोत्तरसंयुक्तं वीरे काव्यं तु यद्भवेत् |**
**जगत्यातिजगत्या वा संकृत्या वापि योजयेत् || ११९ ||**

**पदच्छेद:** – उत्तरोत्तर-संयुक्तम् वीरे काव्यम् तु यत् भवेत् |
जगत्या अतिजगत्या वा संकृत्या वा अपि योजयेत् || ११९ ||

**अन्वय:** – वीरे उत्तरोत्तर-संयुक्तम् तु यत् काव्यम् भवेत् (तत्) जगत्या अतिजगत्या अपि वा संकृत्या वा योजयेत् |

**अर्थ** – वीररसामध्ये जिथे (उत्तर-प्रत्युत्तरासह) चर्चायुक्त काव्य असते त्यात जगती, अतिजगती किंवा संकृति छंदाचा वापर करावा .

**तथैव युद्धसम्फेटावुत्कृत्यां सम्प्रकीर्तितौ |**
**करुणे शक्वरी ज्ञेया तथैवातिधृतिर्भवेत् || १२० ||**

**पदच्छेद:** – तथा एव युद्धसम्फेटौ उत्कृत्याम् सम्प्रकीर्तितौ |
करुणे शक्वरी ज्ञेया तथा एव अतिधृति: भवेत् || १२० ||

**अन्वय:** – तथा एव युद्धसम्फेटौ उत्कृत्याम् सम्प्रकीर्तितौ | करुणे शक्वरी ज्ञेया तथा एव अतिधृति: भवेत् |

**अर्थ** – त्याचप्रमाणे युद्ध आणि संफेट यांच्या वर्णनासाठी 'उत्कृति' छंदाचा वापर करावा आणि करुण रसामध्ये 'शक्वरी' आणि 'अतिधृति' छंदांचा वापर करावा .

**यद्वीरे कीर्तितं छन्दस्तद्रौद्रेऽपि प्रयोजयेत् |**
**शेषाणामर्थयोगेन छन्द: कार्यं प्रयोक्तृभि: || १२१ ||**

**पदच्छेद:** – यत् वीरे कीर्तितम् छन्द: तत् रौद्रे अपि प्रयोजयेत् |
शेषाणाम् अर्थयोगेन छन्द: कार्यं प्रयोक्तृभि: || १२१ ||

**अन्वय:** – यत् वीरे कीर्तितम् छन्द: तत् रौद्रे अपि प्रयोजयेत् | प्रयोक्तृभि: शेषाणाम् अर्थयोगेन छन्द: कार्यम् |

**अर्थ** – वीररसामध्ये जे छंद सांगितले आहेत, तेच छंद रौद्ररसामध्ये देखील वापरावेत . नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी उरलेल्या रसांमध्ये अर्थानुसार छंदाचा वापर करावा .

**यच्छन्द: पूर्वमुद्दिष्टं विषमार्धसमे समम् |**
**उदारमधुरै: शब्दैस्तत्कार्यं तु रसानुगम् || १२२ ||**

**पदच्छेद: –** यत् छन्द: पूर्वम् उद्दिष्टम् विषम-अर्धसमे समम् |
उदार-मधुरै: शब्दै: तत् कार्यम् तु रस-अनुगम् || १२२ ||

**अन्वय: –** यत् विषमार्धसमे समम् छन्द: पूर्वम् उद्दिष्टम् तत् उदारमधुरै: शब्दै: तु रसानुगम् कार्यम् |

**अर्थ –** जे विषम, अर्धसम आणि सम छंद पूर्वी सांगितले आहेत त्यांचा, उदार आणि मधुर शब्दांद्वारे रसानुसार वापर करावा .

**नाट्याश्रयासु कृतिषु प्रयतेत कर्तुम् |**
**तैर्भूषिता भुवि विभान्ति हि काव्यबन्धा:**
**पद्माकरा विकसिता इव राजहंसै: || १२३ || (वृत्तम्- वसन्ततिलकम्)**

**पदच्छेद: –** शब्दान् उदारमधुरान् प्रमदाभिधेयान्
नाट्याश्रयेषु कृतिषु प्रयतेत कर्तुम् |
तै: भूषिता: भुवि विभान्ति हि काव्यबन्धा:
पद्माकरा: विकसिता: इव राजहंसै: || १२३ ||

**अन्वय: –** नाट्याश्रयेषु कृतिषु उदारमधुरान् प्रमदाभिधेयान् शब्दान् कर्तुम् प्रयतेत | तै: भूषिता: काव्यबन्धा: हि राजहंसै: विकसिता: पद्माकरा: इव भुवि विभान्ति |

**अर्थ –** नाट्यावर आधारित रचनांमध्ये उदार आणि मधुर तसेच हर्ष उत्पन्न करणाऱ्या शब्दांचा वापर केला पाहिजे . असे शब्दार्थांनी सुशोभित सर्व काव्यबंध हे राजहंसांनी शोभून दिसणाऱ्या कमलयुक्त तलावाप्रमाणे सुंदर दिसतात .

### ❖ पाठ्यामध्ये अक्षरांचा वापर ❖

**त्रिविधं ह्यक्षरं कार्यं कविभिर्नाटकाश्रयम् |**
**ह्रस्वं दीर्घं प्लुतं चैव रसभावविभावकम् || १२४ ||**

**पदच्छेद:** – त्रिविधम् हि अक्षरम् कार्यम् कविभि: नाटकाश्रयम् |
ह्रस्वम् दीर्घम् प्लुतम् च एव रसभाव-विभावकम् || १२४ ||

**अन्वय:** – कविभि: नाटकाश्रयम् रसभावविभावकम् ह्रस्वम् दीर्घम् एव च प्लुतम् हि त्रिविधम् अक्षरम् कार्यम् |

**अर्थ** – कवींनी नाटकाच्या रचनेमध्ये रस आणि भावांच्या अभिव्यक्तिसाठी ह्रस्व, दीर्घ आणि प्लुतसंज्ञक अशा त्रिविध अक्षरांचा वापर करावा .

**एकमात्रं भवेद्ह्रस्वं द्विमात्रं दीर्घमुच्यते |**
**प्लुतं चैव त्रिमात्रं स्यादक्षरं स्वरयोजनात् || १२५ ||**

**पदच्छेद:** – एकमात्रम् भवेत् ह्रस्वम् द्विमात्रम् दीर्घम् उच्यते |
प्लुतम् च एव त्रिमात्रम् स्यात् अक्षरम् स्वरयोजनात् || १२५ ||

**अन्वय:** – स्वरयोजनात् एकमात्रम् ह्रस्वम् भवेत् द्विमात्रम् दीर्घम् उच्यते एव च त्रिमात्रम् अक्षरम् 'प्लुतम्' स्यात् |

**अर्थ** – स्वरांच्या योजनेनुसार एकमात्रा असलेला वर्ण 'ह्रस्व' असतो, दोन मात्रांचा वर्ण 'दीर्घ' म्हटला जातो आणि तसेच तीन मात्रा असलेल्या अक्षराला 'प्लुत' म्हणावे .

**स्मृते चासूयिते चैव तथा च परिदेविते |**
**पठतां ब्राह्मणानां च प्लुतमक्षरमिष्यते || १२६ ||**

**पदच्छेद:** – स्मृते च असूयिते तथा च परिदेविते |
पठताम् ब्राह्मणानाम् च प्लुतम् अक्षरम् इष्यते || १२६ ||

**अन्वय:** – स्मृते च असूयिते तथा च परिदेविते ब्राह्मणानाम् च पठताम् प्लुतम् अक्षरम् इष्यते |

**अर्थ** – कुठल्या तरी वस्तूची आठवण, असूया (ईर्ष्या), रडण्यामध्ये आणि ब्राह्मणांच्या वेदपठनामध्ये प्लुत अक्षरांचा वापर करावा .

**अकारस्तु स्मृते कार्य ऊकारश्चाप्यसूयिते |**
**परिदेविते तु हाकार ओङ्कारोऽध्ययने तथा || १२७ ||**

**पदच्छेद :** – अकार : तु स्मृते कार्य : ऊकार : च अभ्यसूयिते |
परिदेविते तु हाकार : ओङ्कार : अध्ययने तथा || १२७ ||

**अन्वय :** – अकार : स्मृते, ऊकार : अभ्यसूयिते, हाकार परिदेविते तथा ओङ्कार : अध्ययने कार्य : |

**अर्थ** – स्मरणामध्ये अकाराचा, अभ्यसूया दर्शविताना ऊकाराचा, रडण्यामध्ये 'हा' चा आणि वेदाध्ययनामध्ये 'ओम्' चा वापर करावा .

**ह्रस्वदीर्घप्लुतानीह यथाभावं यथारसम् |**
**काव्ययोगेषु सर्वेषु ह्यक्षराणि प्रयोजयेत् || १२८ ||**

**पदच्छेद :** – ह्रस्व-दीर्घ-प्लुतान् इह यथाभावम् यथारसम् |
काव्ययोगेषु सर्वेषु हि अक्षराणि प्रयोजयेत् || १२८ ||

**अन्वय :** – इह सर्वेषु काव्ययोगेषु यथाभावम् यथारसम् ह्रस्वदीर्घप्लुतान् हि अक्षराणि प्रयोजयेत् |

**अर्थ** – सर्व प्रकाराच्या काव्यबंधामध्ये रस आणि भावांप्रमाणे ह्रस्व, दीर्घ, आणि लुप्त अक्षरांचा वापर करावा .

**चेक्रीडितप्रभृतिभिर्विकृतैस्तु शब्दै-**
**र्युक्ता न भान्ति ललिता भरतप्रयोगा : |**
**यज्ञक्रियेव मृगचर्मधरैर्घृताक्तै-**
**र्वेश्या द्विजैरिव कमण्डलुदण्डहस्तै : || १२९ ||**
**(वृत्तम्- वसन्ततिलकम्)**

**पदच्छेद :** – चेक्रीडितप्रभृतिभि : विकृतै : तु शब्दै :
युक्ता : न भान्ति ललिता : भरतप्रयोगा : |
यज्ञक्रिया इव मृगचर्मधरै : घृताक्तै :
वेश्या द्विजै : इव कमण्डलुदण्डहस्तै : || १२९ ||

**अन्वय :** – वेश्या : मृगचर्मधरै : घृताक्तै : कमण्डलुदण्डहस्तै : द्विजै : इव यज्ञक्रिया : न भान्ति | तथैव

चेक्रीडितप्रभृतिभिः विकृतैः शब्दैः युक्ताः ललिताः भरतप्रयोगाः न भान्ति | (वेश्याः वेश्यापरिग्रहे - अ. भा.)

**अर्थ** – ज्याप्रमाणे वेश्या सोबत असेल तर मृगचर्म धारण केलेला तूपाने माखलेला हातात कमंडलू आणि दंड धारण करणारा ब्राह्मण असला तरीदेखील यज्ञक्रिया शोभून दिसत नाही त्याचप्रमाणे चेक्रीडितादि शब्दांद्वारे ललित काव्य शोभून दिसत नाही.

('चेक्रीडित' हे पद यङन्त आहे. आदि या शब्दाने ण्यन्त किंवा सन्नन्त पदांचा निर्देश होतो. अशा शब्दांचा प्रयोग नटांसाठी अनुचित आहे. कारण नटांचे शब्दप्रयोग ललित असतात. अन्यथा नाट्यप्रयोग शोभून दिसत नाही.)

**मृदुललितपदार्थं गूढशब्दार्थहीनं**
**बुधजनसुखभोग्यं युक्तिमन्नृत्तयोज्यम् |**
**बहुरसकृतमार्गं सन्धिसन्धानयुक्तं**
**भवति जगति योग्यं नाटकं प्रेक्षकाणाम् || १३० || (वृत्तम्- मालिनी)**

**पदच्छेदः** – मृदु-ललित-पदार्थम् गूढ-शब्दार्थ-हीनम्
बुधजन-सुखभोग्यम् युक्तिमत् नृत्तयोज्यम् |
बहुरस-कृतमार्गम् सन्धि-सन्धान-युक्तम्
भवति जगति योग्यम् नाटकम् प्रेक्षकाणाम् || १३० ||

**अन्वयः** – मृदु-ललित-पदार्थम् गूढ-शब्दार्थ-हीनम् बुधजन-सुखभोग्यम् युक्तिमत् नृत्तयोज्यम् बहुरस-कृतमार्गम् सन्धि-सन्धान- युक्तम् नाटकम् जगति प्रेक्षकाणाम् योग्यम् भवति |

**अर्थ** – ज्यामध्ये शब्दांचा मृदु आणि ललित अर्थ असेल, ज्यात शब्दांचे गूढ अर्थ नसतील, जे बुद्धिमान लोकांना सुखाने उपभोगता येईल, ज्यामध्ये युक्तिपूर्वक नृत्य योजले असेल, ज्यामध्ये अनेक रसांसाठी मार्ग खुला केला असेल, आणि जे संधी व संध्यंगे यांनी जोडलेले असेल असे नाटक जगामध्ये प्रेक्षकांसाठी योग्य होईल.

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे काव्यलक्षणम् नाम षोडशोऽध्यायः ||**

**|| अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील 'काव्यलक्षण' नावाचा सोळावा अध्याय संपला ||**

# सतरावा अध्याय

# काकुस्वरव्यञ्जन



# सतरावा अध्याय

## (वाचिक अभिनयातील) काकुस्वरव्यंजन

**एवं तु संस्कृतं पाठ्यं मया प्रोक्तं समासत:।**
**प्राकृतस्य तु पाठ्यस्य संप्रवक्ष्यामि लक्षणम्॥१॥**

**पदच्छेद:** – एवम् तु संस्कृतम् पाठ्यम् मया प्रोक्तम् समासत:।
प्राकृतस्य तु पाठ्यस्य संप्रवक्ष्यामि लक्षणम्॥१॥

**अन्वय:** – एवम् तु मया संस्कृतम् पाठ्यम् समासत: प्रोक्तम्। प्राकृतस्य तु पाठ्यस्य लक्षणम् संप्रवक्ष्यामि। (पाठविशेषमर्हति, यत्नेन वा पठनीयं, विशिष्टेन रूपेण वा पठनार्हम् आन्तरचित्तवृत्तिवशादेव वा तथा पठितुं शक्यम्, आचार्ययत्नेन वा पठनीयमिति पाठ्यम्। - अ.भा.)

**अर्थ** – अशा रीतीने मी तुम्हांला संस्कृत पाठ्याविषयी थोडक्यात सांगितले. आता प्राकृत पाठ्याची लक्षणे सांगेन.
(याठिकाणी पाठ्य म्हणजे विशेष पाठ. जे प्रयत्नपूर्वक वाचले जाते किंवा विशेष रूपाने वाचले जाते किंवा जे आंतरीक चित्तवृत्तीला वश होऊन वाचणे शक्य आहे किंवा आचार्यांकडून प्रयत्नपूर्वक जे वाचले जाते ते पाठ्य होय. - अ.भा.)

**❖ प्राकृत पाठ्याचेलक्षण ❖**

**एतदेव विपर्यस्तं संस्कारगुणवर्जितम्।**
**विज्ञेयं प्राकृतं पाठ्यं नानावस्थान्तरात्मकम्॥२॥**

**पदच्छेद:** – एतत् एव विपर्यस्तम् संस्कारगुण-वर्जितम्।
विज्ञेयम् प्राकृतम् पाठ्यम् नानावस्थान्तरात्मकम्॥२॥

**अन्वय:** – एतत् एव विपर्यस्तम् संस्कारगुणवर्जितम् नानावस्थान्तरात्मकम्, प्राकृतम् पाठ्यम् विज्ञेयम्।

(प्रकृते: स्वभावात् आगतं प्राकृतम्, व्याकरणादिभि: संस्कारेण संस्कृता भाषा संस्कृतभाषा ||)

**अर्थ** – याविरुद्ध (पूर्वी सांगितलेल्या संस्कृत पाठ्याविरुद्ध) असणारे, संस्कार आणि गुणरहित, देशप्रांतानुसार विविध स्वरूपात असणारे जे पाठ्य, त्याला 'प्राकृत पाठ्य' असे समजावे.

(निसर्गिक स्वभावानुसार आलेली भाषा प्राकृतभाषा होय आणि व्याकरण इत्यादींचे संस्कार ज्या भाषेवर झाले आहेत ती भाषा संस्कृतभाषा होय.)

### ❖ प्राकृत पाठ्याचे तीन प्रकार ❖

**त्रिविधं तच्च विज्ञेयं नाट्ययोगे समासत:|**
**समानशब्दं विभ्रष्टं देशीगतमथापि च || ३ ||**

**पदच्छेद :** – त्रिविधम् तत् च विज्ञेयम् नाट्ययोगे समासत:|
समानशब्दम् विभ्रष्टम् देशीगतम् अथ अपि च || ३ ||

**अन्वय :** – तत् च नाट्ययोगे समासत: त्रिविधम् विज्ञेयम् - समानशब्दम्, विभ्रष्टम् अथ अपि देशीगतम् च|

**अर्थ** – नाट्यप्रयोगामध्ये या 'प्राकृत' पाठ्याचे तीन प्रकार आहेत.
१) तत्सम २) विभ्रष्ट आणि ३) देशीगत.

### ❖ तत्सम पाठ्य ❖

**पाठ्यमेकं तु विज्ञेयं संस्कृतं प्राकृतं यथा |**
**कमलामलरेणुतरङ्गलोलसलिलादिवाक्यं संपन्नम्|**
**प्राकृतबन्धेष्वेवं संस्कृतमपि योगमुपयाति || ४ ||**

**पदच्छेद :** – पाठ्यम् एकम् तु विज्ञेयम् संस्कृतम् प्राकृतम् यथा |
कमल-अमल-रेणु-तरङ्ग-लोल-सलिल-आदि-वाक्यम् संपन्नम् |
प्राकृतबन्धेषु एवम् संस्कृतम् अपि योगम् उपयाति || ४ ||

**अन्वय :** – एकम् पाठ्यम् तु विज्ञेयम् यथा संस्कृतम् तथा प्राकृतम् | कमल-अमल-रेणु-तरङ्ग-लोल-सलिल-आदि-वाक्यम् संपन्नम् | एवम् प्राकृतबन्धेषु संस्कृतम् अपि योगम् उपयाति |

**अर्थ** – पहिल्या प्रकारचा पाठ म्हणजे तत्सम पाठ ज्यामध्ये संस्कृत शब्द प्राकृत पाठात जसेच्या तसे वापरले जातात. उदाहरणार्थ - प्राकृत काव्यामध्येही कमल, अमल, रेणु, तरंग, लोल, सलिल इत्यादी शब्द असणारे सामासिक वाक्य रचता येते. अशा रीतीने समासांचा वापर करून प्राकृत काव्यामध्ये संस्कृतरचना करता येते.

### ❖ विभ्रष्ट पाठ्य ❖

**ये वर्णा: संयोगस्वरवर्णान्यत्वमूनतां चापि |**
**यान्त्यपदादौ प्रायो विभ्रष्टांस्तान्विदुर्विप्रा: ||५||**

**पदच्छेद :** – ये वर्णा: संयोग-स्वर-वर्ण-अन्यत्वम् ऊनताम् च अपि |
यान्ति अपदादौ प्राय: विभ्रष्टान् तान् विदु: विप्रा: ||५||

**अन्वय :** – प्राय: अपदादौ ये वर्णा: संयोगस्वरवर्णान्यत्वम् ऊनताम् यान्ति तान् विप्रा: विभ्रष्टान् विदु: |

**अर्थ** – बहुधा शब्दाच्या आरंभी नसलेले जे वर्ण संयुक्त अक्षर झाल्याने किंवा स्वरांचा वापर केल्याने संस्कृतेतर स्वरूप प्राप्त करतात आणि कमजोर होतात, त्या वर्णांना बुद्धिमान 'विभ्रष्ट' असे म्हणतात.

### ❖ प्राकृत पाठ्याचे नियम ❖

**ये वर्णा वर्णगता व्यञ्जनयुक्ताश्च ये स्वरा नियता: |**
**तानपरस्परवृत्ते प्राकृतयुक्त्या प्रवक्ष्यामि || ६ ||**

**पदच्छेद :** – ये वर्णा: वर्णगता: व्यञ्जनयुक्ता: च ये स्वरा: नियता: |
तान् अपरस्परवृत्ते प्राकृतयुक्त्या प्रवक्ष्यामि || ६ ||

**अन्वय :** – ये वर्णा : वर्णगता : ये च व्यञ्जनयुक्ता : नियता : स्वरा :, अपरस्परवृत्ते तान् प्राकृतयुक्त्या प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – ज्या वर्णांना वर्णस्वरूप मिळालेले आहे आणि जे व्यंजनांसोबत असलेले ठराविक स्वर आहेत, त्यांचा एकमेकांशी संबंध नसला तरी प्राकृत भाषेनुसार त्या सर्वांचे वर्णन मी करत आहे .

**एओआरपराणिअ अं आरपारं अ पाअए णत्थि |**
**वसआरमज्झिमाइ अ कचवग्गतवग्गणिहणाइं || ७ ||**

**[संस्कृते यथा = ऐ औ अ : ऋ ॠ ऌ ॡ वर्णा न हि प्राप्यन्ते प्राकृते |**
**ङञनशषाश्चैतेऽपि हि एवं द्वादश वर्णास्तथा || ७ || (आर्या)]**

**पदच्छेद :** – एओआरपराणि अ : अंआरपारम् अ पाअए णत्थि |
वसआरमज्झिमाइ अ कचवग्ग-तवग्गाणिहणाई || ७ ||

**[पदच्छेद :**– (संस्कृते यथा) = ऐ औ अ : ऋ ॠ ऌ ॡ वर्णा : न हि प्राप्यन्ते प्राकृते |
ङञनशषा : च एते अपि हि एवम् द्वादश वर्णा : तथा || ७ ||]

**अन्वय :** – एओ आरपराणि अ: अंआरपारम् अ पाअए वसआरमज्झिमाइ अ कचवग्गतवगणिहणाई णत्थि |

**[अन्वय :**– (संस्कृते यथा) = प्राकृते एवम् हि द्वादश वर्णा : न हि प्राप्यन्ते – ऐ औ अ : ऋ ॠ ऌ ॡ तथा ङञनशषा : च एते अपि |]

**अर्थ** – ए ओ सोडून (ऐ औ), आणि अनुस्वार सोडून म्हणजे विसर्ग (अ:) तसेच पाद म्हणजे चार (ऋ ॠ ऌ ॡ ) सोडून, व आणि स यांमधील वर्ण (श, ष) सोडून आणि क वर्ग, च वर्ग, त वर्ग यांची शेवटची वर्णे (ङ ञ आणि न) प्राकृतमध्ये नसतात .
(प्राकृतभाषेमध्ये हे बारा वर्ण आढळत नाहीत जसे – ऐ औ अ : ऋ ॠ ऌ ॡ श ष ङ ञ आणि न .)

**वच्चंति कगतदयवा लोपं अत्थं च से वहंति सरा |**
**खघथधभा उण हत्तं उवेंति अत्थं अ मुंचंता || ८ ||**

**[संस्कृते यथा = गच्छन्ति कगतदयवा लोपमर्धं च ते वहन्ति स्वरा:|**
**खघथधभा हत्वं खलु गच्छन्त्यर्धं च मुञ्चन्ति || ८ || (आर्या)]**

**पदच्छेद :-** वच्चंति कगतदयवा लोपम् अत्थम् च से वहंति सरा |
खघथधभा उण हत्तम् उवेंति अत्थम् अ मुंचंता || ८ ||

**[पदच्छेद :-** संस्कृते यथा = गच्छन्ति कगतदयवा : लोपम् अर्धम् च ते वहन्ति स्वरा : |
खघथधभा : हत्वम् खलु गच्छन्ति अर्धम् च मुञ्चन्ति || ८ ||]

**अन्वय :** - कगतदयवा लोपम् वच्चंति अत्थम् से च सरा वहंति | खघथधभा उण हत्तम् उवेंति अत्थम् अ मुंचंता | (खेट-परिघ-अथ- धान्य-भाव्यादीनां व्यञ्जनस्य हत्वं न भवति | - अ . भा . )

**[अन्वय :-** (संस्कृते यथा) = कगतदयवा : लोपम् गच्छन्ति ते स्वरा : च अर्धं वहन्ति | खघथधभा : हत्वम् खलु गच्छन्ति अर्धं च मुञ्चन्ति |]

**अर्थ** - क, ग, त, द, य आणि व यांचा लोप होतो आणि त्यांचा अर्धा भाग स्वरच असतो . ख, घ, थ, ध, भ या अक्षरांचे 'ह' मध्ये परिवर्तन होते . (परंतु खेट, परिघ, अथ, धान्य आणि भाव्य इत्यादी शब्दांमध्ये ख, घ, थ, ध, भ या अक्षरांचे 'ह' मध्ये परिवर्तन होत नाही . - अ . भा . )

**उप्परहुत्तरआरो हेटाहुत्तौ अ पाअए णत्थि |**
**मोत्तूण भद्रचोद्रह पद्रहदचन्द्रजाई स || ९ ||**

**[संस्कृते यथा = कस्यचिदेव शब्दस्य उपर्यधो न रेफ: पादे भवति |**
**नैव खलु भद्रचोद्रह-पद्रहदचन्द्रधात्रीषु || ९ || (आर्या)]**

**पदच्छेद :-** उप्परहुत्तरआरो हेटाहुत्तौ अ पाअए णत्थि |
मोत्तूण भद्रचोद्रह पद्रहदचन्द्रजाई स || ९ ||

**[पदच्छेद :-** संस्कृते यथा = कस्यचित् एव शब्दस्य उपरि अधो न रेफ : पादे भवति |
न एव खलु भद्र-चोद्रह-पद्र-हद-चन्द्र-धात्रीषु || ९ ||]

**अन्वय: –** उप्परहुत्तरआरो हेटाहुत्तो अ पाअए णत्थि | मोत्तूण भद्रवोद्रह पद्रहदवचन्दजाई स ||

**[अन्वय:–** (संस्कृते यथा) = पादे कस्यचित् एव शब्दस्य उपरि अधो वा रेफ: न भवति | न एव खलु भद्र-चोद्रह-पद्र-हद- चन्द्र-धात्रीषु |]

**अर्थ –** प्राकृत श्लोकातील चरणामध्ये वर किंवा खाली कोठेही रफार होत नाही. परंतु भद्र, चोद्रह, हद, चंद्र, धात्री या शब्दांसाठी हा नियम लागू पडत नाही.

**खघथधभाण हआरो मुहमेहकहावहूपहूएसु |**
**खगतदयवाण णिच्चं वीयम्मि ठिओ सरो होइ || १० ||**

**[संस्कृते यथा = खघथधभानां ह एव मुख-मेघ-कथा-वधू-प्रभुषु |**
**कगतदयवानां चैव द्वितीय: स्वरो ध्रुवो भवति || १०|| (आर्या)]**

**पदच्छेद: –** खघथधभाण हआरो मुह-मेह-कहा-वहू-पहूपु |
खगतदयवाण णिच्चम् वीयम्मि ठिओ सरो होइ || १०|| (आर्या)

**[पदच्छेद:–** संस्कृते यथा = खघथधभानाम् 'ह' एव मुख-मेघ-कथा-वधू-प्रभुषु खलु |
कगतदयवानाम् च एव द्वितीय स्वर: ध्रुव: भवति || १० ||]

**अन्वय: –** खधथधभाण हआरो मुहमेहकहावहूपहूएसु | कगतदयवाण णिच्चम् वीयम्मि ठिओ सरो होइ |

**[अन्वय:–** (संस्कृते यथा) = प्राकृते खधथधभानाम् मुख्र-मेघ-कथा-वधू-प्रभुषु 'ह' एव भवति | कगतदयवानाम् च द्वितीय: स्वर: ध्रुव: भवति |]

**अर्थ –** ख, घ, थ, ध, भ या वर्णांचा प्राकृतामध्ये 'ह' होतो. उदाहरणार्थ = मुख - मुह, मेघ - मेह, कथा - कहा, वधू - वहू, आणि प्रभू - पहू होते. तसेच क, ग, त, द, य, व या वर्णांच्या बाबतीत नेहमी दुसरा भाग म्हणजे स्वर गृहीत धरला जातो. जसे - प्रस्तुत श्लोकामध्ये 'हकारो' ऐवजी प्राकृतमध्ये 'हआरो' असा क-वर्जित प्रयोग होतो.

**छ इति षकारो नित्यं बोद्धव्य: षट्पदादियोगेषु |**
**किलशब्दान्त्यो रेफो भवति तथा खु त्ति खलुशब्द: || ११ ||**

**पदच्छेद :-** छ इति पकार : नित्यम् बोद्धव्य : षटपदादि-योगेषु |
किलशब्दान्त्य : रेफ : भवति तथा खु त्ति खलुशब्द : || ११ ||

**अन्वय : -** षट्पदादियोगेषु नित्यम् षकार : इति छ बोद्धव्य : | किलशब्दान्त्य : रेफ : भवति तथा खलुशब्द : खु त्ति (इति) |

**अर्थ -** प्राकृतामध्ये षट्पद इत्यादी शब्दांमध्ये 'ष' चा 'छ' होतो . जसे - छट्पद . किल् शब्दाच्या शेवटचा वर्ण 'र्' होतो . जसे किर् आणि खलु शब्दाचा 'खु' होतो .

**ड इति च भवति टकारो भटकटककुटीतटाद्येषु |**
**सत्वं च भवति शषयो : सर्वत्र यथा विसं संका || १२ ||**

**पदच्छेद :-** ड इति च भवति टकार : भट-कटक-कुटी-तट-आद्येषु |
सत्वम् च भवति शषयो : सर्वत्र यथा विसम् संका || १२ ||

**अन्वय : -** भटकटककुटीतटाद्येषु च टकार : 'ड' इति भवति | शषयो : सर्वत्र सत्वम् स भवति यथा विसम् संका |

**अर्थ -** प्राकृतामध्ये भट, कटक, कुटी आणि तट वगैरे शब्दातील 'ट' चा 'ड' होतो . जसे - भड, कडक, कुडी, तड .
श, ष च्या जागी सगळीकडे 'स' होतो . जसे - विषं = विसं, शङ्का = संका

**अस्पष्टश्च दकारो भवत्यनादौ तकार इतराद्य : |**
**बडवातडागतुल्यो भवति डकारोऽपि च लकार : || १३ ||**

**पदच्छेद :-** अस्पष्ट : च दकार : भवति अनादौ तकार : इतराद्य : |
वडवा-तडागतुल्य : भवति डकार : अपि च लकार : || १३ ||

**अन्वय : -** अनादौ इतराद्य : अस्पष्ट : तकार : दकार : भवति | वडवातडागतुल्य : डकार : अपि च लकार : भवति |

**अर्थ -** शब्दाच्या आरंभी नसलेल्या अस्पष्ट (लघुप्रयत्न) असणाऱ्या 'त' चा असा 'द' होतो . जसे - इतर = इदर इत्यादी . अन्यत्र देखील लघुप्रयत्न असलेल्या डकाराचा 'लकार' होतो . जसे - बडवा = बलवा, तडाग = तलाओ .

**वर्धनगते च भावे धकारवर्णोऽपि ढत्वमुपयाति |**
**सर्वत्र च प्रयोगे भवति नकारोऽपि च णकार: || १४ ||**
**आपानं आवाणं भवति पकारेण वत्वयुक्तेन |**
**अयथातथादिकेषु तु थकारवर्णो व्रजति हत्वम् || १५ ||**

**पदच्छेद: –** वर्धन-गते च भावे धकारवर्ण: अपि ढत्वम् उपयाति |
सर्वत्र च प्रयोगे भवति नकार: अपि च णकार: || १४ ||
आपानम् आवाणम् भवति पकारेण वत्व-युक्तेन |
अयथा-तथादिकेषु तु थकारवर्ण: व्रजति हत्वम् || १५ ||

**अन्वय: –** भावे वर्धनगते धकारवर्ण: अपि ढत्वम् उपयाति | सर्वत्र प्रयोगे च नकार: अपि च णकार: भवति | पकारेण वत्वयुक्तेन आपानम् आवाणम् भवति | अयथातथादिकेषु तु थकारवर्ण: हत्वम् व्रजति |

**अर्थ –** भावातील विस्ताराच्या वेळी 'धकार' चा 'ढकार' होतो . जसे - वर्धन = वर्ढन . सर्व प्रयोगांमध्ये 'नकार' च्या जागी 'णकार' होतो . जसे - नमो = णमो . तसेच 'पकारा'चा 'वकार' होतो . जसे - आपानं = आवाणं आणि यथा - तथा वगळून बाकीच्या वेळी 'थ' चा 'ह' होतो . जसे - कथा = कहा

**परुषं फरुसं विद्यात्पकारवर्णोऽपि फत्वमुपयाति |**
**यस्तु मृत: सोऽपि मओ यश्च मृग: सोऽपि हि तथैव || १६ ||**

**पदच्छेद: –** परुषम् फरुसम् विद्यात् पकारवर्ण: अपि फत्वम् उपयाति |
य: तु मृत: स: अपि मओ य: च मृग: स: अपि हि तथा एव || १६ ||

**अन्वय: –** पकारवर्ण: अपि फत्वम् उपयाति यथा परुषम् फरुसम् विद्यात् | य: तु मृत: स: अपि मओ य: च मृग: स: अपि तथा एव |

**अर्थ –** प्राकृत भाषेमध्ये 'प' चा 'फ' होतो . जसे - परुषम् = फरुषम् . जो 'मृत' आहे तो 'मओ' होतो आणि जो 'मृग'तो ही त्याचप्रमाणे 'मओ' होतो .

**ओकारत्वं गच्छेदौकारश्चौषधादिषु नियुक्तः ।**
**प्रचलाचिराचलादिषु भवति चकारोऽपि तु यकारः ॥ १७ ॥**

**पदच्छेदः -** ओकारत्वम् गच्छेत् औकारः च औषधादिषु नियुक्तः ।
प्रचल-अचिर-अचल-आदिषु भवति चकारः अपि तु यकारः ॥ १७ ॥

**अन्वयः -** औषधादिषु च नियुक्तः औकारः ओकारत्वम् गच्छेत् । प्रचलाचिराचलादिषु अपि चकारः तु यकारः भवति ।

**अर्थ -** औषध इत्यादींमध्ये वापरलेल्या औ' च्या जागी 'ओ' होतो. जसे - ओषध. तसेच प्रचल, अचिर, अचल इत्यादींमध्ये असलेला 'च' त्याचा, 'य' होतो उदा. प्रचल - प्रयल, अचिर - अयिर, अचल - अयल.

**❖ प्राकृत भाषेतील जोडाक्षरे ❖**

**अपरस्परनिष्पन्ना ह्येवं प्राकृतसमाश्रया वर्णाः ।**
**संयुक्तानां तु पुनर्वक्ष्ये परिवृत्तिसंयोगम् ॥ १८ ॥**

**पदच्छेदः -** अपरस्पर-निष्पन्नाः हि एवम् प्राकृत-समाश्रयाः वर्णाः ।
संयुक्तानाम् तु पुनः वक्ष्ये परिवृत्ति-संयोगम् ॥ १८ ॥

**अन्वयः -** एवम् हि प्राकृतसमाश्रयाः अपरस्परनिष्पन्नाः वर्णाः कथिताः । संयुक्तानाम् तु परिवृत्तिसंयोगम् पुनः वक्ष्ये ।

**अर्थ -** अशा प्रकारे, प्राकृतभाषेत जे शब्द जोडलेले नसतात त्यांविषयी सांगितले. आता, प्राकृत भाषेतील जोडाक्षरांचे नियम सांगेन.

**श्चप्सत्सथ्याः छ इति तथा भ्यह्यध्या भवन्ति तु झकाराः ।**
**ष्टः ट्ठः, स्तः त्थः, ष्मो म्ह, क्ष्णो ह्णः, ष्णो ण्हः, क्षः खकाररूपोऽपि ॥ १९ ॥**

**पदच्छेदः -** श्चप्सत्सथ्याः छः इति तथा भ्यह्यध्याः भवन्ति तु झकाराः ।
ष्टः ट्ठः, स्तः त्थः, ष्मः म्ह, क्ष्णः ह्णः, ष्णः ण्हः, क्षः खकाररूपः अपि ॥ १९ ॥

**अन्वयः –** श्चप्सत्सथ्याः छः इति तथा भ्यह्यध्याः तु झकाराः अपि ष्टः ट्ठः, स्तः त्थः, ष्मः म्ह, क्ष्णः ह्णः, ष्णः ण्हः, क्षः खकाररूपः भवन्ति।

**अर्थ –** अ) श्च, प्स, त्स आणि थ्य यांचा 'छ' होतो. (जसे - निश्चयः=णिच्छओ, पश्चिमः=पच्छिमो, लिप्सा=लिच्छा, जुगुप्सा=जुउच्छा. वत्सः=वच्छो, उत्साहः=उच्छाहो. रथ्या=रच्छा, मिथ्या=मिच्छा.)

आ) भ्य, ह्य, ध्य, चा 'झ' होतो. (जसे - तुभ्यं=तुज्झं, मह्यं=मज्झं, विन्ध्य=विंज्झ.)

इ) त्याचप्रमाणे ष्ट चा ट्ठ, स्त चा त्थ, ष्म चा म्ह, क्ष्ण चा ह, ष्ण चा ण्ह, तसेच क्ष चा ख होतो. उदाहरणे पुढीलप्रमाणे -

**आश्चर्यं अच्छरियं निश्चयमिच्छन्ति णिच्छ्यं च यथा।**
**वत्सं वच्छं च यथा अप्सरसं तद्वदच्छरअं ॥ २० ॥**

**पदच्छेदः –** आश्चर्यम् अच्छरियम् निश्चयम् इच्छन्ति णिच्छयम् च यथा।
वत्सम् वच्छम् च यथा अपसरसम् तद्वद् अच्छरअम् ॥ २० ॥

**अन्वयः –** आश्चर्यम् अच्छरियम् निश्चयम् च यथा णिच्छयम् यथा च वत्सम् वच्छम् तद्वत् अपसरसम् अच्छरअम् इच्छन्ति।

**अर्थ –** प्राकृतमध्ये आश्चर्यम्=अच्छरियम्, निश्चयम्=निच्छयम्, वत्सम्=वच्छम्, अप्सरसम्=अच्छरअम् असा बदल होतो.

**उत्साहो उच्छाहो पथ्यं च पच्छं विज्ञेयम् ।**
**तुभ्यं तुज्झं मह्यं मज्झं विन्ध्यश्च भवति विंज्झोत्ति ॥ २१॥**

**पदच्छेदः –** उत्साहः उच्छाहो पथ्यम् च पच्छम् विज्ञेयम्।
तुभ्यम् तुज्झम् मह्यम् मज्झम् विन्ध्यः च भवति विंज्झोत्ति ॥ २१ ॥

**अन्वयः –** उत्साहः उच्छाहो पथ्यम् च पच्छम् विज्ञेयम्। तुभ्यम् तुज्झम् मह्यम् मज्झम् विन्ध्यः च विंज्झोत्ति भवति।

**अर्थ** – याचप्रमाणे उत्साह:=उच्छाहो, पथ्य=पच्छ, तुभ्यम्=तुज्झम्, मह्यम्=मज्झम्, विन्ध्य=विंज्झ असा बदल होतो.

**दष्टो दठ्ठोत्ति तहा हस्तोऽपि च भवति हत्थोत्ति |**
**ग्रीष्मो गिम्होत्ति तथा श्लक्ष्णं सह्णं सदा तु विज्ञेयम् || २२ ||**

**पदच्छेद:** – दष्ट: दठ्ठोत्ति तहा हस्त: अपि च भवति हत्थोत्ति |
ग्रीष्म: गिम्होत्ति तथा श्लक्ष्णम् सह्णम् सदा तु विज्ञेयम् || २२ ||

**अन्वय:** – दष्ट: दठ्ठोत्ति तहा हस्त: अपि च हत्थोत्ति भवति | ग्रीष्म: गिम्होत्ति तथा तु श्लक्ष्णम् सदा सह्णम् इति विज्ञेयम् |

**अर्थ** – दष्ट:=दठ्ठो, हस्त:=हत्थो, ग्रीष्म:=गीम्हो, श्लक्ष्णम्=सह्णम् असा बदल नेहमी होतो.

**उष्णं उह्णं यक्षो जक्खो पर्यङ्को भवति पल्लंकु |**
**विपरीतं हमयोगे ब्रह्मादौ स्याद्बृहस्पतौ फत्वम् || २३ ||**

**पदच्छेद:** – उष्णम् उह्णम् यक्ष: जक्खो पर्यङ्क: भवति पल्लंकु |
विपरीतम् हमयोगे ब्रह्मादौ स्यात् बृहस्पतौ फत्वम् || २३ ||

**अन्वय:** – उष्नम् उह्णम्, यक्ष: जक्खो, पर्य' : पल्लंकु भवति | ब्रह्मादौ हमयोगे विपरीतम् बृहस्पतौ फत्वम् स्यात् |

**अर्थ** – त्याचप्रमाणे प्राकृतामध्ये उष्णम् चे उह्णम्, यक्ष:=जक्खो, पर्यङ्क=पल्लंकु होतो. 'ब्रह्म' इत्यादी शब्दातील 'ह्म' जोडाक्षर विरुद्ध जोडले जातात. जसे ब्रह्म या शब्दाचा ब्म्ह होतो. बृहस्पति या शब्दामध्ये 'प' चा 'फ होतो. जसे – बुहप्फई.

**यज्ञो भवति च जन्नो भीष्मो भिम्होत्ति विज्ञेय: |**
**उपरिगतोऽधस्ताद्वा भवेत्ककारादिकस्तु यो वर्ण: || २४ ||**
**स हि संयोगविहीन: शुद्ध: कार्य: प्रयोगेऽस्मिन् |**
**एवमेतत्तु विज्ञेयं प्राकृतं संस्कृतं तथा || २५ ||**

**पदच्छेद :** – यज्ञ : भवति च जन्नो भीष्म : भिम्होत्ति विज्ञेय : |
उपरिगत : अथस्तात् वा भवेत् ककारादिक : तु य : वर्ण : || २४ ||
श : हि संयोगविहीन : शुद्ध : कार्य : प्रयोगे अस्मिन् |
एवम् एतत् तु विज्ञेयम् प्राकृतम् संस्कृतम् तथा || २५ ||

**अन्वय :** – यज्ञ : च जन्नो भवति | भीष्म : भिम्होत्ति विज्ञेय : | य : ककारादिक : तु वर्ण : उपरिगत : अथस्तात् वा भवेत् संयोगविहीन : हि अस्मिन् प्रयोगे शुद्ध : कार्य : | एवम् एतत् तु प्राकृतम् तथा संस्कृतम् विज्ञेयम् |

**अर्थ** – प्राकृतामध्ये 'यज्ञ:' चा 'जन्नो' होतो आणि 'भीष्म' चा 'भिम्ह' होतो . 'ककार' इत्यादींने युक्त जो वर्ण वर किंवा खाली असेल तर नाटकामध्ये त्याच्या वापरासाठी त्यांचा संयोग दूर करून ते शुद्ध करावेत . (रफार वर असो किंवा खाली त्याचा लोप होतो उदा . शक्र - सक्क, अर्थ - अक्क) . याप्रमाणे संस्कृत आणि प्राकृत भाषेतील पाठ्य समजून घ्यावे .

### ❖ चार प्रकारच्या भाषा ❖

**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि देशभाषाविकल्पनम् |**
**भाषा चतुर्विधा ज्ञेया दशरूपे प्रयोगत: || २६ ||**
**संस्कृतं प्राकृतं चैव यत्र पाठ्यं प्रयुज्यते |**

**पदच्छेद :** – अत : ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि देशभाषा-विकल्पनम् |
भाषा चतुर्विधा ज्ञेया दशरूपे प्रयोगत : || २६ ||
संस्कृतम् प्राकृतम् च एव यत्र पाठ्यम् प्रयुज्यते |

**अन्वय :** – अत : ऊर्ध्वम् देशभाषाविकल्पनम् प्रवक्ष्यामि | दशरूपे यत्र संस्कृतम् प्राकृतम् च पाठ्यम् प्रयुज्यत तत्र प्रयोगत : भाषा चतुर्विधा ज्ञेया |

**अर्थ** – आता, यानंतर प्रादेशीय भाषांविषयी सांगेन . दशरूपकामध्ये जेथे संस्कृत आणि प्राकृत भाषांचा वापर केला जातो, तेथे प्रयोगानुसार चार प्रकारच्या भाषा जाणून घ्याव्यात .

**अतिभाषार्यभाषा च जातिभाषा तथैव च || २७ ||**
**तथा योन्यन्तरी चैव भाषा नाट्ये प्रकीर्तिता |**

**पदच्छेद :–** अतिभाषा आर्यभाषा च जातिभाषा तथा एव च || २७ ||
तथा योन्यन्तरी च एव भाषा नाट्ये प्रकीर्तिता |

**अन्वय :** – अतिभाषा, आर्यभाषा, जातिभाषा तथा एव योन्यन्तरी च भाषा नाट्ये प्रकीर्तिता |

**अर्थ** – नाटकामध्ये चार भाषा सांगितल्या जातात .
१) अतिभाषा  २) आर्यभाषा  ३) जातिभाषा  ४) योन्यन्तरी

**❖ अतिभाषा व आर्यभाषालक्षण ❖**

**अतिभाषा तु देवानामार्यभाषा तु भूभुजाम् || २८ ||**
**संस्कारपाठ्यसंयुक्ता सम्यङ्न्याय्यप्रतिष्ठिता |**

**पदच्छेद :–** अतिभाषा तु देवानाम् आर्यभाषा तु भूभुजाम् || २८ ||
संस्कारपाठ्यसंयुक्ता सम्यङ्न्याय्यप्रतिष्ठिता |

**अन्वय :** – संस्कारपाठ्यसंयुक्ता अतिभाषा देवानाम् अस्ति | सम्यङ्न्याय्यप्रतिष्ठिता आर्यभाषा तु भूभुजाम् अस्ति |

**अर्थ** – स्वरभेदादिंनी पूर्ण संस्कार झालेला पाठ असलेली भाषा ही अतिभाषा होय जी देवांची भाषा (वैदिक संस्कृत) म्हणून गणली जाते . योग्य न्याय करण्यासाठी ज्या भाषेचा वापर होतो ती आर्यभाषा (शास्त्रीय संस्कृत) ही राजांची मानली जाते .

भाषाविधान



### ❖ जाति भाषेचे लक्षण ❖

**विविधा जातिभाषा च प्रयोगे समुदाहृता || २९ ||**
**म्लेच्छशब्दोपचारा च भारतं वर्षमाश्रिता |**

**पदच्छेद :–** विविधा जातिभाषा च प्रयोगे समुदाहृता || २९ ||
म्लेच्छशब्दोपचारा च भारतम् वर्षम् आश्रिता |

**अन्वय : –** प्रयोगे विविधा जातिभाषा समुदाहृता | म्लेच्छशब्दोपचारा च भारतम् वर्षम् आश्रिता |

**अर्थ –** नाट्यप्रयोगामध्ये विविध जातिभाषांची उदाहरणे सापडतात. म्लेच्छ शब्दांचा वापर असणारी भाषा भारतात सर्वत्र वापरली जाते.

### ❖ योन्यंतरी भाषेचे लक्षण ❖

**अथ योन्यन्तरीभाषा ग्राम्यारण्यपशूद्भवा || ३० ||**
**नानाविहङ्गजा चैव नाट्यधर्मीप्रतिष्ठिता |**

**पदच्छेद :–** अथ योन्यन्तरी भाषा ग्राम्यारण्यपशूद्भवा || ३० ||
नानाविहङ्गजा च एव नाट्यधर्मीप्रतिष्ठिता |

**अन्वय : –** अथ योन्यन्तरी भाषा ग्राम्यारण्यपशूद्भवा | नानाविहङ्गजा च एव नाट्यधर्मीप्रतिष्ठिता | (पशुपक्षिणां यत् रुतं तत् नाट्यप्रयोगे कुत्रापि अवसरे संभाव्यम् इत्याह नाट्यधर्मीति | - अ. भा.)

**अर्थ –** 'योन्यन्तरी' भाषा ही ग्राम्य आणि वन्य पशुपक्ष्यांची भाषा आहे, ज्याचा प्रयोग नाट्यधर्मीप्रमाणे केला जातो. (नाटकामध्ये पाळीव आणि जंगली पशुपक्ष्यांचे संभाषण कुठे असावे हे जिच्यामुळे कळते ती नाट्यधर्मी होय. - अ. भा.)

### ❖ नायकानुसार पाठ्यलक्षण ❖

**आर्यभाषाश्रयं पाठ्यं द्विविधं समुदाहृतम् || ३१ ||**
**प्राकृतं संस्कृतं चैव चातुर्वर्ण्यसमाश्रयम् |**

**पदच्छेद :-** आर्यभाषा-आश्रयम् पाठ्यम् द्विविधम् समुदाहृतम् || ३१ ||
प्राकृतम् संस्कृतम् च एव चातुर्वर्ण्य-समाश्रयम् |

**अन्वय : -** आर्यभाषाश्रयम् द्विविधम् पाठ्यम् समुदाहृतम् | प्राकृतम् एव च संस्कृतम् चातुर्वर्ण्य-समाश्रयम् |

**अर्थ –** आर्यभाषेवर आधारित दोन प्रकारचे पाठ्य असते, प्राकृत आणि संस्कृत . ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चारही वर्णांशी हे संबधित असते .

**धीरोद्धते सललिते धीरोदात्ते तथैव च || ३२ ||**
**धीरप्रशान्ते च तथा पाठ्यं योज्यं तु संस्कृतम् |**
**एषामेव तु सर्वेषां नायकानां प्रयोगत: || ३३ ||**
**कारणव्यपदेशेन प्राकृतं संप्रयोजयेत् |**
**दारिद्र्याध्ययनाभावयदृच्छादिभिरेव च || ३४ ||**

**पदच्छेद :-** धीरोद्धते सललिते धीरोदात्ते तथा एव च || ३२ ||
धीरप्रशान्ते च तथा पाठ्यम् योज्यम् तु संस्कृतम् |
एषाम् एव तु सर्वेषाम् नायकानाम् प्रयोगत : || ३३ ||
कारणव्यपदेशेन प्राकृतम् संप्रयोजयेत् |
दारिद्र्य-अध्ययनाभाव-यदृच्छादिभि : एव च || ३४ ||

**अन्वय : -** धीरोद्धते सललिते धीरोदात्ते तथा च धीरप्रशान्ते तु संस्कृतम् पाठ्यम् योज्यम् | एषाम् सर्वेषाम् नायकानाम् प्रयोगत: एव च कारणव्यपदेशेन दारिद्र्य-अध्ययनाभाव-यदृच्छादिभि: प्राकृतम् संप्रयोजयेत् | (कारणव्यपदेशेन इति - अवस्थादिवशात् यथा अर्जुनस्य बृहन्नलारूपेण प्रच्छन्नस्य कारणान्याहरते - अ . भा . )

**अर्थ –** धीरोद्धत, धीरललित, धीरोदात्त आणि धीरप्रशांत नायकांसाठी संस्कृत भाषेचा वापर करावा . या सर्व नायकांसाठी प्रयोगानुसार अथवा विशेष गरज भासल्यास किंवा दारिद्य, अध्ययन नसणे, नायकाची इच्छा इत्यादी दर्शविताना प्राकृतचा प्रयोग करावा . (कारणव्यपदेशेन म्हणजे विशिष्ट रूप धारण केले असेल तर . जसे, अर्जुनाने बृहन्नलेचा वेश धारण केले असताना तो प्राकृतभाषेत बोलत असे . )

### ❖ प्राकृतभाषेचा वापर ❖

**ऐश्वर्येण प्रमत्तानां दारिद्र्येण प्लुतात्मनाम्।**
**अनधीतोत्तमानां च संस्कृतं न प्रयोजयेत्॥ ३५॥**

**पदच्छेद :–** ऐश्वर्येण प्रमत्तानाम् दारिद्र्येण प्लुतात्मनाम्।
अनधीतोत्तमानाम् च संस्कृतम् न प्रयोजयेत्॥ ३५॥

**अन्वय : –** ऐश्वर्येण प्रमत्तानाम् दारिद्र्येण प्लुतात्मनाम् अनधीतोत्तमानाम् च संस्कृतम् न प्रयोजयेत्।

**अर्थ –** संपत्तीचा नशा असलेले, गरीबीने पछाडलेले, अध्ययन न केलेले, उत्तम आणि सुस्वभावी असले तरीदेखील या पात्रांसाठी संस्कृत भाषेचा वापर करू नये.

**व्याजलिङ्गप्रविष्टानां श्रमणानां तपस्विनाम्।**
**भिक्षुचक्रचराणां च प्राकृतं संप्रयोजयेत्॥ ३६॥**

**पदच्छेद :–** व्याजलिङ्ग-प्रविष्टानाम् श्रमणानाम् तपस्विनाम्।
भिक्षुचक्रचराणाम् च प्राकृतम् संप्रयोजयेत्॥ ३६॥

**अन्वय : –** व्याजलिङ्गप्रविष्टानाम् श्रमणानाम् तपस्विनाम् भिक्षुचक्रचराणाम् च प्राकृतम् संप्रयोजयेत्।(व्याजलिङ्गं ये प्रविष्टाः जीविकाद्यर्थम्। चक्रचराः चक्रेण जीवन्ति। - अ. भा.)

**अर्थ –** उपजीविकेसाठी संन्यासीचा वेष घेणारा, श्रमण, तपस्वी, भिक्षुक आणि इकडे तिकडे फिरून जगणारे या पात्रांसाठी प्राकृत भाषेचा वापर करावा.

**भागवततापसोन्मत्तबालनीचग्रहोपसृष्टेषु।**
**स्त्रीनीचजातिषु तथा नपुंसके प्राकृतं योज्यम्॥ ३७॥**

**पदच्छेद :–** भागवत-तापस-उन्मत्त-बाल-नीच-ग्रह-उपसृष्टेषु।
स्त्रीनीचजातिषु तथा नपुंसके प्राकृतम् योज्यम्॥ ३७॥

**अन्वय : –** भागवततापसोन्मत्तबालनीचग्रहोपसृष्टेषु स्त्रीनीचजातिषु तथा नपुंसके प्राकृतम् योज्यम्।
(उत्तमग्रहैः देवगन्धर्वादिभिराक्रान्तानां संस्कृतभाषेत्यभिप्रायेणाह नीचग्रहेति। नीचग्रहैः

पिशाचादिभिरुपसृष्टेषु स्वीकृतेष्विति | नीचजातयः चण्डालाद्याः | - अ.भा.)
(स्त्री नाम साधारणस्त्रीत्यपेक्ष्यते या सेविकागृहिण्यशास्त्रज्ञाद्यभिनयं करोतीति मे मतिः|)

**अर्थ** – पुजारी, तापसी, उन्मत्त, बालक, पिशाच इत्यादींनी पछाडलेला, स्त्री, चांडाळ आणि नपुंसकांसाठी प्राकृत भाषेचा वापर करावा.

(उत्तम ग्रह म्हणजे देव गंधर्व इत्यादींचा अभिनय करणाऱ्यांची भाषा संस्कृतच असावी हा अभिप्राय लक्षात घेऊन 'नीच ग्रह' असे म्हटले आहे. नीच ग्रह म्हणजे पिशाच, झकीण इत्यादींनी पछाडलेला, नीचजाती म्हणजे चांडाळ इत्यादी. - अ.भा.)

(या श्लोकामध्ये, स्त्री म्हणजे साधारण स्त्री अपेक्षित असावी. नाटकामध्ये सेविका, गृहिणी तसेच शास्त्राध्ययन न केलेल्या महिलेची भूमिका करणाऱ्या स्त्रीपात्रांची भाषा प्राकृत असावी.)

**❖ संस्कृतभाषेचा उपयोग ❖**

**परिव्राण्मुनिशाक्येषु चोक्षेषु श्रोत्रियेषु च |**
**शिष्टा ये चैव लिङ्गस्थाः संस्कृतं तेषु योजयेत् || ३८ ||**

**पदच्छेद :** – परिव्राट्-मुनिशाक्येषु चोक्षेषु श्रोत्रियेषु च |
शिष्टाः ये च एव लिङ्गस्थाः संस्कृतम् तेषु योजयेत् || ३८ ||

**अन्वय :** – परिव्राट्-मुनिशाक्येषु चोक्षेषु श्रोत्रियेषु ये शिष्टाः एव च लिङ्गस्थाः तेषु संस्कृतम् योजयेत् |

**अर्थ** – संन्यासी, बौद्ध भिक्षु, वेदपाठी आणि क्षत्रिय यांमध्ये जे शिष्ट व यती आहेत त्यांच्यासाठी संस्कृत भाषेचा उपयोग करावा.

**❖ स्त्रीपात्रांसाठी पाठ्यलक्षण ❖**

**राज्ञ्याश्च गणिकायाश्च शिल्पकार्यास्तथैव च |**
**कलावस्थान्तरकृतं योज्यं पाठ्यं तु संस्कृतम् || ३९ ||**

**पदच्छेद :** – राज्ञ्याः च गणिकायाः च शिल्पकार्याः तथा एव च |
कलावस्थान्तरकृतम् योज्यम् पाठ्यम् तु संस्कृतम् || ३९ ||

**अन्वयः –** राज्ञ्याः, गणिकायाः, शिल्पकार्याः च कलावस्थान्तरकृतम् तु संस्कृतम् पाठ्यम् योज्यम्। (शिल्पकारिकाः कलासु विदग्धाः। राज्ञः सन्धिविग्रहसम्बन्धं षाड्गुण्यादि तथा शुभाशुभरूपं ग्रहनक्षत्रचेष्टितं पक्षिरुतं च शुभाशुभमिति यत् सर्वं नृपपत्न्या ज्ञेयम्, तस्मात् राज्ञः सा प्रतिशरीरकल्पा कदाचित्संस्कृतयोग्यापि भवति। – अ. भा.)

**अर्थ –** महाराणी, गणिका, वेश्या, शिल्पकारिणी इत्यादी स्त्रीपात्रांसाठी संस्कृत भाषेचा वापर करावा. (शिल्पकारी म्हणजे विविध कलांमध्ये विद्वान असलेली स्त्री. राजाचे संधी आणि विग्रह, सहा गुण, ग्रह व नक्षत्रांचे शुभ अशुभ शकुन आणि पक्ष्यांचे कूजन तसेच जे काही शुभ आणि अशुभ आहे ते सर्व राजाच्या पत्नीस माहित असणे गरजेचे असते. तेव्हा राणीला राजाचा दुसरा देह मानला गेल्याने तिच्या मुखी संस्कृत असणे योग्य आहे.)

### ❖ राणीसाठी पाठ्यलक्षण ❖

**सन्धिविग्रहसंबन्धं तथा च प्राप्तवाग्गतिम्।**
**ग्रहनक्षत्रचरितं खगानां रुतमेव च ॥४०॥**
**सर्वमेतत्तु विज्ञेयं काव्यबन्धे शुभाशुभम्।**
**नृपपत्न्या स्मृतं तस्मात्काले पाठ्यं तु संस्कृतम् ॥४१॥**

**पदच्छेदः –** सन्धिविग्रहसंबन्धम् तथा च प्राप्तवाग्गतिम्।
ग्रहनक्षत्रचरितम् खगानाम् रुतम् एव च ॥४०॥
सर्वम् एतत् तु विज्ञेयम् काव्यबन्धे शुभाशुभम्।
नृपपत्न्या स्मृतम् तस्मात् काले पाठ्यम् तु संस्कृतम् ॥४१॥

**अन्वयः –** सन्धिविग्रहसंबन्धम् प्राप्तवाग्गतिम् ग्रहनक्षत्रचरितम् खगानाम् रुतम् काव्यबन्धे शुभाशुभम् एतत् सर्वम् तु नृपपत्न्या विज्ञेयम् तस्मात् काले तु संस्कृतम् पाठ्यम् स्मृतम्।

**अर्थ –** संधी आणि विग्रहाशी निगडित असलेल्या गोष्टी, वाक्चातुर्य, ग्रह आणि नक्षत्राच्या गतीच्या ज्ञानाविषयी आणि पक्ष्यांचे कूजन, काव्याद्वारे चांगल्या वाईटाचे संकेत हे सर्व राजाच्या पत्नीने म्हणजे राणीने जाणणे आवश्यक असते म्हणून काळानुसार राणीसाठी संस्कृत पाठ्य सांगितले गेले आहे.

**❖ वेश्यांसाठी पाठ्यलक्षण ❖**

**क्रीडार्थं सर्वलोकस्य प्रयोगे च सुखाश्रयम् |**
**कलाभ्यासाश्रयं चैव पाठ्यं वेश्यासु संस्कृतम् || ४२ ||**

**पदच्छेद :–** क्रीडार्थम् सर्वलोकस्य प्रयोगे च सुखाश्रयम् |
कलाभ्यासाश्रयम् च एव पाठ्यम् वेश्यासु संस्कृतम् || ४२ ||

**अन्वय : –** सर्वलोकस्य क्रीडार्थम् प्रयोगे सुखाश्रयम् च कलाभ्यासाश्रयम् एव च वेश्यासु संस्कृतम् पाठ्यम् |

**अर्थ –** सर्व लोकांच्या मनोरंजनासाठी, नाट्यप्रयोग चालू असताना सहज कळणारे आणि विविध कलांचा आश्रय असणारे संस्कृत पाठ्य वेश्यांसाठी वापरावे .

**❖ शिल्पकारिणीसाठी पाठ्यलक्षण ❖**

**कलोपचारज्ञानार्थं क्रीडार्थं पार्थिवस्य च |**
**निर्दिष्टं शिल्पकार्यास्तु नाटके संस्कृतं वच : || ४३ ||**

**पदच्छेद :–** कलोपचारज्ञानार्थम् क्रीडार्थम् पार्थिवस्य च |
निर्दिष्टम् शिल्पकार्या : तु नाटके संस्कृतम् वच : || ४३ ||

**अन्वय : –** कलोपचारज्ञानार्थम् पार्थिवस्य च क्रीडार्थम् शिल्पकार्या: वच: नाटके संस्कृतम् इति निर्दिष्टम् |

**अर्थ –** कलेच्या प्रचारासाठी, राजांची करमणूक करण्यासाठी, शिल्पकारिणींची भाषा नाटकामध्ये 'संस्कृत' सांगितली गेली आहे .

**❖ अप्सरांसाठी पाठ्यलक्षण ❖**

**आम्नायसिद्धं सर्वासां शुभमप्सरसां वच : |**
**संसर्गाद्दिवतानां च तद्धि लोकोऽनुवर्तते || ४४ ||**

**पदच्छेद :** – आम्नायसिद्धम् सर्वासाम् शुभम् अपसरसाम् वच : |
संसर्गात् देवतानाम् च तत् हि लोके अनुवर्तते || ४४ ||

**अन्वय :** – देवतानाम् संसर्गात् सर्वासाम् अपसरसाम् वच : लोके आम्नायसिद्धम् शुभम् च तत् हि अनुवर्तते |

**अर्थ** – देवतांशी सहवास असल्यामुळे सर्व अप्सरांचे बोलणे हे शास्त्रशुद्ध आणि शुभच असते . (असे पुराणांमध्ये सांगितलेले आहे . )

**छन्दत : प्राकृतं पाठ्यं स्मृतमप्सरसां भुवि |**
**मानुषाणां च कर्तव्यं कारणार्थव्यपेक्षया || ४५ ||**

**पदच्छेद :** – छन्दत : प्राकृतम् पाठ्यम् स्मृतम् अपसरसाम् भुवि |
मानुषाणाम् च कर्तव्यम् कारणार्थव्यपेक्षया || ४५ ||

**अन्वय :** – भुवि अपसरसाम् पाठ्यम् छन्दत : प्राकृतम् स्मृतम् मानुषाणाम् पाठ्यम् च कारणार्थ-व्यपेक्षया कर्तव्यम् |

**अर्थ** – पृथ्वीवर अवतरलेल्या अप्सरांचा संवाद हा स्वभावानुसार प्राकृतमध्ये सांगितलेला आहे आणि मनुष्यांचा संवाद काही कारणवश हेतुपुरस्सर त्या त्या प्राकृत भाषेत असावा .

### ❖ बर्बर इत्यादी जातींसाठी पाठ्यलक्षण ❖

**न बर्बरकिरातान्ध्रद्रमिलाद्यासु जातिषु |**
**नाट्यप्रयोगे कर्तव्यं पाठ्यं भाषासमाश्रयम् || ४६ ||**

**पदच्छेद :** – न बर्बर-किरात-आन्ध्र-द्रमिल-आद्यासु जातिषु |
नाट्यप्रयोगे कर्तव्यम् पाठ्यम् भाषासमाश्रयम् || ४६ ||

**अन्वय :** – नाट्यप्रयोगे बर्बरकिरातान्ध्रद्रमिलाद्यासु जातिषु भाषासमाश्रयम् पाठ्यम् न कर्तव्यम् |

**अर्थ** – बर्बर, किरात, आंध्र, द्रमिल इत्यादी जातींनी नाट्याच्या प्रयोगामध्ये स्वत :च्या भाषेचा वापर करू नये .

**❖ विविधभाषांचा प्रयोग ❖**

**सर्वास्वेव हि शुद्धासु जातिषु द्विजसत्तमा: |**
**शौरसेनीं समाश्रित्य भाषां काव्येषु योजयेत् || ४७ ||**

**पदच्छेद : –** सर्वासु इह हि शुद्धासु जातिषु द्विजसत्तमा: |
शौरसेनीम् समाश्रित्य भाषाम् काव्येषु योजयेत् || ४७ ||

**अन्वय : –** द्विजसत्तमा:, इह हि सर्वासु शुद्धासु जातिषु शौरसेनीम् भाषाम् समाश्रित्य काव्येषु योजयेत् |

**अर्थ –** हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो, सर्वच शुद्ध जातींच्या बाबतीत काव्यामध्ये शौरसेनी भाषेचाच वापर करावा .

**अथवा छन्दत: कार्या देशभाषा प्रयोक्तृभि: |**
**नानादेशसमुत्थं हि काव्यं भवति नाटके || ४८ ||**

**पदच्छेद : –** अथवा छन्दत: कार्या देशभाषा प्रयोक्तृभि: |
नानादेशसमुत्थम् हि काव्यम् भवति नाटके || ४८ ||

**अन्वय : –** अथवा नाटके नानादेशसमुत्थम् हि काव्यम् भवति (तस्मात्) प्रयोक्तृभि: छन्दत: देशभाषा कार्या |

**अर्थ –** अथवा नाटकामध्ये भिन्न भिन्न देशातील भाषांमध्ये रचलेले काव्य असते, त्यामुळे प्रयोग करणाऱ्यांनी स्वत:च्या इच्छेनुसार देशभाषेचा वापर करावा . (कारण ज्या प्रदेशामध्ये नाट्यप्रयोग होणार असेल नाटकामध्ये त्या देशाच्या भाषेचा वापर करावा . )

**❖ भाषा व विभाषा ❖**

**मागध्यवन्तिजा प्राच्या शौरसेन्यर्धमागधी |**
**बाह्लीका दक्षिणात्या च सप्तभाषा: प्रकीर्तिता: || ४९ ||**

**पदच्छेद : –** मागध्यवन्तिजा प्राच्या शौरसेनी अर्धमागधी |
बाह्लीका दक्षिणात्या च सप्तभाषा: प्रकीर्तिता: || ४९ ||

**अन्वय:** – मागध्यवन्तिजा, प्राच्या, शौरसेनी, अर्धमागधी, वाह्लीका, दक्षिणात्या च सप्तभाषा: प्रकीर्तिता:।

**अर्थ** – मागधी, अवंतिजा, प्राच्या, शौरसेनी, अर्धमागधी, वाह्लीका आणि दाक्षिणात्या या सात भाषा सांगितल्या आहेत .

**शकाराभीरचण्डालशवरद्रमिलान्ध्रजा: ।**
**हीना वनेचराणां च विभाषा नाटके स्मृता ॥५०॥**

**पदच्छेद:** – शकार-अभीर-चण्डाल-शवर-द्रमिल-आन्ध्रजा:।
हीना: वनेचराणाम् च विभाषा: नाटके स्मृता ॥५०॥

**अन्वय:** – नाटके हीना: शकाराभीरचण्डालशवरद्रमिलान्ध्रजा: (एतेषां) वनेचराणाम् च विभाषा: स्मृता। (भाषापभ्रंशस्तु विभाषा सा तत्तद्देशे एव गह्वरवासिनां प्राकृतवासिनां च एता: एव नाट्ये तु। - अ . भा . )

**अर्थ** – वनवासी लोकांच्या शकार, आभीर, चांडाल, शवर, द्रमिल, आंध्रज आणि हीन अशा सात विभाषा सांगितल्या आहेत .
(अपभ्रंशित भाषांना विभाषा असे म्हटले आहे . ही विभाषा त्या त्या देशातील गुहेमध्ये राहणाऱ्या साधारण लोकांची भाषा आहे . - अ . भा . )

### ❖ मागधी व अर्धमागधी ❖

**मागधी तु नरेन्द्राणामन्त: पुरसमाश्रया ।**
**चेटानां राजपुत्राणां श्रेष्ठिनां चार्धमागधी ॥५१॥**

**पदच्छेद:** – मागधी तु नरेन्द्राणाम् अन्त: पुरसमाश्रया।
चेटानाम् राजपुत्राणाम् श्रेष्ठिनाम् च अर्धमागधी ॥५१॥

**अन्वय:** – नरेन्द्राणाम् तु अन्त: पुरसमाश्रया मागधी। चेटानाम् राजपुत्राणाम् श्रेष्ठिनाम् च अर्ध मागधी (भाषा योज्या)।

**अर्थ** – राजाच्या अंत: पुरात राहणाऱ्या सेवकांची भाषा मागधी असावी. चेट, राजकुमार व व्यापारी यांची भाषा अर्धमागधी सांगितली आहे.

### ❖ प्राच्या, अवन्तिजा, शौरसेनी ❖

**प्राच्या विदूषकादीनां धूर्तानामप्यवन्तिजा |**
**नायिकानां सखीनां च शूरसेन्यविरोधिनी || ५२ ||**

**पदच्छेद :** – प्राच्या विदूषकादीनाम् धूर्तानाम् अपि अवन्तिजा |
नायिकानाम् सखीनाम् च शूरसेनी अविरोधिनी || ५२ ||

**अन्वय :** – विदूषकादीनाम् प्राच्या, धूर्तानाम् अपि अवन्तिजा, नायिकानाम् सखीनाम् च अविरोधिनी शूरसेनी (भाषा योज्या) |

**अर्थ** – विदूषक इत्यादींची भाषा 'प्राच्या' असावी. धूर्त लोकांची भाषा अवन्तिजा असावी. नायिका आणि तिच्या मैत्रिणींची भाषा शौरसेनी असावी.

### ❖ दाक्षिणात्य व बाह्लीक ❖

**यौधनागरकादीनां दक्षिणात्याथ दीव्यताम् |**
**बाह्लीकभाषोदीच्यानां खसानां च स्वदेशजा || ५३ ||**

**पदच्छेद :** – यौध-नागरक-आदीनाम् दक्षिणात्या अथ दीव्यताम् |
बाह्लीकभाषा उदीच्यानाम् खसानाम् च स्वदेशजा || ५३ ||

**अन्वय :** – अथ यौधनागरकादीनाम् दीव्यताम् दक्षिणात्या उदीच्यानाम् खसानाम् च स्वदेशजा बाह्लीकभाषा (भाषा योज्या) |
(दीव्यतां कितवानाम् | - अ. भा.)

**अर्थ** – योद्धे, नागरिक आणि जुगारी इत्यादी लोकांची भाषा दाक्षिणात्य असावी आणि उत्तर भारतीय आणि खस लोकांची स्वत:ची अशी बाह्लीक भाषा असावी.

### ❖ शकारी भाषा ❖

**शकारघोषकादीनां तत्स्वभावश्च यो गण: |**
**शकारभाषा योक्तव्या चाण्डाली पुल्कसादिषु ||५४||**

**पदच्छेद : –** शकार-घोषक-आदीनाम् तत् स्वभाव : च य : गण : |
शकारभाषा योक्तव्या चाण्डाली पुल्कसादिषु ||५४||

**अन्वय : –** शकारघोषकादीनाम् तत् स्वभाव : य : गण : शकारभाषा (तथा) च पुल्कसादिषु चाण्डाली योक्तव्या |

**अर्थ –** शकार, घोषक इत्यादी लोकांचा जसा स्वाभाविक समूह आहे त्या लोकांनी शकारी भाषेचा वापर करावा आणि पुल्कस म्हणजे 'डोंब' जातींनी चांडाली भाषेचा वापर करावा .

(पुल्कसादिषु यांतील आदिषु मध्ये मृतप जातीचे ग्रहण केले जाते . मृतप जातीचे लोक स्मशानात मृतदेहावर अंत्यविधी करण्याचे काम करतात . त्यांनीदेखील चांडाली भाषेचा वापर करावा .)

**अङ्गारकारकव्याधकाष्ठयन्त्रोपजीविनाम् |**
**योज्या शकारभाषा तु किंचिद्वानौकसी तथा ||५५||**

**पदच्छेद : –** अङ्गारकारक-व्याध-काष्ठ-यन्त्र-उपजीविनाम् |
योज्या शकारभाषा तु किंचित् वानौकसी तथा ||५५||

**अन्वय : –** अङ्गारकारकव्याधकाष्ठयन्त्रोपजीविनाम् तु शकारभाषा तथा किंचित् वानौकसी योज्या |

**अर्थ –** कोळशाचे व्यापारी, शिकारी, लाकूड विकणारे आणि पत्रावळ विकून जीवन जगणाऱ्या भुसहर इत्यादींची भाषा शकारी असावी अथवा केव्हातरी वानौकसी (आदिवासी) असावी .

### ❖ आभिरी व शाबरी ❖

**गजाश्वाजाविकोष्ट्रादिघोषस्थाननिवासिनाम् |**
**आभीरोक्ति: शाबरी वा द्रामिडी वनचारिषु || ५६ ||**

**पदच्छेद :–** गज-अश्व-अज-अविक-उष्ट्रादि-घोपस्थान-निवासिनाम् |
आभीरोक्ति : शावरी वा द्रामिडी वनचारिषु || ५६ ||

**अन्वय : –** गजाश्वाजाविकोष्ट्रादिघोपस्थाननिवासिनाम् आभीरोक्ति : शावरी वा वनचारिषु द्रामिडी (भाषा योज्या) |

**अर्थ –** हत्ती, घोडा, बकरा, मेंढा, ऊंट इत्यादींच्या निवासस्थानी राहणाऱ्या व्यक्तींची भाषा आभीरी किंवा शावरी असावी आणि वनेचरांची भाषा द्रामिडी असावी .

**सुरङ्गाखनकादीनां सन्धिकाराश्वरक्षताम् |**
**व्यसने नायकानां चाप्यात्मरक्षासु मागधी || ५७ ||**

**पदच्छेद :–** सुरङ्गा-खनकादीनाम् सन्धि-कारा-अश्व-रक्षताम् |
व्यसने नायकानाम् च अपि आत्मरक्षासु मागधी || ५७ ||

**अन्वय : –** सुरङ्गाखनकादीनाम् सन्धिकाराश्वरक्षताम् व्यसने नायकानाम् च आत्मरक्षासु मागधी (भाषा योज्या) |

**अर्थ –** सुरंग खोदणाऱ्यांनी, संधीस्थळे, कारागृह आणि घोडे यांची रक्षा करणाऱ्यांनी तसेच आपत्तीच्या वेळी नायकाने स्वत:ची रक्षा करण्यासाठी वेळप्रसंगी मागधी भाषेचा वापर करावा .

**❖ एकार असलेली भाषा ❖**

**गङ्गासागरमध्ये तु ये देशा : संप्रकीर्तिता : |**
**एकारबहुलां तेषु भाषां तज्ज्ञ : प्रयोजयेत् || ५८ ||**

**पदच्छेद :–** गङ्गासागरमध्ये तु ये देशा : संप्रकीर्तिता : |
एकारबहुलाम् तेषु भाषाम् तज्ज्ञ : प्रयोजयेत् || ५८ ||

**अन्वय : –** ये देशा : गङ्गासागरमध्ये तु संप्रकीर्तिता : तेषु तज्ज्ञ : एकारबहुलाम् भाषाम् प्रयोजयेत् |

**अर्थ –** गंगा आणि समुद्र यांच्यामध्ये जितके देश येतात, या देशांमध्ये विद्वानांनी अनेक एकार असलेल्या भाषेचा वापर करावा . (भारताच्या पूर्वेकडील देशांतील लोकांसाठी हे सांगितले आहे . )

❖ नकारयुक्त बहुलभाषा ❖

**विन्ध्यसागरमध्ये तु ये देशा: श्रुतिमागता:|**
**नकारबहुलां तेषु भाषां तज्ज्ञ: प्रयोजयेत् ||५९||**

**पदच्छेद: –** विन्ध्यसागरमध्ये तु ये देशा: श्रुतिम् आगता:|
नकारबहुलाम् तेषु भाषाम् तज्ज्ञ: प्रयोजयेत् ||५९||

**अन्वय: –** ये देशा: तु विन्ध्यसागरमध्ये श्रुतिम् आगता: तेषु तज्ज्ञ: नकारबहुलाम् भाषाम् प्रयोजयेत् |
(विन्ध्यसागरमध्ये इति दक्षिणसौराष्ट्रा:|- अ.भा.)

**अर्थ –** जे देश विंध्यपर्वत आणि समुद्र यांमध्ये येतात त्यांमध्ये विद्वानांनी नकारयुक्त बहुल भाषेचा वापर करावा (हा संदर्भ भारताच्या पश्चिम दिशेकडे येणाऱ्या दक्षिणसौराष्ट्राविषयी आहे.)

❖ चकार बहुलभाषा ❖

**सुराष्ट्रावन्तिदेशेषु वेत्रवत्युत्तरेषु च |**
**ये देशास्तेषु कुर्वीत चकारप्रायसंश्रयाम् ||६०||**

**पदच्छेद: –** सुराष्ट्र-अवन्ति-देशेषु वेत्रवती-उत्तरेषु च |
ये देशा: तेषु कुर्वीत चकारप्रायसंश्रयाम् ||६०||

**अन्वय: –** सुराष्ट्रावन्तिदेशेषु वेत्रवत्युत्तरेषु च ये देशा: तेषु चकारप्रायसंश्रयाम् (भाषाम्) कुर्वीत |
(सुराष्ट्रावन्तिदेशेषु इति पश्चिमा:| वेत्रवत्यादिनोत्तरा:|- अ.भा.)

**अर्थ –** सौराष्ट्र आणि अवंतिका प्रदेशामध्ये आणि वेत्रवती नदीच्या उत्तरेला जो देश आहे, त्यामध्ये चकार बहुल भाषेचा वापर करावा. (सौराष्ट्र आणि अवन्तिका प्रदेश म्हणजे पश्चिम सौराष्ट्र. वेत्रवतीद्वारे उत्तर सौराष्ट्राचा उल्लेख केला आहे.)

❖ उकार बहुलभाषा ❖

**हिमवत्सिन्धुसौवीरान्ये जना: समुपाश्रिता:|**
**उकारबहुलां तज्ज्ञस्तेषु भाषां प्रयोजयेत् ||६१||**

**पदच्छेद :–** हिमवत्सिन्धुसौवीरान् ये जना : समुपाश्रिता : |
उकारबहुलाम् तज्ज्ञ : तेषु भाषाम् प्रयोजयेत् || ६१ ||

**अन्वय : –** ये जना : हिमवत्सिन्धुसौवीरान् समुपाश्रिता : तेषु तज्ज्ञ : उकारबहुलाम् भाषाम् प्रयोजयेत् |

**अर्थ –** हिमालय, सिंधु आणि सौवीर देशात राहणारे जे लोक आहेत त्यांच्यासाठी तज्ज्ञांनी उकारबहुल भाषेचा वापर करावा .

### ❖ ओकार बहुलभाषा ❖

**चर्मण्वतीनदीतीरे ये चार्बुदसमाश्रिता : |**
**ओकारबहुलां नित्यं तेषु भाषां प्रयोजयेत् || ६२ ||**

**पदच्छेद :–** चर्मण्वतीनदीतीरे ये च अर्बुदसमाश्रिता : |
ओकारबहुलाम् नित्यम् तेषु भाषाम् प्रयोजयेत् || ६२ ||

**अन्वय : –** ये च चर्मण्वतीनदीतीरे अर्बुदसमाश्रिता : तेषु नित्यम् ओकारबहुलाम् भाषाम् प्रयोजयेत् |

**अर्थ –** चर्मण्वती (चंबल) नदीच्या काठावर आणि अरावली डोंगराच्या अवतीभवती असलेल्या प्रदेशातील लोकांसाठी ओकारबहुल भाषेचा वापर करावा .

**एवं भाषाविधानं तु कर्तव्यं नाटकाश्रयम् |**
**अत्र नोक्तं मया यत्तु लोकाद्ग्राह्यं बुधैस्तु तत् || ६३ ||**

**पदच्छेद :–** एवम् भाषाविधानम् तु कर्तव्यम् नाटकाश्रयम् |
अत्र न उक्तम् मया यत् तु लोकात् ग्राह्यम् बुधै : तु तत् || ६३ ||

**अन्वय : –** एवम् नाटकाश्रयम् तु भाषाविधानम् कर्तव्यम् | यत् तु अत्र मया न उक्तम् तत् तु बुधै : लोकात् ग्राह्यम् |

**अर्थ –** याप्रमाणे नाटकाशी संबंधित विविध भाषेचा वापर करावा . येथे मी जे नाही सांगितले, विद्वानांनी ते स्वत : समाजाकडून समजून घ्यावे .
(काशीसंस्करणानुसार याठिकाणी 'भाषाविधान' नावाचा सतरावा अध्याय संपतो आणि पुढील ६४ व्या श्लोकापासून अठरावा अध्याय सुरू होतो . )

**एवं भाषाविधानं तु मया प्रोक्तं द्विजोत्तमा : |**
**पुनर्वाक्यविधानं तु लौकिकं संनिबोधत || ६४ ||**

**पदच्छेद : –** एवम् भाषाविधानम् तु मया प्रोक्तम् द्विजोत्तमा : |
पुन : वाक्यविधानम् तु लौकिकम् संनिबोधत || ६४ ||

**अन्वय : –** द्विजोत्तमा :, मया एवम् भाषाविधानम् तु प्रोक्तम् | पुन: लौकिकम् वाक्यविधानम् तु संनिबोधत |

**अर्थ –** हे विद्वज्जनांनो, ह्याप्रमाणे मी तुम्हांला भाषाविधान सांगितले . आता मी तुम्हांला लौकिक वाक्यविधानाविषयी सांगणार आहे ते नीट ऐकावे .
(अभिनवाच्या मते, वाक्यविधान म्हणजे वाक्य आणि भाषेमध्ये परस्परांशी असलेला अन्योन्यसंबंध होय . )

**❖ संबोधनाचे नियम ❖**

**उत्तमैर्मध्यमैर्नीचैर्ये संभाष्या यथा नरा: |**
**समानोत्कृष्टहीनाश्च नाटके तान्निबोधत || ६५ ||**

**पदच्छेद : –** उत्तमै : मध्यमै : नीचै : ये संभाष्या यथा नरा : |
समानोत्कृष्टहीना : च नाटके तान् निबोधत || ६५ ||

**अन्वय : –** नाटके उत्तमै : मध्यमै : नीचै : ये समानोत्कृष्टहीना : च नरा : यथा संभाष्या तान् निबोधत |

**अर्थ –** उत्तम, मध्यम आणि अधम पात्रांनी आपल्यासारख्या लोकांशी तसेच आपल्यापेक्षा श्रेष्ठ आणि आपल्यापेक्षा हीन लोकांशी नाटकामध्ये कसे संभाषण करावे, हे तुम्ही नीट समजून घ्या .

**❖ भगवान् शब्दप्रयोग ❖**

**देवानामपि ये देवा महात्मानो महर्षय: |**
**भगवन्निति ते वाच्या यास्तेषां योषितस्तथा || ६६ ||**

**पदच्छेद :–** देवानाम् अपि ये देवा : महात्मान : महर्षय : |
भगवन् इति ते वाच्या : या : तेषाम् योषित : तथा || ६६ ||

**अन्वय : –** ये देवानाम् अपि देवा : महात्मान : महर्षय : ते भगवन् इति वाच्या : तेषाम् या : योषित : तथा (भगवति इति वाच्या :) |

**अर्थ –** जे देवांचेही देव आहेत, महात्मा आणि महर्षि आहेत, त्यांच्याशी बोलताना 'भगवन्' असे उच्चारावे आणि ज्या त्यांच्या पत्नी आहेत त्यांना संबोधताना 'भगवति' असे म्हणावे .

**देवाश्च लिङ्गिनश्चैव नानाश्रुतधराश्च ये |**
**भगवन्निति ये वाच्या : पुरुषै : स्त्रीभिरेव च || ६७ ||**

**पदच्छेद :–** देवा : च लिङ्गिन : च एव नानाश्रुतधरा : च ये |
भगवन् इति ये वाच्या : पुरुषै : स्त्रीभि : एव च || ६७ ||

**अन्वय : –** ये देवा : च लिङ्गिन : ये नानाश्रुतधरा : च ते पुरुषै : स्त्रीभि : एव च भगवन् इति वाच्या : |

**अर्थ –** तसेच जे देवता, संन्यासी आणि अनेक शास्त्र जाणणारे (शास्त्रवेत्ता) आहेत, त्यांना संबोधताना स्त्रियांनी आणि पुरुषांनी 'भगवन्' असे म्हणावे .

**❖ आर्य, तात, शब्दप्रयोग ❖**

**आर्येति ब्राह्मणं ब्रूयान्महाराजेति पार्थिवम् |**
**उपाध्यायेति चाचार्यं वृद्धं तातेति चैव हि || ६८ ||**

**पदच्छेद :–** आर्य इति ब्राह्मणम् ब्रूयात् महाराज इति पार्थिवम् |
उपाध्याय इति च आचार्यम् वृद्धम् तात इति च एव हि || ६८ ||

**अन्वय : –** ब्राह्मणम् आर्य इति, पार्थिवम् महाराज इति, आचार्यम् च उपाध्याय इति, वृद्धम् च तात इति ब्रूयात् |

**अर्थ –** ब्राह्मणाला 'आर्य', राजाला 'महाराज', उपाध्यायाला 'आचार्य' आणि वृद्ध व्यक्तीला 'तात' असे संबोधित करावे .

**❖ राजा व ब्राह्मणांसाठी संबोधन ❖**

**नाम्ना राजेति वा वाच्या ब्राह्मणैस्तु नराधिपा: |**
**तत्क्षाम्यं हि महीपालैर्यस्मात्पूज्या द्विजा: स्मृता: || ६९ ||**

**पदच्छेद: –** नाम्ना राजा इति वा वाच्य: ब्राह्मणै: तु नराधिपा: |
तत् क्षाम्यम् हि महीपालै: यस्मात् पूज्या: द्विजा: स्मृता: || ६९ ||

**अन्वय: –** ब्राह्मणै: तु नराधिपा: नाम्ना राजा इति वा वाच्य: | तत् हि महीपालै: क्षाम्यम् यस्मात् द्विजा: पूज्या: स्मृता: |

**अर्थ –** राजाचे नाव घेऊन किंवा राजा असे ब्राह्मणांनी संबोधन केले तर राजाने त्याला क्षमा करावी कारण ब्राह्मण नेहमी पूजनीय असतात .

**ब्राह्मणै: सचिवो वाच्यो ह्यमात्य सचिवेति वा |**
**शेषैरन्यैर्जनैर्वाच्यो हीनैरार्येति नित्यश: || ७० ||**

**पदच्छेद: –** ब्राह्मणै: सचिव: वाच्य: हि अमात्य सचिव इति वा |
शेषै: अन्यै: जनै: वाच्य: हीनै: आर्य इति नित्यश: || ७० ||

**अन्वय: –** ब्राह्मणै: हि सचिव: अमात्य सचिव इति वा वाच्य: | शेषै: अन्यै: हीनै: जनै: नित्यश: आर्य इति वाच्य: |

**अर्थ –** ब्राह्मणांनी मंत्र्यांना अमात्य किंवा सचिव या शब्दाने संबोधित करावे आणि बाकीच्या उरलेल्या द्वितीय तृतीय किंवा चतुर्थ श्रेणीतील लोकांनी त्यांना 'आर्य' म्हणून संबोधित करावे .

**समै: संभाषणं कार्य येन नाम्ना स संज्ञित: |**
**हीनै: सपरिवारं तु नाम्ना सम्भाष्य उत्तम: || ७१ ||**

**पदच्छेद: –** समै: संभाषणम् कार्यम् येन नाम्ना स: संज्ञित: |
हीनै: सपरिवारम् तु नाम्ना सम्भाष्य: उत्तम: || ७१ ||

**अन्वय: –** समै: येन नाम्ना स: संज्ञित: (तेन) संभाषणम् कार्यम् | हीनै: तु उत्तम: सपरिवारम् नाम्ना सम्भाष्य: |

**अर्थ** – समान वयाच्या लोकांनी एकमेकांना बोलावताना तो व्यक्ती ज्या नावाने ओळखला जातो त्याच नावाने त्याला बोलवावे आणि अधम पात्रांनी उत्तम पात्राशी बोलताना त्याच्या आडनावाने किंवा कुलनावाने बोलावे .

**नियोगाधिकृताश्चैव पुरुषा योषितस्तथा |**
**कारुका: शिल्पिनश्चैव संभाष्यास्ते तथैव हि || ७२ ||**

**पदच्छेद:** – नियोग-अधिकृता: च एव पुरुषा: योषित: तथा |
कारुका: शिल्पिन: च एव संभाष्या: ते तथा एव हि || ७२ ||

**अन्वय:** – कारुका: एव च शिल्पिन: पुरुषा: तथा एव च योषित: नियोगाधिकृता: तथा एव हि ते संभाष्या: |

**अर्थ** – जे पुरुष आणि स्त्रिया स्तूपकार किंवा शिल्पकार म्हणून अधिकृतरीत्या कार्यासाठी नेमले आहेत, त्यांना त्यांच्या कर्मानुसार संबोधित करावे .
(कारुक म्हणजे स्तूपकार आणि शिल्पी म्हणजे भिंतीवर चित्र काढणारा . - अ . भा . )

**मार्षो भावेति वक्तव्य: किंचिदूनस्तु मार्षक: |**
**समानोऽथ वयस्येति हं हो हण्डेति वाधम: || ७३ ||**

**पदच्छेद:** – मार्ष: भाव इति वक्तव्य: किंचित् ऊन: तु मार्षक: |
समान: अथ वयस्य: इति हम् हो हण्ड इति वा अधम: || ७३ ||

**अन्वय:** – अथ मार्ष: भाव इति, किंचित् ऊन: तु मार्षक:, समान: वयस्य: इति, अधम: हम् हो हण्ड वा इति वक्तव्य: |

**अर्थ** – सूत्रधारास 'भाव' म्हणावे . त्याच्याहून लहानास 'मार्षक' किंवा 'मारिष' म्हणावे . समान वय असणाऱ्यास 'वयस्य' आणि अधम पात्रास 'हं' 'हो' 'हण्ड' या शब्दांनी संबोधित करावे .

### ❖ भाव, मार्षक, वयस्य, आयुष्मान् इत्यादी संबोधन ❖

**आयुष्मन्निति वाच्यस्तु रथी सूतेन सर्वदा |**
**तपस्वीति प्रशान्तस्तु साधो इति च शब्द्यते || ७४ ||**

**पदच्छेद :** – आयुष्मन् इति वाच्य : तु रथी सूतेन सर्वदा |
तपस्वी इति प्रशान्त : तु साधो इति च शब्द्यते || ७४ ||

**अन्वय :** – सूतेन रथी तु सर्वदा आयुष्मन् इति वाच्य : | प्रशान्त : तपस्वी तु साधो इति च शब्द्यते |

**अर्थ** – सारथ्याने रथावर बसलेल्या पुरुषाला 'आयुष्मन्' शब्दाने संबोधित करावे. शांत तपस्वी व्यक्तीला 'साधो' असे संबोधित करावे.

**स्वामीति युवराजस्तु कुमारो भर्तृदारक : |**
**सौम्य भद्रमुखेत्येवं हे पूर्वं चाधमं वदेत् || ७५ ||**

**पदच्छेद :** – स्वामी इति युवराज : तु कुमार : भर्तृदारक : |
सौम्य भद्रमुख इति एवम् हे पूर्वम् च अधमम् वदेत् || ७५ ||

**अन्वय :** – युवराज : स्वामी इति, भर्तृदारक : तु कुमार : एवम् हे पूर्वम् सौम्य भद्रमुख इति च अधमम् वदेत् |

**अर्थ** – युवराजाला 'स्वामी', राजपुत्राला 'कुमार', आणि अधम पात्राला 'हे सौम्य' 'हे भद्रमुख' इत्यादी शब्दांनी संबोधित करावे.

### ❖ कर्मानुसार संबोधन ❖

**यद्यस्य कर्म शिल्पं वा विद्या वा जातिरेव वा |**
**स तेन नाम्ना भाष्यो हि नाटकादौ प्रयोक्तृभि : || ७६ ||**

**पदच्छेद :** – यदि अस्य कर्म शिल्पम् वा विद्या वा जाति : एव वा |
स : तेन नाम्ना भाष्य : हि नाटकादौ प्रयोक्तृभि : || ७६ ||

**अन्वय :** – नाटकादौ प्रयोक्तृभि : यदि अस्य कर्म शिल्पम् वा विद्या वा जाति : एव वा स : तेन नाम्ना हि भाष्य : | (कर्म पाकादि विद्या त्रयादि जातिर्गोत्रं देशो वा | - अ. भा. )

**अर्थ** – ज्याचे जे कर्म आहे, शिल्प, विद्या किंवा जाती असेल, त्यानुसार त्या नावाने त्याला नाट्यविद्वानांनी नाटकाच्या आरंभी संबोधित करावे.

(स्वयंपाक इत्यादी कर्म, तीन वेदविद्या, जाती म्हणजे गोत्र किंवा देश असा अर्थ घ्यावा. - अ. भा.)

**❖ पिता-पुत्राचे संबोधन ❖**

**वत्स ! पुत्रक ! तातेति नाम्ना गोत्रेण वा पुन: |**
**वाच्य: शिष्य: सुतो वापि पित्रा वा गुरुणापि वा || ७७ ||**

**पदच्छेद:** – वत्स ! पुत्रक ! तात इति नाम्ना गोत्रेण वा पुन: |
वाच्य: शिष्य: सुत: वा अपि पित्रा वा गुरुणा अपि वा || ७७ ||

**अन्वय:** – पित्रा गुरुणा वा सुत: शिष्य: वा वत्स ! पुत्रक ! तात गोत्रेण नाम्ना वा वाच्य: |

**अर्थ** – पित्याने स्वत:च्या मुलाला किंवा गुरूंनी स्वत:च्या शिष्याला वत्स, पुत्र, तात या शब्दांनी किंवा गोत्राच्या नावाने हाक मारावी.

**❖ बौद्ध-जैन साधूंसाठी संबोधन ❖**

**संभाष्या शाक्यनिर्ग्रन्था भदन्तेति प्रयोक्तृभि: |**
**आमन्त्रणैस्तु पाषण्डा: शेषा: स्वसमयाश्रितै: || ७८ ||**

**पदच्छेद:** – संभाष्या: शाक्यनिर्ग्रन्था: भदन्त इति प्रयोक्तृभि: |
आमन्त्रणै: तु पाषण्डा: शेषा: स्वसमयाश्रितै: || ७८ ||

**अन्वय:** – प्रयोक्तृभि: शाक्यनिर्ग्रन्था: भदन्त इति शेषा: पाषण्डा: तु स्वसमयाश्रितै: आमन्त्रणै: संभाष्या: |

(शाक्या: सौगता:, निर्ग्रन्था: क्षपणका:, शेषा: पाषण्डाति पाशुपतादय: | - अ. भा.)

**अर्थ** – नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी बौद्ध आणि जैन संन्यासी यांना 'भदन्त' म्हणून संबोधित करावे. उरलेल्या पाशुपत संप्रदायातील साधूंना त्यांचे आचरण पाहून संबोधित करावे.

**❖ अन्यपात्रांसाठी संबोधन ❖**

**देवेति नृपतिर्वाच्यो भृत्यै: प्रकृतिभिस्तथा |**
**भट्टेति सार्वभौमस्तु नित्यं परिजनेन हि || ७९ ||**

**पदच्छेद: –** देव इति नृपति: वाच्यो भृत्यै: प्रकृतिभि: तथा |
भट्ट इति सार्वभौम: तु नित्यम् परिजनेन हि || ७९ ||

**अन्वय: –** भृत्यै: तथा प्रकृतिभि: नृपति: 'देव' इति (वाच्य:) | सार्वभौम: तु नित्यम् परिजनेन हि 'भट्ट' इति वाच्य: |

**अर्थ –** नोकरवर्ग आणि प्रजाजनांनी राजाला 'देव' या शब्दाने संबोधित करावे. सार्वभौम राजाला सेवकवर्गाने 'भट्ट' असे संबोधित करावे.

**राजन्नित्यृषिभिर्वाच्यो ह्यपत्यप्रत्ययेन वा |**
**वयस्य राजन्निति वा भवेद्वाच्यो महीपति: || ८० ||**
**विदूषकेण राज्ञी च चेटि च भवतीत्यपि |**
**नाम्ना वयस्येत्यपि वा राज्ञा वाच्यो विदूषक: || ८१ ||**

**पदच्छेद: –** राजन् इति ऋषिभि: वाच्य: हि अपत्यप्रत्ययेन वा |
वयस्य राजन् इति वा भवेत् वाच्य: महीपति: || ८० ||
विदूषकेण राज्ञी च चेटि च भवति इति अपि |
नाम्ना वयस्य इति अपि वा राज्ञा वाच्य: विदूषक: || ८१ ||

**अन्वय: –** ऋषिभि: महीपति: राजन् इति अपत्यप्रत्ययेन वा वाच्य: | विदूषकेण वयस्य राजन् इति वा वाच्य: भवेत् | राज्ञा राज्ञी च चेटि च भवति इति अपि नाम्ना विदूषक: वयस्य इति अपि वा वाच्य: |

**अर्थ –** ऋषींनी राजास 'हे राजन्' अथवा अपत्यार्थक वंशागत नावाने संबोधित करावे. विदूषकाने राजाला 'वयस्य' किंवा 'राजन्' शब्दाने संबोधावे. विदूषकाने महाराणीला 'चेटी' किंवा 'भवति' या शब्दांनी संबोधित करावे. राजानेदेखील विदूषकाला त्याच्या नावाने किंवा 'वयस्य' या शब्दाने संबोधित करावे.

**सर्वस्त्रीभि: पतिर्वाच्य आर्यपुत्रेति यौवने |**
**अन्यदा पुनरार्येति महाराजेति भूपति: || ८२ ||**

**पदच्छेद: –** सर्वस्त्रीभि: पति: वाच्य: आर्यपुत्र इति यौवने |
अन्यदा पुन: आर्य इति महाराज इति भूपति: || ८२ ||

**अन्वय: –** यौवने पति: सर्वस्त्रीभि: आर्यपुत्र इति वाच्य: | अन्यदा पुन: भूपति: आर्य इति महाराज इति (वा वाच्य:) |

**अर्थ –** तरुणपणात सर्व स्त्रियांनी स्वत:च्या पतीला 'आर्यपुत्र' या शब्दाने संबोधित करावे. यौवनेतर अवस्थेमध्ये राजास 'आर्य' 'महाराज' या शब्दांनी संबोधित करावे.

**आर्येति पूर्वजो भ्राता वाच्य: पुत्र इवानुज: |**
**योषिद्भिरथ काम्येति राजपुत्रेति योधनै: || ८३ ||**

**पदच्छेद: –** आर्य इति पूर्वज: भ्राता वाच्य: पुत्र: इव अनुज: |
योषिद्भि: अथ काम्या इति राजपुत्र इति योधनै: || ८३ ||

**अन्वय: –** अथ पूर्वज: भ्राता 'आर्य' इति, अनुज: पुत्र: इव, योषिद्भि: काम्या इति, योधनै: 'राजपुत्र' इति वाच्य: |

**अर्थ –** मोठ्या भावाला 'आर्य' म्हणून संबोधित करावे. लहान भावाला स्वत:च्या पुत्राप्रमाणे 'वत्स' इत्यादी शब्दांनी संबोधित करावे. स्त्रियांशी बोलताना काम्या आणि सैनिकांशी संबोधताना 'राजपुत्र' या शब्दाचा उपयोग करावा.

**पुरुषाभाषणं ह्येवं कार्य नाट्ये प्रयोक्तृभि: |**
**पुन: स्त्रीणां प्रवक्ष्यामि यथाभाष्यास्तु नाटके || ८४ ||**

**पदच्छेद: –** पुरुषाभाषणम् हि एवम् कार्यम् नाट्ये प्रयोक्तृभि: |
पुन: स्त्रीणाम् प्रवक्ष्यामि यथाभाष्या: तु नाटके || ८४ ||

**अन्वय: –** प्रयोक्तृभि: नाट्ये एवम् हि पुरुषाभाषणम् कार्यम् | पुन: नाटके स्त्रीणाम् यथाभाष्या: तु प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – आतापर्यंत नाटकामध्ये पुरुष पात्रांनी कोणाला कसे संबोधित करावे ते सांगितले. आता नाटकामध्ये कोणत्या स्त्रीपात्रास कोणते संबोधन वापरावे त्याविषयी सांगीन.

**❖ स्त्री संबोधने ❖**

**तपस्विन्यो देवताश्च वाच्या भगवतीति च |**
**गुरुभार्या तु वक्तव्या स्थानीया भवतीति च || ८५ ||**

**पदच्छेद :** – तपस्विन्य : देवता : च वाच्या : भगवति इति च |
गुरुभार्या तु वक्तव्या स्थानीया भवति इति च || ८५ ||

**अन्वय :** – तपस्विन्य : देवता : च भगवति इति वाच्या : | गुरुभार्या स्थानीया च तु भवति इति च वक्तव्या |

**अर्थ** – 'तपस्वी' स्त्रिया व देवींना 'भगवति' या शब्दाने संबोधित करावे. गुरुपत्नी व पूजनीय (मोठ्या आणि आदरणीय स्त्रियांना) 'भवति' शब्दाने संबोधित करावे.

**गम्या भद्रेति वाच्या वै वृद्धाम्बेति च नाटके |**
**राजपत्न्यस्तु संभाष्या सर्वा: परिजनेन वै || ८६ ||**
**भट्टिनी स्वामिनी देवीत्येवं वै नाटके बुधै: |**
**देवीति महिषी वाच्या राज्ञा परिजनेन वा || ८७ ||**

**पदच्छेद :** – गम्या भद्रा इति वाच्या वै वृद्धा अम्ब इति च नाटके |
राजपत्न्य : तु संभाष्या : सर्वा : परिजनेन वै || ८६ ||
भट्टिनी स्वामिनी देवि इति एवम् वै नाटके बुधै : |
देवि इति महिषी वाच्या राज्ञा परिजनेन वा || ८७ ||

**अन्वय :** – नाटके गम्या भद्रा इति वै वृद्धा अम्ब इति च वाच्या | सर्वा : राजपत्न्य : तु परिजनेन भट्टिनि स्वामिनि देवि इति संभाष्या | एवम् नाटके राज्ञा परिजनेन वा महिषी देवि इति वाच्या इति बुधै : उच्यते |

**अर्थ** – नाटकामध्ये ग्रामीण स्त्रीला 'भद्रे' व वृद्ध स्त्रीला 'अम्ब' म्हणून संबोधन करावे. तसेच राजाच्या सर्व पत्नींना त्यांच्या सेवकांनी 'भट्टिनी' 'स्वामिनी' 'देवी' इत्यादी शब्दांनी

संबोधित करावे. अशाप्रकार, नाटकामध्ये राजाने किंवा सेवकांनी राणीला देवी या शब्दाने संबोधित करावे, असे विद्वान म्हणतात.

**भोगिन्य: परिशिष्टास्तु स्वामिन्य इति वा पुन:|**
**कुमार्यश्चैव वक्तव्या: प्रेष्याभिर्भर्तृदारिका: || ८८ ||**

**पदच्छेद:** – भोगिन्य: परिशिष्टा: तु स्वामिन्य: इति वा पुन:|
कुमार्य: च एव वक्तव्या: प्रेष्याभि: भर्तृदारिका: || ८८ ||

**अन्वय:** – पुन: परिशिष्टा: भोगिन्य: स्वामिन्य: इति वा प्रेष्याभि: कुमार्य: च भर्तृदारिका: एव वक्तव्या:|

**अर्थ** – उरलेल्या स्त्रियांना भोगिनी किंवा स्वामिनी शब्दांनी संबोधित करावे. संदेश वहन करणाऱ्या सेविकांनी राजकुमारीला 'भर्तृदारिका' या शब्दाने संबोधित करावे.

**स्वसेति भगिनी वाच्या वत्सेति च यवीयसी |**
**ब्राह्मण्यार्येति वक्तव्या लिङ्गस्था व्रतिनी च या || ८९ ||**

**पदच्छेद:** – स्वसा इति भगिनी वाच्या वत्से इति च यवीयसी |
ब्राह्मणी आर्या इति वक्तव्या लिङ्गस्था व्रतिनी च या || ८९ ||

**अन्वय:** – स्वसा भगिनी इति यवीयसी च वत्से इति वाच्या | या ब्राह्मणी लिङ्गस्था व्रतिनी च आर्या इति वक्तव्या |

**अर्थ** – मोठ्या बहिणीला 'भगिनी' आणि धाकट्या बहिणीला 'वत्से' म्हणावे. ब्राह्मणी, संन्यासिनी आणि व्रतधारिणी स्त्रियांना 'आर्या' म्हणून संबोधित करावे.

**पत्नी चार्येति संभाष्या पितृनाम्ना सुतस्य वा |**
**समानाभिस्तथा सख्य: हलेति स्यात्परस्परम् || ९० ||**

**पदच्छेद:** – पत्नी च आर्या इति संभाष्या पितृनाम्ना सुतस्य वा |
समानाभि: तथा सख्य: हला इति स्यात् परस्परम् || ९० ||

**अन्वय : –** पत्नी च आर्या इति पितृनाम्ना सुतस्य वा संभाष्या | तथा समानाभि : सख्य : परस्परम् हला इति स्यात् |

**अर्थ –** स्वत :च्या धर्मपत्नीला आर्ये किंवा तिच्या वडिलांच्या अथवा पुत्राच्या नावाने संबोधन करावे . समवयस्क मैत्रिणींनी एकमेकींना 'हला' म्हणून संबोधित करावे .

**प्रेष्या हञ्जेति वक्तव्या स्त्रिया यत्तूत्तमा भवेत् |**
**अज्जुकेति च वक्तव्या वेश्या परिजनेन च || ९१ ||**

**पदच्छेद : –** प्रेष्या हञ्जा इति वक्तव्या स्त्रिया यत् तु उत्तमा भवेत् |
अज्जुका इति च वक्तव्या वेश्या परिजनेन च || ९१ ||

**अन्वय : –** यत् उत्तमा प्रेष्या भवेत् स्त्रिया सा हञ्जा इति वक्तव्या | वेश्या च परिजनेन अज्जुका इति च वक्तव्या |

**अर्थ –** जी उत्तम संदेशवाहक दासी असते तिला स्त्रीने 'हञ्जा' असे संबोधित करावे . सेवकांनी वेश्येला 'अज्जुका' या शब्दाने संबोधित करावे .

**अत्तेति गणिकामाता वाच्या परिजनेन हि |**
**प्रियेति भार्या शृङ्गारे वाच्या राज्ञेतरेण वा || ९२ ||**

**पदच्छेद : –** अत्ता इति गणिकामाता वाच्या परिजनेन हि |
प्रिया इति भार्या शृङ्गारे वाच्या राज्ञा इतरेण वा || ९२ ||

**अन्वय : –** गणिकामाता परिजनेन हि अत्ता इति वाच्या | शृङ्गारे राज्ञा इतरेण वा भार्या प्रिया इति वाच्या |

**अर्थ –** सेवकांनी गणिकेच्या आईला 'अत्ता' असे संबोधित करावे . शृंगाराच्या वेळी राजा आणि इतरांनी स्वत :च्या बायकोला 'प्रिये' असे संबोधित करावे .

**पुरोध : सार्थवाहानां भार्यास्त्वार्येति सर्वदा |**
**तल्लिङ्गार्थानि नामानि कार्याणि कविभि : सदा || ९३ ||**
**औत्पत्तिकानि यानि स्युरप्रख्यातानि नाटके |**

**पदच्छेद :–** पुरोध : सार्थवाहानाम् भार्या : तु आर्या इति सर्वदा |
तत् लिङ्गार्थानि नामानि कार्याणि कविभि : सदा || ९३ ||
औत्पत्तिकानि यानि स्यु : न प्रख्यातानि नाटके |

**अन्वय : –** सार्थवाहानाम् पुरोध : भार्या : तु सर्वदा आर्या : इति (वाच्या) | नाटके यानि न प्रख्यातानि पात्राणि स्यु : तेषाम् नामानि कविभि : सदा लिङ्गार्थानि तथा औत्पत्तिकानि कार्याणि |

**अर्थ –** व्यापाऱ्यांच्या समोर स्वपत्नीस नेहमी 'आर्या' असेच संबोधित करावे. नाटकामध्ये जी पात्रे प्रसिद्ध नसतात, असा पात्रांना लिंग आणि कार्याप्रमाणे काल्पनिक नावांनी संबोधित करावे.

**❖ पुरूषपात्रांचा नामविधि ❖**

**ब्रह्मक्षत्रस्य नामानि गोत्रकर्मानुरूपत: || ९४ ||**
**काव्ये कार्याणि कविभि : शर्मवर्मकृतानि हि |**
**दत्तप्रायाणि नामानि वणिजां संप्रयोजयेत् || ९५ ||**

**पदच्छेद :–** ब्रह्मक्षत्रस्य नामानि गोत्रकर्मानुरूपत : || ९४ ||
काव्ये कार्याणि कविभि : शर्मवर्मकृतानि हि |
दत्तप्रायाणि नामानि वणिजाम् संप्रयोजयेत् || ९५ ||

**अन्वय : –** काव्ये कविभि: ब्रह्मक्षत्रस्य हि नामानि गोत्रकर्मानुरूपत: शर्मवर्मकृतानि कार्याणि | वणिजाम् दत्तप्रायाणि नामानि संप्रयोजयेत् |

**अर्थ –** काव्यामध्ये कवींनी ब्राह्मण आणि क्षत्रियांची नावे त्यांच्या गोत्र आणि कर्मानुसार ठेवावीत आणि त्यांच्या नावासमोर 'शर्मा' किंवा 'वर्मा' या शब्दांचा प्रयोग करावा. (म्हणजे ब्राह्मणाच्या नावांसमोर 'शर्मा' आणि क्षत्रियांच्या नावांच्या समोर 'वर्मा' लावावे) आणि वाण्याच्या (वणिक) नावानंतर 'दत्त' या शब्दाचा प्रयोग करावा. (जसे – सोमशर्मा, कृष्णवर्मा, चारुदत्त)

**कापालिकास्तु घण्टान्तनामन : समुदाहृता |**
**शौर्योदात्तानि नामानि तथा शूरेषु योजयेत् || ९६ ||**

**पदच्छेद :–** कापालिका : तु घण्टान्तनामन : समुदाहृता |
शौर्योदात्तानि नामानि तथा शूरेषु योजयेत् || ९६ ||

**अन्वय : –** कापालिका : तु घण्टान्तनामन : समुदाहृता | तथा शूरेषु शौर्योदात्तानि नामानि योजयेत् |

**अर्थ –** कापालिकांना 'घंटांत' या शब्दाने संबोधित करावे आणि वीरांसाठी शौर्य, उदात्त सूचक नावांचा प्रयोग करावा .

**❖ स्त्रीपात्रांचा नामविधि ❖**

**विजयार्थानि नामानि राजस्त्रीणां तु नित्यश : |**
**दत्ता मित्रा सेनेति वेश्यानामानि योजयेत् || ९७ ||**

**पदच्छेद :–** विजयार्थानि नामानि राजस्त्रीणाम् तु नित्यश : |
दत्ता मित्रा सेना इति वेश्यानामानि योजयेत् || ९७ ||

**अन्वय : –** राजस्त्रीणाम् तु नित्यश : विजयार्थानि नामानि (तथा) दत्ता मित्रा सेना इति वेश्यानामानि योजयेत् |

**अर्थ –** राजपत्नींची (राण्यांची) नावे विजयाची सूचना देणारी असावीत . (जसे - विजयवती) आणि वेश्यांच्या नावामध्ये 'दत्ता' 'सेना' 'मित्रा' इत्यादी शब्दांचा वापर करावा . (जसे - वासवदत्ता, वसंतसेना, विदग्धमित्रा)

**नानाकुसुमनामान : प्रेष्या : कार्यास्तु नाटके |**
**मङ्गलार्थानि नामानि चेटानामपि योजयेत् || ९८ ||**

**पदच्छेद :–** नानाकुसुमनामान : प्रेष्या : कार्या : तु नाटके |
मङ्गलार्थानि नामानि चेटानाम् अपि योजयेत् || ९८ ||

**अन्वय : –** नाटके तु प्रेष्या : नानाकुसुमनामान : कार्या : | चेटानाम् अपि मङ्गलार्थानि नामानि योजयेत् |

**अर्थ –** नाटकात संदेशवहन करणाऱ्या दासींची नावे वेगवेगळ्या फुलांवर आधारित असावीत . (जसे - बकुलावलिका, मालतीमल्लिका) आणि चेटांची नावेही मंगलसूचक असावीत . (जसे - सिद्धार्थक)

**गम्भीरार्थानि नामानि ह्युत्तमानां प्रयोजयेत् |**
**यस्मान्नामानुसदृशं कर्म तेषां भविष्यति || ९९ ||**

**पदच्छेद :–** गम्भीरार्थानि नामानि हि उत्तमानाम् प्रयोजयेत् |
यस्मात् नामानुसदृशम् कर्म तेषाम् भविष्यति || ९९ ||

**अन्वय : –** उत्तमानाम् हि गम्भीरार्थानि नामानि प्रयोजयेत् यस्मात् तेषाम् कर्म नामानुसदृशम् भविष्यति |

**अर्थ –** उत्तमपात्रांची नावे गंभीर अर्थाची असावीत ज्यामुळे त्यांचे कर्म त्यांच्या नावाला साजेसे होईल . (जसे – अक्षोभ्य)

**जातिचेष्टानुरूपाणि शेषाणामपि कारयेत् |**
**नामानि पुरुषाणां तु स्त्रीणां चोक्तानि तत्त्वत: || १०० ||**

**पदच्छेद :–** जातिचेष्टानुरूपाणि शेषाणाम् अपि कारयेत् |
नामानि पुरुषाणाम् तु स्त्रीणाम् च उक्तानि तत्त्वत: || १०० ||

**अन्वय : –** शेषाणाम् जातिचेष्टानुरूपाणि नामानि कारयेत् | एवं पुरुषाणां स्त्रीणां च नामानि तत्त्वत: उक्तानि |

**अर्थ –** शेष स्त्री-पुरुषांची नावे त्यांच्या जाती आणि कर्मानुसार असावीत . अशाप्रकारे पुरुष व स्त्रियांची नावे त्यांच्या तत्त्वानुसार सांगितली .

**एवं नामविधानं तु कर्तव्यं कविभि: सदा |**
**एवं भाषाविधानं तु ज्ञात्वा कर्माण्यशेषत: || १०१ ||**

**पदच्छेद :–** एवम् नामविधानम् तु कर्तव्यम् कविभि: सदा |
एवम् भाषाविधानम् तु ज्ञात्वा कर्माणि अशेषत: || १०१ ||

**अन्वय : –** एवं कविभि: सदा नामविधानम् कर्तव्यम् | (तथा च) कर्माणि अशेषत: ज्ञात्वा एवम् तु भाषाविधानम् कर्तव्यम् |

**अर्थ –** याप्रमाणे कवींनी नाटकामध्ये नावांचा वापर करावा आणि तसेच पात्रांची सर्व कामे व योग्यता समजून घेऊन भाषेचा वापर करावा .

### ❖ पाठ्याचे गुण ❖

**पाठ्यगुणानिदानीं वक्ष्यामः।**
**तद्यथा सप्तस्वराः त्रीणि स्थानानि चत्वारो वर्णाः द्विविधा काकुः षडलङ्काराः षडङ्गानीति। एषामिदानीं लक्षणमभिव्याख्यास्यामः।**
**तत्र सप्तस्वरा नाम षड्जर्षभगान्धारमध्यमपञ्चमधैवतनिषादाः। एते रसेषूपपाद्याः॥ १०२॥**

**पदच्छेदः –** पाठ्यगुणान् इदानीम् वक्ष्यामः। तत् यथा सप्तस्वराः त्रीणि स्थानानि चत्वारः वर्णाः द्विविधा काकुः षड्अलङ्काराः षड्अङ्गानि इति। एषाम् इदानीम् लक्षणम् अभिव्याख्यास्यामः। तत्र सप्तस्वराः नाम षड्ज-ऋषभ-गान्धार-मध्यम-पञ्चम-धैवत-निषादाः। एते रसेषु उपपाद्याः॥ १०२॥

**अन्वयः –** इदानीम् पाठ्यगुणान् वक्ष्यामः। तत् यथा - सप्तस्वराः, त्रीणि स्थानानि, चत्वारः वर्णाः, द्विविधा काकुः, षड्-अलङ्काराः, षड्अङ्गानि इति। इदानीम् एषाम् लक्षणम् अभिव्याख्यास्यामः। तत्र सप्तस्वराः नाम षड्ज-ऋषभ-गान्धार-मध्यम-पञ्चम-धैवत-निषादाः। एते रसेषु उपपाद्याः।

**अर्थ –** आता पाठ्याचे गुण सांगीन. ते याप्रमाणे आहेत - सात स्वर, तीन स्थाने, चार वर्ण, दोन काकू, सहा अलंकार आणि सहा अंग. आता या पाठ्यगुणांचे विस्तृत विवेचन करीन. षड्ज (सा), ऋषभ (रे), गांधार (ग), मध्यम (म), पंचम (प), धैवत (ध) आणि निषाद (नि). हे सात स्वर आहेत व विविध रसांमध्ये त्याचा वापर करावा.

### ❖ स्वरविधान ❖

**ततः पाठ्यं प्रयुञ्जीत षडलङ्कारसंयुतम्।**
**हास्यशृङ्गारयोः कार्यौ स्वरौ मध्यमपञ्चमौ॥ १०३॥**
**षड्जर्षभौ तथा चैव वीररौद्राद्भुतेष्वथ।**
**गान्धारश्च निषादश्च कर्तव्यौ करुणे रसे॥**
**धैवतश्चैव कर्तव्यो बीभत्से सभयानके॥ १०४॥**

**पदच्छेद :-** ततः पाठ्यम् प्रयुञ्जीत षड्-अलङ्कार-संयुतम् |
हास्य-शृङ्गारयोः कार्यौ स्वरौ मध्यम-पञ्चमौ || १०३ ||
षड्ज-ऋषभौ तथा च एव वीर-रौद्र-अद्भूतेषु अथ |
गान्धारः च निषादः च कर्तव्यौ करुणे रसे ||
धैवतः च एव कर्तव्यः बीभत्से सभयानके || १०४ ||

**अन्वयः -** ततः षड्-अलङ्कार-संयुतम् पाठ्यम् प्रयुञ्जीत | हास्य-शृङ्गारयोः मध्यम-पञ्चमौ स्वरौ कार्यौ | अथ तथा एव च वीर-रौद्र-अद्भुतेषु षड्ज-ऋषभौ | करुणे रसे गान्धारः च निषादः च कर्तव्यौ | सभयानके बीभत्से धैवतः एव च कर्तव्यः |

**अर्थ -** सहा अलंकारांनी युक्त अशा पाठ्याचा वापर करावा. हास्य आणि शृंगार रसामध्ये मध्यम आणि पंचम स्वराचा वापर करावा. वीर, अद्भुत आणि रौद्र रसामध्ये षड्ज आणि ऋषभ स्वराचा वापर करावा. करुण रसामध्ये गांधार आणि निषाद आणि तसेच बीभत्स आणि भयानक रसामध्ये धैवत स्वराचा वापर करावा.

**त्रीणि स्थानानि - उरः कण्ठः शिर इति भवत्यपि च |**
**शारीर्यामथ वीणायां त्रिभ्यः स्थानेभ्य एव तु |**
**उरसः शिरसः कण्ठात्स्वरः काकुः प्रवर्तते || १०५ ||**

**पदच्छेद :-** त्रीणि स्थानानि - उरः कण्ठः शिरः इति भवति अपि च | शारीर्याम् अथ वीणायाम् त्रिभ्यः स्थानेभ्यः एव तु | उरसः शिरसः कण्ठात् स्वरः काकुः प्रवर्तते || १०५ ||

**अन्वयः -** अथ शारीर्याम् वीणायाम् उरः कण्ठः शिरः इति त्रीणि स्थानानि भवन्ति | अपि च त्रिभ्यः स्थानेभ्यः उरसः शिरसः कण्ठात् काकुः स्वरः प्रवर्तते |

**अर्थ -** स्थान तीन आहेत - छाती, कंठ आणि मस्तक. शरीरनामक वीणेच्या छाती, कंठ आणि मस्तक या तीन स्थानातून काकु स्वर उत्पन्न होतो.

**अभाषणं च दूरस्थे शिरसा संप्रयोजयेत् |**
**नातिदूरे च कण्ठेन ह्युरसा चैव पार्श्वतः || १०६ ||**

**पदच्छेद :–** अभाषणम् च दूरस्थे शिरसा संप्रयोजयेत् |
न अतिदूरे च कण्ठेन हि उरसा च एव पार्श्वत : || १०६ ||

**अन्वय : –** दूरस्थे अभाषणम् शिरसा च, न अतिदूरे च कण्ठेन एव, पार्श्वत : च उरसा संप्रयोजयेत् |

**अर्थ –** अंतराच्या दृष्टीने, दूर असलेल्या व्यक्तीशी बोलताना मस्तक हलवावे . व्यक्ती फार दूर नसेल तर कंठातून बोलावे आणि व्यक्ती खूपच जवळ असेल हळू आवाजात उरस्य (छातीतील) वायूचा प्रयोग करून बोलावे .

**उरसोदाहृतं वाक्यं शिरसा दीपयेद्बुध : |**
**कण्ठेन शमनं कुर्यात्पाठ्ययोगेषु सर्वदा || १०७ ||**

**पदच्छेद :–** उरसा उदाहृतम् वाक्यम् शिरसा दीपयेत् बुध : |
कण्ठेन शमनम् कुर्यात् पाठ्ययोगेषु सर्वदा || १०७ ||

**अन्वय : –** पाठ्ययोगेषु बुध : सर्वदा उरसा उदाहृतम् वाक्यम् शिरसा दीपयेत् कण्ठेन शमनम् कुर्यात् |

**अर्थ –** पाठ्याचा वापर करताना विद्वानांनी नेहमी उरस्यकथित वाक्य मस्तकाद्वारे अधिक व्यक्त करावे आणि कंठाद्वारे बोलून ते वाक्य पूर्ण करावे .

**❖ वर्ण ❖**

**उदात्तश्चानुदात्तश्च स्वरित: कम्पितस्तथा |**
**वर्णाश्चत्वार एव स्यु: पाठ्ययोगे तपोधना: || १०८ ||**

**पदच्छेद :–** उदात्त : च अनुदात्त : च स्वरित : कम्पित : तथा |
वर्णा : चत्वार : एव स्यु : पाठ्ययोगे तपोधना : || १०८ ||

**अन्वय : –** तपोधना : पाठ्ययोगे वर्णा : उदात्त : च अनुदात्त : च स्वरित : तथा कम्पित : एव चत्वार : स्यु : |

**अर्थ –** हे तपस्विंनो, पाठ्याचे वाचन करताना उदात्त, अनुदात्त, स्वरित आणि कंपित असे चार वर्ण सांगितले आहेत .

शृंगार आणि हास्य रसामध्ये स्वरित आणि उदात्त स्वर वापरावा. वीर, रौद्र आणि अद्‍भुत रसामध्ये उदात्त आणि कंपित स्वर योजावा. तसेच करूण, बीभत्स आणि भयानक रसामध्ये अनुदात्त, स्वरित आणि कंपित स्वरांनी पठन करावे.

**❖ काकू ❖**

**द्विविधा काकु: साकांक्षा निराकांक्षा |**
**चेति वाक्यस्य साकांक्षनिराकांक्षत्वात् || १०९ ||**

**पदच्छेद: –** द्विविधा काकु: साकांक्षा निराकांक्षा |
च इति वाक्यस्य साकांक्ष-निराकांक्षत्वात् || १०९ ||

**अन्वय: –** वाक्यस्य साकांक्ष-निराकांक्षत्वात् काकु: साकांक्षा निराकांक्षा च इति द्विविधा |

**अर्थ –** वाक्याची साकांक्ष (साकार) आणि निराकांक्ष (निराकार) ही दोन रूपे असल्यामुळे काकुचे दोन प्रकार आहेत. १) साकांक्षा आणि २) निराकांक्षा

**अनियुक्तार्थकं वाक्यं साकांक्षमिति संज्ञितम् |**
**नियुक्तार्थं तु यद्वाक्यं निराकांक्षं तदुच्यते || ११० ||**

**पदच्छेद: –** अनियुक्तार्थकम् वाक्यम् साकांक्षम् इति संज्ञितम् |
नियुक्तार्थम् तु यत् वाक्यम् निराकांक्षम् तत् उच्यते || ११० ||

**अन्वय: –** अनियुक्तार्थकम् वाक्यम् साकांक्षम् इति संज्ञितम् | यत् वाक्यम् तु नियुक्तार्थम् तत् निराकांक्षम् इति उच्यते |

**अर्थ –** जेथे साकांक्ष वाक्य असते तेथे 'साकांक्षा काकु' असतो. म्हणजे जेथे पूर्णरूपाने अर्थ प्रकट होत नाही, केवळ संकेताद्वारे अर्थनिष्पत्ति होते, तेव्हा ते 'साकांक्ष' काकु समजावे. जेव्हा वाक्यातून अर्थ पूर्णपणे प्रकट होतो, तेव्हा त्यास 'निराकांक्ष काकु' म्हणावे.

**तत्र साकांक्षं नाम तारादिमन्द्रान्तमनियुक्तार्थमनियातितवर्णालङ्कारं कण्ठोर: स्थानगतम् |**
**निराकांक्षं नाम नियुक्तार्थं नियातितवर्णालङ्कारं शिर:स्थानगतं मन्द्रादितारान्तमिति || १११ ||**

**पदच्छेद :** – तत्र साकांक्षम् नाम तारादि-मन्द्रान्तम् अनियुक्तार्थम् अनिर्यातित-वर्णालङ्कारम् कण्ठ-उर-स्थान-गतम् |
निराकांक्षम् नाम नियुक्तार्थम् निर्यातित-वर्णालङ्कारम् शिर :स्थानगतम् मन्द्रादि-तारान्तम् इति || १११ ||

**अन्वय :** – तत्र साकांक्षम् नाम तारादि-मन्द्रान्तम् अनियुक्तार्थम् कण्ठोर-स्थानगतम् अनिर्यातित-वर्णालङ्कारम् | निराकांक्षम् नाम नियुक्तार्थम् निर्यातित-वर्णालङ्कारम् शिर :-स्थानगतम् मन्द्रादि-तारान्तम् इति |

**अर्थ** – यातील साकांक्ष काकु तार स्वरापासून सुरू होतो आणि मंद्र स्वरावर संपतो . 'अनियुक्तार्थक' वाक्य ज्यात वर्ण आणि अलंकार अव्यक्त असतात आणि ती कंठ आणि उर :स्थानगतच असतात . परंतु, निराकांक्ष काकु हा नियुक्तार्थक वर्णालंकारांनी युक्त असतो जो शिर :स्थानगत असतो . तो मंद्राने सुरू होऊन तारस्वराने संपतो .

**❖ सहा अलंकार ❖**

**अथ षडलङ्कारा नाम -**
**उच्चो दीप्तश्च मन्द्रश्च नीचो द्रुतविलम्बितौ |**
**पाठयस्यैते ह्यलङ्कारा लक्षणं च निबोधत || ११२ ||**

**पदच्छेद :** – अथ षट् अलङ्कारा : नाम -
उच्च : दीप्त : च मन्द्र : च नीच : द्रुतविलम्बितौ |
पाठ्यस्य एते हि अलङ्कारा : लक्षणम् च निबोधत || ११२ ||

**अन्वय :** – अथ षट् अलङ्कारा : नाम - उच्च :, दीप्त :, मन्द्र :, नीच :, द्रुतविलम्बितौ च | एते हि पाठ्यस्य अलङ्कारा : लक्षणम् च निबोधत |

**अर्थ** – आता सहा अलंकारांची नावे - उच्च, दीप्त, मंद्र, नीच, द्रुत आणि विलंबित हे सहा पाठ्याचे अलंकार आहेत . आता यांची लक्षणे समजून घ्या .

**❖ अलंकाराची लक्षणे व उपयोग ❖**

**उच्चो नाम शिर:स्थानगस्तारस्वर: |**
**स च दूरस्थाभाषणविस्मयोत्तरोत्तरसंजल्पदूराह्वानत्रासनाबाधाद्येषु || ११३ ||**

**पदच्छेद:** – उच्च: नाम शिर:स्थानग: तारस्वर: | स: च दूरस्थ-अभाषण-विस्मय-उत्तरोत्तर-संजल्प-दूराह्वान-त्रासन-अबाधा-आद्येषु || ११३ ||

**अन्वय:** – उच्च: नाम शिर:स्थानग: तारस्वर: | स: च दूरस्थ-अभाषण-विस्मय-उत्तरोत्तर-संजल्प-दूराह्वान-त्रासन-अबाधाद्येषु |

**अर्थ** – शिर:स्थानावर असलेला तारस्वर 'उच्च' होय . त्याचा उपयोग दूर असलेल्या लोकांशी बोलण्यासाठी, विस्मयामध्ये, उत्तर-प्रत्युत्तराच्या वेळी, दुरून आव्हान करण्यासाठी, त्रास आणि बाधा उत्पन्न करण्यासाठी करावा .

**दीप्तो नाम शिर:स्थानगत:तारतर: |**
**स च आक्षेपकलहविवादामर्षक्रुष्टाधर्षणक्रोधशौर्यदर्पतीक्ष्णरूक्षाभिधाननिर्भर्त्सनाक्रन्दितादिषु |**

**पदच्छेद:** – दीप्त: नाम शिर:स्थानगत: तारतर: | स च आक्षेप-कलह-विवाद-अमर्ष-क्रुष्ट-आधर्षण-क्रोध-शौर्य-दर्प-तीक्ष्ण-रूक्ष- अभिधान-निर्भर्त्सन-आक्रन्दित-आदिषु |

**अन्वय:** – दीप्त: नाम शिर:स्थानगत: तारतर: | स च आक्षेप-कलह-विवाद-अमर्ष-क्रुष्ट-आधर्षण-क्रोध-शौर्य-दर्प-तीक्ष्ण- रूक्ष-अभिधान-निर्भर्त्सन-आक्रन्दित-आदिषु |

**अर्थ** – दीप्त स्वर हा शिर:स्थानावर असून खूप अधिक तारस्वरूपी असतो . याचा वापर आक्षेप, भांडण, विवाद, राग, ओरडणे, अपमान, क्रोध, शौर्य, दर्प, तीक्ष्ण, रूक्षता, मोठ्याने बोलणे, निर्भत्सना (कुचंबणा) आणि आक्रंदित यांमध्ये केला जातो .

**मन्द्रो नाम उर:स्थानगतो |**
**निर्वेदग्लानिचिन्तौत्सुक्यदैन्यव्याधिक्रीडागाढशस्त्रक्षतमूर्छामदगुह्यार्थवचनादिषु |**

**पदच्छेद:** – मन्द्र: नाम उर:स्थानगत: | निर्वेद-ग्लानि-चिन्ता-औत्सुक्य-दैन्य-व्याधि-क्रीडा-गाढशस्त्रक्षत-मूर्च्छा-मद-गुह्यार्थवचन-आदिषु |

**अर्थ** – मंद स्वर उर:स्थानातून (छातीतून) उत्पन्न होतो . याचा उपयोग निर्वेद, ग्लानि, चिंता, औत्सुक्य, दैन्य, व्याधि, क्रीडा, तीक्ष्ण शस्त्राचा आघात, मूर्च्छा, मद आणि गूढ अर्थ सांगण्यासाठी करावा .

**नीचो नाम उर:स्थानस्थो मन्द्रतर: | स च स्वभावाभाषणव्याधिशमश्रमार्तस्तपतितमूर्च्छितादिषु |**

**पदच्छेद:** – नीच: नाम उर:स्थानस्थ: मन्द्रतर: | स: च स्वभाव-अभाषण-व्याधि-शम-श्रम-आर्तस्त-पतित-मूर्च्छित-आदिषु |

**अर्थ** – नीच स्वर हा छातीतून उत्पन्न होणारा अतिशय मंद्र स्वर असतो . याचा वापर स्वत:च्या मनातील भाव, संभाषण, आजारपण, शम, श्रमाने थकलेले असताना, त्रासलेले, पडलेले, मूर्च्छित असताना वापरला जातो .

**द्रुतो नाम कण्ठगत: | स च त्वरित: लल्लनमन्मनभयशीतज्वरत्रासायस्तात्ययिककार्यविदनादिषु |**

**पदच्छेद:** – द्रुत: नाम कण्ठगत: | स: च त्वरित: लल्लन-मन्मन-भय-शीत-ज्वर-त्रास-आयस्त-आत्ययिक-कार्य-आवेदन-आदिषु |

**अन्वय:** – द्रुत: नाम कण्ठगत: | स: च त्वरित: लल्लन-मन्मन-भय-शीत-ज्वर-त्रास-आयस्त-आत्ययिक-कार्य-आवेदन-आदिषु |

**अर्थ** – द्रुत स्वर कंठातून उच्चारला जातो . त्याचा वापर पुढील स्थितीत त्वरेने केला जातो . जसे - लहान मुलांचे लाड करताना, रुसलेल्या बाळाला मनविण्यासाठी, भय, थंडी, ताप, त्रास, दु:ख, मदत हवी असताना, कामाचा व्याप आणि बातमी सांगणे इत्यादी दर्शविण्यासाठी .

**विलम्बितो नाम कण्ठस्थानग: तनुमन्द्र: |**
**स च शृङ्गारकरुणवितर्कितविचरामर्षासूयिताव्यक्तार्थप्रवादलज्जाचिन्ता-तर्जनविस्मयदोषानुकीतन-दीर्घरोगनिपीडनादिषु || ११४ ||**

**पदच्छेद:** – विलम्बित: नाम कण्ठस्थानग: तनुमन्द्र: | स: च शृङ्गार-करुण-वितर्कित-विचर-अमर्ष-असूयिता-व्यक्तार्थ-प्रवाद-लज्जा-चिन्ता-तर्जन-विस्मय-दोष-अनुकीर्तन-दीर्घरोग-निपीडन-आदिषु || ११४ ||

**अन्वयः** – विलम्बितः नाम कण्ठस्थानगः तनुमन्द्रः । सः च शृङ्गार-करुण-वितर्कित-विचर-अमर्ष-असूयिता-व्यक्तार्थ-प्रवाद-लज्जा-चिन्ता-तर्जन-विस्मय-दोष-अनुकीर्तन-दीर्घरोग-निपीडन-आदिषु ।

**अर्थ** – कंठातून येणारा विलंबित स्वर हा क्षीण आणि मंद असतो. शृंगार, करुण, वितर्क, विचार, राग, मत्सर, अव्यक्त अर्थ, अफवा, लाज, चिंता, रागावणे, आश्चर्य, दोष सांगताना, खूप मोठे आजारपण, मन दुखवणे इत्यादींमध्ये याचा वापर करावा.

**❖ अत्रानुवंश्या श्लोका भवन्ति – ❖**

**उत्तरोत्तरसंजल्पपरुषाक्षेपणेषु च ।**
**तीक्ष्णरूक्षाभिनये आवेगे क्रन्दिते तथा ॥ ११५ ॥**
**परोक्षस्य समाह्वाने तर्जने त्रासने तथा ।**
**दूरस्थाभाषणे चैव तथा निर्भर्त्सनेषु च ॥ ११६ ॥**
**भावेष्वेतेषु नित्यं हि नानारससमश्रया ।**
**उच्चा दीप्ता द्रुता चैव काकुः कार्या प्रयोक्तृभिः ॥ ११७॥**

**पदच्छेदः** – अत्र अनुवंश्याः श्लोकाः भवन्ति –
उत्तरोत्तर-संजल्प-परुष-आक्षेपणेषु च ।
तीक्ष्ण-रूक्ष-अभिनये आवेगे क्रन्दिते तथा ॥ ११५ ॥
परोक्षस्य समाह्वाने तर्जने त्रासने तथा ।
दूरस्थाभाषणे च एव तथा निर्भर्त्सनेषु च ॥ ११६ ॥
भावेषु एतेषु नित्यम् हि नानारससमश्रया ।
उच्चा दीप्ता द्रुता च एव काकुः कार्या प्रयोक्तृभिः ॥ ११७ ॥

**अन्वयः** – प्रयोक्तृभिः नित्यम् उत्तरोत्तरसंजल्पपरुषाक्षेपणेषु च तीक्ष्णरूक्षाभिनये तथा आवेगे क्रन्दिते परोक्षस्य समाह्वाने तर्जने तथा त्रासने एव च दूरस्थाभाषणे तथा निर्भर्त्सनेषु च हि एतेषु भावेषु नानारससमश्रया उच्चा दीप्ता एव च द्रुता काकुः कार्या ।

**अर्थ** – कथा-कथनामध्ये, कठोर वचनांनी आरोप-प्रत्यारोप करताना, तीक्ष्ण आणि रूक्ष विषयाच्या अभिनयासाठी, आवेगामध्ये, आक्रोश करताना, परोक्ष व्यक्ती बोलवत असताना, रागावताना, घाबरविण्यासाठी, बोलताना इत्यादी भाव दाखविण्यासाठी नाट्यकर्त्यांनी विविध रसांसाठी उच्च, दीप्त आणि द्रुत काकुंचा वापर करावा .

**व्याधिते च ज्वरार्ते च भयार्ते शीतविप्लुते |**
**नियमस्थे वितर्के च गाढशस्त्रक्षतेषु च ||११८||**
**गुह्यार्थवचने चैव चिन्तायां तपसि स्थिते |**
**मन्द्रा नीचा च कर्तव्या काकुर्नाट्यप्रयोक्तृभि: ||११९||**

**पदच्छेद:** – व्याधिते च ज्वरार्ते च भयार्ते शीतविप्लुते |
नियमस्थे वितर्के च गाढशस्त्रक्षतेषु च ||११८||
गुह्यार्थवचने च एव चिन्तायाम् तपसि स्थिते |
मन्द्रा नीचा च कर्तव्या काकु: नाट्यप्रयोक्तृभि: ||११९||

**अन्वय:** – व्याधिते ज्वरार्ते भयार्ते शीतविप्लुते नियमस्थे वितर्के च गाढशस्त्रक्षतेषु च गुह्यार्थवचने एव च चिन्तायाम् तपसि स्थिते नाट्यप्रयोक्तृभि: मन्द्रा नीचा च काकु: कर्तव्या |

**अर्थ** – आजारी असताना, तापाने फणफणत असताना, भीतीने व्याकुळ झाले असताना, थंडीने त्रस्त असताना, नियमांचे पालन करताना, तर्क-वितर्क करताना, शस्त्राने केलेली खोलसर जखम असेल तर, गूढार्थ सांगताना, चिंतेमध्ये आणि तपस्या करताना नाट्यजाणकारांनी मंद्र आणि नीच काकुचा वापर करावा .

**लल्ले च मन्मने चैव भयार्ते शीतविप्लुते |**
**मन्द्रा द्रुता च कर्तव्या काकुर्नाट्यप्रयोक्तृभि: || १२० ||**

**पदच्छेद:** – लल्ले च मन्मने च एव भयार्ते शीतविप्लुते |
मन्द्रा द्रुता च कर्तव्या काकु: नाट्यप्रयोक्तृभि: || १२० ||

**अन्वय:** – लल्ले मन्मने भयार्ते शीतविप्लुते च नाट्यप्रयोक्तृभि: मन्द्रा द्रुता च काकु: कर्तव्या |

**अर्थ** – बालविनोद करताना, एखाद्यास मनविण्यासाठी, भीतीने व्याकुळ झाले असताना आणि थंडीचा अभिनय करतांना नाट्यविद्वानांनी मंद्र आणि द्रुत काकुचा वापर करावा .

**दृष्टनष्टानुसरणे इष्टानिष्टश्रुते तथा |**
**इष्टार्थख्यापने चैव चिन्ताध्याने तथैव च || १२१ ||**
**उन्मादेऽसूयिते चैव उपालम्भे तथैव हि |**
**अव्यक्तार्थप्रवादे च कथायोगे तथैव च || १२२ ||**
**उत्तरोत्तरसंजल्पे कार्येऽतिशयसंयुते |**
**विकृते व्याधिते क्रोधे दु:खे शोके तथैव च || १२३ ||**
**विस्मयामर्षयोश्चैव प्रहर्षे परिदेविते |**
**विलम्बिता च दीप्ता च काकुर्मन्द्रा च वै भवेत् || १२४ ||**

**पदच्छेद :** – दृष्ट-नष्ट-अनुसरणे इष्ट-अनिष्ट-श्रुते तथा |
इष्टार्थ-ख्यापने च एव चिन्ता-ध्याने तथा एव च || १२१ ||
उन्मादे असूयिते च एव उपालम्भे तथा एव हि |
अव्यक्तार्थ-प्रवादे च कथायोगे तथा एव च || १२२ ||
उत्तरोत्तर-संजल्पे कार्ये अतिशय-संयते |
विकृते व्याधिते क्रोधे दु:खे शोके तथा एव च || १२३ ||
विस्मय-अमर्षयो : च एव प्रहर्षे परिदेविते |
विलम्बिता च दीप्ता च काकु : मन्द्रा च वै भवेत् || १२४ ||

**अन्वय :** – दृष्ट-नष्ट-अनुसरणे, इष्ट-अनिष्ट-श्रुते, इष्टार्थख्यापने, चिन्ताध्याने, उन्मादे, असूयिते, उपालम्भे, अव्यक्तार्थप्रवादे, कथायोगे, उत्तरोत्तरसंजल्पे, अतिशयसंयते कार्ये, विकृते, व्याधिते, क्रोधे, दु:खे, शोके, विस्मय-अमर्षयो :, प्रहर्षे, परिदेविते च विलम्बिता, दीप्ता मन्द्रा च काकु : भवेत् |

**अर्थ** – दृष्ट नष्टाचे अनुसरण करताना, आवडती किंवा न आवडती गोष्ट ऐकताना, 'आवडत्या गोष्टीची घोषणा करताना, चिंतापूर्वक केलेल्या चिंतनामध्ये, उन्माद आणि

मत्सरामध्ये, ओळख करताना, अव्यक्त अर्थाचा उच्चार करताना, कथा कथनामध्ये, सलग बोलताना, अतिशय अधिकृत कार्यामध्ये, विकृतपणामध्ये किंवा आजारपणामध्ये, राग, दु:ख आणि शोकामध्ये, विस्मय आणि रागामध्ये अत्यंत आनंदामध्ये, शोकामध्ये विलंबिता दीप्ता आणि मंद्रकाकुचा वापर करावा .

**लघ्वक्षरप्रायकृते गुर्वक्षरकृते तथा |**
**उच्चा दीप्ता च कर्तव्या काकुस्तत्र प्रयोक्तृभि: || १२५ ||**

**पदच्छेद:** – लघ्वक्षरप्रायकृते गुर्वक्षरकृते तथा |
उच्चा दीप्ता च कर्तव्या काकु: तत्र प्रयोक्तृभि: || १२५ ||

**अन्वय:** – लघ्वक्षरप्रायकृते तथा गुर्वक्षरकृते तत्र प्रयोक्तृभि: उच्चा दीप्ता च काकु: कर्तव्या |

**अर्थ** – जेथे बहुतांशपणे लघु अक्षर आणि गुरू अक्षर असतील तेथे नाट्यविद्वानांनी उच्च आणि दीप्त काकुचा वापर करावा .

**यानि सौम्यार्थयुक्तानि सुखभावकृतानि च |**
**मन्द्रा विलम्बिता चैव तत्र काकुर्विधीयते || १२६ ||**

**पदच्छेद:** – यानि सौम्यार्थ-युक्तानि सुखभाव-कृतानि च |
मन्द्रा विलम्बिता च एव तत्र काकु: विधीयते || १२६ ||

**अन्वय:** – यानि सौम्यार्थयुक्तानि सुखभावकृतानि च तत्र मंद्र विलम्बिता च काकु: विधीयते |

**अर्थ** – जेथे सौम्य (शुभ) अर्थांनी युक्त आणि सुखद भाव दर्शविणारे कार्य असते तेथे मंद्र आणि विलंबिता काकुचा प्रयोग करावा .

**यानि स्युस्तीक्ष्णरूक्षाणि दीप्ता चोच्चा च तेष्वपि |**
**एवं नानाश्रयोपेतं पाठ्यं योज्यं प्रयोक्तृभि: || १२७ ||**

**पदच्छेद:** – यानि स्यु: तीक्ष्णरूक्षाणि दीप्ता च उच्चा च तेषु अपि |
एवम् नानाश्रयोपेतम् पाठ्यम् योज्यम् प्रयोक्तृभि: || १२७ ||

**अन्वय:** – यानि तीक्ष्णरूक्षाणि स्यु: तेषु दीप्ता उच्चा च काकु: विधीयते | एवम् प्रयोक्तृभि: नानाश्रयोपेतम् पाठ्यम् योज्यम् |

**अर्थ** – जेथे तीक्ष्ण आणि रूक्ष भाव असतील तिथे उच्च आणि दीप्त काकु असतात. याप्रमाणे नाट्य जाणणाऱ्यांनी विविध विषयांनी युक्त अशा पाठ्याची योजना करावी.

**❖ विविध भाव आणि रसयुक्त काकुचा प्रयोग ❖**

**हास्यशृङ्गारकरुणेष्विष्टा काकुर्विलम्बिता |**
**वीररौद्राद्भुतेषूच्चा दीप्ता वापि प्रशस्यते || १२८ ||**

**❖ षडंग ❖**

**भयानके सबीभत्से द्रुता नीचा च कीर्तिता |**
**एवं भावरसोपेता काकु: कार्या प्रयोक्तृभि: || १२९ ||**

**पदच्छेद:** – हास्यशृङ्गारकरुणेषु इष्टा काकु: विलम्बिता |
वीररौद्राद्भुतेषु उच्चा दीप्ता वा अपि प्रशस्यते || १२८ ||
भयानके सबीभत्से द्रुता नीचा च कीर्तिता |
एवम् भावरसोपेता काकु: कार्या प्रयोक्तृभि: || १२९ ||

**अन्वय:** – हास्यशृङ्गारकरुणेषु विलम्बिता काकु: इष्टा | वीररौद्राद्भुतेषु उच्चा दीप्ता वा अपि प्रशस्यते | भयानके सबीभत्से द्रुता नीचा च कीर्तिता | एवम् प्रयोक्तृभि: भावरसोपेता काकु: कार्या |

**अर्थ** – शृंगार, हास्य आणि करुण रसामध्ये विलंबिता काकु योग्य आहे. वीर, रौद्र आणि अद्भुत रसामध्ये उच्चा आणि दीप्ता काकु उत्कृष्ट आहे. बीभत्स आणि भयानक रसामध्ये नीच आणि द्रुत काकु स्वराचा वापर सांगितला आहे. याप्रमाणे नाट्य जाणणाऱ्यांनी विविध भाव आणि रसांनी युक्त अश्या काकुचा वापर करावा.

❖ अंग ❖

**अथाङ्गानि षट्-विच्छेदोऽर्पणविसर्गोऽनुबन्धो दीपनं प्रशमनमिति | तत्र विच्छेदो नाम विरामकृत: | अर्पणं नाम लीलायमानमधुरवल्गुना स्वरेण पूरयतेव रङ्गं यत्पठ्यते तदर्पणम् | विसर्गो नाम वाक्यन्यास: | अनुबन्धो नाम पदान्तरेष्वपि विच्छेद:, अनुच्छ्वसनं वा | दीपनं नाम त्रिस्थानशोभि वर्धमानस्वरं चेति | प्रशमनं नाम तारगतानां स्वराणां प्रशाम्यतामवैस्वर्येणावतारणमिति |**

**पदच्छेद: -** अथ अङ्गानि षट्- विच्छेद: अर्पण-विसर्ग: अनुबन्ध: दीपनम् प्रशमनम् इति | तत्र विच्छेद: नाम विरामकृत: | अर्पणम् नाम लीलायमान-मधुरवल्गुना स्वरेण पूरयता इव रङ्गम् यत् पठ्यते तत् अर्पणम् | विसर्ग: नाम वाक्यन्यास: | अनुबन्ध: नाम पदान्तरेषु अपि विच्छेद:, अनुच्छ्वसनम् वा | दीपनम् नाम त्रिस्थानशोभि वर्धमानस्वरम् च इति | प्रशमनम् नाम तारगतानाम् स्वराणाम् प्रशाम्यताम् अवैस्वर्येण अवतारणम् इति |

**अर्थ -** अंग ६ प्रकारचे सांगितले आहेत. विच्छेद, अर्पण, विसर्ग, अनुबंध, दीपन आणि प्रशमन. यातील विच्छेद हा अंग विरामासाठी असतो. लीलायुक्त मधुर आणि मनोहर स्वरांनी रंगभूमी भरून काढणाऱ्या पठणाला 'अर्पण' असे म्हणतात. वाक्यव्यवस्था एकत्रित ठेवणारा (विन्यास) विसर्ग आहे. पदांच्या मध्ये विच्छेद किंवा उच्छ्वसन नसणे यास 'अनुबंध' म्हणतात. तीन जागेवर सुशोभित होणारा वर्धमान स्वर 'दीपन' म्हणून ओळखला जातो. तारमध्ये उच्च ध्वनीवर पोहोचून प्रशांत अवस्थेमध्ये येणाऱ्या स्वरांचा विस्तार न करता त्यांना खाली ठेवणे / आणणे याला 'प्रशमन' म्हणतात.

**❖ रसामध्ये त्याचा प्रयोग ❖**

**❖ एषां च रसगत: प्रयोग: ❖**

**एषां च रसगत: प्रयोग: - तत्र हास्यशृङ्गारयोराकांक्षायामर्पणविच्छेददीपनप्रशमन-युक्तं पाठ्यं कार्यम् | दीपनप्रशमनयुक्तं करुणे | विच्छेदप्रशमनदीपनानुबन्ध- बहुलं वीररौद्राद्भुतेषु, विसर्गविच्छेदयुक्तम् बीभत्सभयानकयोरिति |**

**पदच्छेद : -** एषाम् च रसगत : प्रयोग : - तत्र हास्य-शृङ्गारयो : आकांक्षायाम् अर्पण-विच्छेद-दीपन-प्रशमन-युक्तम् पाठ्यम् कार्यम् | दीपन-प्रशमन-युक्तम् करुणे | विच्छेद-प्रशमन-दीपन-अनुबन्ध-बहुलं वीर-रौद्र-अद्भुतेषु, विसर्ग-विच्छेद-युक्तम् बीभत्स-भयानकयो : इति |

**अर्थ** - ज्याचा विविध रसांमध्ये वापर केला जातो . शृंगार आणि हास्य रसामध्ये अर्पण, विच्छेद आणि प्रशमनाने पठण करावे . करुण रसामध्ये दीपन आणि प्रशमन युक्त असे पाठ्य हवे . तसेच वीर, रौद्र, आणि अद्भुत रसामध्ये विच्छेद, प्रशमन, दीपन आणि अनुबंधयुक्त पाठ्य असावे . बीभत्स आणि भयानक रसामध्ये विसर्ग आणि विच्छेदयुक्त पाठ्य असावे .

### ❖ मंद्र, मध्य व तार स्थान ❖

**सर्वेषामप्येषां मन्द्रमध्यतारकृत : प्रयोगस्त्रिस्थानगत : |**
**तत्र दूरस्थाभाषणे तारं शिरसा नातिदूरे मध्यं कण्ठेन पार्श्वतो**
**मन्द्रमुरसा प्रयोजयेत्पाठ्यमिति मन्द्रात्तारं न गच्छेत् ताराद्वा मन्द्रमिति || १३० ||**

**पदच्छेद : -** सर्वेषाम् अपि एषाम् मन्द्रमध्यतारकृत : प्रयोग : त्रिस्थानगत : | तत्र दूरस्थाभाषणे तारम् शिरसा नातिदूरे मध्यम् कण्ठेन पार्श्वत : मन्द्रम् उरसा प्रयोजयेत् पाठ्यम् इति मन्द्रात् तारम् न गच्छेत् तारात् वा मन्द्रम् इति || १३० ||

**अन्वय : -** सर्वेषाम् अपि एषाम् मन्द्रमध्यतारकृत : त्रिस्थानगत : प्रयोग : | तत्र दूरस्थाभाषणे शिरसा तारम् नातिदूरे कण्ठेन मध्यम् पार्श्वत : उरसा मन्द्रम् पाठ्यम् प्रयोजयेत् इति | मन्द्रात् तारम् तारात् वा मन्द्रम् न गच्छेत् इति |

**अर्थ** - या सर्व अंगांचा वापर मंद्र, मध्य आणि तार या तीन स्थानांमध्ये केला जातो . यातील कोणी एक दूर असलेल्या व्यक्तीशी बोलताना शिरस्थ असलेला तार स्वराने पठन करावे, खूप दूर नसल्यास कंठातून निर्माण होणाऱ्या मध्य स्वराने पठन करावे आणि बाजूलाच असलेल्या व्यक्तिंशी बोलताना उरस् छातीतून निर्माण होणाऱ्या मंद्र स्वरातून पठन करावे . मंद्र स्वरातून तार स्वर आणि तार स्वरातून मग पुन्हा मंद्र स्वरावर जाऊ नये .

**एषां च द्रुतमध्यविलम्बितास्त्रयो लया रसेषूपपाद्याः |**
**तत्र हास्यशृङ्गारयोर्मध्यलयः करुणे विलम्बितो वीररौद्राद्भुतबीभत्सभयानकेषु द्रुत इति ||१३१||**

**पदच्छेदः** – एषाम् च द्रुत-मध्य-विलम्बिताः त्रयः लयाः रसेषु उपपाद्याः | तत्र हास्य-शृङ्गारयोः मध्यलयः करुणे विलम्बितः वीर-रौद्र-अद्भुत-बीभत्स-भयानकेषु द्रुतः इति|| १३१ ||

**अन्वयः** – एषाम् च द्रुत-मध्य-विलम्बिताः त्रयः लयाः रसेषु उपपाद्याः | तत्र हास्यशृङ्गारयोः मध्यलयः करुणे विलम्बितः वीर-रौद्र-अद्भुत-बीभत्स-भयानकेषु द्रुतः इति |

**अर्थ** – यांचा वापर रसानुसार द्रुत, मध्य आणि विलंबित अशा तीन लयींमध्ये करावा. शृंगार आणि हास्य रसासाठी मध्य लय, करुणेसाठी विलंबित लय आणि वीर, रौद्र, अद्भुत, बीभत्स आणि भयानक रसामध्ये द्रुत लयीचा वापर करावा.

### ❖ विरामाची लक्षणे व उपयोग ❖

**अथ विरामः अर्थसमाप्तौ कार्यवशान्न छन्दोवशात् |**
**कस्मात् दृश्यन्ते ह्येकद्वित्रिचतुरक्षरा विरामाः | यथा -**
**किं ! गच्छ मा विश सुदुर्जन वारितोऽसि कार्यं त्वया न मम सर्वजनोपयुक्तम् |**
**सूचासु चाङ्कुरगते च तथोपाचारेष्वल्पाक्षराणि हि पदानि भवन्ति काव्ये || १३२ ||**

**पदच्छेदः** – अथ विरामः अर्थसमाप्तौ कार्यवशात् न छन्दोवशात् |
कस्मात् दृश्यन्ते हि एकद्वित्रिचतुरक्षराः विरामाः | यथा -
किं ! गच्छ मा विश सुदुर्जन वारितः असि कार्यम् त्वया न मम सर्वजनोपयुक्तम् |
सूचासु च अङ्कुरगते च तथा उपाचारेषु अल्पाक्षराणि हि पदानि भवन्ति काव्ये||१३२ ||

**अन्वयः** – अथ अर्थसमाप्तौ विरामः कार्यवशात् न छन्दोवशात् | कस्मात् दृश्यन्ते हि एकद्वित्रिचतुरक्षराः विरामाः | यथा - किम्, गच्छ, मा विश, सुदुर्जन, वारितः असि |

त्वया मम सर्वजनोपयुक्तम् कार्यम् न (शक्यते) | काव्ये सूचासु च अङ्कुरगते च तथा उपाचारेषु अल्पाक्षराणि पदानि भवन्ति |

**अर्थ** – अर्थ समजावा यासाठी छंदांच्या नियमांनुसार नव्हे तर अपेक्षित कार्याप्रमाणे विराम घेतला जातो. कारण एक, दोन, तीन आणि चार अक्षरांवरदेखील विराम घेतलेला आढळतो. उदाहरणार्थ - किं, गच्छ, मा विश, सुदुर्जन | "काय रे, चालता हो. बसू नकोस. अरे निगरगट्ट दुष्टा, तुला हाकलवत आहे मी. सर्व लोकांना उपयोगी असे माझे काम तुझ्याने होणार नाही." काव्यामध्ये, सूचा अंकुर इत्यादी अभिनयामध्ये, उपचारामध्ये अल्प अक्षरांची पदे असतात.

**एवं विरामे प्रयत्नोऽनुष्ठेयः | कस्मात् विरामो ह्यर्थानुदर्शकः | अत्र श्लोकः -**
**विरामेषु प्रयत्नो हि नित्यं कार्यः प्रयोक्तृभिः |**
**कस्मादभिनयो ह्यस्मिन्नर्थापेक्षी यतः स्मृतः || १३३ ||**

**पदच्छेदः** – एवम् विरामे प्रयत्नः अनुष्ठेयः | कस्मात् विरामः हि अर्थानुदर्शकः | अत्र श्लोकः -
विरामेषु प्रयत्नः हि नित्यम् कार्यः प्रयोक्तृभिः |
कस्मात् अभिनयः हि अस्मिन् अर्थापेक्षी यतः स्मृतः || १३३ ||

**अन्वयः** – एवम् विरामे प्रयत्नः अनुष्ठेयः | कस्मात् विरामः हि अर्थानुदर्शकः | अत्र श्लोकः - प्रयोक्तृभिः हि नित्यम् विरामेषु प्रयत्नः कार्यः | कस्मात् यतः अस्मिन् अभिनयः हि अर्थापेक्षी इति स्मृतः |

**अर्थ** – अशा प्रकारे, विरामाच्या बाबतीत विशेष प्रयत्न करावा, कारण 'विराम' वाक्याचा अर्थ उलगडवून सांगण्यात मार्गदर्शक ठरतो. याविषयी पुढील श्लोक म्हटला जातो.

नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी विरामांच्या बाबतीत नेहमी प्रयत्नशील असावे, कारण या विरामामुळेच अभिनय हा अर्थाला साजेसा आणि योग्य ठरतो.

**यत्र व्यग्रावुभौ हस्तौ तत्र दृष्टिसमन्वित:|**
**वाचिकाभिनय: कार्यो विरामैरर्थदर्शकै: || १३४ ||**

**पदच्छेद: –** यत्र व्यग्रौ उभौ हस्तौ तत्र दृष्टिसमन्वित:|
वाचिकाभिनय: कार्य: विरामै: अर्थदर्शकै: || १३४ ||

**अन्वय: –** यत्र उभौ हस्तौ व्यग्रौ तत्र अर्थदर्शकै: विरामै: दृष्टिसमन्वित: वाचिकाभिनय: कार्य:|

**अर्थ –** दोन्ही हात विशेष अभिनय दर्शविण्यात व्यस्त असतील तर अर्थदर्शक विरामांद्वारे दृष्टिक्षेपयुक्त वाचिक अभिनयाचा वापर करावा.

**❖ विराम व अलंकाराद्वारे अर्थनिश्चिती ❖**

**प्रायो वीरे च रौद्रे च करौ प्रहरणाकुलौ |**
**बीभत्से कुत्सितत्वाच्च भवत: कुञ्चितौ करौ || १३५ ||**
**हास्ये चोद्देशमात्रेण करुणे च प्रलम्बितौ |**
**अद्‌भुते विस्मयात्स्तब्धौ भयाच्चैव भयानके || १३६ ||**

**पदच्छेद: –** प्राय: वीरे च रौद्रे च करौ प्रहरणाकुलौ |
बीभत्से कुत्सितत्वात् च भवत: कुञ्चितौ करौ || १३५ ||
हास्ये च उद्देशमात्रेण करुणे च प्रलम्बितौ |
अद्‌भुते विस्मयात् स्तब्धौ भयात् च एव भयानके || १३६ ||

**अन्वय: –** प्राय: वीरे रौद्रे च करौ प्रहरणाकुलौ, बीभत्से च कुत्सितत्वात् करौ कुञ्चितौ भवत:| हास्ये च करुणे च उद्देशमात्रेण प्रलम्बितौ | अद्‌भुते विस्मयात् भयानके एव च भयात् स्तब्धौ|

**अर्थ –** सर्वसाधारणपणे वीर आणि रौद्र रसामध्ये दोन्ही हात शस्त्रप्रहारासाठी, हल्ल्यासाठी व्यस्त असतात. बीभत्स रसामध्ये कुत्सितपणामुळे दोन्ही हात कुंचित होतात. हास्य आणि करुण रसामध्ये केवळ हेतूने दोन्ही हात लांब होतात. अद्‌भुत रसामध्ये विस्मयामुळे आणि भयानक रसामध्ये भीतिमुळे दोन्ही हात स्तब्ध होतात.

**एवमादिषु चान्येषु प्रविचारेऽथ हस्तयो: |**
**अलङ्कारविरामाभ्यां साध्यते ह्यर्थनिश्चय: || १३७ ||**

**पदच्छेद:** – एवम् आदिषु च अन्येषु प्रविचारे अथ हस्तयो: |
अलङ्कार-विरामाभ्याम् साध्यते हि अर्थनिश्चय: || १३७ ||

**अन्वय:** – एवम् आदिषु अन्येषु अथ हस्तयो: प्रविचारे च अलङ्कारविरामाभ्याम् हि अर्थनिश्चय: साध्यते |

**अर्थ** – अशा इतर अन्य कार्यामध्ये तसेच हस्तसंचालनाच्या बाबतीत अलंकार आणि विराम यांच्याद्वारे अर्थनिश्चिती केली जाते .

**ये विरामा: स्मृता वृत्ते तेष्वलङ्कार दृश्यते |**
**समाप्तेऽर्थे पदे वापि तथा प्राणवशेन वा || १३८ ||**
**पदवर्णसमासे च द्रुते बह्वर्थसंकटे |**
**कार्यो विराम: पादान्ते तथा प्राणवशेन वा |**
**शेषमर्थवशेनैव विरामं सम्प्रयोजयेत् || १३९ ||**

**पदच्छेद:** – ये विरामा: स्मृता: वृत्ते तेषु अलङ्कार: दृश्यते |
समाप्ते अर्थे पदे वा अपि तथा प्राणवशेन वा || १३८ ||
पदवर्णसमासे च द्रुते बहु-अर्थ-संकटे |
कार्य: विराम: पादान्ते तथा प्राणावशेन वा |
शेषम् अर्थवशेन एव विरामम् सम्प्रयोजयेत् || १३९ ||

**अन्वय:** – वृत्ते ये विरामा: स्मृता: तेषु अलङ्कार: दृश्यते | समाप्ते अर्थे अपि वा पदे तथा प्राणवशेन वा | पदवर्णसमासे च द्रुते बह्वर्थसंकटे विराम: कार्य: | पादान्ते तथा प्राणावशेन वा शेषम् अर्थवशेन एव विरामम् सम्प्रयोजयेत् |

**अर्थ** – वृत्तांमध्ये जे विराम सांगितले गेले आहेत, त्यांमध्ये विशिष्ट अलंकार अथवा विशेष सौंदर्य दिसते . म्हणून विशेष अर्थ, शब्द संपल्यावर किंवा श्वास घेण्यासाठी विरामांचा विशेष उपयोग करावा .

रस, भाव इत्यादींचे औचित्य साधायचे असेल तर, वर्ण, पद आणि समासामध्ये, जलदगतीने उच्चारण करताना, अनेक अर्थांची आपत्ती येत असेल तर, चरणाचा शेवट होत असेल तर किंवा श्वास घ्यायचा असेल तर विरामांचा प्रयोग करावा . अन्यत्र अर्था प्रमाणे विराम घ्यावा .

**❖ कृष्याक्षरांविषयी ❖**

**अत्र च भावगतानि रसगतानि च कृष्याक्षराणि बोद्धव्यानि तद्यथा -**
**आकारैकारसंयुक्तमैकारौकारसंयुतम् |**
**व्यञ्जनं यद्भवेद्दीर्घं कृष्यं तत्तु विधीयते || १४० ||**

**पदच्छेद :** – अत्र च भावगतानि रसगतानि च कृष्याक्षराणि बोद्धव्यानि तत् यथा -
आकारैकार-संयुक्तम् ऐकारौकार-संयुतम् |
व्यञ्जनम् यत् भवेत् दीर्घम् कृष्यम् तत् तु विधीयते || १४० ||

**अन्वय :** – अत्र भावगतानि च रसगतानि च कृष्याक्षराणि बोद्धव्यानि तत् यथा - आकार-एकार-संयुक्तम् ऐकार-औकार-संयुतम् यत् व्यञ्जनम् दीर्घम् भवेत् तत् तु कृष्यम् विधीयते |

**अर्थ** – भाव आणि रस व्यक्त करणारी कृष्याक्षरे आता जाणून घ्यावीत . जे व्यंजन आकार, एकार, ऐकार, औकाराच्या संयोगाने दीर्घ होते त्या व्यंजनास 'कृष्याक्षर' म्हणतात .

**विषादे च वितर्के च प्रश्नेऽथामर्ष एव च |**
**कलाकालप्रमाणेन पाठ्यं कार्य प्रयोक्तृभि : || १४१ ||**

**पदच्छेद :** – विषादे च वितर्के च प्रश्ने अथ अमर्षे एव च |
कलाकालप्रमाणेन पाठ्यम् कार्यम् प्रयोक्तृभि : || १४१ ||

**अन्वय :** – अथ प्रयोक्तृभि : विषादे, वितर्के, प्रश्ने अमर्षे च कलाकालप्रमाणेन पाठ्यम् कार्यम् |

**अर्थ** – नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी विषाद, वितर्क, प्रश्न आणि राग व्यक्त करताना कला आणि काळ यांच्या प्रमाणानुसार पठन करावे .

**शेषाणामर्थयोगेन विरामे विरमेदिह |**
**एकद्वित्रिचतु:पञ्चषट्कलं च विलम्बितम् || १४२ ||**

**पदच्छेद:** – शेषाणाम् अर्थयोगेन विरामे विरमेत् इह।
एकद्वित्रिचतु:पञ्चषट्कलम् च विलम्बितम् ॥ १४२ ॥

**अन्वय:** – इह शेषाणाम् अर्थयोगेन विरामे विरमेत्। विलम्बितम् एकद्वित्रिचतु:पञ्चषट्कलम् च।

**अर्थ** – उरलेल्या अक्षरांच्या बाबतीत अर्थाप्रमाणे विरामाच्या वेळी विराम ठेवावा. विलंबित काकुमध्ये एक, दोन, तीन, चार, पाच, सहा कला असतात.

**विलम्बिते विरामे हि सदा गुर्वक्षरं भवेत् |**
**षण्णां कलानां परतो विलम्बो न विधीयते || १४३ ||**

**पदच्छेद:** – विलम्बिते विरामे हि सदा गुरु अक्षरम् भवेत्।
षण्णाम् कलानाम् परत: विलम्ब: न विधीयते ॥ १४३ ॥

**अन्वय:** – विलम्बिते विरामे हि सदा गुरु अक्षरम् भवेत्। षण्णाम् कलानाम् परत: विलम्ब: न विधीयते।

**अर्थ** – विलंबित विराम म्हणजेच काकुमध्ये नेहमी गुरू अक्षर असावे. सहा कलांनंतर विराम (विलंब) असू नये.

**अथवा कारणोपेतं प्रयोगं कार्यम् एव च |**
**समीक्ष्य वृत्ते कर्तव्य: विराम: रसभावत: || १४४ ||**

**पदच्छेद:** – अथवा कारणोपेतम् प्रयोगम् कार्यम् एव च।
समीक्ष्य वृत्ते कर्तव्य: विराम: रसभावत: ॥ १४४ ॥

**अन्वय:** – अथवा कारणोपेतम् एव च प्रयोगम् कार्यम्। रसभावत: समीक्ष्य वृत्ते विराम: कर्तव्य:।

**अर्थ** – अथवा कारणानुसार म्हणजेच प्रयोजनाप्रमाणे विरामांचा वापर करावा. रस आणि भाव नीट तपासून वृत्तामध्ये विरामाचा वापर करावा.

**ये विरामाः स्मृताः पाठ्ये वृत्तपादसमुद्भवाः |**
**उत्क्रम्यापि क्रमं तज्ज्ञैः कार्यास्तेऽर्थवशानुगाः || १४५ ||**

**पदच्छेद:** – ये विरामाः स्मृताः पाठ्ये वृत्तपादसमुद्भवाः |
उत्क्रम्य अपि क्रमम् तज्ज्ञैः कार्याः ते अर्थवशानुगाः || १४५ ||

**अन्वय:** – पाठ्ये वृत्तपादसमुद्भवाः ये विरामाः स्मृताः, क्रमम् उत्क्रम्य अपि तज्ज्ञैः ते अर्थ वशानुगाः कार्याः |

**अर्थ** – पाठ्यातील वृत्ताच्या चरणामध्ये उदभवलेला जो विराम सांगितला आहे, विशिष्ट क्रमाचे उल्लंघन करूनही त्याचे वृत्त जाणणाऱ्यांनी अर्थाप्रमाणे विराम द्यावा .

**नापशब्दं पठेत्तज्ज्ञो भिन्नवृत्तं तथैव हि |**
**विश्रमेन्नाविरामेषु दैन्ये काकुं न दीपयेत् || १४६ ||**

**पदच्छेद:** – न अपशब्दम् पठेत् तज्ज्ञः भिन्नवृत्तम् तथा एव हि |
विश्रमेत् न अविरामेषु दैन्ये काकुम् न दीपयेत् || १४६ ||

**अन्वय:** – तज्ज्ञः अपशब्दम् तथा एव भिन्नवृत्तम् हि न पठेत् | अविरामेषु न विश्रमेत् | दैन्ये काकुम् न दीपयेत् |

**अर्थ** – नाट्यविद्वानांनी अपशब्दाचे पठन करू नये आणि तसेच वृत्तभंग करून वाचू नये . विराम नसलेल्या ठिकाणी विराम घेऊ नये आणि दयनीय अवस्थेमध्ये काकुस्वर मोठ्याने म्हणू नये .

**❖ पाठ्यधर्म ❖**

**वर्जितं काव्यदोषैस्तु लक्षणाढ्यं गुणान्वितम् |**
**स्वरालङ्कारसंयुक्तं पठेत्पाठ्यं यथाविधि || १४७ ||**

**पदच्छेद:** – वर्जितम् काव्यदोषैः तु लक्षणाढ्यम् गुणान्वितम् |
स्वरालङ्कार-संयुक्तम् पठेत् पाठ्यम् यथाविधि || १४७ ||

**अन्वय:** – काव्यदोषै: वर्जितम् तु लक्षणाढ्यम् गुणान्वितम् स्वरालङ्कार-संयुक्तम् पाठ्यम् यथाविधि पठेत्।

**अर्थ** – काव्यदोष नसलेला, लक्षणांनी संपूर्ण, गुणांनी युक्त असलेला, स्वर आणि अलंकारांनी युक्त असा पाठ विद्वानांनी यथाविधी वाचावा.

**अलङ्कारा विरामाश्च ये पाठ्ये संस्कृते स्मृता:।**
**त एव सर्वे कर्तव्या: स्त्रीणां पाठ्ये त्वसंस्कृते ॥ १४८ ॥**

**पदच्छेद:** – अलङ्कारा: विरामा: च ये पाठ्ये संस्कृते स्मृता:।
ते एव सर्वे कर्तव्या: स्त्रीणाम् पाठ्ये तु असंस्कृते ॥ १४८ ॥

**अन्वय:** – ये अलङ्कारा: विरामा: च संस्कृते पाठ्ये स्मृता: ते सर्वे एव स्त्रीणाम् असंस्कृते पाठ्ये तु कर्तव्या:।

**अर्थ** – संस्कृत पाठ्यामध्ये जे अलंकार आणि विराम सांगितले आहेत, त्या सर्वांचा वापर स्त्रियांच्या प्राकृत पाठामध्येही करावा.

**एवमतेत्स्वरकृतं कलाताललयान्वितम् ।**
**दशरूपविधाने तु पाठ्यं योज्यं प्रयोक्तृभि: ॥ १४९ ॥**

**पदच्छेद:** – एवम् एतत् स्वरकृतम् कला–ताल–लय–अन्वितम्।
दशरूपविधाने तु पाठ्यम् योज्यम् प्रयोक्तृभि: ॥ १४९ ॥

**अन्वय:** – एवम् प्रयोक्तृभि: दशरूपविधाने तु एतत् स्वरकृतम् कलाताललयान्वितम् पाठ्यम् योज्यम्।

**अर्थ** – नाट्यविद्वानांनी दशरूपविधानामध्ये स्वरांनी युक्त तसेच कला, ताल आणि लयीने युक्त असलेल्या पाठाचा प्रयोग करावा.

**उक्तं काकुविधानं तु यथावदनुपूर्वश:।**
**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि दशरूपविकल्पनम् ॥ १५० ॥**

**पदच्छेद:** – उक्तम् काकुविधानम् तु यथावत् अनुपूर्वश: |
अत: ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि दशरूपविकल्पनम् || १५० ||

**अन्वय:** – काकुविधानम् तु यथावत् अनुपूर्वश: उक्तम् | अत: ऊर्ध्वम् दशरूपविकल्पनम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – अशाप्रकारे, पूर्वसूरींनी सांगितल्याप्रमाणे काकुविधान मी जसेच्या तसे सांगितले आहे . आता यानंतर दहा रूपकांविषयी तुम्हांला सांगीन .

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे वागभिनये काकुस्वरव्यञ्जनो नाम सप्तदशोऽध्याय: ||**

**|| अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील वाचिक अभिनयातील 'काकुस्वरव्यंजन' नावाचा सतरावा अध्याय संपला . ||**

# अठरावा अध्याय

## दशरूपनिरूपण



# अठरावा अध्याय

## दशरूपनिरूपण

**❖ दहा रूपकांचे वर्णन ❖**

**वर्णयिष्याम्यहं विप्रा! दशरूपविकल्पनम्।**
**नामतः कर्मतश्चैव तथा चैव प्रयोगतः॥ १॥**

**पदच्छेदः** – वर्णयिष्यामि अहम् विप्राः! दशरूपविकल्पनम्।
नामतः कर्मतः च एव तथा च एव प्रयोगतः॥ १॥

**अन्वयः** – विप्राः! अहम् नामतः, कर्मतः तथा च प्रयोगतः दशरूपविकल्पनम् वर्णयिष्यामि।

**अर्थ** – हे विद्वानांनो, आता मी नावानुसार, कार्यानुसार आणि प्रयोगानुसार दहा रूपकांविषयी वर्णन करीन.

**नाटकं सप्रकरणमङ्को व्यायोग एव च।**
**भाणः समवकारश्च वीथी प्रहसनं डिमः॥ २॥**
**ईहामृगश्च विज्ञेयो दशमो नाट्यलक्षणे।**
**एतेषां लक्षणमहं व्याख्यास्याम्यनुपूर्वशः॥ ३॥**

**पदच्छेदः** – नाटकम् सप्रकरणम् अङ्कः व्यायोगः एव च।
भाणः समवकारः च वीथी प्रहसनम् डिमः॥ २॥
ईहामृगः च विज्ञेयः दशमः नाट्यलक्षणे।
एतेषाम् लक्षणम् अहम् व्याख्यास्यामि अनुपूर्वशः॥ ३॥

**अन्वयः** – नाट्यलक्षणे नाटकम्, सप्रकरणम्, अङ्कः, व्यायोगः, भाणः, समवकारः, वीथी, प्रहसनम्, डिमः, ईहामृगः च दशमः विज्ञेयः। अहम् एतेषाम् लक्षणम् अनुपूर्वशः व्याख्यास्यामि। (प्राक् च सामान्यलक्षणं ततो विशेषलक्षणानि चोद्देशक्रमेणेति चानुपूर्व्यार्थः।– अ.भा.)

**अर्थ** – नाट्याच्या लक्षणांनुसार नाटक, प्रकरण, अंक, व्यायोग, भाण, समवकार, वीथी, प्रहसन, डिम हे प्रकार मानले जातात आणि त्यांमध्ये ईहामृग हा दहावा प्रकार होय.

प्रथम सामान्यलक्षण त्यानंतर विशेषलक्षणे अशा क्रमाने या दहा रूपकांची लक्षणे आता मी सांगणार आहे .

### ❖ सर्व रूपकांसाठी वृत्तींचे महत्त्व ❖

**सर्वेषामेव काव्यानां मातृका वृत्तय: स्मृता: |**
**आभ्यो विनिस्सृतं ह्येतद्दशरूपं प्रयोगत: || ४ ||**

**पदच्छेद: –** सर्वेषाम् एव काव्यानाम् मातृका: वृत्तय: स्मृता: |
आभ्य: विनिस्सृतम् हि एतत् दशरूपम् प्रयोगत: || ४ ||

**अन्वय: –** वृत्तय: सर्वेषाम् एव काव्यानाम् मातृका: स्मृता: | आभ्य: हि प्रयोगत: एतत् दशरूपम् विनिस्सृतम् | (दशानां नाटकादीनां रूपं दशरूपम् | अ . भा . )

**अर्थ –** वृत्तींना सर्वच काव्यांची जननी म्हटले जाते . या वृत्तींच्या प्रयोगांमुळेच हे दशरूपक निर्माण झाले आहे . (दहा नाटक इत्यादींचे स्वरूप म्हणजे दशरूप | अ . भा . )

**जातिभि: श्रुतिभिश्चैव स्वरा ग्रामत्वमागता: |**
**यथा तथा वृत्तिभेदै: काव्यबन्धा भवन्ति हि || ५ ||**

**पदच्छेद: –** जातिभि: श्रुतिभि: च एव स्वरा: ग्रामत्वम् आगता: |
यथा तथा वृत्तिभेदै: काव्यबन्धा: भवन्ति हि || ५ ||

**अन्वय: –** यथा जातिभि: श्रुतिभि: च स्वरा: ग्रामत्वम् आगता: तथा हि वृत्तिभेदै: काव्यबन्धा: भवन्ति | (इह हि ग्रामशब्देन जातिसमुदायोऽभिधीयते | वस्तुतस्तु षड्जादि स्वरसमुदायो ग्राम: | अ . भा . )

**अर्थ –** ज्याप्रमाणे जाति आणि श्रुतिंमुळे स्वरांना विशेष ग्रामत्व प्राप्त होते, त्याचप्रमाणे वृत्तींच्या विविधतेमुळे काव्यबंधांची रचना होत असते . (वस्तुत: षड्ज इत्यादी स्वरसमुदायास ग्राम असे म्हणतात . - अ . भा . )

**ग्रामौ पूर्णस्वरौ द्वौ तु यथा वै षड्जमध्यमौ |**
**सर्ववृत्तिविनिष्पन्नौ काव्यबन्धौ तथा त्विमौ || ६ ||**

**पदच्छेद :** – ग्रामौ पूर्णस्वरौ द्वौ तु यथा वै षड्जमध्यमौ |
सर्ववृत्ति-विनिष्पन्नौ काव्यबन्धौ तथा तु इमौ || ६ ||

**अन्वय :** – द्वौ ग्रामौ यथा षड्जमध्यमौ पूर्णस्वरौ तथा इमौ काव्यबन्धौ तु सर्ववृत्तिविनिष्पन्नौ |

**अर्थ** – जसे षड्ज आणि मध्यम हे दोन्ही ग्राम पूर्ण स्वर आहेत त्याचप्रमाणे हे दोन काव्यबंध (नाटक आणि प्रकरण) सर्व वृत्तींद्वारे निर्माण होऊ शकते .

**ज्ञेयं प्रकरणं चैव तथा नाटकमेव च |**
**सर्ववृत्तिविनिष्पन्नं नानाबन्धसमाश्रयम् || ७ ||**

**पदच्छेद :** – ज्ञेयम् प्रकरणम् च एव तथा नाटकम् एव च |
सर्ववृत्ति-विनिष्पन्नम् नानाबन्ध-समाश्रयम् || ७ ||

**अन्वय :** – नाटकम् तथा एव च प्रकरणम् सर्ववृत्तिविनिष्पन्नम् एव च नानाबन्धसमाश्रयम् ज्ञेयम् |

**अर्थ** – नाटक आणि प्रकरण हे दोन्ही सर्व वृत्तींतून उत्पन्न होणारे असतात आणि विविध प्रकारच्या रचना या वृत्तींवर अवलंबून असतात .

**वीथी समवकारश्च तथेहामृग एव च |**
**उत्सृष्टिकाङ्को व्यायोगो भाण: प्रहसनं डिम: || ८ ||**
**कैशिकीवृत्तिहीनानि रूपाण्येतानि कारयेत् |**
**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि काव्यबन्धविकल्पनम् || ९ ||**

**पदच्छेद :** – वीथी समवकार: च तथा ईहामृग: एव च |
उत्सृष्टिकाङ्क: व्यायोग: भाण: प्रहसनम् डिम: || ८ ||
कैशिकीवृत्तिहीनानि रूपाणि एतानि कारयेत् |
अत: ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि काव्यबन्ध-विकल्पनम् || ९ ||

**अन्वय :** – वीथी, समवकार:, ईहामृग:, उत्सृष्टिकाङ्क:, व्यायोग:, भाण:, प्रहसनं, डिम: च एतानि रूपाणि कैशिकीवृत्तिहीनानि कारयेत् | अत: ऊर्ध्वम् काव्यबन्धविकल्पनम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – वीथी, समवकार, ईहामृग, उत्सृष्टिकांक, व्यायोग, भाण, प्रहसन आणि डिम या रूपकांमध्ये कैशिकीवृत्तीचा वापर केला जात नाही. आता यानंतर काव्यबंधाविषयी सांगीन.

**❖ १. नाटक लक्षण ❖**

**प्रख्यातवस्तुविषयं प्रख्यातोदात्तनायकं चैव | (आर्या)**
**राजर्षिवंश्यचरितं तथैव दिव्याश्रयोपेतम् || १० ||**
**नानाविभूतिभिर्युतमृद्धिविलासादिभिर्गुणैश्चैव | (आर्या)**
**अङ्कप्रवेशकाद्यं भवति हि तन्नाटकं नाम || ११ ||**

**पदच्छेद :** – प्रख्यात-वस्तु-विषयम् प्रख्यात-उदात्तनायकम् च एव |
राजर्षि-वंश्य-चरितम् तथा एव दिव्य-आश्रय-उपेतम् || १० ||
नाना-विभूतिभि: युतम् ऋद्धि-विलास-आदिभि: गुणै: च एव |
अङ्क-प्रवेशक-आद्यम् भवति हि तत् नाटकम् नाम || ११ ||

**अन्वय :** – प्रख्यातवस्तुविषयम् प्रख्यातोदात्तनायकम् राजर्षिवंश्यचरितम् दिव्याश्रयोपेतम् नानाविभूतिभि: ऋद्धिविलासादिभि: गुणै: युतम् अङ्कप्रवेशकाद्यम् च तत् हि नाटकं नाम भवति |

**अर्थ** – ज्यामध्ये कथावस्तुतील विषय प्रसिद्ध असतो, नायक प्रसिद्ध आणि उदात्त असतो, ज्यात राजर्षी वंशाचे चरित्रवर्णन असते, आणि ज्यामध्ये दिव्य आश्रय असतो, जे अनेक विभूती, समृद्धी आणि विलास इत्यादी गुणांनी युक्त असते आणि ज्यामध्ये अंक व प्रवेशक इत्यादी असतात त्यास नाटक असे म्हणावे.

**नृपतीनां यच्चरितं नानारसभावचेष्टितं बहुधा | (आर्या)**
**सुखदु:खोत्पत्तिकृतं भवति हि तन्नाटकं नाम || १२ ||**

**पदच्छेद :** – नृपतीनाम् यत् चरितम् नाना-रस-भाव-चेष्टितम् बहुधा |
सुख-दु:ख-उत्पत्ति-कृतम् भवति हि तत् नाटकम् नाम || १२ ||

**अन्वय: –** नृपतीनाम् यत् चरितम् बहुधा नानारसभावचेष्टितम् सुखदु:खोत्पत्तिकृतम् (अस्ति) तत् हि नाटकम् नाम भवति |

**अर्थ –** ज्यामध्ये विविध प्रकारच्या रस आणि भाव यांनी राजांचे चरित्र अधिक व्यक्त होते, जे सुख आणि दु:ख निर्माण करणारे असते त्यास नाटक म्हणतात .

**❖ अंक लक्षण ❖**

**अस्यावस्थोपेतं कार्यं प्रसमीक्ष्य बिन्दुविस्तारात् | (आर्या)**
**कर्तव्योऽङ्क: सोऽपि तु गुणान्वितं नाट्यतत्त्वज्ञै: || १३ ||**

**पदच्छेद: –** अस्य अवस्थोपेतम् कार्यम् प्रसमीक्ष्य बिन्दुविस्तारात् |
कर्तव्य: अङ्क: स: अपि तु गुणान्वितम् नाट्यतत्त्वज्ञै: || १३ ||

**अन्वय: –** नाट्यतत्त्वज्ञै: अस्य (नाटकस्य) अवस्थोपेतम् कार्यम् प्रसमीक्ष्य बिन्दुविस्तारात् गुणान्वितम् स: अपि तु अङ्क: कर्तव्य: |

**अर्थ –** नाट्यविद्वानांनी नाटकाच्या विविध अवस्थांनुसार कार्य नीट पाहून कथावस्तूचा विस्तार करून गुणांच्या आधारांवर 'अंक' रचना करावी .

**अङ्क इति रूढिशब्दो भावैश्च रसैश्च रोहयत्यर्थान् |(आर्या)**
**नानाविधानयुक्तो यस्मात्तस्माद्भवेदङ्क: || १४ ||**

**पदच्छेद: –** अङ्क: इति रूढिशब्द: भावै: च रसै: च रोहयति अर्थान् |
नानाविधानयुक्त: यस्मात् तस्मात् भवेत् अङ्क: || १४ ||

**अन्वय: –** अङ्क: इति रूढिशब्द: | (यस्मिन्) भावै: च रसै: च अर्थान् रोहयति | यस्मात् नानाविधानयुक्त: तस्मात् अङ्क: भवेत् |

**अर्थ –** अंक हा रूढ शब्द आहे . ज्यात भाव आणि रसांद्वारे अर्थ अधिक चांगल्या रीतीने कळतो . जो अनेक विधानांनी युक्त असतो, त्यास 'अंक' असे म्हणतात .
(तथा चोक्तं कोहलेन – त्रिधाङ्कोऽङ्कावतारेण चूडयाङ्कमुखेन वा | राजानुरागस्य शय्याफलकादिकृतस्य मूलमिति चूलिकेत्युक्तम् | तेन प्रथम: चूलिकाङ्क: (चूडा) | यत्र

त्वङ्के सर्वेषामङ्कानां योऽर्थो बीजलक्षणस्तस्य संहार: संमिलितत्वेन प्राप्तिर्भवति सोऽवताराङ्क: | यथा रत्नावल्यां द्वितीयोऽङ्क: | यत्र तु अनुसन्धानमात्रप्राणत्वेन तदुपयोगितया वृत्तान्तमुच्यते तत् उपश्लिष्टम् अङ्कमुखम् | स एव इह किञ्चिदवलग्नबिन्दु: इत्यनेन तृतीय: भेद: उक्त: | यथा रत्नावल्यां तृतीये अङ्के अभिसन्धानं यौगन्धरायणादीनाम् अस्त्येव | तेन अयं संक्षेप: - अङ्के यत् अवर्णनीयं वस्तु तत्तावत् द्विधा प्रधानं तदुपयोगि च तदुपयोगी अपि किञ्चित् दैववशात् उपयोगं याति किञ्चित् अभिसन्धिबलात् इति त्रिविधोऽङ्कार्थ:| - अ. भा. )

(कोहलाच्या मतानुसार अंक हे तीन प्रकारचे असतात - चूलिका, अवतार आणि किंचिदवलग्नबिन्दु. राजाच्या प्रेमाचे शय्या, फलक इत्यादी कृतींचे जे मूळ त्यास चूलिका असे म्हणतात. उदाहरणार्थ - रत्नावली नाटकातील १ ते २३ श्लोक. ज्या अंकामध्ये अन्य सर्व अंकांच्या अर्थाचा कथाबीजानुसार एकत्र समारोप केला जातो, त्यास अवतार अंक म्हणावे. जसे रत्नावली नाटकातील दुसरा अंक. ज्यामध्ये नियोजनाद्वारे उपयोगी ठरेल अशा संपूर्ण योजनेचा वृत्तांत सांगितला जातो तो गूढ अंक म्हणजे तिसरा अंकमुख. रत्नावली नाटकामध्ये नियोजन यौगंधरायण इत्यादींचे होते. यालाच किंचिदवलग्नबिंदू असेही म्हटले जाते. थोडक्यात सांगायचे झाले तर अंकामध्ये ज्या प्रसंगाचे वर्णन करायचे असते तो दोन प्रकारचा असतो. मुख्य प्रसंग आणि त्याला उपयोगी होईल असा अन्य प्रसंग. दुसरा प्रसंग उपयोगी असूनही कधीकधी योजनेच्या सामर्थ्यामुळे 'सुदैवाने' उपयोगी ठरतो. हा तिसऱ्या किञ्चिदवलग्नबिंदु नामक अंकाचा अर्थ होय. - अ. भा. )

**अङ्कसमाप्ति: कार्या काव्यच्छेदेन बीजसंहार: | (आर्या)**
**वस्तुव्यापी बिन्दु: काव्यसमुत्थोऽत्र नित्यं स्यात् || १५ ||**

**पदच्छेद: -** अङ्कसमाप्ति: कार्या काव्यच्छेदेन बीजसंहार: |
वस्तुव्यापी बिन्दु: काव्यसमुत्थ: अत्र नित्यम् स्यात् || १५ ||

**अन्वय: -** काव्यच्छेदेन बीजसंहार: चेत् अङ्कसमाप्ति: कार्या | अत्र वस्तुव्यापी काव्यसमुत्थ: बिन्दु: नित्यम् स्यात् |

**अर्थ** – काव्याचा विषय मूळ विषयापासून दूर जात असेल तर कथावस्तूचा विषय गोळा करीत अंक संपवावा. याठिकाणी कथावस्तु व्यक्त होईल असे आणि काव्यनिर्मितीस पोषक असे लक्षण नेहमी असावे.

**यत्रार्थस्य समाप्तिर्यत्र च बीजस्य भवति संहार: | (आर्या)**
**किञ्चिदवलग्नबिन्दु: सोऽङ्क: इति सदावगन्तव्य: || १६ ||**

**पदच्छेद:** – यत्र अर्थस्य समाप्ति: यत्र च बीजस्य भवति संहार: |
किञ्चिदवलग्नबिन्दु: स: अङ्क: इति सदा अवगन्तव्य: || १६ ||

**अन्वय:** – यत्र अर्थस्य समाप्ति: यत्र च बीजस्य संहार: (भवति) स: अङ्क: सदा 'किञ्चिदवलग्नबिन्दु:' भवति इति अवगन्तव्य: |

**अर्थ** – जेथे अर्थ संपतो आणि कथेचा विषयदेखील संपतो, तो अंक नेहमी 'किंचिदवलग्नबिंदू' होतो असे समजावे.

**ये नायका निगदितास्तेषां प्रत्यक्षचरितसम्भोग: | (आर्या)**
**नानावस्थोपेत: कार्यस्त्वङ्कोऽविकृष्टस्तु || १७ ||**

**पदच्छेद:** – ये नायका: निगदिता: तेषाम् प्रत्यक्ष-चरित-सम्भोग: |
नानावस्थोपेत: कार्य: तु अङ्क: अविकृष्ट: तु || १७ ||

**अन्वय:** – ये नायका: निगदिता: तेषाम् प्रत्यक्षचरितसम्भोग: नानावस्थोपेत: अङ्क: अविकृष्ट: कार्य: | (अविकृष्ट: इति अदीर्घ: | दीर्घो हि प्रयोक्तृप्रेक्षकाणां खेदाय स्यात् | - अ. भा.)

**अर्थ** – नाटकात जे नायक (धीरोदात्त इत्यादी किंवा प्रतिनायक) यांचा संभोग प्रत्यक्षपणे आचरिला जात असेल आणि विविध अवस्थांनी युक्त असेल तर असा अंक थोडक्यात करावा. (अविकृष्ट म्हणजे त्यावर अधिक वेळ घालवू नये. तोच प्रसंग रेटाळत राहिला तर प्रयोग करणारे आणि प्रयोग पाहणारे यांना खेद किंवा पश्चात्ताप होऊशकतो. - अ. भा.)

**नायकदेवीगुरुजनपुरोहितामात्यसार्थवाहानाम् |(आर्या)**
**नैकरसान्तरविहितो ह्यङ्क इति स वेदितव्यस्तु || १८ ||**

**पदच्छेद :** – नायक-देवी-गुरुजन-पुरोहित-अमात्य-सार्थवाहानाम् |
नैक-रसान्तर-विहित : हि अङ्क : इति स : वेदितव्य : तु || १८ ||

**अन्वय :** – नायकदेवीगुरुजनपुरोहितामात्यसार्थवाहानाम् नैकरसान्तरविहित: स: हि अङ्क: इति वेदितव्य : |

(देव्यो महादेवीभोगिनीप्रभृतय: | गुरुजनो मातृपितृभात्राचार्यादि: सार्थवाहोऽत्र सेनापति : | इतिवृत्तवशात् वणिग् एव वा | अनेकरसाङ्कितत्वादपि अङ्क इति नामेत्यर्थ : - अ . भा . )

**अर्थ** – नायक, देवी (महादेवी भोगिनी इत्यादी), गुरुजन (माता पिता भाऊ आचार्य इत्यादी), पुरोहित, मंत्री तसेच सेनापति यांच्यासाठी अनेक रसांनी युक्त असलेल्या रचनेस 'अंक' समजावे . (जर इतिवृत्त असेल तर सार्थवाह या शब्दाचा अर्थ 'व्यापारी' असा घ्यावा . अनेक रस या प्रयोगात अंकित होत असल्याने त्यास 'अंक' असे म्हटले जाते . )

**पञ्चापरा दशपरा ह्यङ्का : स्युर्नाटके प्रकरणे च | (आर्या)**
**पदच्छेद: –** प्रहसनम् अपि विज्ञेयम् द्विविधम् शुद्धम् तथा च सङ्कीर्णम् |
वक्ष्यामि तयो: युक्त्या पृथक् पृथक् लक्षणविशेषम् ||१०२||

**अन्वय :** – प्रहसनम् अपि द्विविधम् विज्ञेयम् शुद्धम् तथा च सङ्कीर्णम् | तयो : युक्त्या लक्षणविशेषम् पृथक् पृथक् वक्ष्यामि |

**अर्थ** – प्रहसनाचे दोन प्रकार आहेत १) शुद्ध आणि २) संकीर्ण . आता मी युक्तीसह विशेष लक्षणे वेगवेगळी सांगीन .

**भगवत्तापसविप्रैरन्यैरपि हास्यवादसंबद्धम् | (आर्या)**
**कापुरुषसंप्रयुक्तं परिहासाभाषणप्रायम् || १०३ ||**
**अविकृतभाषाचारं विशेषभावोपपन्नचरितपदम् | (आर्या)**
**नियतगतिवस्तुविषयं शुद्धं ज्ञेयं प्रहसनं तु || १०४ ||**

**पदच्छेद :** – भगवत्-तापस-विप्रै : अन्यै : अपि हास्यवाद-संबद्धम् |
कापुरुष-संप्रयुक्तम् परिहास-अभाषण-प्रायम् || १०३ ||
अविकृत-भाषा-आचारम् विशेषभाव-उपपन्न-चरितपदम् |
नियतगति-वस्तुविषयम् शुद्धम् ज्ञेयम् प्रहसनम् तु || १०४ ||

**अन्वय :** – भगवत्तापसविप्रै: अन्यै: अपि हास्यवादसंबद्धम्, कापुरुषसंप्रयुक्तम् परिहासाभाषण-प्रायम् अविकृतभाषाचारम् विशेषभावोपपन्नचरितपदम् नियतगतिवस्तुविषयम् तु शुद्धम् प्रहसनम् ज्ञेयम् |
(तथापि भाषाचारी यत्र न विकृती असत्याश्लीलरूपी | - अ . भा . )

**अर्थ** – प्रहसन हे देवभक्त, तपस्वी, ब्राह्मण तसेच इतर पुरुषांच्या हास्यपूर्ण संवादाने युक्त असते . तसेच यामध्ये असभ्य पुरुष बहुधा एखाद्याच्या चारित्र्याची थट्टा करतात आणि अयोग्यपणे बोलतात . असे असले तरी त्यांची भाषा असत्यावर आधारित आणि त्यांचे आचरण अश्लील नसते . त्यामध्ये विशेष रीतीने व्यभिचारी भावांनी युक्त अशी पदे म्हणजेच कथाभाग असतो . ठराविक पद्धतीने कथावस्तु आणि विषय मांडला जातो ते शुद्ध प्रहसन समजावे .

**वेश्याचेटनपुंसकविटधूर्ता बन्धकी च यत्र स्यु: | (आर्या)**
**अनिभृतवेषपरिच्छदचेष्टितकरणैस्तु संकीर्णम् || १०५ ||**

**पदच्छेद :–** वेश्या-चेट-नपुंसक-विट-धूर्ता : बन्धकी च यत्र स्यु : |
अनिभृत-वेष-परिच्छद-चेष्टित-करणै : तु संकीर्णम् || १०५ ||

**अन्वय : –** अनिभृतवेषपरिच्छदचेष्टितकरणै : यत्र वेश्याचेटनपुंसकविटधूर्ता : बन्धकी च स्यु : तु संकीर्णम् (प्रहसनम् भवति) |

**अर्थ –** अत्यंत असभ्य वेशभूषा, वस्त्र, कृती, तसेच विचित्र उपकरणांसह जिथे वेश्या, चेट, नपुंसक, विट, धूर्त आणि गणिका असतील त्याला 'संकीर्ण प्रहसन' असे म्हणतात .

**लोकोपचारयुक्ता या वार्ता यश्च दम्भसंयोग : | (आर्या)**
**स प्रहसने प्रयोज्यो धूर्तप्रविवादसम्पन्न : || १०६ ||**

**पदच्छेद :–** लोक-उपचार-युक्ता या वार्ता य : च दम्भ-संयोग : |
स : प्रहसने प्रयोज्य : धूर्त-प्रविवाद-सम्पन्न : || १०६ ||

**अन्वय : –** या वार्ता लोकोपचारयुक्ता, य : दम्भसंयोग : धूर्तप्रविवादसम्पन्न : च स : प्रहसने प्रयोज्य : |

**अर्थ –** जी कथावार्ता लोकव्यवहाराशी निगडित आहे आणि दंभाशी जोडलेली आहे आणि धूर्तांच्या वादविवादांनी युक्त आहे, अशा प्रसंगांचा वापर प्रहसनामध्ये करावा .

**वीथ्यङ्गै : संयुक्तं कर्तव्यं प्रहसनं यथायोगम् | (आर्या)**
**भाणस्यापि तु लक्षणमत : परं संप्रवक्ष्यामि || १०७ ||**

**पदच्छेद :–** वीथी-अङ्गै : संयुक्तम् कर्तव्यम् प्रहसनम् यथायोगम् |
भाणस्य अपि तु लक्षणम् अत : परम् संप्रवक्ष्यामि || १०७ ||

**अन्वय : –** प्रहसनम् यथायोगम् वीथ्यङ्गै : संयुक्तम् कर्तव्यम् | अत : परम् भाणस्य अपि तु लक्षणम् संप्रवक्ष्यामि |

**अर्थ –** प्रहसन हे यथायोग्य वीथींच्या अंगांप्रमाणे करावे . यानंतर आता 'भाणा'ची लक्षणे सांगतो .

❖ ९ . भाण लक्षण ❖

**आत्मानुभूतशंसी परसंश्रयवर्णनाविशेषस्तु |(आर्या)**
**विविधाश्रयो हि भाणो विज्ञेयस्त्वेकहार्यश्च || १०८ ||**

**पदच्छेद : –** आत्म-अनुभूत-शंसी परसंश्रय-वर्णन-अविशेष: तु |
विविधाश्रय: हि भाण: विज्ञेय: तु एकहार्य: च || १०८ ||

**अन्वय : –** आत्मानुभूतशंसी परसंश्रयवर्णनाविशेष: विविधाश्रय: एकहार्य: च 'भाण:' इति विज्ञेय: |
(एकेन पात्रेण हरणीय: सामाजिकहृदयं प्रापयितव्योऽर्थो यत्र स भाण: | एकमुखेनैव भाण्यन्ते उक्तिम् अन्त:क्रियन्ते अप्रविष्टा अपि पात्रविशेषा यत्र इति भाण: | तत्र स प्रविष्ट: पात्रविशेष: आत्मानुभूतं वा शंसति परगतं वा वर्णयति | - अ . भा . )

**अर्थ –** स्वत: अनुभवलेल्या गोष्टींचे कथन ज्यामध्ये असते, अन्य व्यक्तींवर आधारित गोष्टींचे वर्णन केले जाते, विविध लोकांविषयी बोलले जाते, एकाच नटाद्वारे कथाबीज पुढे नेले जाते त्याला 'भाण' असे म्हणतात .

(ज्यामध्ये एकाच नटाद्वारे कथाबीज पुढे नेले जाते आणि प्रेक्षकांच्या हृदयापर्यंत अर्थ ज्यामध्ये पोहोचवला जातो ते भाण होय . प्रविष्ट झाले वा न झाले तरी एकाच मुखाद्वारे स्वत: विषयी वा इतरांविषयी म्हटले जाते ते भाण होय . - अ . भा . )

**परवचनमात्मसंस्थं प्रतिवचनैरुत्तरोत्तरग्रथितै: | (आर्या)**
**आकाशपुरुषकथितैरङ्गविकारैरभिनयैश्चैव || १०९ ||**
**धूर्तविटसंप्रयोज्यो नानावस्थान्तरात्मकश्चैव | (आर्या)**
**एकाङ्को बहुचेष्ट: सततं कार्यो बुधैर्भाण: || ११० ||**

**पदच्छेद : –** परवचनम् आत्मसंस्थम् प्रतिवचनै: उत्तरोत्तर-ग्रथितै: |
आकाशपुरुष-कथितै: अङ्गविकारै: अभिनयै: च एव || १०९ ||
धूर्तविट-संप्रयोज्य: नानावस्था-अन्तरात्मक: च एव |
एकाङ्क: बहुचेष्ट: सततम् कार्य: बुधै: भाण: || ११० ||

**अन्वयः –** आकाशपुरुषकथितैः उत्तरोत्तरग्रथितैः प्रतिवचनैः अङ्गविकारैः अभिनयैः एव च आत्मसंस्थम् परवचनम् धूर्तविटसंप्रयोज्यः नानावस्थान्तरात्मकः एव च बहुचेष्टः एकाङ्कः भाणः बुधैः सततम् कार्यः।

**अर्थ –** धूर्त, विट आकाशभाषितांद्वारे, उत्तरोत्तर केलेल्या प्रतिवचनांद्वारे आणि आंगिक अभिनयाने, स्वतःची आणि दुसऱ्याची वाक्ये बोलतात. अशा विविध अवस्था असलेल्या, अनेक अंगचेष्टांनी केल्या जाणाऱ्या एक अंकी भाणाचा विद्वानांनी नेहमी प्रयोग करावा.

**भाणस्यापि हि निखिलं लक्षणमुक्तं तथागमानुगतम्। (आर्या)**
**वीथ्याः संप्रति निखिलं कथयामि यथाक्रमं विप्राः॥ १११॥**

**पदच्छेदः–** भाणस्य अपि हि निखिलम् लक्षणम् उक्तम् तथा आगम-अनुगतम्।
वीथ्याः संप्रति निखिलम् कथयामि यथाक्रमम् विप्राः॥ १११॥

**अन्वयः –** विप्राः, आगमानुगतम् भाणस्य निखिलम् लक्षणम् उक्तम्। तथा संप्रति वीथ्याः निखिलम् (लक्षणम्) यथाक्रमम् कथयामि।

**अर्थ –** हे ब्राह्मणांनो, आगमशास्त्रानुसार भाणाची संपूर्ण लक्षणे मी सांगितली. आता, मी क्रमशः वीथीची सर्व लक्षणे सांगीन.

### ❖ १०. वीथी लक्षण ❖

**सर्वरसलक्षणाढ्या युक्ता ह्यङ्गैस्त्रयोदशभिः। (आर्या)**
**वीथी स्यादेकाङ्का तथैकहार्या द्विहार्या वा॥ ११२॥**

**पदच्छेदः–** सर्व-रस-लक्षण-आढ्या युक्ता हि अङ्गैः त्रयोदशभिः।
वीथी स्यात् एकाङ्का तथा एकहार्या द्विहार्या वा॥ ११२॥

**अन्वयः –** सर्वरसलक्षणाढ्या, त्रयोदशभिः अङ्गैः युक्ता, तथा एकहार्या द्विहार्या वा एकाङ्का 'वीथी' स्यात्।

**अर्थ –** जे सर्वरसांच्या लक्षणांनी संपन्न असते, तेरा अंगांनी युक्त असते आणि एक किंवा दोन पात्रांद्वारा अभिनय केला जातो, ते एक अंकी रूपक म्हणजे 'वीथी' होय.

**अधमोत्तममध्याभिर्युक्ता स्यात्प्रकृतिभिस्तिसृभि: |(आर्या)**
**उद्धात्यकावलगितावस्पन्दितनाल्यसत्प्रलापाश्च || ११३ ||**
**वाक्केल्यथ प्रपञ्चो मृदवाधिबले छलं त्रिगतम् |(आर्या)**
**व्याहारो गण्डश्च त्रयोदशाङ्गान्युदाहृतान्यस्या: || ११४ ||**

**पदच्छेद: –** अधम-उत्तम-मध्याभि: युक्ता स्यात् प्रकृतिभि: तिसृभि: |
उद्धात्यक-अवलगित-अवस्पन्दित-नाली-असत्प्रलापा: च || ११३ ||
वाक्केली अथ प्रपञ्च: मृदव-अधिबले छलम् त्रिगतम् |
व्याहार: गण्ड: च त्रयोदश अङ्गानि उदाहृतानि अस्या: || ११४ ||

**अन्वय: –** अधमोत्तममध्याभि: तिसृभि: प्रकृतिभि: युक्ता स्यात् | अथ अस्या: त्रयोदश अङ्गानि उदाहृतानि यथा उद्धात्यक-अवलगित-अवस्पन्दित-नाली-असत्प्रलापा: वाक्केली प्रपञ्च: मृदव-अधिबले छलम् त्रिगतम् व्याहार: गण्ड: च |

**अर्थ –** वीथीमध्ये उत्तम, मध्यम व अधम अशी तीन प्रकारची पात्रे असतात. उद्धात्यक, अवलगित, अवस्पंदित, नाली, असत्प्रलाप, वाक्केली, प्रपंच, मृदव, अधिबल, छल, त्रिगत, व्याहार आणि गंड ही वीथीची तेरा अंगे आहेत.

**त्रयोदश सदाङ्गानि वीथ्यामेतानि योजयेत् | (अनुष्टुभ्)**
**लक्षणं पुनरेतेषां प्रवक्ष्याम्यनुपूर्वश: || ११५ ||**

**पदच्छेद: –** त्रयोदश सदा अङ्गानि वीथ्याम् एतानि योजयेत् |
लक्षणम् पुन: एतेषाम् प्रवक्ष्यामि अनुपूर्वश: || ११५ ||

**अन्वय: –** एतानि त्रयोदश अङ्गानि वीथ्याम् सदा योजयेत् | पुन: एतेषाम् लक्षणम् अनुपूर्वश: प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** वीथीमध्ये नेहमी या तेरा अंगांचा उपयोग करावा. आता क्रमाने मी त्यांची लक्षणे सांगीन.

❖ उद्धात्यक लक्षण ❖

**पदानि त्वगतार्थानि ये नरा: पुनरादरात्| (अनुष्टुभ्)**
**योजयन्ति पदैरन्यैस्तदुद्धात्यकमुच्यते || ११६ ||**

**पदच्छेद :–** पदानि तु अगतार्थानि ये नरा: पुन: आदरात्|
योजयन्ति पदै: अन्यै: तत् उद्धात्यकम् उच्यते || ११६ ||

**अन्वय : –** ये नरा: अगतार्थानि पदानि अन्यै: पदै: पुन: आदरात् योजयन्ति तत् उद्धात्यकम् उच्यते|

**अर्थ –** जे व्यक्ती न कळलेल्या शब्दांचा अर्थ समजण्यासाठी अन्य पदांचा आदरपूर्वक वापर करतात, त्याला 'उद्धात्यक' म्हणतात .

❖ अवलगित लक्षण ❖

**यत्रान्यस्मिन् समावेश्य कार्यमन्यत्प्रसाध्यते | (अनुष्टुभ्)**
**तच्चावलगितं नाम विज्ञेयं नाट्ययोक्तृभि: || ११७ ||**

**पदच्छेद :–** यत्र अन्यस्मिन् समावेश्य कार्यम् अन्यत् प्रसाध्यते |
तत् च अवलगितम् नाम विज्ञेयम् नाट्ययोक्तृभि: || ११७ ||

**अन्वय : –** यत्र अन्यस्मिन् समावेश्य अन्यत् कार्यम् प्रसाध्यते तत् च नाट्ययोक्तृभि: अवलगितम् नाम विज्ञेयम्|

**अर्थ –** जेव्हा एखादे विशिष्ट कार्य करून वेगळेच कार्य पूर्ण केले जाते, तेव्हा नाट्यविद्वानांनी त्यास 'अवलगित' असे जाणावे .

❖ अवस्पंदित ❖

**आक्षिप्तेऽर्थे तु कस्मिंश्चिच्छुभाशुभसमुत्थिते | (अनुष्टुभ्)**
**कौशलादुच्यतेऽन्योऽर्थस्तदवस्पन्दितं भवेत् || ११८ ||**

**पदच्छेद :** – आक्षिप्ते अर्थे तु कस्मिंश्चित् शुभ-अशुभ-समुत्थिते ।
कौशलात् उच्यते अन्य : अर्थ : तत् अवस्पन्दितम् भवेत् ॥ ११८ ॥

**अन्वय :** – शुभाशुभसमुत्थिते आक्षिप्ते अर्थे कौशलात् कस्मिंश्चित् तु अन्य: अर्थ: उच्यते तत् अवस्पन्दितम् भवेत् ।
(शुभाशुभं दैवं तेन अबुद्धिपूर्वकं कुत्रचित् अर्थे आक्षिप्तेऽपि कौशलात् तत् तत्प्रच्छादनेच्छया यत्र उत्तरोऽन्य : अर्थ : उच्यते तत् अवस्पन्दितम् । – अ . भा . )

**अर्थ** – जेव्हा कुठलाही विचार न करता अजाणताच कुठल्यातरी आक्षिप्त अर्थाविषयी सांगून हुशारीने दुसराच अर्थ सांगितला जातो त्याला 'अवस्पंदित' म्हणतात .

**❖ नालिका आणि वाक्केली ❖**

**हास्येनोपगतार्थप्रहेलिका नालिकेति विज्ञेया । (आर्या)**
**एकद्विप्रतिवचना वाक्केली स्यात्प्रयोगेऽस्मिन् ॥ ११९ ॥**

**पदच्छेद :** – हास्येन उपगत-अर्थप्रहेलिका नालिका इति विज्ञेया ।
एकद्वि-प्रतिवचना वाक्केली स्यात् प्रयोगे अस्मिन् ॥ ११९ ॥

**अन्वय :** – हास्येन उपगतार्थप्रहेलिका नालिका इति विज्ञेया । अस्मिन् प्रयोगे वाक्केली एकद्वि-प्रतिवचना स्यात् । (हास्ययुक्ता सा नालिका प्रणालिका व्याजेत्यर्थ: । प्रकर्षेण हेलिका नर्मादिक्रीडारूपं यस्या : सा प्रहेलिका । – अ . भा . )

**अर्थ** – विनोदाद्वारे अर्थ समजतो त्या प्रहेलिकेला 'नालिका' म्हणतात . ज्या प्रयोगामध्ये एक दोन उत्तर-प्रत्युत्तर असतील त्याला वाक्केली म्हणतात . (हास्यपूर्ण असल्याने तिला नालिका प्रणालिका असे म्हणतात . प्रणालिका हा शब्द व्याजस्तुति या अर्थाने घेतला जातो . नर्मादि क्रीडारूप हे जिचे स्वरूप तिला प्रहेलिका असे म्हणतात . )

**❖ असत्प्रलाप ❖**

**मूर्खजनसन्निकर्षे हितमपि यत्र प्रभाषते विद्वान् । (आर्या)**
**न च गृह्यतेऽस्य वचनं विज्ञेयोऽसत्प्रलापोऽसौ ॥ १२० ॥**

**पदच्छेद :–** मूर्खजन-सन्निकर्षे हितम् अपि यत्र प्रभाषते विद्वान् |
न च गृह्यते अस्य वचनम् विज्ञेय : असत्प्रलाप : असौ || १२० ||

**अन्वय : –** यत्र विद्वान् मूर्खजनसन्निकर्षे हितम् अपि प्रभाषते अस्य वचनम् च असौ मूर्ख : न गृह्यते (स :) असत्प्रलाप : विज्ञेय : |

**अर्थ –** जिथे विद्वान पुरुष मूर्ख लोकांच्या संपर्कात आले असताना त्यांच्या हिताविषयी सांगतात, परंतु मूर्ख त्यांचे बोलणे ऐकत नाहीत, त्याला 'असत्प्रलाप' समजावे .

❖ प्रपंच ❖

**यदसद्भूतं वचनं संस्तवयुक्तं द्वयो: परस्परं यत्तु |(आर्या)**
**एकस्य चार्थहेतो: स हास्यजनन: प्रपञ्च: स्यात् || १२१ ||**

**पदच्छेद :–** यत् असद् भूतम् वचनम् संस्तव-युक्तम् द्वयो : परस्परम् यत् तु |
एकस्य च अर्थहेतो : स : हास्यजनन : प्रपञ्च : स्यात् || १२१ ||

**अन्वय : –** द्वयो : एकस्य च अर्थहेतो : यत् परस्परम् संस्तवयुक्तम् यत् असद्भूतम् वचनम् स : हास्यजनन : प्रपञ्च : स्यात् |

**अर्थ –** दोघांमधील एकाच्या मनातील विशिष्ट हेतू पूर्ण होण्यासाठी जे एकमेकांना ओळख दाखवत असत्य बोलले जाते आणि हास्य निर्माण केले जाते, त्यास 'प्रपंच' असे म्हणतात .

❖ मृदव ❖

**यत्कारणाद्गुणानां दोषीकरणं भवेद्विवादकृतम् | (आर्या)**
**दोषगुणीकरणं वा तन्मृदवं नाम विज्ञेयम् ||१२२||**

**पदच्छेद :–** यत् कारणात् गुणानाम् दोषीकरणम् भवेत् विवादकृतम् |
दोषगुणीकरणम् वा तत् मृदवम् नाम विज्ञेयम् || १२२ ||

**अन्वय : –** कारणात् यत् विवादकृतम् गुणानाम् दोषीकरणम् दोषगुणीकरणम् वा भवेत् तत् मृदवम् नाम विज्ञेयम् |

**अर्थ –** काही कारणास्तव भांडण करणे, गुणांवर दोषारोपण करणे आणि दोष हे गुण असल्याप्रमाणे भासवणे त्यास 'मृदव' असे म्हणतात .

❖ अधिबल ❖

**परवचनमात्मनश्चोत्तरोत्तरसमुद्भवं द्वयोर्यत्तु | (आर्या)**
**अन्योन्यार्थविशेषकमधिबलमिति तद्बुधैर्ज्ञेयम् || १२३ ||**

**पदच्छेद :–** परवचनम् आत्मन: च उत्तरोत्तर-समुद्भवम् द्वयो: यत् तु |
अन्योन्यार्थ-विशेषकम् अधिबलम् इति तत् बुधै: ज्ञेयम् || १२३ ||

**अन्वय : –** परवचनम् आत्मन: च उत्तरोत्तरसमुद्भवम् द्वयो: यत् अन्योन्यार्थविशेषकम् तत् बुधै: अधिबलम् इति ज्ञेयम् |

**अर्थ –** जेव्हा दुसऱ्याच्या व स्वत:च्या बोलण्यातून निरंतर उत्पन्न होणाऱ्या दोन वाक्यांचा परस्परांशी संबंध असल्याकारणाने विशेष अर्थलाभ होत असेल तर त्यास 'अधिबल' म्हणून ओळखावे .

❖ छल आणि व्याहार ❖

**अन्यार्थमेव वाक्यं छलमभिसन्धानहास्यरोषकरम् | (आर्या)**
**प्रत्यक्षवृत्तिरुक्तो व्याहारो हास्यलेशार्थ: || १२४ ||**

**पदच्छेद :–** अन्यार्थम् एव वाक्यम् छलम् अभिसन्धान-हास्यरोषकरम् |
प्रत्यक्षवृत्ति: उक्त: व्याहार: हास्यलेशार्थ: || १२४ ||

**अन्वय : –** अन्यार्थम् एव वाक्यम् अभिसन्धान-हास्यरोषकरम् छलम् | हास्यलेशार्थ: प्रत्यक्षवृत्ति: व्याहार: उक्त: |

**अर्थ –** वेगळ्याच उद्देशाने म्हटले गेलेले वाक्य एकासाठी हास्य उत्पन्न करीत असेल आणि दुसऱ्याचा क्रोध उत्पन्न करीत असेल तर त्यास 'छल' म्हणावे . किंचित हास्याचा अर्थ प्रत्यक्ष सांगितला जातो त्याला 'व्याहार' असे म्हणतात .

❖ त्रिगत ❖

**श्रुतिसारूप्याद्यस्मिन्बहवोऽर्था युक्तिभिर्नियुज्यन्ते | (आर्या)**
**यद्धास्यमहास्यं वा तत्त्रिगतं नाम विज्ञेयम् || १२५ ||**

**पदच्छेद :–** श्रुतिसारूप्यात् यस्मिन् बहव : अर्था : युक्तिभि : नियुज्यन्ते |
यत् हास्यम् अहास्यम् वा तत् त्रिगतम् नाम विज्ञेयम् || १२५ ||

**अन्वय : –** यत् श्रुतिसारूप्यात् युक्तिभि : यस्मिन् बहव : अर्था : नियुज्यन्ते तत् हास्यम् अहास्यम् वा त्रिगतम् नाम विज्ञेयम् |

**अर्थ –** शब्दांच्या सारखेपणामुळे युक्तीद्वारे जिथे विविध अर्थ उत्पन्न केले जातात, त्या हास्यरूपास किंवा अहास्यरूपास 'त्रिगत' म्हणतात .

❖ गंड ❖

**संरम्भसंभ्रमयुतं विवादयुक्तं तथापवादकृतम् | (आर्या)**
**बहुवचनाक्षेपकृतं गण्डं प्रवदन्ति तत्त्वज्ञा : || १२६ ||**

**पदच्छेद :–** संरम्भ-संभ्रम-युतम् विवाद-युक्तम् तथा अपवाद-कृतम् |
बहुवचन-आक्षेप-कृतम् गण्डम् प्रवदन्ति तत्त्वज्ञा : || १२६ ||

**अन्वय : –** संरम्भसंभ्रमयुतम् विवादयुक्तम् तथा अपवादकृतम् बहुवचनाक्षेपकृतम् गण्डम् तत्त्वज्ञा : प्रवदन्ति |

**अर्थ –** जिथे शरीराच्या विशेष आकृतीद्वारे संभ्रम, विवाद, अपवाद, तसेच खूप बोलल्याने आक्षेपपूर्ण उच्चार असतील, त्याला तत्त्वज्ञ 'गंड' असे म्हणतात .

**इति दशरूपविधानं सर्वं प्रोक्तं मया हि लक्षणत : | (आर्या)**
**पुनरस्य शरीरगतं सन्धिविधौ लक्षणं वक्ष्ये || १२७ ||**

**पदच्छेद :–** इति दशरूपविधानम् सर्वम् प्रोक्तम् मया हि लक्षणत : |
पुन : अस्य शरीरगतम् सन्धिविधौ लक्षणम् वक्ष्ये || १२७ ||

**अन्वय : –** इति सर्वम् दशरूपविधानम् मया हि लक्षणत : प्रोक्तम् | पुन : अस्य सन्धिविधौ शरीरगतम् लक्षणम् वक्ष्ये |

**अर्थ –** याप्रमाणे लक्षणांनुसार संपूर्ण दशरूपकाविषयी मी तुम्हांला सांगितले आहे . आता इतिवृत्तानुसार (शरीरगत) त्यांच्या संधिविषयीची लक्षणे सांगीन .

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे दशरूपनिरूपणं नाम अष्टादशोऽध्याय : ||**

**|| अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील 'दशरूपनिरूपण' नावाचा अठरावा अध्याय संपला ||**

# एकोणीसावा अध्याय

## संधिनिरूपण



# एकोणीसावा अध्याय

## संधिनिरूपण

**❖ नाट्याचे शरीर ❖**

**इतिवृत्तं तु नाट्यस्य शरीरं परिकीर्तितम् |**
**पञ्चभि: सन्धिभिस्तस्य विभाग: संप्रकल्पित: || १ ||**

**पदच्छेद:** – इतिवृत्तम् तु नाट्यस्य शरीरम् परिकीर्तितम् |
पञ्चभि: सन्धिभि: तस्य विभाग: संप्रकल्पित: || १ ||

**अन्वय:** – इतिवृत्तम् तु नाट्यस्य शरीरम् परिकीर्तितम् | पञ्चभि: सन्धिभि: तस्य विभाग: संप्रकल्पित: |

**अर्थ** – इतिवृत्ताला नाट्याचे शरीर मानले गेले आहे आणि पाच संधींद्वारे त्याचे विभाग आता सांगितले जात आहेत.

**❖ इतिवृत्ताचे दोन प्रकार ❖**

**इतिवृत्तं द्विधा चैव बुधस्तु परिकल्पयेत् |**
**आधिकारिकमेकं स्यात् प्रासङ्गिकमथापरम् || २ ||**

**पदच्छेद:** – इतिवृत्तम् द्विधा च एव बुध: तु परिकल्पयेत् |
आधिकारिकम् एकम् स्यात् प्रासङ्गिकम् अथ अपरम् || २ ||

**अन्वय:** – बुध: तु इतिवृत्तम् द्विधा एव च परिकल्पयेत् | अथ एकम् आधिकारिकम् अपरम् प्रासङ्गिकम् स्यात् |

**अर्थ** – विद्वानांनी दोन प्रकारचे इतिवृत्त सांगितले आहेत. एक आधिकारिक (मुख्य) आणि दुसरा प्रासंगिक (गौण).

**❖ आधिकारिक आणि प्रासंगिक इतिवृत्त ❖**

**यत्कार्यं हि फलप्राप्त्या सामर्थ्यात्परिकल्प्यते |**
**तदाधिकारिकं ज्ञेयमन्यत्प्रासङ्गिकं विदु: || ३ ||**

**पदच्छेद : –** यत् कार्यम् हि फलप्राप्त्या सामर्थ्यात् परिकल्प्यते |
तत् आधिकारिकम् ज्ञेयम् अन्यत् प्रासङ्गिकम् विदु : || ३ ||

**अन्वय : –** फलप्राप्त्या सामर्थ्यात् हि यत् कार्यम् परिकल्प्यते तत् आधिकारिकम् ज्ञेयम् अन्यत् प्रासङ्गिकम् विदु : |
(समुत्कर्ष प्राध्यान्यम् अवलम्ब्य फलप्राप्ति: कल्प्यते, प्रधानफलप्राप्तिप्रयोजनम् आधिकारिकम् इत्यर्थ : आधिकारिकम् | - अ . भा . )

**अर्थ –** उत्कर्षाचा विचार करून फलप्राप्ती व्हावी यासाठी स्वसामर्थ्याने ज्या इतिवृत्ताची रचना केली जाते, त्याला 'आधिकारिक' इतिवृत्त समजावे आणि दुसऱ्याला 'प्रासंगिक' समजावे .

**कारणात्फलयोगस्य वृत्तं स्यादाधिकारिकम् |**
**तस्योपकरणार्थं तु कीर्त्यते ह्यानुषङ्गिकम् || ४ ||**

**पदच्छेद : –** कारणात् फलयोगस्य वृत्तम् स्यात् आधिकारिकम् |
तस्य उपकरणार्थम् तु कीर्त्यते हि आनुषङ्गिकम् || ४ ||

**अन्वय : –** फलयोगस्य कारणात् आधिकारिकम् वृत्तम् स्यात् | तस्य हि उपकरणार्थम् तु आनुषङ्गिकम् कीर्त्यते |

**अर्थ –** फलप्राप्ती होते म्हणूनच यास 'आधिकारिक' इतिवृत्त असे म्हणतात आणि याच मुख्य प्रसंगाची पूर्तता होण्यासाठी जे अन्य प्रसंग रचले जातात, त्यांना 'प्रासंगिक' इतिवृत्त समजावे .

**❖ फलप्राप्ती ❖**

**कवे : प्रयत्नान्नेतॄणां युक्तानां विध्यपाश्रयात् |**
**कल्प्यते हि फलप्राप्ति: समुत्कर्षात्फलस्य च || ५ ||**

**पदच्छेद : –** कवे : प्रयत्नात् नेतॄणाम् युक्तानाम् विधि-अपाश्रयात् |
कल्प्यते हि फलप्राप्ति : समुत्कर्षात् फलस्य च || ५ ||

**अन्वय:** – कवे: प्रयत्नात्, युक्तानाम् नेतृणाम् विध्यपाश्रयात्, फलस्य च समुत्कर्षात् हि फलप्राप्ति: कल्प्यते |

(नेतृणां युक्तानां विध्यपाश्रयात् धीरोदात्तादिभेदानां नायकानां मध्ये यो यत्र नायको युक्त: उचित: तस्य यो विधि: सम्पाद्यं वस्तु तत् अपाश्रयप्रयत्नात् हेतो: कविफलं प्रधानम् इति | - अ.भा.)

**अर्थ** – कवीच्या प्रयत्नांमुळे, योग्य अशा धीरोदात्त इत्यादी नायकांसाठी सांगितलेल्या विधीनुसार आणि फळाच्या इच्छेमुळेच फलप्राप्तीची कल्पना केली जाते.

**लौकिकी सुखदु:खाख्या यथावस्था रसोद्भवा |**
**दशधा मन्मथावस्था व्यवस्था त्रिविधा मता || ६ ||**

**पदच्छेद:** – लौकिकी सुखदु:-आख्या यथा अवस्था रस-उद्भवा |
दशधा मन्मथा-वस्था व्यवस्था त्रिविधा मता || ६ ||

**अन्वय:** – यथा लौकिकी सुखदु:खाख्या अवस्था (सन्ति तथा) रसोद्भवा मन्मथावस्था दशधा (तथा च तेषाम्) व्यवस्था त्रिविधा मता |

**अर्थ** – जसे लौकिक जीवनामध्ये सुख-दु:ख इत्यादी अवस्था असतात त्याचप्रमाणे शृंगाररसाने उत्पन्न होणाऱ्या कामाच्या दहा अवस्था सांगितल्या आहेत आणि त्यांच्याही तीन प्रकारच्या व्यवस्था असतात.

कामाच्या दहा अवस्था १) चक्षु:प्राप्ति २) मन:संग ३) संकल्प ४) निद्राच्छेद
५) तनुता ६) विषयव्यावृत्ति ७) लज्जाप्रणाश ८) उन्माद ९) मूर्च्छा १०) मरण

**संसाध्ये फलयागे तु व्यापार: कारणस्य य: |**
**तस्यानुपूर्व्या विज्ञेया: पञ्चावस्था: प्रयोक्तृभि: || ७ ||**

**पदच्छेद:** – संसाध्ये फलयागे तु व्यापार: कारणस्य य: |
तस्य आनुपूर्व्या: विज्ञेया: पञ्च अवस्था: प्रयोक्तृभि: || ७ ||

**अन्वय:** – संसाध्ये फलयागे कारणस्य य: व्यापार: (अस्ति) तस्य आनुपूर्व्या: पञ्च अवस्था: प्रयोक्तृभि: विज्ञेया: |

(कविप्रयत्नेन साध्ये व्यापारपरिस्पन्दो यो वाङ्मनसंगतस्तस्य या अवस्था आनुपूर्व्येति उद्देशक्रमेणैव प्रयोक्तृभि: कविभि: निबन्धनीयतया ज्ञातव्या:| - अ. भा. )

**अर्थ** – कवीच्या प्रयत्नांमुळे फलप्राप्ती होण्यासाठी जो काही खटाटोप करावा लागतो, त्याच्या पाच अवस्था नाट्याची रचना करणाऱ्यांनी विशेष पद्धतीने समजून घ्याव्यात .

**प्रारम्भश्च प्रयत्नश्च तथा प्राप्तेश्च संभव:|**
**नियता च फलप्राप्ति: फलयोगश्च पञ्चम:||८||**

**पदच्छेद:** – प्रारम्भ: च प्रयत्न: च तथा प्राप्ते: च संभव:|
नियता च फलप्राप्ति: फलयोग: च पञ्चम:||८||

**अन्वय:** – प्रारम्भ:, प्रयत्न:, प्राप्ते: संभव:, नियता फलप्राप्ति:, पञ्चम: च फलयोग:|

**अर्थ** – प्रारंभ, प्रयत्न, प्राप्ति-संभव, नियत फलप्राप्ति आणि पाचवा फलागम अशा पाच अवस्था सांगितल्या आहेत .

**❖ अवस्था १ - फलारंभ ❖**

**औत्सुक्यमात्रबन्धस्तु यद्बीजस्य निबध्यते |**
**महत: फलयोगस्य स फलारम्भ इष्यते || ९ ||**

**पदच्छेद:** – औत्सुक्यमात्रबन्ध: तु यत् बीजस्य निबध्यते |
महत: फलयोगस्य स: फलारम्भ: इष्यते || ९ ||

**अन्वय:** – यत् बीजस्य औत्सुक्यमात्रबन्ध: महत: फलयोगस्य निबध्यते स: फलारम्भ: इष्यते |

**अर्थ** – जी कथावस्तु केवळ उत्सुकता निर्माण करते आणि मोठ्या फलप्राप्तीशी जोडली जाते त्यास 'फलारंभ' असे म्हणतात .

**❖ अवस्था २ - प्रयत्न ❖**

**अपश्यत: फलप्राप्तिं व्यापारो य: फलं प्रति |**
**परं चौत्सुक्यगमनं स: प्रयत्न: प्रकीर्तित: || १० ||**

**पदच्छेद :–** अपश्यत : फलप्राप्तिम् व्यापार : य : फलम् प्रति |
परम् च औत्सुक्यगमनम् स : प्रयत्न : प्रकीर्तित : || १० ||

**अन्वय : –** फलप्राप्तिम् अपश्यत : य : फलम् प्रति व्यापार : परम् च औत्सुक्यगमनम् स : प्रयत्न : प्रकीर्तित : |

**अर्थ –** फलप्राप्तीकडे न पाहता जी फलप्राप्तीसाठी लागणारी कृती केली जाते आणि त्याद्वारे खूप उत्सुकता निर्माण केली जाते यालाच 'प्रयत्न' असे म्हणतात .

**❖ अवस्था ३ - प्राप्तिसंभव ❖**

**ईषत्प्राप्तिर्यदा काचित्फलस्य परिकल्पते |**
**भावमात्रेण तं प्राहुर्विधिज्ञा: प्राप्तिसम्भवम् || ११ ||**

**पदच्छेद :–** ईषत् प्राप्ति : यदा काचित् फलस्य परिकल्पते |
भावमात्रेण तम् प्राहु : विधिज्ञा : प्राप्तिसम्भवम् || ११ ||

**अन्वय : –** यदा फलस्य काचित् ईषत् प्राप्ति : परिकल्पते | तम् विधिज्ञा : भावमात्रेण प्राप्तिसम्भवम् प्राहु : |

**अर्थ –** जेव्हा थोड्या विशिष्ट फलप्राप्तीची कल्पना केली जाते, तेव्हा विधी जाणणारे विद्वान लोक त्याला प्रत्याशा म्हणजेच 'प्राप्तिसंभव' असे म्हणतात .

**❖ अवस्था ४ - नियत फलप्राप्ती ❖**

**नियतां तु फलप्राप्तिं यदा भावेन पश्यति |**
**नियतां तां फलप्राप्तिं सगुणां परिचक्षते || १२ ||**

**पदच्छेद :–** नियताम् तु फलप्राप्तिम् यदा भावेन पश्यति |
नियताम् ताम् फलप्राप्तिम् सगुणाम् परिचक्षते || १२ ||

**अन्वय : –** यदा भावेन तु नियताम् फलप्राप्तिम् पश्यति ताम् सगुणाम् नियताम् फलप्राप्तिम् परिचक्षते |

**अर्थ** – जेव्हा एखाद्या भावाद्वारे किंवा उपायाद्वारे निश्चित फलप्राप्ती दिसून येते, तेव्हा विद्वानांनी त्याला 'नियत फलप्राप्ती' असे म्हटले आहे.

**❖ अवस्था ५ - फलयोग ❖**

**अभिप्रेतं समग्रं च प्रतिरूपं क्रियाफलम् |**
**इतिवृत्ते भवेद्यस्मिन्फलयोगः प्रकीर्तितः || १३ ||**

**पदच्छेदः** – अभिप्रेतम् समग्रम् च प्रतिरूपम् क्रियाफलम् |
इतिवृत्ते भवेत् यस्मिन् फलयोगः प्रकीर्तितः || १३ ||

**अन्वयः** – यस्मिन् इतिवृत्ते अभिप्रेतम् समग्रम् च प्रतिरूपम् क्रियाफलम् भवेत् (सः) फलयोगः प्रकीर्तितः |

**अर्थ** – ज्या इतिवृत्तामध्ये नायकाला अनुरूप आणि संपूर्ण अशी इष्ट क्रियाफलप्राप्ती होत असेल तर त्याला 'फलयोग' किंवा 'फलागम' असे सांगितले आहे.

**सर्वस्यैव हि कार्यस्य प्रारब्धस्य फलार्थिभिः |**
**एतास्त्वनुक्रमेणैव पञ्चावस्था भवन्ति हि || १४ ||**

**पदच्छेदः** – सर्वस्य एव हि कार्यस्य प्रारब्धस्य फलार्थिभिः |
एताः तु अनुक्रमेण एव पञ्च अवस्थाः भवन्ति हि || १४ ||

**अन्वयः** – फलार्थिभिः नायकैः प्रारब्धस्य सर्वस्य एव कार्यस्य अनुक्रमेण एताः एव पञ्च अवस्थाः भवन्ति |

**अर्थ** – फलाची इच्छा असणाऱ्या नायकांद्वारे सुरू केलेल्या सर्व कार्याच्या याच पाच विविध अवस्था असतात.

**आसां स्वभावभिन्नानां परस्परसमागमात् |**
**विन्यास एकभावेन फलहेतुः प्रकीर्तितः || १५ ||**

**पदच्छेदः** – आसाम् स्वभाव-भिन्नानाम् परस्पर-समागमात् |
विन्यासः एकभावेन फलहेतुः प्रकीर्तितः || १५ ||

**अन्वय: –** आसाम् स्वभावभिन्नानाम् परस्परसमागमात् एकभावेन विन्यास: फलहेतु: प्रकीर्तित:| (एकभाव: सम्बन्ध:|)

**अर्थ –** स्वभावाने भिन्न अशा या विविध अवस्थांची एकमेकांशी जी संगती असते ती विशिष्ट संबंधाने मांडलेली असते त्याला 'फलहेतु' (कारण) असे म्हटले आहे .

**इतिवृत्तं समाख्यातं प्रत्यगेवाधिकारिकम् |**
**तदारम्भादि कर्तव्यं फलान्तं च यथा भवेत् || १६ ||**

**पदच्छेद: –** इतिवृत्तम् समाख्यातम् प्रत्यक् एव अधिकारिकम् |
तत् आरम्भादि कर्तव्यम् फलान्तम् च यथा भवेत् || १६ ||

**अन्वय: –** अधिकारिकम् इतिवृत्तम् प्रत्यक् एव समाख्यातम् | आरम्भादि तत् कर्तव्यम् यथा फलान्तम् च भवेत् |

**अर्थ –** अधिकृत इतिवृत्त यापूर्वीच सांगितले आहे . तेव्हा आरंभ इत्यादी अवस्थांचे वर्णन करावे ज्यामुळे शेवटी फलप्राप्ती होऊ शकते .

**पूर्णसन्धि च कर्तव्यं हीनसन्ध्यपि वा पुन: |**
**नियमात् पूर्णसन्धि स्याद् हीनसन्ध्यथ कारणात् || १७ ||**

**पदच्छेद: –** पूर्णसन्धि च कर्तव्यम् हीनसन्धि अपि वा पुन: |
नियमात् पूर्णसन्धि स्यात् हीनसन्धि अथ कारणात् || १७ ||

**अन्वय: –** पूर्णसन्धि अपि वा पुन: हीनसन्धि च कर्तव्यम् | अथ नियमात् पूर्णसन्धि, हीनसन्धि कारणात् स्यात् |

**अर्थ –** रूपकामधील इतिवृत्तामध्ये सर्व संधींचा वापर करावा किंवा संधी कमी असेल तरीही चालेल . यात नियमानुसार सर्व संधींचा समावेश असावा . परंतु काही विशेष कारणांमुळे संधी कमी असली तरी चालेल .

**❖ संधिलोपाची अवस्था ❖**

**एकलोपे चतुर्थस्य द्विलोपे त्रिचतुर्थयो: |**
**द्वितीयत्रिचतुर्थानाम् त्रिलोपे लोप इष्यते || १८ ||**

**पदच्छेद :–** एकलोपे चतुर्थस्य द्विलोपे त्रिचतुर्थयो : |
द्वितीय-त्रि-चतुर्थानाम् त्रिलोपे लोप : इष्यते || १८ ||

**अन्वय : –** एकलोपे चतुर्थस्य, द्विलोपे त्रिचतुर्थयो :, त्रिलोपे द्वितीयत्रिचतुर्थानाम् लोप : इष्यते |

**अर्थ –** पाच संधीपैकी एका संधीचा लोप करायचा असेल तर चतुर्थ (अवमर्श) संधीचा लोप करावा . उदाहरणार्थ – डिम आणि समवकारामध्ये चार संधी असतात .
दोन संधींचा लोप करायचा असेल तर तिसऱ्या (गर्भ) आणि चौथ्या (अवमर्श) संधीचा लोप करावा . उदाहरणार्थ – व्यायोग, आणि ईहामृगामध्ये तीन संधी असतात .
तीन संधीचा लोप करायचा असेल तर दुसऱ्या (प्रतिमुख), तिसऱ्या (गर्भ) आणि चौथ्या (अवमर्श) संधीचा लोप करावा . उदाहरणार्थ – प्रहसन, वीथी, अंक आणि भाण यांमध्ये दोन संधी असतात .

**प्रासङ्गिके परार्थत्वान्न ह्येष नियमो भवेत् |**
**यद्वृत्तं सम्भवेत्तत्र तद्योज्यमविरोधतः || १९ ||**

**पदच्छेद :–** प्रासङ्गिके परार्थत्वात् न हि एष : नियम : भवेत् |
यत् वृत्तम् सम्भवेत् तत्र तत् योज्यम् अविरोधत : || १९ ||

**अन्वय : –** प्रासङ्गिके परार्थत्वात् हि एष : नियम : न भवेत् | यत् वृत्तम् सम्भवेत् तत्र तत् अविरोधत : योज्यम् |

**अर्थ –** प्रासंगिक इतिवृत्तामध्ये हा नियम लागू पडत नाही, कारण तो दुसऱ्यासाठी असतो . जे वृत्त शक्य असेल त्याठिकाणी त्याचा विनविरोध वापर करावा .

**इतिवृत्ते यथावस्था : पञ्चारम्भादिका : स्मृता : |**
**अर्थप्रकृतय: पञ्च तथा बीजादिका अपि || २० ||**

**पदच्छेद :–** इतिवृत्ते यथा अवस्था : पञ्च आरम्भादिका : स्मृता : |
अर्थप्रकृतय : पञ्च तथा बीजादिका : अपि || २० ||

**अन्वय : –** इतिवृत्ते यथा अवस्था : आरम्भादिका : पञ्च तथा बीजादिका : पञ्च अर्थप्रकृतय : अपि स्मृता : |

**अर्थ** – इतिवृत्तामध्ये ज्याप्रमाणे आरंभ इत्यादी पाच अवस्था असतात, त्याचप्रमाणे बीज इत्यादी पाच अर्थप्रकृती देखील असतात .

**❖ पाच अर्थप्रकृति ❖**

**बीजं बिन्दु: पताका च प्रकरी कार्यमेव च |**
**अर्थप्रकृतय: पञ्च ज्ञात्वा योज्या यथाविधि || २१ ||**

**पदच्छेद:–** बीजम् बिन्दु: पताका च प्रकरी कार्यम् एव च |
अर्थप्रकृतय: पञ्च ज्ञात्वा योज्या यथाविधि || २१ ||

**अन्वय: –** बीजम् बिन्दु: पताका च प्रकरी एव च कार्यम् (एता:) पञ्च अर्थप्रकृतय: ज्ञात्वा यथाविधि योज्या |

**अर्थ** – बीज, बिंदू, पताका, प्रकरी आणि कार्य या पाच अर्थप्रकृती आहेत . विधीनुसार रूपकांमध्ये त्याचा वापर करावा .

**❖ बीज ❖**

**स्वल्पमात्रं समुत्सृष्टं बहुधा यद्विसर्पति |**
**फलावसानं यच्चैव बीजं तत्परिकीर्तितम् || २२ ||**

**पदच्छेद:–** स्वल्पमात्रम् समुत्सृष्टम् बहुधा यत् विसर्पति |
फलावसानम् यत् च एव बीजम् तत् परिकीर्तितम् || २२ ||

**अन्वय: –** यत् स्वल्पमात्रम् समुत्सृष्टम् बहुधा विसर्पति यत् च फलावसानम् (भवति) तत् एव बीजम् परिकीर्तितम् |

**अर्थ** – जे सुरुवातीस सूक्ष्मरूपाने असते, नंतर उत्तरोत्तर अनेक प्रकारे ज्याचा विकास होतो आणि ज्याची परिणती मुख्य फलप्राप्तीमध्ये होते त्याला 'बीज' असे म्हटले आहे .

❖ विन्दु ❖

**प्रयोजनानां विच्छेदे यदविच्छेदकारणम् |**
**यावत्समाप्तिर्बन्धस्य स बिन्दु: परिकीर्तित: || २३ ||**

**पदच्छेद: –** प्रयोजनानाम् विच्छेदे यत् अविच्छेदकारणम् |
यावत् समाप्ति: वन्धस्य स: बिन्दु: परिकीर्तित: || २३ ||

**अन्वय: –** प्रयोजनानाम् विच्छेदे यावत् वन्धस्य समाप्ति: यत् अविच्छेदकारणम् स: विन्दु: परिकीर्तित: |

**अर्थ –** फलप्राप्तीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयोजनांमध्ये विघ्न पडल्यावर कथानकाची फलप्राप्ती होईपर्यंत कथानक अव्याहतपणे चालू ठेवण्याचे जे कारण असते, त्याला 'विंदु' असे म्हणतात.

❖ पताका ❖

**यद्वृत्तं तु परार्थं स्यात् प्रधानस्य उपकारकम् |**
**प्रधानवत् च कल्प्येत सा पताका इति कीर्तिता || २४ ||**

**पदच्छेद: –** यत् वृत्तम् तु परार्थम् स्यात् प्रधानस्य उपकारकम् |
प्रधानवत् च कल्प्येत सा पताका इति कीर्तिता || २४ ||

**अन्वय: –** यत् परार्थम् वृत्तम् प्रधानस्य तु उपकारकम् स्यात् प्रधानवत् च कल्प्येत सा पताका इति कीर्तिता |

**अर्थ –** जे इतिवृत्त प्रमुख इतिवृत्तासाठी उपकारक असले तरी ते प्रमुख असल्याप्रमाणे कल्पिले जाते, त्याला 'पताका' असे म्हणतात.

❖ प्रकरी ❖

**फलं प्रकल्प्यते यस्या: परार्थायैव केवलम् |**
**अनुबन्धविहीनत्वात् प्रकरीति विनिर्दिशेत् || २५ ||**

**पदच्छेद : –** फलम् प्रकल्प्यते यस्या : परार्थाय एव केवलम् |
अनुबन्ध-विहीनत्वात् प्रकरी इति विनिर्दिशेत् || २५ ||

**अन्वय : –** यस्या : फलम् केवलम् परार्थाय एव प्रकल्प्यते अनुबन्धविहीनत्वात् (सा) प्रकरी इति विनिर्दिशेत् |

**अर्थ –** ज्या इतिवृत्ताचे फल केवळ निरपेक्ष भावाने दुसऱ्यासाठी कल्पिले जाते आणि त्यामध्ये अनुबंध नसतो म्हणून त्याला 'प्रकरी' असे म्हणतात .

**❖ कार्य ❖**

**यदाधिकारिकं वस्तु सम्यक्प्राज्ञैः प्रयुज्यते |**
**तदर्थो यः समारम्भस्तत्कार्यं परिकीर्तितम् || २६ ||**

**पदच्छेद : –** यत् अधिकारिकम् वस्तु सम्यक् प्राज्ञैः प्रयुज्यते |
तदर्थ : य : समारम्भ : तत् कार्यम् परिकीर्तितम् || २६ ||

**अन्वय : –** यत् अधिकारिकम् वस्तु प्राज्ञैः सम्यक् प्रयुज्यते तदर्थः यः समारम्भः तत् कार्यम् परिकीर्तितम् |

(आरभत इति आरम्भशब्दवाच्यो द्रव्यक्रियागुणप्रभृतिः सर्वोऽर्थः यस्य सहकारी तत् कार्यम् इत्युच्यते, चेतनैः कार्यते फलमिति व्युत्पत्त्या | सम्यगिति प्रभुमन्त्रोत्साहशक्तित्रयसंपन्नैः इत्यर्थः | - अ . भा . )

**अर्थ –** ज्या अधिकारयुक्त इतिवृत्ताचा विद्वान लोक चांगल्या प्रकारे वापर करतात आणि त्यासाठी सुरुवातीला बीज नावाच्या अर्थप्रकृतीद्वारे जो आरंभ केला जातो त्याला 'कार्य' म्हणतात .

(येथे आरंभ म्हणजे वाच्य द्रव्य, गुण, क्रिया इत्यादी अर्थ ज्याचे सहकारी आहेत ते कार्य आणि सम्यक म्हणजे प्रभुशक्ति, मंत्रशक्ति आणि उत्साहशक्ति रूप तीन शक्तींनी संपन्न अशी गोष्ट . - अ . भा . )

❖ गौण-प्रधान भाव ❖

**एतेषां यस्य येनार्थो यतश्च गुण इष्यते |**
**तत् प्रधानं तु कर्तव्यं गुणभूतान्यत: परम् || २७ ||**

**पदच्छेद: -** एतेषाम् यस्य येन अर्थ: यत: च गुण: इष्यते |
तत् प्रधानम् तु कर्तव्यम् गुणभूत-अन्यत: परम् || २७ ||

**अन्वय: -** एतेषाम् यस्य येन अर्थ: यत: च गुण: इष्यते | तत् तु प्रधानम् कर्तव्यम् | अत: परम् गुणभूतानी |

**अर्थ -** या पाचही अर्थप्रकृतींमध्ये ज्याचा अधिक वापर केला जातो आणि ज्याच्याशी योग्य असा संबंध सिद्ध होतो, त्यांचा त्याच्याशी 'गौण-प्रधान भाव' असतो. अर्थात ज्याचा गुण एखाद्यासाठी चांगला आहे, त्याला तिथे प्राधान्य द्यावे आणि इतरांना गौण करावे.

❖ अनुसंधि ❖

**एकोऽनेकोऽपि वा सन्धि: पताकायां तु यो भवेत् |**
**प्रधानार्थानुयायित्वादनुसन्धि: प्रकीर्त्यते || २८ ||**

**पदच्छेद: -** एक: अनेक: अपि वा सन्धि: पताकायाम् तु य: भवेत् |
प्रधानार्थ-अनुयायित्वात् अनुसन्धि: प्रकीर्त्यते || २८ ||

**अन्वय: -** पताकायां तु एक: अपि वा अनेक: सन्धि: य: भवेत् प्रधानार्थानुयायित्वात् (स:) अनुसन्धि: प्रकीर्त्यते |

**अर्थ -** 'पताका'मध्ये एक किंवा अनेक अशा संधी असतात, त्या जर मुख्य इतिवृत्तानुसार होत असतील तर त्याला 'अनुसंधि' (म्हणजेच अनुबंध पताका) म्हणतात.

**आगर्भादाविमर्शाद्वा पताका विनिवर्तते |**
**कस्माद्यस्मान्निबन्धोऽस्या: परार्थ: परिकीर्त्यते || २९ ||**

**पदच्छेद :–** आगर्भात् आविमर्शात् वा पताका विनिवर्तते |
कस्मात् यस्मात् निवन्ध : अस्या : परार्थ : परिकीर्त्यते || २९ ||

**अन्वय : –** आगर्भात् आविमर्शात् वा पताका विनिवर्तते | कस्मात्? यस्मात् अस्या: निबन्ध: परार्थ : परिकीर्त्यते |

**अर्थ –** गर्भसंधीपासून विमर्शसंधीपर्यंत पताका इतिवृत्त संपते. असे का? कारण पताका इतिवृत्ताची रचना इतरांच्या लाभाकरिता सांगितली जाते.

**यत्रार्थे चिन्तितेऽन्यस्मिंस्तल्लिङ्गोऽन्य : प्रयुज्यते |**
**आगन्तुकेन भावेन पताकास्थानकं तु तत् || ३० ||**

**पदच्छेद :–** यत्र अर्थे चिन्तिते अन्यस्मिन् तत् लिङ्ग : अन्य : प्रयुज्यते |
आगन्तुकेन भावेन पताकास्थानकम् तु तत् || ३० ||

**अन्वय : –** यत्र अन्यस्मिन् चिन्तिते अर्थे तत् आगन्तुकेन भावेन अन्य: लिङ्ग: प्रयुज्यते तत् तु पताकास्थानकम् |

**अर्थ –** जेव्हा काहीतरी वेगळ्या अर्थाचा विचार केला जातो आणि त्याचवेळी तत्सदृश-त्याच्या सारखा वेगळा अर्थ आगंतुक भावाने उपस्थित होतो त्याला 'पताका स्थानक' असे म्हणतात.

(यत्रार्थे चिन्तितेऽन्यस्मिन् स्तल्लिङ्गोऽन्य : प्रयुज्यते | असा पाठभेद आढळतो. परंतु, व्याकरणसंधीच्या नियमानुसार अन्यस्मिन् + तल्लिङ्ग : याचा संधी 'अन्यस्मिंस्तल्लिङ्ग' असा होतो. तसा वदल श्लोकामध्ये करण्यात आलेला आहे.)

**❖ प्रथम पताकास्थान ❖**

**सहसैवार्थसम्पत्तिर्गुणवत्युपकारत: |**
**पताकास्थानकमिदं प्रथमं परिकीर्तितम् || ३१ ||**

**पदच्छेद :–** सहसा एव अर्थसम्पत्ति : गुणवती उपकारत : |
पताकास्थानकम् इदम् प्रथमम् परिकीर्तितम् || ३१ ||

**अन्वय:** – उपकारत: सहसा एव गुणवती अर्थसम्पत्ति: इदम् प्रथमम् पताकास्थानकम् परिकीर्तितम् |

**अर्थ** – जेव्हा काही उपकाराच्या अपेक्षेने आकस्मिकरीत्या अत्यंत गुणयुक्त किंवा उत्कृष्ट अर्थाची प्राप्ती होते तेव्हा त्यास 'प्रथम पताकास्थान' असे म्हणतात .

**❖ द्वितीय पताकास्थान ❖**

**वच: सातिशयं श्लिष्टं काव्यबन्धसमाश्रयम् |**
**पताकास्थानकमिदं द्वितीयं परिकीर्तितम् || ३२ ||**

**पदच्छेद:** – वच: सातिशयम् श्लिष्टम् काव्यबन्धसमाश्रयम् |
पताकास्थानकम् इदम् द्वितीयम् परिकीर्तितम् || ३२ ||

**अन्वय:** – काव्यबन्धसमाश्रयम् सातिशयम् श्लिष्टम् इदम् वच: द्वितीयम् पताकास्थानकम् परिकीर्तितम् |

**अर्थ** – जेथे प्रस्तुत विषयाचे वर्णन करणारे, अत्यंत उपयोगी परंतु क्लिष्ट शब्दांचा उपयोग केला जातो, त्याला 'द्वितीय पताकास्थान' असे म्हणतात .

**❖ तृतीय पताकास्थान ❖**

**अर्थोपक्षेपणं यत्र लीनं सविनयं भवेत् |**
**श्लिष्टप्रत्युत्तरोपेतं तृतीयमिदमिष्य ते || ३३ ||**

**पदच्छेद:** – अर्थ-उपक्षेपणम् यत्र लीनम् सविनयम् भवेत् |
श्लिष्ट-प्रत्युत्तर-उपेतम् तृतीयम् इदम् इष्यते || ३३ ||

**अन्वय:** – यत्र श्लिष्टप्रत्युत्तरोपेतम् लीनम् सविनयम् अर्थोपक्षेपणम् भवेत् इदम् तृतीयम् इष्यते |

**अर्थ** – जेथे श्लेषमय उत्तर-प्रत्युत्तराचा वापर करून अस्फुट आणि अभिप्रेत असलेला अर्थ व्यक्त होतो, त्याला 'तृतीय पताकास्थान' असे म्हणतात .

**❖ चतुर्थ पताकास्थान ❖**

**द्व्यर्थो वचनविन्यास: सुश्लिष्ट: काव्ययोजित: |**
**उपन्याससुयुक्तश्च तच्चतुर्थमुदाहृतम् || ३४ ||**

**पदच्छेद :–** द्वि-अर्थ वचन-विन्यास : सुश्लिष्ट : काव्ययोजित : |
उपन्यास-सुयुक्त : च तत् चतुर्थम् उदाहृतम् || ३४ ||

**अन्वय : –** काव्ययोजितः सुश्लिष्टः द्व्यर्थे वचनविन्यासः उपन्याससुयुक्तः तत् च चतुर्थम् उदाहृतम् |

**अर्थ –** काव्याची निर्मिती करताना श्लेषासह अनेक द्व्यर्थी शब्दांचा वापर करून अन्य कथानकाशी जोडले गेले असेल त्याला 'चतुर्थ पताकास्थान' म्हटले आहे.

❖ **पताकार्ध** ❖

**यत्र सातिशयं वाक्यमर्थोपक्षेपणं भवेत् |**
**विनाशिदृष्टमन्ते च पताकार्ध तु तद्भवेत् || ३५ ||**

**पदच्छेद :–** यत्र सातिशयम् वाक्यम् अर्थोपक्षेपणम् भवेत् |
विनाशिदृष्टम् अन्ते च पताकार्धम् तु तत् भवेत् || ३५ ||

**अन्वय : –** यत्र सातिशयम् अर्थोपक्षेपणम् अन्ते च विनाशिदृष्टम् वाक्यम् भवेत् तत् तु पताकार्धम् भवेत् |

**अर्थ –** जेथे अतिशयोक्त वाक्याचा अर्थ व्यक्त होत असेल आणि शेवटी विनाश दर्शविणारे वाक्य असेल तर त्यास 'पताकार्ध' असे म्हणतात.

**चतुष्पताकापरमं नाटके कार्यमिष्यते |**
**पञ्चभि : सन्धिभिर्युक्तं तांश्च वक्ष्याम्यत : परम् || ३६ ||**

**पदच्छेद :–** चतुष्पताका-परमम् नाटके कार्यमिष्यते |
पञ्चभि : सन्धिभि : युक्तम् तान् च वक्ष्यामि अत : परम् || ३६ ||

**अन्वय : –** नाटके चतुष्पताकापरमं पञ्चभिः सन्धिभिः युक्तं कार्यम् इष्यते अतः परम् च तान् वक्ष्यामि |

**अर्थ –** नाटकामध्ये चार पताका आणि पंचसंधी करणे अपेक्षित आहे, म्हणून यापुढे मी त्यांविषयी सांगणार आहे.

❖ पंचसंधी ❖

**मुखं प्रतिमुखं चैव गर्भो विमर्श एव च |**
**तथा निर्वहणं चेति नाटके पञ्च सन्धयः || ३७ ||**

**पदच्छेदः–** मुखम् प्रतिमुखम् च एव गर्भः विमर्शः एव च |
तथा निर्वहणम् च इति नाटके पञ्च सन्धयः || ३७ ||

**अन्वयः –** नाटके मुखम्, प्रतिमुखम्, गर्भः, विमर्शः तथा निर्वहणम् च इति पञ्च सन्धयः वर्तन्ते |

**अर्थ –** नाटकामध्ये मुख, प्रतिमुख, गर्भ, विमर्श आणि तसेच निर्वहण अशा पाच संधी असतात. थोडक्यात सांगायचे तर ...

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्थप्रकृती | + | अवस्था | = | संधी |
| १. बीज | + | प्रारम्भ | = | मुखसंधी |
| २. विन्दु | + | प्रयत्न | = | प्रतिमुखसंधी |
| ३. पताका | + | प्राप्त्याशा | = | गर्भसंधी |
| ४. प्रकरी | + | नियताप्ति | = | विमर्शसंधी |
| ५. कार्य | + | फलागम | = | निर्वहणसंधी |

**पञ्चभिः सन्धिभिर्युक्तं प्रधानमनुकीर्त्यते |**
**शेषाः प्रधानसन्धीनामनुग्राह्यनुसन्धयः || ३८ ||**

**पदच्छेदः–** पञ्चभिः सन्धिभिः युक्तम् प्रधानम् अनुकीर्त्यते |
शेषाः प्रधान-सन्धीनाम् अनुग्राहि-अनुसन्धयः || ३८ ||

**अन्वयः –** पञ्चभिः सन्धिभिः युक्तम् प्रधानम् अर्थम् अनुकीर्त्यते | प्रधानसन्धीनाम् शेषाः अनुग्राह्यनुसन्धयः |

**अर्थ –** पाच संधी मिळून मुख्य अर्थाचे अनुकीर्तन होते. अनुग्रह करणाऱ्या अन्य संधी 'अनुसंधि' म्हणून ओळखल्या जातात.

❖ १. मुख ❖

**यत्र बीजसमुत्पत्तिर्नानार्थरससम्भवा |**
**काव्ये शरीरानुगता तन्मुखं परिकीर्तितम् || ३९ ||**

**पदच्छेद:-** यत्र बीजसमुत्पत्ति: नानार्थ-रससम्भवा |
काव्ये शरीर-अनुगता तत् मुखम् परिकीर्तितम् || ३९ ||

**अन्वय: –** काव्ये यत्र शरीरानुगता, नानार्थरससम्भवा, बीजसमुत्पत्ति: तत् मुखम् परिकीर्तितम् |

**अर्थ –** काव्यामध्ये इतिवृत्त रूप शरीर असणाऱ्या, विविध अर्थ आणि रसांना उत्पन्न करणाऱ्या, जिथे बीजाची उत्पत्ती विविध प्रयोजनातून होत असते तिला 'मुखसंधि' असे म्हणतात. (ज्याप्रमाणे सर्व अवयवांमध्ये मुख हे महत्त्वाचे असते त्याचप्रमाणे नाटकामध्ये मुखसंधी प्रमुख मानली जाते.)

❖ २. प्रतिमुख संधी ❖

**बीजस्योद्घाटनं यत्र दृष्टनष्टमिव क्वचित् |**
**मुखन्यस्तस्य सर्वत्र तद्वै प्रतिमुखं स्मृतम् || ४० ||**

**पदच्छेद:-** बीजस्य उद्घाटनम् यत्र दृष्टनष्टम् इव क्वचित् |
मुखन्य: तस्य सर्वत्र तत् वै प्रतिमुखम् स्मृतम् || ४० ||

**अन्वय: –** यत्र बीजस्य उद्घाटनम् क्वचित् दृष्टनष्टम् इव सर्वत्र तस्य मुखन्य: तत् वै प्रतिमुखम् स्मृतम् |

**अर्थ –** मुखसंधीमध्ये गोवलेले बीज कधी दृष्ट तर कधी नष्ट रूपामध्ये समोर दिसून येते, तेव्हा त्यास 'प्रतिमुख' संधि असे म्हणतात.

❖ ३. गर्भ संधी ❖

**उद्भेदस्तस्य बीजस्य प्राप्तिरप्राप्तिरेव वा |**
**पुनश्चान्वेषणं यत्र स गर्भ इति संज्ञित: || ४१ ||**

**पदच्छेद :** – उद्‌भेद : तस्य बीजस्य प्राप्ति : अप्राप्ति : एव वा |
पुन : च अन्वेषणम् यत्र स : गर्भ : इति संज्ञित : || ४१ ||

**अन्वय :** – यत्र तस्य बीजस्य उद्‌भेद : प्राप्ति : एव वा अप्राप्ति : पुन : च अन्वेषणम् स : गर्भ : इति संज्ञित : |

**अर्थ** – उपसंधीमध्ये उत्पन्न होणाऱ्या बीजाची कधी प्राप्ती तर कधी अप्राप्ती होणे आणि त्याचा शोध घेणे यास 'गर्भसंधी' असे म्हटले आहे .

**❖ ४ . विमर्श संधी ❖**

**गर्भनिर्भिन्नबीजार्थो विलोभनकृतोऽथवा |**
**क्रोधव्यसनजो वापि स विमर्श इति स्मृत : || ४२ ||**

**पदच्छेद :** – गर्भनिर्भिन्न-बीजार्थ : विलोभन-कृत : अथवा |
क्रोध-व्यसनज : वा अपि स : विमर्श : इति स्मृत : || ४२ ||

**अन्वय :** – गर्भनिर्भिन्नबीजार्थ : अथवा विलोभनकृत : अपि वा क्रोधव्यसनज : स : विमर्श : इति स्मृत : |

**अर्थ** – जेव्हा गर्भसंधीमध्ये प्रस्फुटित बीजरूप अर्थांशी संबंधित विलोभन, क्रोध किंवा वासनांमुळे फलप्राप्तिविषयी चर्चाविचार केला जातो तेव्हा त्यास 'विमर्शसंधि' म्हणतात .

**❖ ५ . निर्वहण संधी ❖**

**समानयनमर्थानां मुखाद्यानां सबीजिनाम् |**
**नानाभावोत्तराणां यद्भवेन्निर्वहणं तु तत् || ४३ ||**

**पदच्छेद :** – समानयनम् अर्थानाम् मुख-आद्यानाम् सबीजिनाम् |
नानाभाव-उत्तराणाम् यत् भवेत् निर्वहणम् तु तत् || ४३ ||

**अन्वय :** – मुखाद्यानाम् सबीजिनाम् नानाभावोत्तराणाम् अर्थानाम् यत् समानयनम् भवेत् तत् तु निर्वहणम् |

**अर्थ** – जेथे मुख इत्यादी संधींचा आणि बीजासोबत आरंभ इत्यादी विविध भाव, अवस्थांचे आणि फलागमाचे एकत्रीकरण होऊन ते समान पातळीवर आणले जाते त्यास निर्वहणसंधि असे म्हणतात .

**❖ रूपकांमध्ये संधींचा प्रयोग ❖**

**एते तु सन्धयो ज्ञेया नाटकस्य प्रयोक्तृभि:|**
**तथा प्रकरणस्यापि शेषाणां च निबोधत || ४४ ||**

**पदच्छेद:** – एते तु सन्धय: ज्ञेया: नाटकस्य प्रयोक्तृभि: |
तथा प्रकरणस्य अपि शेषाणाम् च निबोधत || ४४ ||

**अन्वय:** – प्रयोक्तृभि: तु एते नाटकस्य सन्धय: ज्ञेया: | तथा प्रकरणस्य अपि च शेषाणाम् (सन्धय:) निबोधत |

**अर्थ** – नाट्याचा प्रयोग करणाऱ्यांनी नाटक आणि प्रकरणामध्ये या संधी समजून घ्याव्यात . आता उरलेल्या रूपकांमध्ये या संधींविषयी सांगेन .

**डिम: समवकारश्च चतु:सन्धी प्रकीर्तितौ |**
**न तयोरवमर्शस्तु कर्तव्य: कविभि: सदा || ४५ ||**

**पदच्छेद:** – डिम: समवकार: च चतु:सन्धी प्रकीर्तितौ |
न तयो: अवमर्श: तु कर्तव्य: कविभि: सदा || ४५ ||

**अन्वय:** – डिम: समवकार: च चतु:सन्धी प्रकीर्तितौ | तयो: कविभि: अवमर्श: तु सदा न कर्तव्य: |

**अर्थ** – डिम आणि समवकारमध्ये चार संधी सांगितल्या आहेत . यात कवींनी अवमर्शाचा प्रयोग करू नये .

**व्यायोगेहामृगौ चापि सदा कार्यौ त्रिसन्धिकौ |**
**गर्भावमर्शौ न स्यातां तयोर्वृत्तिश्च कैशिकी || ४६ ||**

**पदच्छेद:** – व्यायोग-ईहामृगौ च अपि सदा कार्यौ त्रिसन्धिकौ |
गर्भ-अवमर्शौ न स्याताम् तयो: वृत्ति: च कैशिकी || ४६ ||

**अन्वय:** – अपि च व्यायोगेहामृगौ सदा त्रिसन्धिकौ कार्यौ | तयो: गर्भावमर्शौ न स्याताम् वृत्ति: च कैशिकी (स्यात्) |

**अर्थ** – व्यायोग आणि ईहामृगामध्ये तीन संधींचा प्रयोग करावा . यात गर्भ आणि अवमर्श संधी नसाव्यात आणि यात कैशिकी वृत्ती असावी .

**द्विसन्धि तु प्रहसनं वीथ्यङ्को भाण एव च |**
**मुखनिर्वहणे तत्र कर्तव्ये कविभि: सदा || ४७ ||**

**पदच्छेद:** – द्विसन्धि तु प्रहसनम् वीथी अङ्क: भाण: एव च |
मुखनिर्वहणे तत्र कर्तव्ये कविभि: सदा || ४७ ||

**अन्वय:** – द्विसन्धि तु प्रहसनम् वीथी अङ्क: एव च भाण:, तत्र कविभि: सदा मुखनिर्वहणे कर्तव्ये |

**अर्थ** – वीथी, भाण, प्रहसन आणि अंक यांमध्ये विद्वानांनी मुख आणि निर्वहण या दोन संधी कराव्यात .

**वीथी च वै हि भाणश्च तथा प्रहसनं पुन: |**
**कैशिकीवृत्तिहीनानि कार्याणि कविभि: सदा || ४८ ||**

**पदच्छेद:** – वीथी च वै हि भाण: च तथा प्रहसनम् पुन: |
कैशिकीवृत्ति-हीनानि कार्याणि कविभि: सदा || ४८ ||

**अन्वय:** – कविभि: वीथी, भाण: तथा च पुन: प्रहसनम् सदा कैशिकीवृत्तिहीनानि कार्याणि |

**अर्थ** – कवींनी वीथी, भाण आणि प्रहसन हे नेहमी कैशिकीवृत्ति शिवाय करावे .

**❖ संधींची अंगे ❖**

**एवं हि सन्धय: कार्या दशरूपे प्रयोक्तृभि: |**
**पुनरेषां तु सन्धीनामङ्गकल्पं निबोधत || ४९ ||**

**पदच्छेद:** – एवम् हि सन्धय: कार्या: दशरूपे प्रयोक्तृभि: |
पुन: एषाम् तु सन्धीनाम् अङ्गकल्पम् निबोधत || ४९ ||

**अन्वय: –** प्रयोक्तृभि: दशरूपे हि एवम् सन्धय: कार्या: | पुन: एषाम् तु सन्धीनाम् अङ्गकल्पम् निबोधत |

**अर्थ –** नाट्यप्रयोगकर्त्यांनी दहा रूपकांमध्ये या संधीचा प्रयोग करावा . यापुढे आता या संधींची अंगे तुम्हांला सांगतो .

**सन्धीनां यानि वृत्तानि प्रदेशेष्वनुपूर्वश: |**
**स्वसम्पद्गुणयुक्तानि तान्यङ्गान्युपधारयेत् || ५० ||**

**पदच्छेद: –** सन्धीनाम् यानि वृत्तानि प्रदेशेषु अनुपूर्वश: |
स्वसम्पत्-गुणयुक्तानि तानि अङ्गानि उपधारयेत् || ५० ||

**अन्वय: –** सन्धीनाम् प्रदेशेषु अनुपूर्वश: यानि वृत्तानि तानि स्वसम्पद्गुणयुक्तानि अङ्गानि उपधारयेत् |

**अर्थ –** संधींचे आपआपल्या स्थानांवर, क्रमश: जे इतिवृत्त स्वगुणाने युक्त आहे त्यालाच अंगरूपाने धारण करावे .

**❖ संध्यंगांची प्रयोजने ❖**

**इष्टस्यार्थस्य रचना वृत्तान्तस्यानुपक्षय: |**
**रागप्राप्ति: प्रयोगस्य गुह्यानां चैव गूहनम् || ५१ ||**
**आश्चर्यवदभिख्यानं प्रकाश्यानां प्रकाशनम् |**
**अङ्गानां षड्विधं ह्येतद्दृष्टं शास्त्रे प्रयोजनम् || ५२ ||**

**पदच्छेद: –** इष्टस्य अर्थस्य रचना वृत्तान्तस्य अनुपक्षय: |
रागप्राप्ति: प्रयोगस्य गुह्यानाम् च एव गूहनम् || ५१ ||
आश्चर्यवत् अभिख्यानम् प्रकाश्यानाम् प्रकाशनम् |
अङ्गानाम् षड्विधम् हि एतत् दृष्टम् शास्त्रे प्रयोजनम् || ५२ ||

**अन्वय: –** इष्टस्य अर्थस्य रचना, वृत्तान्तस्य अनुपक्षय:, प्रयोगस्य रागप्राप्ति:, गुह्यानाम् गूहनम्, आश्चर्यवत् अभिख्यानम्, प्रकाश्यानाम् प्रकाशनम्, शास्त्रे अङ्गानाम् एतत् षड्विधम् प्रयोजनम् दृष्टम् |

**अर्थ** – इष्ट अर्थाची रचना, वृत्तांताची घटना क्रमानुसार असणे, त्याचा व्यतिक्रम न होणे, प्रयोगामध्ये प्रेमाची बैठक असणे, गोपनीयता असणे, आश्चर्यजनक अर्थ असलेली वाक्ये आणि प्रकाशनीय वस्तुंचे प्रकाशन असणे अशी अंगांची सहा प्रयोजने नाट्यशास्त्रामध्ये सांगितली गेली आहेत.

**❖ काव्य आणि प्रयोग ❖**

**अङ्गहीनो नरो यद्वन्नैवारम्भक्षमो भवेत् |**
**अङ्गहीनं तथा काव्यं न प्रयोगक्षमं भवेत् || ५३ ||**

**पदच्छेद:** – अङ्गहीन: नर: यद्वत् न एव आरम्भक्षम: भवेत् |
अङ्गहीनम् तथा काव्यम् न प्रयोगक्षमम् भवेत् || ५३ ||

**अन्वय:** – यद्वत् अङ्गहीन: नर: आरम्भक्षम: न एव भवेत् तथा अङ्गहीनम् काव्यम् प्रयोगक्षमम् न भवेत् |

**अर्थ** – ज्याप्रमाणे अंगहीन मनुष्य कार्याची सुरुवात करण्यास असमर्थ असतो, त्याचप्रमाणे अंगहीन काव्याद्वारे प्रयोगाला यश आणि प्रसिद्धि प्राप्त होऊ शकत नाही.

**उदात्तमपि यत्काव्यं स्यादङ्गै: परिवर्जितम् |**
**हीनत्वाद्धि प्रयोगस्य न सतां रञ्जयेन्मन: || ५४ ||**

**पदच्छेद:** – उदात्तम् अपि यत् काव्यम् स्यात् अङ्गै: परिवर्जितम् |
हीनत्वात् हि प्रयोगस्य न सताम् रञ्जयेत् मन: || ५४ ||

**अन्वय:** – यत् उदात्तम् अपि काव्यम् अङ्गै: परिवर्जितम् स्यात् प्रयोगस्य हि हीनत्वात् सताम् मन: न रञ्जयेत् |

**अर्थ** – जे काव्य उदात्त आहे किंतु अंगवर्जित असेल म्हणजे अंगहीन काव्य असेल तर त्याच्या प्रयोगाद्वारे रसिकांचे मनोरंजन होऊ शकत नाही.

**काव्यं यदपि हीनार्थं सम्यगङ्गै: समन्वितम् |**
**दीप्तत्वात्तु प्रयोगस्य शोभामेति न संशय: || ५५ ||**

**पदच्छेद :–** काव्यम् यत् अपि हीनार्थम् सम्यक् अङ्गै : समन्वितम् |
दीप्तत्वात् तु प्रयोगस्य शोभाम् एति न संशय : || ५५ ||

**अन्वय : –** यत् अपि हीनार्थम् काव्यम् सम्यक् अङ्गै : समन्वितम् (स्यात्) | प्रयोगस्य दीप्तत्वात् तु शोभाम् एति (अत्र) संशय : न (अस्ति) |

**अर्थ –** सम्यक् अंग असलेले काव्य जरी अधम अर्थाचे असले तरीही प्रयोगाच्या प्रकाशाने प्रदीप्त होऊन शोभा देतात यात शंका नाही .

**तस्मात् सन्धिप्रदेशेषु यथायोगं यथारसम् |**
**कविनाङ्गानि कार्याणि सम्यक्तानि निबोधत || ५६ ||**

**पदच्छेद :–** तस्मात् सन्धिप्रदेशेषु यथायोगं यथारसम् |
कविना अङ्गानि कार्याणि सम्यक् तानि निबोधत || ५६ ||

**अन्वय : –** तस्मात् कविना सन्धिप्रदेशेषु यथायोगम् यथारसम् अङ्गानि कार्याणि | तानि सम्यक् निबोधत |

**अर्थ –** आणि म्हणूनच कवींनी संधिप्रदेशामध्ये युक्तिंद्वारे रसांप्रमाणे, अंगांचा प्रयोग करावा . म्हणजेच काव्यामध्ये रसाभिव्यंजनेसाठी संध्यंगांचा वापर आवश्यक आहे . आता त्या चांगल्या रीत्या समजून घ्याव्यात .

**❖ संध्यंगे ❖**

**❖ मुखसंधीची अंगे ❖**

**उपक्षेप: परिकर: परिन्यासो विलोभनम् |**
**युक्ति: प्राप्ति: समाधानं विधानं परिभावना || ५७ ||**
**उद्भेद: करणं भेद एतान्यङ्गानि वै मुखे |**
**तथा प्रतिमुखे चैव शृणुताङ्गानि नामत: || ५८ ||**

**पदच्छेद :–** उपक्षेप : परिकर : परिकर : परिन्यास : विलोभनम् |
युक्ति : प्राप्ति : समाधानम् विधानम् परिभावना || ५७ ||

उद्भेद: करणम् भेद: एतानि अङ्गानि वै मुखे |
तथा प्रतिमुखे च एव शृणुत अङ्गानि नामत: ||५८||

**अन्वय: –** उपक्षेप:, परिकर:, परिकर:, परिन्यास:, विलोभनम्, युक्ति:, प्राप्ति:, समाधानम्, विधानम्, परिभावना, उद्भेद:, करणम्, भेद: च मुखे एतानि अङ्गानि (सन्ति) | तथा एव च प्रतिमुखे अङ्गानि नामत: शृणुत |

**अर्थ –** उपक्षेप, परिकर, परिन्यास, विलोभन, युक्ति, प्राप्ती, समाधान, विधान, परिभावना, उद्भेद, करण आणि भेद ही बारा मुखसंधींची अंगे आहेत आणि आता प्रतिमुख संधीची अंगे सांगीन.

**❖ प्रतिमुखसंधीची अंगे ❖**

**विलास: परिसर्पश्च विधूतं तापनं तथा |**
**नर्म नर्मद्युतिश्चैव तथा प्रगयणं पुन: ||५९||**
**निरोधश्चैव विज्ञेय: पर्युपासनमेव च |**
**पुष्पं वज्रमुपन्यासो वर्णसंहार एव च ||६०||**
**एतानि वै प्रतिमुखे गर्भेऽङ्गानि निबोधत |**

**पदच्छेद: –** विलास: परिसर्प: च विधूतम् तापनम् तथा |
नर्म: नर्मद्युति: च एव तथा प्रगयणम् पुन: ||५९||
निरोध: च एव विज्ञेय: पर्युपासनम् एव च |
पुष्पम् वज्रम् उपन्यास: वर्णसंहार: एव च ||६०||
एतानि वै प्रतिमुखे गर्भे अङ्गानि निबोधत |

**अन्वय: –** विलास: परिसर्प: विधूतम् तापनम् नर्म: नर्मद्युति: प्रगयणम् निरोध: पर्युपासनम् पुष्पम् वज्रम् उपन्यास: वर्णसंहार: च विज्ञेया: | प्रतिमुखे वै एतानि अङ्गानि (सन्ति) | गर्भे (अङ्गानि) निबोधत |

**अर्थ –** विलास, परिसर्प, विधूत, तापन, नर्म, नर्मद्युति, प्रगमन (प्रशमन), निरोध, पर्युपासन, पुष्प, वज्र, उपन्यास आणि वर्णसंहार ही प्रतिमुखसंधीची तेरा अंगे आहेत. आता गर्भसंधीची अंगे सांगतो.

❖ गर्भसंधीची अंगे ❖

**अभूताहरणं मार्गो रूपोदाहरणे क्रमः ||६१||**
**संग्रहश्चानुमानं च प्रार्थनाक्षिप्तमेव च |**
**तोटकाधिबले चैव ह्युद्वेगो विद्रवस्तथा||६२||**
**एतान्यङ्गानि वै गर्भे ह्यवमर्शे निबोधत |**

**पदच्छेद:-** अभूताहरणम् मार्ग: रूपोदाहरणे क्रम: || ६१ ||
संग्रह: च अनुमानम् च प्रार्थना अक्षिप्तम् एव च |
तोटकाधिबले च एव हि उद्वेग: विद्रव: तथा || ६२ ||
एतानि अङ्गानि वै गर्भे हि अवमर्शे निबोधत |

**अन्वय: -** अभूताहरणम् मार्ग: रूपोदाहरणे क्रम: संग्रह: च अनुमानम् च प्रार्थना अक्षिप्तम् एव च तोटकाधिबले एव च हि उद्वेग: तथा विद्रव: | गर्भे एतानि वै अङ्गानि (सन्ति) | अवमर्शे (अङ्गानि) हि निबोधत |

**अर्थ -** अभूताहरण, मार्ग, रूप, उदाहरण, क्रम संग्रह, अनुमान, प्रार्थना, आक्षिप्त, तोटक, अधिबल, उद्भेद, आणि विद्रव ही गर्भसंधीची बारा अंगे सांगितली आहेत. आता अवमर्श संधीची अंगे जाणून घ्या.

❖ अविमर्शसंधीची अंगे ❖

**अपवादश्च संफेटो विद्रवः शक्तिरेव च ||६३||**
**व्यवसायः प्रसङ्गश्च द्युतिः खेदो निषेधनम् |**
**विरोधनमथादानं छादनं च प्ररोचना ||६४||**
**व्यवहारश्च युक्तिश्च विमर्शाङ्गान्यमूनि च |**

**पदच्छेद:-** अपवाद: च संफेट: विद्रव: शक्ति: एव च || ६३ ||
व्यवसाय: प्रसङ्ग: च द्युति: खेद: निषेधनम् |
विरोधनम् अथ आदानम् छादनम् च प्ररोचना || ६४ ||
व्यवहार: च युक्ति: च विमर्शाङ्गानि अमूनि च |

**अन्वय: –** अपवाद: संफेट: विद्रव: शक्ति: व्यवसाय: प्रसङ्ग: द्युति: खेद: निषेधनम् विरोधनम् आदानम् छादनम् प्ररोचना व्यवहार: युक्ति: च अमूनि च विमर्शाङ्गानि (सन्ति)।

**अर्थ –** अपवाद, संफेट, विद्रव, शक्ति, व्यवसाय, प्रसंग, द्युति, खेद, निषेधन, विरोधन, आदान, छादन आणि प्ररोचन व्यवहार आणि युक्ती ही अवमर्शसंधीची अंगे आहेत.

**❖ निर्वहणसंधीची अंगे ❖**

**सन्धिर्निरोधो ग्रथनं निर्णय: परिभाषणम् ॥ ६५ ॥**
**द्युति: प्रसाद आनन्द: समयो ह्युपगूहनम् ।**
**भाषणं पूर्ववाक्यं च काव्यसंहार एव च ॥ ६६ ॥**
**प्रशस्तिरिति संहारे ज्ञेयान्यङ्गानि नामत: ।**

**पदच्छेद: –** सन्धि: निरोध: ग्रथनम् निर्णय: परिभाषणम् ॥ ६५ ॥
द्युति: प्रसाद: आनन्द: समय: हि उपगूहनम् ।
भाषणम् पूर्ववाक्यम् च काव्यसंहार: एव च ॥ ६६ ॥
प्रशस्ति: इति संहारे ज्ञेयानि अङ्गानि नामत: ।

**अन्वय: –** सन्धि: निरोध: ग्रथनम् निर्णय: परिभाषणम् द्युति: प्रसाद: आनन्द: समय: उपगूहनम् भाषणम् पूर्ववाक्यम् काव्यसंहार: प्रशस्ति: इति संहारे नामत: अङ्गानि ज्ञेयानि ।

**अर्थ –** संधी, विबोध, ग्रथन, निर्णय, परिभाषण, द्युति, प्रसाद, आनंद, समय, उपगूहन, भाषण, पूर्ववाक्य, काव्यसंहार आणि प्रशस्ती ही चौदा निर्वहण संधींची अंगे आहेत.

**चतुष्षष्ठि बुधैर्ज्ञेयान्येतान्यङ्गानि सन्धिषु ॥ ६७ ॥**

**पदच्छेद: –** चतुष्षष्ठि बुधै: ज्ञेयानि एतानि अङ्गानि सन्धिषु ॥ ६७ ॥

**अन्वय: –** बुधै: सन्धिषु एतानि चतुष्षष्ठि अङ्गानि ज्ञेयानि ।

**अर्थ –** विद्वानांनी पाच संधींची ही ६४ अंगे नीट समजून घ्यावीत.

**संपादनार्थ बीजस्य सम्यक् सिद्धिकराणि च |**
**कार्याण्येतानि कविभिर्विभज्यार्थानि नाटके || ६८ ||**
**पुनरेषां प्रवक्ष्यामि लक्षणानि यथाक्रमम् |**

**पदच्छेद :–** संपादनार्थम् बीजस्य सम्यक् सिद्धिकराणि च |
कार्याणि एतानि कविभि : विभज्यार्थानि नाटके || ६८ ||
पुन : एषाम् प्रवक्ष्यामि लक्षणानि यथाक्रमम् |

**अन्वय : –** नाटके बीजस्य सम्यक् संपादनार्थम् एतानि सिद्धिकराणि च कार्याणि कविभि : विभज्यार्थानि | पुन : एषाम् लक्षणानि यथाक्रमम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** नाटकामध्ये कथाबीज योग्य पद्धतीने प्राप्त करण्यासाठी कवींनी या सिद्धी देणाऱ्या संध्यंगांचा उपयोग करावा .

**❖ मुखसंधीची अंगे ❖**

**❖ १ . उपक्षेप ❖**

**काव्यार्थस्य समुत्पत्तिरुपक्षेप इति स्मृत : || ६९ ||**

**पदच्छेद :–** काव्यार्थस्य समुत्पत्ति : उपक्षेप : इति स्मृत : || ६९ ||

**अन्वय : –** काव्यार्थस्य समुत्पत्ति : उपक्षेप : इति स्मृत : |

**अर्थ –** पुन्हा मी यांची लक्षणे क्रमाने सांगत आहे .
१ ) उपक्षेप – काव्यार्थाच्या उत्पत्तीला 'उपक्षेप' म्हणतात .

**❖ २ . परिकर ३ . उपन्यास ❖**

**यदुत्पन्नार्थबाहुल्यं ज्ञेय: परिकरस्तु स: |**
**तन्निष्पत्ति: परिन्यासो विज्ञेय: कविभि: सदा || ७० ||**

**पदच्छेद :–** यत् उत्पन्नार्थबाहुल्यम् ज्ञेय : परिकर : तु स : |
तन्निष्पत्ति : परिन्यास : विज्ञेय : कविभि : सदा || ७० ||

**अन्वयः –** यत् उत्पन्नार्थवाहुल्यम् सः तु परिकरः ज्ञेयः | तन्निष्पत्तिः कविभिः सदा परिन्यासः विज्ञेयः |

**अर्थ –** (२) परिकर - उत्पन्न झालेल्या काव्यार्थाचा किंवा इतिवृत्ताचा विस्तार होणे म्हणजे परिकर.

(३) परिन्यास - काव्यार्थ परिकरापेक्षा विशेष निश्चय रूपाने हृदयात सर्वबाजुंनी पोहोचविणे म्हणजेच परिन्यास.

**❖ ४. विलोभन ५. युक्ति ❖**

**गुणनिर्वर्णनं चैव विलोभनमिति स्मृतम् |**
**संप्रधारणमर्थानां युक्तिरित्यभिधीयते || ७१ ||**

**पदच्छेदः –** गुणनिर्वर्णनम् च एव विलोभनम् इति स्मृतम् |
संप्रधारणम् अर्थानाम् युक्तिः इति अभिधीयते || ७१ ||

**अन्वयः –** गुणनिर्वर्णनम् एव च विलोभनम् इति स्मृतम् | अर्थानाम् संप्रधारणम् युक्तिः इति अभिधीयते |

**अर्थ –** (४) विलोभन - गुणांचे ज्यात वर्णन आहे ते 'विलोभन'- (अभिनवगुप्ताच्या मते, याच्यापेक्षा तो जास्त गुणवान आहे अशी प्रशंसा जेव्हा केली जाते त्याला 'विलोभन' असे म्हणतात).

(५) युक्ती- निश्चित अर्थ सूचित करणे यास 'युक्ती' म्हणतात.

**❖ ६. प्राप्ती ७. समाधान ❖**

**मुखार्थस्याभिगमनं प्राप्तिरित्यभिसंज्ञिता |**
**बीजार्थस्योपगमनं समाधानमिति स्मृतम् || ७२ ||**

**पदच्छेदः –** मुखार्थस्य अभिगमनम् प्राप्तिः इति अभिसंज्ञिता |
बीजार्थस्य उपगमनम् समाधानम् इति स्मृतम् || ७२ ||

**अन्वय: –** सुखार्थस्य अभिगमनम् प्राप्ति: इति अभिसंज्ञिता | बीजार्थस्य उपगमनम् समाधानम् इति स्मृतम् |

**अर्थ –** (६) प्राप्ती - सुखार्थाचा अनुभव होणे यास 'प्राप्ती' म्हणावे .
(७) समाधान - इतिवृत्ताचा अर्थ समजल्यास त्याला 'समाधान' असे म्हणतात .

### ❖ ८ . विधान ९ . परिभावना ❖

**सुखदु:खकृतो योऽर्थस्तद्विधानमिति स्मृतम् |**
**कुतूहलोत्तरावेगो विज्ञेया परिभावना || ७३ ||**

**पदच्छेद: –** सुखदु:खकृत: य: अर्थ: तत् विधानम् इति स्मृतम् |
कुतूहल-उत्तर-आवेग: विज्ञेया परिभावना || ७३ ||

**अन्वय : –** न्यायात् एव समुत्थितै : न्यायाश्रितै : च अङ्गहारै : यस्मात् युद्धानि वर्तन्ते तस्मात् न्याया : प्रकीर्तिता : |

**अर्थ –** अंगहार हे न्यायावर आधारित असतात आणि न्यायातूनच उत्पन्न होतात . त्यांच्याद्वारेच युद्धाचे दर्शन घडते . म्हणूनच त्यांना 'न्याय' असे म्हटले आहे .
( नाट्यशास्त्रातील १०.७५ मध्ये हाच श्लोक उद्धृत केला आहे . न्यायाचे चार प्रकार १०.७२ ते १०.८५ मध्ये दिले आहेत . )

**चारीषु च समुत्पन्नो नानाचारीसमाश्रय : |**
**न्यायसंज्ञ : कृतो ह्येष द्रुहिणेन महात्मना || २० ||**

**पदच्छेद :–** चारीषु च समुत्पन्न : नानाचारी-समाश्रय : |
न्यायसंज्ञ : कृत : हि एष : द्रुहिणेन महात्मना || २० ||

**अन्वय : –** चारीषु समुत्पन्न : नानाचारीसमाश्रय : च एष : हि न्यायसंज्ञ : महात्मना द्रुहिणेन कृत : |

**अर्थ –** चारींमधून उत्पन्न झालेल्या आणि अनेक प्रकारच्या चारींच्या आश्रयात असलेल्या युद्धाला महात्मा ब्रह्माने 'न्याय' असे नाव दिले आहे .

**❖ वृत्तींची उत्पत्ति ❖**

**ततो वेदेषु निक्षिप्ता द्रुहिणेन महात्मना |**
**पुनरिष्वस्त्रजाते च नानाचारीसमाकुले || २१ ||**
**पुनर्नाट्यप्रयोगेषु नानाभावसमन्विता: |**
**वृत्तिसंज्ञा: कृता ह्येता: काव्यबन्धसमाश्रया: || २२ ||**

**पदच्छेद :–** तत : वेदेषु निक्षिप्ता : द्रुहिणेन महात्मना |
पुन : इषु-अस्त्रजाते च नानाचारी-समाकुले || २१ ||
पुन : नाट्यप्रयोगेषु नानाभाव-समन्विता : |
वृत्तिसंज्ञा : कृता : हि एता : काव्यबन्ध-समाश्रया : || २२ ||

**अन्वय : –** तत : महात्मना द्रुहिणेन वेदेषु निक्षिप्ता : | पुन : इष्वस्त्रजाते नानाचारीसमाकुले च नाट्यप्रयोगेषु एता : नानाभावसमन्विता : काव्यबन्धसमाश्रया : हि वृत्तिसंज्ञा : कृता : |

**अर्थ –** यानंतर महात्मा ब्रह्मदेवाने वेदांमध्ये या वृत्तींची स्थापना केली . त्यानंतर धनुष्यबाण अस्त्र यांचा प्रयोग असताना आणि विविध चारींनी युक्त असताना नाट्यप्रयोगामध्ये विविध भावांनी युक्त असलेल्या आणि काव्यरचनेसाठी अत्यंत आवश्यक असलेल्यांना 'वृत्ती' ही संज्ञा दिली आहे .

**चरितैर्यस्य देवस्य जप्यं यद्यादृशं कृतम् |**
**ऋषिभिस्तादृशी वृत्ति: कृता पाठ्यादिसंयुता || २३ ||**

**पदच्छेद :–** चरितै : यस्य देवस्य जप्यम् यत् यादृशम् कृतम् |
ऋषिभि : तादृशी वृत्ति : कृता पाठ्यादि-संयुता || २३ ||

**अन्वय:** – यस्य देवस्य चरितै: जप्यम् यत् यादृशम् कृतम् ऋषिभि: तादृशी पाठ्यादिसंयुता वृत्ति: कृता |

**अर्थ** – चरित्रामुळे भगवान विष्णूच्या स्तुतीचा जसा जप ब्रह्मदेवाने केला, तशीच वृत्ती ऋषीमुनींनी रचली जी पाठ्य इत्यादी गुणांनी युक्त होती .

**नाट्यवेदसमुत्पन्ना वागङ्गाभिनयात्मिका |**
**मया काव्यक्रियाहेतो: प्रक्षिप्ता द्रुहिणाज्ञया || २४ ||**

**पदच्छेद:** – नाट्यवेद-समुत्पन्ना वाग्-अङ्ग-अभिनयात्मिका |
मया काव्य-क्रिया-हेतो : प्रक्षिप्ता : द्रुहिण-आज्ञया || २४ ||

**अन्वय:** – द्रुहिणाज्ञया काव्य-क्रिया-हेतो: नाट्यवेद-समुत्पन्ना वाग्-अङ्ग-अभिनयात्मिका वृत्ति: मया प्रक्षिप्ता |

**अर्थ** – अशाप्रकारे, ब्रह्मदेवाच्या आज्ञेनुसार नाटकाच्या निर्मितीसाठी उपयोगी, नाट्यवेदातून उत्पन्न झालेली, वाचिक आणि आंगिक अभिनयासह असलेली वृत्ती तुमच्या समोर मी मांडली आहे .

**ऋग्वेदाद्भारती क्षिप्ता यजुर्वेदाच्च सात्त्वती |**
**कैशिकी सामवेदाच्च शेषा चाथर्वणादपि || २५ ||**

**पदच्छेद:** – ऋग्वेदात् भारती क्षिप्ता यजुर्वेदात् च सात्त्वती |
कैशिकी सामवेदात् च शेषा च आथर्वणात् अपि || २५ ||

**अन्वय:** – ऋग्वेदात् भारती, यजुर्वेदात् च सात्त्वती, कैशिकी सामवेदात्, अपि च शेषा च आथर्वणात् क्षिप्ता |

(पाठ्यप्रधाना भारती, अभिनयप्रधाना सात्त्वती, अनुभावाद्यावेशमयरसप्रधाना आरभटी, गीतवाद्योपरञ्जकप्रधाना कैशिकीति | - अ . भा . )

**अर्थ** – ऋग्वेदातून भारतीवृत्ती, यजुर्वेदातून सात्त्वतीवृत्ती, सामवेदातून कैशिकीवृत्ती आणि अथर्ववेदातून आरभटीवृत्ती घेतली आहे .

(ज्यामध्ये पाठ्य प्रमुख असते ती भारती वृत्ती होय. ज्यामध्ये अभिनय प्रमुख असतो ती सात्त्वती वृत्ती होय. ज्यामध्ये अनुभाव इत्यादी आवेश आणि रस प्रमुख असतो ती आरभटी वृत्ती होय आणि ज्यामध्ये गीत वाद्य इत्यादींद्वारे मनोरंजन केले जाते की कैशिकी वृत्ती होय. - अ. भा.)

**❖ भारती वृत्तींची लक्षणे ❖**

**या वाक्प्रधाना पुरुषप्रयोज्या स्त्रीवर्जिता संस्कृतपाठ्ययुक्ता |**
**स्वनामधेयैर्भरतैः प्रयुक्ता सा भारती नाम भवेत्तु वृत्तिः || २६ ||**

**पदच्छेदः-** या वाक्प्रधाना पुरुष-प्रयोज्या स्त्री-वर्जिता संस्कृत-पाठ्य-युक्ता |
स्वनामधेयैः भरतैः प्रयुक्ता सा भारती नाम भवेत् तु वृत्तिः || २६ ||

**अन्वयः -** या वाक्प्रधाना, स्त्रीवर्जिता, पुरुषप्रयोज्या, संस्कृतपाठ्ययुक्ता स्वनामधेयैः भरतैः प्रयुक्ता सा तु भारती नाम वृत्तिः भवेत् |

**अर्थ -** ज्या वृत्तीमध्ये भाषा प्रमुख असेल, जी स्त्रीपात्रविरहित असेल, जी केवळ पुरुषपात्रांद्वारे प्रस्तुत केली जात असेल, ज्यामध्ये वाक्यरचना संस्कृतमध्ये असेल आणि जी भरत म्हणजे नटांद्वारे स्वतःच्या नावानुसार वापरली गेली असेल त्या वृत्तीस 'भारतीवृत्ती' असे म्हणतात.

**❖ भारती वृत्तींचे चार अंश ❖**

**भेदास्तस्यास्तु विज्ञेयाश्चत्वारोऽङ्गत्वमागताः | (आर्या)**
**प्ररोचना मुखं चैव वीथी प्रहसनं तथा || २७ ||**

**पदच्छेदः-** भेदाः तस्याः तु विज्ञेयाः चत्वारः अङ्गत्वम् आगताः |
प्ररोचनामुखम् च एव वीथी प्रहसनम् तथा || २७ ||

**अन्वयः -** तस्याः अङ्गत्वम् आगताः चत्वारः भेदाः विज्ञेयाः - प्ररोचना, मुखम्, वीथी तथा प्रहसनम् (इति) |

(भेदा: इति अस्याम् इत्यर्थ: अत्र न तु प्रकारा:, त्रैलोक्यव्यापिन्या: हि भारत्या: कश्चित् अंश: प्ररोचनारूप:, एवम् आमुखस्वभाव: इत्यादि | अत: एव आह अङ्गत्वमिति अंशत्वं प्राप्ता: इत्यर्थ: | अन्यथा यदि रूपकस्य अङ्गत्वं प्राप्ता: इत्युच्यते तदा वीथी प्रहसनं च रूपकभेद:, न तु रूपकस्य अङ्गम् | - अ. भा. )

**अर्थ** – भारतीवृत्तीचे चार अंश आहेत - प्ररोचना, आमुख, वीथी व प्रहसन.

(वरील कारिकेमध्ये भेद याचा 'प्रकार' असा अर्थ होणार नाही. त्रैलोक्यास व्यापणारी ही जी वाणी आहे तिचा अंश म्हणजे प्ररोचना होय. त्याचप्रमाणे आमुख, वीथी आणि प्रहसन होय. म्हणूनच म्हटले आहे अङ्गत्वं म्हणजे अंशरूप झाले आहे. अन्यथा जर रूपकाचे अंग मानले तर वीथी आणि प्रहसन हे रूपकाचे भेद होतील. तसे करू नये. )

**❖ प्ररोचना लक्षण ❖**

**जयाभ्युदायिनी चैव मङ्गल्या विजयावहा | (आर्या)**
**सर्वपापप्रशमनी पूर्वरङ्गे प्ररोचना || २८ ||**

**पदच्छेद:** – जय-अभ्युदायिनी च एव मङ्गल्या विजयावहा |
सर्व-पाप-प्रशमनी पूर्वरङ्गे प्ररोचना || २८ ||

**अन्वय:** – जयाभ्युदायिनी, मङ्गल्या, विजयावहा, सर्वपापप्रशमनी प्ररोचना पूर्वरङ्गे कार्या |

**अर्थ** – विजय व समृद्धी देणारी, मंगलकारिणी, विजयापर्यंत घेऊन जाणारी तसेच सर्व पापे दूर करणारी ही 'प्ररोचना' पूर्वरंगामध्ये करावी.

**उपक्षेपेण काव्यस्य हेतुयुक्तिसमाश्रया |**
**सिद्धेनामन्त्रणा या तु विज्ञेया सा प्ररोचना || २९ ||**

**पदच्छेद:** – उपक्षेपेण काव्यस्य हेतुयुक्ति-समाश्रया |
सिद्धेन आमन्त्रणा या तु विज्ञेया सा प्ररोचना || २९ ||

**अन्वय:** – काव्यस्य सिद्धेन उपक्षेपेण हेतुयुक्तिसमाश्रया या आमन्त्रणा सा प्ररोचना विज्ञेया |

**अर्थ** – काव्याची स्पष्ट सूचना देणारे, हेतु आणि युक्ती असलेली जी संभाषण असते, तिला 'प्ररोचना' असे म्हणतात.

**❖ आमुख लक्षण ❖**

**नटी विदूषको वापि पारिपार्श्विक एव वा |**
**सूत्रधारेण सहिताः संलापं यत्तु कुर्वते || ३० ||**
**चित्रैर्वाक्यैः स्वकार्योत्थैर्वीथ्यङ्गैरन्यथापि वा |**
**आमुखं तत्तु विज्ञेयं बुधैः प्रस्तावनापि वा || ३१ ||**

**पदच्छेदः –** नटी विदूषकः वा अपि पारिपार्श्विकः एव वा |
सूत्रधारेण सहिताः संलापम् यत् तु कुर्वते || ३० ||
चित्रैः वाक्यैः स्वकार्योत्थैः वीथ्यङ्गैः अन्यथा अपि वा |
आमुखम् तत् तु विज्ञेयम् बुधैः प्रस्तावना अपि वा || ३१ ||

**अन्वयः –** नटी, विदूषकः, पारिपार्श्विकः सूत्रधारेण सहिताः स्वकार्योत्थैः चित्रैः वाक्यैः वीथ्यङ्गैः अन्यथा यत् संलापम् तु कुर्वते तत् बुधैः आमुखम् अपि वा प्रस्तावना इति विज्ञेयम् |

**अर्थ –** जेव्हा नटी, विदूषक आणि पारिपार्श्विक सूत्रधारासोबत स्वतःच्या कार्याची चर्चा करताना चित्र-विचित्र उक्तींद्वारे किंवा वीथीतील विभागांच्या आधारांवर किंवा कुठल्यातरी अन्य प्रकाराने संभाषण करतात तेव्हा त्यास बुद्धिमान लोक 'आमुख' असे म्हणतात आणि यालाच 'प्रस्तावना' असेही म्हटले जाते .

**लक्षणं पूर्वमुक्तं तु वीथ्याः प्रहसनस्य च |**
**आमुखाङ्गान्यतो वक्ष्ये यथावदनुपूर्वशः || ३२ ||**

**पदच्छेदः –** लक्षणम् पूर्वम् उक्तम् तु वीथ्याः प्रहसनस्य च |
आमुख-अङ्गानि अतः वक्ष्ये यथावत् अनुपूर्वशः || ३२ ||

**अन्वयः –** वीथ्याः प्रहसनस्य च लक्षणम् तु पूर्वम् उक्तम् | अतः यथावत् अनुपूर्वशः आमुखाङ्गानि वक्ष्ये |

**अर्थ –** वीथी आणि प्रहसनाची लक्षणे मी पूर्वी सांगितली आहेत . आता मी क्रमशः आमुखाच्या विभागांविषयी सांगणार आहे .

**उद्धात्यक: कथोद्धात: प्रयोगातिशयस्तथा |**
**प्रवृत्तकावलगिते पञ्चाङ्गान्यामुखस्य तु || ३३ ||**

**पदच्छेद:** – उद्धात्यक: कथोद्धात: प्रयोगातिशय: तथा |
प्रवृत्तक-अवलगिते पञ्च अङ्गानि आमुखस्य तु || ३३ ||

**अन्वय:** – उद्धात्यक: कथोद्धात: प्रयोगातिशय: प्रवृत्तक-अवलगिते (इति) आमुखस्य पञ्च अङ्गानि |

**अर्थ** – उद्धात्यक, कथोद्धात, प्रयोगातिशय, प्रवृत्तक आणि अवलगित ही पाच आमुखाची (प्रस्तावनेची) अंगे आहेत .

**उद्धात्यकावलगितलक्षणं कथितं मया |**
**शेषाणां लक्षणं विप्रा व्याख्यास्याम्यनुपूर्वश: || ३४ ||**

**पदच्छेद:** – उद्धात्यक-अवलगित-लक्षणम् कथितम् मया |
शेषाणाम् लक्षणम् विप्रा: व्याख्यास्यामि अनुपूर्वश: || ३४ ||

**अन्वय:** – मया उद्धात्यकावलगितलक्षणं कथितम् | हे विप्रा:, शेषाणां लक्षणं अनुपूर्वश: व्याख्यास्यामि |

**अर्थ** – उद्धात्यक (१८.११६) आणि अवलगिताची लक्षणे (१८.११७) मी यापूर्वी तुम्हांला सांगितली आहेत . हे ब्राह्मणांनो, आता शेष प्रकारांची लक्षणे क्रमाने सांगीन .

**❖ कथोद्धात ❖**

**सूत्रधारस्य वाक्यं वा यत्र वाक्यार्थमेव वा |**
**गृहीत्वा प्रविशेत्पात्रं कथोद्धात: स कीर्तित: || ३५ ||**

**पदच्छेद:** – सूत्रधारस्य वाक्यम् वा यत्र वाक्यार्थम् एव वा |
गृहीत्वा प्रविशेत् पात्रम् कथोद्धात: स: कीर्तित: || ३५ ||

**अन्वय:** – यत्र सूत्रधारस्य वाक्यम् वाक्यार्थम् वा गृहीत्वा पात्रम् प्रविशेत् स: कथोद्धात: कीर्तित: |

**अर्थ** – जिथे सूत्रधाराचे वाक्य अथवा वाक्याचा अर्थ घेऊन पात्र रंगमंचावर प्रवेश करते तेव्हा त्यास 'कथोद्धात' असे म्हटले जाते .

❖ प्रयोगातिशय ❖

**प्रयोगे तु प्रयोगं तु सूत्रधार: प्रयोजयेत् |**
**ततश्च प्रविशेत्पात्रं प्रयोगातिशयो हि स: || ३६ ||**

**पदच्छेद:** – प्रयोगे तु प्रयोगम् तु सूत्रधार: प्रयोजयेत् |
तत: च प्रविशेत् पात्रम् प्रयोगातिशय: हि स: || ३६ ||

**अन्वय:** – प्रयोगे तु सूत्रधार: प्रयोगम् प्रयोजयेत् तत: च पात्रम् प्रविशेत् स: हि प्रयोगातिशय: |

**अर्थ** – प्रयोग सुरु असताना जेव्हा सूत्रधार दुसऱ्या पात्राचा अभिनय करतो आणि त्याप्रमाणे त्याला अनुसरून जेव्हा त्या विशिष्ट पात्राचा प्रवेश होतो तेव्हा त्यास 'प्रयोगातिशय' असे म्हणतात .

❖ प्रवृत्तक ❖

**कालप्रवृत्तिमाश्रित्य वर्णना या प्रयुज्यते |**
**तदाश्रयाच्च पात्रस्य प्रवेशस्तत्प्रवृत्तकम् || ३७ ||**

**पदच्छेद:** – कालप्रवृत्तिम् आश्रित्य वर्णना या प्रयुज्यते |
तत्-आश्रयात् च पात्रस्य प्रवेश: तत् प्रवृत्तकम् || ३७ ||

**अन्वय:** – कालप्रवृत्तिम् आश्रित्य या वर्णना प्रयुज्यते तत्-आश्रयात् पात्रस्य प्रवेश: (भवति चेत्) तत् प्रवृत्तकम् |
(तत् कालप्रवृत्त्या स्वार्थोक्तत्वात् प्रवृत्तकम् | - अ . भा . )

**अर्थ** – विशिष्ट वेळेनुसार प्रवृत्तीचे वर्णन करून त्यानुसार पात्राचा प्रवेश होत असेल तर त्यास 'प्रवृत्तक' असे म्हणावे .

**एषामन्यतमं श्लिष्टं योजयित्वार्थयुक्तिभि: |**
**तस्मादङ्गद्वयस्यापि सम्भवो न निवार्यते || ३८ ||**

**पदच्छेद:** – एषाम् अन्यतमम् श्लिष्टम् योजयित्वा अर्थयुक्तिभि: |
तस्मात् अङ्गद्वयस्य अपि सम्भव: न निवार्यते || ३८ ||

**अन्वय :** – एषाम् अन्यतमम् श्लिष्टम् अर्थयुक्तिभि : योजयित्वा तस्मात् अङ्गद्वयस्य अपि सम्भव : न निवार्यते |

**अर्थ** – यांपेक्षा अतिशय वेगळे जे द्व्यर्थी संभाषण आहे ते अर्थाशी जोडून त्यापासून दोन विभाग होत असतील तर त्यास विरोध करू नये .

**पात्रग्रन्थैरसंबाधं प्रकुर्यादामुखं तत: |**
**एवमेतद्बुधैर्ज्ञेयमामुखं विविधाश्रयम् || ३९ ||**

**पदच्छेद :** – पात्रग्रन्थै : असंबाधम् प्रकुर्यात् आमुखम् तत : |
एवम् एतत् बुधै : ज्ञेयम् आमुखम् विविध–आश्रयम् || ३९ ||

**अन्वय :** – तत : पात्रग्रन्थै : असंबाधम् आमुखम् प्रकुर्यात् | एवम् एतत् विविध–आश्रयम् आमुखम् बुधै : ज्ञेयम् |
(पात्रग्रन्थैरसम्बाधमिति यत्र न भूयांसि पात्राणि अल्पपात्रेऽपि ग्रन्थबहुलत्वं तथारूपम् आमुखं कुर्यात् | - अ . भा . )

**अर्थ** – तसेच अनेक पात्रांचा वापर न करताही कमी पात्रांद्वारे आमुख करता येते . अशाप्रकारे विविध गोष्टींचा आश्रय असलेले हे 'आमुख' विद्वानांनी समजून घ्यावे .

**लक्षणं पूर्वमुक्तं तु वीथ्या: प्रहसनस्य च |**
**इत्यष्टार्धविकल्पा वृत्तिरियं भारती मयाभिहिता |**
**सात्त्वत्यास्तु विधानं लक्षणयुक्त्या प्रवक्ष्यामि || ४० ||**

**पदच्छेद :** – लक्षणम् पूर्वम् उक्तम् तु वीथ्या : प्रहसनस्य च |
इति अष्टार्धविकल्पा वृत्ति : इयम् भारती मया अभिहिता |
सात्त्वत्या : तु विधानम् लक्षणयुक्त्या प्रवक्ष्यामि || ४० ||

**अन्वय :** – वीथ्या : प्रहसनस्य च लक्षणम् तु पूर्वम् उक्तम् | इति अष्टार्धविकल्पा इयम् भारती वृत्ति : मया अभिहिता | सात्त्वत्या : तु लक्षणयुक्त्या विधानम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – वीथी आणि प्रहसनाची लक्षणे मी पूर्वी सांगितली आहेत . याप्रमाणे चार विकल्प

असलेली ही भारतीवृत्ती मी तुम्हांला सांगितली आहे. आता सात्त्वती वृत्तीची लक्षणे सांगीन.

**❖ सात्त्वती वृत्तीची लक्षणे ❖**

**या सात्त्वतेनेह गुणेन युक्ता न्यायेन वृत्तेन समन्विता च |**
**हर्षोत्कटा संहृतशोकभावा सा सात्त्वती नाम भवेत्तु वृत्तिः || ४१ ||**

**पदच्छेद :-** या सात्त्वतेन इह गुणेन युक्ता न्यायेन वृत्तेन समन्विता च |
हर्ष-उत्कटा संहृत-शोक-भावा सा सात्त्वती नाम भवेत् तु वृत्तिः || ४१ ||

**अन्वय :-** या इह सात्त्वतेन गुणेन युक्ता, न्यायेन वृत्तेन समन्विता, हर्षोत्कटा, संहृतशोकभावा च सा तु सात्त्वती नाम वृत्तिः भवेत् |

**अर्थ -** जी वृत्ती सत्त्वगुणाने युक्त असते, सात्त्वत न्यायाने युक्त असते (नाट्यशास्त्र खंड पहिला १०.८१), उत्कट आनंदाने युक्त असते आणि शोकभावरहित असते तिला 'सात्त्वती वृत्ती' म्हणतात.

**वागङ्गाभिनयवती सत्त्वोत्थानवचनप्रकरणेषु | (आर्या)**
**सत्त्वाधिकारयुक्ता विज्ञेया सात्त्वती वृत्तिः || ४२ ||**

**पदच्छेद :-** वागङ्ग-अभिनयवती सत्त्व-उत्थान-वचन-प्रकरणेषु |
सत्त्व-अधिकार-युक्ता विज्ञेया सात्त्वती वृत्तिः || ४२ ||

**अन्वय :-** सत्त्वाधिकारयुक्ता वागङ्गाभिनयवती सात्त्वती वृत्तिः सत्त्वोत्थानवचनप्रकरणेषु विज्ञेया | (सत्त्वोत्थानस्य सत्त्वाधारस्य, वचनं येषु प्रकरणेषु काव्यखण्डेषु, तेषु वागङ्गाभिनययुक्तासती, सत्त्वस्य सात्त्विकाभिनयस्य अधिकारे आधिक्यक्रियया सात्त्वतीवृत्तिर्युक्ता भवति इति सम्बन्धः | - अ. भा.)

**अर्थ -** सात्त्विक अभिनयावर आधारित क्रियांचे जिथे आधिक्य असते, वाचिक आणि आंगिक अभिनय ज्यामध्ये प्रमुख असतो अशी ही सात्त्वतीवृत्ती जिथे सत्त्वावर आधारित विधान केले आहे अशा प्रकरणांमध्ये विशेषप्रकारे जाणून घ्यावी.

**वीराद्भुतरौद्ररसा निरस्तशृङ्गारकरुणनिर्वेदा | (आर्या)**
**उद्धतपुरुषप्राया परस्पराधर्षणकृता च || ४३ ||**

**पदच्छेद :-** वीर-अद्भुत-रौद्र-रसा निरस्त-शृङ्गार-करुण-निर्वेदा |
उद्धत-पुरुष-प्राया परस्पर-आधर्षण-कृता च || ४३ ||

**अन्वय : -** वीराद्भुतरौद्ररसा निरस्तशृङ्गारकरुणनिर्वेदा उद्धतपुरुषप्राया परस्पराधर्षणकृता च |
(आधर्षणं वाचा न्यक्कार : | - अ . भा . )

**अर्थ -** या वृत्तीमध्ये वीर, अद्भुत आणि रौद्र रस असतात . शृंगार, करुण आणि निर्वेद म्हणजेच शांत हे रस नसतात . उद्धत स्वभाव असलेले अनेक पुरुष असतात आणि ते एकमेकांचा वाणीद्वारे अपमान करणारे असतात .

**❖ सात्त्वती वृत्तीचे प्रकार ❖**

**उत्थापकश्च परिवर्तकश्च सँल्लापकश्च संघात्य : | (आर्या)**
**चत्वारोऽस्या भेदा विज्ञेया नाट्यतत्त्वज्ञै: || ४४ ||**

**पदच्छेद :-** उत्थापक : च परिवर्तक : च सँल्लापक : च संघात्य : |
चत्वार : अस्या : भेदा : विज्ञेया : नाट्यतत्त्वज्ञै : || ४४ ||

**अन्वय : -** नाट्यतत्त्वज्ञै: उत्थापक: परिवर्तक: सँल्लापक: संघात्य: च (इति) अस्या: चत्वार: भेदा : विज्ञेया : |

**अर्थ -** नाट्यतत्त्वज्ञांनी या वृत्तीचे चार प्रकार सांगितले आहेत - उत्थापक, परिवर्तक, संलापक आणि संघात्य .

**❖ उत्थापक ❖**

**अहमप्युत्थास्यामि त्वं तावद्दर्शयात्मन : शक्तिम् | (आर्या)**
**इति संघर्षसमुत्थस्तज्ज्ञैरुत्थापको ज्ञेय: || ४५ ||**

**पदच्छेद:** – अहम् अपि उत्थास्यामि त्वम् तावत् दर्शय आत्मन: शक्तिम्।
इति संघर्ष-समुत्थ: तज्ज्ञै: उत्थापक: ज्ञेय:॥४५॥

**अन्वय:** – "अहम् उत्थास्यामि तावत् त्वम् अपि आत्मन: शक्तिम् दर्शय" इति संघर्षसमुत्थ: तज्ज्ञै: उत्थापक: ज्ञेय:। (उत्थापयति यो मानस: परिस्पन्द: स तावत् उत्थापक:। - अ.भा.)

**अर्थ** – "मी युद्धासाठी उठीन पण तुम्ही आधी स्वत:ची ताकद तर दाखवा." याप्रमाणे संघर्षातून उत्पन्न होणाऱ्या आव्हानाला नाट्यविद्वानांनी 'उत्थापक' असे म्हटले आहे.

**❖ परिवर्तक ❖**

**उत्थानसमारब्धानर्थानुत्सृज्य योऽर्थयोगवशात्।(आर्या)**
**अन्यानर्थान् भजते स चापि परिवर्तको ज्ञेय:॥ ४६॥**

**पदच्छेद:** – उत्थान-समारब्धान् अर्थान् उत्सृज्य य: अर्थयोग-वशात्।
अन्यान् अर्थान् भजते स: च अपि परिवर्तक: ज्ञेय:॥४६॥

**अन्वय:** – उत्थानसमारब्धान् अर्थान् उत्सृज्य अर्थयोगवशात् य: अन्यान् च अर्थान् भजते स: अपि परिवर्तक: ज्ञेय:। (अस्त्रागारप्रवेशपरित्यागेन पाञ्चालीदर्शनात्मककार्यान्तरसम्पादको मानसो व्यापार: परिवर्तयति कार्यमिति, परिवर्तकवचनं तु उपचारारूढम्। - अ.भा.)

**अर्थ** – जेव्हा मूळ कार्याला सुरूवात केल्यानंतर ते सोडून विशिष्ट कार्यामुळे दुसरेच कार्य केले जाते, तेव्हा त्यास 'परिवर्तक' असे म्हणतात.

(जेव्हा शस्त्रागारामध्ये जाण्यासाठी प्रवृत्त झालेला भीम सहदेवाशी बोलत बोलत चुकून पांचालीच्या भवनामध्ये प्रवेश करतो, तेव्हा सहदेवाकडून त्याला कळते, की आपण पांचालीच्या भवनात आलो आहोत. अशावेळी विचार बदलून त्याक्षणी तो पांचालीला भेटण्याची इच्छा व्यक्त करतो. अशाप्रकारे शस्त्रागारामध्ये प्रवेश करायचे सोडून पांचालीला भेटण्याची मनातील इच्छा भीमाला मूळ कार्य करण्यापासून परावर्तित करते, म्हणूनच याच परिवर्तक असे म्हटले आहे.)

**निर्दिष्टवस्तुविषय: प्रपञ्चबद्धस्त्रिहास्यसंयुक्त:।(आर्या)**
**संघर्षविशेषकृतस्त्रिविध: परिवर्तको ज्ञेय: ॥४७॥**

**पदच्छेद :–** निर्दिष्ट-वस्तु-विषय : प्रपञ्च-बद्ध : त्रिहास्य-संयुक्त : |
संघर्ष-विशेष-कृत : त्रिविध : परिवर्तक : ज्ञेय : || ४७ ||

**अन्वय : –** निर्दिष्टवस्तुविषय :, प्रपञ्चबद्ध :, त्रिहास्यसंयुक्त : च त्रिविध : संघर्षविशेषकृत : परिवर्तक : ज्ञेय : |

**अर्थ –** विशेष मानसिक संघर्ष असलेला हा परिवर्तक तीन प्रकारचा असतो हे जाणून घ्यावे .
१. ज्यामध्ये दर्शविलेली एखादी गोष्ट हा विषय असतो .
२. प्रपंचाने बद्ध असतो .
३. तीन प्रकारच्या हास्यांनी युक्त असतो .

**❖ संलापक ❖**

**साधर्षजो निराधर्षजोऽपि वा रागवचनसंयुक्त : | (आर्या)**
**साधिक्षेपालापो ज्ञेय : सँल्लापक : सोऽपि || ४८ ||**

**पदच्छेद :–** साधर्षज : निराधर्षज : अपि वा राग-वचन-संयुक्त : |
साधिक्षेप-आलाप : ज्ञेय : सँल्लापक : स : अपि || ४८ ||

**अन्वय : –** साधर्षज : निराधर्षज : वा रागवचनसंयुक्त : साधिक्षेपालाप : स : 'सँल्लापक :' ज्ञेय : |

**अर्थ –** शाब्दिक अपमानाने निर्माण होणारा किंवा अपमान न करता निर्माण होणारा, भडकाऊ शब्द असणारा, अपमानास्पद वाक्यांचा प्रयोग असणारा सात्त्वतीवृत्तीचा तिसरा प्रकार म्हणजे संल्लापक . तो जाणून घ्यावा .

**धर्माधर्मसमुत्थं यत्र भवेद्रागदोषसंयुक्तम् | (आर्या)**
**साधिक्षेपं च वचो ज्ञेय : संलापको नाम || ४९ ||**

**पदच्छेद :–** धर्म-अधर्म-समुत्थम् यत्र भवेद् राग-दोष-संयुक्तम् |
साधिक्षेपम् च वच : ज्ञेय : संलापक : नाम || ४९ ||

**अन्वय : –** यत्र धर्माधर्मसमुत्थं रागदोषसंयुक्तम् साधिक्षेपं च वच : भवेत् (स :) संलापक : नाम ज्ञेय : |

**अर्थ –** धर्म आणि अधर्मातून उत्पन्न होणारे, राग आणि दोषांनी युक्त असणारे, अपमान करणारे बोल जेव्हा बोलले जातात तेव्हा त्यास 'संलापक' असे म्हणतात .

❖ संघात्यक ❖

**मन्त्रार्थवाक्यशक्त्या दैववशादात्मदोषयोगाद्वा | (आर्या)**
**संघातभेदजननस्तज्ज्ञैः संघात्यको ज्ञेयः ||५०||**

**पदच्छेद :–** मन्त्रार्थ-वाक्यशक्त्या दैववशात् आत्मदोष-योगात् वा |
संघात-भेदजनन : तज्ज्ञै : संघात्यक : ज्ञेय : ||५०||

**अन्वय : –** तज्ज्ञै: मन्त्रार्थवाक्यशक्त्या दैववशात् आत्मदोषयोगात् वा संघातभेदजनन: संघात्यक: ज्ञेय : |

(सङ्घातभेदजनन इति - सङ्घातस्य भेदं जनयति यो युधि स सङ्घात्यक :, सम्यक्घात्य: शत्रुवर्गो येन, सङ्घातभेदश्च परेण सामादि-उपायबलेन वा क्रियते | यथा भीम: युधिष्ठिरेण साम्ना भेदित :, अत : शिखण्डिनं पुरस्कृत्य योद्धव्यश्च | दैवात् संपद्यते, यथा द्रोणेन उक्तं सुते हते शस्त्रं त्यक्ष्यामीति | आत्मदोषे वा स्वकटकलक्षणेन, यथा कर्णेन सह कलहायमान : अश्वत्थामा शस्त्रत्यागं करोति इति | - अ . भा . )

**अर्थ –** जो मंत्रशक्ती अर्थशक्ती आणि वाक्यशक्तीद्वारे किंवा दैवाच्या प्राबल्यामुळे अथवा स्वत:च्याच दोषांमुळे शत्रूंच्या समूहात भेद निर्माण करतो त्याला 'संघात्यक' म्हणून ओळखावे .

(**वाक्यशक्ती -** जसे भीमाने युधिष्ठिराला वाक्चातुर्याने युद्धापासून परावृत्त केले आणि शिखंडीस पुढे करून त्याला युद्ध करण्यास सांगितले .

**दैवप्राबल्य -** जसे द्रोणाचार्यांनी सांगितले की मुलगा धारातीर्थी पडला तर मी शस्त्रत्याग करीन .

**स्वदोष -** कर्णासोबत भांडून अश्वत्थामाने शस्त्रत्याग केला . )

(यामध्ये सात्त्विकवृत्ती अधिक वर्चस्वी होते, म्हणूनच यास सात्त्वतीवृत्ती असे म्हणतात . )

❖ कूटसंघात्य ❖

**बहुकपटसंश्रयाणां परोपघाताशयप्रयुक्तानाम् | (आर्या)**
**कूटानां संघातो विज्ञेयः कूटसंघात्यः ||५१||**

**पदच्छेद :–** बहु-कपट-संश्रयाणाम् परोपघात-आशय-प्रयुक्तानाम् |
कूटानाम् संघात : विज्ञेय : कूटसंघात्य : || ५१ ||

**अन्वय : –** बहुकपटसंश्रयाणाम् परोपघाताशयप्रयुक्तानाम् कूटानाम् संघात : कूटसंघात्य : विज्ञेय : |

**अर्थ –** बऱ्याच कपट-कारस्थानांद्वारे होणाऱ्या आणि दुसऱ्याचा घात करणाऱ्या इच्छेने केल्या गेलेल्या फसव्या कृत्यांचा नाश करणे म्हणजे कूटसंघात्य होय, जे विद्वानांनी जाणून घ्यावे .

**इत्यष्टार्धविकल्पा वृत्तिरियं सात्त्वती मयाभिहिता | (आर्या)**
**कैशिक्यास्त्वथ लक्षणमत: परं संप्रवक्ष्यामि || ५२ ||**

**पदच्छेद :–** इति अष्टार्ध-विकल्पा वृत्ति : इयम् सात्त्वती मया अभिहिता |
कैशिक्या : तु अथ लक्षणम् अत : परम् संप्रवक्ष्यामि || ५२ ||

**अन्वय : –** इति इयम् अष्टार्धविकल्पा सात्त्वती वृत्ति : मया अभिहिता | अथ अत : परम् कैशिक्या : लक्षणम् संप्रवक्ष्यामि |

**अर्थ –** याप्रमाणे एकूण चार प्रकार असलेली सात्त्वती वृत्ती मी तुम्हाला सांगितली . आता यानंतर, कैशिकीवृत्तीची लक्षणे तुम्हांला सांगीन .

**❖ कैशिकी वृत्तीची लक्षणे ❖**

**या श्लक्ष्णनैपथ्यविशेषचित्रास्त्रीसंयुता या बहुनृत्तगीता |**
**कामोपभोगप्रभवोपचारा तां कैशिकीं वृत्तिमुदाहरन्ति || ५३ ||**

**पदच्छेद :–** या श्लक्ष्ण-नैपथ्य-विशेष-चित्रा स्त्रीसंयुता या बहु-नृत्त-गीता |
काम-उपभोग-प्रभव-उपचारा ताम् कैशिकीम् वृत्तिम् उदाहरन्ति || ५३ ||

**अन्वय : –** या श्लक्ष्णनैपथ्यविशेषचित्रा स्त्रीसंयुता या बहुनृत्तगीता कामोपभोगप्रभवोपचारा ताम् कैशिकीम् वृत्तिम् उदाहरन्ति |

**अर्थ –** जी सुकुमार आणि मनोहर वेशभूषेमुळे अतिशय सुंदर असते, स्त्रीपात्रांनी युक्त असते, ज्यामध्ये अनेक प्रकारचे नृत्त आणि गीते असतात, तसेच रतिक्रीडेमुळे निर्माण होणाऱ्या शृंगारास जिची साजेशी वर्तणूक असते तिला 'कैशिकी वृत्ति' असे म्हणतात .

**बहुवाद्यनृत्तगीता शृङ्गाराभिनयचित्रनैपथ्या |**
**माल्यालङ्कारयुता प्रशस्तवेषा च कान्ता च ||५४||**
**चित्रपदवाक्यबन्धैरलङ्कृता हसितरुदितरोषाद्यैः |**
**स्त्रीपुरुषकामयुक्ता विज्ञेया कैशिकीवृत्तिः ||५५||**

**पदच्छेदः** – बहु-वाद्य-नृत्त-गीता शृङ्गार-अभिनय-चित्र-नैपथ्या |
माल्य-अलङ्कार-युता प्रशस्त-वेषा च कान्ता च ||५४||
चित्रपद-वाक्यबन्धैः अलङ्कृता हसित-रुदित-रोष-आद्यैः |
स्त्रीपुरुष-कामयुक्ता विज्ञेया कैशिकीवृत्तिः ||५५||

**अन्वयः** – बहुवाद्यनृत्तगीता, शृङ्गाराभिनयचित्रनैपथ्या, माल्यालङ्कारयुता, प्रशस्तवेषा, कान्ता, चित्रपदवाक्यबन्धैः हसित-रुदितरोषाद्यैः अलङ्कृता, स्त्रीपुरुषकामयुक्ता च कैशिकीवृत्तिः विज्ञेया |

**अर्थ** – जिथे अनेक प्रकारची वाद्ये, नृत्त आणि गीते असतात, शृंगारमय अभिनयासाठी सुंदर वेशभूषा असते, हार आणि अलंकार परिधान केलेले असतात, सुंदर वस्त्र परिधान केलेले असतात, जी अत्यंत आकर्षक असते, मोहक शब्दांनी व वाक्यांनी अलंकृत असते आणि हास्य रुदन रोष इत्यादींनी सुशोभित असते आणि स्त्रीपुरुषांच्या कामक्रीडांनी युक्त असते अशी 'कैशिकी वृत्ति' विद्वानांनी जाणून घ्यावी.

### ❖ कैशिकी वृत्तीचे प्रकार ❖

**नर्म च नर्मस्फुञ्जो नर्मस्फोटोऽथ नर्मगर्भश्च |**
**कैशिक्याश्चत्वारो भेदा ह्येते समाख्याताः || ५६ ||**

**पदच्छेदः** – नर्म च नर्मस्फुञ्जः नर्मस्फोटः अथ नर्मगर्भः च |
कैशिक्याः चत्वारः भेदाः हि एते समाख्याताः ||५६||

**अन्वयः** – अथ नर्म च नर्मस्फुञ्जः नर्मस्फोटः नर्मगर्भः च एते कैशिक्याः चत्वारः भेदाः समाख्याताः |

**अर्थ** – यानंतर कैशिकीवृत्तीचे चार प्रकार सांगितले गेले आहेत - नर्म, नर्मस्फुंज, नर्मस्फोट आणि नर्मगर्भ.

❖ नर्म ❖

**आस्थापितशृङ्गारं विशुद्धकरणं निवृत्तवीररसम् | (आर्या)**
**हास्यप्रवचनबहुलं नर्म त्रिविधं विजानीयात् ||५७||**

**पदच्छेद :-** आस्थापित-शृङ्गारम् विशुद्ध-करणम् निवृत्त-वीर-रसम् |
हास्य-प्रवचन-बहुलम् नर्म त्रिविधम् विजानीयात् ||५७||

**अन्वय : -** आस्थापितशृङ्गारं निवृत्तवीररसं हास्यप्रवचनबहुलं इति त्रिविधं विशुद्धकरणं नर्म विजानीयात् | (हासप्रधानता च तदेति सामान्यलक्षणम् | - अ . भा . )

**अर्थ -** जिथे शृंगाररस प्रस्थापित असतो, जिथे वीररस नसतो, जिथे हास्यरस निर्माण होईल असे बोलणे पुष्कळ प्रमाणात असते, अशाप्रकारे विशुद्ध इंद्रिय असणारे नर्म तीन प्रकारचे असते . (नर्माचे सामान्य लक्षण म्हणजे यामध्ये हास्यरस प्रमुख असतो . - अ . भा . )

**ईर्ष्याक्रोधप्रायं सोपालम्भकरणानुविद्धं च | (आर्या)**
**आत्मोपक्षेपकृतं सविप्रलम्भं स्मृतं नर्म || ५८ ||**

**पदच्छेद :-** ईर्ष्या-क्रोध-प्रायम् सोपालम्भ-करण-अनुविद्धम् च |
आत्म-उपक्षेप-कृतम् सविप्रलम्भम् स्मृतम् नर्म ||५८||

**अन्वय : -** ईर्ष्याक्रोधप्रायम् सोपालम्भकरणानुविद्धम् आत्मोपक्षेपकृतम् सविप्रलम्भम् च नर्म स्मृतम् |

**अर्थ -** बहुधा यामध्ये ईर्ष्या आणि क्रोध दर्शविले जाते, दोष दर्शविण्यासाठी इंद्रिये तयार असतात, दुसऱ्याच्या हृदयाला आकर्षित केले जाते असे कैशिकी वृत्तीचे नर्म हे विप्रलंभ शृंगारामध्ये वापरले जाते .

❖ नर्मस्फुंज ❖

**नवसङ्गमसम्भोगो रतिसमुदयवेषवाक्यसंयुक्त: | (आर्या)**
**ज्ञेयो नर्मस्फुञ्जो ह्यवसानभयात्मकश्चैव || ५९ ||**

**पदच्छेद :-** नव-सङ्गम-सम्भोग : रति-समुदय-वेष-वाक्य-संयुक्त : |
ज्ञेय : नर्मस्फुञ्ज : हि अवसान-भयात्मक : च एव ||५९||

**अन्वय : -** नवसङ्गमसम्भोग: रतिसमुदयवेषवाक्यसंयुक्त: अवसानभयात्मक: च एव नर्मस्फुञ्ज: हि ज्ञेय: |

(अवसाने भयं पूर्वनायिकाकृतम् | यथा रत्नावल्याम् उदयनस्य सागरिकायाश्च नर्मण: स्फुञ्जो विघ्न: इत्यर्थ: | - अ.भा.)

**अर्थ** – नवीन भेटीतच संभोग होणार असेल, रतिक्रीडेला उत्पन्न करणारी वेषभूषा आणि मोहक वाक्य असतील आणि आधीची नायिका येईल म्हणून शेवटी भीती उत्पन्न करीत असेल तर त्यास 'नर्मस्फुंज' समजावे. (जसे - रत्नावली नाटकामध्ये उदयन राजा आणि सागरिका यांच्या नर्मभेटीत स्फुंज म्हणजे विघ्न निर्माण होते. - अ.भा.)

**❖ नर्मस्फोट ❖**

**विविधानां भावानां लवैर्लवैर्भूषितो बहुविशेषै: | (आर्या)**
**असमग्राक्षिप्तरसो नर्मस्फोटस्तु विज्ञेय: ||६०||**

**पदच्छेद:** – विविधानाम् भावानाम् लवै: लवै: भूषित: बहुविशेषै: |
असमग्र-आक्षिप्तरस: नर्मस्फोट: तु विज्ञेय: ||६०||

**अन्वय:** – विविधानाम् भावानाम् बहुविशेषै: लवै: लवै: भूषित: असमग्राक्षिप्तरस: तु नर्मस्फोट: विज्ञेय: | (विविधा: भावा: भयहासहर्षत्रासरोषाद्या: लवैर्लवैरित्यत एव भयादीनामंशेन भावात् स्थायित्वानुपगमात् भयानकहास्यरौद्रादिरसतापत्तिर्न सम्भवति | - अ.भा.)

**अर्थ** – जेव्हा भय, हास, हर्ष, त्रास, रोष इत्यादी विविध भाव अनेक विशिष्ट लहान लहान गुणांनी शोभून दिसतात तसेच अंशत: रसांनी जे प्रभावित असते त्याला 'नर्मस्फोट' असे जाणावे. (शृंगाराच्या वेळी अनेक भाव व्यक्त होत असतात. जसे काही ठिकाणी हास्याचा किंवा रागाचा लवलेश पाहावयास मिळतो. तिथे पूर्णपणे हास्य रस वा रौद्र रस नसतो.)

**❖ नर्मगर्भ ❖**

**विज्ञानरूपशोभाधनादिभिर्नायको गुणैर्यत्र | (आर्या)**
**प्रच्छन्नं व्यवहरते कार्यवशान्नर्मगर्भोऽसौ ||६१||**

**पदच्छेद:** – विज्ञानरूप-शोभाधन-आदिभि: नायक: गुणै: यत्र |
प्रच्छन्नम् व्यवहरते कार्यवशात् नर्मगर्भ: असौ ||६१||

**अन्वय:** – यत्र नायक: विज्ञानरूपशोभाधनादिभि: गुणै: कार्यवशात् प्रच्छन्नम् व्यवहरते असौ नर्मगर्भ: (विज्ञेय:) |

**अर्थ** – जेव्हा नायक काही विशिष्ट कारणांमुळे विज्ञान, रूप, शोभा, धन इत्यादी गुणांनी गुप्त व्यवहार करतो तेव्हा त्यास 'नर्मगर्भ' असे म्हणतात .

**पूर्वस्थितौ विपद्येत नायको यत्र चापरस्तिष्ठेत् | (आर्या)**
**तमपीह नर्मगर्भं विद्यान्नाट्यप्रयोगेषु || ६२ ||**

**पदच्छेद :** – पूर्वस्थितौ विपद्येत नायक : यत्र च अपर : तिष्ठेत् |
तम् अपि इह नर्मगर्भम् विद्यात् नाट्यप्रयोगेषु || ६२ ||

**अन्वय :** – यत्र पूर्वस्थितौ नायक : विपद्येत अपर : च तिष्ठेत् तम् अपि इह नाट्यप्रयोगेषु नर्मगर्भम् इति विद्यात् |

**अर्थ** – जिथे आधीच्या स्थितीमध्ये नायक निघून जातो आणि त्याच्या जागेवर दुसरा नायक येतो तेव्हा नाट्यप्रयोगामध्ये त्याला 'नर्मगर्भ' असे म्हणावे .

**इत्यष्टार्धविकल्पा वृत्तिरियं कैशिकी मयाभिहिता | (आर्या)**
**अत ऊर्ध्वमुद्धतरसामारभटीं संप्रवक्ष्यामि || ६३ ||**

**पदच्छेद :** – इति अष्टार्ध-विकल्पा वृत्ति : इयम् कैशिकी मया अभिहिता |
अत : ऊर्ध्वम् उद्धतरसाम् आरभटीम् संप्रवक्ष्यामि || ६३ ||

**अन्वय :** – इति अष्टार्धविकल्पा इयम् कैशिकी वृत्ति : मया अभिहिता | अत : ऊर्ध्वम् उद्धतरसाम् आरभटीं संप्रवक्ष्यामि | (उद्धतेति दीप्तरसा : रौद्रादय : उद्धता : | - अ . भा . )

**अर्थ** – अशाप्रकारे चार प्रकार असलेली ही कैशिकी वृत्ती मी तुम्हाला सांगितली . आता यानंतर रौद्रादी रस असलेल्या आरभटी वृत्तीची लक्षणे सांगीन .

### ❖ आरभटी वृत्तीची लक्षणे ❖

**आरभटप्रायगुणा तथैव बहुकपटवञ्चनोपेता |**
**दम्भानृतवचनवती त्वारभटी नाम विज्ञेया || ६४ ||**

**पदच्छेद :** – आरभट-प्रायगुणा तथा एव बहुकपट-वञ्चन-उपेता |
दम्भ-अनृत-वचनवती तु आरभटी नाम विज्ञेया || ६४ ||

**अन्वय :** – आरभटप्रायगुणा, बहुकपटवञ्चनोपेता दम्भानृतवचनवती तु आरभटी नाम विज्ञेया |

**अर्थ** – आरभट म्हणजे उद्धट पुरुषांचे जे क्रोध आवेग इत्यादी गुण असतात त्यांचे अधिक प्रमाण असलेली, अनेक कपटांद्वारे फसवणूक करणारी, दांभिक आणि असत्य बोलणारी अशी ही 'आरभटी वृत्ती' असते .

**पुस्तावपातप्लुतलङ्घितानि-च्छेद्यानि मायाकृतमिन्द्रजालम् |**
**चित्राणि युद्धानि च यत्र नित्यं तां तादृशीमारभटीं वदन्ति || ६५ ||**

**पदच्छेद :** – पुस्त-अवपात-प्लुत-लङ्घितानि छेद्यानि मायाकृतम् इन्द्रजालम् |
चित्राणि युद्धानि च यत्र नित्यं तां तादृशीम् आरभटीं वदन्ति || ६५ ||

**अन्वय :** – यत्र नित्यं पुस्तावपातप्लुतलङ्घितानि छेद्यानि मायाकृतम् इन्द्रजालम् चित्राणि युद्धानि च (सन्ति) तां तादृशीम् आरभटीं वदन्ति |

**अर्थ** – पुस्त (लाकूड इत्यादींनी तयार केलेले आहार्य - साहित्य) इत्यादींना खाली फेकणे, हवेत उडवणे आणि ओलांडणे, मायावी जादूटोणा आणि आश्चर्यकारक युद्ध ज्या वृत्तीमध्ये असतात त्या वृत्तीस 'आरभटी' असे म्हणतात .

**षाड्गुण्यसमारब्धा हठातिसन्धानविद्रवोपेता | (आर्या)**
**लाभालाभार्थकृता विज्ञेया वृत्तिरारभटी || ६६ ||**

**पदच्छेद :** – षाड्गुण्य-समारब्धा हठ-अतिसन्धान-विद्रव-उपेता |
लाभ-अलाभार्थ-कृता विज्ञेया वृत्ति : आरभटी || ६६ ||

**अन्वय :** – षाड्गुण्यसमारब्धा हठातिसन्धानविद्रवोपेता लाभालाभार्थकृता वृत्ति : आरभटी विज्ञेया |

**अर्थ** – साम दान दंड भेद क्रोध आवेग या सहा गुणांनी सुरू होणारी, हट्ट लबाडी आणि विद्रव यांनी युक्त असलेली, फायदा आणि नुकसान यांसाठी केली जाणारी ही आरभटी वृत्ती असते, हे विद्वानांनी जाणावे .

**❖ आरभटी वृत्तीचे प्रकार ❖**

**संक्षिप्तकावपातौ वस्तूत्थापनमथापि संफेट : | (आर्या)**
**एते ह्यस्या भेदा लक्षणमेषां प्रवक्ष्यामि || ६७ ||**

**पदच्छेद :–** संक्षिप्तक-अवपातौ वस्तु-उत्थापनम् अथ अपि संफेट : |
एते हि अस्या : भेदा : लक्षणम् एषाम् प्रवक्ष्यामि || ६७ ||

**अन्वय : –** अथ संक्षिप्तकावपातौ वस्तूत्थापनम् अपि संफेट : एते हि अस्या : भेदा : (सन्ति) | एषाम् लक्षणम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** संक्षिप्तक, अवपात, वस्तूत्थापन आणि संफेट हे आरभटी वृत्तीचे चार प्रकार आहेत. आता यांची लक्षणे मी सांगीन.

❖ **संक्षिप्तक** ❖

**अन्वर्थशिल्पयुक्तो बहुपुस्तोत्थानचित्रनेपथ्य : | (आर्या)**
**संक्षिप्तवस्तुविषयो ज्ञेय: संक्षिप्तको नाम || ६८ ||**

**पदच्छेद :–** अन्वर्थ-शिल्पयुक्त : बहुपुस्त-उत्थान-चित्र-नेपथ्य : |
संक्षिप्त-वस्तुविषय : ज्ञेय : संक्षिप्तक : नाम || ६८ ||

**अन्वय : –** अन्वर्थशिल्पयुक्त: बहुपुस्तोत्थानचित्रनेपथ्य: संक्षिप्तवस्तुविषय: संक्षिप्तक: नाम ज्ञेय : |
(पुस्तस्य उत्थानं प्रकटत्वं विचित्रं च नेपथ्यं खड्गचर्मवर्मादि यत्र पुस्तयोगे | - अ. भा.)

**अर्थ –** जिथे अर्थानुरूप शिल्पांद्वारे, अनेक लाकूड इत्यादींद्वारे तयार केलेले पुस्त म्हणजे साहित्य उचलणे (उदाहरणार्थ - खड्ग, चर्म, कवच इत्यादी) आणि त्याचवेळी चित्रविचित्र नेपथ्याद्वारे विषयवस्तु थोडक्यात दाखवणे म्हणजे 'संक्षिप्तक' होय.

❖ **अवपात** ❖

**भयहर्षसमुत्थानं विद्रवविनिपातसंभ्रमाचरणम् | (आर्या)**
**क्षिप्रप्रवेशनिर्गममवपातमिमं विजानीयात् || ६९ ||**

**पदच्छेद :–** भय-हर्ष-समुत्थानम् विद्रव-विनिपात-संभ्रम-आचरणम् |
क्षिप्र-प्रवेश-निर्गमम् अवपातम् इमम् विजानीयात् || ६९ ||

**अन्वय : –** भयहर्षसमुत्थानम् विद्रवविनिपातसंभ्रमाचरणम् क्षिप्रप्रवेशनिर्गमम् इमम् अवपातम् विजानीयात् |

**अर्थ** – जेव्हा भय आणि हर्ष निर्माण झाल्यामुळे धावपळ, धडपडणे आणि संभ्रम होऊन पात्रांचा घाईघाईने प्रवेश आणि निर्गमन होते तेव्हा त्याला 'अवपात' असे म्हणतात .

**❖ वस्तूत्थापन ❖**

**सर्वरससमासकृतं सविद्रवाविद्रवाश्रयं वापि | (आर्या)**
**नाट्यं विभाव्यते यत्तद्वस्तूत्थापनं ज्ञेयम् || ७० ||**

**पदच्छेद :–** सर्वरस-समासकृतम् सविद्रव-अविद्रव-आश्रयम् वा अपि |
नाट्यम् विभाव्यते यत् तत् वस्तूत्थापनम् ज्ञेयम् || ७० ||

**अन्वय :** – यत् नाट्यम् सर्वरससमासकृतम् अपि वा सविद्रवाविद्रवाश्रयम् विभाव्यते तत् वस्तूत्थापनम् ज्ञेयम् |

**अर्थ** – जिथे सर्व रसांचे थोडेसे मिश्रण असते, कधी धावपळ तर कधी शांतता असते तेव्हा त्यास 'वस्तूत्थापन' असे म्हणावे .

**❖ संफेट ❖**

**संरम्भसंप्रयुक्तो बहुयुद्धनियुद्धकपटनिर्भेद : | (आर्या)**
**शस्त्रप्रहारबहुल : सम्फेटो नाम विज्ञेय : || ७१ ||**

**पदच्छेद :–** संरम्भ-संप्रयुक्त : बहुयुद्ध-नियुद्ध-कपट-निर्भेद : |
शस्त्रप्रहार-बहुल : सम्फेट : नाम विज्ञेय : || ७१ ||

**अन्वय :** – संरम्भसंप्रयुक्त : बहुयुद्धनियुद्धकपटनिर्भेद : शस्त्रप्रहारबहुल : सम्फेट : नाम विज्ञेय : |
(यथा रावणजटायुयुद्धम् . - अ . भा . )

**अर्थ** – जिथे उत्साह असतो, अनेक प्रकारचे युद्ध आणि बाहुयुद्ध असते, कपटामुळे विभाजन होते, अनेक प्रकारे शस्त्रांनी प्रहार केला जातो त्यास 'संफेट' असे जाणावे .

**एवमेता बुधैर्ज्ञेया वृत्तयो नाट्यसंश्रया : |**
**रसप्रयोगमासां च कीर्त्यमानं निबोधत || ७२ ||**

**पदच्छेद :–** एवम् एता : बुधै : ज्ञेया : वृत्तय : नाट्यसंश्रया : |
रसप्रयोगम् आसाम् च कीर्त्यमानम् निबोधत || ७२ ||

**अन्वय : –** एवम् एता: नाट्यसंश्रया: वृत्तय: बुधै: ज्ञेया: | आसाम् च कीर्त्यमानम् रसप्रयोगम् निबोधत |

**अर्थ –** याप्रमाणे नाट्याश्रित अशा या चार वृत्ती विद्वानांनी समजून घ्याव्यात . आता वृत्तीला योग्य असा रसप्रयोग मी सांगतो, तो जाणून घ्या .

**❖ वृत्तीनुसार रसांचा प्रयोग ❖**

**हास्यशृङ्गारबहुला कैशिकी परिचक्षिता |**
**सात्त्वती चापि विज्ञेया वीराद्भुतशमाश्रया || ७३ ||**
**रौद्रे भयानके चैव विज्ञेयारभटी बुधै: |**
**बीभत्से करुणे चैव भारती संप्रकीर्तिता || ७४ ||**

**पदच्छेद :–** हास्य-शृङ्गार-बहुला कैशिकी परिचक्षिता |
सात्त्वती च अपि विज्ञेया वीर-अद्भुत-शम-आश्रया || ७३ ||
रौद्रे भयानके च एव विज्ञेया आरभटी बुधै : |
बीभत्से करुणे च एव भारती संप्रकीर्तिता || ७४ ||

**अन्वय : –** हास्यशृङ्गारबहुला कैशिकी परिचक्षिता | अपि च वीराद्भुतशमाश्रया सात्त्वती विज्ञेया | रौद्रे भयानके बुधै : आरभटी विज्ञेया | बीभत्से एव च करुणे भारती संप्रकीर्तिता |

**अर्थ –** शृंगार आणि हास्यरस असेल तेव्हा बहुतेक कैशिकी वृत्ती सांगितली जाते . वीर, रौद्र आणि अद्भुत रस असेल तर सात्त्वती वृत्ती योजावी . रौद्र आणि भयानक रसामध्ये आरभटी वृत्ती जाणावी आणि बीभत्स व करुण रसामध्ये प्राधान्याने भारती वृत्ती सांगितली गेली आहे .

**न ह्येकरसजं काव्यं किंचिदस्ति प्रयोगत: |**
**भावो वापि रसो वापि प्रवृत्तिर्वृत्तिरेव वा || ७५ ||**

**पदच्छेद :–** न हि एकरसजम् काव्यम् किंचित् अस्ति प्रयोगत : |
भाव : वा अपि रस : वा अपि प्रवृत्ति : वृत्ति : एव वा || ७५ ||

**अन्वय:** – किंचित् हि काव्यम् एकरसजम् न अस्ति | प्रयोगत: भाव: अपि वा रस: अपि वा प्रवृत्ति: वृत्ति: एव वा (सन्ति) |

**अर्थ** – कोणतेही काव्य केवळ एकाच रसाला निर्माण करणारे नसते. प्रयोगाप्रमाणे त्यात वेगवेगळे भावही असतात आणि रस देखील असतात. तसेच प्रवृत्ती आणि वृत्ती यांचाही समावेश असतो.

**सर्वेषां समवेतानां यस्य रूपं भवेद्बहु |**
**स मन्तव्यो रस: स्थायी शेष: सञ्चारिण: स्मृता: || ७६ ||**

**पदच्छेद:** – सर्वेषाम् समवेतानाम् यस्य रूपम् भवेत् बहु |
स मन्तव्य: रस: स्थायी शेष: सञ्चारिण: स्मृता: || ७६ ||

**अन्वय:** – सर्वेषाम् समवेतानाम् यस्य बहु रूपम् भवेत् स स्थायी रस: मन्तव्य: | शेष: सञ्चारिण: स्मृता: |

**अर्थ** – सर्व समाविष्ट भावांमध्ये जो अधिक प्रमाणात असतो त्याला स्थायी रस समजले पाहिजे व शेष भावांना संचारी म्हटले आहे.

**वृत्त्यन्त एषोऽभिनयो मयोक्तो वागङ्गसत्त्वप्रभवो यथावत् |**
**आहार्यमिवाभिनयं प्रयोगे वक्ष्यामि नेपथ्यकृतं तु भूय: || ७७ ||**

**पदच्छेद:** – वृत्त्यन्त: एष: अभिनय: मया उक्त: वागङ्ग-सत्त्वप्रभव: यथावत् |
आहार्यम् एव अभिनयम् प्रयोगे वक्ष्यामि नेपथ्यकृतम् तु भूय: || ७७ ||

**अन्वय:** – वागङ्गसत्त्वप्रभव: वृत्त्यन्त: एष: अभिनय: यथावत् मया उक्त: | नेपथ्यकृतम् तु आहार्यम् अभिनयम् एव प्रयोगे भूय: वक्ष्यामि |

**अर्थ** – वाचिक, आंगिक आणि सात्त्विक भावांनी निर्माण होणारा, अभिनय जो वृत्तींवर आधारित असतो तो जसा आहे तसा मी सांगितला. नेपथ्यानुसार जो आहार्य अभिनय आहे तो प्रयोगाच्या वेळी विस्तृतपणे सांगीन.

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे वृत्तिविकल्पनं नाम विंश: अध्याय: ||**

**|| अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील 'वृत्तिविकल्पन' नावाचा विसावा अध्याय संपला ||**

# एकविसावा अध्याय

# आहार्य अभिनय



# एकविसावा अध्याय

## आहार्य अभिनय

❖ आहार्य अभिनय ❖

**आहार्याभिनयं विप्रा व्याख्यास्याम्यनुपूर्वशः |**
**यस्मात्प्रयोगः सर्वोऽयमाहार्याभिनये स्थितः || १ ||**

**पदच्छेदः** – आहार्य-अभिनयम् विप्राः व्याख्यास्यामि अनुपूर्वशः |
यस्मात् प्रयोगः सर्वः अयम् आहार्य-अभिनये स्थितः || १ ||

**अन्वयः** – विप्राः, आहार्य-अभिनयम् अनुपूर्वशः व्याख्यास्यामि, यस्मात् अयम् सर्वः प्रयोगः आहार्य-अभिनये स्थितः |

**अर्थ** – हे ब्राह्मणांनो, आता मी क्रमशः आहार्य अभिनयाविषयी सांगणार आहे, कारण संपूर्ण प्रयोग हा आहार्य अभिनयावर आधारित असतो .

**नानावस्थाः प्रकृतयः पूर्वं नेपथ्यसाधिताः |**
**अङ्गादिभिरभिव्यक्तिमुपगच्छन्त्ययत्नतः || २ ||**

**पदच्छेदः** – नाना-अवस्थाः प्रकृतयः पूर्वम् नेपथ्य-साधिताः |
अङ्ग-आदिभिः अभिव्यक्तिम् उपगच्छन्ति अयत्नतः || २ ||

**अन्वयः** – पूर्वम् नेपथ्यसाधिताः नानावस्थाः प्रकृतयः अङ्गादिभिः अयत्नतः अभिव्यक्तिम् उपगच्छन्ति |

**अर्थ** – आधी सांगितलेल्या नेपथ्य विधानाप्रमाणे सजवलेल्या पात्रांच्या विविध अवस्था आणि प्रकृती या विशेष प्रयत्न न करता अंगादींद्वारे सहज अभिव्यक्त होतात .
(म्हणजेच आहार्य अभिनयाद्वारे पाहताक्षणी प्रयोगातील पात्र सहजपणे समजते . )

**आहार्याभिनयो नाम ज्ञेयो नेपथ्यजो विधिः |**
**तत्र कार्यः प्रयत्नस्तु नाट्यस्य शुभमिच्छता || ३ ||**

**पदच्छेदः** – आहार्य-अभिनयः नाम ज्ञेयः नेपथ्यजः विधिः |
तत्र कार्यः प्रयत्नः तु नाट्यस्य शुभम् इच्छता || ३ ||

**अन्वय:** – आहार्याभिनय: नाम नेपथ्यज: विधि: इति ज्ञेय: | नाट्यस्य शुभम् इच्छता तत्र तु प्रयत्न: कार्य: |

**अर्थ** – आहार्य अभिनय म्हणजे नेपथ्यातून निर्माण झालेला विधी, असे समजावे. नाट्याचे कल्याण इच्छिणाऱ्याने प्रयत्नपूर्वक आहार्य अभिनयाचा वापर करावा.

**तस्मिन्यत्नस्तु कर्तव्यो नेपथ्ये सिद्धिमिच्छता |**
**नाट्यस्येह त्वलङ्कारो नैपथ्ये यत्प्रकीर्तितम् || ४ ||**

**पदच्छेद:** – तस्मिन् यत्न: तु कर्तव्य: नेपथ्ये सिद्धिम् इच्छता |
नाट्यस्य इह तु अलङ्कार: नेपथ्यम् यत् प्रकीर्तितम् || ४ ||

**अन्वय:** – तस्मिन् सिद्धिम् इच्छता नेपथ्ये तु यत्न: कर्तव्य: | इह यत् नेपथ्यम् प्रकीर्तितम् (तत्) तु नाट्यस्य अलङ्कार: |

**अर्थ** – नाटकामध्ये यश मिळण्याची इच्छा बाळगणाऱ्यांनी आहार्य अभिनयावर विशेष भर द्यावा. इथे नेपथ्यामध्ये जे सांगितले आहे ते तर नाट्याचे अलंकार आहेत.

**❖ नेपथ्याचे चार प्रकार ❖**

**चतुर्विधं तु नेपथ्यं पुस्तोऽलङ्कार एव च |**
**तथाङ्गरचना चैव ज्ञेयं सज्जीवमेव च || ५ ||**

**पदच्छेद:** – चतुर्विधम् तु नेपथ्यम् पुस्त: अलङ्कार: एव च |
तथा अङ्गरचना च एव ज्ञेयम् सज्जीवम् एव च || ५ ||

**अन्वय:** – पुस्त: अलङ्कार: अङ्गरचना सज्जीवम् च (इति) चतुर्विधम् नेपथ्यम् ज्ञेयम् |

**अर्थ** – पुस्त, अलंकार, अंगरचना आणि सज्जीव हे नेपथ्याचे चार प्रकार जाणून घ्यावे.

**❖ पुस्त ❖**

**शैलयानविमानानि चर्मवर्मध्वजा नगा: |**
**ये क्रियन्ते हि नाट्ये तु स पुस्त इति संज्ञित: || ६ ||**

(गायकवाड ओरिएण्टल सीरीज मध्ये हा नववा श्लोक असला तरी विषयाच्या दृष्टीने तो याठिकाणी योग्य वाटतो .)

**पदच्छेद:** – शैल-यान-विमानानि चर्म-वर्म-ध्वजा : नगा : |
ये क्रियन्ते हि नाट्ये तु स : पुस्त : इति संज्ञित : || ६ ||

**अन्वय:** – नाट्ये हि ये शैलयानविमानानि चर्मवर्मध्वजा : नगा : क्रियन्ते स : तु पुस्त : इति संज्ञित : |

**अर्थ** – नाटकामध्ये जे डोंगर, वाहन, विमान, तसेच चामड्याच्या वस्तू, कवच, ध्वज आणि हत्ती इत्यादी सूचित करण्यासाठी ज्या वस्तू रंगमंचावर उभ्या केल्या जातात त्याला 'पुस्त' अशी संज्ञा दिली जाते .

**❖ पुस्ताचे तीन प्रकार ❖**

**पुस्तस्तु त्रिविधो ज्ञेयो नानारूपप्रमाणत: |**
**सन्धिमो व्याजिमश्चैव वेष्टिमश्च प्रकीर्तित: || ७ ||**

**पदच्छेद:** – पुस्त : तु त्रिविध : ज्ञेय : नानारूप-प्रमाणत : |
सन्धिम : व्याजिम : च एव वेष्टिम : च प्रकीर्तित : || ७ ||

**अन्वय:** – नानारूप-प्रमाणत : तु त्रिविध : पुस्त : ज्ञेय : | सन्धिम : व्याजिम : वेष्टिम : च प्रकीर्तित : |

**अर्थ** – विविध रूप आणि मोजमापानुसार पुस्त हे तीन प्रकारचे असते, हे जाणून घ्यावे . संधिम, व्याजिम आणि वेष्टिम हे तीन प्रकार म्हटले जातात .

**❖ संधिम ❖**

**किलिञ्जचर्मवस्त्राद्यैर्यद्रूपं क्रियते बुधै: |**
**सन्धिमो नाम विज्ञेय: पुस्तो नाटकसंश्रय: || ८ ||**

**पदच्छेद:** – किलिञ्ज-चर्म-वस्त्र-आद्यै : यत् रूपम् क्रियते बुधै : |
सन्धिम : नाम विज्ञेय : पुस्त : नाटकसंश्रय : || ८ ||

**अन्वय:** – किलिञ्जचर्मवस्त्राद्यै : यत् रूपम् क्रियते (तत्) सन्धिम : नाम नाटकसंश्रय : पुस्त : बुधै : विज्ञेय : | (किलिञ्जं भूर्ज वेणुदलादि | - अ . भा .)

**अर्थ** – भूर्जपत्र किंवा बांबूची पाने, चामडे, वस्त्र इत्यादींचा वापर करून जी सजावट केली जाते, त्यास 'संधिम' नावाचे पुस्तनेपथ्य म्हणतात. नाटकात वापरले जाणारे हे पुस्तनेपथ्य विद्वानांनी जाणून घ्यावे.

**❖ व्याजिम आणि वेष्टिम ❖**

**व्याजिमो नाम विज्ञेयो यन्त्रेण क्रियते तु यः |**
**वेष्ट्यते चैव यद्रूपं वेष्टिमः स तु संज्ञितः || ९ ||**

**पदच्छेद:–** व्याजिमः नाम विज्ञेयः यन्त्रेण क्रियते तु यः |
वेष्ट्यते च एव यत् रूपम् वेष्टिमः सः तु संज्ञितः || ९ ||

**अन्वय: –** यः यन्त्रेण क्रियते (सः) तु व्याजिमः नाम पुस्तः विज्ञेयः | यत् रूपम् वेष्ट्यते सः तु वेष्टिमः पुस्तः (इति) संज्ञितः |

**अर्थ** – जी सजावट यंत्राने केली जाते त्याला 'व्याजिमपुस्त' असे म्हणतात. जी सजावट वेशभूषा इत्यादींद्वारे केली जाते त्याला 'वेष्टिमपुस्त' असे म्हणतात.

**अलङ्कारस्तु विज्ञेयो माल्याभरणवाससाम् |**
**नानाविधः समायोगोऽप्यङ्गोपाङ्गविधिः स्मृतः || १० ||**

**पदच्छेद:–** अलङ्कारः तु विज्ञेयः माल्य-आभरण-वाससाम् |
नानाविधः समायोगः अपि अङ्ग-उपाङ्ग-विधिः स्मृतः || १० ||

**अन्वय: –** माल्याभरणवाससाम् नानाविधः समायोगः अलङ्कारः विज्ञेयः | तस्य अङ्गोपाङ्गविधिः अपि स्मृतः |

**अर्थ** – फुलांच्या माळा, दागिने आणि रेशमी वस्त्रे यांचा अनेक प्रकारे वापर करणे त्याला 'अलंकार' असे समजावे. अंग आणि उपांग यांनुसार त्याचा विधीदेखील सांगितला जातो.

**❖ माळांचे प्रकार ❖**

**वेष्टिमं विततं चैव संघात्यं ग्रन्थिमं तथा |**
**प्रालम्बितं तथा चैव माल्यं पञ्चविधं स्मृतम् || ११ ||**

**पदच्छेद :-** वेष्टिम् विततम् च एव संघात्यम् ग्रन्थिमम् तथा |
प्रालम्बितम् तथा च एव माल्यम् पञ्चविधम् स्मृतम् || ११ ||

**अन्वय :-** वेष्टिमम् विततम् संघात्यम् ग्रन्थिमम् प्रालम्बितम् च इति पञ्चविधम् माल्यम् स्मृतम् |
(वेष्टिमं तृणवेष्टनया निर्मितं बहुमालावेष्टनकृतं वा | विततम् इति आवेष्टित-अन्योन्यश्लिष्टमालासमूहात्मकं वस्त्रधारणभयेन उम्भितं वा। संघात्यं वृत्तं वा आस्यच्छिद्रान्त: प्रक्षिप्तसूत्रं बहुपुष्पगुच्छोम्भितं वा | ग्रन्थिमं ग्रन्थिभि: उम्भितं वा | प्रालम्बितमिति जालादिपर्यन्तव्याप्तिकम् | - अ . भा . )

**अर्थ –** वेष्टिम, वितन, संघात्य, ग्रंथिम आणि प्रालंबित अशा पाच प्रकारच्या माळा सांगितल्या जातात .

(वेष्टिम माळ ती असते जी गवताला पिळून बनवली जाते अथवा अनेक माळा गुंडाळून बनवली जाते . वितत माळ ती असते जी अनेक माळा एकमेकांमध्ये गुंफून बनवली जाते किंवा वस्त्र परिधान करायचे नसेल तेव्हा लज्जाभयाने संपूर्ण शरीरावर वस्त्राप्रमाणे धारण केली जाते . संघात्य माळ ती असते जी मुखविवरामध्ये धाग्याचे एक टोक ठेवून अनेक फुलांचे गुच्छ त्यात माळले जातात . ग्रन्थिम माळ ती असते ज्यामध्ये अनेक गाठी असतात . प्रालंवित माळ ती असते जी जाळ्याप्रमाणे व्यापलेली असते . - अ . भा . )

**❖ अलंकारांचे प्रकार ❖**

**चतुर्विधं तु विज्ञेयं नाट्ये ह्याभरणं बुधै: |**
**आवेध्यं बन्धनीयं च क्षेप्यमारोप्यमेव च || १२ ||**

**पदच्छेद :-** चतुर्विधम् तु विज्ञेयम् नाट्ये हि आभरणम् बुधै: |
आवेध्यम् बन्धनीयम् च क्षेप्यम् आरोप्यम् एव च || १२ ||

**अन्वयः –** बुधैः तु नाट्ये हि आवेध्यम् बन्धनीयम् क्षेप्यम् आरोप्यम् च इति चतुर्विधम् आभरणम् विज्ञेयम्|

**अर्थ –** नाट्यविद्वानांनी नाटकामध्ये आवेध्य, बंधनीय, क्षेप्य आणि आरोप्य असे अलंकारांचे चार प्रकार समजून घ्यावेत .

**आवेध्यं कुण्डलादीह यत्स्याच्छ्रवणभूषणम् |**
**आरोप्यं हेमसूत्रादि हाराश्च विविधाश्रयाः || १३ ||**

**पदच्छेदः –** आवेध्यम् कुण्डल-आदि इह यत् स्यात् श्रवण-भूषणम् |
आरोप्यम् हेमसूत्र-आदि हाराः च विविध-आश्रयाः || १३ ||

**अन्वयः –** इह यत् कुण्डलादि श्रवणभूषणम् तत् आवेध्यम् स्यात् | विविधाश्रयाः हेमसूत्रादि हाराः च आरोप्यम् स्यात् |

**अर्थ –** याठिकाणी कुंडल इत्यादी जे कर्णभूषण असते त्यांना 'आवेध्य' म्हणतात . विविध प्रकारच्या आश्रय वस्तू (धातू) मधून उत्पन्न झालेले सोन्याच्या धाग्यात गुंफलेले असे हार इत्यादींना 'आरोप्य' समजावे .

**श्रोणीसूत्राङ्गदे मुक्ताबन्धनीयानि सर्वदा |**
**प्रक्षेप्यं नूपुरं विद्याद्वस्त्राभरणमेव च || १४ ||**

**पदच्छेदः –** श्रोणी-सूत्र-अङ्गदे मुक्ता-बन्धनीयानि सर्वदा |
प्रक्षेप्यम् नूपुरम् विद्यात् वस्त्र-आभरणम् एव च || १४ ||

**अन्वयः –** श्रोणीसूत्राङ्गदे सर्वदा मुक्ताबन्धनीयानि | नूपुरम् एव च वस्त्राभरणम् प्रक्षेप्यम् विद्यात् |

**अर्थ –** श्रोणीसूत्र म्हणजे मेखला किंवा कंबरपट्टा आणि केयूर म्हणजे बाजूबंध इत्यादी शरीरावर धारण केले जाणारे दागिने हे 'बंधनीय' आहेत आणि घुंगरू तसेच वस्त्राभूषणे ही 'प्रक्षेप्य' म्हटली जातात .

**भूषणानां विकल्पं हि पुरुषस्त्रीसमाश्रयम् |**
**नानाविधं प्रवक्ष्यामि देशजातिसमुद्भवम् || १५ ||**

**पदच्छेद :–** भूषणानाम् विकल्पम् हि पुरुष-स्त्री-समाश्रयम् |
नानाविधम् प्रवक्ष्यामि देश-जाति-समुद्भवम् || १५ ||

**अन्वय : –** भूषणानाम् हि पुरुषस्त्रीसमाश्रयम् देशजातिसमुद्भवम् नानाविधम् विकल्पम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** पुरुष आणि स्त्री यांच्या आधाराने, देश आणि जातीतून उत्पन्न होणारे, विविध प्रकारच्या अलंकारांचे जे विकल्प शरीरावर धारण केले जातात, ते मी आता सांगणार आहे.

**❖ शिरोभूषणे आणि कर्णभूषणे ❖**

**चूडामणिः समकुटः शिरसो भूषणं स्मृतम् |**
**कुण्डलं मोचकं कीला कर्णाभरणमिष्यते || १६ ||**

**पदच्छेद :–** चूडामणिः समकुटः शिरसः भूषणम् स्मृतम् |
कुण्डलम् मोचकम् कीला कर्णाभरणम् इष्यते || १६ ||

**अन्वय : –** समकुटः चूडामणिः शिरसः भूषणम् स्मृतम् | कुण्डलम् मोचकम् कीला कर्णाभरणम् इष्यते | (चूडामणिः शिरोमध्ये | मकुटो ललाटोर्ध्वे | कुण्डलम् अधरपाल्याम् | मोचकं कर्ण शष्कुल्या मध्यच्छिद्रे कृतम्, कीला ऊर्ध्वच्छिद्रे उत्तरकर्णिका इति प्रसिद्धा - अ. भा.)

**अर्थ –** मुकुट आणि चूडामणि हे मस्तकाचे आभूषण म्हणून सांगितले आहे. कुंडल, मोचक आणि कर्णिका (वाली) ही कानांची आभूषणे सांगितली आहेत.
(चूडामणि मस्तकाच्या मध्यभागी असतो. मुकुट कपाळावर असतो. कुंडल कानाच्या खालच्या पाळीवर असते. मोचक हे कर्णवक्राच्या मध्यभागी छिद्र करून घातले जाते. कीला हे कर्णवक्राच्या वरच्या बाजूला छिद्र करून घातले जाते. कीला हा अलंकार उत्तरकर्णिका या नावाने प्रसिद्ध आहे. - अ. भा.)

**❖ कंठभूषणे आणि अंगुलिभूषणे ❖**

**मुक्तावली हर्षकं च सूत्रकं कण्ठभूषणम् |**
**वेतिकाङ्गुलिमुद्रा च स्यादङ्गुलिविभूषणम् || १७ ||**

**पदच्छेद :–** मुक्तावली हर्षकम् च सूत्रकम् कण्ठ-भूषणम् |
वेतिका अङ्गुलि-मुद्रा च स्यात् अङ्गुलि-विभूषणम् || १७ ||
(हर्षकमिति समुद्गकं सर्पादिरूपतया प्रसिद्धम् | सूत्रकमिति गुच्छग्रीवासूत्रादितया प्रसिद्धम् | वेतिका इति सूक्ष्मकटकरूपा अङ्गुलिमुद्रा पक्षिपद्म-आदि-आकारेण-उपेता | - अ . भा . )

**अन्वय :–** मुक्तावली हर्षकम् सूत्रकम् च कण्ठभूषणम् (स्यात्) | वेतिका अङ्गुलिमुद्रा च अङ्गुलिविभूषणम् स्यात् |

**अर्थ –** मोत्यांचा हार, सर्पाकार दागिने, साखळी ही गळ्याची भूषणे आहेत . वेतिका व अंगठी हे बोटांचे अलंकार आहेत .

(हर्षक म्हणजे सर्प इत्यादी आकाराप्रमाणे असलेला दागिना जो विशेष अशा अलंकारपेटीत ठेवतात . सोन्याच्या गुच्छांनी बनवलेले ग्रीवासूत्र म्हणजे सूत्रक अर्थात साखळी, जी गळ्यामध्ये घातली जाते . वेतिका म्हणजे सूक्ष्मपणे कोरलेले कटक (Bracelet on Finger) आणि बोटामध्ये जी घालतो ती अंगठी, जिच्यावर पक्षी कमळ इत्यादी आकार असतात . - अ . भा . )

### ❖ बाहुनालीभूषणे आणि मणिबंधभूषणे ❖

**हस्तली वलयं चैव बाहुनालीविभूषणम् |**
**रूचकश्चूलिका कार्या मणिबन्धविभूषणम् || १८ ||**

**पदच्छेद :–** हस्तली वलयम् च एव बाहुनाली-विभूषणम् |
रूचक : चूलिका कार्या मणिबन्ध-विभूषणम् || १८ ||
(रूचक इति करगोलके वितत: तत ऊर्ध्वे चूलिका इति प्रसिद्धो निकुञ्चक: अग्रबाहुस्थाने एतत् मणिबन्धविभूषणम् | - अ . भा . )

**अन्वय :–** हस्तली एव च वलयम् बाहुनालीविभूषणम् (स्यात्) | रूचक : चूलिका मणिबन्धविभूषणम् कार्या |

**अर्थ –** हस्तली आणि वलय हे बाहुनालीची (Forearm) आभूषणे आहेत . रूचक (bracelet) व चूलिका ही मनगटाची आभूषणे आहेत .

(रूचक म्हणजे हाताच्या मनगटावर बांधला जाणारा लवचिक अलंकार. त्याच्या वरच्या बाजूला जो अलंकार असतो ती चूलिका. बाहुच्या वरच्या बाजूला असणारा निकुंचक अलंकार तर प्रसिद्ध आहेच. हे आहेत मनगटावरील अलंकार. - अ.भा.)

**❖ कूर्पुरभूषणे आणि वक्षोभूषणे ❖**

**केयूरे अङ्गदे चैव कूर्परोपरिभूषणे |**
**त्रिसरश्चैव हारश्च तथा वक्षोविभूषणम् || १९ ||**

**पदच्छेद:-** केयूरे अङ्गदे च एव कूर्पर-उपरि-भूषणे |
त्रिसर: च एव हार: च तथा वक्ष:-विभूषणम् || १९ ||

**अन्वय: -** केयूरे अङ्गदे च कूर्परोपरिभूषणे | त्रिसर: तथा च हार: वक्षोविभूषणम् |
(केयुर: कूर्परस्योर्ध्वत:, तयोरुर्ध्वे तु अङ्गदे | त्रिसर: मुक्तालयात्रयेण | - अ.भा.)

**अर्थ -** केयूर आणि अंगद हे कोपराच्या वरच्या भागाचे म्हणजे दंडाचे अलंकार आहेत. त्रिसर आणि हार हे वक्ष:स्थलाचे अलंकार आहेत. (केयूर हे कोपराच्या वरच्या ठिकाणी, त्याच्याही वर अङ्गद असतात. मोत्यांच्या माळेच्या तीन रांगा एकत्र असतील तर त्या हारास त्रिसर असे म्हटले जाते. - अ.भा.)

**❖ कटिभूषणे ❖**

**व्यालम्बमौक्तिको हारो माला चैवाङ्गभूषणम् |**
**तलकं सूत्रकं चैव भवेत्कटिविभूषणम् || २० ||**

**पदच्छेद:-** व्यालम्बमौक्तिक: हार: माला च एव अङ्गभूषणम् |
तलकम् सूत्रकम् च एव भवेत् कटिविभूषणम् || २० ||
(तलकं नाभे: अध:, तस्यापि अध: सूत्रकम् | - अ.भा.)

**अन्वय: -** व्यालम्बमौक्तिक: हार: माला च अङ्गभूषणम् | तलकम् सूत्रकम् च कटिविभूषणम् भवेत् |

**अर्थ -** लोंबणारा मोत्यांचा हार व फुलांच्या माळा हे शरीराचे आभूषण आहेत. तलक आणि सूत्रक हे कंबरेवरचे अलंकार आहेत.

(नाभीच्या खाली लटकणारे जे आभूषण ते तलक होय आणि त्याच्याही खाली असणारे आभूषण सूत्रक होय. - अ. भा.)

**अयं पुरुषनिर्योग: कार्यस्त्वाभरणाश्रय: |**
**देवानां पार्थिवानां च पुनर्वक्ष्यामि योषिताम् || २१ ||**

**पदच्छेद: -** अयम् पुरुष-निर्योग: कार्य: तु आभरण-आश्रय: |
देवानाम् पार्थिवानाम् च पुन: वक्ष्यामि योषिताम् || २१ ||

**अन्वय: -** अयम् आभरणाश्रय: पुरुषनिर्योग: तु कार्य: | पुन: देवानाम् पार्थिवानाम् योषिताम् च वक्ष्यामि |

(पुरुषनिर्योग: औचित्यमस्य | आभरणाश्रय: आभरणविधिरित्यर्थ: |- अ. भा.)

**अर्थ -** दागिन्यांविषयीचे हे जे काही नियम मी सांगितले, ते पुरुषांसाठीही वापरावेत. आता देवतांसाठी, राजांसाठी आणि स्त्रियांच्या अलंकारांविषयी मी सांगेन.

(पुरुषांसाठी असणारा आभरणविधी हा त्यांच्या व्यवसायानुसार ठरतो. - अ. भा.)

**❖ शिरोभूषणे ❖**

**शिखापाशं शिखाव्याल: पिण्डीपत्रं तथैव च |**
**चूडामणिर्मकरिका मुक्ताजालगवाक्षिकम् || २२ ||**
**शिरसो भूषणं चैव विचित्रं शीर्षजोलकम् |**

**पदच्छेद: -** शिखापाशम् शिखाव्याल: पिण्डीपत्रम् तथा एव च |
चूडामणि: मकरिका मुक्ताजाल-गवाक्षिकम् || २२ ||
शिरस: भूषणम् च एव विचित्रम् शीर्षजालकम् |

**अन्वय: -** शिखापाशम् शिखाव्याल: पिण्डीपत्रम् चूडामणि: मकरिका मुक्ताजालगवाक्षिकम् विचित्रम् शीर्षजालकम् शिरस: भूषणम् |

(शिखाव्याल: नाग: ग्रन्थिभि: उपनिबद्धो मध्ये कर्णिकास्थानीय:, तस्यैव दलसन्धानतया चित्ररचनानि वर्तुलानि पत्राणि पिण्डीपत्राणि | चूडामणि: शिरोमध्ये, ततो

मकरपत्रं मकरिका, ततो ललाटान्तमुक्ताजालिका तोरणं जालिकादिरूपेण प्रसिद्धा | सर्पस्यैव वा शिरस: एकमेव सुवर्णमुक्तामणिचित्रितम् | - अ . भा . )

**अर्थ** – शिखापाश, शिखाव्याल, पिंडीपत्र, चूडामणि, मकरिका, मुक्ताजल, गवाक्ष, विशिष्ट पद्धतीने बनविलेले मस्तकावरील जालरूपी असणारा अलंकार इत्यादी सर्व शिरोभूषणे आहेत .

(शिखाव्याल म्हणजे सर्पाच्या आकार असलेला गाठींनी गुंफलेला दागिना जो कर्णिकास्थानी असतो . त्याच नागाच्या फण्यासह डोक्याच्या मध्यभागी गोलाकार पाने ठेवणे म्हणजे पिंडीपत्र होय . चूडामणि डोक्याच्या मध्यभागी असतो . त्यानंतर मकरिका म्हणजे मकरपत्र नावाचा दागिना . त्यानंतर ललाटान्त प्रदेशापासून मोत्यांचा तोरणरूपी जो अलंकार त्याला मुक्ताजाल असे म्हणतात किंवा सर्पाच्या मस्तकाप्रमाणे असणारा एकच सुवर्णनिर्मित आणि मोत्यांनी जडलेला अलंकार म्हणजे मुक्ताजाल . - अ . भा . )
( शिखापाश म्हणजे केसांना बांधून ठेवणारे आभूषण . )

**कण्डकं शिखिपत्रं च वेणीपुच्छ: सदोरक: || २३ ||**
**ललाटतिलकं चैव नानाशिल्पप्रयोजितम् |**
**भ्रूगुच्छोपरिगुच्छश्च कुसुमानुकृतिस्तथा ||२४||**

**पदच्छेद: –** कण्डकम् शिखिपत्रम् च वेणी-पुच्छ: सदोरक: || २३ ||
ललाट-तिलकम् च एव नाना-शिल्प-प्रयोजितम् |
भ्रूगुच्छोपरिगुच्छ: च कुसुम-अनुकृति: तथा || २४ ||

**अन्वय: –** कण्डकम् शिखिपत्रम् वेणीपुच्छ: सदोरक: ललाटतिलकम् च नानाशिल्पप्रयोजितम् | भ्रूगुच्छोपरिगुच्छ: कुसुमानुकृति: |
(शिखिपत्रं मयूरपिच्छाकारो विचित्रवर्णमणिरचित: कर्णावतंसक: | - अ . भा . )

**अर्थ** – कुंडल, शिखिपत्र, वेणीपुच्छ, दोरक आणि ललाटतिलक हे अलंकार विविध शिल्पांमध्ये दिसतात . भुवयांच्या वर फुलांच्या गुच्छासमान असलेला अलंकार म्हणजे गुच्छक . (शिखिपत्र नावाचा कानावर घालायचा अलंकार हा मोरपिसासमान विविध रंगांच्या मण्यांनी बनविलेला असतो . - अ . भा . )

### ❖ कर्णभूषणे ❖

**कर्णिका कर्णवलयं तथा स्यात्पत्रकर्णिका |**
**कुण्डलं कर्णमुद्रा च कर्णोत्कीलकमेव च || २५ ||**
**नानारत्नविचित्राणि दन्तपत्राणि चैव हि |**
**कर्णयोर्भूषणं ह्येतत्कर्णपूरस्तथैव च || २६ ||**

**पदच्छेद :–** कर्णिका कर्णवलयम् तथा स्यात् पत्रकर्णिका |
कुण्डलम् कर्णमुद्रा च कर्ण-उत्कीलकम् एव च || २५ ||
नानारत्न-विचित्राणि दन्तपत्राणि च एव हि |
कर्णयो : भूषणम् हि एतत् कर्णपूर : तथा एव च || २६ ||

**अन्वय : –** कर्णिका कर्णवलयम् पत्रकर्णिका कुण्डलम् कर्णमुद्रा कर्णोत्कीलकम् नानारत्नविचित्राणि दन्तपत्राणि कर्णपूर : एतत् कर्णयो : भूषणम् हि स्यात् |
(कर्णिका इत्यादिना विकल्पत: कर्णाभरणानि अपि स्थानान्तरभेदात् समुच्चयेन इति आहु: | - अ . भा . )

**अर्थ –** कर्णिका, कर्णवलय, पत्रकर्णिका, कुंडल, कर्णमुद्रा, कर्णोत्कीलक, विविध प्रकारची रत्ने, दंतपत्रे आणि कर्णपूरक ही कानांची आभूषणे आहेत .
(कर्णिका इत्यादी कर्णालंकार विकल्पाने विविध स्थानांच्या भेदानुसार एकत्र इथे सांगितले आहेत . - अ . भा . )

### ❖ कपोलभूषणे आणि वक्षभूषणे ❖

**तिलका: पत्रलेखाश्च भवेद्गण्डविभूषणम् |**
**त्रिवणी चैव विज्ञेयं भवेद्वक्षोविभूषणम् || २७ ||**

**पदच्छेद :–** तिलका : पत्रलेखा : च भवेत् गण्डविभूषणम् |
त्रिवणी च एव विज्ञेयम् भवेत् वक्षो-विभूषणम् || २७ ||

**अन्वय : –** तिलका: पत्रलेखा: च गण्डविभूषणम् भवेत् | त्रिवणी वक्षोविभूषणम् भवेत् (इति) विज्ञेयम् |

**अर्थ** – तिलक आणि पत्रलेखा ही गालाची आभूषणे आहेत. त्रिवणी हे वक्षस्थलावरील आभूषण आहे असे जाणावे.

**❖ दंतभूषणे आणि ओष्ठभूषणे ❖**

**नेत्रयोरञ्जनं ज्ञेयमधरस्य च रञ्जनम् |**
**दन्तानां विविधो रागश्चतुर्णां शुक्लतापि वा || २८ ||**

**पदच्छेद:** – नेत्रयो: अञ्जनम् ज्ञेयम् अधरस्य च रञ्जनम् |
दन्तानाम् विविध: राग: चतुर्णाम् शुक्लता अपि वा || २८ ||

**अन्वय:** – नेत्रयो: अञ्जनम् अधरस्य च रञ्जनम् ज्ञेयम् | चतुर्णाम् दन्तानाम् विविध: राग: अपि वा शुक्लता (इति ज्ञेयम्) |

**अर्थ** – डोळ्यांचा अलंकार काजळ आणि ओठांचा अलंकार लाली होय. समोरच्या चार दातांना रंगविणे किंवा पांढरेशुभ्र करणे हा दातांचा अलंकार होय.

**रागान्तरविकल्पोऽथ शोभनेनाधिकोज्ज्वल: |**
**मुग्धानां सुन्दरीणां च मुक्ताभासितशोभना: || २९ ||**
**सुरक्ता वापि दन्ता: स्यु: पद्मपल्लवरञ्जना: |**
**अश्मरागोद्योतित: स्यादधर: पल्लवप्रभ: || ३० ||**
**विलासश्च भवेत्तासां सविभ्रान्तनिरीक्षितम् |**

**पदच्छेद:** – रागान्तर-विकल्प: अथ शोभनेन अधिक-उज्ज्वल: |
मुग्धानाम् सुन्दरीणाम् च मुक्ता-भासित-शोभना: || २९ ||
सुरक्ता: वा अपि दन्ता: स्यु: पद्म-पल्लव-रञ्जना: |
अश्मराग-उद्द्योतित: स्यात् अधर: पल्लवप्रभ: || ३० ||
विलास: च भवेत् तासाम् सविभ्रान्त-निरीक्षितम् |
(सविभ्रान्तनिरीक्षितं यत् स्मितं तत् भवेत् अतीव हृद्यं संपाद्यते इति तावत् | - अ. भा.)

**अन्वय:** – अथ रागान्तरविकल्प: शोभनेन अधिकोज्ज्वल: मुग्धानाम् सुन्दरीणाम् च

मुक्ताभासितशोभना: दन्ता: पद्मपल्लवरञ्जना: सुरक्ता: स्यु: | अश्मरागोद्योतित: अधर: पल्लवप्रभ: स्यात् | तासां विलास: च सविभ्रान्तनिरीक्षितम् भवेत् |

**अर्थ** – इतर रंगांचा विकल्प वापरला किंवा अधिक उजळ रंग वापरला तर मुग्ध झालेल्या सुंदरींचे मोत्यांप्रमाणे चमकणारे दात कमलपत्राप्रमाणे गुलावी होतात. तसेच अश्मराग म्हणजे रंगीत असा अतिशय नरम दगड, तो जर हळूवारपणे ओठांना लावला तर ओठ (अधर) हे नवीन पालवीप्रमाणे गुलावी होतात. (थोडक्यात, दात आणि ओठ हे एकाच रंगाचे म्हणजे गुलावी होतात.) अशा त्या स्त्रियांच्या शृंगारिक क्रिया व दृष्टिक्षेप फारच आकर्षक असतात.

(सविभ्रान्त निरीक्षित म्हणजे स्मित हास्य करीत अत्यंत रमणीयपणे पाहणे जे अतिशय आकर्षक असते. - अ. भा.)

### ❖ कंठभूषणे ❖

**मुक्तावली व्यालपङ्क्तिर्मञ्जरी रत्नमालिका || ३१ ||**
**रत्नावली सूत्रकं च ज्ञेयं कण्ठविभूषणम् |**

**पदच्छेद:** – मुक्तावली व्यालपङ्क्ति: मञ्जरी रत्नमालिका || ३१ ||
रत्नावली सूत्रकम् च ज्ञेयम् कण्ठ-विभूषणम् |

**अन्वय:** – मुक्तावली व्यालपङ्क्ति: मञ्जरी रत्नमालिका रत्नावली सूत्रकम् च कण्ठविभूषणम् ज्ञेयम् |

**अर्थ** – मुक्तावली, व्यालपंक्ति, मंजरी, रत्नमालिका, रत्नावली आणि सूत्रक हे कंठभूषण समजावे.

### ❖ कंठभूषणे आणि दंडभूषणे ❖

**द्विसरस्त्रिसरश्चैव चतुस्सरकमेव च || ३२ ||**
**तथा भृङ्खलिका चैव भवेत्कण्ठविभूषणम् |**
**अङ्गदं वलयं चैव बाहुमूलविभूषणम् || ३३ ||**

**पदच्छेद :–** द्विसर : त्रिसर : च एव चतुस्सरकम् एवच || ३२ ||
तथा भृङ्खलिका च एव भवेत् कण्ठ-विभूषणम् |
अङ्गदम् वलयम् च एव बाहुमूल-विभूषणम् || ३३ ||

**अन्वय : –** द्विसर : त्रिसर : चतुस्सरकम् तथा भृङ्खलिका कण्ठविभूषणं भवेत् | अङ्गदम् वलयम् च बाहुमूलविभूषणम् (भवेत्) |

**अर्थ –** दोन, तीन आणि चार पदरी साखळी हा गळ्यातील अलंकार आहे . अंगद आणि वलय हे बाहुच्या मुळाशी म्हणजे दंडावर घालण्याचे दागिने आहेत .

### ❖ वक्षोभूषणे आणि स्तनभूषणे ❖

**नानाशिल्पकृताश्चैव हारा वक्षोविभूषणम् |**
**मणिजालावनद्धं च भवेत् स्तनविभूषणम् || ३४ ||**

**पदच्छेद :–** नाना-शिल्प-कृता : च एव हारा : वक्षो-विभूषणम् |
मणिजाल-अवनद्धम् च भवेत् स्तन-विभूषणम् || ३४ ||

**अन्वय : –** नानाशिल्पकृता : हारा : वक्षोविभूषणम् मणिजालावनद्धम् च स्तनविभूषणम् भवेत् |

**अर्थ –** विविध कोरीव काम केलेल्या माळा हे वक्ष:स्थळाचे भूषण आहे आणि अनेक मण्यांचे जाळे असलेला अलंकार हे स्तनांचे भूषण आहे .

### ❖ बाहुनालीभूषणे आणि अंगुलिभूषणे ❖

**खर्जूरकं सोच्छितिकं बाहुनालीविभूणम् |**
**कलापी कटकं शङ्खो हस्तपत्रं सपूरकम् |**
**मुद्राङ्गुलीयकं चैव ह्यङ्गुलीनां विभूषणम् || ३५ ||**

**पदच्छेद :–** खर्जूरकम् सोच्छितिकम् बाहुनाली-विभूणम् |
कलापी कटकम् शङ्ख : हस्तपत्रम् सपूरकम् |
मुद्राङ्गुलीयकम् च एव हि अङ्गुलीनाम् विभूषणम् || ३५ ||

**अन्वय : –** सोच्छितिकं खर्जूरकम् बाहुनालीविभूषणम् (स्यात्) | कलापी कटकम् शङ्ख : हस्तपत्रम् सपूरकम् मुद्राङ्गुलीयकम् अङ्गुलीनाम् हि विभूषणम् (स्यात्) |

**अर्थ** – बाहुनालीवर (कोपर ते मनगट या हाताच्या भागावर) उच्छितिक आणि खर्जूरक नावाचे अलंकार घातले जातात. कलापी, कटक, शंख, हस्तपत्र, पूरक आणि अंगठी हे बोटांचे दागिने आहेत.

### ❖ कटिभूषणे ❖

**मुक्ताजालाढ्यतलकं मेखला काञ्चिकापि वा |**
**रशना च कलापश्च भवेच्छ्रोणीविभूषणम् || ३६ ||**

**पदच्छेद:** – मुक्ता-जालाढ्य-तलकम् मेखला काञ्चिका अपि वा |
रशना च कलाप: च भवेत् श्रोणी-विभूषणम् || ३६ ||

**अन्वय:** – मुक्ताजालाढ्यतलकम् मेखला काञ्चिका रशना कलाप: च श्रोणीविभूषणम् भवेत् |

**अर्थ** – मोत्यांच्या जाळ्यांनी बनवलेले तलक, मेखला, कांचिका, रशना आणि कलाप ही कमरेची आभूषणे आहेत.

### ❖ कटिभूषणांचे मोजमाप ❖

**एकयष्टिर्भवेत्काञ्ची मेखला त्वष्टयष्टिका |**
**द्विरष्टयष्टी रशना कलाप: पञ्चविंशक: || ३७ ||**
**द्वात्रिंशच्च चतु:षष्टि: शतमष्टोत्तरं तथा |**
**मुक्ताहारा भवन्त्येते देवपार्थिवयोषिताम् || ३८ ||**

**पदच्छेद:** – एकयष्टि: भवेत् काञ्ची मेखला तु अष्टयष्टिका |
द्विरष्टयष्टी रशना कलाप: पञ्चविंशक: || ३७ ||
द्वात्रिंशत् च चतु:षष्टि: शतम् अष्टोत्तरम् तथा |
मुक्ताहारा: भवन्ति एते देवपार्थिवयोषिताम् || ३८ ||

**अन्वय:** – काञ्ची एकयष्टि:, मेखला अष्टयष्टिका, रशना द्विरष्टयष्टी, कलाप: पञ्चविंशक: भवेत् | तथा एते देवपार्थिव-योषिताम् मुक्ताहारा: द्वात्रिंशत् चतु: षष्टि: शतम् च अष्टोत्तरम् भवन्ति |

**अर्थ** – कांची एक पदरी असते, मेखला आठ पदरी असते, रशनेमध्ये सोळा पदर असतात तर कलाप ही पंचवीस पदरी असते . देव, राजे आणि महिलांसाठी बनविलेल्या हारामध्ये बत्तीस मोती, चौसष्ट मोती आणि एकशे आठ मोती असतात .

**❖ गूल्फभूषणे ❖**

**नूपुर: किङ्किणीकाश्च घण्टिका रत्नजालकम् |**
**सघोषे कटके चैव गुल्फोपरिविभूषणम् || ३९ ||**

**पदच्छेद:** – नूपुर : किङ्किणीका : च घण्टिका रत्नजालकम् |
सघोषे कटके च एव गुल्फोपरिविभूषणम् || ३९ ||

**अन्वय:** – नूपुर : किङ्किणीका : घण्टिका रत्नजालकम् एव च सघोषे कटके गुल्फोपरि-विभूषणम् |

**अर्थ** – नूपुर, किंकिणी, घंटिका, रत्नजालक आणि आवाज करणारे कटक हे गुल्फावर घालायचे दागिने आहेत .

**❖ पादभूषणे ❖**

**जङ्घयो: पादपत्रं स्यादङ्गुलीष्वङ्गुलीयकम् || ४० ||**
**अङ्गुष्ठतिलकाश्चैव पादयोश्च विभूषणम् |**
**तथालक्तकरागश्च नानाभक्तिविवेशित: || ४१ ||**

**पदच्छेद:** – जङ्घयो : पादपत्रम् स्यात् अङ्गुलीषु अङ्गुलीयकम् || ४० ||
अङ्गुष्ठ-तिलका : च एव पादयो : च विभूषणम् |
तथा अलक्तक-राग : च नानाभक्ति-विवेशित : || ४१ ||

**अन्वय:** – जङ्घयो: पादपत्रम् अङ्गुलीषु अङ्गुलीयकम् स्यात् | अङ्गुष्ठतिलका: नानाभक्तिविवेशित : अलक्तकराग : च पादयो : च विभूषणम् |

**अर्थ** – मांड्यांवर पादपत्र आणि बोटांमध्ये अंगठी असावी . पायाच्या अंगठ्यावर तिलक असणे, विविध प्रकारच्या आकारांचा आल्ता ही पायांची आभूषणे आहेत .

❖ आभूषणांविषयीचे नियम ❖

**अशोकपल्लवच्छाय: स्यात् स्वाभाविक एव च |**
**एतद्विभूषणं नार्या आकेशादानखादपि || ४२ ||**

**पदच्छेद:–** असोक-पल्लव-छाय: स्यात् स्वाभाविक: एव च |
एतत् विभूषणम् नार्या: आकेशात् आनखात् अपि || ४२ ||

**अन्वय: –** अशोकपल्लवच्छाय: स्वाभाविक: एव स्यात् | नार्या: आकेशात् आनखात् अपि एतत् विभूषणम् |
(आकेशादिति शिखापाश, शिखाव्याल इत्यत: प्रभृति इति अर्थ: | आनखादिति अलक्तकरागपर्यन्तमिति यावत् | - अ. भा.)

**अर्थ –** अशोकवृक्षाच्या नवपालवीची चमक जशी स्वाभाविक असते तशी कांति असलेला हा आल्ता स्वाभाविकपणे लालचटक असतो. नारीच्या केसांपासून (शिखापाश, शिखाव्याल यांपासून) नखांपर्यंत (पायांचा आल्ता) यांविषयीचे सर्व अलंकार सांगितले.

**यथाभावरसावस्थं विज्ञेयं द्विजसत्तमा: |**
**आगमश्च प्रमाणं च रूपनिर्वर्णनं तथा || ४३ ||**

**पदच्छेद:–** यथाभाव-रसावस्थम् विज्ञेयम् द्विजसत्तमा: |
आगम: च प्रमाणम् च रूप-निर्वर्णनम् तथा || ४३ ||

**अन्वय: –** द्विजसत्तमा:, आगम: प्रमाणम् तथा च रूपनिर्वर्णनम् यथाभावरसावस्थम् विज्ञेयम् |

**अर्थ –** हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो, आगम प्रमाण तसेच स्वरूपाप्रमाणे वर्णन हे भाव, रस आणि अवस्था यांनुसार समजावे.

**विश्वकर्ममतात्कार्य सुबुद्ध्यापि प्रयोक्तृभि: |**
**नहि शक्यं सुवर्णेन मुक्ताभिर्मणिभिस्तथा || ४४ ||**
**स्वाधीनमिति रूच्यैव कर्तुमङ्गस्य भूषणम् |**
**विभागतोऽभिप्रयुक्तमङ्गशोभाकरं भवेत् || ४५ ||**

**पदच्छेद :–** विश्वकर्ममतात् कार्यम् सुबुद्ध्या अपि प्रयोक्तृभि : |
न हि शक्यम् सुवर्णेन मुक्ताभि : मणिभि : तथा || ४४ ||
स्वाधीनम् इति रूच्या एव कर्तुम् अङ्गस्य भूषणम् |
विभागत : अभिप्रयुक्तम् अङ्गशोभाकरम् भवेत् || ४५ ||

**अन्वय :** – विश्वकर्ममतात् प्रयोक्तृभि: सुबुद्ध्या अपि कार्यम् | हि अङ्गस्य भूषणम् सुवर्णेन मुक्ताभि: तथा मणिभि: स्वाधीनम् इति रूच्या एव कर्तुम् न शक्यम् | विभागत: अभिप्रयुक्तम् अङ्गशोभाकरम् भवेत् |

**अर्थ** – विश्वकर्माने सांगितल्याप्रमाणे नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी अत्यंत बुद्धीने आभूषणांची निर्मिती करावी. शरीरावरील दागिने हे सोने, मोती आणि वेगवेगळ्या मणींपासून बनवावेत. स्वत:च्या आवडीप्रमाणे बनवू नयेत कारण वेगवेगळ्या विभागांप्रमाणे तयार केलेले हे अलंकार शरीराची शोभा वाढवितात.

**यथा स्थानान्तरगतं भूषणं रत्नसंयुतम् |**
**न तु नाट्यप्रयोगे तु कर्तव्यं भूषणं गुरू || ४६ ||**

**पदच्छेद :–** यथा स्थानान्तरगतम् भूषणम् रत्नसंयुतम् |
न तु नाट्यप्रयोगे तु कर्तव्यम् भूषणम् गुरू || ४६ ||

**अन्वय :** – यथा - स्थानान्तरगतम् रत्नसंयुतम् भूषणम् | नाट्यप्रयोगे तु गुरूभूषणम् तु न कर्तव्यम् |

**अर्थ** – जसे - विविध जागी धारण केलेली रत्नजडित आभूषणे शोभा वाढवितात. म्हणूनच नाट्यप्रयोगासाठी जड दागिने बनवू नयेत.

**खेदं जनयते तद्धि सव्यायतविचेष्टनात् |**
**गुरूभावावसन्नस्य स्वेदो मूर्च्छा च जायते || ४७ ||**

**पदच्छेद :–** खेदम् जनयते तत् हि सव्यायत-विचेष्टनात् |
गुरूभाव-अवसन्नस्य स्वेद : मूर्च्छा च जायते || ४७ ||

**अन्वय: –** तत् हि सव्यायतविचेष्टनात् खेदम् जनयते | गुरुभावावसन्नस्य स्वेद: मूर्च्छा च जायते |

**अर्थ –** कारण अतिवजनाचे दागिने आंगिक अभिनय करताना व्यत्यय निर्माण करतात व त्यामुळे खेद निर्माण होतो. अतिवजनाचे दागिने घालून नटाला खूप घाम येऊ शकतो किंवा तो मूर्च्छित होऊ शकतो.

**गुर्वाभरणसन्नो हि चेष्टां न कुरुते पुन: |**
**तस्मात्तनुत्वचकृतं सौवर्णं भूषणं भवेत् || ४८ ||**

**पदच्छेद: –** गुरु-आभरण-सन्न: हि चेष्टाम् न कुरुते पुन: |
तस्मात् तनु-त्वच-कृतम् सौवर्णम् भूषणम् भवेत् || ४८ ||

**अन्वय: –** पुन: हि गुर्वाभरणसन्न: चेष्टाम् न कुरुते | तस्मात् तनुत्वचकृतम् सौवर्णम् भूषणम् भवेत् |

**अर्थ –** जड दागिने घातलेला अभिनेता योग्य अभिनय करु शकत नाही, म्हणूनच शरीराच्या त्वचेवर नीट राहतील असे सोन्याचे हलके दागिने घालून नटांनी अभिनय करावा.

**रत्नवज्जतुबद्धं वा न खेदजननं भवेत् |**
**स्वेच्छया भूषणविधिर्दिव्यानामुपदिश्यते || ४९ ||**

**पदच्छेद: –** रत्नवत् जतुबद्धम् वा न खेदजननम् भवेत् |
स्वेच्छया भूषणविधि: दिव्यानाम् उपदिश्यते || ४९ ||

**अन्वय: –** रत्नवत् जतुबद्धम् वा खेदजननम् न भवेत् | दिव्यानाम् भूषणविधि: स्वेच्छया उपदिश्यते |

**अर्थ –** लाखेपासून तयार केलेले रत्नजडित अलंकार हे फार खेदजनक नसतात. म्हणून दिव्यपात्रांसाठी दागिने निर्माण करण्याचा विधी आता स्वेच्छेने सांगत आहे.

**❖ दिव्यपात्रांसाठी अलंकारांविषयीचे नियम ❖**

**यत्नभावविनिष्पन्नं मानुषाणां विभूषणम् |**
**वेष्टितं विततं चैव सङ्घात्यं ग्रन्थिमं तथा || ५० ||**
**लम्बशोभि तथा चैव माल्यं पञ्चविधं स्मृतम् |**

**पदच्छेद :–** यत्नभाव-विनिष्पन्नम् मानुषाणाम् विभूषणम् |
वेष्टितम् विततम् च एव सङ्घात्यम् ग्रन्थिमम् तथा || ५० ||
लम्बशोभि तथा च एव माल्यम् पञ्चविधम् स्मृतम् |

**अन्वय :–** मानुषाणाम् विभूषणम् यत्नभाव-विनिष्पन्नम् (अस्ति) | वेष्टितम् विततम् सङ्घात्यम् ग्रन्थिमम् लम्बशोभि (इति) पञ्चविधम् माल्यम् स्मृतम् |

**अर्थ –** मानवांसाठीचे अलंकार हे प्रयत्नपूर्वक विशिष्ट भावांनी निर्माण केलेले असतात. वेष्टित, वितत, संघात्य, ग्रंथिम आणि लंबशोभी अशा पाच प्रकारच्या माळा सांगितल्या गेल्या आहेत.

(वेष्टितं विततं चैव सङ्घात्यं ग्रन्थिमं तथा || ५० || लम्बशोभि तथा चैव माल्यं पञ्चविधं स्मृतम् | इथे श्लोक क्रमांक ११ ची पुनरावृत्ती दिसून येते.)

**आच्छादनं बहुविधं नानापत्तनसंभवम् || ५१ ||**
**तज्ज्ञेयं त्रिप्रकारं तु शुद्धं रक्तं विचित्रितम् |**
**दिव्यानां भूषणविधिर्य एषः परिकीर्तितः || ५२ ||**

**पदच्छेद :–** आच्छादनम् बहुविधम् नाना-पत्तन-संभवम् || ५१ ||
तत् ज्ञेयम् त्रिप्रकारम् तु शुद्धम् रक्तम् विचित्रितम् |
दिव्यानाम् भूषणविधिः यः एषः परिकीर्तितः || ५२ ||

**अन्वय :–** नानापत्तनसंभवम् आच्छादनम् बहुविधम् (अस्ति) | तत् तु शुद्धम् रक्तम् विचित्रितम् त्रिप्रकारम् (इति) ज्ञेयम् | यः एषः भूषणविधिः दिव्यानाम् कृते परिकीर्तितः |

**अर्थ –** अनेक नगरांमध्ये होणारे आच्छादन विविध प्रकारचे असते. तरीही त्याचे शुद्ध, रक्त आणि चित्र असे तीन प्रकार सांगितले आहेत. हे जे अलंकारांविषयीचे नियम आहेत, ते दिव्यपात्रांसाठी सांगितले आहेत.

**मानुषाणां च कर्तव्यो नानादेशसमाश्रयः |**
**भूषणैश्चापि वेषैश्च नानावस्थासमाश्रयैः || ५३ ||**

**पदच्छेद :–** मानुषाणाम् च कर्तव्यः नानादेश-समाश्रयः |
भूषणैः च अपि वेषैः च नानावस्था-समाश्रयैः || ५३ ||

**अन्वय:** – नानावस्थासमाश्रयै: भूषणै: वेषै: च नानादेशसमाश्रय: मानुषाणाम् (भूषणविधि:) कर्तव्य:।

**अर्थ** – विविध अवस्थांनुसार असणाऱ्या अलंकारांद्वारे आणि वेशभूषांद्वारे वेगवेगळ्या देशांमध्ये असणाऱ्या व्यक्तींसाठी अलंकारविधी सांगावा.

**❖ वेशभूषा ❖**

**दिव्याङ्गनानां कर्तव्या विभक्ति: स्वस्वभूमिजा।**
**विद्याधरीणां यक्षीणामप्सरोनागयोषिताम् ॥ ५४ ॥**
**ऋषिदैवतकन्यानां वेषैर्नानात्वमिष्यते।**
**तथा च सिद्धगन्धर्वराक्षसासुरयोषिताम् ॥ ५५ ॥**

**पदच्छेद:** – दिव्य-अङ्गनानाम् कर्तव्या विभक्ति: स्वस्वभूमिजा।
विद्याधरीणाम् यक्षीणाम् अप्सरो-नाग-योषिताम् ॥ ५४ ॥
ऋषि-दैवत-कन्यानाम् वेषै: नानात्वम् इष्यते।
तथा च सिद्ध-गन्धर्व-राक्षस-असुर-योषिताम् ॥ ५५ ॥

**अन्वय:** – दिव्याङ्गनानाम् स्वस्वभूमिजा विभक्ति: कर्तव्या। विद्याधरीणाम् यक्षीणाम् अप्सरोनागयोषिताम् ऋषिदैवतकन्यानाम् तथा च सिद्धगन्धर्वराक्षसासुरयोषिताम् वेषै: नानात्वम् इष्यते।

**अर्थ** – दिव्यांगनांचे स्वत:च्या भूमिकेप्रमाणे विभाग करावेत. विद्याधरी, यक्षिणी, अप्सरा, सर्पिणी, ऋषि आणि देवकन्या यांची वेशभूषा त्या त्या विशिष्ट पात्रानुसार असावी. याचप्रमाणे सिद्ध, गंधर्व, रक्षस् तसेच असुरांच्या स्त्रियांच्या वेषामध्येही विविधता असते.

**दिव्यानां नरनारीणां तथैव च शिखण्डकम्।**
**शिखापुटशिखण्डं तु मुक्ताभूयिष्ठभूषणम् ॥ ५६ ॥**

**पदच्छेद:** – दिव्यानाम् नरनारीणाम् तथा एव च शिखण्डकम्।
शिखापुट-शिखण्डम् तु मुक्ता-भूयिष्ठ-भूषणम् ॥ ५६ ॥

**अन्वयः –** दिव्यानाम् नरनारीणाम् च शिखण्डकम् नाम अलङ्कारः | शिखापुटाय निर्मितम् शिखण्डम् तु मुक्ताभूयिष्ठभूषणम् भवति |

**अर्थ –** दिव्य स्त्रीपुरुषांसाठी शिखंडक नावाचा अलंकार सांगितला आहे. शिखेची घडी करण्यासाठी निर्मिलेला अलंकार म्हणजे शिखंड ज्यामध्ये अनेक मोती जडलेले असतात.

**विद्याधरीणां कर्तव्यः शुद्धो वेषपरिच्छदः |**
**यक्षिण्योऽप्सरसश्चैव कार्या रत्नविभूषणाः || ५७ ||**
**समस्तासां भवेद्वेषो यक्षीणां केवलं शिखा |**

**पदच्छेदः –** विद्याधरीणाम् कर्तव्यः शुद्धः वेषपरिच्छदः |
यक्षिण्यः अप्सरसः च एव कार्याः रत्नविभूषणाः || ५७ ||
समः तासाम् भवेत् वेषः यक्षीणाम् केवलम् शिखा |

**अन्वयः –** विद्याधरीणाम् वेषपरिच्छदः शुद्धः कर्तव्यः | यक्षिण्यः अप्सरसः च रत्नविभूषणाः कार्याः | तासाम् वेषः समः भवेत् | यक्षीणाम् केवलम् शिखा (भवेत्) | (शुद्धमिति शुक्लवर्णकम् | - अ. भा.)

**अर्थ –** विद्याधरींची वेशभूषा शुभ्रवर्णीय असली पाहिजेत. यक्षिणी, अप्सरा यांची वेशभूषा रत्नजडित आभूषणांनी करावी. सर्व स्त्रियांचे वेष एकसारखे असतात. परंतु यक्षिणींची केवळ वेणी ही वेगळ्या प्रकारची असते. (विद्याधरी, यक्षिणी, अप्सरा इत्यादी देवयोनी आहेत.)

**दिव्यानामिव कर्तव्यं नागस्त्रीणां विभूषणम् || ५८ ||**
**मुक्तामणिलताप्रायाः फणास्तासां तु केवलाः |**

**पदच्छेदः –** दिव्यानाम् इव कर्तव्यम् नागस्त्रीणाम् विभूषणम् || ५८ ||
मुक्तामणि-लताप्रायाः फणाः तासाम् तु केवलाः |

**अन्वयः –** नागस्त्रीणाम् विभूषणम् दिव्यानाम् इव कर्तव्यम् | तासाम् तु फणाः केवलाः मुक्तामणिलताप्रायाः (कार्याः) |

**अर्थ** – नागिणींचे दागिने हे दिव्यांगनांप्रमाणेच असावेत. त्यांच्या फण्यावर वेलींच्या आकाराचा मुक्तामणी करावा.

**कार्यं तु मुनिकन्यानामेकवेणीधरं शिर: ||५९||**
**न चापि भूषणविधिस्तासां वेषो वनोचित: |**

**पदच्छेद:** – कार्यम् तु मुनिकन्यानाम् एकवेणीधरम् शिर: ||५९||
न च अपि भूषणविधि: तासाम् वेष: वनोचित: |

**अन्वय:** – मुनिकन्यानाम् शिर: तु एकवेणीधरम् कार्यम् | तासाम् वेष: वनोचित:, भूषणविधि: न (कार्यम्) |

**अर्थ** – मुनिकन्यांच्या मस्तकावर एक वेणी असावी. त्या मुनिकन्यांची वेशभूषा वनास साजेशी असावी. परंतु त्यांच्यासाठी अलंकारविधी असू नये.

**मुक्तामरकतप्रायं मण्डनं सिद्धयोषिताम् || ६० ||**
**तासां चैव तु कर्तव्यं पीतवस्त्रपरिच्छदम् |**

**पदच्छेद:** – मुक्ता-मरकत-प्रायम् मण्डनम् सिद्धयोषिताम् || ६० ||
तासाम् च एव तु कर्तव्यम् पीतवस्त्रपरिच्छदम् |

**अन्वय:** – सिद्धयोषिताम् मण्डनम् मुक्तामरकतप्रायम् (कार्यम्) | एव च तासाम् पीतवस्त्रपरिच्छदम् तु कर्तव्यम् |

**अर्थ** – सिद्ध स्त्रियांना मुक्ता मरकत (मणि) द्वारे सजवावे. त्यांचे नेसायचे वस्त्र पिवळ्या रंगाचे असावे.

**पद्मरागमणिप्रायं गन्धर्वीणां विभूषणम् ||६१||**
**वीणाहस्तश्च कर्तव्य: कौसुम्भवसनस्तथा |**

**पदच्छेद:** – पद्मराग-मणिप्रायम् गन्धर्वीणाम् विभूषणम् ||६१||
वीणाहस्त: च कर्तव्य: कौसुम्भ-वसन: तथा |

**अन्वय: –** गन्धर्वीणाम् विभूषणम् पद्मरागमणिप्रायम् (अस्ति) | तथा च वीणाहस्त: कौसुम्भवसन: कर्तव्य: |

**अर्थ –** परंतु गंधर्व स्त्रियांची आभूषणे गुलाबी रंगाच्या मण्यांनी जडलेली असावीत. त्यांच्या हातात वीणा हवी आणि भगव्या रंगाचे कपडे असावेत.

**इन्द्रनीलैस्तु कर्तव्यं राक्षसीनां विभूषणम् || ६२ ||**
**सितदंष्ट्रा च कर्तव्या कृष्णवस्त्रपरिच्छदम् |**

**पदच्छेद: –** इन्द्रनीलै: तु कर्तव्यम् राक्षसीनाम् विभूषणम् || ६२ ||
सितदंष्ट्रा च कर्तव्या कृष्णवस्त्र-परिच्छदम् |

**अन्वय: –** राक्षसीनाम् तु विभूषणम् इन्द्रनीलै: कर्तव्यम् | सितदंष्ट्रा कृष्णवस्त्रपरिच्छदम् च कर्तव्या |

**अर्थ –** राक्षसींची आभूषणे इंद्रनील मण्यांनी जडलेले असावे. त्यांचे दात सफेद रंगाचे आणि कपडे काळे असावेत.

**वैडूर्यमुक्ताभरणा: कर्तव्या सुरयोषिताम् ||६३||**
**शुकपिञ्छनिभैर्वस्त्रै: कार्यस्तासां परिच्छद: |**
**पुष्यरागैस्तु मणिभि: क्वचिद्वैडूर्यभूषितै: ||६४||**

**पदच्छेद: –** वैडूर्य-मुक्त-आभरणा: कर्तव्या: सुरयोषिताम् || ६३ ||
शुक-पिञ्छ-निभै: वस्त्रै: कार्य: तासाम् परिच्छद: |
पुष्यरागै: तु मणिभि: क्वचित् वैडूर्य-भूषितै: || ६४ ||

**अन्वय: –** सुरयोषिताम् वैडूर्यमुक्ताभरणा: कर्तव्या: | शुकपिञ्छनिभै: वस्त्रै:, क्वचित् वैडूर्यभूषितै: पुष्यरागै: तु मणिभि: तासाम् परिच्छद: कार्य: |

**अर्थ –** देवांगनांची आभूषणे वैदूर्य आणि मोतींनी जडलेली असावीत. हिरव्या पोपटी रंगाच्या वस्त्रांनी आणि कधीकधी वैदूर्य मण्यांनी सुशोभित गुलाबी रंगांच्या मण्यांनी त्यांची वेशभूषा तयार करावी.

**दिव्यवानरनारीणां कार्यो नीलपरिच्छद: |**
**एवं शृङ्गारिण: कार्या वेषा दिव्याङ्गनाश्रया: || ६५ ||**

**पदच्छेद :-** दिव्य-वानर-नारीणाम् कार्य : नीलपरिच्छद : |
एवम् शृङ्गारिण : कार्या : वेषा : दिव्य-अङ्गना-अश्रया : || ६५ ||

**अन्वय : -** दिव्यवानरनारीणाम् नीलपरिच्छद : कार्य : | एवम् दिव्याङ्गनाश्रया : वेषा : शृङ्गारिण : कार्या : |

**अर्थ –** दिव्य वानरी आणि दिव्य स्त्रियांचे कपडे निळ्या रंगाचे असावेत . याप्रमाणे दिव्यांगनांची वेशभूषा शृंगारमय करावी .

**अवस्थान्तरमासाद्य शुद्धा: कार्या: पुनस्तथा |**
**मानुषीणां तु कर्तव्या नानादेशसमुद्भवा: || ६६ ||**

**पदच्छेद :-** अवस्थान्तरम् आसाद्य शुद्धा : कार्या : पुन : तथा |
मानुषीणाम् तु कर्तव्या : नाना-देश-समुद्भवा : || ६६ ||

**अन्वय : -** अवस्थान्तरम् आसाद्य पुन: तथा शुद्धा: (वेषा:) कार्या: | मानुषीणाम् तु नानादेशसमुद्भवा : कर्तव्या : |

**अर्थ –** वेगळी अवस्था झाल्यास त्यांचे वेष शुभ्र असावेत . महिलांचे वेष विविध देशानुसार वेगवेगळे असावेत .

**❖ स्त्रियांची केशभूषा ❖**

**वेषाभरणसंयोगान् गदतस्तान्निबोधत |**
**आवन्त्ययुवतीनां तु शिरस्सालककुन्तलम् || ६७ ||**

**पदच्छेद :-** वेषा-आभरण-संयोगान् गदत : तान् निबोधत |
आवन्त्य-युवतीनाम् तु शिर : सालक-कुन्तलम् || ६७ ||

**अन्वय : -** वेषाभरणसंयोगान् गदत: तान् निबोधत | आवन्त्ययुवतीनां तु सालककुन्तलं शिर: (भवेत्) | (सालककुन्तलमिति अलका: स्थाने कुन्तला: कुञ्चिता: केशा: यत्र तत्तथोक्तम् | - अ . भा . )

**अर्थ –** आता वेष आणि आभूषण एकत्रपणे सांगत असताना ते नीट समजून घ्या . आवंती देशातील स्त्रियांच्या डोक्यावर कुरळे केस असावे .

**गौडीनामलकप्रायं सशिखापाशवेणिकम् |**
**आभीरयुवतीनां तु द्विवेणीधर एव तु || ६८ ||**

**पदच्छेद :–** गौडीनाम् अलकप्रायम् सशिखापाश-वेणिकम् |
आभीर-युवतीनाम् तु द्विवेणीधर : एव तु || ६८ ||

**अन्वय : –** गौडीनाम् सशिखापाशवेणिकम् अलकप्रायम् (शिर : भवेत्) | आभीरयुवतीनाम् तु द्विवेणीधर : (वेष : भवेत्) |

**अर्थ –** गौड देशाच्या स्त्रियांच्या डोक्यावर वेणीचा अंबाडा असावा . आभीर देशाच्या स्त्रियांच्या दोन वेणी दाखवाव्यात .

**शिर :परिगम : कार्यो नीलप्रायमथाम्बरम् |**
**तथा पूर्वोत्तरस्त्रीणां समुन्नद्धशिखण्डकम् || ६९ ||**

**पदच्छेद :–** शिर :परिगम : कार्य : नीलप्रायम् अथ अम्बरम् |
तथा पूर्वोत्तर-स्त्रीणाम् समुन्नद्ध-शिखण्डकम् || ६९ ||

**अन्वय : –** अथ पूर्वोत्तरस्त्रीणाम् शिर :परिगम : कार्य : समुन्नद्धशिखण्डकम् भवेत् तथा नीलप्रायम् अम्बरम् (कार्यम्) |

**अर्थ –** ईशान्य देशातील स्त्रियांच्या डोक्यावरचे केस स्वच्छ असावेत . तसेच शिखा वरच्या बाजूला फुगीर असावी . त्यांचे कपडे मुख्यत : निळ्या रंगाचे असावेत .

**आकेशाच्छादनं तासां देशकर्मणि कीर्तितम् |**
**तथैव दक्षिणस्त्रीणां कार्यमुल्लेख्यसंश्रयम् || ७० ||**

**पदच्छेद :–** आकेश-आच्छादनम् तासाम् देशकर्मणि कीर्तितम् |
तथा एव दक्षिण-स्त्रीणाम् कार्यम् उल्लेख्य-संश्रयम् || ७० ||

**अन्वय : –** तासाम् आकेशाच्छादनम् देशकर्मणि कीर्तितम् | तथा एव दक्षिणस्त्रीणाम् उल्लेख्यसंश्रयम् कार्यम् |

**अर्थ** – आतापर्यंत वेगवेगळ्या देशातील स्त्रियांच्या केशकलापांपासून कपड्यापर्यंत सर्व सांगितले . तसेच दाक्षिणात्य देशातील स्त्रियांविषयी उल्लेख करणे आवश्यक आहे .

**❖ दाक्षिणात्य स्त्रियांची केशभूषा आणि वेशभूषा ❖**

**कुम्भीबन्धकसंयुक्तं तथावर्तललाटिकम् |**
**गणिकानां तु कर्तव्यमिच्छाविच्छित्ति मण्डनम् || ७१ ||**

**पदच्छेद:** – कुम्भीबन्धक-संयुक्तम् तथा आवर्तल-लाटिकम् |
गणिकानाम् तु कर्तव्यम् इच्छा-विच्छित्ति मण्डनम् || ७१ ||

**अन्वय:** – कुम्भीबन्धकसंयुक्तम् तथा आवर्तललाटिकम् | गणिकानाम् तु इच्छाविच्छित्ति मण्डनम् कर्तव्यम् |

**अर्थ** – कुंभीबंध म्हणजे एक प्रकारचा गोल बांगडीसारखा अंबाडा डोक्यावर धारण करावा आणि डोक्यावर भुंगा (केसांचा विशिष्ट फुगवटा-अंबाडा जसे मोहिनीअट्टम्) देखील लावावा. गणिकांनी स्वत:च्या इच्छेप्रमाणे अलंकारांनी आणि वस्त्रांनी स्वत:ला सजवावे .

**❖ वेशभूषा, अलंकार इत्यादी नियम ❖**

**देशजातिविधानेन शेषाणामपि कारयेत् |**
**वेषं तथा चाभरणं क्षुरकर्म परिच्छदम् || ७२ ||**

**पदच्छेद:** – देशजाति-विधानेन शेषाणाम् अपि कारयेत् |
वेषम् तथा च आभरणम् क्षुरकर्म परिच्छदम् || ७२ ||

**अन्वय:** – शेषाणाम् वेषम् तथा च आभरणम् देशजातिविधानेन क्षुरकर्म परिच्छदम् कारयेत् |

**अर्थ** – त्याचप्रमाणे उरलेल्या स्त्रियांची वेषभूषा, अलंकार, केशकर्तन आणि विशेष वस्त्र हे त्या त्या देशानुसार किंवा जातीनुसार करावे .

**आगमं चापि नेपथ्ये नाट्यस्यैवं प्रयोजयेत् |**
**अदेशयुक्तो वेषो हि न शोभां जनयिष्यति || ७३ ||**
**मेखलोरसि बद्धा तु हास्यं समुपपादयेत् |**

**पदच्छेद :–** आगमम् च अपि नेपथ्ये नाट्यस्य एवम् प्रयोजयेत् |
अदेशयुक्त : वेष : हि न शोभाम् जनयिष्यति || ७३ ||
मेखला उरसि बद्धा तु हास्यम् समुपपादयेत् |

**अन्वय : –** एवम् नेपथ्ये नाट्यस्य आगमम् प्रयोजयेत् | हि अदेशयुक्त : वेष : शोभाम् न जनयिष्यति | उरसि बद्धा मेखला तु हास्यम् समुपपादयेत् |

**अर्थ –** अशा प्रकारे, नेपथ्याच्या बाबतीत नाट्यशास्त्रानुसार प्रयोग करावा; कारण देशप्रांतानुसार वेष नसेल तर नाटकामध्ये सौंदर्यजनक ठरत नाही . जसे – मेखला जर छातीवर बांधली तर ते हास्यास्पद होईल .

**तथा प्रोषितकान्तासु व्यसनाभिहतासु च || ७४ ||**
**वेषो वै मलिन : कार्य एकवेणीधरं शिर : |**
**विप्रलम्भे तु नार्यास्तु शुद्धो वेषो भवेदिह || ७५ ||**

**पदच्छेद :–** तथा प्रोषित-कान्तासु व्यसन-अभिहतासु च || ७४ ||
वेष : वै मलिन : कार्य : एक-वेणी-धरम् शिर : |
विप्रलम्भे तु नार्या : तु शुद्ध : वेष : भवेत् इह || ७५ ||

**अन्वय : –** प्रोषितकान्तासु तथा व्यसनाभिहतासु च मलिन : वेष : कार्य : | एकवेणीधरम् शिर : (च कार्यम्) | इह विप्रलम्भे तु नार्या : वेष : तु शुद्ध : भवेत् |

**अर्थ –** पती प्रवासाला गेला असेल तर त्या मुलींचे आणि व्यसनामुळे पतीचा मार खाल्लेल्या स्त्रियांचे कपडे मळके असावेत आणि एकच वेणी असावी . परंतु विप्रलंभ शृंगारामध्ये स्त्रियांचे कपडे पांढरेशुभ्र असावेत .

**नात्याभरणसंयुक्तो न चापि मृजयान्वित : |**
**एवं स्त्रीणां भवेद्वेषो देशावस्थासमुद्भव : || ७६ ||**

**पदच्छेद: –** न अत्याभरण-संयुक्त: न च अपि मृजया अन्वित: |
एवम् स्त्रीणाम् भवेत् वेष: देश-अवस्था-समुद्भव: || ७६ ||

**अन्वय: –** न अत्याभरणसंयुक्त: अपि च न मृजयान्वित: | एवम् स्त्रीणाम् वेष: देशावस्थासमुद्भव: भवेत् |

**अर्थ –** खूप जास्त दागिन्यांचा वापर येथे करू नये आणि अतिस्वच्छतेवरही लक्ष असू नये. अशाप्रकारे देश आणि अवस्थांनुसार स्त्रियांचा वेष असावा.

**पुरुषाणां पुनश्चैव वेषान्वक्ष्यामि तत्त्वत: |**
**तत्राङ्गरचना पूर्वं कर्तव्या नाट्ययोक्तृभि: || ७७ ||**

**पदच्छेद: –** पुरुषाणाम् पुन: च एव वेषान् वक्ष्यामि तत्त्वत: |
तत्र अङ्गरचना पूर्वम् कर्तव्या नाट्ययोक्तृभि: || ७७ ||

**अन्वय: –** पुन: एव पुरुषाणाम् वेषान् तत्त्वत: वक्ष्यामि | तत्र पूर्वम् नाट्ययोक्तृभि: अङ्गरचना कर्तव्या | (तत्रेति पुरुषेषु एव | अङ्गानां रूपपरिवर्तन-सम्पादनात्मक-वर्णवर्तना कर्तव्या न स्त्रीपात्रेषु इति यावत्- अ. भा.)

**अर्थ –** आता मी पुरुषांच्या वेषाविषयी मुद्देसूर सांगेन. पण सर्वात आधी नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी पुरुषपात्रांच्या शरीराचा रंग बदलावा.

**❖ वर्णभूषा ❖**

**तत: परं प्रयोक्तव्या वेषा देशसमुद्भवा: |**
**सितो नीलश्च पीतश्च चतुर्थो रक्त एव च || ७८ ||**

**पदच्छेद: –** तत: परम् प्रयोक्तव्या: वेषा: देशसमुद्भवा: |
सित: नील: च पीत: च चतुर्थ: रक्त: एव च || ७८ ||

**अन्वय: –** तत: परम् सित: नील: पीत: चतुर्थ: च रक्त: एतै: वर्णै: देशसमुद्भवा: वेषा: प्रयोक्तव्या: |

**अर्थ –** यानंतर त्या त्या देशामध्ये तयार झालेले सफेद, निळा, पिवळा आणि चौथा लाल या रंगांचे वेष वापरावे.

**एते स्वभावजा वर्णा यैः कार्यं त्वङ्गवर्तनम् |**
**संयोगजाः पुनश्चान्ये उपवर्णा भवन्ति हि || ७९ ||**

**पदच्छेदः-** एते स्वभावजाः वर्णाः यैः कार्यम् तु अङ्गवर्तनम् |
संयोगजाः पुनः च अन्ये उपवर्णाः भवन्ति हि || ७९ ||

**अन्वयः -** एते स्वभावजाः वर्णाः यैः तु अङ्गवर्तनम् कार्यम् | पुनः च अन्ये हि संयोगजाः उपवर्णाः भवन्ति |

**अर्थ -** हे चार स्वाभाविक रंग आहेत, ज्यांच्या द्वारे शरीराचा रंग बदलावा. या रंगांच्या मिश्रणातून उत्पन्न होणाऱ्या रंगांना 'उपवर्ण' असे म्हणतात.

**तानहं संप्रवक्ष्यामि यथाकार्यं प्रयोक्तृभिः |**
**सितनीलसमायोगे कारण्डव इति स्मृतः || ८० ||**

**पदच्छेदः-** तान् अहम् संप्रवक्ष्यामि यथाकार्यम् प्रयोक्तृभिः |
सितनील-समायोगे कारण्डवः इति स्मृतः || ८० ||

**अन्वयः -** तान् अहम् संप्रवक्ष्यामि प्रयोक्तृभिः यथाकार्यम् | सितनीलसमायोगे कारण्डवः इति स्मृतः |

**अर्थ -** आता मी उपवर्णाविषयी सांगतो. त्याप्रमाणे नाट्यकर्त्यांनी नाटकामध्ये त्याचा वापर करावा. सफेद आणि निळ्या रंगाच्या मिश्रणाने कारंडव म्हणजे निळसर सफेद रंग (कपोतवर्ण) तयार होतो.

**सितपीतसमायोगात्पाण्डुवर्णः प्रकीर्तितः |**
**सितरक्तसमायोगे पद्मवर्णः प्रकीर्तितः || ८१ ||**

**पदच्छेदः-** सितपीतसमायोगात् पाण्डुवर्णः प्रकीर्तितः |
सितरक्तसमायोगे पद्मवर्णः प्रकीर्तितः || ८१ ||

**अन्वयः -** सितपीतसमायोगात् पाण्डुवर्णः प्रकीर्तितः | सितरक्तसमायोगे पद्मवर्णः प्रकीर्तितः |

**अर्थ -** सफेद आणि पिवळ्या रंगाच्या मिश्रणाने तयार होणाऱ्या रंगाला पांडुवर्ण म्हटले जाते.

तसेच सफेद आणि लाल रंगाच्या योगाने उत्पन्न झालेल्या रंगाला पद्मवर्ण (गुलाबी) म्हटले जाते .

**पीतनीलसमायोगाद्धरितो नाम जायते |**
**नीलरक्तसमायोगात्कषायो नाम जायते || ८२ ||**

**पदच्छेद :–** पीतनीलसमायोगात् हरित : नाम जायते |
नीलरक्तसमायोगात् कषाय : नाम जायते || ८२ ||

**अन्वय : –** पीतनीलसमायोगात् हरित : नाम जायते | नीलरक्तसमायोगात् कषाय : नाम जायते |

**अर्थ –** पिवळ्या आणि निळ्या रंगाच्या मिश्रणाने हिरवा रंग तयार होतो . निळ्या आणि लाल रंगाच्या मिश्रणाने कषाय रंग तयार होतो .

**रक्तपीतसमायोगाद्गौरवर्ण इति स्मृत: |**
**एते संयोगजा वर्णा ह्युपवर्णास्तथापरे || ८३ ||**

**पदच्छेद :–** रक्तपीत-समायोगात् गौरवर्ण : इति स्मृत : |
एते संयोगजा : वर्णा : हि उपवर्णा : तथा अपरे || ८३ ||

**अन्वय : –** रक्तपीतसमायोगात् गौरवर्ण: इति स्मृत: | एते संयोगजा: वर्णा: तथा हि अपरे उपवर्णा : |

**अर्थ –** लाल आणि पिवळा रंग एकत्र करून गौर रंग तयार होतो . हे संयोगज रंग आहेत म्हणजेच दोन रंगाच्या मिश्रणातून उत्पन्न होणारे रंग आहेत . इतर रंगांना मात्र उपवर्ण असे म्हणतात .

**त्रिचतुर्वर्णसंयुक्ता बहव: संप्रकीर्तिता: |**
**बलस्थो यो भवेद्वर्णस्तस्य भागो भवेत्तत: || ८४ ||**

**पदच्छेद :–** त्रिचतुर्वर्ण-संयुक्ता बहव : संप्रकीर्तिता : |
बलस्थ : य : भवेत् वर्ण : तस्य भाग : भवेत् तत : || ८४ ||

**अन्वय: –** त्रिचतुर्वर्णसंयुक्ता वहव: संप्रकीर्तिता: | तत: य: वर्ण: बलस्थ: भवेत् तस्य भाग: भवेत् |

**अर्थ –** तीन चार रंगाच्या संयोगाने अनेक रंग बनू शकतात. यामध्ये जो रंग बलशाली असेल त्याचा एक पूर्ण भाग असावा (बलवान/शक्तिशाली रंग तो आहे जो दुसऱ्या रंगाला स्वत: मध्ये सामावून घेईल व म्हणूनच मिश्रण करताना दुसरे दुर्बल रंगाचे दोन भाग घ्यावेत. अन्य विद्वानांच्या मते निळा रंग सोडून बाकीचे सर्व रंग दुर्बल असतात. -अ.भा.)

**दुर्बलस्य च भागौ द्वौ नीलं मुक्त्वा प्रदापयेत् |**
**नीलस्यैको भवेद्भागश्चत्वारोऽन्ये तु वर्णके || ८५ ||**

**पदच्छेद: –** दुर्बलस्य च भागौ द्वौ नीलम् मुक्त्वा प्रदापयेत् |
नीलस्य एक: भवेत् भाग: चत्वार: अन्ये तु वर्णके || ८५ ||

**अन्वय: –** नीलम् मुक्त्वा दुर्बलस्य च द्वौ भागौ प्रदापयेत् | नीलस्य एक: भाग: भवेत् अन्ये तु वर्णके चत्वार: (भागा: सन्ति) |

**अर्थ –** निळा रंग वगळून दुर्बळ रंगाचे दोन भाग घ्यावे. कारण निळ्या रंगाचा जर एक भाग घेतला असेल तर बाकीच्या रंगाचे चार भाग घ्यावे.

**बलवान्सर्ववर्णानां नील एव प्रकीर्तित: |**
**एवं वर्णविधिं ज्ञात्वा नानासंयोगसंश्रयम् || ८६ ||**
**तत: कुर्याद्यथायोगमङ्गानां वर्तनं बुध: |**
**वर्तनाच्छादनं रूपं स्ववेषपरिवर्जितम् || ८७ ||**

**पदच्छेद: –** बलवान् सर्ववर्णानाम् नील: एव प्रकीर्तित: |
एवम् वर्णविधिम् ज्ञात्वा नाना-संयोग-संश्रयम् || ८६ ||
तत: कुर्यात् यथायोगम् अङ्गानाम् वर्तनम् बुध: |
वर्तन-आच्छादनम् रूपम् स्ववेष-परिवर्जितम् || ८७ ||

**अन्वय: –** सर्ववर्णानाम् नील: एव बलवान् प्रकीर्तित: | एवम् नानासंयोगसंश्रयम् वर्णविधिम् ज्ञात्वा तत: बुध: यथायोगम् अङ्गानाम् वर्तनम् वर्तनाच्छादनम् रूपम् स्ववेषपरिवर्जितम् कुर्यात् |

**अर्थ –** सर्व रंगामध्ये निळा रंग हा बलवान समजला जातो याप्रमाणे विविध रंगाच्या संयोगाने उत्पन्न होणारा हा वर्णविधि समजून त्यानंतर नाट्यविद्वानांनी यथायोग्य शरीरावर या रंगांचा वापर करावा. नटाने स्वत:चा वेष सोडून भूमिकेनुसार अंगपरिवर्तन आणि वेशपालट करावा.

**नाट्यधर्मप्रवृत्तं तु ज्ञेयं तत्प्रकृतिस्थितम् |**
**स्ववर्णमात्मनश्छाद्यं वर्णकैर्वेषसंश्रयै: || ८८ ||**

**पदच्छेद: –** नाट्यधर्म-प्रवृत्तम् तु ज्ञेयम् तत् प्रकृतिस्थितम् |
स्ववर्णम् आत्मन: छाद्यं वर्णकै: वेषसंश्रयै: || ८८ ||

**अन्वय: –** नाट्यधर्मप्रवृत्तम् तत् प्रकृतिस्थितम् तु ज्ञेयम् | वर्णकै: वेषसंश्रयै: आत्मन: स्ववर्णम् छाद्यम् |

**अर्थ –** नाट्यधर्म जो प्रवृत्त होतो तो विशिष्ट पात्राच्या स्वभावानुसार असतो. तेव्हा रंगांद्वारे आणि वेषभूषेद्वारे नटाने स्वत:चा मूळ रंग झाकून टाकावा.

**आकृतिस्तस्य कर्त्तव्या यस्य प्रकृतिरास्थिता |**
**यथा जन्तु: स्वभावं स्वं परित्यज्यान्यदैहिकम् || ८९ ||**

**पदच्छेद: –** आकृति: तस्य कर्त्तव्या यस्य प्रकृति: आस्थिता |
यथा जन्तु: स्वभावम् स्वम् परित्यज्य अन्यदैहिकम् || ८९ ||

**अन्वय: –** यस्य प्रकृति: आस्थिता तस्य आकृति: कर्त्तव्या | यथा जन्तु: स्वम् स्वभावम् परित्यज्य अन्यदैहिकम् (भवति) |

**अर्थ –** ज्या प्रकृतीचा (व्यक्तीचा) अभिनय करायचा आहे त्यानुसार नटाने ती आकृती स्वत:मध्ये धारण करावी. जसे – आत्मा स्वत:चा मूळ स्वभाव सोडून अन्य शरीर धारण करतो.

**तत्स्वभावं हि भजते देहान्तरमुपाश्रितः |**
**वेषेण वर्णकैश्चैव च्छादितः पुरुषस्तथा || ९० ||**
**परभावं प्रकुरुते यस्य वेषं समाश्रितः |**

**पदच्छेदः –** तत् स्वभावम् हि भजते देहान्तरम् उपाश्रितः |
वेषेण वर्णकैः च एव छादितः पुरुषः तथा || ९० ||
परभावम् प्रकुरुते यस्य वेषम् समाश्रितः |

**अन्वयः –** (यथा) देहान्तरम् उपाश्रितः तत् हि स्वभावम् भजते | तथा वेषेण वर्णकैः छादितः पुरुषः यस्य वेषम् समाश्रितः (तस्य) परभावम् प्रकुरुते |

**अर्थ –** ज्याप्रमाणे अन्य देह धारण करणारा आत्मा तोच स्वभाव आत्मसात करतो त्याचप्रमाणे नट वेषभूषेद्वारे आणि रंगांनी स्वतःला लपवून जो वेष धारण करतो (ज्या पात्राचा अभिनय करतो) त्याच्या भावांचे अनुकरण तो करीत असतो .

**देवदानवगन्धर्वयक्षराक्षसपन्नगाः || ९१ ||**
**प्राणिसंज्ञाः स्मृता ह्येते जीवबन्धाश्च येऽपरे |**
**स्त्रीभावाः पर्वताः नद्यः समुद्रा वाहनानि च || ९२ ||**
**नानाशस्त्राण्यपि तथा विज्ञेयाः प्राणिसंज्ञया |**

**पदच्छेदः –** देव-दानव-गन्धर्व-यक्ष-राक्षस-पन्नगाः || ९१ ||
प्राणिसंज्ञाः स्मृताः हि एते जीवबन्धाः च ये अपरे |
स्त्रीभावाः पर्वताः नद्यः समुद्राः वाहनानि च || ९२ ||
नानाशस्त्राणि अपि तथा विज्ञेयाः प्राणिसंज्ञया |

**अन्वयः –** देवः दानवः गन्धर्वः यक्षः राक्षसः पन्नगः हि एते ये च अपरे जीवबन्धाः (ते) प्राणिसंज्ञाः स्मृताः | तथा स्त्रीभावाः पर्वताः नद्यः समुद्राः वाहनानि अपि च नानाशस्त्राणि प्राणिसंज्ञया विज्ञेयाः |

**अर्थ –** देवता, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस आणि सर्प इत्यादी जे जीव आहेत त्यांना सजीव समजले जाते . परंतु स्त्रीस्वभाव असलेले पर्वत, नदी, समुद्र, वाहन तसेच विविध प्रकारचे शस्त्र यांनाही सजीवच समजावे .

**शैलप्रासादयन्त्राणि चर्मवर्मध्वजास्तथा || ९३ ||**
**नानाप्रहरणाद्याश्च तेऽप्राणिन इति स्मृता: |**
**अथवा कारणोपेता भवन्त्येते शरीरिण: || ९४ ||**

**पदच्छेद: –** शैल-प्रासाद-यन्त्राणि चर्म-वर्म-ध्वजा : तथा || ९३ ||
नाना-प्रहरण-आद्या : च ते अप्राणिन : इति स्मृता : |
अथवा कारण-उपेता : भवन्ति एते शरीरिण : || ९४ ||

**अन्वय: –** शैलप्रासादयन्त्राणि चर्मवर्मध्वजा : तथा च नानाप्रहरणाद्या : ते अप्राणिन : इति स्मृता : | अथवा एते कारणोपेता : शरीरिण : भवन्ति |

**अर्थ –** टेकडी, महाल, यंत्र, चर्म, वर्म (कवच), ध्वज तसेच अनेक प्रकारचे अस्त्र इत्यादींना निर्जीव म्हटले जाते किंवा विशेष कारण असेल तर हेदेखील शरीर धारण करतात .

**वेषभाषाश्रयोपेता नाट्यधर्ममवेक्ष्य तु |**
**वर्णानां तु विधिं ज्ञात्वा वय: प्रकृतिमेव च || ९५ ||**
**कुर्यादङ्गस्य रचनां देशजातिवय:श्रिताम् |**

**पदच्छेद: –** वेष-भाषा-आश्रय-उपेता : नाट्यधर्मम् अवेक्ष्य तु |
वर्णानाम् तु विधिम् ज्ञात्वा वय : प्रकृतिम् एव च || ९५ ||
कुर्यात् अङ्गस्य रचनाम् देश-जाति-वय :-श्रिताम् |

**अन्वय: –** नाट्यधर्मम् अवेक्ष्य वेषभाषाश्रयोपेता: वर्णानाम् विधिम् वय: प्रकृतिम् ज्ञात्वा देशजातिवय : श्रिताम् अङ्गस्य रचनाम् कुर्यात् |

**अर्थ –** नाट्यधर्मास जाणून घेऊन वेषभूषा आणि भाषेच्या आधाराने तसेच चारही वर्णांचे नियम, वय, स्वभाव जाणून त्यानंतर देश, जाती आणि वयावर आधारित अशी शरीररचना करावी .

**देवा गौरास्तु विज्ञेया यक्षाश्चाप्सरसस्तथा || ९६ ||**
**रूद्रार्कद्रुहिणस्कन्दास्तपनीयप्रभा: स्मृता: |**
**सोमो बृहस्पति: शुक्रो वरूणस्तारकागणा: || ९७ ||**

**पदच्छेद :-** देवा : गौरा : तु विज्ञेया : यक्षा : च अप्सरस : तथा || ९६ ||
रूद्र-अर्क-द्रुहिण-स्कन्दा : तपनीय-प्रभा : स्मृता : |
सोम : बृहस्पति : शुक्र : वरूण : तारका-गणा : || ९७ ||

**अन्वय : -** देवा : यक्षा : तथा च अप्सरस : तु गौरा : विज्ञेया : | रुद्रार्कद्रुहिणस्कन्दा : सोम : बृहस्पति : शुक्र : वरूण : तारकागणा : तपनीयप्रभा : स्मृता : |

**अर्थ** - देव, यक्ष आणि अप्सरा हे गोऱ्या रंगाचे असावेत. अकरा रूद्र, बारा आदित्य, ब्रह्मा, स्कंद, सोम, बृहस्पति, शुक्र, वरूण आणि तारागण हे तेजस्वी कांती असणारे असावेत.

**समुद्रहिमवद्गङ्गा: श्वेता हि स्युर्बलस्तथा |**
**रक्तमङ्गारकं विद्यात्पीतौ बुधहुताशनौ || ९८ ||**
**नारायणो नरश्चैव श्यामो नागश्च वासुकि: |**
**दैत्याश्च दानवाश्चैव राक्षसा गुह्यका नगा: || ९९ ||**
**पिशाचा जलमाकाशमसितानि तु वर्णत: |**

**पदच्छेद :-** समुद्र-हिमवद्-गङ्गा : श्वेता : हि स्यु : बल : तथा |
रक्तम् अङ्गारकम् विद्यात् पीतौ बुध-हुताशनौ || ९८ ||
नारायण : नर : च एव श्याम : नाग : च वासुकि : |
दैत्या : च दानवा : च एव राक्षसा : गुह्यका : नगा : || ९९ ||
पिशाचा : जलम् आकाशम् असितानि तु वर्णत : |

**अन्वय : -** समुद्र-हिमवत्-गङ्गा : बल : च श्वेता : स्यु : | अङ्गारकम् रक्तम् विद्यात् | बुधहुताशनौ पीतौ | नारायण : नर : च श्याम :, नाग : वासुकि : दैत्या : दानवा : राक्षसा : गुह्यका : नगा : पिशाचा : जलम् आकाशम् वर्णत : तु असितानि |
(नगा : पर्वता : | जलमाकाशमिति तदधिष्ठात्री देवतेह विवक्षिता | - अ. भा. )

**अर्थ** - समुद्र, हिमालय, गंगा आणि बलराम हे शुभ्र रंगाचे असावेत. मंगळ लाल रंगाचा असावा. बुध आणि अग्निसाठी पिवळा रंग वापरावा. नारायण आणि नर यांसाठी

सावळा रंग असावा . वासुकी नाग, दैत्य, दानव, राक्षस, गुह्यक, डोंगर, पिशाच, यम, जलदेवता आणि आकाशदेवता यांसाठी काळा रंग वापरावा .

**भवन्ति षट्सु द्वीपेषु पुरुषाश्चैव वर्णत: || १०० ||**
**कर्तव्या नाट्ययोगेन निष्टप्तकनकप्रभा: |**

**पदच्छेद: –** भवन्ति षट्सु द्वीपेषु पुरुषा : च एव वर्णत : || १०० ||
कर्तव्या : नाट्ययोगेन निष्टप्तकनकप्रभा : |

**अन्वय: –** षट्सु द्वीपेषु पुरुषा : वर्णत : भवन्ति | नाट्ययोगेन निष्टप्तकनकप्रभा : कर्तव्या : |

**अर्थ –** जंबूद्वीप वगळून जे सहा द्वीप आहेत तेथील पुरुष कुठल्याही रंगाचे असोत परंतु नाटकाच्या प्रयोगामध्ये त्यांचा रंग तापलेल्या सोन्यासारखा तेजस्वी असावा .

**जम्बूद्वीपस्य वर्षे तु नानावर्णाश्रया नरा: ||१०१||**
**उत्तरांस्तु कुरूंस्त्यक्त्वा ते चापि कनकप्रभा: |**
**भद्राश्वपुरुषा: श्वेता: कर्तव्या वर्णतस्तथा || १०२ ||**

**पदच्छेद: –** जम्बूद्वीपस्य वर्षे तु नाना-वर्ण-आश्रया : नरा : || १०१ ||
उत्तरान् तु कुरून् त्यक्त्वा ते च अपि कनक-प्रभा : |
भद्र-अश्व-पुरुषा : श्वेता : कर्तव्या : वर्णत : तथा || १०२ ||

**अन्वय: –** उत्तरान् कुरून् त्यक्त्वा जम्बूद्वीपस्य वर्षे नरा : नानावर्णानाम् आश्रया : (भवन्ति) | ते अपि च कनकप्रभा : (भवन्ति) | तथा भद्राश्वपुरुषा : वर्णत : श्वेता : कर्तव्या : | ( जम्बूद्वीपस्य वर्षे इति भारते | ते चापीति उत्तरकुरव : | - अ . भा . )

**अर्थ –** उत्तरेतील कुरुप्रदेशातील लोकांना वगळून भारतातील पुरुषांचा रंग आधी सांगितल्याप्रमाणे विविध वर्णानुसार वेगवेगळा असावा . परंतु उत्तरेकडील कुरुप्रदेशातील लोकांचा रंग सोन्यासारखा तेजस्वी असावा . तसेच भद्राश्वदेशातील पुरुष रंगाने सफेद असावेत .

**केतुमाले नरा नीला गौरा: शेषेषु कीर्तिता: |**
**नानावर्णा: स्मृता भूता गन्धर्वा यक्षपन्नगा: || १०३ ||**

**पदच्छेद:** – केतुमाले नरा: नीला: गौरा: शेषेषु कीर्तिता: |
नानावर्णा: स्मृता: भूता: गन्धर्वा: यक्षपन्नगा: || १०३ ||

**अन्वय:** – केतुमाले नरा: नीला: शेषेषु गौरा: कीर्तिता: | भूता: गन्धर्वा: यक्षपन्नगा: नानावर्णा: स्मृता: |

**अर्थ** – केतुमाल देशातील लोकांचा रंग निळा असावा आणि उरलेल्या देशांतील लोकांचा रंग गौरवर्ण सांगितला गेला आहे . भूत, गंधर्व, यक्ष आणि सर्प यांचे रंग विविध असावेत, असे सांगितले आहेत .

**विद्याधरास्तथा चैव पितरस्तु समा नरा: |**
**पुनश्च भारते वर्षे तांस्तान्वर्णान्निबोधत || १०४ ||**

**पदच्छेद:** – विद्याधरा: तथा च एव पितर: तु समा: नरा: |
पुन: च भारते वर्षे तान् तान् वर्णान् निबोधत || १०४ ||

**अन्वय:** – विद्याधरा: पितर: नरा: तु समा: (वर्णा: कर्तव्या:) | पुन: च भारते वर्षे तान् तान् वर्णान् निबोधत |

**अर्थ** – विद्याधर, पितर आणि पुरुष हे सर्व सारख्याच रंगाचे असतात . परंतु भारतदेशामध्ये जे वेगवेगळे रंग वेगवेगळ्या लोकांसाठी सांगितले आहेत ते आता समजून घ्या .

**राजान: पद्मवर्णास्तु गौरा: श्यामास्तथैव च |**
**ये चापि सुखिनो मर्त्या गौरा: कार्यास्तु वै बुधै: || १०५ ||**

**पदच्छेद:** – राजान: पद्मवर्णा: तु गौरा: श्यामा: तथा एव च |
ये च अपि सुखिन: मर्त्या: गौरा: कार्या: तु वै बुधै: || १०५ ||

**अन्वय:** – राजान: तु पद्मवर्णा: गौरा: तथा एव च श्यामा: (कर्तव्या:) | अपि च ये मर्त्या: सुखिन: ते बुधै: गौरा: कार्या: |

**अर्थ** – राजे हे गुलाबी रंगाचे, गोरे किंवा सावळे असावेत. ज्या माणसांना सुखी दाखवायचे असेल, बुद्धिमान लोकांनी त्यांचा रंग गोरा करावा.

**कुकर्मिणो ग्रहग्रस्ताः व्याधितास्तपसि स्थिताः।**
**आयस्तकर्मिणश्चैव ह्यसिताश्च कुजातयः ॥ १०६ ॥**

**पदच्छेदः–** कुकर्मिणः ग्रहग्रस्ताः व्याधिताः तपसि स्थिताः।
आयस्त-कर्मिणः च एव हि असिताः च कुजातयः ॥ १०६ ॥

**अन्वयः –** कुकर्मिणः ग्रहग्रस्ताः व्याधिताः तपसि स्थिताः आयस्तकर्मिणः कुजातयः च हि असिताः (कर्तव्याः)। (कुकर्मिणः इति कुत्सितं निन्दितं कर्म येषाम्। आयस्तं शरीरक्लेशबहुलं कर्म येषामित्यर्थः। कुजातयो धीवरडोम्बाद्याः। - अ. भा.)

**अर्थ** – निंदित कर्म करणारे, ग्रहांची पीडा सहन करत असलेले, रोगी, तपस्या करणारे, शारीरिक त्रासाची कामे करणारे, कुजातीचे लोक जसे धीवर डोंब इत्यादी हे गौरवर्णाचे दाखवू नयेत.

**ऋषयश्चैव कर्तव्या नित्यं तु बदरप्रभाः।**
**तपःस्थिताश्च ऋषयो नित्यमेवासिता बुधैः ॥ १०७ ॥**

**पदच्छेदः–** ऋषयः च एव कर्तव्याः नित्यम् तु बदरप्रभाः।
तपःस्थिताः च ऋषयः नित्यम् एव असिताः बुधैः ॥ १०७ ॥

**अन्वयः –** ऋषयः तु नित्यम् बदरप्रभाः कर्तव्याः। तपःस्थिताः च ऋषयः बुधैः नित्यम् एव असिताः (कर्तव्याः)।

**अर्थ** – ऋषींसाठी नेहमी परिपक्व बोराच्या रंगासारखा रंग वापरावा आणि तपस्या करणाऱ्या ऋषींसाठी बुद्धिमान लोकांनी गौरवर्ण वापरू नये.

**कारणव्यपदेशेन तथा चात्मेच्छया पुनः।**
**वर्णस्तत्र प्रकर्तव्यो देशजातिवशानुगः ॥ १०८ ॥**

**पदच्छेदः–** कारणव्यपदेशेन तथा च आत्मेच्छया पुनः।
वर्णः तत्र प्रकर्तव्यः देश-जाति-वश-अनुगः ॥ १०८ ॥

**अन्वय: –** तत्र कारणव्यपदेशेन तथा च पुन: आत्मेच्छया देशजातिवशानुग: वर्ण: प्रकर्तव्य: | (तत्रेति भारते)

**अर्थ –** भारतात काही विशिष्ट कारण असेल अथवा स्वत:ची इच्छा असेल तर त्या त्या देश, जातीनुसारही ऋषींसाठी रंग ठरवावेत .

**देशं कर्म च जातिं च पृथिव्युद्देशसंश्रयम् |**
**विज्ञाय वर्तना कार्या पुरुषाणां प्रयोगत: || १०९ ||**

**पदच्छेद: –** देशम् कर्म च जातिम् च पृथिवी-उद्देश-संश्रयम् |
विज्ञाय वर्तना कार्या पुरुषाणां प्रयोगत: || १०९ ||

**अन्वय: –** देशम् कर्म च जातिम् पृथिव्युद्देशसंश्रयम् च विज्ञाय प्रयोगत: पुरुषाणाम् वर्तना कार्या |

**अर्थ –** देश, कर्म, जाती आणि पृथ्वीवरील मूळ स्थान समजून प्रयोगाप्रमाणे पुरुषांनी वर्तन करावे .

**किरातबर्बरान्ध्राश्च द्रविडा: काशिकोसला: |**
**पुलिन्दा दाक्षिणात्याश्च प्रायेण त्वसिता: स्मृता: || ११० ||**

**पदच्छेद: –** किरात-बर्बर-आन्ध्रा: च द्रविडा: काशि-कोसला: |
पुलिन्दा: दाक्षिणात्या: च प्रायेण तु असिता: स्मृता: || ११० ||

**अन्वय: –** किरातबर्बरान्ध्रा: द्रविडा: च काशिकोसला: पुलिन्दा: दाक्षिणात्या: च प्रायेण तु असिता: स्मृता: |

**अर्थ –** किरात, बर्बर, आंध्र, द्रविड, काशी, कोसल, पुलिंद, दाक्षिणात्य हे मुख्यत्वे गौरवर्णीय नसतात असे सांगितले गेले आहे .

**शकाश्च यवनाश्चैव पह्लवा बाह्लिकाश्च ये |**
**प्रायेण गौरा: कर्तव्या उत्तरां ये श्रिता दिशम् || १११ ||**

**पदच्छेद: –** शका: च यवना: च एव पह्लवा: बाह्लिका: च ये |
प्रायेण गौरा: कर्तव्या: उत्तराम् ये श्रिता: दिशम् || १११ ||

**अन्वयः –** ये शकाः यवनाः पह्लवाः बाल्हिकाः ये उत्तराम् दिशम् श्रिताः (ते) प्रायेण गौराः कर्तव्याः |

**अर्थ –** जे शक, यवन, पल्हव, बाल्हिक, तसेच जे लोक उत्तर दिशेला राहतात ते मुख्यतः गौरवर्णीय असावेत .

**पाञ्चालाः शौरसेनाश्च माहिषाश्चौड्रमागधाः |**
**अङ्गा वङ्गाः कलिङ्गाश्च श्यामाः कार्यास्तु वर्णतः || ११२ ||**

**पदच्छेदः –** पाञ्चालाः शौरसेनाः च माहिषाः च औड्रमागधाः |
अङ्गाः वङ्गाः कलिङ्गाः च श्यामाः कार्याः तु वर्णतः || ११२ ||

**अन्वयः –** पाञ्चालाः शौरसेनाः च माहिषाः च औड्रमागधाः अङ्गाः वङ्गाः कलिङ्गाः च वर्णतः तु श्यामाः कार्याः |

**अर्थ –** पांचाल, शौरसेन (मथुरेला राहणारे), माहिष, औड्रमागधी (उडीसाला राहणारे), अंगदेश (भागलपुरचे निवासी किंवा त्याच्या जवळचे क्षेत्र), वंग (वंगाल) आणि कलिंगवासी लोक हे सावळे असावेत .

**ब्राह्मणाः क्षत्रियाश्चैव गौराः कार्यास्तथैव हि |**
**वैश्याः शूद्रास्तथा चैव श्यामाः कार्यास्तु वर्णतः || ११३ ||**

**पदच्छेदः –** ब्राह्मणाः क्षत्रियाः च एव गौराः कार्याः तथा एव हि |
वैश्याः शूद्राः तथा च एव श्यामाः कार्याः तु वर्णतः || ११३ ||

**अन्वयः –** ब्राह्मणाः एव च क्षत्रियाः गौराः कार्याः | तथा एव हि वैश्याः तथा च शूद्राः वर्णतः श्यामाः कार्याः |

**अर्थ –** ब्राह्मण आणि क्षत्रियांचा रंग गोरा असावा . तसेच वैश्य आणि शूद्र हे रंगाने सावळे असावेत .

**एवं कृत्वा यथान्यायं मुखाङ्गोपाङ्गवर्तनाम् |**
**श्मश्रुकर्म प्रयुञ्जीत देशकालवयोऽनुगम् || ११४ ||**

**पदच्छेद:** – एवम् कृत्वा यथान्यायम् मुखाङ्ग-उपाङ्ग-वर्तनाम् |
श्मश्रुकर्म प्रयुञ्जीत देशकालवय:-अनुगम् || ११४ ||

**अन्वय:** – एवम् यथान्यायम् मुखाङ्गोपाङ्गवर्तनाम् कृत्वा देशकालवय: अनुगम् श्मश्रुकर्म प्रयुञ्जीत |

**अर्थ** – याप्रमाणे नीतिनुसार मुखांग आणि उपांगांचा विनियोग करून देश, काल आणि वयाप्रमाणे न्हाव्याचे काम करावे .

**❖ श्मश्रूभूषा ❖**

**शुद्धं विचित्रं श्यामं च तथा रोमशमेव च |**
**भवेच्चतुर्विधं श्मश्रु नानावस्थान्तरात्मकम् || ११५ ||**

**पदच्छेद:** – शुद्धम् विचित्रम् श्यामम् च तथा रोमशम् एव च |
भवेत् चतुर्विधम् श्मश्रु नाना-अवस्थान्तरात्मकम् || ११५ ||

**अन्वय:** – श्मश्रु शुद्धम् विचित्रम् श्यामम् च तथा एव च रोमशम् (इति) चतुर्विधम् नानावस्थान्तरात्मकम् भवेत् | (शुद्धमिति क्षुरेण, सर्वथा चासितं, श्यामं पूर्वं क्षुरकर्म योजितम् अपि इदानीं निवारितं तत् योजनाङ्कम् | विचित्रमिति क्षुरकर्त्रिकाकर्मणा उत्पादनकर्मणा च रचितविचित्रसंनिवेशम् | रोमशमिति यथोत्पन्नम् | - अ . भा . )

**अर्थ** – विविध अवस्थेप्रमाणे शुद्ध (ब्लेडने पूर्ण स्वच्छ करणे), विचित्र (विशेष प्रकारे कोरलेली), श्याम (पूर्वी न्हाव्याने कोरलेली परंतु पुढच्या वेळी न कापता वाढवलेली) आणि रोमश (नैसर्गिकरीत्या वाढलेली) अशा चार प्रकारच्या मिश्या सांगितल्या आहेत .

**शुद्धं तु लिङ्गिनां कार्यं तथामात्यपुरोधसाम् |**
**मध्यस्था ये च पुरुषा ये च दीक्षां समाश्रिता: || ११६ ||**
**दिव्या ये पुरुषा: केचित्सिद्धविद्याधरादय: |**
**पार्थिवाश्च कुमाराश्च ये च राजोपजीविन: || ११७ ||**
**शृङ्गारिणश्च ये मर्त्या यौवनोन्मादिनश्च ये |**
**तेषां विचित्रं कर्तव्यं श्मश्रु नाट्यप्रयोक्तृभि: || ११८ ||**

**पदच्छेद:** – शुद्धम् तु लिङ्गिनाम् कार्यम् तथा अमात्य-पुरोधसाम् |
मध्यस्था: ये च पुरुषा: ये च दीक्षाम् समाश्रिता: || ११६ ||
दिव्या: ये पुरुषा: केचित् सिद्ध-विद्याधर-आदय: |
पार्थिवा: च कुमारा: च ये च राजोपजीविन: || ११७ ||
शृङ्गारिण: च ये मर्त्या: यौवन-उन्मादिन: च ये |
तेषाम् विचित्रम् कर्तव्यम् श्मश्रु नाट्य-प्रयोक्तृभि: || ११८ ||

**अन्वय:** – लिङ्गिनाम् तथा अमात्यपुरोधसाम् तु शुद्धम् (श्मश्रु) कार्यम् | ये च मध्यस्था: पुरुषा: ये च दीक्षाम् समाश्रिता:, सिद्धविद्याधरादय: ये केचित् दिव्या: पुरुषा:, पार्थिवा: कुमारा: च ये च राजोपजीविन:, ये च शृङ्गरिण: मर्त्या:, ये च यौवनोन्मादिन: तेषाम् विचित्रम् श्मश्रु नाट्यप्रयोक्तृभि: कर्तव्यम् | (लिङ्गिनामपि ब्रह्मचारि-वानप्रस्थ-आदीनाम् मध्यस्थ इति न उत्तमानाम् अधमानाम् इत्यर्थ: यौवनोन्मादिन इति अमात्यपुरोधसोऽपि इति भाव: | - अ. भा.)

**अर्थ** – संन्यासी, अमात्य आणि पुरोहितांची मिशी 'शुद्ध' असावी. नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी, जे उत्तम नाहीत आणि अधमही नाहीत परंतु मध्यस्थ पुरुष आहेत, तसेच ज्यांनी दीक्षा घेतली आहे, जे सिद्ध, विद्याधर इत्यादी दिव्य पुरुष आहेत, राजे, कुमार आणि जे राजाच्या कृपेवर जगणारे आहेत, जी माणसे शृंगारी व यौवनाने उन्मत्त आहेत (अमात्य आणि पुरोहित जर शृंगारी आणि यौवनाने उन्मत्त असतील तर त्यांची) अशा सर्वांची मिशी 'विचित्र' करावी.

**अनिस्तीर्णप्रतिज्ञानां दु:खितानां तपस्विनाम् |**
**व्यसनाभिहतानां च श्यामं श्मश्रु प्रयोजयेत् || ११९ ||**

**पदच्छेद:** – अनिस्तीर्णप्रतिज्ञानाम् दु:खितानाम् तपस्विनाम् |
व्यसन-अभिहतानाम् च श्यामम् श्मश्रु प्रयोजयेत् || ११९ ||

**अन्वय:** – अनिस्तीर्णप्रतिज्ञानाम् दु:खितानाम् तपस्विनाम् व्यसनाभिहतानाम् च श्यामम् श्मश्रु प्रयोजयेत् |

**अर्थ** – प्रतिज्ञेचे पालन न करणारे, दु:खी, तपस्वी आणि व्यसनाने ग्रासलेल्यांची मिशी 'श्याम' (पूर्वी न्हाव्याने कोरलेली परंतु पुढच्या वेळी न कापता वाढवलेली) असावी .

**ऋषीणां तापसानां च ये च दीर्घव्रता नरा: |**
**तथा च चीरबद्धानां रोमशं श्मश्रु कीर्तितम् || १२० ||**

**पदच्छेद:** – ऋषीणाम् तापसानाम् च ये च दीर्घव्रता: नरा: |
तथा च चीरबद्धानाम् रोमशम् श्मश्रु कीर्तितम् || १२० ||

**अन्वय:** – ऋषीणाम् तापसानाम् च ये दीर्घव्रता नरा: तथा च चीरबद्धानाम् रोमशम् श्मश्रु कीर्तितम् |

**अर्थ** – ज्या ऋषींमध्ये, तपस्वी लोकांमध्ये जे दीर्घ काळ व्रत धारण केलेले पुरुष आहेत आणि ज्यांनी वल्कले धारण केलेली आहे अशांची मिशी 'रोमश' असावी .

**एवं नानाप्रकारं तु श्मश्रु कार्यं प्रयोक्तृभि: |**
**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि वेषान्नानाप्रयोगजान् || १२१ ||**

**पदच्छेद:** – एवम् नानाप्रकारम् तु श्मश्रु कार्यम् प्रयोक्तृभि: |
अत: ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि वेषान् नानाप्रयोगजान् || १२१ ||

**अन्वय:** – प्रयोक्तृभि: एवम् नानाप्रकारम् तु श्मश्रु कार्यम् | अत: ऊर्ध्वम् नानाप्रयोगजान् वेषान् प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – याप्रमाणे नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी विविध प्रकारच्या मिशांची योजना करावी . यानंतर मी विविध प्रयोगांनुसार तयार केल्या जाणाऱ्या वेषभूषांविषयी सांगेन .

**❖ वेशभूषा ❖**

**शुद्धो विचित्रो मलिनस्त्रिविधो वेष उच्यते |**
**तेषां नियोगं वक्ष्यामि यथावदनुपूर्वश: || १२२ ||**

**पदच्छेद:** – शुद्ध: विचित्र: मलिन: त्रिविध: वेष: उच्यते |
तेषाम् नियोगम् वक्ष्यामि यथावत् अनुपूर्वश: || १२२ ||

**अन्वय:** – वेष: शुद्ध: विचित्र: मलिन: (इति) त्रिविध: उच्यते | तेषाम् नियोगम् यथावत् अनुपूर्वश: वक्ष्यामि |

**अर्थ** – शुद्ध, विचित्र आणि मलिन असे तीन प्रकारचे वेष सांगितले जातात . त्यांचे विनियोग जसेच्या तसे क्रमश: सांगेन .

**देवाभिगमने चैव मङ्गले नियमस्थिते |**
**तिथिनक्षत्रयोगे च विवाहकरणे तथा || १२३ ||**
**धर्मप्रवृत्तं यत्कर्म स्त्रियो वा पुरुषस्य वा |**
**वेषस्तेषां भवेच्छुद्धो ये च प्रायत्निका नरा: || १२४ ||**

**पदच्छेद:** – देव-अभिगमने च एव मङ्गले नियम-स्थिते |
तिथि-नक्षत्र-योगे च विवाह-करणे तथा || १२३ ||
धर्मप्रवृत्तम् यत् कर्म स्त्रिय: वा पुरुषस्य वा |
वेष: तेषाम् भवेत् शुद्ध: ये च प्रायत्निका: नरा: || १२४ ||

**अन्वय:** – देवाभिगमने मङ्गले नियमस्थिते तिथिनक्षत्रयोगे तथा च विवाहकरणे यत् स्त्रिय: वा पुरुषस्य वा धर्मप्रवृत्तम् कर्म ये च प्रायत्निका: नरा: तेषाम् वेष: शुद्ध: भवेत् |

**अर्थ** – देवतांच्या अभिगमनासाठी, मंगलकार्यामध्ये, नियमानुसार करावयाचे असेल तेव्हा, तिथी नक्षत्र आणि योग असताना, विवाह करीत असताना, स्त्री-पुरुषांच्या धार्मिक कार्यासाठी व जे प्रयत्नशील पुरुष आहेत या सर्वांचा वेष शुभ असावा .

**देवदानवयक्षाणां गन्धर्वोरगरक्षसाम् |**
**नृपाणां कर्कशानां च चित्रो वेष उदाहृत: || १२५ ||**

**पदच्छेद:** – देव-दानव-यक्षाणाम् गन्धर्व-उरगरक्षसाम् |
नृपाणाम् कर्कशानाम् च चित्र: वेष: उदाहृत: || १२५ ||

**अन्वय:** – देवदानवयक्षाणाम् गन्धर्वोरगरक्षसाम् नृपाणाम् कर्कशानाम् च चित्र: वेष: उदाहृत: |

**अर्थ** – देव, दानव, यक्ष, गंधर्व, सर्प, राक्षस, राजे आणि कर्कश प्रकृतीच्या व्यक्तिंसाठी विचित्र (विशेष पद्धतीने तयार केलेल्या ) वेषाचा वापर करावा .

**वृद्धानां ब्राह्मणानां च श्रेष्ठ्यमात्यपुरोधसाम् |**
**वणिजां काञ्चुकीयानां तथा चैव तपस्विनाम् || १२६ ||**
**विप्रक्षत्रियवैश्यानां स्थानीया ये च मानवा: |**
**शुद्धो वस्त्रविधिस्तेषां कर्तव्यो नाटकाश्रय: || १२७ ||**

**पदच्छेद: –** वृद्धानाम् ब्राह्मणानाम् च श्रेष्ठी-अमात्य-पुरोधसाम् |
वणिजाम् काञ्चुकीयानाम् तथा च एव तपस्विनाम् || १२६ ||
विप्र-क्षत्रिय-वैश्यानाम् स्थानीया: ये च मानवा: |
शुद्ध: वस्त्रविधि: तेषाम् कर्तव्य: नाटक-आश्रय: || १२७ ||

**अन्वय: –** वृद्धानाम् ब्राह्मणानाम् श्रेष्ठी-अमात्य-पुरोधसाम् वणिजाम् काञ्चुकीयानाम् तथा च तपस्विनाम् विप्र-क्षत्रिय-वैश्यानाम् ये च स्थानीया: मानवा: तेषाम् नाटकाश्रय: वस्त्रविधि: शुद्ध: कर्तव्य:।

**अर्थ –** वृद्ध पुरुष, ब्राह्मण, व्यापारी, अमात्य, पुरोहित, वाणी, कंचुकी आणि तसेच तपस्वी, ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या पात्रांसाठी जी स्थानीय माणसे नाटकामध्ये दाखविली जातात, त्यांचे वस्त्र शुभ्र असावे .

**उन्मत्तानां प्रमत्तानामध्वगानां तथैव च |**
**व्यसनोपहतानां च मलिनो वेष उच्यते || १२८ ||**

**पदच्छेद: –** उन्मत्तानाम् प्रमत्तानाम् अध्वगानाम् तथा एव च |
व्यसन-उपहतानाम् च मलिन: वेष: उच्यते || १२८ ||

**अन्वय: –** उन्मत्तानाम् प्रमत्तानाम् अध्वगानाम् तथा एव च व्यसनोपहतानाम् च मलिन: वेष: उच्यते |

**अर्थ –** उन्मत, प्रमत्त, वाटसरू आणि व्यसनी व्यक्तींचे वेष मलिन असावेत, असे सांगितले आहेत .

**शुद्धरक्तविचित्राणि वासांस्यूर्ध्वाम्बराणि च |**
**योजयेन्नाट्यतत्त्वज्ञो वेषयो: शुद्धचित्रयो: || १२९ ||**

**कुर्याद्वेषे तु मलिने मलिनं तु विचक्षणः |**

**पदच्छेदः** – शुद्ध-रक्त-विचित्राणि वासांसि ऊर्ध्व-अम्बराणि च |
योजयेत् नाट्य-तत्त्वज्ञः वेपयोः शुद्धचित्रयोः || १२९ ||
कुर्यात् वेषे तु मलिने मलिनम् तु विचक्षणः |

**अन्वयः** – नाट्यतत्त्वज्ञः शुद्धचित्रयोः वेषयोः शुद्धरक्तविचित्राणि वासांसि ऊर्ध्वाम्बराणि च योजयेत् | मलिने वेषे विचक्षणः मलिनम् वस्त्रम् कुर्यात् |

**अर्थ** – नाटकाची तत्त्वे जाणणाऱ्यांनी शुद्ध आणि विचित्र वेषांच्या बाबतीत शुभ्र, रक्त आणि विशेष तयार केलेल्या वस्त्रांचा आणि शरीराच्या वरच्या भागावर परिधान करण्यासाठीच्या वस्त्रांचा वापर करावा. मलिन वेश दाखवायचा असेल तर बुद्धिमान आयोजकांनी मलिन वस्त्र धारण करावे.

**मुनिनिर्ग्रन्थशाक्येषु यतिपाशुपतेषु च || १३० ||**
**व्रतानुगस्तु कर्तव्यो वेषो लोकस्वभावतः |**

**पदच्छेदः** – मुनि-निर्ग्रन्थ-शाक्येषु यति-पाशुपतेषु च || १३० ||
व्रतानुगः तु कर्तव्यः वेषः लोकस्वभावतः |

**अन्वयः** – मुनिनिर्ग्रन्थशाक्येषु यतिपाशुपतेषु च लोकस्वभावतः तु व्रतानुगः वेषः कर्तव्यः |

**अर्थ** – मुनी, दिगंबर पंथीय, बौद्ध भिक्षुक, यती, शैव साधू यांच्या लौकिक आचरणानुसार व्रताप्रमाणे त्यांचे वेष असावेत.

**चीरवल्कलचर्माणि तापसानां तु योजयेत् || १३१ ||**
**परिव्राण्मुनिशाक्यानां वासः काषायमिष्यते |**
**नानाचित्राणि वासांसि कुर्यात्पाशुपतेष्वथ || १३२ ||**

**पदच्छेदः** – चीरवल्कलचर्माणि तापसानाम् तु योजयेत् || १३१ ||
परिव्राण्मुनिशाक्यानां वासः काषायम् इष्यते |
नानाचित्राणि वासांसि कुर्यात् पाशुपतेषु अथ || १३२ ||

**अन्वय:** – तापसानाम् तु चीरवल्कलचर्माणि योजयेत् | परिव्राण्मुनिशाक्यानाम् वास: कापायम् इष्यते | अथ पाशुपतेषु नानाचित्राणि वासांसि कुर्यात् | (चीरमिति अवितता स्थूला च वृक्षत्वक्, वल्कलम् तु तद्विपरीतम्, यथा भूर्जपत्रत्वक्, मृगादेश्चर्म | - अ.भा.)

**अर्थ** – तपस्वी जनांसाठी चीर, वल्कल आणि चामडे यांपासून बनविलेले वस्त्र वापरावे. परिव्राजक, मुनी, बौद्ध यांसाठी कषाय वस्त्र योजावीत. शैव साधूंची वस्त्रे विविध प्रकारची असावीत. (चीरवस्त्र म्हणजे झाडाच्या न ताणल्या जाणाऱ्या आणि अतिशय जाड अशा सालीपासून तयार केलेले वस्त्र, यांपेक्षा वेगळी अशी जी झाडाची साल जसे भूर्जपत्राच्या झाडाची साल तिच्यापासून केल्या जाणाऱ्या वस्त्रास वल्कले म्हणतात, याशिवाय मृग इत्यादी प्राण्यांच्या चामड्यापासून तयार केलेले वस्त्र म्हणजे चर्मवस्त्र. - अ.भा.)

**कुजातयश्च ये प्रोक्तास्तेषां चैव यथार्हत: |**
**अन्त:पुरप्रवेशे च विनियुक्ता हि ये नरा: || १३३ ||**
**काषायकञ्चुकपटा: कार्यास्तेऽपि यथाविधि |**
**अवस्थान्तरतश्चैवं नृणां वेषो भवेदथ || १३४ ||**

**पदच्छेद:** – कुजातय: च ये प्रोक्ता: तेषाम् च एव यथार्हत: |
अन्त:पुरप्रवेशे च विनियुक्ता: हि ये नरा: || १३३ ||
काषाय-कञ्चुक-पटा: कार्या: ते अपि यथाविधि |
अवस्थान्तरत: च एवम् नृणाम् वेष: भवेत् अथ || १३४ ||

**अन्वय:** – ये च कुजातय: प्रोक्ता: तेषाम् एव च यथार्हत: (वेष: कार्य:) | ये हि नरा: अन्त:पुरप्रवेशे च विनियुक्ता: ते अपि यथाविधि काषायकञ्चुकपटा: कार्या: | अथ एवम् च अवस्थान्तरत: नृणाम् वेष: भवेत् |

**अर्थ** – जी कुजातीचे लोक आहेत त्यांचे वेष त्यांच्या पात्रतेनुसार करावेत. अंत:पुरामध्ये प्रवेश करणारे जे पुरुष नियुक्त केले आहेत त्यांचेही वस्त्र नियमांनुसार कषाय रंगाचे किंवा कंचुकीसारखे असावेत. तसेच वेगवेगळ्या अवस्थांप्रमाणे मनुष्यांचे वेष असावेत.

**वेष: सांग्रामिकश्चैव शूराणां संप्रकीर्तित: |**
**विचित्रशस्त्रकवचो बद्धतूणो धनुर्धर: || १३५ ||**

**पदच्छेद:** – वेष: सांग्रामिक: च एव शूराणाम् संप्रकीर्तित: |
विचित्र-शस्त्र-कवच: बद्धतूण: धनुर्धर: || १३५ ||

**अन्वय:** – सांग्रामिक: विचित्रशस्त्रकवच: बद्धतूण: धनुर्धर: इति शूराणाम् वेष: संप्रकीर्तित: |

**अर्थ** – युद्धामध्ये लढण्यास योग्य असा, विशिष्ट शस्त्र आणि कवच असणारा, तूणीर (ज्यामध्ये बाण ठेवतात तो पाठीवर बांधायचा कोष) आणि धनुष्य असणारा असा जो वेष असतो तो शूरांसाठी सांगितला गेला आहे .

**चित्रो वेषस्तु कर्तव्यो नृपाणां नित्यमेव च |**
**केवलस्तु भवेच्छुद्धो नक्षत्रोत्पातमङ्गले || १३६ ||**

**पदच्छेद:** – चित्र: वेष: तु कर्तव्य: नृपाणाम् नित्यम् एव च |
केवल: तु भवेत् शुद्ध: नक्षत्र-उत्पात-मङ्गले || १३६ ||

**अन्वय:** – नृपाणाम् नित्यम् एव च चित्र: वेष: तु कर्तव्य: | नक्षत्रोत्पातमङ्गले तु केवल: शुद्ध: भवेत् | (नक्षत्रेति नक्षत्र-उत्पात-प्रशमनार्थं यन्मङ्गलं, एतच्च नैमित्तिकस्य श्राद्ध-देवार्चना-आदे: अपि उपलक्षणम् | - अ . भा . )

**अर्थ** – राजांचा वेष हा नेहमी विशेष बनविलेला (designer costume) असावा . फक्त नक्षत्र आणि उत्पात यांची शांती करण्यासाठी जे मंगल कार्य केले जाते अशावेळी त्यांनी शुभ्र वस्त्र असावे . याशिवाय काही नैमित्तिक कार्य जसे श्राद्ध, देवपूजा इत्यादींच्या वेळीही राजांनी शुभ्र वस्त्र परिधान करावे .

**एवमेष भवेद्वेषो देशजातिवयोऽनुग: |**
**उत्तमाधममध्यानां स्त्रीणां नृणामथापि च || १३७ ||**

**पदच्छेद:** – एवम् एष: भवेत् वेष: देश-जाति-वय:-अनुग: |
उत्तम-अधम-मध्यानाम् स्त्रीणाम् नृणाम् अथ अपि च || १३७ ||

**अन्वय:** – एवम् उत्तम-अधम-मध्यानाम् स्त्रीणाम् अथ अपि च नृणाम् देशजातिवयोऽनुग: एष: वेष: भवेत्|

**अर्थ** – याप्रमाणे उत्तम, मध्यम आणि अधम पुरुषांचा, स्त्रियांचा आणि तसेच राजांचा वेष हा देश, जाती आणि वयानुसार असावा .

**एवं वस्त्रविधि: कार्य: प्रयोगे नाटकाश्रये |**
**नानावस्थां समासाद्य शुभाशुभकृतस्तथा || १३८ ||**

**पदच्छेद:** – एवम् वस्त्रविधि: कार्य: प्रयोगे नाटकाश्रये |
नाना-अवस्थाम् समासाद्य शुभ-अशुभ-कृत: तथा || १३८ ||

**अन्वय:** – एवम् नाटकाश्रये प्रयोगे नाना-अवस्थाम् समासाद्य तथा शुभाशुभकृत: वस्त्रविधि: कार्य:|

**अर्थ** – अशाप्रकारे नाटकाच्या प्रयोगामध्ये वेगवेगळ्या अवस्थेनुसार शुभ व अशुभ काळ दर्शविणारा वस्त्रविधी आयोजकांनी करावा .

**❖ मुकुटयोजना ❖**

**तथा प्रतिशिरश्चापि कर्तव्यं नाटकाश्रयम् |**
**दिव्यानां मानुषाणां च देशजातिवय:श्रितम् || १३९ ||**

**पदच्छेद:** – तथा प्रतिशिर: च अपि कर्तव्यम् नाटक-आश्रयम् |
दिव्यानाम् मानुषाणाम् च देश-जाति-वय:-श्रितम् || १३९ ||

**अन्वय:** – तथा अपि च दिव्यानाम् मानुषाणाम् च देशजातिवय:श्रितम् नाटकाश्रयम् प्रतिशिर: कर्तव्यम्|

**अर्थ** – तसेच दिव्य पात्रांसाठी आणि मनुष्यांसाठी देश, जाती आणि वयानुसार नाटकावर आधारित अशा मुकुटाची योजना करावी .

**पार्श्वागता मस्तकिनस्तथा चैव किरीटिन: |**
**त्रिविधो मकुटो ज्ञेयो दिव्यपार्थिवसंश्रित: || १४० ||**

**पदच्छेद:** – पार्श्वागता : मस्तकिन : तथा च एव किरीटिन : |
त्रिविध : मकुट : ज्ञेय : दिव्य-पार्थिव-संश्रित : || १४० ||

**अन्वय:** – पार्श्वागता: मस्तकिन: तथा एव च किरीटिन:(इति) दिव्यपार्थिवसंश्रित: त्रिविध: मकुट: ज्ञेय: |

**अर्थ** – दिव्यपुरुष म्हणजे देवता आणि राजा यांचे मुकुट हे पार्श्वागत, मस्तकी आणि किरीटी अशा तीन प्रकारचे असते .

**देवगन्धर्वयक्षाणां पन्नगानां सरक्षसाम् |**
**कर्तव्या नैकविहिता मुकुटा: पार्श्वमौलय: || १४१ ||**

**पदच्छेद:** – देव-गन्धर्व-यक्षाणाम् पन्नगानाम् सरक्षसाम् |
कर्तव्या : नैकविहिता : मुकुटा : पार्श्व-मौलय : || १४१ ||

**अन्वय:** – देवानाम् गन्धर्वानाम् यक्षाणां सरक्षसां पन्नगानां नैकविहिता: पार्श्वमौलय: मुकुटा: कर्तव्या: |

**अर्थ** – देवता, गंधर्व, यक्ष, पन्नग आणि राक्षस यांचे मुकुट विविध प्रकारचे आणि पार्श्वागत असावे .

**उत्तमा ये च दिव्यानां ते च कार्या: किरीटिन: |**
**मध्यमा मौलिनश्चैव कनिष्ठा: पार्श्वमौलिन: || १४२ ||**

**पदच्छेद:** – उत्तमा : ये च दिव्यानाम् ते च कार्या : किरीटिन : |
मध्यमा : मौलिन : च एव कनिष्ठा : पार्श्वमौलिन : || १४२ ||

**अन्वय:** – दिव्यानाम् ये च उत्तमा: ते किरीटिन: च कार्या: | मध्यमा: मौलिन: एव च कनिष्ठा: पार्श्वमौलिन: (किरीटिन : कार्या :) |

**अर्थ** – देवतांमध्ये जे उत्तम आहेत त्यांची मुकुटे 'किरीटी' प्रकारची म्हणजे तुरा असलेली असावीत . जे मध्यम नायक आहेत त्यांची मुकुटे 'मस्तकी' असावीत तथा कनिष्ठ पात्रांची मुकुटे 'पार्श्वमौली' असावीत .

**नराधिपानां कर्तव्या मस्तके मकुटा बुधैः |**
**विद्याधराणां सिद्धानां चारणानां तथैव च || १४३ ||**

**पदच्छेदः** – नराधिपानाम् कर्तव्याः मस्तके मकुटाः बुधैः |
विद्याधराणाम् सिद्धानाम् चारणानाम् तथा एव च || १४३ ||

**अन्वयः** – बुधैः नराधिपानाम् विद्याधराणाम् सिद्धानाम् तथा एव च चारणानाम् मस्तके मकुटाः कर्तव्याः |

**अर्थ** – बुद्धिमान नाट्यशास्त्रज्ञांनी राजे, विद्याधर, सिद्ध आणि स्तुतिपाठक यांच्या डोक्यावर मस्तकी मुकुटाची योजना करावी .

**ग्रन्थिमत्केशमकुटाः कर्तव्यास्तु प्रयोक्तृभिः |**
**रक्षोदानवदैत्यानां पिङ्गकेशेक्षणानि हि || १४४ ||**

**पदच्छेदः** – ग्रन्थिमत्-केश-मकुटाः कर्तव्याः तु प्रयोक्तृभिः |
रक्षो-दानव-दैत्यानाम् पिङ्ग-केश-ईक्षणानि हि || १४४ ||

**अन्वयः** – प्रयोक्तृभिः रक्षोदानवदैत्यानाम् तु ग्रन्थिमत्केशमकुटाः पिङ्गकेशेक्षणानि हि कर्तव्याः |

**अर्थ** – नाट्याचा प्रयोग करणाऱ्यांनी राक्षस, दानव आणि दैत्यांचे मुकुट हे गाठी बांधलेल्या केसांप्रमाणे असावेत आणि केस व डोळे लालसर-तपकिरी रंगाचे करावेत .

**हरिच्छ्मश्रूणि च तथा मकुटास्यानि कारयेत् |**
**उत्तमाश्चापि ये तत्र ते कार्याः पार्श्वमौलिनः || १४५ ||**

**पदच्छेदः** – हरित्-श्मश्रूणि च तथा मकुट-आस्यानि कारयेत् |
उत्तमाः च अपि ये तत्र ते कार्याः पार्श्वमौलिनः || १४५ ||

**अन्वयः** – तथा च (रक्षोदानवदैत्यानां) हरिच्छ्मश्रूणि मकुटास्यानि कारयेत् | अपि च तत्र ये उत्तमाः ते पार्श्वमौलिनः कार्याः |

**अर्थ** – राक्षस, दानव आणि दैत्यांची मुकुटे, मिश्या आणि मुख हिरव्या रंगाचे असावेत आणि

यात जो श्रेष्ठ असेल त्यांना पार्श्वमौली करावे .

**कस्मात्तु मुकुटाः सृष्टाः प्रयोगे दिव्यपार्थिवे |**
**केशानां छेदनं दृष्टं वेदवादे यथाश्रुति || १४६ ||**

**पदच्छेदः** – कस्मात् तु मुकुटाः सृष्टाः प्रयोगे दिव्यपार्थिवे |
केशानाम् छेदनम् दृष्टम् वेदवादे यथाश्रुति || १४६ ||

**अन्वयः** – दिव्यपार्थिवे प्रयोगे कस्मात् तु मुकुटाः सृष्टाः | वेदवादे यथाश्रुति केशानाम् छेदनम् दृष्टम् |

**अर्थ** – देव आणि राजांसाठी विशिष्ट मुकुटाचा वापर का करावा, तर असे म्हटले जाते की वैदिक प्रयोगांमध्ये श्रुतीनुसार केशकर्तन केले जाते .

**भद्रीकृतस्य वा यज्ञे शिरसस्छादनेच्छया |**
**केशानामप्यदीर्घत्वात्स्मृतं मुकुटधारणम् || १४७ ||**

**पदच्छेदः** – भद्रीकृतस्य वा यज्ञे शिरसः छादनेच्छया |
केशानम् अपि अदीर्घत्वात् स्मृतम् मुकुटधारणम् || १४७ ||

**अन्वयः** – यज्ञे भद्रीकृतस्य शिरसः छादनेच्छया अपि वा केशानम् अदीर्घत्वात् मुकुटधारणम् स्मृतम् |

**अर्थ** – यज्ञामध्ये भद्रीकृत म्हणजे मुंडन केलेले डोके झाकण्यासाठी तसेच केस लहान असतील तर मुकुट धारण करावे, असे सांगितले गेले आहे .

**सेनापतेः पुनश्चापि युवराजस्य चैव हि |**
**योजयेदर्धमकुटं महामात्राश्च ये नराः || १४८ ||**

**पदच्छेदः** – सेनापतेः पुनः च अपि युवराजस्य च एव हि |
योजयेत् अर्धमकुटम् महामात्राः च ये नराः || १४८ ||

**अन्वयः** – सेनापतेः युवराजस्य ये नराः महामात्राः च (तेषाम्) अर्धमकुटम् योजयेत् |

**अर्थ** – सेनापती, युवराज आणि मुख्य प्रधान त्यांच्यासाठी अर्धमुकुट वापरावे .

**अमात्यानां कञ्चुकिनां तथा श्रेष्ठिपुरोधसाम् |**
**वेष्टनाबद्धपट्टानि प्रतिशीर्षाणि कारयेत् || १४९ ||**

**पदच्छेद:** – अमात्यानाम् कञ्चुकिनाम् तथा श्रेष्ठि-पुरोधसाम् |
वेष्टना-बद्धपट्टानि प्रतिशीर्षाणि कारयेत् || १४९ ||

**अन्वय:** – अमात्यानाम् कञ्चुकिनाम् तथा श्रेष्ठिपुरोधसाम् वेष्टनाबद्धपट्टानि प्रतिशीर्षाणि कारयेत् | (वेष्टनेति वेष्टनार्थम् आबद्धं पट्टम् उष्णीषप्रायं येषु | - अ . भा . )

**अर्थ** – अमात्य, कंचुकी तसेच व्यापारी आणि पुरोहितांच्या डोक्याला गुंडाळण्यासाठी जे लांब वस्त्र बांधले जाते अशी फेट्यासमान असणारी पगडी बांधावी .

**पिशाचोन्मत्तभूतानां साधकानां तपस्विनाम् |**
**अनिस्तीर्णप्रतिज्ञानां लम्बकेशं भवेच्छिर: || १५० ||**

**पदच्छेद:** – पिशाच-उन्मत्त-भूतानाम् साधकानाम् तपस्विनाम् |
अनिस्तीर्ण-प्रतिज्ञानाम् लम्बकेशम् भवेत् शिर: || १५० ||

**अन्वय:** – पिशाचानाम् उन्मत्तानाम् भूतानाम् साधकानाम् तपस्विनाम् अनिस्तीर्णप्रतिज्ञानाम् शिर: लम्बकेशम् भवेत् |

**अर्थ** – पिशाच, उन्मत्त, भूत, साधक, तपस्वी आणि प्रतिज्ञा पूर्ण झालेली नसेल (चाणक्य, द्रौपदी इत्यादी ) तर अशा लोकांच्या मस्तकावरील केस लांब असावे .

**शाक्यश्रोत्रियनिर्ग्रन्थपरिव्राड्दीक्षितेषु च |**
**शिरोमुण्डं तु कर्तव्यं यज्ञदीक्षान्वितेषु च || १५१ ||**

**पदच्छेद:** – शाक्य-श्रोत्रिय-निर्ग्रन्थ-परिव्राट्-दीक्षितेषु च |
शिरोमुण्डम् तु कर्तव्यम् यज्ञ-दीक्षा-अन्वितेषु च || १५१ ||

**अन्वय:** – शाक्यश्रोत्रियनिर्ग्रन्थपरिव्राड्दीक्षितेषु च यज्ञदीक्षान्वितेषु च शिरोमुण्डम् तु कर्तव्यम् |

**अर्थ** – बौद्ध भिक्षुक, श्रोत्रिय, जैन साधू, परिव्राजक, दीक्षित आणि यज्ञामध्ये दीक्षा घेणाऱ्या लोकांच्या मस्तकाचे मुंडन करावे .

**तथा व्रतानुगं चैव शेषाणां लिङ्गिनां शिर: |**
**मुण्डं वा कुञ्चितं वापि लम्बकेशमथापि वा || १५२ ||**

**पदच्छेद:** – तथा व्रतानुगम् च एव शेषाणाम् लिङ्गिनाम् शिर: |
मुण्डम् वा कुञ्चितम् वा अपि लम्बकेशम् अथ अपि वा || १५२ ||

**अन्वय:** – शेषाणाम् लिङ्गिनाम् शिर: व्रतानुगम् मुण्डम् कुञ्चितम् अपि वा लम्बकेशम् वा (कर्तव्यम्) |

**अर्थ** – उरलेल्या साधूंच्या मस्तकाचे व्रतानुसार मुंडन करावे किंवा मस्तकावर कुरळे ठेवावेत अथवा लांब केस करावेत .

**धूर्तानां चापि कर्तव्यं ये च रात्र्युपजीविन: |**
**शृङ्गारचित्ता: पुरुषास्तेषां कुञ्चितमूर्धजा: || १५३ ||**

**पदच्छेद:** – धूर्तानाम् च अपि कर्तव्यम् ये च रात्रि-उपजीविन: |
शृङ्गार-चित्ता: पुरुषा: तेषाम् कुञ्चित-मूर्धजा: || १५३ ||

**अन्वय:** – धूर्तानाम् च अपि कर्तव्यम् | ये रात्र्युपजीविन: शृङ्गारचित्ता: पुरुषा: च तेषां कुञ्चितमूर्धजा: स्यु: |

**अर्थ** – लंपट पुरुषांचेही केस कुरळे करावेत . तसेच जे निशाचर आहेत आणि शृंगाररस प्रिय असलेले कामी पुरुष आहेत त्यांचे केस कुरळे असावेत .

**बालानामपि कर्तव्यं त्रिशिखण्डविभूषितम् |**
**जटामकुटबद्धं च मुनीनां तु भवेच्छिर: || १५४ ||**

**पदच्छेद:** – बालानाम् अपि कर्तव्यम् त्रिशिखण्ड-विभूषितम् |
जटा-मकुट-बद्धम् च मुनीनाम् तु भवेत् शिर: || १५४ ||

**अन्वय:** – बालानाम् अपि त्रिशिखण्डविभूषितम् (शिर:) कर्तव्यम् | मुनीनाम् च जटामकुटबद्धम् शिर: तु भवेत् | (त्रिखण्डाश्चूलिका: त्रिशिखण्डम् | - अ . भा . )

**अर्थ** – लहान मुलांच्या तीन चूलिका असाव्यात किंवा मुंडन करावे आणि मुनींच्या डोक्यावर जटारूपी मुकुट असावा .

**चेटानामपि कर्तव्यं त्रिशिखं मुण्डमेव वा |**
**विदूषकस्य खलतिः स्यात्काकपदमेव वा || १५५ ||**

**पदच्छेदः** – चेटानाम् अपि कर्तव्यम् त्रिशिखम् मुण्डम् एव वा |
विदूषकस्य खलतिः स्यात् काकपदम् एव वा || १५५ ||

**अन्वयः** – चेटानाम् अपि त्रिशिखम् मुण्डम् एव वा कर्तव्यम् | विदूषकस्य खलतिः एव वा काकपदम् स्यात् |

**अर्थ** – शिष्यांच्या डोक्यावर तीन शिखा असाव्यात किंवा मुंडन करावे. विदूषक मुंडन असलेला किंवा काकपदासारखे केस असलेला असावा.

**शेषाणामर्थयोगेन देशजातिसमाश्रयम् |**
**शिरः प्रयोक्तृभिः कार्यं नानावस्थान्तराश्रयम् || १५६ ||**

**पदच्छेदः** – शेषाणाम् अर्थयोगेन देश-जाति-समाश्रयम् |
शिरः प्रयोक्तृभिः कार्यम् नाना-अवस्थान्तर-आश्रयम् || १५६ ||

**अन्वयः** – प्रयोक्तृभिः शेषाणाम् अर्थयोगेन देशजातिसमाश्रयम् नानावस्थान्तराश्रयम् शिरः कार्यम् |

**अर्थ** – नाट्यप्रयोग करणाऱ्यांनी उरलेल्या लोकांचे मस्तक कथावस्तुप्रमाणे देश, जाती आणि विविध अवस्थांप्रमाणे करावेत.

**भूषणैर्वर्णकैर्वस्त्रैर्माल्यैश्चैव यथाविधि |**
**एवं नानाप्रकारैस्तु बुद्ध्या वेषान्प्रकल्पयेत् || १५७ ||**

**पदच्छेदः** – भूषणैः वर्णकैः वस्त्रैः माल्यैः च एव यथाविधि |
एवम् नानाप्रकारैः तु बुद्ध्या वेषान् प्रकल्पयेत् || १५७ ||

**अन्वयः** – भूषणैः वर्णकैः वस्त्रैः एव च माल्यैः एवम् तु नानाप्रकारैः यथाविधि बुद्ध्या वेषान् प्रकल्पयेत् |

**अर्थ** – आभूषणांद्वारे, रंगांनी, वस्त्र, माळा इत्यादी विविध प्रकारे तर्क-वितर्क करून अनेकविध वेषांचा विचार करावा.

**पूर्वं तु प्रकृतिं स्थाप्य प्रयोगगुणसंभवाम् |**
**स्त्रीणां वा पुरुषाणां वाप्यवस्थां प्राप्य तादृशीम् || १५८ ||**
**सर्वे भावाश्च दिव्यानां कार्या मानुषसंश्रया: |**
**तेषां चानिमिषत्वादि नैव कार्यं प्रयोक्तृभि: || १५९ ||**

**पदच्छेद:** – पूर्वम् तु प्रकृतिम् स्थाप्य प्रयोग-गुण-संभवाम् |
स्त्रीणाम् वा पुरुषाणाम् वा अपि अवस्थाम् प्राप्य तादृशीम् || १५८ ||
सर्वे भावा: च दिव्यानाम् कार्या: मानुषसंश्रया: |
तेषाम् च अनिमिषत्वादि न एव कार्यम् प्रयोक्तृभि: || १५९ ||

**अन्वय:** – पूर्वम् तु प्रयोगगुणसंभवाम् प्रकृतिम् स्थाप्य स्त्रीणाम् पुरुषाणाम् वा तादृशीम् अवस्थाम् प्राप्य दिव्यानाम् सर्वे भावा: च मानुषसंश्रया: कार्या: | प्रयोक्तृभि: तेषाम् अनिमिषत्वादि न कार्यम् |

**अर्थ** – प्रयोगकर्त्यांनी प्रथम प्रयोगाविषयी गुणांची संभाव्यता जाणून घ्यावी आणि स्त्रीपुरुषांची त्या पात्रासमान असलेली अवस्था योग्यरीत्या जाणून घ्यावी म्हणजेच त्या पात्राच्या प्रकृती किंवा स्वभावानुसार सर्व भावांची अभिव्यक्ती करावी. (किंतु प्रयोग करणाऱ्यांनी अनिमेष इत्यादींचा अभिनय करू नये.)

**इह भावरसाश्चैव दृष्टिभि: संप्रतिष्ठिता: |**
**दृष्ट्यैव स्थापितो ह्यर्थ: पश्चादङ्गैर्विभाव्यते || १६० ||**

**पदच्छेद:** – इह भावरसा: च एव दृष्टिभि: संप्रतिष्ठिता: |
दृष्ट्या एव स्थापित: हि अर्थ: पश्चात् अङ्गै: विभाव्यते || १६० ||

**अन्वय:** – इह भावरसा: दृष्टिभि: संप्रतिष्ठिता: | दृष्ट्या एव हि स्थापित: अर्थ: पश्चात् अङ्गै: विभाव्यते |

**अर्थ** – नाट्यप्रयोगामध्ये रस आणि भाव हे संपूर्णपणे दृष्टिंद्वारे ठळकपणे व्यक्त होतात. प्रथमत: अर्थाला (शब्दाच्या अर्थाला) दृष्टीद्वारे अभिव्यक्त करावे आणि नंतर अंगांद्वारे प्रदर्शित करावे.

**एवं ज्ञेयाङ्गरचना नानाप्रकृतिसंभवा |**
**सजीव इति य: प्रोक्तस्तस्य वक्ष्यामि लक्षणम् || १६१ ||**

**पदच्छेद:** – एवम् ज्ञेया अङ्गरचना नाना-प्रकृति-सम्भवा |
सजीव: इति य: प्रोक्त: तस्य वक्ष्यामि लक्षणम् || १६१ ||

**अन्वय:** – एवम् नानाप्रकृतिसंभवा अङ्गरचना ज्ञेया | य: सजीव: इति प्रोक्त: तस्य लक्षणम् वक्ष्यामि |

**अर्थ** – याप्रमाणे विविध प्रकृतींमधून उत्पन्न होणाऱ्या अंगरचनेला जाणून घ्यावे . त्याला सजीव असे म्हणतात . त्याची लक्षणे तुम्हांला सांगतो .

**❖ सजीव ❖**

**य: प्राणिनां प्रवेशो वै सजीव इति संज्ञित: |**
**चतुष्पदोऽथ द्विपदस्तथा चैवापद: स्मृत: || १६२ ||**

**पदच्छेद:** – य: प्राणिनाम् प्रवेश: वै सजीव: इति संज्ञित: |
चतुष्पद: अथ द्विपद: तथा च एव अपद: स्मृत: || १६२ ||

**अन्वय:** – य: प्राणिनां वै प्रवेश: (स:) सजीव: इति संज्ञित: | अथ चतुष्पद: द्विपद: अपद: च स्मृत: |

**अर्थ** – नाट्यामध्ये रंगमंचावर प्राण्यांच्या प्रवेशाला 'सजीव' असे म्हणतात . हे तीन प्रकारचे असतात चतुष्पद, द्विपद आणि पाय नसलेले .

**उरगानपदान्विद्याद्द्विपदान्खगमानुषान् |**
**ग्राम्या आरण्या: पशवो विज्ञेया: स्युश्चतुष्पदा: || १६३ ||**

**पदच्छेद:** – उरगान् अपदान् विद्यात् द्विपदान् खग-मानुषान् |
ग्राम्या: आरण्या: पशव: विज्ञेया: स्यु: चतुष्पदा: || १६३ ||

**अन्वय:** – उरगान् अपदान् विद्यात् | खगमानुषान् द्विपदान् स्यु: | ग्राम्या: आरण्या: पशव: चतुष्पदा: विज्ञेया: |

**अर्थ** – यातील सर्प इत्यादींना अपद म्हणजे पाय नसलेले समजावे. पक्षी व मनुष्यांना द्विपद समजावे. तसेच पाळीव प्राणी आणि जंगली प्राण्यांना चतुष्पद समजावे.

**ये ते तु युद्धसंफेटैरूपरोधैस्तथैव च |**
**नानाप्रहरणोपेताः प्रयोज्या नाटके बुधैः || १६४ ||**

**पदच्छेदः** – ये ते तु युद्धसंफेटैः उपरोधैः तथा एव च |
नाना-प्रहरण-उपेताः प्रयोज्याः नाटके बुधैः || १६४ ||

**अन्वयः** – नाटके ये नानाप्रहरणोपेताः ते युद्धसंफेटैः उपरोधैः तु बुधैः प्रयोज्याः |

**अर्थ** – नाटकातील युद्धप्रसंगी होणारा संफेट आणि उपरोध यांद्वारे विविध प्रकारच्या आयुधांद्वारे विद्वानांनी प्रहार करावा.

**❖ आयुधे आणि उपकरणे ❖**

**आयुधानि च कार्याणि पुरुषाणां प्रमाणतः |**
**तान्यहं वर्तयिष्यामि यथापुस्तप्रमाणतः || १६५ ||**

**पदच्छेदः** – आयुधानि च कार्याणि पुरुषाणाम् प्रमाणतः |
तानि अहम् वर्तयिष्यामि यथापुस्त-प्रमाणतः || १६५ ||

**अन्वयः** – पुरुषाणाम् प्रमाणतः (यानि) आयुधानि च कार्याणि, तानि अहम् यथापुस्तप्रमाणतः वर्तयिष्यामि |

**अर्थ** – पुरुषाच्या बांध्याप्रमाणे आयुधांचा वापर करावा. शास्त्रानुसार त्याचे मापदंड मी तुम्हांला सांगतो.

**भिण्डिर्द्वादशतालः स्याद्दश कुन्तो भवेदथ |**
**अष्टौ शतघ्नी शूलं च तोमरः शक्तिरेव वा || १६६ ||**

**पदच्छेदः** – भिण्डिः द्वादशतालः स्यात् दश कुन्तः भवेत् अथ |
अष्टौ शतघ्नी शूलम् च तोमरः शक्तिः एव वा || १६६ ||

**अन्वय:** – अथ भिण्डि: द्वादशताल: स्यात् | कुन्त: दश भवेत् | शतघ्नी शूलम् च तोमर: एव वा शक्ति: अष्टौ (स्यात्) |

**अर्थ** – 'भिण्डी' बारा ताल मापाचे असावे . 'कुन्त' (भाला) दहा तालांचा , शतघ्नी (तोफ), शूल, तोमर आणि शक्ति आठ तालाची असावी . (अङ्गुष्ठमध्यमामितं ताल: | अंगठ्यापासून मध्यमापर्यंतच्या अंतरास ताल असे म्हणतात . )

**अष्टौ ताला धनुर्ज्ञेयमायामोऽस्य द्विहस्तक: |**
**शरो गदा च वज्रा च चतुस्तालं विधीयते || १६७ ||**

**पदच्छेद:** – अष्टौ ताला धनु: ज्ञेयम् आयाम: अस्य द्विहस्तक: |
शर: गदा च वज्रा च चतुस्तालम् विधीयते || १६७ ||

**अन्वय:** – धनु: अष्टौ ताला ज्ञेयम् | अस्य आयाम: द्विहस्तक: (स्यात्) | शर: गदा च वज्रा च चतुस्तालम् विधीयते |

**अर्थ** – धनुष्याची उंची आठ तालांची आणि रुंदी दोन हातांची हवी . बाण, गदा आणि वज्र हे चार ताल मापाचे असावेत .

**अङ्गुलानि त्वसि: कार्यश्चत्वारिंशत्प्रमाणत: |**
**द्वादशाङ्गुलकं चक्रं ततोऽर्धं प्रास इष्यते || १६८ ||**

**पदच्छेद:** – अङ्गुलानि तु असि: कार्य: चत्वारिंशत् प्रमाणत: |
द्वादशाङ्गुलकम् चक्रम् तत: अर्धम् प्रास: इष्यते || १६८ ||

**अन्वय:** – असि: तु प्रमाणत: चत्वारिंशत् अङ्गुलानि कार्य: | चक्रम् द्वादशाङ्गुलकम् प्रास: तत: अर्धम् इष्यते |

**अर्थ** – 'तलवार' चाळीस बोटांच्या मापाची करावी . 'चक्र' बारा बोटांच्या मापाचे असावे आणि 'प्रास' हे त्याच्याहून अर्ध्या मापाचे म्हणजे सहा बोटांच्या मापाचे करावे .

**प्रासवत्पट्टसं विद्याद्दण्डश्चैव तु विंशति: |**
**विंशति: कणयश्चैव ह्यङ्गुलानि प्रमाणत: || १६९ ||**

**पदच्छेद:** – प्रसवत् पट्टसम् विद्यात् दण्ड: च एव तु विंशति: |
विंशति: कणय: च एव हि अङ्गुलानि प्रमाणत: || १६९ ||

**अन्वय:** – प्रसवत् पट्टसम् विद्यात् | दण्ड: तु विंशति: (स्यात्) | एव च कणय: हि प्रमाणत: विंशति: अङ्गुलानि (स्यात्) |

**अर्थ** – 'प्रस' सारखेच 'पट्टस' असावे. तसेच 'दंड' वीस बोटांच्या मापाचे असावे आणि 'कणय' देखील वीस बोटांच्या मापाचे असावे.

**षोडशाङ्गुलविस्तीर्णं सबलं संप्रघण्टिकम् |**
**त्रिंशदङ्गुलमानेन कर्तव्यं खेटकं बुधैः ||१७०||**

**पदच्छेद:** – षोडश-अङ्गुल-विस्तीर्णम् सबलम् संप्रघण्टिकम् |
त्रिंशत्-अङ्गुलमानेन कर्तव्यम् खेटकम् बुधै: || १७० ||

**अन्वय:** – सबलम् संप्रघण्टिकम् षोडशाङ्गुलविस्तीर्णम् (स्यात्) । बुधै: खेटकम् त्रिंशदङ्गुलमानेन कर्तव्यम् ।

**अर्थ** – संप्रघंटिक सोळा बोट लांब असावी आणि खेटक (ढाल) तीस बोटांच्या मापाचे असावे.

**जर्जरो दण्डकाष्ठं च तथैव प्रतिशीर्षकम् |**
**छत्रं च चामरं चैव ध्वजो भृङ्गार एव च || १७१ ||**

**पदच्छेद:** – जर्जर: दण्डकाष्ठम् च तथा एव प्रतिशीर्षकम् |
छत्रम् च चामरम् च एव ध्वज: भृङ्गार: एव च || १७१ ||

**अन्वय:** – जर्जर: दण्डकाष्ठम् प्रतिशीर्षकम् छत्रम् चामरम् ध्वज: भृङ्गार: च (कर्तव्य:) |

**अर्थ** – जर्जर, दंडकाष्ठ, प्रतिशीर्षक, छत्र, चामर, ध्वज आणि कमंडलू हे देखील तयार करावेत.

**यत्किंचिन्मानुषे लोके द्रव्यं पुंसां प्रयोजकम् |**
**यच्चोपकरणं सर्वं नाट्ये तत्संप्रकीर्तितम् || १७२ ||**

**पदच्छेद:** – यत् किंचित् मानुषे लोके द्रव्यम् पुंसाम् प्रयोजकम् |
यत् च उपकरणम् सर्वम् नाट्ये तत् संप्रकीर्तितम् || १७२ ||

**अन्वय:** – मानुषे लोके यत् किंचित् पुंसाम् द्रव्यम् यत् च उपकरणम् प्रयोजकम् तत् सर्वम् नाट्ये संप्रकीर्तितम् |

**अर्थ** – या मनुष्य लोकांमध्ये जे काही द्रव्य किंवा उपकरणे पुरूषांसाठी उपयोगी आहेत या सर्वांचा वापर मी नाट्यात सांगितला आहे .

**यद्यस्य विषयप्राप्तं तेनोह्यं तस्य लक्षणम् |**
**जर्जरो दण्डकाष्ठं च संप्रवक्ष्यामि लक्षणम् || १७३ ||**

**पदच्छेद:** – यत् यस्य विषयप्राप्तम् तेन ऊह्यम् तस्य लक्षणम् |
जर्जर: दण्डकाष्ठम् च संप्रवक्ष्यामि लक्षणम् || १७३ ||

**अन्वय:** – यत् यस्य विषयप्राप्तम् तेन तस्य लक्षणम् ऊह्यम् | जर्जर: दण्डकाष्ठम् च लक्षणम् संप्रवक्ष्यामि |

**अर्थ** – शास्त्राविषयी जे योग्य आहे त्याप्रमाणे त्या वस्तुंची लक्षणे तुम्ही समजून घ्यावी . यानंतर आता जर्जर आणि दंडकाष्ठाची लक्षणे सांगेन .

**माहेन्द्रा वै ध्वजा: प्रोक्ता लक्षणैर्विश्वकर्मणा |**
**एषामन्यतमं कुर्याज्जर्जरं दारुकर्मत: || १७४ ||**

**पदच्छेद:** – माहेन्द्रा: वै ध्वजा: प्रोक्ता: लक्षणै: विश्वकर्मणा |
एषाम् अन्यतमं कुर्यात् जर्जरम् दारूकर्मत: || १७४ ||

**अन्वय:** – माहेन्द्रा: ध्वजा: विश्वकर्मणा लक्षणै: प्रोक्ता: | एषाम् अन्यतमम् जर्जरम् दारूकर्मत: कुर्यात् |

**अर्थ** – विश्वकर्माने विविध लक्षणांनी युक्त इंद्रध्वज सांगितला आहे, त्यातील एक अशा विविध लक्षणांनी युक्त जर्जराची निर्मिती लाकडाद्वारे करावी . (विश्वकर्माच्या मतानुसार महेंद्राच्या ध्वजाचे विविध प्रकार आढळून येतात . )

❖ जर्जर ❖

**अथवा वृक्षयोनिः स्यात्प्ररोहो वापि जर्जरः |**
**वेणुरेव भवेच्छ्रेष्ठस्तस्य वक्ष्यामि लक्षणम् || १७५ ||**

**पदच्छेदः** – अथवा वृक्षयोनिः स्यात् प्ररोहः वा अपि जर्जरः |
वेणुः एव भवेत् श्रेष्ठः तस्य वक्ष्यामि लक्षणम् || १७५ ||

**अन्वयः** – अथवा प्ररोहः वृक्षयोनिः जर्जरः स्यात् | वेणुः एव श्रेष्ठः भवेत् तस्य लक्षणम् वक्ष्यामि |

**अर्थ** – किंवा वृक्षाच्या मुळापासून किंवा झाडाच्या फांद्यांपासून जर्जर बनवणे शक्य आहे. खरंतर, बांबू हेच जर्जर बनविण्यासाठी श्रेष्ठ असते म्हणून आता मी त्याची लक्षणे तुम्हांला सांगतो.

**श्वेतभूम्यां तु यो जातः पुष्यनक्षत्रजस्तथा |**
**संग्राह्यो वै भवेद्वेणुर्जर्जरार्थे प्रयत्नतः || १७६ ||**

**पदच्छेदः** – श्वेतभूम्याम् तु यः जातः पुष्यनक्षत्रजः तथा |
संग्राह्यः वै भवेत् वेणुः जर्जरार्थे प्रयत्नतः || १७६ ||

**अन्वयः** – यः तु श्वेतभूम्याम् जातः तथा (यः) पुष्यनक्षत्रजः वेणुः जर्जरार्थे प्रयत्नतः संग्राह्यः वै भवेत् |

**अर्थ** – श्वेतभूमिमध्ये (सफेद माती असलेल्या जमिनीमध्ये) जो बांबू उत्पन्न होतो प्रयत्नपूर्वक त्याच बांबूचा वापर जर्जर बनविण्यासाठी करावा.

**प्रमाणमङ्गुलानां तु शतमष्टोत्तरं भवेत् |**
**पञ्चपर्वा चतुर्ग्रन्थिस्तालमात्रस्तथैव च || १७७ ||**

**पदच्छेदः** – प्रमाणम् अङ्गुलानाम् तु शतम् अष्टोत्तरम् भवेत् |
पञ्चपर्वा चतुर्ग्रन्थिः तालमात्रः तथा एव च || १७७ ||

**अन्वयः** – अङ्गुलानाम् तु प्रमाणम् शतम् अष्टोत्तरम् भवेत् | तथा एव च पञ्चपर्वा चतुर्ग्रन्थिः तालमात्रः (भवेत्) |

**अर्थ** – जर्जर हे १०८ बोटांच्या लांबीचे असावे, ज्यामध्ये पाच पेर आणि बांबूच्या चार गाठी असाव्यात. त्या फक्त तालमात्र अंतरावर असाव्यात.

**स्थूलग्रन्थिर्न कर्तव्यो न शाखी न च कीटवान् |**
**न कृमिक्षतपर्वा च न हीनश्चान्यवेणुभिः || १७८ ||**

**पदच्छेद:** – स्थूल-ग्रन्थि: न कर्तव्य: न शाखी न च कीटवान् |
न कृमि-क्षत-पर्वा च न हीन: च अन्य-वेणुभि: || १७८ ||

**अन्वय:** – न स्थूलग्रन्थि: न शाखी न च कीटवान् न च कृमिक्षतपर्वा न च हीन: अन्यवेणुभि: कर्तव्य: |

**अर्थ** – त्यातील गाठी खूप जाड नसाव्यात. त्यातून दुसऱ्या नवीन शाखा अंकुर फुटलेले नसावेत. ते कीटकांनी खाल्लेले नसावे आणि सदोष नसावे. अशा प्रकारचा बांबू जर्जर बनविण्यासाठी योग्य आहे.

**मधुसर्पिस्सर्षपाक्तं माल्यधूपपुरस्कृतम् |**
**उपास्य विधिवद्वेणुं गृह्णीयाज्जर्जरं प्रति || १७९ ||**

**पदच्छेद:** – मधु-सर्पिष्-सर्षप-आक्तम् माल्य-धूप-पुरस्कृतम् |
उपास्य विधिवत् वेणुम् गृह्णीयात् जर्जरम् प्रति || १७९ ||

**अन्वय:** – मधुसर्पिस्सर्षपाक्तम् माल्यधूपपुरस्कृतम् वेणुम् विधिवत् उपास्य जर्जरम् प्रति गृह्णीयात् |

**अर्थ** – काळ्या मोहरीने मिश्रित मध आणि तूपाचा लेप लावून फुलांची माळ चढवून आणि धूप दाखवून बांबूची विधिपूर्वक उपासना करावी आणि मग त्या बांबूचे जर्जर बनविण्यासाठी ग्रहण करावे.

**यो विधिर्य: क्रमश्चैव माहेन्द्रे तु ध्वजे स्मृत: |**
**स जर्जरस्य कर्तव्य: पुष्यवेणुसमाश्रय: || १८० ||**

**पदच्छेद:** – य: विधि: य: क्रम: च एव माहेन्द्रे तु ध्वजे स्मृत: |
स: जर्जरस्य कर्तव्य: पुष्य-वेणु-समाश्रय: || १८० ||

**अन्वय:** – य: विधि: एव च य: तु क्रम: माहेन्द्रे ध्वजे स्मृत: पुष्यवेणुसमाश्रय: स: जर्जरस्य कर्तव्य:|

**अर्थ** – जो विधी आणि जो क्रम महेंद्रध्वजासाठी सांगितला आहे, तोच विधि आणि तोच क्रम येथे जर्जर निर्मितीसाठी करावा . यासाठी पुष्यवेणु वांबूचा वापर करावा .

**भवेद्यो दीर्घपर्वा तु तनुपत्रस्तथैव च |**
**पर्वाग्रतण्डुलश्चैव पुष्यवेणु: स कीर्तित: || १८१ ||**

**पदच्छेद:** – भवेत् य: दीर्घपर्वा तु तनुपत्र: तथा एव च |
पर्वाग्र-तण्डुल: च एव पुष्यवेणु: स: कीर्तित: || १८१ ||

**अन्वय:** – य: दीर्घपर्वा तनुपत्र: पर्वाग्रतण्डुल: भवेत् स: पुष्यवेणु: कीर्तित: |

**अर्थ** – ज्याचे पर्व (joint) लांब असेल आणि पाने नाजूक असतील व ज्याचा सुरुवातीचा भाग गोलाकार असेल, त्याला पुष्यवेणू असे म्हटले जाते .

**विधिरेष मया प्रोक्तो जर्जरस्य प्रमाणत: |**
**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि दण्डकाष्ठस्य लक्षणम् || १८२ ||**

**पदच्छेद:** – विधि: एष: मया प्रोक्त: जर्जरस्य प्रमाणत: |
अत: ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि दण्डकाष्ठस्य लक्षणम् || १८२ ||

**अन्वय:** – मया एष: जर्जरस्य विधि: प्रमाणत: प्रोक्त: | अत: ऊर्ध्वम् दण्डकाष्ठस्य लक्षणं प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – जर्जराचा हा विधी मी तुम्हांला मोजमापाप्रमाणे सांगितला . यानंतर आता दंडकाष्ठाची लक्षणे सांगीन .

**❖ दंडकाष्ठाची लक्षणे ❖**

**कपित्थबिल्ववंशेभ्यो दण्डकाष्ठं भवेदथ |**
**वक्रं चैव हि कर्तव्यं त्रिभागे लक्षणान्वितम् || १८३ ||**

**पदच्छेद:** – कपित्थ-विल्व-वंशेभ्य: दण्डकाष्ठम् भवेत् अथ |
वक्रम् च एव हि कर्तव्यम् त्रिभागे लक्षण-अन्वितम् || १८३ ||

**अन्वय:** – अथ कपित्थविल्ववंशेभ्य: दण्डकाष्ठं भवेत् | एव हि वक्रम् त्रिभागे च लक्षणान्वितम् कर्तव्यम् |

**अर्थ** – कपित्थ, वेल आणि बांबू या वृक्षांपासून दंडकाष्ठ बनवावा. तो तीन ठिकाणी वक्र असावा आणि त्यात सुलक्षणे असावेत.

**कीटैर्नोपहतं यच्च व्याधिना न च पीडितम् |**
**मन्दशाखं भवेद्यच्च दण्डकाष्ठं तु तद्भवेत् || १८४ ||**

**पदच्छेद:** – कीटै: न उपहतम् यत् च व्याधिना न च पीडितम् |
मन्दशाखम् भवेत् यत् च दण्डकाष्ठम् तु तत् भवेत् || १८४ ||

**अन्वय:** – यत् च कीटै: न उपहतम् व्याधिना च न पीडितम् यत् च मन्दशाखम् भवेत् तत् तु दण्डकाष्ठम् भवेत् |

**अर्थ** – जे कीटकांनी खाल्लेले नसेल व त्याला काही रोग झालेला नसेल आणि ज्याची फांदी लहान असेल अशा वृक्षाचाच दंडकाष्ठ होऊ शकेल.

**यस्त्वेभिर्लक्षणैर्हीनं दण्डकाष्ठं सजर्जरम् |**
**कारयेत्स त्वपचयं महान्तं प्राप्नुयाद्ध्रुवम् || १८५ ||**

**पदच्छेद:** – य: तु एभि: लक्षणै: हीनम् दण्डकाष्ठम् सजर्जरम् |
कारयेत् स: तु अपचयम् महान्तम् प्राप्नुयात् ध्रुवम् || १८५ ||

**अन्वय:** – य: तु एभि: लक्षणै: हीनम् दण्डकाष्ठम् सजर्जरम् कारयेत् स: तु महान्तम् अपचयम् ध्रुवम् प्राप्नुयात् |

**अर्थ** – जो नाट्यप्रयोगकर्ता ही लक्षणे नसलेल्या वाईट दर्जाच्या वृक्षापासून दंडकाष्ठ आणि जर्जर बनवून घेतो त्याचे निश्चितच फार मोठे नुकसान होते.

❖ मुखवट्याचा विधी ❖

**अथ शीर्षविभागार्थं पटी कार्या प्रयत्नत: |**
**स्वप्रमाणविनिर्दिष्टा द्वात्रिंशत्यङ्गुलानि वै || १८६ ||**

**पदच्छेद: –** अथ शीर्ष-विभागार्थम् पटी कार्या प्रयत्नत: |
स्वप्रमाण-विनिर्दिष्टा द्वात्रिंशत्-अङ्गुलानि वै || १८६ ||

**अन्वय: –** अथ शीर्षविभागार्थम् स्वप्रमाणविनिर्दिष्टा द्वात्रिंशत्यङ्गुलानि वै पटी प्रयत्नत: कार्या |
(शीर्षविभागा इति यत्र द्विशिरा : त्रिशिरा : इत्यादि दृश्यते यत्र वा निजशिर एव आच्छाद्य शिरोऽन्तरं प्रदर्श्यते | - अ . भा . )

**अर्थ –** यानंतर जेव्हा दोन किंवा तीन पेक्षा अधिक मस्तके (चेहरे) दाखवायची असतात किंवा स्वत:चे मस्तक लपवून दुसरे मस्तक धारण करायचे असते तेव्हा स्वत:च्या मापानुसार किंवा बत्तीस बोट मापाचा मुखवटा प्रयत्नपूर्वक करावा .
(वरील श्लोकामध्ये पटी ऐवजी घटी आणि किटी असे पाठभेद आढळतात . परंतु त्यांचा दिलेल्या विवरणाशी संबंध जुळत नसल्याने पटी हा पाठ स्वीकारला आहे . )

**बिल्वमध्येन कर्तव्या पटी सिरसमाश्रया |**
**स्विन्नेन बिल्वकल्केन द्रवेण च समन्विता || १८७ ||**
**भस्मना वा तुषैर्वापि कारयेत्प्रतिशीर्षकम् |**
**संछाद्य तु ततो वस्त्रैर्बिल्वदिग्धैर्घटाश्रयै: || १८८ ||**
**बिल्वकल्केन चीरं तु दिग्ध्वा संयोजयेद्घटीम् |**
**न स्थूलां नानतां तन्वीं दीर्घां चैव न कारयेत् || १८९ ||**

**पदच्छेद: –** बिल्वमध्येन कर्तव्या पटी सिर-समाश्रया |
स्विन्नेन बिल्वकल्केन द्रवेण च समन्विता || १८७ ||
भस्मना वा तुषै : वा अपि कारयेत् प्रतिशीर्षकम् |
सच्छाद्य तु तत : वस्त्रै : बिल्वदिग्धै : घनाश्रयै : || १८८ ||

विल्वकल्केन चीरम् तु दिग्ध्वा संयोजयेत् पटीम् |
न स्थूलाम् न आनताम् तन्वीम् दीर्घाम् च एव न कारयेत् || १८९ ||

**अन्वय:** – विल्वमध्येन सिरसमाश्रया पटी कर्तव्या या विल्वकल्केन स्विन्नेन द्रवेण च समन्विता भवेत् | स्विन्नेन इति भस्मना तुषै: वा | तत: बिल्वदिग्धै: घनाश्रयै: वस्त्रै: संच्छाद्य प्रतिशीर्षकम् कारयेत् | विल्वकल्केन चीरम् दिग्ध्वा पटीम् संयोजयेत् | न स्थूलाम् न आनताम् तन्वीम् एव च दीर्घाम् न कारयेत् | (न स्थूलामिति गुरुत्वभयात् | नानतामिति पेलवात्- अ. भा.)

**अर्थ** – मुखवटा बनविण्यासाठी प्रथम बेलवृक्षाचा खोडाचा रस आणि बेलवृक्षाच्या झाडाची साल यांच्या साहाय्याने आस्तरण (sheet) तयार करावे ज्यामध्ये बेलाचा ओला रस आणि त्यात स्विन्न म्हणजे भस्म किंवा धान्याचा भुगा म्हणजे तूस यांचेही मिश्रण असेल. नंतर बेलाच्या रसामध्ये बुडविलेल्या वस्त्रांनी झाकून नंतरच मुखवटे बनवावेत.

झाडाच्या सालीपासून बनविलेल्या आस्तरणावर बेलाच्या रसामध्ये बुडविलेला कपड्याचे तुकडे ठेवावे. अशी हे आस्तरण फार वजन होऊनये यासाठी ते खूप जाड असू नये आणि नाजुकतेमुळे खूप वाकलेलेही असू नये. ते खूप बारिक आणि लांब देखील असू नये.

**तस्यामातपशुष्कायां सुशुष्कायामथापि वा |**
**छेद्यं बुधा: प्रकुर्वन्ति विधिदृष्टेन कर्मणा || १९० ||**

**पदच्छेद:** – तस्याम् आतप-शुष्कायाम् सुशुष्कायाम् अथ अपि वा |
छेद्यम् बुधा: प्रकुर्वन्ति विधिदृष्टेन कर्मणा || १९० ||

**अन्वय:** – अथ आतपशुष्कायाम् सुशुष्कायाम् वा तस्याम् बुधा: विधिदृष्टेन कर्मणा छेद्यम् प्रकुर्वन्ति |

**अर्थ** – यानंतर कडक उन्हात सुकवल्यावर किंवा चांगल्या रीतीने सुकल्यावर विद्वानांनी शास्त्रशुद्ध पद्धतीनुसार कौशल्याने ते आस्तरण चेहऱ्याच्या आकाराप्रमाणे कापावे.

**सुतीक्ष्णेन तु शस्त्रेण अर्धार्धं प्रविभज्य च |**
**स्वप्रमाणविनिर्दिष्टं ललाटकृतकोणकम् || १९१ ||**

**पदच्छेद: –** सुतीक्ष्णेन तु शस्त्रेण अर्धार्धम् प्रविभज्य च |
स्वप्रमाण-विनिर्दिष्टम् ललाटकृत-कोणकम् || १९१ ||

**अन्वय: –** सुतीक्ष्णेन तु शस्त्रेण अर्धार्धम् च प्रविभज्य स्वप्रमाणविनिर्दिष्टम् ललाटकृतकोणकम् (कुर्यात्) |

**अर्थ –** तीक्ष्ण शस्त्राने अर्धा अर्धा विभाग करून सांगितलेल्या मापानुसार कपाळाच्या आकाराप्रमाणे अर्धगोलाकार कापावे .

**अर्धाङ्गुलं ललाटं तु कार्यं छेद्यं षडङ्गुलम् |**
**अध्यर्धमङ्गुलं छेद्यं कटयोर्द्व्यङ्गुलं भवेत् || १९२ ||**

**पदच्छेद: –** अर्धाङ्गुलम् ललाटम् तु कार्यम् छेद्यम् षड्-अङ्गुलम् |
अध्यर्धम् अङ्गुलम् छेद्यम् कटयो: द्व्यङ्गुलम् भवेत् || १९२ ||

**अन्वय: –** अर्धाङ्गुलम् ललाटम् तु षडङ्गुलम् छेद्यम् कार्यम् | अध्यर्धम् अङ्गुलम् कटयो: द्व्यङ्गुलं छेद्यम् भवेत् |

**अर्थ –** अर्धे बोट उंच आणि सहा बोट रुंद इतक्या मापाचे कपाळ असावे . त्यानुसार आस्तरणावर माप घेऊन नंतर कपाळाचा आकार कापून घ्यावा . दीड बोट उंच आणि दोन बोट रुंद माप घेऊन गालाचा आकार रेखाटावा आणि नंतर तो कापावा .
(याठिकाणी अध्यर्धम् ऐवजी अर्धार्धम् असा पाठभेद सापडतो . परंतु त्याने अपेक्षित अर्थप्राप्ती होत नाही . म्हणूनच इथे अध्यर्धम् हा पाठ स्वीकारला आहे . )

**कटान्ते कर्णनालस्य छेद्यं द्व्यधिकमङ्गुलम् |**
**त्र्यङ्गुलं कर्णविवरं तथा स्याच्छेद्यमेव हि || १९३ ||**

**पदच्छेद: –** कटान्ते कर्णनालस्य छेद्यम् द्वि-अधिकम् अङ्गुलम् |
त्रि-अङ्गुलम् कर्णविवरम् तथा स्यात् छेद्यम् एव हि || १९३ ||

**अन्वयः** – कटान्ते कर्णनालस्य द्व्यधिकम् अङ्गुलम् छेद्यम् | तथा कर्णविवरम् हि त्र्यङ्गुलम् एव स्यात् तत् छेद्यम् |

**अर्थ** – गालाच्या शेवटी कर्णनलिकेचे दोन बोट माप घेऊन ते कापावे. तसेच कर्णविवरासाठी तीन बोटांचे माप घेऊन ते कापावे.

**ततश्चैवावटुः कार्या सुसमा द्वादशाङ्गुला |**
**पट्यां ह्येतत्सदा च्छेद्ये विधानं विहितं मया || १९४ ||**

**पदच्छेदः** – ततः च एव अवटुः कार्या सुसमा द्वादश-अङ्गुला |
पट्याम् हि एतत् सदा छेद्ये विधानम् विहितम् मया || १९४ ||

**अन्वयः** – ततः सुसमा द्वादशाङ्गुला अवटुः कार्या | एतत् सदा पट्याम् हि छेद्ये विधानम् मया विहितम् | (अवटुरिति कर्णशष्कुली - अ. भा.)

**अर्थ** – त्यानंतर बारा बोट मापाचा (सहा बोटे माप उजव्या कानासाठी आणि सहा बोटे माप डाव्या कानासाठी अशा रीतीने) कानाचा आकार तयार करून कापावे. मुखवट्यासाठी जे आस्तरण बनविले जाते त्याचा विधी आणि मोजमापानुसार कर्तनविधी मी तुम्हांला सांगितला.

**तस्योपरिगताः कार्या मुकुटा बहुशिल्पजाः |**
**नानारत्नप्रतिच्छन्ना बहुरूपोपशोभिताः || १९५ ||**

**पदच्छेदः** – तस्य उपरिगताः कार्याः मुकुटाः बहुशिल्पजाः |
नानारत्न-प्रतिच्छन्नाः बहुरूप-उपशोभिताः || १९५ ||

**अन्वयः** – तस्य उपरिगताः बहुशिल्पजाः नानारत्नप्रतिच्छन्नाः बहुरूपोपशोभिताः मुकुटाः कार्याः |

**अर्थ** – मस्तकावर विविध प्रकारचे शिल्प आणि अनेक रत्नजडित व विविध आकारांचे सुशोभित मुकुट तयार करावेत.

**तथोपकरणानीह नाट्ययोगकृतानि वै |**
**बहुप्रकारयुक्तानि कुर्वीत प्रकृतिं प्रति || १९६ ||**

**पदच्छेद:** – तथा उपकरणानि इह नाट्य-योग-कृतानि वै |
बहु-प्रकार-युक्तानि कुर्वीत प्रकृतिम् प्रति || १९६ ||

**अन्वय:** – तथा इह नाट्ययोगकृतानि बहुप्रकारयुक्तानि उपकरणानि वै प्रकृतिम् प्रति कुर्वीत |

**अर्थ** – अशा प्रकारे नाट्यप्रयोगामध्ये वापरली जाणारी अनेक प्रकारची उपकरणे पात्रांच्या स्वभावानुसार तयार करावीत.

**यत्किंचिदस्मिन् लोके तु चराचरसमन्विते |**
**विहितं कर्म शिल्पं वा तत्तूपकरणं स्मृतम् || १९७ ||**

**पदच्छेद:** – यत् किंचित् अस्मिन् लोके तु चराचर-समन्विते |
विहितम् कर्म शिल्पम् वा तत् तु उपकरणम् स्मृतम् || १९७ ||

**अन्वय:** – अस्मिन् चराचरसमन्विते तु लोके यत् किंचित् कर्म शिल्पम् वा विहितम् तत् तु उपकरणम् स्मृतम् |

**अर्थ** – या चराचर म्हणजेच जड आणि चेतनयुक्त लोकामध्ये जे काही कर्म किंवा शिल्प सांगितले जाते त्यास 'उपकरण' असे म्हणतात.

❖ उपकरणे ❖

**यद्यस्य विषयं प्राप्तं तत्तदेवाभिगच्छति |**
**नास्त्यन्य: पुरुषाणां हि नाट्योपकरणाश्रये || १९८ ||**

**पदच्छेद:** – यत् यस्य विषयम् प्राप्तम् तत् तत् एव अभिगच्छति |
नास्ति अन्त: पुरुषाणाम् हि नाट्य-उपकरण-आश्रये || १९८ ||

**अन्वय:** – यस्य यत् विषयम् प्राप्तम् तत् तत् एव अभिगच्छति | हि नाट्योपकरणाश्रये पुरुषाणाम् अन्य : उपाय : नास्ति |

**अर्थ** – ज्याला जो उपकरणविषय मिळाला असेल त्याविषयी त्या त्या नटाने नीट समजून घ्यायला पाहिजे. कारण नाटकामध्ये उपकरणे हाताळताना ती कशी वापरावीत याविषयी नटानेच विशेष प्रयत्न करावेत त्यासाठी अन्य उपाय नाही.

('नास्त्यन्त:' असा पाठभेद अर्थप्राप्ती करवून देत नाही. म्हणून 'नास्त्यन्य:' हा पाठ स्वीकारला आहे.)

**यद्येनोत्पादितं कर्म शिल्पयोग: क्रियापि वा |**
**तस्य तेन कृता सृष्टि: प्रमाणं लक्षणं तथा || १९९ ||**

**पदच्छेद:** – यत् येन उत्पादितम् कर्म शिल्पयोग: क्रिया अपि वा |
तस्य तेन कृता सृष्टि: प्रमाणम् लक्षणम् तथा || १९९ ||

**अन्वय:** – येन शिल्पयोग: क्रिया यत् कर्म वा उत्पादितम् तेन तस्य प्रमाणम् लक्षणम् तथा सृष्टि: कृता |

**अर्थ** – ज्याने स्वत:च्या कलेने जे कर्म, शिल्प त्यांचा विनियोग सांगणारी क्रिया उत्पन्न केली आहे, त्याने त्याचे मोजमाप, लक्षणे व क्रिया देखील सांगितल्या आहेत.

**या कार्ष्णायसभूयिष्ठा कृता सृष्टिर्महात्मना |**
**न सास्माकं नाट्ययोगे कस्मात्खेदावहा हि सा || २०० ||**

**पदच्छेद:** – या कार्ष्ण-आयस-भूयिष्ठा कृता सृष्टि: महात्मना |
न सा अस्माकम् नाट्ययोगे कस्मात् खेदावहा हि सा || २०० ||

**अन्वय:** – महात्मना या कार्ष्णायसभूयिष्ठा सृष्टि: कृता सा अस्माकम् नाट्ययोगे न (कर्तव्या) कस्मात्? सा हि खेदावहा |

**अर्थ** – महान विश्वकर्म्यांनी जी लोहमय विशाल अशी सृष्टी तयार केली आहे तिची निर्मिती नाट्यप्रयोगामध्ये करू नये. का बरे? कारण अशी उपकरणे जड असल्याने नटांना खूपच थकवा आणणारी असतात.
(अर्थाच्या दृष्टीने 'काष्ठयन्त्रभूयिष्ठा' ऐवजी 'कार्ष्णायसभूयिष्ठा' हा पाठ स्वीकारण्यात आलेला आहे.)

**यद्द्रव्यं जीवलोके तु नानालक्षणलक्षितम् |**
**तस्यानुकृतिसंस्थानं नाट्योपकरणं भवेत् || २०१ ||**

**पदच्छेद:** – यत् द्रव्यम् जीवलोके तु नाना-लक्षण-लक्षितम् |
तस्य अनुकृति-संस्थानम् नाट्य उपकरणम् भवेत् || २०१ ||

**अन्वय:** – जीवलोके तु यत् नानालक्षणलक्षितम् द्रव्यं तस्य अनुकृतिसंस्थानं नाट्योपकरणं भवेत् |

**अर्थ** – या जीवलोकामध्ये जी विविध लक्षणांनी ओळखली जाणारी गोष्ट असते त्याची प्रतिकृती म्हणजे 'नाट्योपकरण' होय .

**प्रासादगृहयानानि नानाप्रहरणानि च |**
**न शक्यं तानि वै कर्तुं यथोक्तानीह लक्षणै: || २०२ ||**

**पदच्छेद:** – प्रासाद-गृह-यानानि नाना-प्रहरणानि च |
न शक्यम् तानि वै कर्तुम् यथा उक्तानि इह लक्षणै: || २०२ ||

**अन्वय:** – नानाप्रहरणानि प्रासादगृहयानानि च तानि वै यथा उक्तानि लक्षणै: कर्तुम् इह न शक्यम् |

**अर्थ** – विविध प्रकारची शस्त्रे, महाल, घरे आणि वाहने इत्यादींचे सांगितल्याप्रमाणेच समजून घ्यावे . या सर्वांची लक्षणे इथे सांगणे शक्य नाही .

**लोकधर्मी भवेत्त्वन्या नाट्यधर्मी तथापरा |**
**स्वभावो लोकधर्मी तु विभावो नाट्यमेव हि || २०३ ||**

**पदच्छेद:** – लोकधर्मी भवेत् तु अन्या नाट्यधर्मी तथा अपरा |
स्वभाव: लोकधर्मी तु विभाव: नाट्यम् एव हि || २०३ ||

**अन्वय:** – अन्या लोकधर्मी तथा अपरा तु नाट्यधर्मी भवेत् | स्वभाव: तु लोकधर्मी एव हि विभाव: नाट्यम् (स्यात्) |

**अर्थ** – यामध्ये काही उपकरणे लोकधर्मी व अन्य उपकरणे नाट्यधर्मी होतील . जी उपकरणे त्यांच्या स्वभावानुसार हलकी असतात ती लोकधर्मी उपकरणे होत आणि नाटकात प्रयोग करण्यासाठी ज्या उपकरणांची प्रतिकृती निर्माण केली जाते ती उपकरणे नाट्यधर्मी असतात .

**आयसं तु न कर्तव्यं न च सारमयं तथा |**
**नाट्योपकरणं तज्ज्ञैर्गुरु खेदकरं भवेत् || २०४ ||**

**पदच्छेद:** – आयसम् तु न कर्तव्यम् न च सारमयम् तथा |
नाट्योपकरणम् तज्ज्ञै: गुरु खेदकरम् भवेत् || २०४ ||

**अन्वय:** – तज्ज्ञै: न तु आयसम् तथा च न सारमयम् उपकरणम् कर्तव्यम् | गुरु नाट्योपकरणम् खेदकरम् भवेत् |

**अर्थ** – विद्वानांनी नाटकामध्ये कधीही लोखंडाची तसेच भरीव उपकरणे बनवू नयेत . म्हणजेच हलकी आणि पोकळ उपकरणे तयार करावीत . कारण नाटकातील उपकरणे जड असल्यास नटांना अभिनय करताना त्याचा त्रास होऊ शकतो .

**काष्ठचर्मसु वस्त्रेषु जतुवेणुदलेषु च |**
**नाट्योपकरणानीह लघुकर्माणि कारयेत् || २०५ ||**

**पदच्छेद:** – काष्ठचर्मसु वस्त्रेषु जतु-वेणु-दलेषु च |
नाट्योपकरणानि इह लघुकर्माणि कारयेत् || २०५ ||

**अन्वय:** – इह काष्ठचर्मसु वस्त्रेषु जतुवेणुदलेषु च लघुकर्माणि नाट्योपकरणानि कारयेत् |

**अर्थ** – म्हणून लाकूड, चामडे, वस्त्र, लाख, बांबूची पाने यांपासून नाटकातील हलकीफुलकी उपकरणे बनवून घ्यावीत .

**चर्मवर्मध्वजा: शैला: प्रासादा देवतागृहा: |**
**हयवारणयानानि विमानानि गृहाणि च || २०६ ||**
**पूर्वं वेणुदलै: कृत्वा कृतीर्भावसमाश्रया: |**
**तत: सुरङ्गैराच्छाद्य वस्त्रै: सारूप्यमानयेत् || २०७ ||**

**पदच्छेद:** – चर्मवर्मध्वजा: शैला: प्रासादा: देवता-गृहा: |
हि हय-वारण-यानानि विमानानि गृहाणि च || २०६ ||
पूर्वं वेणुदलै: कृत्वा कृती: भाव-समाश्रया: |
तत: सुरङ्गै: आच्छाद्य वस्त्रै: सारूप्यम् आनयेत् || २०७ ||

**अन्वय:** – चर्मवर्मध्वजा: शैला: प्रासादा: देवतागृहा: हि हयवारणयानानि विमानानि गृहाणि च पूर्वम् वेणुदलै: भावसमाश्रया: कृती: कृत्वा तत: सुरङ्गै: वस्त्रै: आच्छाद्य सारूप्यम् आनयेत् |

**अर्थ** – चामडे, कवच, झेंडा, डोंगर, महाल, मंदिर, घोडागाडी, हत्तीगाडी, विमान आणि घरे इत्यादींची प्रथम बांबूच्या पानांनी प्रतिकृती तयार करावी आणि त्यानंतर त्याला सुंदर रंगीत कपड्यांनी आच्छादित करून त्या त्या वस्तूसमान बनवावे .

**अथवा यदि वस्त्राणामसान्निध्यं भवेदिह |**
**तालीयैर्वा किलिञ्जैर्वा श्लक्ष्णैर्वस्त्रक्रिया भवेत् || २०८ ||**

**पदच्छेद:** – अथवा यदि वस्त्राणाम् असान्निध्यम् भवेत् इह |
तालीयै : वा किलिञ्जै : वा श्लक्ष्णै : वस्त्रक्रिया : भवेत् || २०८ ||

**अन्वय:** – अथवा इह यदि वस्त्राणाम् असान्निध्यम् भवेत् तालीयै: वा श्लक्ष्णै: किलिञ्जै: वा वस्त्रक्रिया : भवेत् |

**अर्थ** – अथवा प्रयोगाच्या वेळी जर कापड जवळ नसेल तर ताडपत्रांचे किंवा नाजूक हिरव्या किलिंजापासून वस्त्र तयार करावेत .

**तथा प्रहरणानि स्युस्तृणवेणुदलादिभि: |**
**जतुभाण्डक्रियाभिश्च नानारूपाणि नाटके || २०९ ||**

**पदच्छेद:** – तथा प्रहरणानि स्यु : तृण-वेणु-दल-आदिभि : |
जतु-भाण्ड-क्रियाभि : च नाना-रूपाणि नाटके || २०९ ||

**अन्वय:** – तथा नाटके तृणवेणुदलादिभि : जतुभाण्डक्रियाभि : च नानारूपाणि प्रहरणानि स्यु : |

**अर्थ** – याप्रमाणे नाटकामध्ये विविध प्रकारची शस्त्रेदेखील गवत किंवा बांबूच्या पानांपासून तयार करावीत, आणि लाख तसेच दुधीच्या पानांवर विशिष्ट क्रिया करूनदेखील ही उपकरणे तयार करता येतात .

**प्रतिपादं प्रतिशिर: प्रतिहस्तं प्रतित्वचम् |**
**तृणै: किलिञ्जैर्भाण्डैर्वा सारूप्याणि तु कारयेत् || २१० ||**

**पदच्छेद:** – प्रतिपादम् प्रतिशिर : प्रतिहस्तम् प्रतित्वचम् |
तृणै : किलिञ्जै : भाण्डै : वा सारूप्याणि तु कारयेत् || २१० ||
(भाण्डैरिति अलाबु-दल-खड्गादिभि : - अ . भा . )

**अन्वय:** – प्रतिपादम् प्रतिशिर: प्रतिहस्तम् प्रतित्वचम् तृणै: किलिञ्जै: भाण्डै: वा सारूप्याणि तु कारयेत्।

**अर्थ** – प्रतिकृतीचा प्रत्येक पाय, डोके, हात व पृष्ठभाग हा गवत, किलिंज किंवा दुधीच्या पानांपासून बनवावा आणि मूळ वस्तूसमान ते तयार करावे.

**यद्यस्य सदृशं रूपं सारूप्यगुणसंभवम् ।**
**मृण्मयं तत्तु कृत्स्नं तु नानारूपं तु कारयेत् ॥ २११ ॥**

**पदच्छेद:** – यत् अस्य सदृशम् रूपम् सारूप्य-गुण-संभवम् ।
मृण्मयम् तत् तु कृत्स्नम् तु नानारूपम् तु कारयेत् ॥ २११ ॥

**अन्वय:** – अस्य यत् सारूप्यगुणसंभवम् सदृशम् रूपम् तत् तु कृत्स्नम् नानारूपम् मृण्मयम् कारयेत् ।

**अर्थ** – एखाद्या उपकरणाचे पाहताक्षणी समान गुणधर्म दिसत असल्याने जे सादृश्य आहे, त्यानुसार ती विविध रूपे असणारी उपकरणे पूर्णपणे मातीपासूनदेखील बनविता येतात.

**भाण्डवस्त्रमधूच्छिष्टैर्लाक्षयाभ्रदलेन च ।**
**नगास्ते विविधा: कार्या ह्यतसीशणबिल्वजै: ॥ २१२ ॥**

**पदच्छेद:** – भाण्ड-वस्त्र-मधूच्छिष्टै: लाक्षया-अभ्र-दलेन च ।
नगा: ते विविधा: कार्या: हि अतसी-शण-बिल्वजै: ॥ २१२ ॥

**अन्वय:** – भाण्डवस्त्रमधूच्छिष्टै: लाक्षयाभ्रदलेन हि अतसीशणबिल्वजै: च विविधा: नगा: ते कार्या: ।

**अर्थ** – दुधीची पाने, वस्त्र, मेण, लाख तसेच अभ्रदल, अतसी, शण आणि बिल्वज यांद्वारे विविध प्रकारचे पर्वत तयार करावेत. (याठिकाणी नागा: ऐवजी नगा: हा पाठ स्वीकारण्यात आलेला आहे.)

**नानाकुसुमजातीश्च फलानि विविधानि च ।**
**भाण्डवस्त्रमधूच्छिष्टैर्लाक्षया वापि कारयेत् ॥ २१३ ॥**

**पदच्छेद:** – नाना-कुसुम-जाती: च फलानि विविधानि च |
भाण्ड-वस्त्र-मधु-उच्छिष्टै: लाक्षया वा अपि कारयेत् || २१३ ||

**अन्वय:** – भाण्डवस्त्रमधूच्छिष्टै: अपि वा लाक्षया नानाकुसुमजाती: विविधानि फलानि च कारयेत् |

**अर्थ** – दुधीची पाने, वस्त्र, मेण तसेच लाक्षारसाने विविध प्रकारची फुले आणि विविध फळे तयार करावे .

**भाण्डवस्त्रमधूच्छिष्टैस्ताम्रपत्रैस्तथैव च |**
**सम्यक्च नीलीरागेणाप्यभ्रपत्रेण चैव हि || २१४ ||**
**रञ्जितेनाभ्रपत्रेण मणीश्चैव प्रकारयेत् |**
**उपाश्रयमथाप्येषां शुल्बवङ्गेन कारयेत् || २१५ ||**

**पदच्छेद:** – भाण्ड-वस्त्र-मधु-उच्छिष्टै: ताम्रपत्रै: तथा एव च |
सम्यक् च नीली-रागेण अपि अभ्रपत्रेण च एव हि || २१४ ||
रञ्जितेन अभ्रपत्रेण मणी: च एव प्रकारयेत् |
उपाश्रयम् अथ अपि एषाम् शुल्ब-वङ्गेन कारयेत् || २१५ ||

**अन्वय:** – भाण्डवस्त्रमधूच्छिष्टै: ताम्रपत्रै: सम्यक् नीलीरागेण च अभ्रपत्रेण च रञ्जितेन अभ्रपत्रेण एव च मणी: प्रकारयेत् | अथ अपि एषाम् शुल्बवङ्गेन उपाश्रयम् कारयेत् |

**अर्थ** – दुधीची पाने, वस्त्र, मेण, ताम्रपत्रे आणि चांगल्या दर्जाच्या नीलीरागाने व अभ्रदलाने तसेच रंगीत अभ्रदलांद्वारेही मणी बनवावेत आणि त्यात त्यांचा आधारासाठी पितळेचा वापर करावा .

**विविधा मकुटा दिव्या पूर्वं ये गदिता मया |**
**तेऽभ्रपत्रोज्ज्वला: कार्या मणिव्यालोपशोभिता: || २१६ ||**

**पदच्छेद:** – विविधा: मकुटा: दिव्या: पूर्वम् ये गदिता: मया |
ते अभ्रपत्र-उज्ज्वला: कार्या: मणिव्याल-उपशोभिता: || २१६ ||

**अन्वयः** – मया ये विविधाः दिव्याः मकुटाः पूर्वं गदिताः ते अभ्रपत्रोज्ज्वलाः मणिव्यालोपशोभिताः कार्याः।

**अर्थ** – विविध प्रकारचे दिव्य पुरुषांचे मुकुट, जे पूर्वी मी सांगितले आहेत ते सर्व अभ्रपत्राद्वारे तेजस्वी करून मण्यांच्या माळांनी सुशोभित करावेत.

**न शास्त्रप्रभवं कर्म तेषां हि समुदाहृतम्।**
**आचार्यबुद्ध्या कर्तव्यमूहापोहप्रयोजितम्॥ २१७॥**

**पदच्छेदः** – न शास्त्रप्रभवम् कर्म तेषाम् हि समुदाहृतम्।
आचार्य-बुद्ध्या कर्तव्यम् ऊहापोह-प्रयोजितम्॥ २१७॥

**अन्वयः** – तेषाम् हि शास्त्रप्रभवम् कर्म न समुदाहृतम्। आचार्यबुद्ध्या ऊहापोहप्रयोजितम् कर्तव्यम्।

**अर्थ** – या सर्व वस्तूंच्या निर्माणासाठी उचित अशा क्रिया शास्त्रामध्ये कुठेही सांगितलेल्या नाहीत, म्हणून आचार्यांनी स्वतःच्या बुद्धीचा वापर करून तर्क-वितर्क करून ते करावेत.

**एष मर्त्यक्रियायोगो भविष्यत्कल्पितो मया।**
**कस्मादल्पबलत्वं हि मनुष्येषु भविष्यति॥ २१८॥**

**पदच्छेदः** – एषः मर्त्य-क्रियायोगः भविष्यत्-कल्पितः मया।
कस्मात् अल्प-बलत्वम् हि मनुष्येषु भविष्यति॥ २१८॥

**अन्वयः** – मया एषः मर्त्यक्रियायोगः भविष्यत्कल्पितः। कस्मात् हि मनुष्येषु अल्पबलत्वम् भविष्यति।

**अर्थ** – मानवांशी निगडीत जो क्रियायोग मी सांगितला तो भविष्याच्या दृष्टीने कल्पिलेला आहे. कशावरून? तर मानवाचे भविष्यात सामर्थ्य कमी असणार आहे.

**मर्त्यानामपि नो शक्या विभावाः सर्वकाञ्चनाः।**
**नेष्टाः सुवर्णरत्नैस्तु मुकुटा भूषणानि वा॥ २१९॥**

**पदच्छेद:** – मर्त्यानाम् अपि न शक्या: विभावा: सर्वकाञ्चना: |
न इष्टा: सुवर्णरत्नै: तु मुकुटा: भूषणानि वा || २१९ ||

**अन्वय:** – सर्वकाञ्चना: विभावा: मर्त्यानाम् अपि न शक्या: | सुवर्णरत्नै: मुकुटा: भूषणानि वा तु न इष्टा: |

**अर्थ** – सर्व विभाव सुवर्णनिर्मित करणे हे मानवाला शक्य होणार नाही . म्हणून सुवर्णजडित आणि रत्नांनी बनविलेले मुकुट अथवा अन्य आभूषणे त्यांच्यासाठी योग्य नाहीत .

**युद्धे नियुद्धे नृत्ते वा वृष्टिव्यापारकर्मणि |**
**गुरुभावावसन्नस्य स्वेदो मूर्च्छा च जायते || २२० ||**

**पदच्छेद:** – युद्धे नियुद्धे नृत्ते वा वृष्टि-व्यापार-कर्मणि |
गुरुभाव-अवसन्नस्य स्वेद: मूर्च्छा च जायते || २२० ||

**अन्वय:** – गुरुभावावसन्नस्य युद्धे नियुद्धे नृत्ते वृष्टिव्यापारकर्मणि वा स्वेद: मूर्च्छा च जायते |

**अर्थ** – युद्ध, नियुद्ध (मल्लयुद्ध) अथवा नृत्तामध्ये तसेच वृष्टी किंवा व्यापार कार्यामध्ये अतिपरिश्रमामुळे नटाला अतिशय घाम येतो आणि तो मूर्च्छित होऊशकतो .

**स्वेदमूर्च्छाक्लमार्तस्य प्रयोगस्तु विनश्यति |**
**प्राणात्यय: कदाचिच्च भवेद्व्यायतचेष्टया || २२१ ||**

**पदच्छेद:** – स्वेद-मूर्च्छा-क्लम-आर्तस्य प्रयोग: तु विनश्यति |
प्राणात्यय: कदाचित् च भवेत् व्यायत-चेष्टया || २२१ ||

**अन्वय:** – स्वेदमूर्च्छाक्लमार्तस्य प्रयोग: तु विनश्यति | व्यायतचेष्टया कदाचित् प्राणात्यय: च भवेत् |

**अर्थ** – घाम, मूर्च्छा आणि थकव्याने त्रस्त झालेल्या नटाचा प्रयोग नष्ट होऊ शकतो आणि कदाचित अतिकष्टामुळे नटाचा मृत्यु देखील होऊशकतो .

**तस्मात्ताम्रमयै: पत्रैरभ्रकै रञ्जितैरपि |**
**खण्डैरपि मधूच्छिष्टै: कार्याण्याभरणानि तु || २२२ ||**

**पदच्छेद :** – तस्मात् ताम्रमयै : पत्रै : अभ्रकै : रञ्जितै : अपि |
भेण्डै : अपि मधूच्छिष्टै : कार्याणि आभरणानि तु || २२२ ||

**अन्वय :** – तस्मात् ताम्रमयै: पत्रै: अपि अभ्रकै: रञ्जितै: मधूच्छिष्टै: खण्डै: आभरणानि तु कार्याणि |

**अर्थ** – म्हणून ताम्रपत्रांपासून, अभ्रकापासून, मधमाशांच्या पोळ्यातील रंगीत मेणापासून अलंकार तयार करावेत .

**एवं लोकोपचारेण स्वबुद्धिविभवेन च |**
**नाट्योपकरणानीह बुध: सम्यक्प्रयोजयेत् || २२३ ||**

**पदच्छेद :** – एवम् लोकोपचारेण स्वबुद्धि-विभवेन च |
नाट्योपकरणानि इह बुध : सम्यक् प्रयोजयेत् || २२३ ||

**अन्वय :** – एवम् इह बुध : लोकोपचारेण स्वबुद्धिविभवेन च सम्यक् नाट्योपकरणानि प्रयोजयेत् |

**अर्थ** – याप्रमाणे लोकव्यवहारांमध्ये प्रचलित तसेच स्वत:च्या बुद्धिवैभवाने नाट्यातील उपकरणांचा चांगल्या प्रकारे प्रयोग करावा .

**न भेद्यं नैव च च्छेद्यं न प्रहर्तव्यमेव च |**
**रङ्गे प्रहरणै: कार्यं संज्ञामात्रं तु कारयेत् || २२४ ||**

**पदच्छेद :** – न भेद्यम् न एव च छेद्यम् न प्रहर्तव्यम् एव च |
रङ्गे प्रहरणै : कार्यम् संज्ञामात्रम् तु कारयेत् || २२४ ||

**अन्वय :** – रङ्गे प्रहरणै : न भेद्यम् न छेद्यम् न प्रहर्तव्यम् कार्यम् | संज्ञामात्रम् तु कारयेत् |

**अर्थ** – रंगमंचावर शस्त्रांद्वारे काहीही फोडू नये, काहीही कापू नये आणि प्रहार देखील करू नये . केवळ नाममात्र प्रयोग करावा .

**अथवा योगशिक्षाभिर्विद्यामायाकृतेन वा |**
**शस्त्रमोक्ष: प्रकर्तव्यो रङ्गमध्ये प्रयोक्तृभि: || २२५ ||**

**पदच्छेद :** – अथवा योग-शिक्षाभि : विद्या-माया-कृतेन वा |
शस्त्र-मोक्ष : प्रकर्तव्य : रङ्गमध्ये प्रयोक्तृभि : || २२५ ||

**अन्वयः** – अथवा रङ्गमध्ये प्रयोक्तृभिः योगशिक्षाभिः विद्यामायाकृतेन वा शस्त्रमोक्षः प्रकर्तव्यः |

**अर्थ** – अथवा रंगमंचावर नटांनी योग शिक्षा विद्या आणि मायेच्या बळावर शस्त्रांचा प्रयोग करावा.

**एवं नानाप्रकारैस्तु आयुधाभरणानि च |**
**नोक्तानि यानि च मया लोकाद्ग्राह्याणि तान्यपि || २२६ ||**

**पदच्छेदः** – एवम् नानाप्रकारैः तु आयुधानि आभरणानि च |
न उक्तानि यानि च मया लोकात् ग्राह्याणि तानि अपि || २२६ ||

**अन्वयः** – एवम् तु यानि आयुधानि आभरणानि मया च न उक्तानि तानि अपि लोकात् नानाप्रकारैः ग्राह्याणि |

**अर्थ** – अशा प्रकारे जी आयुधे आणि आभूषणे जी मी इथे सांगितलेली नाहीत त्यांविषयी समाजातून विविध प्रकारे जाणून घ्यावे.

**आहार्याभिनयो ह्येष मया प्रोक्तः समासतः |**
**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि सामान्याभिनयं प्रति || २२७ ||**

**पदच्छेदः** – आहार्याभिनयः हि एषः मया प्रोक्तः समासतः |
अतः ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि सामान्यम् अभिनयम् प्रति || २२७ ||

**अन्वयः** – मया हि एषः आहार्यः अभिनयः समासतः प्रोक्तः | अतः ऊर्ध्वम् सामान्यम् अभिनयम् प्रति प्रवक्ष्यामि |

**अर्थ** – मी थोडक्यात आहार्य अभिनयाविषयी तुम्हांला सांगितले. आता यानंतर सामान्य अभिनयाविषयी तुम्हाला सांगेन.

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे आहार्याभिनयो नाम एकविंशोऽध्यायः ||**

**|| अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील 'आहार्य अभिनय' नावाचा एकविसावा अध्याय संपला ||**

# बावीसावा अध्याय

# सामान्य अभिनय



# बावीसावा अध्याय

## सामान्य अभिनय

**❖ सामान्य अभिनय ❖**

**सामान्याभिनयो नाम ज्ञेयो वागङ्गसत्त्वज: |**
**तत्र कार्य: प्रयत्नस्तु नाट्यं सत्त्वे प्रतिष्ठितम् || १ ||**

**पदच्छेद: –** सामान्य-अभिनय: नाम ज्ञेय: वाग्-अङ्ग-सत्त्वज: |
तत्र कार्य: प्रयत्न: तु नाट्यम् सत्त्वे प्रतिष्ठितम् || १ ||

**अन्वय: –** वागङ्गसत्त्वज: सामान्याभिनय: नाम ज्ञेय: | तत्र प्रयत्न: तु कार्य: | (यस्मात्) नाट्यम् सत्त्वे प्रतिष्ठितम् |

(इहान्यदित्युपरञ्जकं च अभिनयं च अन्याभिनयं समं च तदिति तत्र भव: सामान्याभिनय इति परमार्थ: | - अ . भा . )

**अर्थ –** आहार्याभिनयाच्या निरूपणानंतर आता वाचिक, आंगिक आणि सात्त्विक अभिनयातून निर्माण होणारा सामान्य अभिनय जाणून घ्यावा . त्यासाठी विशेष प्रयत्न करावा . कारण नाट्य हे सत्त्वावर आधारित असते .

(अभिनवगुप्ताच्या मते, येथे अन्य आणि अभिनय या दोन शब्दांचा प्रथम द्वंद्व समास होतो आणि 'अन्याभिनय' शब्द तयार होतो, त्यानंतर सम आणि अन्याभिनय या दोन शब्दांचा द्वन्द्व समास होतो आणि त्यातून 'सामान्याभिनय' शब्द तयार होतो . इथे 'भव' अर्थाने 'अण्' प्रत्यय लागून 'सामान्याभिनय' शब्द तयार झाला म्हणून त्याचा अर्थ 'परमार्थ' होतो . )

**सत्त्वातिरिक्तोऽभिनयो ज्येष्ठ इत्यभिधीयते |**
**समसत्त्वो भवेन्मध्य: सत्त्वहीनोऽधम: स्मृत: || २ ||**

**पदच्छेद: –** सत्त्व-अतिरिक्त: अभिनय: ज्येष्ठ: इति अभिधीयते |
समसत्त्व: भवेत् मध्य: सत्त्वहीन: अधम: स्मृत: || २ ||

**अन्वय: –** सत्त्वातिरिक्त: अभिनय: ज्येष्ठ: इति अभिधीयते | समसत्त्व: मध्य: भवेत् | सत्त्वहीन: अधम: स्मृत: |

**अर्थ –** सत्त्वाचा अतिरेक असलेला अभिनय 'ज्येष्ठ' अभिनय मानला जातो . समानरूपाने जिथे सत्त्व असेल त्याला 'मध्य' अभिनय आणि सत्त्वहीन अभिनयाला 'अधम' असे मानले आहे .

**अव्यक्तरूपं सत्त्वं हि विज्ञेयं भावसंश्रयम् |**
**यथास्थानरसोपेतं रोमाञ्चास्रादिभिर्गुणै: || ३ ||**

**पदच्छेद: –** अव्यक्तरूपम् सत्त्वम् हि विज्ञेयम् भावसंश्रयम् |
यथास्थान-रसोपेतम् रोमाञ्च-अस्र-आदिभि: गुणै: || ३ ||

**अन्वय: –** यथास्थानरसोपेतम् भावसंश्रयम् अव्यक्तरूपम् सत्त्वम् हि रोमाञ्चास्रादिभि: गुणै: विज्ञेयम् |

**अर्थ –** सत्त्व जे स्थान आणि रस यांनी युक्त असते, भावाधीन असते, ज्याचे स्वरूप अव्यक्त असते ते रोमांच, अश्रु इत्यादी गुणांनी जाणून घ्यावे .

### ❖ अलंकार ❖

**अलङ्कारास्तु नाट्यज्ञैर्ज्ञेया भावरसाश्रया: |**
**यौवनेऽभ्यधिका: स्त्रीणां विकारा वक्त्रगात्रजा: || ४ ||**

**पदच्छेद: –** अलङ्कारा: तु नाट्यज्ञै: ज्ञेया: भाव-रस-आश्रया: |
यौवने अभ्यधिका: स्त्रीणाम् विकारा: वक्त्र-गात्रजा: || ४ ||

**अन्वय: –** नाट्यज्ञै: तु भावरसाश्रया: अलङ्कारा: ज्ञेया: | स्त्रीणाम् वक्त्रगात्रजा: विकारा: यौवने अभ्यधिका: (सन्ति) |

**अर्थ –** नाट्य जाणणाऱ्यांनी भाव आणि रसांच्या आश्रयात असलेले अलंकार समजून घ्यावे . स्त्रियांच्या वाचिक आणि आंगिक क्रिया विशेषत: तारूण्यामध्ये अधिक असतात .

**आदौ त्रयोऽङ्गजास्तेषां दश स्वाभाविका: परे |**
**अयत्नजा: पुन: सप्त रसभावोपबृंहिता: || ५ ||**

**पदच्छेद:** – आदौ त्रय: अङ्गजा: तेषाम् दश स्वाभाविका: परे |
अयत्नजा: पुन: सप्त रसभाव-उपवृंहिता: || ५ ||

**अन्वय:** – आदौ त्रय: अलङ्कारा: अङ्गजा: सन्ति | तेषाम् परे दश स्वाभाविका: सन्ति | पुन: सप्त अयत्नजा: सन्ति एते रसभावोपवृंहिता: सन्ति |

**अर्थ** – यातील पहिले तीन अलंकार हे अंगज म्हणजेच 'आंगिक अलंकार' असतात. त्यानंतरचे दहा 'स्वभावज अलंकार' असतात. त्यानंतरचे सात 'अयत्नज अलंकार' प्रयत्न न करता सहज होणारे असे असतात. हे सर्व रस आणि भाव यांना पुष्ट करतात.

**❖ स्त्रियांचे ३ अंगज अलंकार ❖**

**देहात्मकं भवेत्सत्त्वं सत्त्वाद्भाव: समुत्थित: |**
**भावात्समुत्थितो हावो हावाद्धेला समुत्थिता || ६ ||**

**पदच्छेद:** – देहात्मकम् भवेत् सत्त्वम् सत्त्वात् भाव: समुत्थित: |
भावात् समुत्थित: हाव: हावात् हेला समुत्थिता || ६ ||

**अन्वय:** – सत्त्वम् देहात्मकम् भवेत् | सत्त्वात् भाव: समुत्थित: | भावात् हाव: समुत्थित: | हावात् हेला समुत्थिता |

**अर्थ** – सत्त्व हे देहामध्येच असते, सत्त्वातून भाव उत्पन्न होतो, भावातून हावाची उत्पत्ती होते आणि हावातून हेला उत्पन्न होते.

**हेला हावश्च भावश्च परस्परसमुत्थिता: |**
**सत्त्वभेदे भवन्त्येते शरीरे प्रकृतिस्थिता: || ७ ||**

**पदच्छेद:** – हेला हाव: च भाव: च परस्पर-समुत्थिता: |
सत्त्व-भेदे भवति एते शरीरे प्रकृति-स्थिता: || ७ ||

**अन्वय:** – हेला हाव: च भाव: च परस्परसमुत्थिता: | एते सत्त्वभेदे शरीरे प्रकृतिस्थिता: भवन्ति |

**अर्थ** – हाव, भाव आणि हेला हे एकमेकांमधून उत्पन्न होतात, कारण सत्त्वातून उत्पन्न होणारे हे भेद शरीरात स्वाभाविकपणे असतात.

❖ भाव ❖

**वागङ्गमुखरागैश्च सत्त्वेनाभिनयेन च |**
**कवेरन्तर्गतं भावं भावयन्भाव उच्यते || ८ ||**

**पदच्छेद :-** वाग्-अङ्ग-मुख-रागै : च सत्त्वेन अभिनयेन च |
कवे : अन्तर्गतम् भावम् भावयन् भाव : उच्यते || ८ ||

**अन्वय :** – वागङ्गमुखरागै : सत्त्वेन अभिनयेन च कवे : अन्तर्गतम् भावयन् भावम् भाव : उच्यते |

**अर्थ** – वाणी, अंग, मुखराग आणि सत्त्वाच्या अभिनयातून कवीचे अंतर्गत भाव अभिव्यक्त करणाऱ्या कारणास 'भाव' असे म्हणतात .

**भावस्यातिकृतं सत्त्वं व्यतिरिक्तं स्वयोनिषु |**
**नैकावस्थान्तरकृतं भावं तमिह निर्दिशेत् || ९ ||**

**पदच्छेद :-** भावस्य अतिकृतम् सत्त्वम् व्यतिरिक्तम् स्वयोनिषु |
नैकावस्थान्तर-कृतम् भावम् तम् इह निर्दिशेत् || ९ ||

**अन्वय :** – भावस्य अतिकृतम् सत्त्वम् स्वयोनिषु व्यतिरिक्तम् नैकावस्थान्तरकृतम् तम् इह भावम् इति निर्दिशेत् |

**अर्थ** – भावाचा जो अमर्याद सत्त्व आहे आणि जो स्वत:च्या कारणांमुळे वेगळा आहे आणि जो भिन्न अवस्थांद्वारे व्यक्त केला जातो त्याला नाट्यामध्ये 'भाव' असे म्हणतात .

❖ हाव ❖

**तत्राक्षिभ्रूविकाराढ्य: शृङ्गाराकारसूचक: |**
**सग्रीवारेचको ज्ञेयो हाव: स्थितसमुत्थित: || १० ||**

**पदच्छेद :-** तत्र अक्षि-भ्रू-विकार-आढ्य : शृङ्गार-आकार-सूचक : |
सग्रीवारेचक :ज्ञेय : हाव : स्थित-समुत्थित : || १० ||

**अन्वय :** – तत्र अक्षिभ्रूविकाराढ्य : शृङ्गाराकारसूचक : सग्रीवारेचक : स्थितसमुत्थित : हाव : ज्ञेय : |

**अर्थ** – डोळे, भुवया, मुख इत्यादींच्या विकारांनी शृंगाराचा निर्देश करणारा तसेच ग्रीवारेचकांनी युक्त असणारा, भावांच्या परिस्थितीतून उत्पन्न होणाऱ्या भावांना 'हाव' असे म्हणतात .

❖ हेला ❖

**यो वै हाव: स एवैषा शृङ्गाररससंभवा |**
**समाख्याता बुधैर्हेला ललिताभिनयात्मिका || ११ ||**

**पदच्छेद :–** य : वै हाव : स : एव एषा शृङ्गार-रस-संभवा |
समाख्याता बुधै : हेला ललित-अभिनयात्मिका || ११ ||

**अन्वय : –** य : वै हाव : स : एव एषा शृङ्गाररससंभवा ललिताभिनयात्मिका हेला बुधै : समाख्याता |

**अर्थ –** नटांचा जो हाव आहे तो शृंगारसातून निर्माण होत असेल आणि ललित अभिनयाने युक्त अशा अंगविकारांद्वारे प्रकट होत असेल तर त्याला बुद्धिमान लोक 'हेला' असे म्हणतात .

❖ स्त्रियांचे १० स्वभावज अलंकार ❖

**लीला विलासो विच्छित्तिर्विभ्रम: किलिकिञ्चितम् |**
**मोट्टायितं कुट्टमितं बिब्बोको ललितं तथा || १२ ||**
**विहृतं चेति विज्ञेया दश स्त्रीणां स्वभावजा: |**
**पुनरेषां स्वरूपाणि प्रवक्ष्यामि पृथक्पृथक् || १३ ||**

**पदच्छेद :–** लीला विलास : विच्छित्ति : विभ्रम : किलिकिञ्चितम् |
मोट्टायितम् कुट्टमितम् बिब्बोक : ललितम् तथा || १२ ||
विहृतम् च इति विज्ञेया : दश स्त्रीणाम् स्वभावजा : |
पुन : एषाम् स्वरूपाणि प्रवक्ष्यामि पृथक्पृथक् || १३ ||

**अन्वय : –** लीला विलास : विच्छित्ति : विभ्रम : किलिकिञ्चितम् मोट्टायितम् कुट्टमितम् बिब्बोक : तथा ललितम् विहृतम् च इति दश स्त्रीणाम् स्वभावजा : विज्ञेया : | पुन : एषाम् स्वरूपाणि पृथक्पृथक् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** लीला, विलास, विच्छित्ति, विभ्रम, किलकिंचित, मोट्टायित, कुट्टमित, बिब्बोक, ललित आणि विहृत हे दहा स्त्रियांचे स्वाभाविक अलंकार आहेत . पुढे यांची स्वतंत्रपणे लक्षणे सांगीन .

❖ १. लीला ❖

**वागङ्गालङ्कारैः शिष्टैः प्रीतिप्रयोजितैर्मधुरैः |**
**इष्टजनस्यानुकृतिर्लीला ज्ञेया प्रयोगज्ञैः || १४ ||**

**पदच्छेदः** – वाग्-अङ्ग-अलङ्कारैः शिष्टैः प्रीति-प्रयोजितैः मधुरैः |
इष्टजनस्य अनुकृतिः लीला ज्ञेया प्रयोगज्ञैः || १४ ||

**अन्वयः** – प्रीतिप्रयोजितैः शिष्टैः मधुरैः वागङ्गालङ्कारैः इष्टजनस्य अनुकृतिः प्रयोगज्ञैः लीला ज्ञेया |

**अर्थ** – प्रेमाने युक्त, शिष्ट आणि मधुर अशा वाणी, काया आणि अलंकार यांद्वारे प्रियजनांचे अनुकरण करणे यालाच 'लीला' असे म्हणतात.

❖ २. विलास ❖

**स्थानासनगमनानां हस्तभ्रूनेत्रकर्मणां चैव |**
**उत्पद्यते विशेषो यः श्लिष्टः स तु विलासः स्यात् || १५ ||**

**पदच्छेदः** – स्थान-आसन-गमनानाम् हस्त-भ्रू-नेत्र-कर्मणाम् च एव |
उत्पद्यते विशेषः यः श्लिष्टः सः तु विलासः स्यात् || १५ ||

**अन्वयः** – स्थानासनगमनानाम् एव च हस्तभ्रूनेत्रकर्मणाम् यः विशेषः श्लिष्टः उत्पद्यते सः तु विलासः स्यात् |

**अर्थ** – उभे रहाणे (स्थान), बसणे (आसन), चालणे (गमन), तसेच हात, भुवया, डोळे यांच्या क्रियाकलापांमध्ये जो विलक्षण बदल एकत्रितपणे दिसून येतो त्यास 'विलास' असे म्हणतात.

❖ ३. विच्छिति ❖

**माल्याच्छादनभूषणविलेपनानामनादरन्यासः |**
**स्वल्पोऽपि परां शोभां जनयति यस्मात्तु विच्छित्तिः || १६ ||**

**पदच्छेद :–** माल्य-आच्छादन-भूषण-विलेपनानाम् अनादर-न्यास :।
स्वल्प : अपि पराम् शोभाम् जनयति यस्मात् तु विच्छित्ति : ॥ १६ ॥

**अन्वय : –** माल्याच्छादनभूषणविलेपनानाम् स्वल्प: अपि अनादरन्यास: पराम् शोभाम् जनयति यस्मात् तु विच्छित्ति : (भवति)।

**अर्थ –** माळा, वस्त्र, भूषण आणि प्रसाधने यांचा तिरस्कार करणे किंवा त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत असताना थोडासा शृंगार करणे यास 'विच्छिति' असे म्हणतात .

**❖ ४ . विभ्रम ❖**

**विविधानामर्थानां वागङ्गाहार्यसत्त्वयोगानाम्।**
**मदरागहर्षजनितो व्यत्यासो विभ्रमो ज्ञेय: ॥ १७ ॥**

**पदच्छेद :–** विविधानाम् अर्थानाम् वाग्-अङ्ग-आहार्य-सत्त्व-योगानाम्।
मदराग-हर्षजनित : व्यत्यास : विभ्रम : ज्ञेय : ॥ १७ ॥

**अन्वय : –** वागङ्गाहार्यसत्त्वयोगानाम् विविधानाम् अर्थानाम् मदरागहर्षजनित: व्यत्यास: विभ्रम: ज्ञेय :।

**अर्थ –** वाचिक, आंगिक, आहार्य आणि सात्त्विक अभिनयाचे जे विविध विभाग आहेत त्यांमध्ये जे विषय आणि त्यांचे जे अर्थ (शब्द, क्रिया, किंवा वेशभूषा-प्रसाधन) यांमध्ये मद, प्रेम, हर्ष या कारणांमुळे जो बदल होतो आणि त्यामुळे वेगळ्याच स्थानांवर धारण केले जातात त्याला 'विभ्रम' असे म्हणतात .

**❖ ५ . किलकिंचित ❖**

**स्मितरुदितहसितभयहर्षगर्वदु :खश्रमाभिलाषाणाम्।**
**सङ्करकरणं हर्षादसकृत् किलिकिञ्चितं ज्ञेयम् ॥ १८ ॥**

**पदच्छेद :–** स्मित-रुदित-हसित-भय-हर्ष-गर्व-दु :ख-श्रम-अभिलाषाणाम्।
सङ्कर-करणम् हर्षात् असकृत् किलिकिञ्चितम् ज्ञेयम् ॥ १८ ॥

**अन्वय:** – स्मितरुदितहसितभयहर्षगर्वदु:खश्रमाभिलाषाणाम् हर्षात् असकृत् सङ्करकरणम् किलिकिञ्चितम् ज्ञेयम्|

**अर्थ** – स्मित हास्य करणे, रडणे, मोठ्याने हसणे, भय, हर्ष, गर्व, दु:ख, श्रम आणि अभिलाषा इत्यादी भाव एकत्रितरीत्या व्यक्त होणे यांस 'किलकिंचित' असे म्हणतात.

### ❖ ६. मोट्टायित ❖

**इष्टजनस्य कथायां लीलाहेलादिदर्शने वापि |**
**तद् भावभावनाकृतमुक्तं मोट्टायितं नाम || १९ ||**

**पदच्छेद:** – इष्टजनस्य कथायाम् लीला-हेला-आदि-दर्शने वा अपि |
तद् भाव-भावना-कृतम् उक्तम् मोट्टायितम् नाम || १९ ||

**अन्वय:** – इष्टजनस्य कथायाम् अपि वा लीलाहेलादिदर्शने तद् भावभावनाकृतम् मोट्टायितम् नाम उक्तम्|

**अर्थ** – प्रिय व्यक्तींच्या कथांमध्ये किंवा लीला, हेला इत्यादी पाहत असल्यामुळे त्यांच्यासारख्या भावांची इच्छा व्यक्त करणे त्याला 'मोट्टायित' असे म्हणतात.

### ❖ ७. कुट्टमित ❖

**केशस्तनाधरादिग्रहणादतिहर्षसंभ्रमोत्पन्नम् |**
**कुट्टमितं विज्ञेयं सुखमपि दु:खोपचारेण || २० ||**

**पदच्छेद:** – केश-स्तन-अधर-आदि-ग्रहणात् अतिहर्ष-संभ्रम-उत्पन्नम् |
कुट्टमितम् विज्ञेयम् सुखम् अपि दु:ख-उपचारेण || २० ||

**अन्वय:** – केशस्तनाधरादिग्रहणात् अतिहर्षसंभ्रमोत्पन्नम् दु:खोपचारेण सुखम् तत् कुट्टमितम् विज्ञेयम्|

**अर्थ** – प्रियकराद्वारे केस ओढताना, स्तन मर्दन करताना, अधरपान करीत असताना दु:ख आणि अत्यानंद अशा संभ्रमावस्थेत दु:खातून सुखाचा जो अनुभव होतो त्याला 'कुट्टमित' असे म्हणतात.

### ❖ ८. बिब्वोक ❖

**इष्टानां भावानां प्राप्तावभिमानगर्वसंभूतः |**
**स्त्रीणामनादरकृतो बिब्बोको नाम विज्ञेयः || २१ ||**

**पदच्छेदः–** इष्टानाम् भावानाम् प्राप्तौ अभिमान-गर्व-संभूतः |
स्त्रीणाम् अनादर-कृतः विब्वोकः नाम विज्ञेयः || २१ ||

**अन्वयः –** इष्टानाम् भावानाम् प्राप्तौ स्त्रीणाम् अभिमानगर्वसंभूतः अनादरकृतः विब्वोकः नाम विज्ञेयः |

**अर्थ –** इच्छित भावांची प्राप्ती झाल्यावर अभिमान आणि गर्वामुळे स्त्रियांकडे दुर्लक्ष केले जाते किंवा त्यांचा अनादर केला जातो त्याला 'विब्वोक' असे म्हणतात .

### ❖ ९. ललित ❖

**हस्तपादाङ्गविन्यासो भ्रूनेत्रोष्ठप्रयोजितः |**
**सौकुमार्याद्भवेद्यस्तु ललितं तत्प्रकीर्तितम् || २२ ||**

**पदच्छेदः–** हस्त-पाद-अङ्ग-विन्यासः भ्रू-नेत्र-ओष्ठ-प्रयोजितः |
सौकुमार्यात् भवेत् यः तु ललितम् तत् प्रकीर्तितम् || २२ ||

**अन्वयः –** सौकुमार्यात् यः भ्रूनेत्रोष्ठप्रयोजितः हस्तपादाङ्गविन्यासः भवेत् तत् तु ललितम् प्रकीर्तितम् |

**अर्थ –** भुवया, डोळे, ओठ यांसह हात-पाय इत्यादी अंगांचा स्त्रियांद्वारे जो सुकुमार प्रयोग केला जातो त्यास 'ललित' असे म्हणतात .

**करचरणाङ्गन्यासः सभ्रूनेत्रोष्ठसंप्रयुक्तस्तु |**
**सुकुमारविधानेन स्त्रीभिरितीदं स्मृतं ललितम् || २३ ||**

**पदच्छेदः–** कर-चरण-अङ्ग-न्यासः सभ्रू-नेत्र-ओष्ठ-संप्रयुक्तः तु |
सुकुमार-विधानेन स्त्रीभिः इति इदम् स्मृतम् ललितम् || २३ ||

**अन्वय :** – स्त्रीभि : सुकुमारविधानेन सभ्रूनेत्रोष्ठसंप्रयुक्त : इदम् करचरणाङ्गन्यास : तु ललितम् इति स्मृतम्।

**अर्थ** – स्त्रियांद्वारे भुवया, डोळे, ओठ तसेच हातपाय यांच्या नाजूक आणि मोहक हालचाली केल्या जातात, त्यास 'ललित' असे म्हणतात .

**❖ १० . विहृत ❖**

**वाक्यानां प्रीतियुक्तानां प्राप्तानां यदभाषणम्।**
**व्याजात्स्वभावतो वापि विहृतं नाम तद्भवेत् ॥ २४ ॥**

**पदच्छेद :** – वाक्यानाम् प्रीतियुक्तानाम् प्राप्तानाम् यत् अभाषणम्।
व्याजात् स्वभावत : वा अपि विहृतम् नाम तत् भवेत् ॥ २४ ॥

**अन्वय :** – प्रीतियुक्तानाम् वाक्यानाम् प्राप्तानाम् अपि स्वभावत : व्याजात् वा यत् अभाषणम् तत् विहृतम् नाम भवेत्।

**अर्थ** – आनंदाने बोलण्याच्या वेळी स्वभावामुळे किंवा कपटामुळे जो अबोलपणा धारण केला जातो त्याला 'विहृत' असे म्हणतात .

**प्राप्तानामपि वचसां क्रियते यदभाषणं ह्रिया स्त्रीभि : ।**
**व्याजात्स्वभावतो वाप्येतत्समुदाहृतं विहृतम् ॥ २५ ॥**

**पदच्छेद :** – प्राप्तानाम् अपि वचसाम् क्रियते यत् अभाषणम् ह्रिया स्त्रीभि : ।
व्याजात् स्वभावत : वा अपि एतत् समुदाहृतम् विहृतम् ॥ २५ ॥

**अन्वय :** – वचसाम् प्राप्तानाम् अपि स्त्रीभि : ह्रिया व्याजात् अपि वा स्वभावत : यत् अभाषणम् क्रियते एतत् 'विहृतम्' समुदाहृतम्।

**अर्थ** – बोलण्याच्या वेळी स्त्रिया लाजाळूपणामुळे, कपटामुळे अथवा स्वभावामुळे बोलत नाहीत, त्यास 'विहृत' म्हणतात .

**❖ स्त्रियांचे अयलज अलंकार ❖**

**शोभा कान्तिश्च दीप्तिश्च तथा माधुर्यमेव च |**
**धैर्य प्रागल्भ्यमौदार्यमित्यते स्युरयलजा: || २६ ||**

**पदच्छेद: –** शोभा कान्ति: च दीप्ति: च तथा माधुर्यम् एव च |
धैर्यम् प्रागल्भ्यम् औदार्यम् इति एते स्यु: अयलजा: || २६ ||

**अन्वय: –** शोभा कान्ति: दीप्ति: माधुर्य धैर्य प्रागल्भ्यम् औदार्यम् इति एते अयलजा: स्यु: |

**अर्थ –** शोभा, कांती, दीप्ती, माधुर्य, धैर्य, प्रागल्भ्य आणि औदार्य असे स्त्रियांचे सात 'अयलज' म्हणजे स्वयंस्फुरित अलंकार आहेत .

**❖ १ . शोभा ❖**

**रूपयौवनलावण्यैरुपभोगोपबृंहितै: |**
**अलङ्करणमङ्गानां शोभेति परिकीर्तिता || २७ ||**

**पदच्छेद: –** रूप-यौवन-लावण्यै: उपभोग-उपबृंहितै: |
अलङ्करणम् अङ्गानाम् शोभा इति परिकीर्तिता || २७ ||

**अन्वय: –** रूपयौवनलावण्यै: उपभोगोपबृंहितै: अङ्गानाम् अलङ्करणम् शोभा इति परिकीर्तिता |

**अर्थ –** रूप, तारुण्य आणि सौंदर्य यांमुळे आणि उपभोगाच्या आनंदामुळे उत्साहित होऊन अंग, प्रत्यंगांना सजविणे यास 'शोभा' म्हणतात .

**❖ २. कांति ३. दीप्ति ❖**

**विज्ञेया च तथा कान्ति: शोभैवापूर्णमन्मथा |**
**कान्तिरेवातिविस्तीर्णा दीप्तिरित्यभिधीयते || २८ ||**

**पदच्छेद: –** विज्ञेया च तथा कान्ति: शोभा इव आपूर्ण-मन्मथा |
कान्ति: एव अतिविस्तीर्णा दीप्ति: इति अभिधीयते || २८ ||

**अन्वय :** – आपूर्णमन्मथा शोभा एव कान्ति: विज्ञेया | अतिविस्तीर्णा कान्ति: एव दीप्ति: इति अभिधीयते |
(आ समन्तात् पूर्णो मन्मथ: इति कामोपभोगो हेतु: यस्या: सा इत्यर्थ: | - अ . भा . )

**अर्थ** – कामक्रीडेची इच्छा जिची अपूर्ण राहिली आहे आणि चहूबाजूंनी मदनाने वेढल्यावर जी शोभा नायिकेला प्राप्त होते त्यास 'कांती' असे म्हणतात . हीच कांती अतिप्रमाणात वाढली की त्यास 'दीप्ति' असे म्हटले जाते .

**❖ ४. माधुर्य ❖**

**सर्वावस्थाविशेषेषु दीप्तेषु ललितेषु च |**
**अनुल्बणत्वं चेष्टाया माधुर्यमिति संज्ञितम् || २९ ||**

**पदच्छेद :** – सर्व-अवस्था-विशेषेषु दीप्तेषु ललितेषु च |
अनुल्बणत्वम् चेष्टाया : माधुर्यम् इति संज्ञितम् || २९ ||

**अन्वय :** – ललितेषु च (इव) दीप्तेषु सर्वावस्थाविशेषेषु चेष्टाया: अनुल्बणत्वम् माधुर्यम् इति संज्ञितम् |
(दीप्तेषु इति क्रोधादिषु | 'च'शब्द इवार्थे ललितेषु रतिक्रीडादिषु यथामासृण्यं चेष्टायास्तथा दीप्तेष्वपि यत् तन्माधुर्यम् | - अ . भा . )

**अर्थ** – ज्याप्रमाणे रतिक्रीडेमध्ये कठोरता नसते त्याचप्रमाणे क्रोधामध्ये तसेच सर्व विशिष्ट (कायिक, वाचिक आणि मानसिक ) अवस्थांमध्ये जेव्हा कठोर कृती नसतात तेव्हा त्यास 'माधुर्य' असे म्हणतात .

**❖ ५. धैर्य ❖**

**चापलेनानुपहता सर्वार्थेष्वविकत्थना |**
**स्वाभाविकी चित्तवृत्तिर्धैर्यमित्यभिधीयते || ३० ||**

**पदच्छेद :** – चापलेन अनुपहता सर्वार्थेषु अविकत्थना |
स्वाभाविकी चित्तवृत्ति : धैर्यम् इति अभिधीयते || ३० ||

**अन्वय: –** चापलेन अनुपहता सर्वार्थेषु अविकत्थना स्वाभाविकी चित्तवृत्ति: धैर्यम् इति अभिधीयते | (सर्वार्थेष्विव रूपयौवनादिषु वर्गत्वात् च इयं क्रिया रूपेभ्य: पृथगेव धीरता पठिता | -अ.भा.)

**अर्थ –** चंचलता नसणे, सौंदर्य आणि तारुण्य असताना कसल्याही स्वरूपाची बढाई न मारणे आणि चित्तवृत्ती अत्यंत स्वाभाविक असणे यास 'धैर्य' असे म्हटले जाते.

**❖ ६. प्रागल्भ्य ७. औदार्य ❖**

**प्रयोगनिस्साध्वसता प्रागल्भ्यं समुदाहृतम् |**
**औदार्य प्रश्रय: प्रोक्त: सर्वावस्थानुगो बुधै: || ३१ ||**

**पदच्छेद: –** प्रयोग-निस्साध्वसता प्रागल्भ्यम् समुदाहृतम् |
औदार्यम् प्रश्रय: प्रोक्त: सर्व-अवस्था-अनुग: बुधै: || ३१ ||

**अन्वय: –** प्रयोगनिस्साध्वसता प्रागल्भ्यम् समुदाहृतम् | सर्वावस्थानुग: प्रश्रय: बुधै: औदार्यम् प्रोक्त: |
(प्रयोग इति कामकलादौ चातु:षष्टिकबाभ्रवीयोक्ता आलिङ्गनादिचतु:षष्टिकला वात्स्यायनेन सांप्रयोगिके ऽनूदिता: इत्यर्थ: | - अ.भा.) (सर्वासु अमर्प-ईर्ष्या -क्रोधादि-अवस्थासु अपि यत् परुषवचनादि-अनुदीरणं तदौदार्यम् | - अ.भा.)

**अर्थ –** कामकलेच्या आरंभी आलिंगनादी चौसष्ठ कलांचा प्रयोग करणे यास 'प्रागल्भ्य' असे म्हटले जाते. सर्व अवस्थांमध्ये नम्रपणे वागणे, यास विद्वान 'औदार्य' असे म्हणतात. (अमर्ष-ईर्ष्या-क्रोध इत्यादी सर्व अवस्थांमध्ये कठोर वचन न बोलणे यास 'औदार्य' असे म्हणतात. - अ.भा.)

**सुकुमारे भवन्त्येते प्रयोगे ललितात्मके |**
**विलासललिते हित्वा दीप्तेऽप्येते भवन्ति हि || ३२ ||**

**पदच्छेद: –** सुकुमारे भवन्ति एते प्रयोगे ललितात्मके |
विलास-ललिते हित्वा दीप्ते अपि एते भवन्ति हि || ३२ ||

**अन्वय: –** एते ललितात्मके सुकुमारे प्रयोगे भवन्ति | एते हि विलासललिते हित्वा दीप्ते अपि भवन्ति|

**अर्थ –** ललितात्मक सुकुमार प्रयोगामध्ये शोभा वगैरे सर्व गुणांचा उपयोग केला जातो . तसेच विलास आणि ललित सोडून क्रोधामध्ये या गुणांचा वापर केला जातो .

**❖ पुरुषगत सत्त्वभेद ❖**

**शोभा विलासो माधुर्यं स्थैर्यं गाम्भीर्यमेव च |**
**ललितौदार्यतेजांसि सत्त्वभेदास्तु पौरुषा: || ३३ ||**

**पदच्छेद: –** शोभा विलास: माधुर्यम् स्थैर्यम् गाम्भीर्यम् एव च |
ललित-औदार्य-तेजांसि सत्त्वभेदा: तु पौरुषा: || ३३ ||

**अन्वय: –** शोभा विलास: माधुर्यम् स्थैर्यम् गाम्भीर्यम् एव च ललितौदार्यतेजांसि पौरुषा: तु सत्त्वभेदा: (सन्ति) |

**अर्थ –** शोभा, विलास, माधुर्य, स्थैर्य, गांभीर्य, लालित्य, तेज आणि औदार्य हे पुरुषांचे आठ सात्त्विक भेद आहेत .

**❖ १. शोभा ❖**

**दाक्ष्यं शौर्यमथोत्साहो नीचार्थेषु जुगुप्सनम् |**
**उत्तमैश्च गुणै: स्पर्धा यत: शोभेति सा स्मृता || ३४ ||**

**पदच्छेद: –** दाक्ष्यम् शौर्यम् अथ उत्साह: नीचार्थेषु जुगुप्सनम् |
उत्तमै: च गुणै: स्पर्धा यत: शोभा इति सा स्मृता || ३४ ||

**अन्वय: –** अथ दाक्ष्यम् शौर्यम् उत्साह: नीचार्थेषु जुगुप्सनम् उत्तमै: च गुणै: स्पर्धा यत: सा शोभा इति स्मृता |

**अर्थ –** हुशारी, शौर्य (कौशल्य), उत्साह, अधम गोष्टी नापसंत असणे, उत्तम गुणांशी स्पर्धा करणे यास 'शोभा' असे म्हणतात .

**❖ २. विलास ❖**

**धीरसंचारिणी दृष्टिर्गतिर्गोवृषभाञ्चिता |**
**स्मितपूर्वमथालापो विलास इति कीर्तितः || ३५ ||**

**पदच्छेद :–** धीर-संचारिणी दृष्टिः गतिः गो-वृषभ-अञ्चिता |
स्मितपूर्वम् अथ आलापः विलासः इति कीर्तितः || ३५ ||

**अन्वय : –** अथ धीरसंचारिणी दृष्टिः गोवृषभाञ्चिता गतिः स्मितपूर्वम् आलापः विलासः इति कीर्तितः |

**अर्थ –** स्थिर संचार करणारी दृष्टी, उत्तम गाय आणि वृषभासमान गती, स्मित हास्य करीत बोलणे याला 'विलास' असे म्हणतात .

**❖ ३. माधुर्य ❖**

**अभ्यासात्करणानां तु श्लिष्टत्वं यत्र जायते |**
**महत्स्वपि विकारेषु तन्माधुर्यमिति स्मृतम् || ३६ ||**

**पदच्छेद :–** अभ्यासात् करणानाम् तु श्लिष्टत्वम् यत्र जायते |
महत्सु अपि विकारेषु तत् माधुर्यम् इति स्मृतम् || ३६ ||

**अन्वय : –** यत्र करणानाम् महत्सु विकारेषु अपि अभ्यासात् श्लिष्टत्वम् जायते तत् तु माधुर्यम् इति स्मृतम् |

(महत्स्वपि विकारेष्विति युद्धनियुद्धव्यायामादिषु अभ्यासकृतं करणानां करचरणादिक्रियाणां श्लिष्टत्वम् अनुल्बणत्वं यत्र शरीरविकारो स माधुर्यम् |- अ . भा . )

**अर्थ –** इंद्रियांमध्ये मोठमोठे विकार असले तरीही सरावामुळे इंद्रिय एकीकृत होऊन नियंत्रित हालचाली केल्या जातात त्यास 'माधुर्य' असे म्हणतात .

(युद्ध-नियुद्ध व्यायाम इत्यादींमध्ये सततच्या सरावामुळे शरीरामध्ये तसेच इंद्रियांच्या जसे हातपाय इत्यादींच्या क्रियेमध्ये एक विशिष्ट प्रकारचा लवचिकपणा किंवा नम्रपणा येतो त्या शरीराच्या बदलास 'माधुर्य' असे म्हणतात . - अ . भा . )

❖ ४. स्थैर्य ❖

**धर्मार्थकामसंयुक्ताच्छुभाशुभसमुत्थितात् |**
**व्यवसायादचलनं स्थैर्यमित्यभिसंज्ञितम् ||३७||**

**पदच्छेद:-** धर्म-अर्थ-काम-संयुक्तात् शुभ-अशुभ-समुत्थितात् |
व्यवसायात् अचलनम् स्थैर्यम् इति अभिसंज्ञितम् || ३७ ||

**अन्वय:-** धर्मार्थकामसंयुक्तात् शुभाशुभसमुत्थितात् व्यवसायात् अचलनम् स्थैर्यम् इति अभिसंज्ञितम् |

**अर्थ** - धर्म, अर्थ, काम यांनी युक्त तसेच शुभ किंवा अशुभ कार्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे आचरणात बदल न होणे यास 'स्थैर्य' असे म्हणतात .

❖ ५. गांभीर्य ❖

**यस्य प्रभावादाकारा हर्षक्रोधभयादिषु |**
**भावेषु नोपलक्ष्यन्ते तद्गाम्भीर्यमिति स्मृतम् || ३८ ||**

**पदच्छेद:-** यस्य प्रभावात् आकारा: हर्ष-क्रोध-भय-आदिषु |
भावेषु न उपलक्ष्यन्ते तत् गाम्भीर्यम् इति स्मृतम् || ३८ ||

**अन्वय:-** यस्य प्रभावात् हर्षक्रोधभयादिषु भावेषु आकारा: न उपलक्ष्यन्ते तत् गाम्भीर्यम् इति स्मृतम् |

**अर्थ** - ज्याच्या प्रभावामुळे आनंद, क्रोध तसेच भय इत्यादी भाव चेहऱ्यावर दिसून येत नाहीत, त्याला 'गांभीर्य' म्हणतात .

❖ ६. ललित ❖

**अबुद्धिपूर्वकं यत्तु निर्विकारस्वभावजम् |**
**शृङ्गाराकारचेष्टत्वं ललितं तदुदाहृतम् || ३९ ||**

**पदच्छेद :–** अबुद्धि-पूर्वकम् यत् तु निर्विकार-स्वभावजम् |
शृङ्गार-आकार-चेष्टत्वम् ललितम् तत् उदाहृतम् || ३९ ||

**अन्वय : –** यत् तु अबुद्धिपूर्वकम् निर्विकारस्वभावजम् शृङ्गाराकारचेष्टत्वम् तत् ललितम् उदाहृतम् |

**अर्थ –** अजाणपणे विकाररहित स्वभावजन्य शृंगार आणि शृंगारिक चेष्टा यांना 'ललित' असे म्हणतात .

**❖ ७. औदार्य ❖**

**दानमभ्युपपत्तिश्च तथा च प्रियभाषणम् |**
**स्वजने च परे वापि तदौदार्यं प्रकीर्तितम् || ४० ||**

**पदच्छेद :–** दानम् अभ्युपपत्ति : च तथा च प्रियभाषणम् |
स्वजने च परे वा अपि तत् औदार्यम् प्रकीर्तितम् || ४० ||

**अन्वय : –** स्वजने च परे वा अपि दानम् तथा च अभ्युपपत्तिः प्रियभाषणम् च तत् औदार्यम् प्रकीर्तितम् |

**अर्थ –** कुटुंबातील सदस्य किंवा इतरांशी कुठलाही भेदभाव न ठेवता दान केले जाते, कृपा दर्शविली जाते आणि गोड बोलले जाते तेव्हा त्याला 'औदार्य' म्हणतात .

**❖ ८. तेज ❖**

**अधिक्षेपावमानादेः प्रयुक्तस्य परेण यत् |**
**प्राणात्ययेऽप्यसहनं तत्तेजः समुदाहृतम् || ४१ ||**

**पदच्छेद :–** अधिक्षेप-अवमान-आदे : प्रयुक्तस्य परेण यत् |
प्राणात्यये अपि असहनम् तत् तेज : समुदाहृतम् || ४१ ||

**अन्वय : –** प्राणात्यये अपि परेण प्रयुक्तस्य अधिक्षेपावमानादे : यत् असहनम् तत् तेज : समुदाहृतम् |
(परेण इति शत्रुणा, न तु गुरुणा मित्रादिना वा | – अ . भा . )

**अर्थ –** प्राण जात असतानाही शत्रूद्वारे केले जाणारे आरोप आणि अपमान इत्यादी सहन न करणे यास 'तेज' म्हणतात .

**सत्त्वजोऽभिनयः पूर्वं मया प्रोक्तो द्विजोत्तमाः |**
**शारीरं चाप्यभिनयं व्याख्यास्याम्यनुपूर्वशः ||४२||**

**पदच्छेदः** – सत्त्वजः अभिनयः पूर्वम् मया प्रोक्तः द्विजोत्तमाः |
शारीरम् च अपि अभिनयम् व्याख्यास्यामि अनुपूर्वशः ||४२||

**अन्वयः** – द्विजोत्तमाः, पूर्वम् मया सत्त्वजः अभिनयः प्रोक्तः | अपि च शारीरम् अभिनयम् अनुपूर्वशः व्याख्यास्यामि |
(पूर्वमिति भावाध्याये एव ते निरूपिताः इति | - अ. भा. )
(अत्र चशब्दो यस्मादर्थे, अपिशब्दस्तत इत्यत्रार्थे | - अ. भा. )

**अर्थ** – हे ब्राह्मणांनो, यापूर्वी भावाध्यायामध्ये मी सत्त्वातून निर्माण होणारा सात्त्विक अभिनय सांगितला. त्यामुळे यानंतर आता मी क्रमाने शारीराभिनय सांगीन.

**❖ शारीराभिनय ❖**

**षडात्मकस्तु शारीरो वाक्यं सूचाङ्कुरस्तथा |**
**शाखा नाट्यायितं चैव निवृत्त्यङ्कुर एव च ||४३||**

**पदच्छेदः** – षडात्मकः तु शारीरः वाक्यम् सूचा अङ्कुरः तथा |
शाखा नाट्यायितम् च एव निवृत्त्यङ्कुरः एव च ||४३||

**अन्वयः** – शारीरः तु वाक्यम् सूचा अङ्कुरः शाखा नाट्यायितम् एव च निवृत्त्यङ्कुरः (इति) षडात्मकः |

**अर्थ** – शरीराने केल्या जाणाऱ्या अभिनयाचे सहा प्रकार सांगितले आहेत. वाक्य, सूचा, अंकुर, शाखा, नाट्यायित आणि निवृत्यंकुर.

**❖ वाक्याभिनय ❖**

**नानारसार्थयुक्तैर्वृत्तनिबन्धैः कृतः सचूर्णपदैः | (आर्या)**
**प्राकृतसंस्कृतपाठो वाक्याभिनयो बुधैर्ज्ञेयः ||४४||**

**पदच्छेद :–** नाना-रस-अर्थ-युक्तै : वृत्तनिबन्धै : कृत : सचूर्णपदै : |
प्राकृत-संस्कृत-पाठ : वाक्याभिनय : बुधै : ज्ञेय : || ४४ ||

**अन्वय : –** नानारसार्थयुक्तै: वृत्तनिबन्धै: सचूर्णपदै: कृत: प्राकृतसंस्कृतपाठ: बुधै: वाक्याभिनय : (इति) ज्ञेय : |

**अर्थ –** प्राकृत आणि संस्कृत भाषेतील विविध प्रकारच्या रसांनी आणि अर्थांनी युक्त असलेल्या, गद्यमय पद्यमय (छन्दोबद्ध) वाक्यांचा जेव्हा अभिनय केला जातो, तेव्हा त्याला बुद्धिमान लोकांनी 'वाक्याभिनय' समजावे .

❖ **सूचाभिनय** ❖

**वाक्यार्थो वाक्यं वा सत्त्वाङ्गै : सूच्यते यदा पूर्वम् | (आर्या)**
**पश्चाद्वाक्याभिनय: सूचेत्यभिसंज्ञिता सा तु || ४५ ||**

**पदच्छेद :–** वाक्यार्थ : वाक्यम् वा सत्त्वाङ्गै : सूच्यते यदा पूर्वम् |
पश्चात् वाक्याभिनय : सूचा इति अभिसंज्ञिता सा तु || ४५ ||

**अन्वय : –** यदा सत्त्वाङ्गै : पूर्वं वाक्यार्थ : वाक्यं वा सूच्यते पश्चात् वाक्याभिनय : (क्रियते) सा तु सूचा इति अभिसंज्ञिता |

**अर्थ –** वाक्य किंवा वाक्याचा अर्थ शरीराच्या सात्त्विक अंगचेष्टांद्वारे आधीच सूचित केला जात असेल आणि त्यानंतर वाक्याभिनय होत असेल तर त्याला 'सूचाभिनय' असे ओळखले जाते .

❖ **अंकुराभिनय** ❖

**हृदयस्थो निर्वचनैरङ्गाभिनय : कृतो निपुणसाध्य : | (आर्या)**
**सूचैवोत्पत्तिकृतो विज्ञेयस्त्वङ्कुराभिनय: || ४६ ||**

**पदच्छेद :–** हृदयस्थ : निर्वचनै : अङ्गाभिनय : कृत : निपुण-साध्य : |
सूचा एव उत्पत्ति-कृत : विज्ञेय : तु अङ्कुराभिनय : || ४६ ||

**अन्वय : –** हृदयस्थ : निपुणसाध्य : सूचा एव उत्पत्तिकृत : भाव : निर्वचनै : अङ्गाभिनय : कृत : चेत् तु अङ्कुराभिनय : |

(इति) विज्ञेय: | (यच्चायमङ्कुरो निपुणैरेव प्रयोक्तृभि: सामाजिकैश्च साध्य: आपाद्य: चेतसा ध्यात: उत्पत्त्या स्वबुद्धिकल्पनयापचित: | - अ.भा.) (निर्वचनशब्देन उक्तत्वादर्थस्य | - अ.भा.)

**अर्थ** – हृदयात असलेला भाव, निपुण नटाने किंवा रसिकांनी प्राप्त करायचा असतो आणि सूचाभिनयाद्वारे स्वबुद्धिकल्पनेने तो समजून असतो, यासाठी जेव्हा नट विशिष्ट शब्दांद्वारे आंगिक अभिनय करतो तेव्हा त्यास 'अंकुराभिनय' असे म्हणतात.

**❖ शाखाभिनय ❖**

**यत्तु शिरोमुखजङ्घोरुपाणिपादैर्यथाक्रमं क्रियते | (आर्या)**
**शाखादर्शनमार्ग: शाखाभिनय: स विज्ञेय: ||४७||**

**पदच्छेद:** – यत् तु शिर:-मुख-जङ्घा-उरु-पाणि-पादै: यथाक्रमम् क्रियते |
शाखा-दर्शन-मार्ग: शाखाभिनय: स: विज्ञेय: ||४७||

**अन्वय:** – यत् तु शिरोमुखजङ्घोरुपाणिपादै: यथाक्रमम् शाखादर्शनमार्ग: क्रियते स: शाखाभिनय: विज्ञेय: |

**अर्थ** – जेव्हा शिर, मुख, जंघा, उरू, हस्त, पाद इत्यादी अवयव एकमेकांना अनुसरण करीत त्याद्वारे क्रमश: शाखादर्शितमार्गानुसार अभिनय सादर केला जातो तेव्हा त्यास 'शाखाभिनय' असे म्हणतात.

**❖ नाट्यायित ❖**

**नाट्यायितमुपचारैर्य: क्रियतेऽभिनयसूचया नाट्ये | (आर्या)**
**कालप्रकर्षहेतो: प्रवेशकै: संगमो यावत् ||४८||**

**पदच्छेद:** – नाट्यायितम् उपचारै: य: क्रियते अभिनय-सूचया नाट्ये |
काल-प्रकर्ष-हेतो: प्रवेशकै: संगम: यावत् ||४८||

**अन्वय:** – यावत् नाट्ये कालप्रकर्षहेतो: अभिनयसूचया उपचारै: प्रवेशकै: य: संगम: क्रियते (तत्) नाट्यायितम् (इति ज्ञेयम्) | (नाट्ये यत्प्रवेशकै: नाट्यान्तरगतैरिव पात्रै: अत

एव तत: प्रविशति इत्युक्तै: सङ्गम: क्रियते तन्नाट्यायितम्|- अ.भा.)
(कालप्रकर्षलक्षणाद्धेतो: अन्योन्यभिन्नकालत्वात् कथं तत्र एकघनता युक्ता इति भाव:|- अ.भा.)

**अर्थ** – भरतमुनींनी नाट्यायिताचे दोन प्रकार सांगितले आहेत.
नाट्यप्रयोग सुरू होण्यापूर्वी अभिनय सूचित करण्यासाठी अनेक उपचारांद्वारे आणि प्रवेशकांद्वारे पात्रांचा रंगमंचावर प्रवेश होऊन एकत्र सादरीकरण केले जाते त्याला 'नाट्यायित' असे म्हणतात.

**स्थाने ध्रुवास्वभिनयो य: क्रियते हर्षशोकरोषाद्यै:| (आर्या)**
**भावरससंप्रयुक्तैर्ज्ञेयं नाट्यायितं तदपि ||४९||**

**पदच्छेद:** – स्थाने ध्रुवासु अभिनय: य: क्रियते हर्ष-शोक-रोष-आद्यै:|
भाव-रस-संप्रयुक्तै: ज्ञेयम् नाट्यायितम् तत् अपि ||४९||

**अन्वय:** – हर्षशोकरोषाद्यै: भावरससंप्रयुक्तै: य: अभिनय: ध्रुवासु स्थाने क्रियते तत् अपि नाट्यायितम् ज्ञेयम्|

**अर्थ** – भाव आणि रसांनी युक्त अशा हर्ष, शोक आणि रोष इत्यादींचा सम्यक् अभिनय ध्रुवागानांमध्ये प्रस्तुत केला जातो तेव्हा त्यास 'नाट्यायित' म्हणतात.

❖ **निवृत्त्यंकुर** ❖

**यत्रान्योक्तं वाक्यं सूचाभिनयेन योजयेदन्य:| (आर्या)**
**तत्संबन्धार्थकथं भवेन्निवृत्त्यङ्कुर: सोऽथ ||५०||**

**पदच्छेद:** – यत्र अन्योक्तम् वाक्यम् सूचाभिनयेन योजयेत् अन्य:|
तत् संबन्धार्थकथम् भवेत् निवृत्त्यङ्कुर: स: अथ ||५०||

**अन्वय:** – अथ यत्र तत्संबन्धार्थकथम् अन्योक्तम् वाक्यम् सूचाभिनयेन अन्य: योजयेत् स: निवृत्त्यङ्कुर: भवेत्|

**अर्थ** – एका पात्राने सांगितलेले वाक्य किंवा घटना ऐकून त्यासंबंधीची प्रतिक्रिया दुसऱ्या पात्राकडून सूचाभिनयाद्वारे अभिव्यक्त केली जाते त्या घटनेची सूचना देणाऱ्या साभिनय अभिव्यक्तीस 'निवृत्यंकुर' म्हणतात.

**एतेषां तु भवेन्मार्गो यथाभावरसान्वित: |**
**काव्यवस्तुषु निर्दिष्टो द्वादशाभिनयात्मक: || ५१ ||**

**पदच्छेद :** – एतेषाम् तु भवेत् मार्ग: यथाभाव-रसान्वित: |
काव्य-वस्तुषु निर्दिष्ट: द्वादश-अभिनयात्मक: || ५१ ||

**अन्वय :** – एतेषाम् तु यथाभावरसान्वित: काव्यवस्तुषु निर्दिष्ट: मार्ग: स द्वादशाभिनयात्मक: भवेत्|

**अर्थ** – रस आणि भावांनी युक्त असलेला, कथावस्तुमध्ये सांगितला गेलेला, वाचिक अभिनयाचा जो मार्ग म्हणजे विषय आहे, तो बारा प्रकारच्या अभिनयांद्वारे व्यक्त होतो.

**❖ वाचिक अभिनय ❖**

**आलापश्च प्रलापश्च विलाप: स्यात्तथैव च |**
**अनुलापोऽथ संलापस्त्वपलापस्तथैव च || ५२ ||**
**सन्देशश्चातिदेशश्च निर्देश: स्यात्तथापर: |**
**उपदेशोऽपदेशश्च व्यपदेशश्च कीर्तित: || ५३ ||**

**पदच्छेद :** – आलाप: च प्रलाप: च विलाप: स्यात् तथा एव च |
अनुलाप: अथ संलाप: तु अपलाप: तथा एव च || ५२ ||
सन्देश: च अतिदेश: च निर्देश: स्यात् तथा अपर: |
उपदेश: अपदेश: च व्यपदेश: च कीर्तित: || ५३ ||

**अन्वय :** – आलाप: प्रलाप: विलाप: अनुलाप: संलाप: अपलाप: च स्यात् | सन्देश: अतिदेश: निर्देश: च स्यात् | उपदेश: अपदेश: व्यपदेश: च कीर्तित: |

**अर्थ** – वाचिक अभिनयाचे आलाप, प्रलाप, विलाप, अनुलाप, संलाप, अपलाप, संदेश, अतिदेश, निर्देश, उपदेश, अपदेश, आणि व्यपदेश हे बारा प्रकार सर्वश्रुत आहेत.

**❖ आलाप आणि प्रलाप ❖**

**आभाषणं तु यद्वाक्यमालापो नाम स स्मृतः।**
**अनर्थकं वचो यत्तु प्रलापः स तु कीर्तितः॥ ५४॥**

**पदच्छेदः-** आभाषणम् तु यत् वाक्यम् आलापः नाम सः स्मृतः।
अनर्थकम् वचः यत् तु प्रलापः सः तु कीर्तितः॥ ५४॥

**अन्वयः -** यत् तु आभाषणम् वाक्यम् सः आलापः नाम स्मृतः। यत् तु अनर्थकम् वचः सः तु प्रलापः कीर्तितः।

**अर्थ -** संभाषण करणे म्हणजे आलाप आणि निरर्थक वाक्याला 'प्रलाप' असे म्हणतात.

**❖ विलाप आणि अनुलाप ❖**

**करुणप्रभवो यस्तु विलापः स तु कीर्तितः।**
**बहुशोऽभिहितं वाक्यमनुलाप इति स्मृतः॥ ५५॥**

**पदच्छेदः-** करुण-प्रभवः यः तु विलापः सः तु कीर्तितः।
बहुशः अभिहितम् वाक्यम् अनुलापः इति स्मृतः॥ ५५॥

**अन्वयः -** यः तु करुणप्रभवः सः तु विलापः कीर्तितः। बहुशः अभिहितम् वाक्यम् अनुलापः इति स्मृतः।

**अर्थ -** करुणरस निर्माण करण्या-या वाक्यास 'विलाप' म्हणतात आणि पुनः पुनः तेच बोलले गेले असेल त्याला 'अनुलाप' म्हणतात.

**❖ संलाप आणि अपलाप ❖**

**उक्तिप्रत्युक्तिसंयुक्तः संलाप इति कीर्तितः।**
**पूर्वोक्तस्यान्यथावादो ह्यपलाप इति स्मृतः॥ ५६॥**

**पदच्छेदः-** उक्ति-प्रत्युक्ति-संयुक्तः संलापः इति कीर्तितः।
पूर्व-उक्तस्य अन्यथावादः हि अपलापः इति स्मृतः॥ ५६॥

**अन्वय:** – उक्तिप्रत्युक्तिसंयुक्त: संलाप: इति कीर्तित: | पूर्वोक्तस्य अन्यथावाद: हि अपलाप: इति स्मृत: |

**अर्थ** – भाषण आणि उत्तर (उक्ति आणि प्रत्युक्ति) यांसह असलेल्या संभाषणास 'संलाप' म्हणतात. आधी म्हटलेल्या वाक्यानंतर उलट प्रत्युत्तर दिले तर त्यास 'अपलाप' असे म्हणतात.

**❖ संदेश आणि अतिदेश ❖**

**तदिदं वचनं ब्रूहीत्येष सन्देश उच्यते |**
**यत्त्वयोक्तं मयोक्तं तत्सोऽतिदेश इति स्मृत: || ५७ ||**

**पदच्छेद:** – तत् इदम् वचनम् ब्रूहि इति एष: सन्देश: उच्यते |
यत् त्वया उक्तम् मया उक्तम् तत् स: अतिदेश: इति स्मृत: || ५७ ||

**अन्वय:** – तत् इदम् वचनम् ब्रूहि इति एष: सन्देश: उच्यते | यत् त्वया उक्तम् तत् मया उक्तम् स: अतिदेश: इति स्मृत: |

**अर्थ** – 'तर हे वाक्य सांग' याला 'संदेश' म्हणतात आणि 'जे तुम्ही सांगितले तेच मी सांगितले' असे बोलणे यास 'अतिदेश' असे म्हणतात.

**❖ निर्देश आणि व्यपदेश ❖**

**स एषोऽहं ब्रवीमीति निर्देश इति कीर्तित: |**
**व्याजान्तरेण कथनं व्यपदेश इहोच्यते || ५८ ||**

**पदच्छेद:** – स: एष: अहम् ब्रवीमि इति निर्देश: इति कीर्तित: |
व्याजान्तरेण कथनम् व्यपदेश: इह उच्यते || ५८ ||

**अन्वय:** – एष: अहम् ब्रवीमि इति स: निर्देश: इति कीर्तित: | व्याजान्तरेण कथनम् इह व्यपदेश: उच्यते |

**अर्थ** – 'मी बोलत आहे' अशा वाक्याला 'निर्देश' म्हणतात आणि छल कपटाने सांगणे यास 'व्यपदेश' म्हणतात.

**❖ उपदेश आणि अपदेश ❖**

**इदं कुरु गृहाणेति ह्युपदेशः प्रकीर्तितः |**
**अन्यार्थकथनं यत् स्यात् सोऽपदेशः प्रकीर्तितः || ५९ ||**

**पदच्छेदः** – इदम् कुरु गृहाण इति हि उपदेशः प्रकीर्तितः |
अन्यार्थ-कथनम् यत् स्यात् सः अपदेशः प्रकीर्तितः || ५९ ||

**अन्वयः** – इदम् कुरु गृहाण इति हि उपदेशः प्रकीर्तितः | यत् अन्यार्थकथनम् स्यात् सः अपदेशः प्रकीर्तितः |

**अर्थ** – "हे करा, हे घ्या" याला 'उपदेश' म्हणतात आणि स्वतःच्या मनात असलेले दुसराच कोणीतरी सांगतोय असे सांगणे याला 'अपदेश' असे म्हणतात .

**❖ मार्गाचे प्रकार ❖**

**एते मार्गास्तु विज्ञेयाः सर्वाभिनययोजकाः |**
**सप्तप्रकारमेतेषां पुनर्वक्ष्यामि लक्षणम् || ६० ||**

**पदच्छेदः** – एते मार्गाः तु विज्ञेयाः सर्व-अभिनय-योजकाः |
सप्तप्रकारम् एतेषाम् पुनः वक्ष्यामि लक्षणम् || ६० ||

**अन्वयः** – एते सर्वाभिनययोजकाः मार्गाः तु विज्ञेयाः | पुनः एतेषाम् सप्तप्रकारम् लक्षणम् वक्ष्यामि |

**अर्थ** – सर्व प्रकारच्या अभिनयांना जोडणारे हे मार्ग जाणून घ्यावेत . आता मी यांची सात प्रकारची लक्षणे सांगीन .

**प्रत्यक्षश्च परोक्षश्च तथा कालकृतास्त्रयः |**
**आत्मस्थश्च परस्थश्च प्रकाराः सप्त एव तु || ६१ ||**

**पदच्छेदः** – प्रत्यक्षः च परोक्षः च तथा कालकृताः त्रयः |
आत्मस्थः च परस्थः च प्रकाराः सप्त एव तु || ६१ ||

**अन्वयः** – प्रत्यक्षः, परोक्षः, त्रयः कालकृताः, आत्मस्थः, परस्थः च एव तु सप्त प्रकाराः (सन्ति) |

**अर्थ** – प्रत्यक्ष, परोक्ष, तीन कालकृत (वर्तमान, भूत आणि भविष्य), आत्मस्थ आणि परस्थ असे वाचिक अभिनयाचे सात प्रकार आहेत .

**एवं ब्रवीमि नाहं भो वदामीति च यद्वच: |**
**प्रत्यक्षश्च परोक्षश्च वर्तमानश्च तद् भवेत् || ६२ ||**

**पदच्छेद:** – एवम् ब्रवीमि न अहम् भो: वदामि इति च यत् वच: |
प्रत्यक्ष: च परोक्ष: च वर्तमान: च तत् भवेत् || ६२ ||

**अन्वय:** – "भो: अहम् एवं ब्रवीमि न वदामि च" इति यत् वच: तत् वर्तमान: प्रत्यक्ष: (वाचिकाभिनय: च भवेत् |) (अन्यत् वच:) परोक्ष: (वाचिकाभिनय:) च भवेत् |

**अर्थ** – "अहो, मी हे अशा प्रकारे बोलत आहे आणि मी हे बोलत नाही" हे असे बोलणे म्हणजे वर्तमानकाळी प्रत्यक्ष वाचिक अभिनय होय आणि याप्रमाणे जो नाही तो परोक्ष वाचिक अभिनय होय .
(याठिकाणी 'एष:' ऐवजी 'एवं' असा पाठ स्वीकारण्यात आलेला आहे . )

**अहं करोमि गच्छामि वदामि वचनं तव |**
**आत्मस्थो वर्तमानश्च प्रत्यक्षश्चैव स स्मृत: || ६३ ||**

**पदच्छेद:** – अहम् करोमि गच्छामि वदामि वचनम् तव |
आत्मस्थ: वर्तमान: च प्रत्यक्ष: च एव स: स्मृत: || ६३ ||

**अन्वय:** – अहम् करोमि गच्छामि तव वचनम् वदामि (इति यत् वच: तत्) वर्तमान: आत्मस्थ: (वाचिकाभिनय: भवेत् |) स एव प्रत्यक्ष: च स्मृत: |

**अर्थ** – "मी करतो, मी जातो, तुझं बोलणं सांगतो" वगैरे जे बोलणे तो म्हणजे वर्तमानकाळी आत्मस्थ वाचिक अभिनय होय आणि यालाच प्रत्यक्ष 'वाचिक अभिनय असेही म्हणतात .

**करिष्यामि गमिष्यामि वदिष्यामीति यद्वच: |**
**आत्मस्थश्च परोक्षश्च भविष्यत्काल एव च || ६४ ||**

**पदच्छेद:** – करिष्यामि गमिष्यामि वदिष्यामि इति यत् वच:|
आत्मस्थ: च परोक्ष: च भविष्यत्काल: एव च || ६४ ||

**अन्वय:** – करिष्यामि गमिष्यामि वदिष्यामि इति यत् वच: आत्मस्थ: च परोक्ष: च भविष्यत्काल: एव च (स्मृत:) |

**अर्थ** – "मी करीन, मी जाईन, मी सांगीन" असे बोलणे हे आत्मस्थ, परोक्ष वाचिक अभिनयाचे द्योतक असते जे भविष्यकाळी असते .

(व्याकरणदृष्ट्या जरी वरील वाक्य आत्मस्थ 'प्रत्यक्ष' वाचिक अभिनय दर्शवित असले तरी भरताच्या दृष्टीने तो आत्मस्थ, 'परोक्ष' वाचिक अभिनय असतो . कारण या परोक्ष होणाऱ्या घटना रंगमंचावर दाखवता येत नाहीत . )

**हता जिताश्च भग्नाश्च मया सर्वे द्विषद्गणा: |**
**आत्मस्थश्च परोक्षश्च वृत्तकालश्च स स्मृत: || ६५ ||**

**पदच्छेद:** – हता: जिता: च भग्ना: च मया सर्वे द्विषद्गणा: |
आत्मस्थ: च परोक्ष: च वृत्तकाल: च स: स्मृत: || ६५ ||

**अन्वय:** – मया सर्वे द्विषद्गणा: जिता: भग्ना: च हता: स: आत्मस्थ: वृत्तकाल: 'परोक्ष:' इति स्मृत:|

**अर्थ** – "मी माझ्या सर्व शत्रूंना जिंकले, भेदले आणि मारले" असे आत्मस्थ (भूतकालिक), वर्तमानकाळी बोलणे हे परोक्ष वाचिक अभिनयाचे द्योतक असते .

**त्वया हता जिताश्चेति यो वदेन्नाट्यकर्मणि |**
**परोक्षश्च परस्थश्च वृत्तकाल: तथा एव च || ६६ ||**

**पदच्छेद:** – त्वया हता: जिता: च इति य: वदेत् नाट्यकर्मणि |
परोक्ष: च परस्थ: च वृत्तकाल: तथा एव च || ६६ ||

**अन्वय:** – त्वया हता: जिता: च इति नाट्यकर्मणि य: वदेत् (स:) परोक्ष: च परस्थ: तथा एव च वृत्तकाल: च (स्मृत:)|

**अर्थ** – "तुम्ही मारले आणि जिंकले" असे नाट्यप्रयोगामध्ये जे बोलले जाते ते परस्थ (भूतकालिक), वर्तमानकाळी बोलणे हे परोक्ष वाचिक अभिनयाचे द्योतक असते .

**एष ब्रवीति कुरुते गच्छतीत्यादि यद्वच: |**
**परस्थो वर्तमानश्च प्रत्यक्षश्च भवेत्तथा || ६७ ||**

**पदच्छेद:** – एष: ब्रवीति कुरुते गच्छति इति आदि यत् वच: |
परस्थ: वर्तमान: च प्रत्यक्ष: च भवेत् तथा || ६७ ||

**अन्वय:** – एष: ब्रवीति कुरुते गच्छति इत्यादि यत् परस्थ: वर्तमान: वच: तत् प्रत्यक्ष: भवेत् |

**अर्थ** – हा सांगत आहे, हा करत आहे, हा जात आहे इत्यादी परस्थ, वर्तमानकाळी वाक्य हे प्रत्यक्ष वाचिक अभिनयाचे द्योतक असते .
(वरील श्लोकामध्ये 'ब्रवीमि' हा पाठ आढळतो परंतु व्याकरण आणि संकल्पनेच्या दृष्टीने 'ब्रवीति' हा पाठ ग्राह्य धरला आहे . )

**स गच्छति करोतीति वचनं यदुदाहृतम् |**
**परस्थं वर्तमानं च परोक्षं चैव तद्भवेत् || ६८ ||**

**पदच्छेद:** – स: गच्छति करोति इति वचनम् यत् उदाहृतम् |
परस्थम् वर्तमानम् च परोक्षम् च एव तत् भवेत् || ६८ ||

**अन्वय:** – स: गच्छति करोति इति यत् तत् परस्थम् वर्तमानम् वचनम् उदाहृतम् एव च परोक्षम् च भवेत् |

**अर्थ** – "तो जात आहे, करत आहे" असे परस्थ, वर्तमानकाळी वाक्य हे परोक्ष वाचिक अभिनयाचे द्योतक असते .

**करिष्यन्ति गमिष्यन्ति वदिष्यन्तीति यद्वच: |**
**परस्थमेष्यत्कालं च परोक्षं चैव तद् भवेत् || ६९ ||**

**पदच्छेद:** – करिष्यन्ति गमिष्यन्ति वदिष्यन्ति इति यत् वच: |
परस्थम् एष्यत्कालम् च परोक्षम् च एव तत् भवेत् || ६९ ||

**अन्वय : –** करिष्यन्ति गमिष्यन्ति वदिष्यन्ति इति यत् वच : तत् परस्थम् एष्यत्कालम् च परोक्षम् एव च भवेत् |

**अर्थ –** "करतील, जातील, सांगतील" असे परस्थ, भविष्यकाळी वाक्य हे 'परोक्ष' वाचिक अभिनयाचे द्योतक असते .

**हस्तमन्तरत: कृत्वा यद्वदेन्नाट्यकर्मणि |**
**आत्मस्थं हृदयस्थं च परोक्षं चैव तन्मतम् || ७० ||**

**पदच्छेद : –** हस्तम् अन्तरत : कृत्वा यत् वदेत् नाट्यकर्मणि |
आत्मस्थम् हृदयस्थम् च परोक्षम् च एव तत् मतम् || ७० ||

**अन्वय : –** नाट्यकर्मणि हस्तम् अन्तरत: कृत्वा यत् आत्मस्थम् हृदयस्थम् वदेत् तत् एव च परोक्षम् (इति) मतम् |

**अर्थ –** नाट्यप्रयोगामध्ये नट एक हात अंतर ठेवून जे काही बोलतो ते आत्मस्थ आणि हृदयस्थ बोलणे हे देखील 'परोक्ष' समजावे .

**परेषामात्मनश्चैव कालस्य च विशेषणात् |**
**सप्तप्रकारस्यास्यैव भेदा ज्ञेया अनेकधा || ७१ ||**

**पदच्छेद : –** परेषाम् आत्मन : च एव कालस्य च विशेषणात् |
सप्तप्रकारस्य अस्य एव भेदा : ज्ञेया : अनेकधा || ७१ ||

**अन्वय : –** परेषाम् एव च आत्मन : कालस्य च विशेषणात् अस्य सप्तप्रकारस्य एव अनेकधा भेदा : ज्ञेया : |

**अर्थ –** परस्थ, आत्मस्थ आणि तीन काळांच्या वैशिष्ट्यांनुसार या सात प्रकारांचे अनेक विभाग होऊ शकतात .

**एते प्रयोगा विज्ञेया मार्गाभिनययोजिता: |**
**एतेष्विह विनिष्पन्नो विविधोऽभिनयो भवेत् || ७२ ||**

**पदच्छेद : –** एते प्रयोगा : विज्ञेया : मार्गाभिनय-योजिता : |
एतेषु इह विनिष्पन्न : विविध : अभिनय : भवेत् || ७२ ||

**अन्वय: –** मार्गाभिनययोजिता: एते प्रयोगा: विज्ञेया: | एतेषु इह विविध: अभिनय: विनिष्पन्न: भवेत् |

**अर्थ –** मार्गानुसार (शास्त्रानुसार) सांगितलेले हे प्रयोग नीट समजून घ्यावेत . यांच्या आधाराने अनेकविध अभिनय निर्माण होऊ शकतात .

**❖ सामान्याभिनय ❖**

**शिरोहस्तकटीवक्षोजङ्घोरुकरणेषु तु |**
**सम: कर्मविभागो य: सामान्याभिनयस्तु स: || ७३ ||**

**पदच्छेद: –** शिरो-हस्त-कटी-वक्षो-जङ्घा-उरु-करणेषु तु |
सम: कर्मविभाग: य: सामान्याभिनय: तु स: || ७३ ||

**अन्वय: –** शिरोहस्तकटीवक्षोजङ्घोरुकरणेषु तु य: सम: कर्मविभाग: स: तु सामान्याभिनय: (स्मृत:) |

**अर्थ –** शिर, हस्त, कंबर, छाती, पोटऱ्या, मांड्या या इंद्रियाचा एकत्रितपणे अभिनय केला जात असेल तर त्याला 'सामान्य अभिनय' म्हणतात .

**ललितैर्हस्तसंचारैस्तथा मृद्वङ्गचेष्टितै: |**
**अभिनेयस्तु नाट्यज्ञै रसभावसमन्वितै: || ७४ ||**

**पदच्छेद: –** ललितै: हस्तसंचारै: तथा मृदु-अङ्ग-चेष्टितै: |
अभिनेय: तु नाट्यज्ञै: रस-भाव-समन्वितै: || ७४ ||

**अन्वय: –** नाट्यज्ञै: तु रसभावसमन्वितै: मृद्वङ्गचेष्टितै: तथा ललितै: हस्तसंचारै: अभिनेय: |

**अर्थ –** नाट्य जाणणाऱ्यांनी रस, भाव यांनी युक्त ललित हस्तसंचाराद्वारे आणि नाजूक आंगिक चेष्टांनी युक्त असा जो वर सांगितलेला अंगप्रत्यंगाचा संयुक्त अभिनय आहे त्यालाच 'सामान्य अभिनय' म्हणतात .

(इथे आंगिक अभिनयाचाच एक विभाग असलेला जो चेष्टाकृत अभिनय यासाठी समानार्थक म्हणून भरतमुनी सामान्य अभिनयाचा उल्लेख करतात, हे स्पष्ट होते . )

**❖ आभ्यंतर नाट्य ❖**

**अनुद्धतमसंभ्रान्तमनाविद्धाङ्गचेष्टितम् |**
**लयतालकलापातप्रमाणनियतात्मकम् || ७५ ||**
**सुविभक्तपदालापमनिष्ठुरमकाहलम् |**
**यदीदृशं भवेन्नाट्यं ज्ञेयमाभ्यन्तरं तु तत् || ७६ ||**

**पदच्छेद :–** अनुद्धतम् असंभ्रान्तम् अनाविद्ध-अङ्गचेष्टितम् |
लय-ताल-कलापात-प्रमाण-नियतात्मकम् || ७५ ||
सुविभक्त-पद-आलापम् अनिष्ठुरम् अकाहलम् |
यत् ईदृशम् भवेत् नाट्यम् ज्ञेयम् आभ्यन्तरम् तत् || ७६ ||

**अन्वय :–** अनुद्धतम् असंभ्रान्तम् अनाविद्धाङ्गचेष्टितम् लयतालकलापातप्रमाणनियतात्मकम् सुविभक्तपदालापम् अनिष्ठुरम् अकाहलम् यत् नाट्यम् ईदृशम् भवेत् तत् आभ्यन्तरम् (इति) ज्ञेयम् |

**अर्थ –** जो अभिनय अनुद्धत म्हणजे अभिमानरहित असतो अर्थात नम्र आणि विनयशील असतो, ज्यामध्ये व्याकुळता नाही, शरीराच्या हालचाली घाईघाईने केल्या जात नाहीत किंवा चुकीच्या केल्या जात नाहीत, लय ताल कला आणि पात तसेच संगीत सर्व प्रमाणबद्ध सुनिश्चित व नियमित असते, गाण्याची पदे आणि ध्रुवासहिताचा आलाप वेगळा असला तरी तो कर्कश किंवा वेसुर नसतो आणि तसेच जिथे गर्दीमुळे कोलाहल होत नाही अशा नाट्याला 'आभ्यंतर नाट्य' असे म्हणतात .

**❖ बाह्य नाट्य ❖**

**एतदेव विपर्यस्तं स्वच्छन्दगतिचेष्टितम् |**
**अनिबद्धगीतवाद्यं नाट्यं बाह्यमिति स्मृतम् || ७७ ||**

**पदच्छेद :–** एतत् एव विपर्यस्तम् स्वच्छन्द-गति-चेष्टितम् |
अनिबद्ध-गीत-वाद्यम् नाट्यम् बाह्यम् इति स्मृतम् || ७७ ||

**अन्वय:** – एतत् एव विपर्यस्तम् स्वच्छन्दगतिचेष्टितम् अनिबद्धगीतवाद्यम् नाट्यम् बाह्यम् इति स्मृतम्।

**अर्थ** – वर सांगितलेल्या अभिनयाच्या उलट म्हणजे एकदम विरोधी असलेले जिथे पात्रांची हालचाल स्वच्छंदी असेल, गीत-वाद्य-ताल-लय इत्यादी नियमांनुसार प्रमाणबद्ध नसतील तर त्यास 'बाह्य नाट्य' असे म्हणतात.

**लक्षणाभ्यन्तरत्वाद्धि तदाभ्यन्तरमिष्यते।**
**शास्त्रबाह्यं भवेद्यत्तु तद्बाह्यमिति भण्यते॥ ७८॥**

**पदच्छेद:** – लक्षणाभ्यन्तरत्वात् हि तदा आभ्यन्तरम् इष्यते।
शास्त्रबाह्यम् भवेत् यत् तु तत् बाह्यम् इति भण्यते॥ ७८॥

**अन्वय:** – लक्षणाभ्यन्तरत्वात् हि तदा आभ्यन्तरम् इष्यते। यत् तु शास्त्रबाह्यम् भवेत् तत् बाह्यम् इति भण्यते।

**अर्थ** – नाट्याचार्यांद्वारे दर्शविलेल्या लक्षणांनी युक्त अशा नाट्यास 'आभ्यंतर' म्हणून स्वीकारले जाते आणि आचार्यांद्वारे बहिष्कृत असा शास्त्रबाह्य प्रयोग केला जातो त्याला 'बाह्यनाट्य' असे म्हटले जाते.

**अनेन लक्ष्यते यस्मात् प्रयोग: कर्म चैव हि।**
**तस्माल्लक्षणमेतद्धि नाट्येऽस्मिन् संप्रयोजितम्॥ ७९॥**

**पदच्छेद:** – अनेन लक्ष्यते यस्मात् प्रयोग: कर्म च एव हि।
तस्मात् लक्षणम् एतत् हि नाट्ये अस्मिन् संप्रयोजितम्॥ ७९॥

**अन्वय:** – यस्मात् अनेन प्रयोग: कर्म च एव हि लक्ष्यते, तस्मात् एतत् लक्षणम् हि अस्मिन् नाट्ये संप्रयोजितम्।

**अर्थ** – या लक्षणांद्वारे प्रयोग आणि पात्रांचे कार्य सुनिश्चित केले जाते. म्हणूनच ही लक्षणे असणाऱ्या सामान्य अभिनयाचा नाट्यामध्ये सम्यक प्रयोग करावा.

**अनाचार्योषिता ये च ये च शास्त्रबहिष्कृता:।**
**बाह्यं प्रयुञ्जते ते तु अज्ञात्वाचार्यकीं क्रियाम्॥ ८०॥**

**पदच्छेद :–** अनाचार्य-उषिता : ये च ये च शास्त्र-बहिष्कृता : |
बाह्यम् प्रयुञ्जते ते तु अज्ञात्वा आचार्यकीम् क्रियाम् || ८० ||

**अन्वय : –** ये च अनाचार्योषिता : ये च शास्त्रबहिष्कृता : ते तु आचार्यकीम् क्रियाम् अज्ञात्वा बाह्यम् प्रयुञ्जते |

**अर्थ –** ज्यांनी आचार्यांच्या सहवासात राहून अध्ययन केलेले नाही आणि जे शास्त्राद्वारे बहिष्कृत केले गेले आहेत, त्यांना आचार्यांच्या अभिनयक्रिया माहित नसल्याने त्यांनी स्वप्रतिभेने केलेल्या प्रयोगालाही 'बाह्य प्रयोग' म्हणूनच ओळखले जाते.

(यावरून असे दिसून येते की, भरताच्या काळी नाट्यप्रयोगाच्या दोन परंपरा अस्तित्वात होत्या. एका परंपरेमध्ये शास्त्रानुसार सांगितलेल्या नाट्यनियमांचे पालन करून प्रयोग केला जात असे. दुसऱ्या परंपरेनुसार मात्र शास्त्राद्वारे बहिष्कृत परंतु सृजनात्मक असा नवीन प्रयोग केला जात असे.)

**❖ पंचेंद्रियांचा अभिनय ❖**

**शब्दं स्पर्शं च रूपं च रसं गन्धं तथैव च |**
**इन्द्रियाणीन्द्रियार्थांश्च भावैरभिनयेद्बुध : || ८१ ||**

**पदच्छेद :–** शब्दम् स्पर्शम् च रूपम् च रसम् गन्धम् तथा एव च |
इन्द्रियाणि इन्द्रियार्थान् च भावै : अभिनयेत् बुध : || ८१ ||

**अन्वय : –** शब्दम् स्पर्शम् रूपम् रसम् गन्धम् च (इति) इन्द्रियार्थान् तथा च इन्द्रियाणि बुध : भावै : अभिनयेत् |

**अर्थ –** इंद्रिय आणि इंद्रियांचा विषय जसे - कानांचा विषय शब्द, त्वचेचा विषय स्पर्श, डोळ्यांचा विषय रूप, जिभेचा विषय रस आणि नाकाचा विषय गंध या सर्वांचा बुद्धिमान नटांनी भावांसहित अभिनय करावा.

**❖ शब्द ❖**

**कृत्वा साचीकृतां दृष्टिं शिर : पार्श्वनतं तथा |**
**तर्जनी कर्णदेशे च बुध : शब्दं विनिर्दिशेत् || ८२ ||**

**पदच्छेद :–** कृत्वा साचीकृताम् दृष्टिम् शिर : पार्श्वनतम् तथा |
तर्जनी कर्णदेशे च बुध : शब्दम् विनिर्दिशेत् || ८२ ||

**अन्वय : –** साचीकृताम् दृष्टिम् तथा पार्श्वनतम् शिर: तर्जनी च कर्णदेशे कृत्वा बुध: शब्दम् विनिर्दिशेत् |

**अर्थ –** साची दृष्टी करून मस्तकाला (मानेला) एका बाजूला (खांद्यावर) झुकवून आणि तर्जनी कानाजवळ आणून नटांनी 'शब्दाचा' अभिनय करावा .

❖ **स्पर्श** ❖

**किञ्चिदाकुञ्चिते नेत्रे कृत्वा भ्रूक्षेपमेव च |**
**तथाऽसगण्डयो: स्पर्शात् स्पर्शमेवं विनिर्दिशेत् || ८३ ||**

**पदच्छेद :–** किञ्चित् आकुञ्चिते नेत्रे कृत्वा भ्रूक्षेपम् एव च |
तथा आसगण्डयो : स्पर्शात् स्पर्शम् एवम् विनिर्दिशेत् || ८३ ||

**अन्वय : –** किञ्चित् आकुञ्चिते नेत्रे भ्रूक्षेपम् कृत्वा तथा आसगण्डयो: स्पर्शात् एवम् स्पर्शम् विनिर्दिशेत् |

**अर्थ –** डोळे किंचित आकुंचित करून भ्रूक्षेप म्हणजे भुवया वर उडवून आणि तसेच दोन्ही खांद्यांद्वारे गालांना स्पर्श करून नटांनी 'स्पर्शाचा' अभिनय करावा .

❖ **रूप** ❖

**कृत्वा पताकौ मूर्धस्थौ किञ्चित्प्रचलिताननः |**
**निर्वर्णयन्त्या दृष्ट्या च रूपं त्वभिनयेद् बुधः || ८४ ||**

**पदच्छेद :–** कृत्वा पताकौ मूर्धस्थौ किञ्चित् प्रचलित-आनन : |
निर्वर्णयन्त्या दृष्ट्या च रूपम् तु अभिनयेत् बुध : || ८४ ||

**अन्वय : –** पताकौ मूर्धस्थौ किञ्चित् प्रचलिताननः कृत्वा निर्वर्णयन्त्या तु दृष्ट्या च बुध: रूपम् अभिनयेत् |

**अर्थ –** दोन्ही पताक हस्त डोक्याजवळ आणून, चेहरा किंचित हलवित डोळ्यांनी मुग्ध भावाने पाहत विद्वानांनी 'रूपाचा' अभिनय करावा .

**❖ रस आणि गंध ❖**

**किञ्चिदाकुञ्चिते नेत्रेकृत्वोत्फुल्लां च नासिकाम् |**
**एकोच्छ्वासेन चेष्टौ तु रसगन्धौ विनिर्दिशेत् || ८५ ||**

**पदच्छेद :–** किञ्चित् आकुञ्चिते नेत्रे कृत्वा उत्फुल्लाम् च नासिकाम् |
एकोच्छ्वासेन चेष्टौ तु रसगन्धौ विनिर्दिशेत् || ८५ ||

**अन्वय : –** किञ्चित् आकुञ्चिते नेत्रे उत्फुल्लाम् च नासिकाम् कृत्वा एकोच्छ्वासेन तु चेष्टौ रसगन्धौ विनिर्दिशेत् |

**अर्थ –** डोळे किंचित आकुंचित करून आणि नाकपुड्या फुगवून एका श्वासाद्वारे केल्या गेलेल्या क्रियेने रस आणि गंधाचा अभिनय करावा .

**पञ्चानामिन्द्रियार्थानां भावा ह्येतेऽनुभाविन: |**
**श्रोत्रत्वङ्नेत्रजिह्वानां घ्राणस्य च तथैव हि || ८६ ||**

**पदच्छेद :–** पञ्चानाम् इन्द्रियार्थानाम् भावा : हि एते अनुभाविन : |
श्रोत्र-त्वङ्-नेत्र-जिह्वानाम् घ्राणस्य च तथा एव हि || ८६ ||

**अन्वय : –** एते हि पञ्चानाम् इन्द्रियार्थानाम् श्रोत्रत्वङ्नेत्रजिह्वानाम् घ्राणस्य च अनुभाविन: भावा : (सन्ति) |

**अर्थ –** पंचेंद्रियांचे म्हणजे कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक यांच्या अनुभूतीचे हे प्रतिभाव सांगितले .

**इन्द्रियार्था: समनसो भवन्ति ह्यनुभाविन: |**
**न वेत्ति ह्यमना: किञ्चिद्विषयं पञ्चधागतम् || ८७ ||**

**पदच्छेद :–** इन्द्रियार्था : समनस : भवन्ति हि अनुभाविन : |
न वेत्ति हि अमना : किञ्चित् विषयम् पञ्चधागतम् || ८७ ||

**अन्वय : –** समनस : हि इन्द्रियार्था : अनुभाविन : भवन्ति | अमना : पञ्चधागतम् विषयम् किञ्चित् हि न वेत्ति |

**अर्थ** – इंद्रियांच्या या पाच विषयांमध्ये जर मन गुंतलेले असेल तरच त्यांची अनुभूती शक्य होईल. मन गुंतलेले नसेल तर अशा अमनस्क पुरुषाला पाच प्रकारच्या या विषयांचा अनुभव होऊ शकत नाही.
(अशा रीतीने पाच इंद्रिये आणि मन हे सामान्य अभिनयाचे मूळ आहे.)

**❖ मनाचे तीन प्रकार ❖**

**मनसस्त्रिविधो भावो विज्ञेयोऽभिनये बुधैः |**
**इष्टस्तथा ह्यनिष्टश्च मध्यस्थश्च तथैव हि || ८८ ||**

**पदच्छेदः**– मनस: त्रिविध: भाव: विज्ञेय: अभिनये बुधै: |
इष्ट: तथा हि अनिष्ट: च मध्यस्थ: च तथा एव हि || ८८ ||

**अन्वयः** – अभिनये बुधै: मनस: भाव: इष्ट: तथा हि अनिष्ट: तथा एव च मध्यस्थ: च (इति) त्रिविध: हि विज्ञेय: |

**अर्थ** – नाट्याभिनयामध्ये तज्ज्ञांनी इष्ट, अनिष्ट आणि मध्यस्थ असे मनाचे तीन प्रकारचे भाव सांगितले आहेत, ते जाणून घ्यावेत.

**❖ इष्ट भाव ❖**

**प्रह्लादनेन गात्रस्य तथा पुलकितेन च |**
**वदनस्य विकासेन कुर्यादिष्टनिदर्शनम् || ८९ ||**
**इष्टे शब्दे तथा रूपे स्पर्शे गन्धे तथा रसे |**
**इन्द्रियैर्मनसा प्राप्तैः सौमुख्यं संप्रदर्शयेत् || ९० ||**

**पदच्छेदः**– प्रह्लादनेन गात्रस्य तथा पुलकितेन च |
वदनस्य विकासेन कुर्यात् इष्टनिदर्शनम् || ८९ ||
इष्टे शब्दे तथा रूपे स्पर्शे गन्धे तथा रसे |
इन्द्रियै: मनसा प्राप्तै: सौमुख्यम् संप्रदर्शयेत् || ९० ||

**अन्वय:** – मनसा इन्द्रियै: प्राप्तै: इष्टे शब्दे रूपे स्पर्शे गन्धे तथा रसे सति गात्रस्य प्रह्लादनेन पुलकितेन तथा च वदनस्य विकासेन इष्टनिदर्शनम् कुर्यात् | तत्कृते सौमुख्यम् संप्रदर्शयेत् | (सुमुखत्वं प्रसादादियुक्तं वदनम् इत्यर्थ: | - अ . भा . )

**अर्थ** – मनाद्वारे आणि इंद्रियांद्वारे प्राप्त झालेल्या इष्ट अशा शब्द, रूप, स्पर्श, गंध आणि रस यांचा अभिनय करतेवेळी शरीर आनंदित करून, रोमांचित करून आणि तसेच प्रफुल्लित चेहरा करून त्या इष्ट भावाचा अभिनय करावा .

**❖ अनिष्ट भाव ❖**

**परावृत्तेन शिरसा नेत्रनासाविकर्षणै: |**
**चक्षुषश्चाप्रदानेन ह्यनिष्टमभिनिर्दिशेत् || ९१ ||**

**पदच्छेद:** – परावृत्तेन शिरसा नेत्र-नासा-विकर्षणै: |
चक्षुष: च अप्रदानेन हि अनिष्टम् अभिनिर्दिशेत् || ९१ ||

**अन्वय:** – शिरसा परावृत्तेन, नेत्रनासाविकर्षणै:, चक्षुष: च अप्रदानेन हि अनिष्टम् अभिनिर्दिशेत् | (विकर्षणानि सङ्कोचनानि च | - अ . भा . )

**अर्थ** – मान वळवून, डोळे आणि नाक संकुचित करून आणि डोळ्यांची उघड-झाप न करता अनिष्ट भावाचा अभिनय करावा .

**❖ मध्यस्थ भाव ❖**

**नातिहृष्टेन मनसा न चात्यर्थजुगुप्सया |**
**मध्यस्थेनैव भावेन मध्यस्थमभिनिर्दिशेत् || ९२ ||**

**पदच्छेद:** – न अतिहृष्टेन मनसा न च अत्यर्थ-जुगुप्सया |
मध्यस्थेन एव भावेन मध्यस्थम् अभिनिर्दिशेत् || ९२ ||

**अन्वय:** – न अतिहृष्टेन मनसा न च अत्यर्थजुगुप्सया मध्यस्थेन एव भावेन मध्यस्थम् अभिनिर्दिशेत् |

**अर्थ** – खूप आनंदाने नाही तसेच खूप तिरस्कृत भावानेदेखील नाही तर मध्यस्थ भावाने 'मध्यस्थ अभिनय' करावा .

**तेनेदं तस्य वापीदं स एवं प्रकरोति वा |**
**परोक्षाभिनयो यस्तु मध्यस्थ इति स स्मृत: || ९३ ||**

**पदच्छेद:–** तेन इदम् तस्य वा अपि इदम् स: एवम् प्रकरोति वा |
परोक्षाभिनय: य: तु मध्यस्थ: इति स: स्मृत: || ९३ ||

**अन्वय: –** तेन इदम्, तस्य वा अपि इदम्, स: एवम् वा प्रकरोति (इति) य: परोक्षाभिनय: स: तु मध्यस्थ: इति स्मृत: |

**अर्थ –** ज्यामध्ये अर्थ अभिनेयानुसार असतो तो मध्यस्थ अभिनय होय. जसे - "त्याने असं केलं, ही वस्तु त्याची आहे. तो असं करत आहे" अशी परोक्ष स्थिती असते त्या स्थितीमध्ये मध्यस्थ अभिनय केला जातो.

**❖ आत्मस्थ आणि परस्थ अर्थ ❖**

**आत्मानुभावी योऽर्थ: स्यादात्मस्थ इति स स्मृत: |**
**परार्थवर्णना यत्र परस्थ: स तु संज्ञित: || ९४ ||**

**पदच्छेद:–** आत्मानुभावी य: अर्थ: स्यात् आत्मस्थ: इति स: स्मृत: |
परार्थ-वर्णना यत्र परस्थ: स: तु संज्ञित: || ९४ ||

**अन्वय: –** य: आत्मानुभावी अर्थ: स्यात् स: आत्मस्थ: इति स्मृत: | यत्र परार्थवर्णना स: तु परस्थ: संज्ञित: |

**अर्थ –** जो अर्थ स्वत: अनुभवलेला असतो त्याला 'आत्मस्थ अर्थ' असे म्हणतात आणि ज्याची अनुभूती दुसऱ्या कोणाकडून होत असते तर त्याला 'परस्थ अर्थ' असे म्हणतात.

**प्रायेण सर्वभावानां कामान्निष्पत्तिरिष्यते |**
**स चेच्छागुणसम्पन्नो बहुधा परिकल्पित: || ९५ ||**

**पदच्छेद:–** प्रायेण सर्वभावानाम् कामात् निष्पत्ति: इष्यते |
स: च इच्छा-गुण-सम्पन्न: बहुधा परिकल्पित: || ९५ ||

**अन्वय: –** प्रायेण सर्वभावानाम् निष्पत्ति: कामात् इष्यते | इच्छागुणसम्पन्न: स: च बहुधा परिकल्पित:| (कामादिति इच्छात:|- अ.भा.)

**अर्थ –** सामान्यत: सर्व भावांची निष्पत्ती कामाद्वारे म्हणजे इच्छेद्वारे होत असते. 'इच्छा' या गुणाने संपन्न असलेल्या व्यक्ती विविध कार्य करण्यासाठी नियुक्त केला जातो.

**❖ काम शब्दाची व्याख्या ❖**

**धर्मकामोऽर्थकामश्च मोक्षकामस्तथैव च |**
**स्त्रीपुंसयोस्तु योगो य: स तु काम इति स्मृत: || ९६ ||**

**पदच्छेद: –** धर्मकाम: अर्थकाम: च मोक्षकाम: तथा एव च |
स्त्रीपुंसयो: तु योग: य: स: तु काम: इति स्मृत: || ९६ ||

**अन्वय: –** धर्मकाम: अर्थकाम: तथा एव च मोक्षकाम: भवति | य: स्त्रीपुंसयो: तु योग: स: तु 'काम:' इति स्मृत:|

**अर्थ –** धर्मकाम, अर्थकाम आणि मोक्षाच्या इच्छेतून स्त्रीपुरुषांचा जो संयोग घडून येतो त्यास 'काम' असे म्हटले गेले आहे.

**सर्वस्यैव हि लोकस्य सुखदु:खनिबर्हण: |**
**भूयिष्ठं दृश्यते काम: स सुखं व्यसनेष्वपि || ९७ ||**

**पदच्छेद: –** सर्वस्य एव हि लोकस्य सुख-दु:ख-निवर्हण:|
भूयिष्ठम् दृश्यते काम: स: सुखम् व्यसनेषु अपि || ९७ ||

**अन्वय: –** सर्वस्य एव हि लोकस्य सुखदु:खनिवर्हण: काम:| स: व्यसनेषु अपि भूयिष्ठम् सुखम् इति दृश्यते| (भूयिष्ठमिति प्राप्तादधिकमिति यावत्| - अ.भा.)

**अर्थ –** काम हा सर्व लोकांचे सुख-दु:ख दूर करतो. तो संकटातही अपेक्षेपेक्षा अधिक सुख देतो असे दिसते.

**स: स्त्रीपुरुषसंयोगो रतिसंभोगकारक: |**
**स शृङ्गार इति ज्ञेय उपचारकृत: शुभ: || ९८ ||**

**पदच्छेद :-** स : स्त्री-पुरुष-संयोग : रति-संभोग-कारक : |
स : शृङ्गार : इति ज्ञेय : उपचारकृत : शुभ : || ९८ ||

**अन्वय : -** रतिसंभोगकारक : स्त्रीपुरुषसंयोग : स : शृङ्गार : | उपचारकृत : चेत् स : शुभ : इति ज्ञेय : | (उपचार : अन्योन्यहृदयग्रहण-उचितव्यापारै : परिपूर्ण : | - अ . भा . )

**अर्थ -** स्त्रीपुरुषांचे परस्पर मिलन जे रती आणि संभोगास कारणीभूत ठरते, त्याला शृंगार असे म्हणतात . एकमेकांचे हृदय आकर्षित करणे, योग्य आचरण करणे या उपचारांनी युक्त असा शृंगार असेल तर त्यास 'शुभ शृंगार' असे म्हणतात .

**भूयिष्ठमेव लोकोऽयं सुखमिच्छति सर्वदा |**
**सुखस्य हि स्त्रियो मूलं नानाशीलाश्च ता : पुन : || ९९ ||**

**पदच्छेद :-** भूयिष्टम् एव लोक : अयम् सुखम् इच्छति सर्वदा |
सुखस्य हि स्त्रिय : मूलम् नानाशीला : च ता : पुन : || ९९ ||

**अन्वय : -** अयम् लोक : सर्वदा भूयिष्ठम् एव सुखम् इच्छति | स्त्रिय : हि सुखस्य मूलम् | ता : च पुन : नानाशीला : (सन्ति) |

**अर्थ -** या जगातील सर्व लोकांना अधिकाधिक सुखाची अपेक्षा असते आणि स्त्रिया हे सुखाचे मूळ आहे . अशा या स्त्रिया विविध स्वभावाच्या असतात .

**❖ स्त्री स्वभाव ❖**

**देवदानवगन्धर्वरक्षोनागपतत्रिणाम् |**
**पिशाचयक्षव्यालानां नरवानरहस्तिनाम् || १०० ||**
**मृगमीनोष्ट्रमकरखरसूकरवाजिनाम् |**
**महिषाजगवादीनां तुल्यशीला : स्त्रिय : स्मृता : || १०१ ||**

**पदच्छेद :-** देव-दानव-गन्धर्व-रक्षो-नाग-पतत्रिणाम् |
पिशाच-यक्ष-व्यालानाम् नर-वानर-हस्तिनाम् || १०० ||
मृग-मीन-उष्ट्र-मकर-खर-सूकर-वाजिनाम् |
महिषा-अज-गो-आदीनाम् तुल्यशीला : स्त्रिय : स्मृता : || १०१ ||

**अन्वय:** – देवदानवगन्धर्वरक्षोनागपतत्रिणाम् पिशाचयक्षव्यालानाम् नरवानरहस्तिनाम् मृगमीनोष्ट्र मकरखरसूकरवाजिनाम् महिषाजगवादीनाम् तुल्यशीला: स्त्रिय: स्मृता:। (आदिग्रहणेन अन्यदपि शीलमस्तीत्याह। - अ.भा.)

**अर्थ** – देव, दानव, गंधर्व, राक्षस, नाग, पक्षी, पिशाच्च, यक्ष, चित्ता, नर, वानर, हत्ती, हरिण, मासा, ऊंट, मगर, गाढव, वराह, घोडा, म्हैस, बकरी, गाय वगैरे यांच्या स्वभावानुसार स्त्रिया असतात. (येथे आदी शब्दामुळे वर दिलेल्यापेक्षाही अधिक स्त्रीस्वभावाचे प्रकार असू शकतात.- अ.भा.)

**❖ देवशीला ❖**

**स्निग्धैरङ्गैरुपाङ्गैश्च स्थिरा मन्दनिमेषिणी।**
**अरोगा दीप्त्युपेता च दानसत्त्वार्जवान्विता ॥ १०२ ॥**
**अल्पस्वेदा समरता स्वल्पभुक् सुरतप्रिया।**
**गन्धपुष्परता हृद्या देवशीलाङ्गना स्मृता ॥१०३॥**

**पदच्छेद:** – स्निग्धै: अङ्गै: उपाङ्गै: च स्थिरा मन्द-निमेषिणी।
अरोगा दीप्ति-उपेता च दानसत्त्व-आर्जव-अन्विता ॥ १०२ ॥
अल्प-स्वेदा सम-रता स्वल्पभुक् सुरत-प्रिया।
गन्ध-पुष्प-रता हृद्या देवशीला-अङ्गना स्मृता ॥ १०३ ॥

**अन्वय:** – स्निग्धै: अङ्गै: उपाङ्गै: स्थिरा, मन्दनिमेषिणी, अरोगा, दीप्त्युपेता, दानसत्त्वार्ज वान्विता, अल्पस्वेदा, समरता, स्वल्पभुक्, सुरतप्रिया, गन्धपुष्परता, हृद्या देवशीलाङ्गना स्मृता। (समरतेति नातिमृद्वी नातिखरेत्यर्थ:। - अ.भा.)

**अर्थ** – जिचे अंग प्रत्यंग स्निग्ध असल्याने स्थिर असतात, जी मंदगतीने डोळ्यांची उघडझाप करते, जी निरोगी, तेजस्वी कांती असणारी, दान, सत्त्व आणि आर्जव या गुणांनी युक्त असते, जिला खूप कमी घाम येतो, जी रतिक्रीडेत समान असते म्हणजे अधिक कोमलही नसते आणि अधिक कठोरही नसते, जी कमी खाते, सुरतक्रीडा जिला प्रिय आहे, गंध आणि सुगंधी फुले यांमध्ये रमते अशी जी स्त्री, तिला 'देवशीला स्त्री' समजावे. (तिचा स्वभाव देवांसारखा असतो.)

**अधर्मशाठ्याभिरता स्थिरक्रोधातिनिष्ठुरा |**
**मद्यमांसप्रिया नित्यं कोपना चातिमानिनी || १०४ ||**
**चपला चातिलुब्धा च परुषा कलहप्रिया |**
**ईर्ष्याशीला चलस्नेहा चासुरं शीलमाश्रिता || १०५ ||**

**पदच्छेद :** – अधर्म-शाठ्य-अभिरता स्थिरक्रोधा अतिनिष्ठुरा |
मद्यमांस-प्रिया नित्यम् कोपना च अतिमानिनी || १०४ ||
चपला च अतिलुब्धा च परुषा कलहप्रिया |
ईर्ष्या-शीला चलस्नेहा च आसुरम् शीलम् आश्रिता || १०५ ||

**अन्वय :** – अधर्मशाठ्याभिरता स्थिरक्रोधा अतिनिष्ठुरा मद्यमांसप्रिया नित्यम् कोपना च अतिमानिनीचपला च अतिलुब्धा च परुषा कलहप्रिया ईर्ष्याशीला चलस्नेहा आसुरम् शीलम् च आश्रिता |

**अर्थ** – जी अधर्म आणि लबाडी यामध्ये सतत गुंग असते, जिचा क्रोध निरंतर असतो, जी अत्यंत कठोर असते, जिला दारू व मांस प्रिय आहे, नेहमी रागावते, अत्यंत मानिनी आणि चंचल आहे, अतिशय लोभी, कठोर बोलणारी, कलहप्रिय आहे, ईर्ष्या करणे हा जिचा स्वभावच आहे, जिचे प्रेम क्षणिक असते, अशी स्त्री दानवी स्वभावाचा आश्रय घेते म्हणून तिला 'असुरशीला' म्हणावे .

### ❖ गंधर्वशीला ❖

**क्रीडापरा चारुनेत्रा नखदन्तैः सुपुष्पितैः |**
**स्वङ्गी च स्मितभाषा च मन्दा गत्या रतिप्रिया || १०६ ||**
**गीते वाद्ये च नृत्ते च रता हृष्टा मृजावती |**
**गन्धर्वसत्त्वा विज्ञेया स्निग्धत्वक्केशलोचना || १०७ ||**

**पदच्छेद :** – क्रीडापरा चारुनेत्रा नखदन्तैः सुपुष्पितैः |
स्वङ्गी च स्मितभाषा च मन्दा गत्या रतिप्रिया || १०६ ||
गीते वाद्ये च नृत्ते च रता हृष्टा मृजावती |
गन्धर्वसत्त्वा विज्ञेया स्निग्ध-त्वक्-केश-लोचना || १०७ ||

**अन्वय:** – क्रीडापरा, चारुनेत्रा, सुपुष्पितै: नखदन्तै:, स्वङ्गी, स्मितभाषा, मन्दा गत्या, रतिप्रिया, गीते वाद्ये नृत्ते च रता, हृष्टा, मृजावती, स्निग्धत्वक्केशलोचना गन्धर्वसत्त्वा विज्ञेया |
(स्वङ्गीति सुखसन्निवेशान्यङ्गानि यस्या: इत्यर्थ: | - अ . भा . )

**अर्थ** – क्रीडेमध्ये सक्रिय असलेली, सुंदर नेत्र असलेली, जिची नखे आणि दात फुलांप्रमाणे सुंदर आहेत, सुख प्रदान करणारे अतिशय कोमल असे जिचे शरीर आहे, स्मित हास्य करीत बोलणारी, मंद चाल असणारी, रतिमध्ये आवड असणारी, नृत्य गीत आणि वाद्यामध्ये मग्न असणारी, आनंदित असणारी, पवित्र , केस त्वचा आणि डोळे कोमल असणारी जी नायिका तिला 'गंधर्वशीला' समजावे .
(स्वङ्गी च स्थिरभाषी च 'मन्दापत्या' रतिप्रिया || १०६ || ऐवजी वरील पाठ अर्थाच्या दृष्टीने ग्राह्य धरला आहे . )

❖ राक्षसशीला ❖

**बृहद्व्यायतसर्वाङ्गी रक्तविस्तीर्णलोचना |**
**खररोमा दिवास्वप्ननिरतात्युच्चभाषिणी ||१०८||**
**नखदन्तक्षतकरी क्रोधेर्ष्या कलहप्रिया |**
**निशाविहारशीला च राक्षसं शीलमाश्रिता || १०९ ||**

**पदच्छेद:** – बृहद्-व्यायत-सर्वाङ्गी रक्त-विस्तीर्ण-लोचना |
खररोमा दिवास्वप्न-निरता अत्युच्च-भाषिणी || १०८ ||
नख-दन्त-क्षत-करी क्रोध-ईर्ष्या कलहप्रिया |
निशा-विहार-शीला च राक्षसम् शीलम् आश्रिता || १०९ ||

**अन्वय:** – बृहद्व्यायतसर्वाङ्गी रक्तविस्तीर्णलोचना खररोमा दिवास्वप्ननिरता अत्युच्चभाषिणी नखदन्तक्षतकरी क्रोधेर्ष्या कलहप्रियानिशाविहारशीला राक्षसम् शीलम् च आश्रिता |

**अर्थ** – मोठे आणि पसरलेले सर्वांग असलेली, लाल आणि विस्तृत डोळे असलेली, शरीरावर गाढवासारखे खूप लव असलेली (केसाळ), दिवास्वप्न बघण्यात मग्न असलेली, मोठमोठ्याने बोलणारी, नखांनी व दातांनी जखम करणारी, क्रोध-ईर्ष्या असणारी आणि अत्यंत भांडखोर, रात्रीच्या वेळी फिरणे जिचा स्वभावच आहे अशी राक्षसांच्या स्वभावाला अनुसरणारी ती स्त्री 'राक्षसशीला' म्हणून ओळखली जाते .

❖ नागशीला ❖

**तीक्ष्णनासाग्रदशना सुतनुस्ताम्रलोचना |**
**नीलोत्पलसवर्णा च स्वप्नशीलाऽतिकोपना || ११० ||**
**तिर्यग्गतिश्चलारम्भा बहुश्वासातिमानिनी |**
**गन्धमाल्यासवरता नागसत्त्वाऽङ्गना स्मृता || १११ ||**

**पदच्छेद :** – तीक्ष्ण-नासाग्र-दशना सुतनु : ताम्र-लोचना |
नीलोत्पल-सवर्णा च स्वप्नशीला अतिकोपना || ११० ||
तिर्यग्गति : चलारम्भा बहुश्वासा अतिमानिनी |
गन्ध-माल्य-आसव-रता नागसत्त्वा अङ्गना स्मृता || १११ ||

**अन्वय :** – तीक्ष्णनासाग्रदशना सुतनु: ताम्रलोचना नीलोत्पलसवर्णा स्वप्नशीला अतिकोपना तिर्यग्गति: चलारम्भा बहुश्वासा अतिमानिनी गन्धमाल्यासवरता नागसत्त्वा अङ्गना स्मृता |

**अर्थ** – जिच्या नाकाचा अग्रभाग टोकदार आहे आणि दात तीक्ष्ण आहेत, जी सुदृढ बांधा असलेली, लाल डोळे असणारी आहे, जिचा रंग नीलकमळाप्रमाणे आहे, स्वप्न पाहणारी, अत्यंत रागावणारी, वक्र गती असलेली, अतिशय चंचल, वेगाने श्वासोच्छ्वास करणारी, अत्यंत मानिनी, सुगंधी माळ धारण करणारी आणि दारूचे अधिक सेवन करणारी जी सर्पजातीचे गुण असलेली स्त्री ती 'नागशीला' असते .

❖ पक्षिशीला ❖

**अत्यन्तव्यावृतास्या च तीक्ष्णशीला सरित्प्रिया |**
**सुरासवक्षीररता बह्वपत्या फलप्रिया || ११२ ||**
**नित्यं श्वसनशीला च तथोद्यानवनप्रिया |**
**चपला बहुवाक्छीघ्रा शाकुनं सत्त्वमाश्रिता || ११३ ||**

**पदच्छेद :** – अत्यन्त-व्यावृत-आस्या च तीक्ष्णशीला सरित्प्रिया |
सुरा-आसव-क्षीर-रता बहु-अपत्या फलप्रिया || ११२ ||

नित्यम् श्वसनशीला च तथा उद्यान-वन-प्रिया |
चपला बहुवाक् शीघ्रा शाकुनम् सत्त्वम् आश्रिता || ११३ ||

**अन्वय:** – अत्यन्तव्यावृतास्या तीक्ष्णशीला सरित्प्रिया सुरासवक्षीररता बह्वापत्या फलप्रिया नित्यम् श्वसनशीला उद्यानवनप्रिया चपला बहुवाक् शीघ्रा शाकुनम् सत्त्वम् आश्रिता |

**अर्थ** – कायम तोंड उघडे ठेवणारी, उत्साही स्वभाव असलेली, नदीमध्ये विहार करण्याची आवड असलेली, दारू, फळांचा रस आणि दूध पिण्यात आनंद मानणारी, खूप अपत्ये असलेली, फळे प्रिय असणारी, सतत दीर्घ श्वास असणारी, उद्यान वन यांची आवड असलेली, चंचल आणि खूप बडबड करणारी, चटकन जाणारी अशी पक्ष्यांच्या स्वभावाला अनुसरणारी जी स्त्री ती 'पक्षिशीला' म्हणून ओळखली जाते .

**❖ पिशाचशीला ❖**

**ऊनाधिकाङ्गुलिकरा रात्रौ निष्कुटचारिणी |**
**बालोद्वेजनशीला च पिशुना क्लिष्टभाषिणी || ११४ ||**
**सुरते कुत्सिताचारा रोमशाङ्गी महास्वना |**
**पिशाचसत्त्वा विज्ञेया मद्यमांसबलप्रिया || ११५ ||**

**पदच्छेद:** – ऊन-अधिक-अङ्गुलि-करा रात्रौ निष्कुट-चारिणी |
बाल-उद्वेजन-शीला च पिशुना क्लिष्ट-भाषिणी || ११४ ||
सुरते कुत्सित-आचारा रोमश-अङ्गी महास्वना |
पिशाच-सत्त्वा विज्ञेया मद्य-मांस-बल-प्रिया || ११५ ||

**अन्वय:** – ऊनाधिकाङ्गुलिकरा रात्रौ निष्कुटचारिणी बालोद्वेजनशीला पिशुना क्लिष्टभाषिणी सुरते कुत्सिताचारा रोमशाङ्गी महास्वना मद्यमांसबलप्रिया पिशाचसत्त्वा विज्ञेया |

**अर्थ** – जिच्या हातांची बोटे कमी किंवा जास्त असतात, जी रात्रीच्या वेळी घरातील बागेत निर्भयतेने फिरते, बाळांना भयानक कृत्य करून घाबरवते, चुगली करणारी, कडू बोलणारी, सुरतक्रीडेमध्ये कुत्सित आचरण करणारी, शरीरावर खूप लव असलेली (केसाळ) आणि मोठमोठ्याने बोलणारी, दारू, मांस आणि बळ जिला अत्यंत प्रिय आहेत अशी स्त्री 'पिशाच्चशीला' म्हणून ओळखली जाते .

❖ यक्षशीला ❖

**स्वप्नप्रस्वेदनाङ्गी च स्थिरशय्यासनप्रिया |**
**मेधाविनी बुद्धिमती मद्यगन्धामिषप्रिया || ११६ ||**
**चिरदृष्टेषु हर्षं च कृतज्ञत्वादुपैति सा |**
**अदीर्घशायिनी चैव यक्षशीलाऽङ्गना स्मृता || ११७ ||**

**पदच्छेद :** – स्वप्न-प्रस्वेदन-अङ्गी च स्थिर-शय्या-आसन-प्रिया |
मेधाविनी बुद्धिमती मद्य-गन्ध-आमिषप्रिया || ११६ ||
चिरदृष्टेषु हर्षम् च कृतज्ञत्वात् उपैति सा |
अदीर्घशायिनी च एव यक्षशीला अङ्गना स्मृता || ११७ ||

**अन्वय :** – स्वप्नप्रस्वेदनाङ्गी, स्थिरशय्यासनप्रिया, मेधाविनी, बुद्धिमती, मद्यगन्धामिषप्रिया, चिरदृष्टेषु कृतज्ञत्वात् च सा हर्षम् उपैति, अदीर्घशायिनी एव च यक्षशीला अङ्गना स्मृता | (बुद्धिमतीति अशेषाविस्मरणं बुद्धि: प्रतिभा | - अ . भा . )

**अर्थ** – स्वप्नात घामाघूम होणारी, स्थिर शय्या आणि आसन प्रिय असलेली, कधीच विस्मरण होणार नाही अशी बुद्धी आणि प्रतिभा असलेली, मद्य, गंध आणि मांसाहाराची आवड असलेली, खूप वेळ पाहिल्यानंतर कृतज्ञतेची जाण ठेवून आनंदी होणारी, खूप वेळ न झोपणारी अशी जी स्त्री तिला 'यक्षशीला' म्हणून ओळखले जाते .

❖ व्यालशीला ❖

**तुल्यमानावमाना या परुषत्वक् खरस्वरा |**
**शठानृतोद्धतकथा व्यालसत्त्वा च पिङ्गदृक् || ११८ ||**

**पदच्छेद :** – तुल्यमाना-अवमाना या परुषत्वक् खरस्वरा |
शठ-अनृत-उद्धत-कथा व्यालसत्त्वा च पिङ्गदृक् || ११८ ||

**अन्वय :** – या तुल्यमानावमाना परुषत्वक् खरस्वरा शठानृतोद्धतकथा पिङ्गदृक् च व्यालसत्त्वा (स्मृता) |

**अर्थ** – जी मान आणि अपमान समान मानते, रखरखीत त्वचा असलेली, गाढवाप्रमाणे कठोर आणि कर्कश आवाज असलेली, लबाड, खोटे आणि उद्धटपणे बोलणारी, पिंगट डोळे असलेली ती स्त्री 'व्यालशीला' म्हणून ओळखली जाते.

**❖ मनुष्यशीला ❖**

**आर्जवाभिरता नित्यं दक्षा क्षान्तिगुणान्विता |**
**विभक्ताङ्गी कृतज्ञा च गुरुदेवद्विजप्रिया ||११९||**
**धर्मकामार्थनिरता ह्यहङ्कारविवर्जिता |**
**सुहृत्प्रिया सुशीला च मानुषं सत्त्वमाश्रिता ||१२०||**

**पदच्छेद:** – आर्जव-अभिरता नित्यम् दक्षा क्षान्ति-गुणान्विता |
विभक्त-अङ्गी कृतज्ञा च गुरु-देव-द्विज-प्रिया || ११९ ||
धर्म-काम-अर्थ-निरता हि अहङ्कार-विवर्जिता |
सुहृत्-प्रिया सुशीला च मानुषम् सत्त्वम् आश्रिता || १२० ||

**अन्वय:** – आर्जवाभिरता नित्य दक्षा क्षान्तिगुणान्विता विभक्ताङ्गी कृतज्ञा च गुरुदेवद्विजप्रिया धर्मकामार्थनिरता हि अहङ्कारविवर्जिता सुहृत्प्रिया सुशीला च मानुषम् सत्त्वम् आश्रिता |

**अर्थ** – जी स्वभावाने कोमल आहे, नेहमी सावध असते, सहनशीलता इत्यादी गुणांनी युक्त असते. सुडौल अंग असलेली, कृतज्ञ असलेली, गुरू देवता आणि ब्राह्मणांचे आदरातिथ्य करणारी, धर्म अर्थ आणि काम यांमध्ये गुंतलेली, अहंकार नसलेली, कुटुंबिय (मित्रपरिवार) यांवर प्रेम करणारी, सुशील अशी नारी मानवी स्वभावाचा आश्रय घेतलेली असते म्हणून तिला 'मनुष्यशीला' असे म्हणतात.

**❖ वानरशीला ❖**

**संहताल्पतनुर्हृष्टा पिङ्गरोमा छलप्रिया |**
**प्रगल्भा चपला तीक्ष्णा वृक्षारामवनप्रिया || १२१ ||**
**स्वल्पमप्युपकारं तु नित्यं या बहुमन्यते |**
**प्रसह्यरतिशीला च वानरं सत्त्वमाश्रिता ||१२२||**

**पदच्छेद:** – संहत-अल्पतनु: हृष्टा पिङ्ग-रोमा छलप्रिया |
प्रगल्भा चपला तीक्ष्णा वृक्ष-आराम-वन-प्रिया || १२१ ||
स्वल्पम् अपि उपकारम् तु नित्यम् या बहुमन्यते |
प्रसह्य-रतिशीला च वानरम् सत्त्वम् आश्रिता || १२२ ||

**अन्वय:** – संहताल्पतनु: हृष्टा पिङ्गरोमा छलप्रिया प्रगल्भा चपला तीक्ष्णा वृक्षारामवनप्रिया स्वल्पम् अपि तु उपकारम् या नित्यम् बहुमन्यते प्रसह्यरतिशीला (सा) वानरम् सत्त्वम् च आश्रिता|

**अर्थ** – जिचे शरीर मजबूत पण छोटे असते, जी आनंदी असते, जिचे रोम पिवळसर रंगाचे असतात, जिला इतरांशी छलकपट करते, जी प्रगल्भा आहे, चपळ आहे, तीक्ष्ण स्वभावाची आहे, झाडे, बगीचे आणि वन जिला अत्यंत प्रिय आहे, थोडे उपकार केले तरी खूप आभार मानते, बलपूर्वक रतिक्रीडेचा आनंद घेते, अशी ती स्त्री 'वानरशीला' म्हणून ओळखली जाते .

**❖ हस्तिशीला ❖**

**महाहनुललाटा च शरीरोपचयान्विता |**
**पिङ्गाक्षी रोमशाङ्गी च गन्धमाल्यासवप्रिया || १२३ ||**
**कोपना स्थिरचित्ता च जलोद्यानवनप्रिया |**
**मधुराभिरता चैव हस्तिसत्त्वा प्रकीर्तिता || १२४ ||**

**पदच्छेद:** – महा-हनु-ललाटा च शरीर-उपचय-अन्विता |
पिङ्ग-अक्षी रोमश-अङ्गी च गन्ध-माल्य-आसव-प्रिया || १२३ ||
कोपना स्थिरचित्ता च जल-उद्यान-वन-प्रिया |
मधुर-अभिरता च एव हस्तिसत्त्वा प्रकीर्तिता || १२४ ||

**अन्वय:** – महाहनुललाटा शरीरोपचयान्विता च पिङ्गाक्षी रोमशाङ्गी गन्धमाल्यासवप्रिया च कोपना स्थिरचित्ता च जलोद्यानवनप्रिया मधुराभिरता एव च हस्तिसत्त्वा प्रकीर्तिता |

**अर्थ** – जिचे कपाळ आणि हनुवटी विशाल आहे, धष्टपुष्ट शरीर असलेली, लालसर डोळे असलेली, अंगावर खूप केस असलेली, जिला गंध माळा आणि रसपान अतिप्रिय आहे,

**अर्थ** – जिचे कपाळ आणि हनुवटी विशाल आहे, धष्टपुष्ट शरीर असलेली, लालसर डोळे असलेली, अंगावर खूप केस असलेली, जिला गंध माळा आणि रसपान अतिप्रिय आहे, क्रोध करणारी, स्थिर चित्त असणारी, पाणी उद्यान आणि वनामध्ये विहार करण्याची आवड असलेली, गोड पदार्थ मनसोक्त खाणारी, (रतिक्रीडेमध्ये रममाण होणारी) अशी ती स्त्री 'हस्तिसत्त्वा' म्हणून ओळखली जाते .

**❖ मृगशीला ❖**

**स्वल्पोदरी भग्ननासा तनुजङ्घा वनप्रिया |**
**चलविस्तीर्णनयना चपला शीघ्रगामिनी || १२५ ||**
**दिवात्रासपरा नित्यं गीतवाद्यरतिप्रिया |**
**निवासस्थिरचित्ता च मृगसत्त्वा प्रकीर्तिता || १२६ ||**

**पदच्छेद:** – स्वल्प-उदरी भग्न-नासा तनु-जङ्घा वनप्रिया |
चल-विस्तीर्ण-नयना चपला शीघ्र-गामिनी || १२५ ||
दिवात्रास-परा नित्यम् गीतवाद्य-रतिप्रिया |
निवास-स्थिरचित्ता च मृगसत्त्वा प्रकीर्तिता || १२६ ||

**अन्वय:** – स्वल्पोदरी भग्ननासा तनुजङ्घा वनप्रिया चलविस्तीर्णनयना चपला शीघ्रगामिनी दिवात्रासपरा नित्यम् गीतवाद्यरतिप्रिया निवासस्थिरचित्ता च मृगसत्त्वा प्रकीर्तिता |

**अर्थ** – बारीक पोट असलेली, चपटे नाक असलेली, बारीक पोटऱ्या असलेली, वनामध्ये फिरणे जिला अत्यंत प्रिय आहे अशी, चंचल आणि विशाल नेत्र असलेली, चपळ आणि वेगवान गती असलेली, गीत वाद्य आणि रती यांमध्ये आवड असलेली, घरामध्ये स्थिर चित्त ठेवणारी स्त्री 'मृगशीला' म्हणून ओळखली जाते .

**❖ मीनशीला ❖**

**दीर्घपीनोन्नतोरस्का चला नातिनिमेषिणी |**
**बहुभृत्या बहुसुता मत्स्यसत्त्वा जलप्रिया || १२७ ||**

**पदच्छेद :–** दीर्घ-पीन-उन्नत-उरस्का चला न अतिनिमेषिणी |
बहुभृत्या बहुसुता मत्स्यसत्त्वा जलप्रिया || १२७ ||

**अन्वय : –** दीर्घपीनोन्नतोरस्का चला न अतिनिमेषिणी बहुभृत्या बहुसुता जलप्रिया मत्स्यसत्त्वा (प्रकीर्तिता) |

**अर्थ –** लांब, पुष्ट आणि उंच स्तन असलेली, चंचल असणारी, वारंवार डोळ्यांची उघड झाप न करणारी, अनेकजण जिची सेवा करतात आणि जिला अनेक अपत्य असतात, अशी पाण्याची आवड असलेली ती 'मीनशीला' स्त्री म्हणून ओळखली जाते .

**❖ उष्ट्रशीला ❖**

**लम्बोष्ठी स्वेदबहुला किञ्चिद्विकटगामिनी |**
**कृशोदरी पुष्पफललवणाम्लकटुप्रिया || १२८ ||**
**उद्बन्धकटिपार्श्वा च खरनिष्ठुरभाषिणी |**
**अत्युन्नतकटीग्रीवा उष्ट्रसत्त्वाऽटवीप्रिया || १२९ ||**

**पदच्छेद :–** लम्बोष्ठी स्वेद-बहुला किञ्चित्-विकटगामिनी |
कृशोदरी पुष्प-फल-लवण-आम्ल-कटुप्रिया || १२८ ||
उद्बन्ध-कटि-पार्श्वा च खर-निष्ठुर-भाषिणी |
अत्युन्नत-कटी-ग्रीवा उष्ट्र-सत्त्वा अटवी-प्रिया || १२९ ||

**अन्वय : –** लम्बोष्ठी स्वेदबहुला किञ्चिद्विकटगामिनी कृशोदरी पुष्पफललवणाम्लकटुप्रिया उद्बन्धकटिपार्श्वा खरनिष्ठुर- भाषिणी च अत्युन्नतकटीग्रीवा अटवीप्रिया उष्ट्रसत्त्वा (प्रकीर्तिता) |

**अर्थ –** लांब ओठ असलेली, जिला खूप घाम येतो, थोडी क्लिष्ट चाल असणारी, बारीक कंबर असलेली, फुले-फळे-खारट-आंबट व कडू पदार्थ प्रिय असलेली, कंबर आणि बाजू जरा सैल असलेली, कर्कश आणि निष्ठूर बोलणारी, अतिशय उंच कंबर व मान (ग्रीवा) असलेली, जिला जंगलात राहणे आवडते अशा स्त्रीला 'उष्ट्रसत्त्वा' असे म्हणतात .

❖ **मकरशीला** ❖

**स्थूलशीर्षाञ्चितग्रीवा दारितास्या महास्वना |**
**ज्ञेया मकरसत्त्वा च क्रूरा मत्स्यगुणोपेता || १३० ||**

**पदच्छेद :–** स्थूल-शीर्ष-अञ्चित-ग्रीवा दारित-आस्या महास्वना |
ज्ञेया मकरसत्त्वा च क्रूरा मत्स्यगुणोपेता || १३० ||

**अन्वय :** – स्थूलशीर्षाञ्चितग्रीवा दारितास्या महास्वना क्रूरा मत्स्यगुणोपेता च मकरसत्त्वा ज्ञेया |

**अर्थ** – जिचे डोके मोठे आणि मान बारीक असेल, जी तोंड उघडे ठेवत असेल आणि जिचा आवाज मोठा आहे, जी क्रूर आणि माश्यासारख्या गुणांनी युक्त आहे, अशा स्त्रीला 'मकरशीला' असे म्हणतात.

❖ **खरशीला** ❖

**स्थूलजिह्वोष्ठदशना रूक्षत्वक्कटुभाषिणी |**
**रतियुद्धकरी धृष्टा नखदन्तक्षतप्रिया || १३१ ||**
**सपत्नीद्वेषिणी दक्षा चपला शीघ्रगामिनी |**
**सरोषा बह्वपत्या च खरसत्त्वा प्रकीर्तिता || १३२ ||**

**पदच्छेद :–** स्थूल-जिह्वा-ओष्ठ-दशना रूक्ष-त्वक्-कटु-भाषिणी |
रतियुद्धकरी धृष्टा नख-दन्त-क्षत-प्रिया || १३१ ||
सपत्नी-द्वेषिणी दक्षा चपला शीघ्र-गामिनी |
सरोषा बहु-अपत्या च खरसत्त्वा प्रकीर्तिता || १३२ ||

**अन्वय :** – स्थूलजिह्वोष्ठदशना रूक्षत्वक्कटुभाषिणी रतियुद्धकरी धृष्टा नखदन्तक्षतप्रिया सपत्नीद्वेषिणी दक्षा चपला शीघ्रगामिनी सरोषा बह्वपत्या च खरसत्त्वा प्रकीर्तिता |

**अर्थ** – जिची जीभ, ओठ, दात जाड असतात, जिची त्वचा रूक्ष आहे, जी कटुभाषिणी आहे, जी रतिकार्यामध्ये जणू युद्ध करणारी आहे, जी निर्दयी आहे, जिला रतिक्रीडेत नखाने ओरबडलेले, दाताने चावलेले आवडते, जी सवतीवर द्वेष करणारी आहे, जी हुशार,

चंचल आणि वेगाने जाणारी आहे, जी रागावणारी आहे, खूप सारी अपत्ये असणारी अशी स्त्री 'खरसत्त्वा' म्हणून ओळखली जाते.

(श्लोक १३२ मध्ये 'सरोगा' ऐवजी 'सरोषा' हा पाठभेद स्वीकारण्यात आलेला आहे.)

**❖ सूकरशीला ❖**

**दीर्घपृष्ठोदरमुखी रोमशाङ्गी बलान्विता |**
**सुसंक्षिप्तललाटा च कन्दमूलफलप्रिया ||१३३||**
**कृष्णा दंष्टोत्कटमुखी ह्रस्वोदरशिरोरुहा |**
**हीनाचारा बह्वपत्या सौकरं सत्त्वमाश्रिता ||१३४||**

**पदच्छेद:** – दीर्घ-पृष्ठ-उदर-मुखी रोमश-अङ्गी बलान्विता |
सुसंक्षिप्त-ललाटा च कन्द-मूल-फल-प्रिया ||१३३||
कृष्णा दंष्ट-उत्कट-मुखी ह्रस्व-उदर-शिरो-रुहा |
हीन-आचारा बहु-अपत्या सौकरम् सत्त्वम् आश्रिता ||१३४||

**अन्वय:** – दीर्घपृष्ठोदरमुखी रोमशाङ्गी बलान्विता सुसंक्षिप्तललाटा कन्दमूलफलप्रिया च कृष्णा दंष्टोत्कटमुखी ह्रस्वोदर- शिरोरुहा हीनाचारा बह्वपत्या सौकरम् सत्त्वम् आश्रिता |

**अर्थ** – जिची पाठ पोट व मुख मोठे असते, जिच्या अंगावर खूप केस असतात, जी बलवान आहे, जिचे कपाळ अतिशय लहान आहे, कंद मुळे व फळे जिला खूप आवडतात, जी काळी आहे, दात मुखाच्या बाहेर आलेले असतात, जिचे पोट कमी आणि डोक्यावरचे केस कमी असतात, जी हीन आचरण करणारी, जिला खूप मुले असतात अशी जी स्त्री तिला 'सूकरशीला' असे म्हणतात.

**❖ हयशीला ❖**

**स्थिरा विभक्तपार्श्वोरुकटीपृष्ठशिरोधरा |**
**सुभगा दानशीला च ऋजुस्थूलशिरोरुहा ||१३५||**
**कृशा चञ्चलचित्ता च स्निग्धवाक्शीघ्रगामिनी |**
**कामक्रोधपरा चैव हयसत्त्वाङ्गना स्मृता ||१३६||**

**पदच्छेद :** – स्थिरा विभक्त-पार्श्व-उरु-कटी-पृष्ठ-शिरोधरा |
सुभगा दानशीला च ऋजु-स्थूल-शिरोरुहा || १३५ ||
कृशा चञ्चल-चित्ता च स्निग्ध-वाक्शीघ्र-गामिनी |
काम-क्रोध-परा च एव हयसत्त्वा अङ्गना स्मृता || १३६ ||

**अन्वय :** – स्थिरा विभक्तपार्श्वोरुकटीपृष्ठशिरोधरा सुभगा दानशीला ऋजुस्थूलशिरोरुहा कृशा चञ्चलचित्ता स्निग्धवाक् शीघ्रगामिनी एव च कामक्रोधपरा हयसत्त्वाङ्गना स्मृता |

**अर्थ** – जिच्या स्वभावात स्थैर्य आहे, जिची बाजू, मांडी, कंबर, पाठ व मान हे सुयोग्य रीत्या रेखीव असतात, जी सौभाग्यशालिनी आहे, जी दानशील आहे, कोमल व जाड केस असलेली आहे, जी सडपातळ आहे, चंचल चित्त असलेली, गोड बोलणारी आहे आणि वेगाने जाणारी आहे, काम आणि क्रोधाने जी व्याकुळ होते अशा स्त्रीला 'हयसत्त्वा' असे म्हणतात .

**❖ महिषशीला ❖**

**स्थूलपृष्ठाक्षिदशना तनुपार्श्वोदरा स्थिरा |**
**हरिरोमाञ्चिता रौद्री लोकद्विष्टा रतिप्रिया || १३७ ||**
**किञ्चिदुन्नतवक्त्रा च जलक्रीडावनप्रिया |**
**बृहल्ललाटा सुश्रोणी माहिषं सत्त्वमाश्रिता || १३८ ||**

**पदच्छेद :** – स्थूल-पृष्ठा-अक्षि-दशना तनु-पार्श्व-उदरा स्थिरा |
हरिरोम-अञ्चिता रौद्री लोक-द्विष्टा रतिप्रिया || १३७ ||
किञ्चित् उन्नतवक्त्रा च जल-क्रीडा-वन-प्रिया |
बृहल्ललाटा सुश्रोणी माहिषम् सत्त्वम् आश्रिता || १३८ ||

**अन्वय :** – स्थूलपृष्ठाक्षिदशना तनुपार्श्वोदरा स्थिरा हरिरोमाञ्चिता रौद्री लोकद्विष्टा रतिप्रिया किञ्चित् उन्नतवक्त्रा जलक्रीडावनप्रिया च बृहल्ललाटा सुश्रोणी माहिषम् सत्त्वम् आश्रिता |

**अर्थ** – जिची पाठ डोळे आणि दात मोठे आहेत, शरीर पार्श्व व पोट बारिक आहे, शरीरावर सुंदर लव आहेत, जी रौद्र स्वभावाची आहे, लोकांचा द्वेष करणारी आहे, रतिप्रिया आहे,

ताठ मान असलेली आहे, जिला जलक्रीडा व वनात फिरणे आवडते. मोठे कपाळ असलेली, सुंदर नितंब असलेली अशी स्त्री ही 'महिषशीला' म्हणून ओळखली जाते.

❖ अजशीला ❖

**कृशा तनुभुजोरस्का निष्टब्धस्थिरलोचना |**
**संक्षिप्तपाणिपादा च सूक्ष्मरोमसमाचिता || १३९ ||**
**भयशीला जलोद्विग्ना बह्वपत्या वनप्रिया |**
**चञ्चला शीघ्रगमना ह्यजसत्त्वाङ्गना स्मृता || १४० ||**

**पदच्छेद:** - कृशा तनुभुज-उरस्का निष्टब्ध-स्थिरलोचना |
संक्षिप्त-पाणि-पादा च सूक्ष्मरोम-समाचिता || १३९ ||
भयशीला जल-उद्विग्ना बह्वपत्या वनप्रिया |
चञ्चला शीघ्रगमना हि अजसत्त्वा अङ्गना स्मृता || १४० ||

**अन्वय:** - कृशा तनुभुजोरस्का निष्टब्धस्थिरलोचना संक्षिप्तपाणिपादा सूक्ष्मरोमसमाचिता भयशीला जलोद्विग्ना बह्वपत्या वनप्रिया चञ्चला शीघ्रगमना हि अजसत्त्वा अङ्गना स्मृता |

**अर्थ** - जी अत्यंत बारिक आहे, शरीर भुजा व छाती कमी असलेली आहे, डोळे निस्तब्ध व स्थिर आहेत, जिचे हातपाय छोटे आहेत, कुरळे केस आहेत, जी स्वभावाने घाबरट आहे, पाण्यामध्ये उद्विग्न होते, जिला अनेक अपत्ये आहेत, वनामध्ये विहार करणारी, चंचल आणि वेगवान गतीने चालणारी अशी जी स्त्री तिला 'अजाशीला' असे म्हटले जाते.

❖ अश्वशीला ❖

**उद्बन्धगात्रनयना विजृम्भणपरायणा |**
**दीर्घाल्पवदना स्वल्पपाणिपादविभूषिता || १४१ ||**
**उच्च्व:स्वना स्वल्पनिद्रा क्रोधना सुकृतप्रिया |**
**हीनाचारा कृतज्ञा चाश्वशीला परिकीर्तिता || १४२ ||**

**पदच्छेद :–** उद्वन्ध-गात्र-नयना विजृम्भण-परायणा |
दीर्घ-अल्प-वदना स्वल्प-पाणि-पाद-विभूपिता || १४१ ||
उच्च :स्वना स्वल्पनिद्रा क्रोधना सुकृत-प्रिया |
हीनाचारा कृतज्ञा च अश्वशीला परिकीर्तिता || १४२ ||

**अन्वय : –** उद्वन्धगात्रनयना विजृम्भणपरायणा दीर्घा अल्पवदना स्वल्पपाणिपादविभूपिता उच्च :स्वना स्वल्पनिद्रा क्रोधना सुकृतप्रिया हीनाचारा कृतज्ञा च अश्वशीला परिकीर्तिता |

**अर्थ –** ज्या स्त्रीचे शरीर आणि डोळे सुदृढ असतात, जी वारंवार जांभई देते, जिचे तोंड लांब आणि वाग्कि असते, जिचे हातपाय छोटे पण सुंदर असतात, जी मोठ्याने बोलते, कमी झोपते, रागिष्ट आहे परंतु चांगले कर्म करण्याची आवड असलेली, हीन आचरण करणारी आणि कृतज्ञ अशा स्त्रीला 'अश्वशीला' असे म्हणतात .

### ❖ गोशीला ❖

**पृथुपीनोन्नतश्रोणी तनुजङ्घा सुहृत्प्रिया |**
**संक्षिप्तपाणिपादा च दृढारम्भा प्रजाहिता || १४३ ||**
**पितृदेवार्चनरता सत्यशौचगुरुप्रिया |**
**स्थिरा परिक्लेशसहा गवां सत्त्वं समाश्रिता || १४४ ||**

**पदच्छेद :–** पृथु-पीन-उन्नत-श्रोणी तनु-जङ्घा सुहृत्प्रिया |
संक्षिप्त-पाणि-पादा च दृढ-आरम्भा प्रजा-हिता || १४३ ||
पितृ-देव-अर्चन-रता सत्य-शौच-गुरु-प्रिया |
स्थिरा परिक्लेश-सहा गवाम् सत्त्वम् समाश्रिता || १४४ ||

**अन्वय : –** पृथुपीनोन्नतश्रोणी तनुजङ्घा सुहृत्प्रिया संक्षिप्तपाणिपादा च दृढारम्भा प्रजाहिता पितृदेवार्चनरताा सत्यशौचगुरुप्रिया स्थिरा परिक्लेशसहा गवाम् सत्त्वम् समाश्रिता |

**अर्थ –** मोठे पुष्ट व उंच नितंब असलेली, वारिक जांघा असलेली, मित्रांवर प्रेम करणारी, लहान हातपाय असणारी, आरंभशूर, प्रजेचे (अपत्यांचे) हित पाहणारी, पितृ आणि देव यांची

पूजा करण्यात मग्न असलेली, सत्य पवित्रता आणि गुरूजनांचा सन्मान करणारी, स्थिर स्वभाव असणारी आणि क्लेश सहन करणारी अशी जी स्त्री ती 'गोशीला' म्हणून ओळखली जाते .

❖ **शील-सत्त्वगुणानुसार स्त्रिया** ❖

**नानाशीला: स्त्रियो ज्ञेया: स्वं स्वं सत्त्वं समाश्रिता: |**
**विज्ञाय च यथासत्त्वमुपसेवेत ता: पुन: || १४५ ||**
**उपचारो यथासत्त्वं स्त्रीणामल्पोऽपि हर्षद: |**
**महानप्यन्यथायुक्तो नैव तुष्टिकरो भवेत् || १४६ ||**

**पदच्छेद: –** नानाशीला : स्त्रिय :ज्ञेया : स्वम् स्वम् सत्त्वम् समाश्रिता : |
विज्ञाय च यथासत्त्वम् उपसेवेत ता : पुन : || १४५ ||
उपचार : यथासत्त्वम् स्त्रीणाम् अल्प : अपि हर्षद : |
महान् अपि अन्यथायुक्त : न एव तुष्टिकर : भवेत् || १४६ ||

**अन्वय: –** स्वम् स्वम् सत्त्वम् समाश्रिता : स्त्रिय : नानाशीला : ज्ञेया : | यथासत्त्वम् च विज्ञाय पुन : ता : उपसेवेत | यथासत्त्वम् स्त्रीणाम् अल्प : अपि उपचार : हर्षद : | अन्यथायुक्त : महान् अपि तुष्टिकर : न एव भवेत् | (महानिति पूर्ण : | अन्यथेति अयथासत्त्वम् | - अ . भा . )

**अर्थ –** स्वत :च्या सत्त्वाचा आधार घेतलेल्या या स्त्रिया विविध स्वभावाच्या असतात . म्हणूनच त्यांच्या सत्त्वगुणानुसार त्या त्या शीलांचा वापर करावा . सत्त्वगुणानुसार स्त्रियांचा थोडा जरी प्रवेश झाला तरी ते त्या स्त्रियांना आनंद देणारे असते . त्या त्या सत्त्वगुणानुसार स्त्रियांचा प्रवेश नाही झाला तर त्यांना संपूर्ण आनंद मिळत नाही .

**यथा संप्रार्थितावाप्त्या रति: समुपजायते |**
**स्त्रीपुंसयोश्च रत्यर्थमुपचारो विधीयते || १४७ ||**

**पदच्छेद: –** यथा संप्रार्थिती आप्त्या रति : समुपजायते |
स्त्रीपुंसयो : च रत्यर्थम् उपचार : विधीयते || १४७ ||

**अन्वय:** – यथा संप्रार्थितौ आप्त्या रति: समुपजायते | स्त्रीपुंसयो : च रत्यर्थम् उपचार : विधीयते |

**अर्थ** – जेव्हा विनंती केली असता मान्य झाल्यावर रति उत्पन्न होते . स्त्रीपुरूषांमध्ये अशी रति निर्माण होण्यासाठी काही उपचार सांगितले जातात .

**धर्मार्थं हि तपश्चर्या सुखार्थं धर्म इष्यते |**
**सुखस्य मूलं प्रमदास्तासु सम्भोग इष्यते || १४८ ||**

**पदच्छेद:** – धर्मार्थम् हि तपश्चर्या सुखार्थम् धर्म : इष्यते |
सुखस्य मूलम् प्रमदा : तासु सम्भोग : इष्यते || १४८ ||

**अन्वय:** – धर्मार्थं हि तपश्चर्या सुखार्थं धर्म : इष्यते | सुखस्य मूलं प्रमदा :, तासु (नायकेन) सम्भोग : इष्यते |

**अर्थ** – धर्मासाठी तप केले जाते, आणि सुखासाठी धर्माची अपेक्षा असते, सुखाचे मूळ म्हणजे नारी व म्हणूनच त्यांच्या सोबत संभोगाची इच्छा होत असते .

**❖ कामोपभोगाचे दोन प्रकार ❖**

**कामोपभागो द्विविधो नाट्यधर्मेऽभिधीयते |**
**बाह्याभ्यन्तरतश्चैव नारीपुरुषसंश्रय: || १४९ ||**

**पदच्छेद:** – काम-उपभाग : द्विविध : नाट्यधर्मे अभिधीयते |
बाह्य-अभ्यन्तरत : च एव नारी-पुरूष-संश्रय : || १४९ ||

**अन्वय:** – नाट्यधर्मे नारीपुरूषसंश्रय : कामोपभाग : बाह्याभ्यन्तरत : एव च द्विविध : अभिधीयते | (नाट्यधर्म इति नाट्योपाये इतिवृत्त इत्यर्थ : | अभ्यन्तरमन्त :पुरं तत्र भव : आभ्यन्तर : | अ . भा . )

**अर्थ** – इतिवृत्तामध्ये स्त्रीपुरूषांवर आधारित कामोपभोगाचे दोन प्रकार सांगितले जातात - आभ्यंतर (अंत :पुरामध्ये केला जाणारा) आणि बाह्य .

**आभ्यन्तर: पार्थिवानां स च कार्यस्तु नाटके |**
**बाह्यो वेश्यागतश्चैव स च प्रकरणे भवेत् || १५० ||**

**पदच्छेद :–** आभ्यन्तर : पार्थिवानाम् स : च कार्य : तु नाटके |
वाह्य : वेश्यागत : च एव स : च प्रकरणे भवेत् || १५० ||

**अन्वय : –** नाटके तु पार्थिवानाम् स : आभ्यन्तर : च कार्य : | एव च बाह्य : वेश्यागत : स : च प्रकरणे भवेत् | (नाटक इति नाटिकायां चेत्यर्थ : | अ . भा . )

**अर्थ –** नाटकामध्ये किंवा नाटिकेमध्ये राजांसाठी अंत :पुरामध्ये करण्यास योग्य असा आभ्यंतर काम दाखवावा आणि प्रकरणामध्ये वेश्यांकडे जाऊन बाह्य काम दर्शवावा .

**❖ उपचारविधि-सामान्य अभिनयाचा प्रकृतिनुसार उपयोग ❖**

**तत्र राजोपभोगं तु व्याख्यास्याम्यनुपूर्वश : |**
**उपचारविधिं सम्यक् कामतन्त्रसमुत्थितम् || १५१ ||**

**पदच्छेद :–** तत्र राजोपभोगम् तु व्याख्यास्यामि अनुपूर्वश : |
उपचार-विधिम् सम्यक् कामतन्त्र-समुत्थितम् || १५१ ||

**अन्वय : –** तत्र कामतन्त्रसमुत्थितम् उपचारविधिम् राजोपभोगम् तु अनुपूर्वश: सम्यक् व्याख्यास्यामि | (अनुपूर्वश इति वक्ष्यमाणग्रन्थे मुनिना | अ . भा . )

**अर्थ –** आता पूर्वसूरींनी सांगिल्याप्रमाणे कामतंत्रामध्ये सांगितलेल्या, विशिष्ट उपचारविधि असलेल्या राजांच्या शृंगाराविषयी मी व्यवस्थित सांगणार आहे .

**त्रिविधा प्रकृति: स्त्रीणां नानासत्त्वसमुद्भवा |**
**बाह्या चाभ्यन्तरा चैव स्याद् बाह्याभ्यन्तरापरा || १५२ ||**

**पदच्छेद :–** त्रिविधा प्रकृति : स्त्रीणाम् नानासत्त्व-समुद्भवा |
बाह्या च आभ्यन्तरा च एव स्यात् बाह्याभ्यन्तरा अपरा || १५२ ||

**अन्वय : –** स्त्रीणाम् नानासत्त्वसमुद्भवा प्रकृति: बाह्या आभ्यन्तरा अपरा च बाह्याभ्यन्तरा (इति) त्रिविधा स्यात् |

**अर्थ –** विविध सत्त्वानुसार स्त्रियांच्या तीन प्रकारच्या प्रकृति आहेत . १ . बाह्य २ . आभ्यंतर आणि ३ . बाह्यभ्यंतर

**कुलीनाभ्यन्तरा ज्ञेया बाह्या वेश्याङ्गना स्मृता |**
**कृतशौचा तु या नारी सा बाह्याभ्यन्तरा स्मृता || १५३ ||**

**पदच्छेद:-** कुलीना आभ्यन्तरा ज्ञेया बाह्या वेश्या अङ्गना स्मृता |
कृतशौचा तु या नारी सा बाह्याभ्यन्तरा स्मृता || १५३ ||

**अन्वय: -** कुलीना आभ्यन्तरा ज्ञेया | वेश्या अङ्गना बाह्या स्मृता | या नारी कृतशौचा सा तु बाह्याभ्यन्तरा स्मृता | (कृतशौचेति कृतं शौचं शुद्धशीलत्वम् एकान्तावरुद्धत्वेन यस्या:, सा च वेश्या पुनर्भवा |-अ.भा.)

**अर्थ -** चांगल्या कुळातील स्त्री ही आभ्यंतर प्रकृतीची म्हटली गेली आहे. वेश्या स्त्री ही बाह्य प्रकृतीची असते. जी कृतशौचा (संस्कारी परंतु कुलीन नसलेली अशी) स्त्री असते ती बाह्याभ्यंतरा किंवा मिश्र प्रकृतीची असते.

(वेश म्हणजे गणिकांचे स्थान. तिथे ज्या जन्माला येतात त्यांना वेश्या असे म्हटले जाते. एकांतात अडविल्यानंतर जी स्वत:चे चारित्र्य शुद्ध ठेवते आणि नंतर पुन्हा वेश्येसमान होते ती कृतशौचा प्रकृतीची नारी होय.-अ.भा.)

**अन्त:पुरोपचारे तु कुलजा कन्यकापि वा |**
**न हि राजोपचारे तु बाह्यस्त्रीभोग इष्यते || १५४ ||**

**पदच्छेद:-** अन्त:पुर-उपचारे तु कुलजा कन्यका अपि वा |
न हि राजोपचारे तु बाह्यस्त्रीभोग: इष्यते || १५४ ||

**अन्वय: -** अन्त:पुरोपचारे तु कुलजा कन्यका अपि वा (इष्यते) | राजोपचारे तु हि बाह्यस्त्रीभोग: न इष्यते |

**अर्थ -** अंत:पुरातील व्यवहारामध्ये कुलीन स्त्री किंवा एखादी कुमारिकादेखील समागमासाठी योग्य आहेत. परंतु राजाने अंत:पुरामध्ये वेश्येशी समागम करू नये.

**आभ्यन्तरो भवेद्राज्ञो बाह्यो बाह्यजनस्य च |**
**दिव्यवेशाङ्गनानां हि राज्ञां भवति सङ्गम: || १५५ ||**

**पदच्छेद :–** आभ्यन्तर : भवेत् राज्ञ : वाह्य : वाह्यजनस्य च |
दिव्य-वेश-अङ्गनानाम् हि राज्ञाम् भवति सङ्गम : || १५५ ||

**अन्वय : –** राज्ञ : (काम :) आभ्यन्तर : वाह्यजनस्य च वाह्य : भवेत् | दिव्यवेशाङ्गनानाम् हि राज्ञाम् सङ्गम : भवति | (न हि राजोपचारे तु वाह्यस्त्रीभोग इत्यस्यापवादमाह दिव्यवेश्येत्यादि | यथा पुरुरवस : ऊर्वश्या | अ . भा . )

**अर्थ –** राजाचा समागम हा आभ्यंतर असावा . वाह्य लोकांचा समागम हा वेश्येसोबत असावा . परंतु दिव्य वेश्यांगनांशी राजांचा समागम होतो .

(१५४ व्या श्लोकामध्ये राजाने वेश्येशी समागम करू नये असा नियम सांगितला आहे . त्याला अपवाद म्हणून या श्लोकात म्हटले आहे की जर ती वेश्या दिव्यांगना असेल तर राजाचा तिच्यासह समागम होऊशकतो, जसे पुरुरवाचा ऊर्वशीसह झालेला समागम . - अ . भा . )

**कुलजाकामितं यच्च तज्ज्ञेयं कन्यकास्वपि |**
**या चापि वेश्या साप्यत्र यथैव कुलटा तथा || १५६ ||**

**पदच्छेद :–** कुलजा-कामितम् यत् च तत् ज्ञेयम् कन्यकासु अपि |
या च अपि वेश्या सा अपि अत्र यथा एव कुलटा तथा || १५६ ||

**अन्वय : –** यत् च कुलजाकामितम् तत् कन्यकासु अपि ज्ञेयम् | यथा कुलटा तथा या च अपि वेश्या सा अपि अत्र (ज्ञेयम्) |

**अर्थ –** समागमाच्या दृष्टीने उच्च कुलीन स्त्रियांसाठी जे नियम आहेत तेच कुमारिकांसाठी देखील असतील . जे नियम वेश्येसाठी तेच कुलटेसाठी आहेत असे समजून घ्यावे .

(या ठिकाणी 'यथैव कुलजा तथा' असा पाठभेद आढळतो परंतु अर्थाच्या दृष्टीने कुलटा हा पाठ ग्राह्य धरला आहे . )

**❖ 'कामा'ची उत्पत्ती व प्रकार ❖**

**इह कामसमुत्पत्तिर्नानाभावसमुद्भवा |**
**स्त्रीणां वा पुरुषाणां वा उत्तमाधममध्यमा || १५७ ||**

**पदच्छेद :–** इह कामसमुत्पत्ति : नानाभाव-समुद्भवा |
स्त्रीणाम् वा पुरुषाणाम् वा उत्तम-अधम-मध्यमा || १५७ ||

**अन्वय : –** इह स्त्रीणाम् वा पुरुषाणाम् वा नानाभावसमुद्भवा कामसमुत्पत्ति: उत्तमाधममध्यमा (ज्ञेया) |

**अर्थ –** स्त्रीपुरुषांमध्ये विविध भावांमुळे उत्पन्न होणारा 'काम' हा तीन प्रकारचा असतो . १ . उत्तम २ . मध्यम आणि ३ . अधम

**श्रवणाद्दर्शनाद्रूपादङ्गलीलाविचेष्टितै: |**
**मधुरैश्च समालापै: काम: समुपजायते || १५८ ||**

**पदच्छेद :–** श्रवणात् दर्शनात् रूपात् अङ्गलीला-विचेष्टितै : |।
मधुरै : च समालापै : काम : समुपजायते || १५८ ||

**अन्वय : –** श्रवणात् दर्शनात् रूपात् अङ्गलीलाविचेष्टितै : मधुरै : च समालापै : काम : समुपजायते | (सीताया : श्रवणात् रावणस्य, शकुन्तलादर्शनात् दुष्यन्तस्य | अ . भा . )

**अर्थ –** श्रवण, दर्शन, सौंदर्य, लीलायुक्त आंगिक क्रिया आणि मधुर बोलणे यांमुळे 'काम' उत्पन्न होतो . (जसे सीतेविषयी ऐकून रावणाच्या मनात आणि शकुंतलेला पाहून दुष्यंताच्या मनात काम उत्पन्न झाला . अ . भा . )

**रूपगुणादिसमेतं कलादिविज्ञानयौवनोपेतम् |**
**दृष्ट्वा पुरुषविशेषं नारी मदनातुरा भवति || १५९ ||**

**पदच्छेद :–** रूप-गुणादि-समेतम् कलादि-विज्ञान-यौवन-उपेतम् |
दृष्ट्वा पुरुष-विशेषम् नारी मदनातुरा भवति || १५९ ||

**अन्वय : –** रूपगुणादिसमेतम् कलादिविज्ञानयौवनोपेतम्पुरुषविशेषम् दृष्ट्वा नारी मदनातुरा भवति|

**अर्थ –** रूप गुण इत्यादींनी युक्त असलेल्या आणि तसेच कलाकौशल्य, विज्ञान व तारुण्य यांनी युक्त असा पुरुषांच्या विशिष्ट गुणांना पाहून स्त्री कामातुर होते .

**ततः कामयमानानां नृणां स्त्रीणामथापि च |**
**कामभावेङ्गितानीह तज्ज्ञः समुपलक्षयेत् || १६० ||**

**पदच्छेदः-** ततः काम-यमानानाम् नृणाम् स्त्रीणाम् अथ अपि च |
कामभाव-इङ्गितानि इह तज्ज्ञः समुपलक्षयेत् || १६० ||

**अन्वयः -** ततः कामयमानानाम् नृणाम् स्त्रीणाम् च कामभावेङ्गितानि तज्ज्ञः इह समुपलक्षयेत् |

**अर्थ -** त्यानंतर कामवासनेत रत असलेल्या पुरुष आणि स्त्रियांचे कामुक भाव आणि गुप्त संकेत तज्ज्ञांनी याठिकाणी जाणून घ्यावेत .

**❖ काम्या दृष्टी ❖**

**ललिता चलपक्ष्मा च तथा च मुकुलितेक्षणा |**
**स्रस्तोत्तरपुटा चैव काम्या दृष्टिर्भवेदिह || १६१ ||**

**पदच्छेदः-** ललिता चल-पक्ष्मा च तथा च मुकुलित-ईक्षणा |
स्रस्त-उत्तरपुटा च एव काम्या: दृष्टि: भवेत् इह || १६१ ||

**अन्वयः -** इह ललिता चलपक्ष्मा मुकुलितेक्षणा तथा स्रस्तोत्तरपुटा च काम्याः दृष्टिः भवेत् |

**अर्थ -** ललित, चंचल पापण्या, प्रफुल्लित नेत्र असणारी आणि वरची पापणी जिची झुकलेली आहे त्या दृष्टीला 'काम्या दृष्टी' असे म्हणतात .

**❖ ललिता दृष्टी ❖**

**वलितान्ता सलालित्यसंमितैर्व्यञ्जितैस्तथा |**
**दृष्टिः सा ललिता नाम स्त्रीणामर्धावलोकने || १६२ ||**

**पदच्छेदः-** वलितान्ता सलालित्य-संमितैः व्यञ्जितैः तथा |
दृष्टिः सा ललिता नाम स्त्रीणाम् अर्धावलोकने || १६२ ||

**अन्वयः -** सलालित्यसंमितैः व्यञ्जितैः तथा स्त्रीणाम् अर्धावलोकने या वलितान्ता सा एव ललिता नाम दृष्टिः |

**अर्थ** – ललित नेत्रांनी, तिरक्या नजरेने किंवा संकुचित, परंतु स्पष्ट रीत्या प्रकट होणाऱ्या स्त्रियांच्या त्या अर्धविलोकनाला 'ललिता दृष्टी' असे म्हणतात .

**❖ मुखराग ❖**

**ईषत्संरक्तगण्डस्तु स्वेदबिन्दुविचित्रित:।**
**प्रस्पन्दमानरोमाञ्चो मुखरागो भवेदिह ॥ १६३ ॥**

**पदच्छेद:–** ईषत्-संरक्त-गण्ड: तु स्वेदबिन्दु-विचित्रित:।
प्रस्पन्दमान-रोमाञ्च: मुखराग: भवेत् इह ॥ १६३ ॥

**अन्वय: –** ईषत्संरक्तगण्ड: तु स्वेदबिन्दु-विचित्रित: प्रस्पन्दमानरोमाञ्च: इह मुखराग: भवेत्।

**अर्थ** – जिचे गाल लज्जेमुळे गुलाबी रंगाचे झाले असतील, चेह-यावर घामाचे थेंब झळकत असतील आणि अंग रोमांचित झाले असेल तर त्याला 'मुखराग' असे म्हणतात .
('प्रस्पन्दमानरोमाञ्च' यात जे सांगितले आहे त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी 'सस्वेदलवचित्रित:' या गायकवाड ओरिएण्टल सीरिज मधील पाठाऐवजी 'स्वेदबिन्दुविचित्रित:' हा पाठ याठिकाणी स्वीकारलेला आहे . )

**❖ मदनाने आतुर वेश्यांचे भाव ❖**

**काम्येनाङ्गविकारेण सकटाक्षनिरीक्षितै:।**
**तथाभरणसंस्पर्शै: कर्णकण्डूयनैरपि ॥ १६४ ॥**
**अङ्गुष्ठाग्रविलिखनै: स्तननाभिप्रदर्शनै:।**
**नखनिस्तोदनाच्चैव केशसंयमनादपि ॥ १६५ ॥**
**वेश्यामेवं विधैभविर्लक्षयेन्मदनातुराम् ।**

**पदच्छेद:–** काम्येन अङ्ग-विकारेण सकटाक्ष-निरीक्षितै:।
तथा आभरण-संस्पर्शै: कर्ण-कण्डूयनै: अपि ॥ १६४ ॥

अङ्गुष्ठाग्र-विलिखनैः स्तन-नाभि-प्रदर्शनैः |
नख-निस्तोदनात् च एव केश-संयमनात् अपि || १६५ ||
वेश्याम् एवम् विधैः भावैः लक्षयेत् मदन-आतुराम् |

**अन्वयः –** काम्येन अङ्गविकारेण, सकटाक्षनिरीक्षितैः आभरणसंस्पर्शैः कर्णकण्डूयनैः अपि अङ्गुष्ठाग्रविलिखनैः स्तननाभिप्रदर्शनैः नखनिस्तोदनात् एव अपि च केशसंयमनात् एवंविधैः भावैः मदनातुराम् वेश्याम् लक्षयेत् |

**अर्थ –** सकाम अंगविकार करणे, नेत्रकटाक्षांसह निरीक्षण करणे, आभूषणांना स्पर्श करणे, कानांना खाजविणे, पायाच्या अंगुष्ठाग्राद्वारे जमिनीवर रेखाटणे, स्तन व नाभि दर्शविणे, नख टोचणे, विविध वेशभूषा करणे अशा प्रकारचे अनुभाव मदनातुर वेश्यांनी प्रदर्शित करावे.

**❖ कुलीन स्त्रीची इंगिते ❖**

**कुलजायास्तथा चैव प्रवक्ष्यामीङ्गितानि तु || १६६ ||**
**प्रहसन्तीव नेत्राभ्यां प्रततं च निरीक्षते |**
**स्मयते सा निगूढं च वाचं चाधोमुखी वदेत् || १६७ ||**
**स्मितोत्तरा मन्दवाक्या स्वेदाकारनिगूहनी |**
**प्रस्पन्दितधरा चैव चकिता च कुलाङ्गना || १६८ ||**

**पदच्छेदः –** कुलजायाः तथा च एव प्रवक्ष्यामि इङ्गितानि तु || १६६ ||
प्रहसन्ती इव नेत्राभ्याम् प्रततम् च निरीक्षते |
स्मयते सा निगूढम् च वाचम् च अधोमुखी वदेत् || १६७ ||
स्मित-उत्तरा मन्दवाक्या स्वेदाकार-निगूहनी |
प्रस्पन्दित-अधरा च एव चकिता च कुलाङ्गना || १६८ ||

**अन्वयः –** तथा एव च कुलजायाः इङ्गितानि तु प्रवक्ष्यामि | (सा) प्रहसन्ती इव नेत्राभ्याम् प्रततम् च निरीक्षते | सा निगूढम् स्मयते अधोमुखी च वाचम् वदेत् | स्मितोत्तरा मन्दवाक्या स्वेदाकारनिगूहनी प्रस्पन्दितधरा चकिता च कुलाङ्गना (अस्ति) |

**अर्थ** – आता कुलीन स्त्रीच्या गुप्त संकेतांविषयी मी सांगतो.
कुलांगना स्त्री खूप वेळ हसतहसत डोळ्यांनी एकटक पाहते. ती एकटीच हसते आणि मान खाली घालून गूढपणे बोलते. स्मित हास्य करीत गुपित सांगते, सौम्यपणे बोलते, चेहऱ्यावरचा घाम वारंवार पुसते, तिचे ओठ कंपित होतात, अशी घाबरलेली ती चकित नजेरेने सर्वत्र पाहते.

**❖ 'कामा'च्या दहा अवस्था ❖**

**एवंविधै: कामलिङ्गैरप्राप्तसुरतोत्सवा |**
**दशस्थानगतं कामं नानाभावै: प्रदर्शयेत् || १६९ ||**

**पदच्छेद:** – एवंविधै: कामलिङ्गै: अप्राप्त-सुरत-उत्सवा |
दशस्थान-गतम् कामम् नानाभावै: प्रदर्शयेत् || १६९ ||

**अन्वय:** – एवंविधै: कामलिङ्गै: अप्राप्तसुरतोत्सवा नानाभावै: दशस्थानगतं कामं प्रदर्शयेत् |

**अर्थ** – मदनाच्या अशा विविध इंगितांद्वारे कुलीन स्त्री जी कामक्रीडेतील सुखाची प्राप्ती करू शकली नाही, तिने विविध भावांवर आधारलेल्या कामाच्या स्थलगत अशा दहा अवस्था प्रदर्शित कराव्यात.
(अभिनवगुप्ताच्या मतानुसार विप्रलंभ शृंगारामध्ये नायिकेने कामाच्या या दहा अवस्था दर्शवाव्यात.)

**प्रथमे त्वभिलाष: स्याद् द्वितीये चिन्तनं भवेत् |**
**अनुस्मृतिस्तृतीये तु चतुर्थे गुणकीर्तनम् || १७० ||**
**उद्वेग: पञ्चमे प्रोक्तो विलाप: षष्ठ उच्यते |**
**उन्माद: सप्तमे ज्ञेयो भवेद्व्याधिस्तथाष्टमे || १७१ ||**
**नवमे जडता चैव दशमे मरणं भवेत् |**
**स्त्रीपुंसयोरेष विधिर्लक्षणं च निबोधत || १७२ ||**

**पदच्छेद : –** प्रथमे तु अभिलाष : स्यात् द्वितीये चिन्तनम् भवेत् ।
अनुस्मृति : तृतीये तु चतुर्थे गुणकीर्तनम् ॥ १७० ॥
उद्वेग : पञ्चमे प्रोक्त : विलाप : षष्ठ : उच्यते ।
उन्माद : सप्तमे ज्ञेय : भवेत् व्याधि : तथा अष्टमे ॥ १७१ ॥
नवमे जडता च एव दशमे मरणम् भवेत् ।
स्त्रीपुंसयो : एष : विधि : लक्षणम् च निबोधत ॥ १७२ ॥

**अन्वय : –** प्रथमे तु अभिलाष : स्यात् । द्वितीये चिन्तनम्, तृतीये अनुस्मृति :, चतुर्थे तु गुणकीर्तनम् भवेत् । पञ्चमे उद्वेग : प्रोक्त : । विलाप : षष्ठ : उच्यते । सप्तमे उन्माद : ज्ञेय : । तथा अष्टमे व्याधि : भवेत् । नवमे जडता एव च दशमे मरणं भवेत् । एष : स्त्रीपुंसयो : विधि : (अस्ति तेषाम्) लक्षणम् च निबोधत ।

**अर्थ –** कामाच्या दहा अवस्था पुढीलप्रमाणे – पहिली अवस्था म्हणजे 'अभिलाषा'. दुसरी अवस्था 'चिन्तन', तिसरी अवस्था 'अनुस्मृति' आणि चौथी गुणकीर्तन असते. पाचवी अवस्था 'उद्वेग' असल्याचे म्हटले गेले आहे. सहावी अवस्था 'विलाप' होय. 'उन्माद' ही सातवी अवस्था जाणून घ्यावी. तसेच आठवी अवस्था 'व्याधि' होय. नववी 'जडता' आणि दहावी अवस्था 'मरण' होय. या अवस्था स्त्री आणि पुरुष या दोघांसाठीही आहेत. आता त्यांचे लक्षण जाणून घ्या.

### ❖ अभिलाषा ❖

**व्यवसायात्समारब्ध : संकल्पेच्छासमुद्भव : ।**
**समागमोपायकृत : सोऽभिलाष : प्रकीर्तित : ॥ १७३ ॥**

**पदच्छेद : –** व्यवसायात् समारब्ध : संकल्प-इच्छा-समुद्भव : ।
समागम-उपाय-कृत : स : अभिलाष : प्रकीर्तित : ॥ १७३ ॥

**अन्वय : –** व्यवसायात् समारब्ध :, संकल्पेच्छासमुद्भव :, समागमोपायकृत : स : अभिलाष : प्रकीर्तित : । (व्यवसायादिति काम्यजनज्ञानं तत्संकल्पपूर्वकेच्छा तत उद्भव उद्रिक्तत्वमस्येति । – अ . भा . )

**अर्थ** – कामवासनेविषयीच्या नैसर्गिक ज्ञानाने जो उत्पन्न होतो आणि संकल्पाद्वारे मनात आलेल्या इच्छेतून ज्याचा उद्रेक होतो, त्यानंतर समागमासाठी काहीतरी उपाय केला जातो त्यास 'अभिलाप' असे म्हणतात .

**निर्याति विशति च मुहु: करोति चाकारमेव मदनस्य |**
**तिष्ठति च दर्शनपथे प्रथमस्थाने स्थिता कामे || १७४ ||**

**पदच्छेद: –** निर्याति विशति च मुहु: करोति च आकारम् एव मदनस्य |
तिष्ठति च दर्शनपथे प्रथमस्थाने स्थिता कामे || १७४ ||

**अन्वय: –** मुहु: निर्याति विशति, मदनस्य च आकारम् एव करोति, दर्शनपथे स्थिता नायिका कामे प्रथमस्थाने च तिष्ठति |
(दर्शनपथ इति तं यत्र पश्येत तेन वा दृश्येत इत्यर्थ: | - अ . भा . )

**अर्थ** – वारंवार घरामध्ये आत-बाहेर करते, मदनाची इंगिते दर्शविते, नंतर प्रियकराच्या दर्शनासाठी त्याच्या मार्गावर थांवते जेणेकरून तो तिला पाहील किंवा ती त्याला पाहील अशी ही नायिका कामाच्या प्रथमस्थानी असते म्हणजेच 'अभिलाप' या अवस्थेत असते .

**❖ चिंतन ❖**

**केनोपायेन संप्राप्ति: कथं वासौ भवेन्मम |**
**दूतीनिवेदितैर्भावैरिति चिन्ता निदर्शयेत् || १७५ ||**

**पदच्छेद: –** केन उपायेन संप्राप्ति: कथम् वा असौ भवेत् मम |
दूती-निवेदितै: भावै: इति चिन्ता निदर्शयेत् || १७५ ||

**अन्वय: –** दूतीनिवेदितै: भावै: "केन उपायेन संप्राप्ति:? कथम् वा असौ मम भवेत्?" इति चिन्ता निदर्शयेत् |
(दूतीनिवेदितैर्भावै: मनोरथैरित्युपलक्षणं स्वकल्पितैरपि इत्यर्थ: | - अ . भा . )

**अर्थ** – स्वत:च्याच कल्पनेद्वारे किंवा दूतींद्वारे प्रियकराविषयी समजल्यानंतर "कोणत्या उपायाने प्रियकर मला भेटेल? कसा वरे तो फक्त माझाच होईल?" अशा शब्दामध्ये नायिकेने चिंता प्रकट करावी .

**आकेकरार्धविप्रेक्षितानि वलयरशनापरामर्शः ।**
**नीवी नाभ्याः संस्पर्शनं च कार्यं द्वितीये तु ॥ १७६ ॥**

**पदच्छेद :–** आकेकरार्ध-विप्रेक्षितानि वलय-रशना-परामर्श: ।
नीवी नाभ्या: संस्पर्शनम् च कार्यम् द्वितीये तु ॥ १७६ ॥

**अन्वय : –** द्वितीये तु आकेकरार्धविप्रेक्षितानि वलयरशनापरामर्श: नीवी नाभ्या: संस्पर्शनं च कार्यम् ।
(आकेकरमिति विचलमविचलं विप्रेक्षितम् । - अ . भा . )

**अर्थ –** कामाच्या या दुसऱ्या अवस्थेमध्ये, नायिकेने अर्धवट अशा आकेकरा दृष्टीने पहावे, कंबरपट्टेला हात लावत रहावे, नीऱ्या नीट कराव्या आणि नाभीला वारंवार स्पर्श करावा .
(विचलित किंवा अविचलित दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण नजरेने पाहणे म्हणजे आकेकरदृष्टी होय . - अ . भा . )

**❖ अनुस्मृति ❖**

**मुहुर्मुहुर्निःश्वसितैर्मनोरथविचिन्तनैः ।**
**प्रद्वेषाच्चान्यकार्याणामनुस्मृतिरुदाहृता ॥ १७७ ॥**

**पदच्छेद :–** मुहु: मुहु: नि:श्वसितै: मनोरथ-विचिन्तनै: ।
प्रद्वेषात् च अन्यकार्याणाम् अनुस्मृति: उदाहृता ॥ १७७ ॥

**अन्वय : –** मुहु: मुहु: नि:श्वसितै: मनोरथविचिन्तनै: अन्यकार्याणाम् च प्रद्वेषात् अनुस्मृति: उदाहृता ।

**अर्थ –** वारंवार नि:श्वास टाकणे, स्वत:च्या मनोरथांचा विचार करणे, अन्य कार्यांचा द्वेष करणे याद्वारे 'अनुस्मृति' ही कामाची तिसरी अवस्था व्यक्त करावी .

**नैवासने न शयने धृतिमुपलभते स्वकर्मणि विहस्ता ।**
**तच्चिन्तोपगतत्वात् तृतीयमेवं प्रयुञ्जीत ॥ १७८ ॥**

**पदच्छेद :–** न एव आसने न शयने धृतिम् उपलभते स्वकर्मणि विहस्ता |
तत्-चिन्ता-उपगतत्वात् तृतीयम् एवम् प्रयुञ्जीत || १७८ ||

**अन्वय : –** तच्चिन्तोपगतत्वात् स्वकर्मणि विहस्ता न आसने न शयने धृतिम् एव उपलभते एवं तृतीयं (कामं) प्रयुञ्जीत |

**अर्थ –** प्रियकराची सतत आठवण येत असल्यामुळे स्वत:ची कामे करू न शकणारी ती नायिका आसनावर नीट बसूही शकत नाही आणि पलंगावर झोपूही शकत नाही . अशा प्रकारे 'अनुस्मृति' ही कामाची तिसरी अवस्था दर्शवावी .

**❖ गुणकीर्तन ❖**

**अङ्गप्रत्यङ्गलीलाभिर्वाक्चेष्टाहसितेक्षितै: |**
**नास्त्यन्य: सदृशस्तेनेत्येतत् स्याद्गुणकीर्तनम् || १७९ ||**

**पदच्छेद :–** अङ्ग-प्रत्यङ्ग-लीलाभि : वाक्-चेष्टा-हसित-ईक्षितै : |
न अस्ति अन्य : सदृश : तेन इति एतत् स्यात् गुणकीर्तनम् || १७९ ||

**अन्वय : –** अङ्गप्रत्यङ्गलीलाभि: वाक्चेष्टाहसितेक्षितै: तेन सदृश: अन्य: न अस्ति इति एतत् गुणकीर्तनम् स्यात् |

**अर्थ –** अंगप्रत्यंगांच्या विविध लालित्यपूर्ण चेष्टा, बोलण्याची छटा, हास्य आणि नेत्रकटाक्ष यांद्वारे प्रियकरासमान या जगात दुसरे कोणीच नाही असे बोलणे, यास गुणकीर्तन असे म्हणतात . ही कामाची चौथी अवस्था होय .

**गुणकीर्तनोल्लुकसनैरश्रुस्वेदापमार्जनैश्चापि |**
**दूत्यविरहविस्रम्भैरभिनययोगश्चतुर्थे तु || १८० ||**

**पदच्छेद :–** गुणकीर्तन-उल्लुकसनै : अश्रुस्वेद-अपमार्जनै : वा अपि |
दूत्यविरह-विस्रम्भै : अभिनययोग : चतुर्थे तु || १८० ||

**अन्वय : –** चतुर्थे तु गुणकीर्तनोल्लुकसनै: अश्रुस्वेदापमार्जनै: अपि वा दूत्यविरहविस्रम्भै: अभिनययोग : (कार्य :) | (दूत्या अविरह इति समास : | – अ . भा . )

**अर्थ** – कामाच्या चौथ्या अवस्थेमध्ये प्रियकराच्या गुणांची प्रशंसा केली जाते. अश्रू व घाम पुसला जातो. 'विरह होणार नाही' असा विश्वास दूतींद्वारे निर्माण केला जातो आणि मिलनाविषयी आश्वस्त केले जाते.

❖ उद्वेग ❖

**आसने शयने चापि न तुष्यति न तिष्ठति |**
**नित्यमेवोत्सुका च स्यादुद्वेगस्थानमाश्रिता || १८१ ||**

**पदच्छेद :–** आसने शयने च अपि न तुष्यति न तिष्ठति |
नित्यम् एव उत्सुका च स्यात् उद्वेगस्थानम् आश्रिता || १८१ ||

**अन्वय :–** आसने अपि च शयने न तुष्यति न तिष्ठति | एव च नित्यम् उत्सुका उद्वेगस्थानम् आश्रिता स्यात् |

**अर्थ** – 'उद्वेग' नामक कामाच्या पाचव्या अवस्थेमध्ये नायिका आसनावर बसत नाही किंवा पलंगावर निजताना आनंदी होत नाही. ती प्रियकराला भेटण्यास कायम उत्सुक असते.

**चिन्तानिःश्वासखेदेन हृद्दाहाभिनयेन च |**
**कुर्यात्तदेवमत्यन्तमुद्वेगाभिनयेन च || १८२ ||**

**पदच्छेद :–** चिन्ता-निःश्वास-खेदेन हृद्-दाह-अभिनयेन च |
कुर्यात् तत् एवम् अत्यन्तम् उद्वेग-अभिनयेन च || १८२ ||

**अन्वय :–** तत् चिन्तानिःश्वासखेदेन हृद्दाहाभिनयेन एवम् च अत्यन्तम् उद्वेगाभिनयेन च कुर्यात् |
(रुदितनिःश्वासितादिः पूर्वावस्थाया योगादिह पुनस्ताः | - अ. भा. )

**अर्थ** – चिंता, निःश्वास, खेद आणि हृदयातील दाह, काळीज धडधडणे यांद्वारे 'उद्वेग' अवस्थेचा अत्यंत भावपूर्ण अभिनय करावा.
(कामाच्या पूर्वावस्थेशी संबंध असल्याने रडणे, निःश्वास टाकणे इत्यादी कृतींची पुनरावृत्ती झाली आहे. - अ. भा. )

❖ विलाप ❖

**इह स्थित इहासीन इह चोपगतो मया |**
**इति तैस्तैर्विलपितैर्विलापं संप्रयोजयेत् || १८३ ||**

**पदच्छेद :–** इह स्थित : इह आसीन : इह च उपगत : मया |
इति तै : तै : विलपितै : विलापम् संप्रयोजयेत् || १८३ ||

**अन्वय : –** "इह स्थित :, इह आसीन :, इह च मया उपगत :" इति तै : तै : विलपितै : विलापम् संप्रयोजयेत् |

**अर्थ –** "इथे माझा प्रियकर उभा होता, इथे बसला होता, आणि इथे तो मला भेटला होता ." अशा अनेक दु:ख व्यक्त करणाऱ्या शब्दांद्वारे 'विलापाचा' अभिनय करावा .

**उद्विग्नात्यर्थमौत्सुक्यादधृत्या च विलापिनी |**
**ततस्ततश्च भ्रमति विलापस्थानमाश्रिता || १८४ ||**

**पदच्छेद :–** उद्विग्ना अत्यर्थम् औत्सुक्यात् अधृत्या च विलापिनी |
तत : तत : च भ्रमति विलापस्थानम् आश्रिता || १८४ ||

**अन्वय : –** अत्यर्थम् औत्सुक्यात् अधृत्या च उद्विग्ना विलापिनी विलापस्थानम् आश्रिता तत : तत : च भ्रमति |

**अर्थ –** प्रियकराला भेटण्यासाठी अत्यंत उत्सुक झाल्यामुळे अधीर व उद्विग्न होणाऱ्या नायिकेचा धीर सुटतो आणि व्याकुळतेने ती इकडे तिकडे फिरत राहते, या अवस्थेला 'विलाप' अशी संज्ञा आहे .

❖ उन्माद ❖

**तत्संश्रितां कथां युङ्क्ते सर्वावस्थागतापि हि |**
**पुंस: प्रद्वेष्टि चाप्यन्यानुन्माद: संप्रकीर्तित: || १८५ ||**

**पदच्छेद :–** तत् संश्रिताम् कथाम् युङ्क्ते सर्वावस्थागता अपि हि |
पुंस : प्रद्वेष्टि च अपि अन्यान् उन्माद : संप्रकीर्तित : || १८५ ||

**अन्वय:** – तत् हि सर्वावस्थागता अपि संश्रिताम् कथाम् युङ्क्ते | अन्यान् पुंस: प्रद्वेष्टि अपि च उन्माद: संप्रकीर्तित: |
(सर्वावस्थागतापीति गुरुजनसन्निधौ अपि, अनेन उन्मादत्वं स्फुटयति | - अ . भा . )

**अर्थ** – सर्व अवस्थांमध्ये म्हणजेच गुरुजनांजवळ गेले असतानाही ती फक्त प्रियकराविषयीचेच बोलत राहते, इतर पुरुषाचा द्वेष करते. यास 'उन्माद' असे म्हटले आहे .

**तिष्ठत्यनिमिषदृष्टिर्दीर्घं नि:श्वसिति गच्छति ध्यानम् |**
**रोदिति विहारकाले नाट्यमिदं स्यात्तथोन्मादे || १८६ ||**

**पदच्छेद:** – तिष्ठति अनिमिषदृष्टि: दीर्घम् नि:श्वसिति गच्छति ध्यानम् |
रोदिति विहारकाले नाट्यम् इदम् स्यात् तथा उन्मादे || १८६ ||

**अन्वय:** – अनिमिषदृष्टि: तिष्ठति दीर्घम् नि:श्वसिति ध्यानम् गच्छति तथा विहारकाले रोदिति इदम् नाट्यम् उन्मादे स्यात् |
(विहारकाल इति क्रीडोचितेषु कालेषु रोदितीत्यर्थ: | - अ . भा . )

**अर्थ** – अनिमेष दृष्टीने एकटक ती त्याची वाट पहाते . दीर्घ नि:श्वास टाकून त्याचेच ध्यान करते . तसेच विहार करण्याच्या वेळी रडत राहते . अशाप्रकारे 'उन्माद' या अवस्थेचा अभिनय केला जातो .

### ❖ व्याधि ❖

**सामदानार्थसंभोगै: काम्यै: संप्रषणैरपि |**
**सर्वैर्निराकृतै: पश्चाद्व्याधि: समुपजायते || १८७ ||**

**पदच्छेद:** – साम-दान-अर्थ-संभोगै: काम्यै: संप्रषणै: अपि |
सर्वै: निराकृतै: पश्चात् व्याधि: समुपजायते || १८७ ||

**अन्वय:** – सामदानार्थसंभोगै: काम्यै: संप्रषणै: सर्वै: अपि निराकृतै: पश्चात् व्याधि: समुपजायते |

**अर्थ** – साम, दान, अर्थ, संभोगानंतर, उपायांद्वारे काम्यवस्तु पाठवूनही जेव्हा हे सर्व उपाय व्यर्थ होतात तेव्हा मानखंडन झाल्यामुळे 'व्याधि' निर्माण होतो .

**मुह्यति हृदयं क्वापि प्रयाति शिरसश्च वेदना तीव्रा |**
**न धृतिं चाप्युपलभते ह्यष्टममेवं प्रयुञ्जीत || १८८ ||**

**पदच्छेद :–** मुह्यति हृदयम् क्व अपि प्रयाति शिरस : च वेदना तीव्रा |
न धृतिम् च अपि उपलभते हि अष्टमम् एवम् प्रयुञ्जीत || १८८ ||
(मुह्यतीत्यत्र हेतु : यतो हृदयं नावतिष्ठति | – अ . भा . )

**अन्वय : –** क्व अपि हृदयम् न मुह्यति, शिरस : वेदना तीव्रा च प्रयाति | अपि च धृतिम् न उपलभते एवम् हि अष्टमम् (व्याधिम्) प्रयुञ्जीत |

**अर्थ –** हृदय कुठेच रमत नाही, डोकेदुखी तीव्र होते, कोणत्याच गोष्टीत चैन पडत नाही, अशाप्रकारे कामाच्या आठव्या अवस्थेचा म्हणजेच व्याधीचा अभिनय करावा .

**❖ जडता ❖**

**पृष्टा न किञ्चित् प्रब्रूते न शृणोति न पश्यति |**
**हाकष्टवाक्या तूष्णीका जडतायां गतस्मृति: || १८९ ||**

**पदच्छेद :–** पृष्टा न किञ्चित् प्रब्रूते न शृणोति न पश्यति |
हा कष्टवाक्या तूष्णीका जडतायाम् गतस्मृति : || १८९ ||

**अन्वय : –** पृष्टा किञ्चित् न प्रब्रूते न शृणोति न पश्यति | जडतायाम् (सा) हा कष्टवाक्या तूष्णीका गतस्मृति: (भवति) |
(हा कष्टमिति एतदव्यतिरेकेण तूष्णीका एतदेव भाष्यते इति यावत् | – अ . भा . )

**अर्थ –** विचारल्यावर काहीच उत्तर देत नाही, काहीही ऐकत नाही, समोरचे पाहत नाही, 'हां' एवढेच कष्टपूर्वक बोलून गप्प बसते . अशा रीतीने 'जडता' या अवस्थेत नायिकेला सर्वच गोष्टींचे विस्मरण होते .

**अकाण्डे दत्तहुंकारा तथा प्रशिथिलाङ्गिका |**
**श्वासग्रस्तानना चैव जडताभिनये भवेत् || १९० ||**

**पदच्छेद :–** अकाण्डे दत्त-हुंकारा तथा प्रशिथिल-अङ्गिका |
श्वासग्रस्त-आनना च एव जडता अभिनये भवेत् || १९० ||

**अन्वय : –** अकाण्डे दत्तहुंकारा तथा प्रशिथिलाङ्गिका श्वासग्रस्तानना एव च अभिनये जडता भवेत् |

**अर्थ –** कोणतेही कारण नसताना नायिका हुंकार देते, अंग सैल सोडते, तोंडाने हळूहळू श्वास घेते . अशाप्रकारे 'जडता' या अवस्थेचा अभिनय करावा .

**❖ मरण ❖**

**सर्वै: कृतै: प्रतीकारैर्यदि नास्ति समागम: |**
**कामाग्निना प्रदीप्ताया जायते मरणं तत: || १९१ ||**

**पदच्छेद :–** सर्वै : कृतै : प्रतीकारै : यदि न अस्ति समागम : |
कामाग्निना प्रदीप्ताया : जायते मरणम् तत : || १९१ ||

**अन्वय : –** सर्वै : कृतै : प्रतीकारै : यदि समागम : न अस्ति तत : प्रदीप्ताया : कामाग्निना मरणम् जायते |
(प्रतीकारैरिति समागमोपायैरित्यर्थ : | – अ . भा . )

**अर्थ –** समागमासाठी केल्या जाणाऱ्या सर्व उपायानंतरही जेव्हा प्रियकराशी मिलन होत नाही तेव्हा प्रज्वलित कामाग्नीमुळे नायिका 'मरणासन्न' अवस्थेत पोचते, म्हणजेच मृत्युसमान तिची अवस्था होते .
(भरतमुनींनी अत्यंत योग्य असा 'मरणं जायते' असा शब्दप्रयोग केलेला आहे . त्यानुसार 'मरण' ही अवस्था निर्माण होते . इथे नायिका मरण पावते असा अर्थ घेऊ नये . )

**एवं स्थानानि कार्याणि कामतन्त्रं समीक्ष्य तु |**
**अप्राप्तौ यानि काम्यस्य वर्जयित्वा तु नैधनम् || १९२ ||**

**पदच्छेद :–** एवम् स्थानानि कार्याणि कामतन्त्रम् समीक्ष्य तु |
अप्राप्तौ यानि काम्यस्य वर्जयित्वा तु नैधनम् || १९२ ||

**अन्वय :** – एवम् कामतन्त्रम् समीक्ष्य स्थानानि कार्याणि | काम्यस्य तु अप्राप्तौ सति नैधनम् वर्जयित्वा यानि कार्याणि |

**अर्थ** – अशाप्रकारे कामतंत्राचा विचार करून सर्व अवस्थांचा अभिनय करावा. प्रियकराशी भेट झाली नाही तर निधन सोडून सर्व अवस्थांचा अभिनय करावा.

**❖ कामी स्त्रीपुरुषांचा अभिनय ❖**

**विविधैः पुरुषोऽप्येवं विप्रलम्भसमुद्भवैः |**
**भावैरेतानि कामस्य नानारूपाणि योजयेत् || १९३ ||**

**पदच्छेद :** – विविधैः पुरुषः अपि एवम् विप्रलम्भ-समुद्भवैः |
भावैः एतानि कामस्य नानारूपाणि योजयेत् || १९३ ||

**अन्वय :** – एवम् पुरुषः अपि विप्रलम्भसमुद्भवैः विविधैः भावैः कामस्य एतानि नानारूपाणि योजयेत् |

**अर्थ** – अशाप्रकारे पुरुषानेही विप्रलंभ शृंगारातून उत्पन्न झालेल्या विविध भावांद्वारे कामाच्या या अवस्थांचा अभिनय करावा.

**एवं कामयमानानां स्त्रीणां नृणामथापि वा |**
**सामान्यगुणयोगेन युञ्जीताभिनयं बुधः || १९४ ||**

**पदच्छेद :** – एवम् कामयमानानाम् स्त्रीणाम् नृणाम् अथ अपि वा |
सामान्यगुण-योगेन युञ्जीत अभिनयम् बुधः || १९४ ||

**अन्वय :** – एवम् कामयमानानाम् स्त्रीणाम् नृणाम् वा सामान्यगुणयोगेन बुधः अभिनयम् युञ्जीत |

**अर्थ** – याप्रमाणे बुद्धिमान नटाने कामी स्त्री किंवा पुरुषांच्या सामान्य गुणांद्वारे वरील अवस्थांचा अभिनय करावा.

**चिन्तानिःश्वासखेदेन हृद्दाहाभिनयेन च |**
**तथानुगमनाच्चापि तथैवाध्वनिरीक्षणात् || १९५ ||**

**आकाशवीक्षणाच्चापि तथा दीनप्रभाषणात् |**
**स्पर्शनान्मोटनाच्चापि तथा सापाश्रयाश्रयात् || १९६ ||**
**एभिर्नानाश्रयोत्पन्नैर्विप्रलम्भसमुद्भवैः |**
**कामस्थानानि सर्वाणि भूयिष्ठं संप्रयोजयेत् || १९७ ||**

**पदच्छेद :-** चिन्ता-निःश्वास-खेदेन हृद्-दाह-अभिनयेन च |
तथा अनुगमनात् च अपि तथा एव अध्व-निरीक्षणात् || १९५ ||
आकाश-वीक्षणात् च अपि तथा दीन-प्रभाषणात् |
स्पर्शनात् मोटनात् च अपि तथा सा अपाश्रय-आश्रयात् || १९६ ||
एभिः नानाश्रय-उत्पन्नैः विप्रलम्भ-समुद्भवैः |
काम-स्थानानि सर्वाणि भूयिष्ठम् संप्रयोजयेत् || १९७ ||

**अन्वय :-** चिन्तानिःश्वासखेदेन हृद्दाहाभिनयेन अनुगमनात् अध्वनिरीक्षणात् आकाशवीक्षणात् दीनप्रभाषणात् स्पर्शनात् मोटनात् अपाश्रयाश्रयात् एभिः नानाश्रयोत्पन्नैः विप्रलम्भसमुद्भवैः सर्वाणि कामस्थानानि सा भूयिष्ठम् संप्रयोजयेत् |

**अर्थ** - चिंता, निःश्वास, खेद, हृदयाग्नि यांद्वारे, तसेच प्रियकराच्या मागे मागे जाणे, प्रियकर येणार म्हणून त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसणे, आकाशाकडे पाहणे, दीनपणे बोलणे, स्पर्श करणे, अंग शिथिल करणे यांद्वारे तसेच अनेक गोष्टींचा आश्रय घेणे अथवा न घेणे इत्यादी अनेक कृतींचा आश्रय घेत विप्रलंभामुळे निर्माण होणाऱ्या सर्व कामाच्या अवस्थांचा नायिकेने चांगल्या रीतीने अभिनय करावा.

**स्रजो भूषणगन्धांश्च गृहाण्युपवनानि च |**
**कामाग्निना दह्यमानः शीतलानि निषेवते || १९८ ||**

**पदच्छेद :-** स्रजः भूषण-गन्धान् च गृहाणि उपवनानि च |
कामाग्निना दह्यमानः शीतलानि निषेवते || १९८ ||

**अन्वय :-** कामाग्निना दह्यमानः शीतलानि स्रजः भूषणगन्धान् च गृहाणि उपवनानि च निषेवते |

**अर्थ** - कामाग्निने त्रासलेल्या नटाने थंड माळा, आभूषणे, गंध, घरे व उपवने यांचा उपभोग घ्यावा.

**प्रदह्यमानः कामार्तो बहुस्थानसमर्दितः |**
**प्रेषयेत्कामतो दूतीमात्मावस्थाप्रदर्शिनीम् || १९९ ||**

**पदच्छेदः –** प्रदह्यमानः कामार्तः बहुस्थानसमर्दितः |
प्रेषयेत् कामतः दूतीम् आत्मावस्था-प्रदर्शिनीम् || १९९ ||

**अन्वयः –** कामतः प्रदह्यमानः कामार्तः बहुस्थानसमर्दितः आत्मावस्थाप्रदर्शिनीम् दूतीम् प्रेषयेत् |

**अर्थ –** कामावस्थाने पीडित असलेल्या, प्रेमाने व्याकुळ झालेल्या, गुप्त ठिकाणी भेटून नटाने स्वतःची अवस्था सांगून दूतीला आपल्या प्रेयसीकडे पाठवावे .

**❖ दूतीद्वारे कामुकसंदेश ❖**

**सन्देशं चैव दूत्यास्तु प्रदद्यान्मदनाश्रयम् |**
**तस्येयं समवस्थेति कथयेद्विनयेन सा || २०० ||**

**पदच्छेदः –** सन्देशम् च एव दूत्याः तु प्रदद्यात् मदनाश्रयम् |
तस्य इयम् समवस्था इति कथयेत् विनयेन सा || २०० ||

**अन्वयः –** एव च मदनाश्रयम् सन्देशम् दूत्याः तु प्रदद्यात् | सा तस्य इयम् समवस्था इति विनयेन कथयेत् |

**अर्थ –** नटाने दूतीद्वारे आपल्या प्रेयसीकडे कामुक संदेश पाठवावा आणि दूतीनेही नायकाच्या त्या अवस्थेचे जसेच्या तसे वर्णन विनयपूर्वक सांगावे .

**अथावेदितभावार्थो रत्युपायं विचिन्तयेत् |**
**अयं विधिर्विधानज्ञैः कार्यः प्रच्छन्नकामिते || २०१ ||**

**पदच्छेदः –** अथ आवेदित-भावार्थः रत्युपायम् विचिन्तयेत् |
अयम् विधिः विधानज्ञैः कार्यः प्रच्छन्न-कामिते || २०१ ||

**अन्वयः –** अथ आवेदितभावार्थः रत्युपायम् विचिन्तयेत् | विधानज्ञैः प्रच्छन्नकामिते अयम् विधिः कार्यः |

**अर्थ** – यानंतर स्वत:चे मनोभाव दूतीद्वारे समजावून सांगितल्यानंतर रतिविषयी उपायांचा विचार करावा . कामोपचाराचा हा विधी विद्वानांद्वारे गुप्तपणे करण्यात यावा .

**❖ सम्यक् अभ्यन्तरविधि ❖**

**विधिं राजोपचारस्य पुनर्वक्ष्यामि तत्त्वत: |**
**अभ्यन्तरगतं सम्यक् कामतन्त्रसमुत्थितम् || २०२ ||**

**पदच्छेद: –** विधिम् राजोपचारस्य पुन: वक्ष्यामि तत्त्वत: |
अभ्यन्तर-गतम् सम्यक् कामतन्त्र-समुत्थितम् || २०२ ||

**अन्वय: –** कामतन्त्रसमुत्थितम् अभ्यन्तरगतम् राजोपचारस्य सम्यक् विधिम् पुन: तत्त्वत: वक्ष्यामि |

**अर्थ** – कामतंत्राने सांगितलेला, अंत:पुरात केला जाणारा राजोपचाराचा हा सुयोग्य आभ्यन्तर विधि आता तत्त्वश: मी सांगणार आहे .

**सुखदु:खकृतान् भावान् नानाशीलसमुत्थितान् |**
**यान्यान् प्रकुरुते राजा तान्स्तान् लोकोऽनुवर्तते || २०३ ||**

**पदच्छेद: –** सुखदु:ख-कृतान् भावान् नानाशील-समुत्थितान् |
यान् यान् प्रकुरुते राजा तान् तान् लोक: अनुवर्तते || २०३ ||

**अन्वय: –** सुखदु:खकृतान् नानाशीलसमुत्थितान् यान् यान् भावान् राजा प्रकुरुते तान् तान् लोक: अनुवर्तते |

**अर्थ** – सुखामुळे किंवा दु:खामुळे केले जाणारे, विविध स्वभावातून उत्पन्न होणारे जे जे भाव राजा प्रकट करतो, त्या त्या भावांचे लोक अनुकरण करतात .

**न दुर्लभा: पार्थिवानां स्त्र्यर्थमाज्ञाकृता गुणा: |**
**दाक्षिण्यात्तु समुद्भूत: कामो रतिकरो भवेत् || २०४ ||**

**पदच्छेद: –** न दुर्लभा: पार्थिवानाम् स्त्र्यर्थम् आज्ञाकृता: गुणा: |
दाक्षिण्यात् तु समुद्भूत: काम: रतिकर: भवेत् || २०४ ||

**अन्वय :** – पार्थिवानाम् आज्ञाकृता: गुणा: स्त्र्यर्थम् न दुर्लभा: | दाक्षिण्यात् तु समुद्भूत: काम: रतिकर : भवेत् |

**अर्थ** – स्त्रीप्राप्तीसाठी राजांमध्ये आज्ञाधारीपणा किंवा विनयादी गुण हे दुर्लभ नाहीत. विनयभावातून निर्माण होणारा काम हा अधिक रति निर्माण करणारा ठरतो.

**बहुमानेन देवीनां वल्लभानां भयेन च |**
**प्रच्छन्नकामितं राज्ञा कार्यं परिजनं प्रति || २०५ ||**

**पदच्छेद :** – बहुमानेन देवीनाम् वल्लभानाम् भयेन च |
प्रच्छन्न-कामितम् राज्ञा कार्यम् परिजनम् प्रति || २०५ ||

**अन्वय :** – देवीनाम् बहुमानेन वल्लभानाम् च भयेन राज्ञा परिजनम् प्रति प्रच्छन्नकामितम् कार्यम् |

**अर्थ** – देवींविषयी म्हणजेच पट्टराणींविषयी पुष्कळ आदर असल्यामुळे आणि प्रेयसींच्या भीतीमुळे राजाने लपूनछपून दासींसोबत कामक्रीडा करावी.

**यद्यप्यस्ति नरेन्द्राणां कामतन्त्रमनेकधा |**
**प्रच्छन्नकामितं यत्तु तद्वि रतिकरं भवेत् || २०६ ||**

**पदच्छेद :** – यद्यपि अस्ति नरेन्द्राणाम् कामतन्त्रम् अनेकधा |
प्रच्छन्न-कामितम् यत् तु तत् वै रतिकरम् भवेत् || २०६ ||

**अन्वय :** – यद्यपि नरेन्द्राणाम् कामतन्त्रम् अनेकधा अस्ति (तथापि) यत् तु प्रच्छन्नकामितम् तत् रतिकरम् भवेत् |
(अनेकधेति विवाहितावरुद्धेत्यादिनेत्यर्थ: | – अ. भा.)

**अर्थ** – खरं तर कामतंत्राविषयी राजांसाठी अनेक प्रकारचे नियम असले तरीही लपूनछपून केलेली कामक्रीडा ही अधिक रति निर्माण करणारी ठरते.

**यद्वामाभिनिवेशित्वं यतश्च विनिवार्यते |**
**दुर्लभत्वं च यन्नार्या: सा कामस्य परा रति: || २०७ ||**

**पदच्छेद :** – यत् वाम-अभिनिवेशित्वम् यत : च विनिवार्यते |
दुर्लभत्वम् च यत् नार्या : सा कामस्य परा रति : || २०७ ||

**अन्वय:** – नार्या: यत् वामाभिनिवेशित्वं यत: च विनिवार्यते तस्या: यत् दुर्लभत्वम् सा कामस्य परा रति:|

**अर्थ** – नायिकेचा हट्टी स्वभाव आणि प्रियकरापासून तिचे दूर राहणे, या ज्या दुर्लभ गोष्टी आहेत त्यामुळे कामविषयक उत्तम रती निर्माण होते.

**राज्ञामन्त:पुरजने दिवासंभोग इष्यते |**
**वासोपचारो यश्चैषां स रात्रौ परिकीर्तित: || २०८ ||**

**पदच्छेद:** – राज्ञाम् अन्त:पुरजने दिवासंभोग: इष्यते |
वासोपचार: य: च एषाम् स: रात्रौ परिकीर्तित: || २०८ ||

**अन्वय:** – राज्ञाम् अन्त:पुरजने दिवासंभोग: इष्यते | य: च एषाम् वासोपचार: स: रात्रौ परिकीर्तित:|

(संभोग: परस्परावलोकनप्रणयकलहसंगीतकादि | – अ. भा.)

(अन्त:पुरजनोऽत्र ऊढा, पुनर्भू:, अवरुद्धगणिका, कन्यका, प्रेष्याविषयं तु प्रच्छन्नकामितमुक्तम् | – अ. भा. )

**अर्थ** – राजांचा अंत:पुरातील स्त्रियांसह दिवसा होणारा 'संभोग' योग्य मानला गेला आहे आणि त्यांचा जो वासोपचार म्हणजेच वेश्या इत्यादींसह होणारा बाह्योपचार तो रात्रीच होणे योग्य आहे असे सांगितले गेले आहे.

(याठिकाणी 'संभोग' म्हणजे एकमेकांना पाहणे, प्रणय, कलह, संगीत इत्यादी होय. – अ. भा.)

(याठिकाणी अन्त:पुरातील स्त्रिया म्हणजे विवाहिता, पुनर्विवाहित, अडवलेली गणिका, कुमारिका, दासी यांसह राजाने लपूनछपूनच रतिक्रीडा करावी. – अ. भा.)

**❖ वासक वृत्तान्त ❖**

**परिपाट्यां फलार्थे वा नवे प्रसव एव वा |**
**दु:खे चैव प्रमोदे च षडेते वासका: स्मृता: || २०९ ||**

**पदच्छेद :–** परिपाट्याम् फलार्थे वा नवे प्रसवे एव वा |
दु:खे च एव प्रमोदे च षड्एते वासका : स्मृता : || २०९ ||

**अन्वय : –** परिपाट्याम् फलार्थे वा नवे प्रसवे एव वा दु:खे एव च प्रमोदे च एते षड्वासका : स्मृता : | (परिपाटिर्यथाकल्पितानपूर्वा यस्या: एकेन भिन्नेन वार:, अस्या द्वाभ्याम् इत्यादि | तदपवादमाह फलार्थ इति ऋतौ इति यावत् | नव इति नवत्वे प्रसवे वृत्ते चिरविरहखिन्ना सुखायितं, दु:खे तदीयबन्धुव्यापत्त्या दु:खिता आश्वासनीयेति | प्रमोद इति तदीयपुत्रोत्सवादौ 'उत्सवो हि माननीय' इत्युक्तम् | वासयति तत्र स्थाने रात्रमिति वास : | अ . भा . )

**अर्थ –** परिपाटी म्हणजेच ऋतुमती असताना, पुत्रप्राप्तीची इच्छा असताना, स्वपुत्रप्राप्तीमुळे आनंदित झाले तरीही दीर्घकाळच्या विरहाने दु:खी झाले असताना, भावावरील विशिष्ट संकटामुळे दु:खी झालेल्या जेव्हा नायिकेला आश्वस्त करण्याची गरज असते अशा वेळी, आनंदाच्या क्षणी आणि उत्सव साजरा करायचा असेल, अशा सहा प्रसंगामध्ये किंवा परिस्थितीमध्ये नायकाने बाह्यस्त्रीसह रात्रीच्या वेळी रति करावी .

(वासं करोति स वासक : याठिकाणी वास म्हणजेच रात्रीच्या वेळी होणारी रतिक्रीडा . ती करणारा नायक तो वासक . वरील श्लोकामध्ये सहा प्रकारच्या वासकांद्वारे म्हणजेच नायकांद्वारे बाह्यस्त्रीसह होणाऱ्या रतिक्रीडेच्या सहा कारणांचेही यथायोग्य वर्णन केले आहे . )

**उचिते वासके स्त्रीणामृतुकालेऽपि वा नृपै : |**
**प्रेष्याणामथवेष्टानां कार्यं चैवोपसर्पणम् || २१० ||**

**पदच्छेद :–** उचिते वासके स्त्रीणाम् ऋतुकाले अपि वा नृपै : |
प्रेष्याणाम् अथवा इष्तानाम् कार्यम् च एव उपसर्पणम् || २१० ||

**अन्वय : –** ऋतुकाले उचिते वासके अपि वा प्रेष्याणाम् अथवा इष्तानाम् एव स्त्रीणाम् च नृपै: उपसर्पणं कार्यम् |

**अर्थ –** ऋतुकाळी किंवा उचित प्रसंग असताना संदेशवाहिका किंवा इष्ट स्त्रिया यांच्याशी राजाने अभिसार करावा .

❖ अष्ट नायिका ❖

**तत्र वासकसज्जा च विरहोत्कण्ठितापि वा |**
**स्वाधीनभर्तृका चापि कलहान्तरितापि वा ||२११||**
**खण्डिता विप्रलब्धा वा तथा प्रोषितभर्तृका |**
**तथाभिसारिका चैव ज्ञेयास्त्वष्टौ तु नायिका: ||२१२||**

**पदच्छेद:** – तत्र वासकसज्जा च विरहोत्कण्ठिता अपि वा |
स्वाधीनभर्तृका च अपि कलहान्तरिता अपि वा ||२११||
खण्डिता विप्रलब्धा वा तथा प्रोषितभर्तृका |
तथा अभिसारिका च एव ज्ञेया: तु अष्टौ तु नायिका: ||२१२||

**अन्वय:** – तत्र वासकसज्जा विरहोत्कण्ठिता स्वाधीनभर्तृका कलहान्तरिता खण्डिता विप्रलब्धा प्रोषितभर्तृका तथा च अभिसारिका तु अष्टौ नायिका: तु ज्ञेया: |

**अर्थ** – याठिकाणी वासकसज्जा, विरहोत्कंठिता, स्वाधीनपतिका, कलहांतरिता, खंडिता, विप्रलब्धा, प्रोषितभर्तृका, अभिसारिका या आठ प्रकारच्या नायिका जाणून घ्याव्यात.

❖ १. वासकसज्जा ❖

**उचिते वासके या तु रतिसंभोगलालसा |**
**मण्डनं कुरुते हृष्टा सा वै वासकसज्जिका ||२१३||**

**पदच्छेद:** – उचिते वासके या तु रतिसंभोग-लालसा |
मण्डनम् कुरुते हृष्टा सा वै वासकसज्जिका ||२१३||

**अन्वय:** – उचिते वासके या तु रतिसंभोगलालसा मण्डनम् कुरुते सा हृष्टा वासकसज्जिका |
(एता: क्रमेण लक्षयति उचिते वासक इत्यादिना | उचित: पूर्वोक्तेन नयेनायात: | लालसा साभिलाषा स्वाभिलाषा – अ.भा.)

**अर्थ** – योग्य शयनकक्षामध्ये प्रियकराची वाट पाहत रतिसंभोगाच्या लालसेने जी नायिका स्वत:स सजविते आणि आनंदित होते ती 'वासकसज्जा' नायिका होय.

### ❖ २. विरहोत्कंठिता ❖

**अनेककार्यव्यासङ्गाद्यस्या नागच्छति प्रिय: |**
**तदनागतदु:खार्ता विरहोत्कण्ठिता तु सा ||२१४||**

**पदच्छेद:** – अनेक-कार्य-व्यासङ्गात् अस्या: न आगच्छति प्रिय: |
तत् अनागत-दु:खार्ता विरहोत्कण्ठिता तु सा || २१४ ||

**अन्वय:** – अनेककार्यव्यासङ्गात् अस्या: प्रिय: न आगच्छति तत् अनागतदु:खार्ता सा तु विरहोत्कण्ठिता |

**अर्थ** – विविध कार्यामध्ये व्यस्त असल्याकारणाने जिचा प्रियकर तिच्याकडे परत येत नाही आणि तो न आल्यामुळे जी दु:खाने अतिशय व्याकुळ होते, तिला 'विरहोत्कंठिता' नायिका असे म्हणतात .

### ❖ ३. स्वाधीनपतिका ❖

**सुरतातिरसैर्बद्धो यस्या: पार्श्वे तु नायक: |**
**सान्द्रामोदगुणप्राप्ता भवेत् स्वाधीनभर्तृका || २१५ ||**

**पदच्छेद:** – सुरतातिरसै: बद्ध: यस्या: पार्श्वे तु नायक: |
सान्द्रा-मोद-गुण-प्राप्ता भवेत् स्वाधीनभर्तृका || २१५ ||

**अन्वय:** – सुरतातिरसै: यस्या: नायक: तु पार्श्वे बद्ध:(सा) सान्द्रामोदगुणप्राप्ता स्वाधीनभर्तृका भवेत्|
(आमोदगुणो हर्ष: सौभाग्याभिमानश्च | - अ . भा . )

**अर्थ** – सुरतक्रीडेचे अतिरसपान केल्याने जिचा नायक हा तिच्या शेजारीच अडकून पडतो, अशी पुष्कळ आनंद सौभाग्य अभिमान या गुणांनी युक्त असलेल्या नायिकेला 'स्वाधीनपतिका' म्हणतात .

### ❖ ४. कलहांतरिता ❖

**ईर्ष्याकलहनिष्क्रान्तो यस्या नागच्छति प्रिय: |**
**सामर्षवशसंप्राप्ता कलहान्तरिता भवेत् || २१६ ||**

**पदच्छेद:** – ईर्ष्या-कलह-निष्क्रान्त: यस्या: न आगच्छति प्रिय: |
सा आमर्ष-वश-संप्राप्ता कलहान्तरिता भवेत् || २१६ ||

**अन्वय:** – ईर्ष्याकलहनिष्क्रान्त: यस्या: प्रिय: न आगच्छति सा आमर्षवशसंप्राप्ता कलहान्तरिता भवेत् |

**अर्थ** – ईर्ष्या आणि भांडणामुळे दूर गेलेला जिचा प्रियकर परत येतच नाही, ती क्रोधास वश गेलेली नायिका 'कलहांतरिता' होईल .

### ❖ ५. खंडिता ❖

**व्यासङ्गादुचिते यस्या वासके नागत: प्रिय: |**
**तदनागमदु:खार्ता खण्डिता सा प्रकीर्तिता || २१७ ||**

**पदच्छेद:** – व्यासङ्गात् उचिते यस्या: वासके न आगत: प्रिय: |
तत्-अनागम-दु:खार्ता खण्डिता सा प्रकीर्तिता || २१७ ||

**अन्वय:** – उचिते वासके यस्या: प्रिय: व्यासङ्गात् न आगत: सा तदनागमदु:खार्ता खण्डिता प्रकीर्तिता |
(व्यासङ्गादिति अन्यनारीविषयात् इत्यर्थ: | - अ . भा . )

**अर्थ** – उचित प्रसंगी नायकाने यावे असे असताना जिचा प्रियकर दुसऱ्या नायिकेशी आसक्त झाल्यामुळे तिच्याजवळ येत नाही आणि त्याच्या न येण्याने जी दु:खाने व्याकुळ होते त्या नायिकेला 'खंडिता' असे म्हणतात .

### ❖ ६. विप्रलब्धा ❖

**यस्या दूतीं प्रिय: प्रेष्य दत्त्वा संकेतमेव वा |**
**नागत: कारणेनेह विप्रलब्धा तु सा भवेत् || २१८ ||**

**पदच्छेद: –** यस्या: दूतीम् प्रिय: प्रेष्य: दत्त्वा संकेतम् एव वा |
न आगत: कारणेन इह विप्रलब्धा तु सा भवेत् || २१८ ||

**अन्वय: –** दूतीम् प्रेष्य: यस्या: प्रिय: संकेतम् दत्त्वा एव कारणेन वा इह न आगत: सा तु विप्रलब्धा भवेत् |

**अर्थ –** दूतीद्वारे प्रियकरास संकेतस्थान सांगून देखील जिचा प्रियकर काही विशिष्ट कारणामुळे त्याठिकाणी पोहचत नाही, तेव्हा त्या अपमानित झालेल्या नायिकेस 'विप्रलब्धा' असे म्हणतात .

**❖ ७. प्रोषितभर्तृका ❖**

**नानाकार्याणि सन्धाय यस्या वै प्रोषित: प्रिय: |**
**सा (प्र?) रूढालककेशान्ता भवेत् प्रोषितभर्तृका || २१९ ||**

**पदच्छेद: –** नानाकार्याणि सन्धाय यस्या: वै प्रोषित: प्रिय: |
सा (प्र?)रूढालक-केशान्ता भवेत् प्रोषितभर्तृका || २१९ ||

**अन्वय: –** नानाकार्याणि सन्धाय यस्या: प्रोषित: प्रिय: सा (प्र?)रूढालककेशान्ता प्रोषितभर्तृका भवेत् |

(प्ररूढा: पलम्बीभूता अलका:, केशान्ताश्च कबरीभार: | प्ररूढ एकवेणीभूते यस्या: | अन्ये तु अकृतकर्मतया केशान्ते ललाटे रोम्णामुद्भेदमुत्प्ररूढं वर्णयन्ति | - अ . भा . )

**अर्थ –** विविध कार्य पूर्ण करण्यासाठी जिचा प्रियकर प्रवासाला गेला आहे, आणि त्याच्या विरहामुळे जी फणीने केस न विंचरत नाही किंवा केवळ एक वेणी घालते त्या नायिकेला 'प्रोषितभर्तृका' नायिका म्हणतात .

**❖ ८. अभिसारिका ❖**

**हित्वा लज्जां तु या श्लिष्टा मदेन मदनेन च |**
**अभिसारयते कान्तं सा भवेदभिसारिका || २२० ||**

**पदच्छेद :** – हित्वा लज्जाम् तु या श्लिष्टा मदेन मदनेन च |
अभिसारयते कान्तम् सा भवेत् अभिसारिका || २२० ||

**अन्वय :** – या मदेन मदनेन च श्लिष्टा लज्जां तु हित्वा कान्तम् अभिसारयते सा अभिसारिका भवेत् |
(मदो मद्यकृत : | चकाराद्द्वयं वदन् मदनस्यैव प्राधान्यमाह | - अ . भा . )

**अर्थ** – जी दारूच्या नशेत किंवा अधिकांशपणे कामातुर होऊन लाज सोडून प्रियकराकडे निघून जाते त्या नायिकेला 'अभिसारिका' म्हणतात .

**आस्ववस्थासु विज्ञेया नायिका नाटकाश्रया |**
**एतासां चैव वक्ष्यामि कामतन्त्रमनेकधा || २२१ ||**

**पदच्छेद :** – आसु अवस्थासु विज्ञेया नायिका नाटकाश्रया |
एतासाम् च एव वक्ष्यामि कामतन्त्रम् अनेकधा || २२१ ||

**अन्वय :** – नाटकाश्रया नायिका आसु अवस्थासु विज्ञेया | च एतासाम् एव कामतन्त्रम् अनेकधा वक्ष्यामि |

**अर्थ** – या अवस्थांनुसार नाटकाश्रित नायिका समजून घ्याव्यात . आता यांचेच कामतंत्रातील विविध प्रकार मी सांगतो .

### ❖ अष्टनायिकांचे अनुभाव ❖

**चिन्तानि:श्वासखेदेन हृद्दाहाभिनयेन च |**
**सखीभि: सह संलापैरात्मावस्थावलोकनै: || २२२ ||**
**ग्लानिर्दैन्याश्रुपातैश्च रोषस्यागमनेन च |**
**निर्भूषणभुजात्वेन दु:खेन रुदितेन च || २२३ ||**
**खण्डिता विप्रलब्धा वा कलहान्तरितापि वा |**
**तथा प्रोषितकान्ता च भावानेतान् प्रयोजयेत् || २२४ ||**

**पदच्छेद :** – चिन्तानि:श्वासखेदेन हृद्-दाह-अभिनयेन च |
सखीभि : सह संलापै : आत्मावस्था-अवलोकनै : || २२२ ||

ग्लानि-दैन्य-अश्रुपातै: च रोषस्य आगमनेन च |
निर्भूषण-भुजात्वेन दु:खेन रुदितेन च || २२३ ||
खण्डिता विप्रलब्धा व कलहान्तरिता अपि वा |
तथा प्रोषितकान्ता च भावान् एतान् प्रयोजयेत् || २२४ ||

**अन्वय:** – चिन्तानि:श्वासखेदेन, हृद्दाहाभिनयेन, सखीभि: सह संलापै:, आत्मावस्थावलोकनै:, ग्लानिदैन्याश्रुपातै:, रोषस्य आगमनेन, निर्भूषणभुजात्वेन, दु:खेन रुदितेन च एतान् भावान् खण्डिता विप्रलब्धा कलहान्तरितता प्रोषितकान्ता च प्रयोजयेत् |

**अर्थ** – चिंता नि:श्वास नैराश्य यांद्वारे, हृदयदाहाचा अभिनय करून, तसेच मैत्रीणीशी संवाद करून, स्वत:च्या अवस्थेचे अवलोकन करून तसेच ग्लानि, दैन्य, अश्रू ढाळणे, रागाने चालत येणे, हातांमधील आभूषणे काढून ठेवणे, दु:खाने रडणे या अनुभावांद्वारे खंडिता, विप्रलब्धा, कलहांतरिता आणि प्रोषितभर्तृका या नायिकांनी अभिनय करावा.

**विचित्रोज्ज्वलवेषा तु प्रमोदोद्द्योतिताानना |**
**उदीर्णशोभा च तथा कार्या स्वाधीनभर्तृका || २२५ ||**

**पदच्छेद:** – विचित्र-उज्ज्वलवेषा तु प्रमोद-उद्द्योतित-आनना |
उदीर्णशोभा च तथा कार्या स्वाधीनभर्तृका || २२५ ||

**अन्वय:** – स्वाधीनभर्तृका विचित्रोज्ज्वलवेषा तु प्रमोदोद्द्योतिताानना तथा च उदीर्णशोभा कार्या |

**अर्थ** – स्वाधीनभर्तृका नायिकेने रंगमंचावर अभिनय करताना स्वत:चा वेष भव्य आणि उज्ज्वल ठेवावा, चेहरा आनंदाने प्रफुल्लित ठेवावा आणि तसेच भावांमध्ये शोभा प्रकट करावी.

**वेश्याया: कुलजायाश्च प्रेष्यायाश्च प्रयोक्तृभि: |**
**एभिर्भावविशेषैस्तु कर्तव्यमभिसारणम् || २२६ ||**

**पदच्छेद:** – वेश्याया: कुलजाया: च प्रेष्याया: च प्रयोक्तृभि: |
एभि: भावविशेषै: तु कर्तव्यम् अभिसारणम् || २२६ ||

**अन्वय:** – वेश्याया: कुलजाया: च प्रेष्याया: च अभिसारणम् प्रयोक्तृभि: एभि: भावविशेषै: तु कर्तव्यम्।

**अर्थ** – नाट्यप्रयोगकर्त्यांनी वेश्या, कुलजा तसेच प्रेष्या या स्त्रियांचे अभिसरण वरील अनुभावांद्वारेच दाखवावे.

**समदा मृदुचेष्टा च तथा परिजनावृता ।**
**नानाभरणचित्राङ्गी गच्छेद्वेश्याङ्गना शनै:॥ २२७॥**

**पदच्छेद:** – समदा मृदुचेष्टा च तथा परिजनावृता।
नानाभरण-चित्राङ्गी गच्छेत् वेश्याङ्गना शनै:॥ २२७॥

**अन्वय:** – मृदुचेष्टा परिजनावृता नानाभरणचित्राङ्गी समदा वेश्याङ्गना शनै: गच्छेत्।

**अर्थ** – कोमल अंगचेष्टांद्वारे, विविध अलंकारांनी शरीराला सजवून मदनाच्या मदाने व्याकुळ झालेल्या वेश्या स्त्रीने सेवकांसह प्रियकराकडे हळूहळू अभिसरण करावे.

**संलीना स्वेषु गात्रेषु त्रस्ता विनमितानना।**
**अवकुण्ठनसंवीता गच्छेत्तु कुलजाङ्गना॥ २२८॥**

**पदच्छेद:** – संलीना स्वेषु गात्रेषु त्रस्ता विनमितानना।
अवकुण्ठन-संवीता गच्छेत् तु कुलजाङ्गना॥ २२८॥

**अन्वय:** – स्वेषु गात्रेषु संलीना त्रस्ता विनमितानना अवकुण्ठनसंवीता कुलजाङ्गना तु गच्छेत्।

**अर्थ** – स्वत:च्या अंगप्रत्यंगास झाकून, घाबरत किंवा थरथरत, मान खाली झुकवून, डोक्यावर पदर घेऊन स्वत:स लपवित उच्च कुळातील स्त्रीने अभिसरण करावे.

**मदस्खलितसंलापा विभ्रमोत्फुल्ललोचना ।**
**आविद्धगतिसंचारा गच्छेत्प्रेष्या समुद्धतम्॥ २२९॥**

**पदच्छेद:** – मद-स्खलित-संलापा विभ्रम-उत्फुल्ल-लोचना।
आविद्धगति-संचारा गच्छेत् प्रेष्या समुद्धतम्॥ २२९॥

**अन्वयः** – मदस्खलितसंलापा विभ्रमोत्फुल्ललोचना आविद्धगतिसंचारा समुद्धतम् प्रेष्या गच्छेत् |

**अर्थ** – दारूच्या नशेत झिंगल्याने अडखळत वार्तालाप करीत, भ्रांतीमुळे डोळे मोठे करीत, आविद्धगतीने संचार करीत प्रेष्या नायिकेने अभिसरण करावे.

**गत्वा सा चेद्यदा तत्र पश्येत्सुप्तं प्रियं तदा |**
**अनेन तूपचारेण तस्य कुर्यात्प्रबोधनम् || २३० ||**

**पदच्छेदः** – गत्वा सा चेत् यदा तत्र पश्येत् सुप्तम् प्रियम् तदा |
अनेन तु उपचारेण तस्य कुर्यात् प्रबोधनम् || २३० ||

**अन्वयः** – सा गत्वा यदा तत्र सुप्तम् प्रियम् पश्येत् चेत् तदा अनेन तु उपचारेण तस्य प्रबोधनम् कुर्यात् |

**अर्थ** – जेव्हा नायिका प्रियकराजवळ पोचते तेव्हा प्रियकर जर झोपला असेल तर खाली सांगितलेल्या उपायांनी त्याला जागे करावे.

**अलङ्कारेण कुलजा वेश्या गन्धैस्तु शीतलैः |**
**प्रेष्या तु वस्त्रव्यजनैः कुर्वीत प्रतिबोधनम् || २३१ ||**

**पदच्छेदः** – अलङ्कारेण कुलजा वेश्या गन्धैः तु शीतलैः |
प्रेष्या तु वस्त्रव्यजनैः कुर्वीत प्रतिबोधनम् || २३१ ||

**अन्वयः** – कुलजा अलङ्कारेण वेश्या तु शीतलैः गन्धैः प्रेष्या तु वस्त्रव्यजनैः प्रतिबोधनम् कुर्वीत |
(अलङ्कारेणेति अलङ्कारशब्दो नूपुरादिविशिष्टः तत् | - अ. भा.)

**अर्थ** – कुलजा नायिकेने अलंकार म्हणजेच पैंजणांच्या आवाजाने प्रियकरास उठवावे. वेश्येने शीतल सुगंधाद्वारे त्याला उठवावे आणि प्रेष्या स्त्रीने वस्त्र हलवून म्हणजेच पदराने वारा घालत त्याला उठवावे.

**कुलाङ्गनानामेवायं नोक्तः कामाश्रयो विधिः |**
**सर्वावस्थानुभाव्यं हि यस्मादभवति नाटकम् || २३२ ||**

**पदच्छेद :** – कुलाङ्गनानाम् एव अयम् न उक्त : कामाश्रय : विधि : |
सर्वावस्था-अनुभाव्यम् हि यस्मात् भवति नाटकम् || २३२ ||

**अन्वय :** – अयम् कामाश्रय: विधि: कुलाङ्गनानाम् एव न उक्त: | यस्मात् नाटकम् हि सर्वावस्थानुभाव्यम् भवति |

**अर्थ** – हा कामाश्रित विधी केवळ उच्च कुळातील स्त्रियांसाठीच सांगितलेला आहे असे नाही . कारण नाटक हे सर्व अवस्थांचा अभिनय करणारे असते .

**❖ रतिक्रीडेसाठी प्रयोग ❖**

**नवकामप्रवृत्ताया क्रुद्धाया वा समागमे |**
**सापदेशैरुपायैस्तु वासकं संप्रयोजयेत् || २३३ ||**

**पदच्छेद :** – नवकाम-प्रवृत्ताया : क्रुद्धाया : वा समागमे |
सापदेशै : उपायै : तु वासकम् संप्रयोजयेत् || २३३ ||

**अन्वय :** – नवकामप्रवृत्ताया क्रुद्धाया वा समागमे सापदेशै : तु उपायै : वासकम् संप्रयोजयेत् |
(सापदेशै : सव्याजै : उपायै : वासको व्याजश्च | - अ . भा . )

**अर्थ** – रतिक्रीडेस प्रथमच प्रवृत्त झालेल्या किंवा क्रुद्धा नायिकेशी समागम करताना फसव्या उपायाद्वारे लवाडीचा प्रयोग करावा .

**नानालङ्कारवस्त्राणि गन्धमाल्यानि चैव हि |**
**प्रियायोजितभुक्तानि निषेवेत मुदान्वित: || २३४ ||**

**पदच्छेद :** – नानालङ्कार-वस्त्राणि गन्ध-माल्यानि च एव हि |
प्रियायोजित-भुक्तानि निषेवेत मुदान्वित : || २३४ ||

**अन्वय :** – प्रियायोजितभुक्तानि नानालङ्कारवस्त्राणि गन्धमाल्यानि एव च हि मुदान्वित : निषेवेत |

**अर्थ** – नायकाने प्रियतमेद्वारा उपभोगलेल्या विविध प्रकारचे अलंकार, वस्त्रे, गंध (सुगंधी पदार्थ ) आणि माळा इत्यादींचा आनंदाने उपभोग घ्यावा .
(नायिकेच्या हृदयाला जिंकण्यासाठी कुशल नायकाने हे उपाय करावेत . )

**न तथा भवति मनुष्यो मदनवश: कामिनीमलभमान: |**
**द्विगुणोपजातहर्षो भवति यथा सङ्गत: प्रियया ||२३५||**

**पदच्छेद: –** न तथा भवति मनुष्य: मदनवश: कामिनीम् अलभमान: |
द्विगुण-उपजात-हर्ष: भवति यथा सङ्गत: प्रियया || २३५ ||

**अन्वय: –** कामिनीम् अलभमान: मनुष्य: न तथा मदनवश: भवति यथा प्रियया सङ्गत: द्विगुणोपजातहर्ष: भवति |

**अर्थ –** कामिनी स्त्री प्राप्त न झाल्यास माणूस तितका कामवश होत नाही . परंतु, प्रेयसी समरस असेल त्याचा आनंद द्विगुणित होतो . (प्रियसीशी संभोग होऊनही वरील उपचार सांगण्याचे कारण असे की नायिका संभोगात समरस नसेल तर नायकास तितका आनंद प्राप्त होत नाही . ती समरस व्हावी यासाठी नायकाने वरील उपाय योजावेत . )

**विलासभावेङ्गितवाक्यलीलामाधुर्यविस्तारगुणोपन्न: |**
**परस्परप्रेमनिरीक्षितेन समागम: कामकृतस्तु कार्य: || २३६ ||**

**पदच्छेद: –** विलास-भाव-इङ्गित-वाक्य-लीला-माधुर्य-विस्तार-गुणोपन्न: |
परस्पर-प्रेम-निरीक्षितेन समागम: कामकृत: तु कार्य: || २३६ ||

**अन्वय: –** परस्परप्रेमनिरीक्षितेन विलासभावेङ्गितवाक्यलीलामाधुर्यविस्तारगुणोपन्न: कामकृत: समागम: तु कार्य: |

(विलास: स्त्रीणां च व्याख्यात: 'स्थानासनगमनाना'मिति (२२.१५), 'धीरसंचारिणी दृष्टि:' पुरूपस्य (२२.३५) | तत्प्रधानभावा: चेष्टितानि | इङ्गितं प्रेमसूचका व्यापारा: (२२.१६७-१७२) | वाक्यलीलेति अङ्गासाध्यादिप्रूक्ता | माधुर्यं 'सर्वावस्थाविशेषे' ष्विति (२२.२९) नृणां च, 'अव्यासात् करणानां' (२२.३६) इति एषां विस्तारगुणेन कविवर्णनाकृतेनोपपन्न एतस्मादुपचारात्सम्यगुद्भवो यस्य | - अ . भा . )

**अर्थ –** एकमेकांना प्रेमाने न्याहाळून, विलास भावाने इंगिते सूचित करून, बोलण्यातील माधुर्य इत्यादींचे कवींद्वारे जे विस्तृत वर्णन केले जाते त्याद्वारे उत्पन्न होणारा आणि कामाद्वारे केला जाणारा समागम हा योग्य असतो .

(थांबणे, बसणे आणि जाणे हे स्त्रियांचे विलास. धीरसंचारिणी दृष्टीने पाहणे हा पुरुषांचा विलास. यांचा प्रमुख रीतीने वापर केला जातो ती चेष्टा. प्रेम सूचित करणाऱ्या हालचाली म्हणजे इंगित. वाक्यलीलेविषयी आंगिक अभिनय इत्यादींमध्ये सांगितले आहे. माधुर्याविषयी 'सर्वावस्थाविशेषेषु' इत्यादी श्लोकांमध्ये यापूर्वीच २२.२९ मध्ये सांगितले आहे.)

**ततः प्रवृत्ते मदने उपचारसमुद्भवे ।**
**वासोपचारः कर्तव्यो नायकागमनं प्रति ॥ २३७ ॥**

**पदच्छेदः–** ततः प्रवृत्ते मदने उपचार-समुद्भवे ।
वासोपचारः कर्तव्यः नायकागमनम् प्रति ॥ २३७ ॥

**अन्वयः –** ततः उपचारसमुद्भवे मदने प्रवृत्ते नायकागमनम् प्रति वासोपचारः कर्तव्यः ।

**अर्थ –** त्यानंतर कामोपचारांमुळे मदन प्रवृत्त झाल्यावर नायकाचे आगमन व्हावे यासाठी योग्य निवासव्यवस्था करावी.

**❖ रतिक्रीडेच्या वेळी स्त्रियांचा आहार्य ❖**

**गन्धमाल्ये गृहीत्वा तु चूर्णवासस्तथैव च ।**
**आदर्शो लीलया गृह्यश्छन्दतो वा पुनः पुनः ॥ २३८ ॥**

**पदच्छेदः–** गन्धमाल्ये गृहीत्वा तु चूर्णवासः तथा एव च ।
आदर्शः लीलया गृह्यः छन्दतः वा पुनः पुनः ॥ २३८ ॥

**अन्वयः –** गन्धमाल्ये चूर्णवासः च गृहीत्वा लीलया छन्दतः वा पुनः पुनः आदर्शः गृह्यः ।

**अर्थ –** स्त्रियांनी गंध, माळा आणि सुवासिक वस्त्र नेसून लाडिकपणे किंवा स्वेच्छेने आरसा वारंवार धरावा.

**वासोपचारे नात्यर्थं भूषणग्रहणं भवेत् ।**
**रशनानुपूरप्रायं स्वनवच्च प्रशस्यते ॥ २३९ ॥**

**पदच्छेदः–** वासोपचारे न अत्यर्थम् भूषणग्रहणम् भवेत् ।
रशना-नुपूर-प्रायम् स्वनवत् च प्रशस्यते ॥ २३९ ॥

**अन्वय:** – वासोपचारे अत्यर्थम् भूषणग्रहणम् न भवेत् | रशनानुपूरप्रायम् स्वनवत् च प्रशस्यते |

**अर्थ** – वासोपचाराच्या वेळी (रतिक्रीडेच्या वेळी) जास्त दागिने परिधान करू नयेत. बहुधा मधुर ध्वनी करणारे घुंगरू आणि रशना (कमरेवरची आभूषणे) प्रशंसनीय मानली जातात.

**नाम्बरग्रहणं रङ्गे न स्नानं न विलेपनम् |**
**नाञ्जनं नाङ्गरागश्च केशसंयमनं तथा || २४० ||**
**नाप्रावृता नैकवस्त्रा न रागमधरस्य तु |**
**उत्तमा मध्यमा वापि कुर्वीत प्रमदा क्वचित् || २४१ ||**

**पदच्छेद:** – न अम्बरग्रहणम् रङ्गे न स्नानम् न विलेपनम् |
न अञ्जनम् न अङ्गराग: च केश-संयमनम् तथा || २४० ||
न अप्रावृता न एकवस्त्रा न रागम् अधरस्य तु |
उत्तमा मध्यमा वा अपि कुर्वीत प्रमदा क्वचित् || २४१ ||

**अन्वय:** – उत्तमा अपि वा मध्यमा प्रमदा रङ्गे न अम्बरग्रहणम् न स्नानम् न विलेपनम् न अञ्जनम् न अङ्गराग: तथा च केशसंयमनम् न अप्रावृता न एकवस्त्रा अधरस्य तु रागम् क्वचित् न कुर्वीत |

**अर्थ** – उत्तम किंवा मध्यम प्रकृतीच्या स्त्री पात्राने रंगमंचावर उघडपणे वस्त्र परिधान करू नये, स्नान करू नये, गंध उटण्याचा लेप लावू नये, डोळ्यामध्ये अंजन घालू नये, शरीरावर रंग लावू नये, केस बांधू नये, वस्त्रविरहित राहू नये, एकच (किंवा पारदर्शक) वस्त्र परिधान करू नये, ओठांवर लाली लावू नये.

**अधमानां भवेदेष सर्व एव विधि: सदा |**
**कारणान्तरमासाद्य तस्मादपि न कारयेत् || २४२ ||**

**पदच्छेद:** – अधमानाम् भवेत् एष: सर्व: एव विधि: सदा |
कारणान्तरम् आसाद्य तस्मात् अपि न कारयेत् || २४२ ||

**अन्वय:** – एष: सर्व: एव विधि: सदा अधमानाम् भवेत् | तस्मात् अपि कारणान्तरम् आसाद्य न कारयेत् |

**अर्थ** – परंतु हा सर्व विधी अधम प्रकृतीच्या स्त्रियांसाठी लागू होऊ शकतो . म्हणजेच त्या हे सर्व कार्य रंगमंचावर दाखवू शकतात, परंतु काही विशेष कारण झाल्यास हा विधी अधम स्त्रियांनी करू नये .

**❖ प्रियकराची वाट पाहतानाचा अभिनय ❖**

**प्रेष्यादीनां च नारीणां नराणां वापि नाटके |**
**भूषणग्रहणं कार्यं पुष्पग्रहणमेव च || २४३ ||**

**पदच्छेद :** – प्रेष्यादीनाम् च नारीणाम् नराणाम् वा अपि नाटके |
भूषणग्रहणम् कार्यम् पुष्पग्रहणम् एव च || २४३ ||

**अन्वय :** – नाटके प्रेष्यादीनाम् नारीणाम् नराणाम् अपि वा पुष्पग्रहणम् एव भूषणग्रहणम् कार्यम् |

**अर्थ** – नाटकातील दास व दासी हे केवळ फुलांचेच अलंकार घालू शकतात .

**गृहीतमण्डना चापि प्रतीक्षेत प्रियागमम् |**
**लीलया मण्डितं वेषं कुर्याद्यन्न विरुध्यते || २४४ ||**

**पदच्छेद :** – गृहीतमण्डना च अपि प्रतीक्षेत प्रियागमम् |
लीलया मण्डितम् वेषम् कुर्यात् यत् न विरुध्यते || २४४ ||

**अन्वय :** – गृहीतमण्डना प्रियागमम् प्रतीक्षेत | लीलया मण्डितम् वेषम् कुर्यात् यत् न विरुध्यते |

**अर्थ** – वेशभूषेने सुसज्ज होऊन (सुंदर वस्त्र, आभूषणे घालून तयार होऊन) नायिकेने प्रियकराची वाट पहावी . लाडिकपणे नटूनथटून स्वभावाला विरुद्ध होणार नाही असे सुंदर वेष नायिकेने धारण करावे .

**विधिवद्वासकं कुर्यान्नायिका नायकागमे |**
**प्रतीक्षमाणा च ततो नालिकाशब्दमादिशेत् || २४५ ||**

**पदच्छेद :** – विधिवत् वासकम् कुर्यात् नायिका नायकागमे |
प्रतीक्षमाणा च ततः नालिकाशब्दम् आदिशेत् || २४५ ||

**अन्वय :** – नायिका नायकागमे विधिवत् वासकम् कुर्यात् | ततः च प्रतीक्षमाणा नालिकाशब्दम् आदिशेत् |

**अर्थ** – नायकाच्या आगमनावेळी नायिकेने विधिपूर्वक तयार राहावे. बाट पहात उभी असलेल्या नायिकेने नायक आल्यावर असता घंटी (नालिका) वाजविण्याचा आदेश सेवकांना द्यावा.

**श्रुत्वा तु नालिकाशब्दं नायकागमविक्लवा |**
**विषण्णा वेपमाना च गच्छेत्तोरणमेव च || २४६ ||**

**पदच्छेद:** – श्रुत्वा तु नालिकाशब्दम् नायकागम-विक्लवा |
विषण्णा वेपमाना च गच्छेत् तोरणम् एव च || २४६ ||

**अन्वय:** – नालिकाशब्दम् तु श्रुत्वा नायकागमविक्लवा विषण्णा च वेपमाना एव च तोरणम् गच्छेत् |

**अर्थ** – घंटीचा आवाज ऐकून नायक येत आहे असे कळल्यावर नायकाच्या आगमनासाठी गोंधळलेल्या, विषण्ण होणाऱ्या आणि कंपित होणाऱ्या नायिकेने उंबरठ्याजवळ जावे.

**तोरणं वामहस्तेन कवाटं दक्षिणेन च |**
**गृहीत्वा तोरणाश्लिष्टा संप्रतीक्षेत नायकम् || २४७ ||**

**पदच्छेद:** – तोरणम् वामहस्तेन कवाटम् दक्षिणेन च |
गृहीत्वा तोरणाश्लिष्टा संप्रतीक्षेत नायकम् || २४७ ||

**अन्वय:** – वामहस्तेन तोरणम् दक्षिणेन च कवाटम् गृहीत्वा तोरणाश्लिष्टा नायकम् संप्रतीक्षेत |

**अर्थ** – डाव्या हाताने दरवाज्याची कमान धरावी आणि उजव्या हाताने कवाट धरावे आणि दरवाज्याला चिकटून उभे राहून नायकाची वाट पहावी.

**शङ्कां चिन्तां भयं चैव प्रकुर्यात्तोरणाश्रिता |**
**अदृष्ट्वा रमणं नारी विषण्णा च क्षणं भवेत् || २४८ ||**

**पदच्छेद:** – शङ्काम् चिन्ताम् भयम् च एव प्रकुर्यात् तोरणाश्रिता |
अदृष्ट्वा रमणम् नारी विषण्णा च क्षणम् भवेत् || २४८ ||

**अन्वय:** – तोरणाश्रिता शङ्काम् चिन्ताम् एव च भयम् प्रकुर्यात् | रमणम् अदृष्ट्वा च नारी क्षणम् विषण्णा भवेत् |

**अर्थ** – दरवाज्या खिळून उभ्या राहिलेल्या नायिकेने शंका, चिंता आणि भय यांचा अभिनय करावा आणि प्रियकर दिसत नाही म्हणून तिने दु:खी व्हावे .

**दीर्घ चैव विनि:श्वस्य नयनाम्बु निपातयेत् |**
**सन्नं च हृदयं कृत्वा विसृजेदङ्गमासने || २४९ ||**

**पदच्छेद:** – दीर्घम् च एव विनि:श्वस्य नयनाम्बु निपातयेत् |
सन्नम् च हृदयम् कृत्वा विसृजेत् अङ्गम् आसने || २४९ ||

**अन्वय:** – दीर्घम् विनि:श्वस्य नयनाम्बु निपातयेत् | सन्नम् च हृदयम् कृत्वा आसने अङ्गम् विसृजेत् |

**अर्थ** – दीर्घ उसासा टाकून, डोळ्यांमधून अश्रुपात करावा आणि हृदय सुन्न करून आसनावर अंग टाकावे .

**व्याक्षेपाद्विमृशेच्चापि नायकागमनं प्रति |**
**तैस्तैर्विचारणोपायै: शुभाशुभसमुत्थितै: || २५० ||**

**पदच्छेद:** – व्याक्षेपात् विमृशेत् च अपि नायक-आगमनम् प्रति |
तै: तै: विचारणोपायै: शुभाशुभ-समुत्थितै: || २५० ||

**अन्वय:** – नायकागमनम् प्रति व्याक्षेपात् तै: तै: शुभाशुभसमुत्थितै: विचारणोपायै: विमृशेत् |

**अर्थ** – नायक येण्यामध्ये अडथळा आलेला पाहून त्या त्या शुभ आणि अशुभ परिस्थितीविषयी चिंता प्रकट करून त्यासंबंधीच्या उपायांचा विचार करावा .

**गुरुकार्येण मित्रैर्वा मन्त्रिणा राज्यचिन्तया |**
**अनुबद्ध: प्रिय: किं नु वृतो वल्लभयापि वा || २५१ ||**

**पदच्छेद:** – गुरुकार्येण मित्रै: वा मन्त्रिणा राज्यचिन्तया |
अनुबद्ध: प्रिय: किम्नु वृत: वल्लभया अपि वा || २५१ ||

**अन्वय:** – गुरुकार्येण मित्रै: वा मन्त्रिणा राज्यचिन्तया वल्लभया अपि वा वृत: किम्नु प्रिय: अनुबद्ध: |

**अर्थ** – गुरुंच्या किंवा एखाद्या मोठ्या कामामुळे किंवा मित्रांमुळे, अथवा मंत्र्यांसह राज्याविषयीचे

चिंतन करीत असल्या कारणाने किंवा एखाद्या प्रेयसीमुळे माझा प्रियकर थांबला असेल? अशी शंका व्यक्त करावी .

**उत्पातान्निर्दिशेच्चापि शुभाशुभसमुत्थितान् |**
**निमित्तैरात्मसंस्थैस्तुस्फुरितैः स्पन्दितैस्तथा || २५२ ||**

**पदच्छेद :-** उत्पातान् निर्दिशेत् च अपि शुभाशुभ-समुत्थितान् |
निमित्तै : आत्मसंस्थै : तु स्फुरितै : स्पन्दितै : तथा || २५२ ||

**अन्वय : -** आत्मसंस्थैः निमित्तैः तथा स्फुरितैः स्पन्दितैः अपि च शुभाशुभसमुत्थितान् उत्पातान् निर्दिशेत् |

**अर्थ –** स्वत:च्या शरीरात होत असलेल्या सूचनांकडे लक्ष देत डोळा लवलवणे, अंगावर काटा येणे इत्यादींद्वारे शुभ आणि अशुभ घटनांच्या सूचनेचा निर्देश करावा .

**❖ विविध संकेत व अनुभाव ❖**

**शोभनेषु तु कार्येषु निमित्तं वामतः स्त्रियाः |**
**अनिष्टेष्वथ सर्वेषु निमित्तं दक्षिणं भवेत् || २५३ ||**

**पदच्छेद :-** शोभनेषु तु कार्येषु निमित्तम् वामत : स्त्रिया : |
अनिष्टेषु अथ सर्वेषु निमित्तं दक्षिणम् भवेत् || २५३ ||

**अन्वय : -** अथ शोभनेषु तु कार्येषु स्त्रियाः वामतः निमित्तम् सर्वेषु अनिष्टेषु दक्षिणम् निमित्तम् भवेत् |

**अर्थ –** शुभकार्याचा संकेत दर्शविताना स्त्रियांच्या डाव्या अंगात स्फुरण म्हणजेच फडफड दाखवावी आणि सर्व वाईट संकेतांसाठी शरीरच्या उजव्या बाजूस स्फुरण किंवा फडफड दाखवावी .

**सव्यं नेत्रं ललाटं च भ्रूनासोष्ठं तथैव च |**
**ऊरुबाहुस्तनं चैव स्फुरेद्यदि समागमः || २५४ ||**

**पदच्छेद :–** सव्यम् नेत्रम् ललाटम् च भ्रू-नासा-ओष्ठम् तथा एव च |
ऊरु-बाहु-स्तनम् च एव स्फुरेत् यदि समागम : || २५४ ||

**अन्वय : –** यदि समागम: (भवेत् तर्हि) सव्यम् नेत्रम् ललाटम् भ्रूनासोष्ठम् एव च ऊरुबाहुस्तनम् स्फुरेत् |

**अर्थ –** जर समागम होणार असेल तर नायिकेचा डावा डोळा, कपाळ, भुवया, नाक, ओठ, मांड्या, बाहू आणि स्तन स्फुरण पावतात .

**एतेषामन्यथाभावे दुर्निमित्तं विनिर्दिशेत् |**
**दर्शने दुर्निमित्तस्य मोहं गच्छेत्क्षणं तत: || २५५ ||**

**पदच्छेद :–** एतेषाम् अन्यथा-भावे दुर्निमित्तम् विनिर्दिशेत् |
दर्शने दुर्निमित्तस्य मोहम् गच्छेत् क्षणम् तत : || २५५ ||

**अन्वय : –** एतेषाम् अन्यथाभावे दुर्निमित्तम् विनिर्दिशेत् | तत: दुर्निमित्तस्य दर्शने क्षणम् मोहम् गच्छेत् |

**अर्थ –** जेव्हा याउलट म्हणजे शरीराची उजवी बाजू प्रस्फुरित झाली तर समजावे की काहीतरी वाईट होणार आहे .
तेव्हा तो अपशकुन पाहिल्यावर क्षणभरासाठी चक्कर आल्याचा अभिनय करावा .

**अनागमे नायकस्य कार्यो गण्डाश्रय: कर: |**
**भूषणे चाप्यवज्ञानं रोदनं च समाचरेत् || २५६ ||**

**पदच्छेद :–** अनागमे नायकस्य कार्य : गण्डाश्रय : कर : |
भूषणे च अपि अवज्ञानम् रोदनम् च समाचरेत् || २५६ ||

**अन्वय : –** नायकस्य अनागमे गण्डाश्रय: कर: कार्य: | अपि च भूषणे अवज्ञानम् रोदनम् च समाचरेत् |

**अर्थ –** नायकाचे आगमन होत नसेल तेव्हा दोन्ही हात गालांवर टेकवावेत . तसेच अलंकारांकडे लक्ष देऊ नये आणि रडण्याचा अभिनय करावा .

**अथ चेच्छोभनं तत्स्यान्निमित्तं नायकागमे |**
**सूच्यो नायिकयासन्नो गन्धाघ्राणेन नायक: || २५७ ||**

**पदच्छेद :–** अथ चेत् शोभनम् तत् स्यात् निमित्तम् नायकागमे |
सूच्य : नायिकया आसन्न : गन्धाघ्राणेन नायक : || २५७ ||

**अन्वय : –** अथ तत् शोभनम् चेत् नायकागमे निमित्तम् स्यात् | नायिकया गन्धाघ्राणेन आसन्न : नायक : सूच्य : |

**अर्थ –** जर शुभ शकुन झाला म्हणजेच डावी बाजू प्रस्फुरित झाली तर नायक हा नक्की येणार असे समजावे. या सूचनेद्वारे नायिकेने सुगंधी पदार्थाचा आस्वाद घेत, आलेल्या नायकाविषयी सूचित करावे.

**❖ प्रियकराच्या आगमनावेळीचा अभिनय ❖**

**दृष्ट्वा चोत्थाय संहृष्टा प्रत्युद्गच्छेद्यथाविधि |**
**तत: कान्तं निरीक्षेत प्रहर्षोत्फुल्ललोचना || २५८ ||**

**पदच्छेद :–** दृष्ट्वा च उत्थाय संहृष्टा प्रत्युद्गच्छेत् यथाविधि |
तत : कान्तम् निरीक्षेत प्रहर्ष-उत्फुल्ल-लोचना || २५८ ||

**अन्वय : –** दृष्ट्वा उत्थाय च संहृष्टा यथाविधि प्रत्युद्गच्छेत् | तत: प्रहर्षोत्फुल्ललोचना कान्तम् निरीक्षेत |

**अर्थ –** प्रियकर आला आहे ते पाहून अत्यानंदाने उठून यथाविधी म्हणजे व्यवस्थित त्याच्याजवळ जावे आणि त्यानंतर आनंदी व विस्तृत नयनांनी प्रियकरास मन भरून न्याहाळावे.

**सखीस्कन्धार्पितकरा कृत्वा स्थानकमायतम् |**
**दर्शयेत तत: कान्तं सचिह्नं सरसव्रणम् || २५९ ||**

**पदच्छेद :–** सखी-स्कन्ध-अर्पित-करा कृत्वा स्थानकम् आयतम् |
दर्शयेत तत : कान्तम् सचिह्नम् सरसव्रणम् || २५९ ||

**अन्वय : –** सखीस्कन्धार्पितकरा आयतम् स्थानकम् कृत्वा तत: कान्तम् सचिह्नम् सरसव्रणम् दर्शयेत |

**अर्थ –** मैत्रिणीच्या खांद्यावर हात ठेवून आयत स्थानामध्ये उभे राहून त्यानंतर नायिकेने प्रियकरास स्वत:च्या शरीरावरील रतिरसास्वादाची चिह्ने दाखवावीत.

**यदि स्यादपराद्धस्तु कृतस्तैस्तैरुपक्रमैः।**
**उपालम्भकृतैर्वाक्यैरुपालभ्यस्तु नायकः॥ २६०॥**

**पदच्छेदः–** यदि स्यात् अपराद्धः तु कृतः तैः तैः उपक्रमैः।
उपालम्भकृतैः वाक्यैः उपालभ्यः तु नायकः॥ २६०॥

**अन्वयः –** यदि तु नायकः अपराद्धः कृतः स्यात् तैः तैः उपक्रमैः उपालम्भकृतैः वाक्यैः तु उपालभ्यः।(यदि स्यादपराद्धस्त्विति तैस्तैरिति मान-अवहित्थ-वस्त्रभङ्ग-अभिष्यन्द-आदिभिः।- अ.भा.)

**अर्थ –** नायक जर अपराधी असेल तर सुरुवातीलाच त्याचा अपमान करणे, भाव लपवणे, वस्त्र खेचणे, ढसाढसा रडणे इत्यादी कृतींद्वारे तसेच खोचकपणे बोलून नायिकेने त्याला गप्प करावे. (बोलूच देऊ नये)

**मानापमानसम्मोहैरवहित्थभयक्रमैः।**
**वचनस्य समुत्पत्तिः स्त्रीणामीर्षाकृता भवेत्॥ २६१॥**

**पदच्छेदः–** मान-अपमान-सम्मोहैः अवहित्थ-भयक्रमैः।
वचनस्य समुत्पत्तिः स्त्रीणाम् ईर्षाकृता भवेत्॥ २६१॥

**अन्वयः –** मानापमानसम्मोहैः अवहित्थभयक्रमैः स्त्रीणाम् वचनस्य समुत्पत्तिः ईर्षाकृता भवेत्।

**अर्थ –** मानअपमान, संमोह, भाव लपविणे, भय अशा प्रचलित हेतुंमुळे नायिकेची होणारी वडवड ईर्ष्येमुळे होते.

**विस्रम्भस्नेहरागेषु सन्देहे प्रणये तथा।**
**परितोषे च घर्षे च दाक्षिण्याक्षेपविभ्रमे॥ २६२॥**
**धर्मार्थकामयोगेषु प्रच्छन्नवचनेषु च।**
**हास्ये कुतूहले चैव संभ्रमे व्यसने तथा॥ २६३॥**
**स्त्रीपुंसयोः क्रोधकृते पृथङ्मिश्रे तथापि वा।**
**अनाभाष्योऽपि संभाष्यः प्रिय एभिस्तु कारणैः॥ २६४॥**

**पदच्छेद : –** विस्रम्भस्नेहरागेषु सन्देहे प्रणये तथा |
परितोषे च घर्षे च दाक्षिण्य-आक्षेप-विभ्रमे || २६२ ||
धर्मार्थकाम-योगेषु प्रच्छन्न-वचनेषु च |
हास्ये कुतूहले च एव संभ्रमे व्यसने तथा || २६३ ||
स्त्रीपुंसयो : क्रोधकृते पृथङ्मिश्रे तथा अपि वा |
अनाभाष्य : अपि संभाष्य : प्रिय : एभि : तु कारणै : || २६४ ||

**अन्वय : –** विस्रम्भस्नेहरागेषु सन्देहे प्रणये परितोषे घर्षे दाक्षिण्याक्षेपविभ्रमे धर्मार्थकामयोगेषु प्रच्छन्नवचनेषु हास्ये कुतूहले संभ्रमे व्यसने तथा अपि वा स्त्रीपुंसयो : पृथङ्मिश्रे क्रोधकृते एभि : तु कारणै : अनाभाष्य : प्रिय : अपि संभाष्य : (भवेत्) |

**अर्थ –** विस्रंभ, स्नेह, प्रेम, संदेह, प्रणय, समाधान, संघर्ष, विनम्रतेमुळे होणारा आक्षेप व विभ्रम, धर्म अर्थ कामाचा प्रयोग, लपूनछपून बोलणे, हास्य, कुतूहल, संभ्रम आणि वाईट सवय, स्त्री आणि पुरुषांचे एकमेकांवर रागावणे इत्यादी कारणांद्वारे प्रियकराचे मौनही बोलण्याचे साधन बनते .

**❖ प्रेमामध्ये ईर्ष्येची चार कारणे व अभिनय ❖**

**यत्र स्नेहो भवेत्तत्र हीर्ष्या मदनसम्भवा |**
**चतस्रो योनयस्तस्या: कीर्त्यमाना निबोधत || २६५ ||**

**पदच्छेद : –** यत्र स्नेह : भवेत् तत्र हि ईर्ष्या मदनसम्भवा |
चतस्र : योनय : तस्या : कीर्त्यमाना : निबोधत || २६५ ||

**अन्वय : –** यत्र स्नेह: तत्र हि मदनसम्भवा ईर्ष्या भवेत् | तस्या: चतस्र: कीर्त्यमाना: योनय: निबोधत |

**अर्थ –** जेथे प्रेम असते तेथे मदनामुळे ईर्ष्या निर्माण होत असते . प्रेमामध्ये ईर्ष्येला चार कारणे असू शकतात, ती नीट जाणून घ्या .

**वैमनस्यं व्यलीकं च विप्रियं मन्युरेव च |**
**एतेषां संप्रवक्ष्यामि लक्षणानि यथाक्रमम् || २६६ ||**

**पदच्छेद :–** वैमनस्यम् व्यलीकम् च विप्रियम् मन्यु : एव च |
एतेषाम् संप्रवक्ष्यामि लक्षणानि यथाक्रमम् || २६६ ||

**अन्वय : –** वैमनस्यम् व्यलीकम् च विप्रियम् एव च मन्यु : एतेषाम् लक्षणानि यथाक्रमम् संप्रवक्ष्यामि |

**अर्थ –** ती चार कारणे म्हणजे उदासीनता, ढोंगीपणा, आक्षेप घेणे आणि रागावणे. आता क्रमानुसार त्यांची लक्षणे सांगतो .

**निद्राखेदालसगतिं सचिह्नं सरसव्रणम् |**
**एवंविधं प्रियं दृष्ट्वा वैमनस्यं भवेत् स्त्रिया: || २६७ ||**

**पदच्छेद :–** निद्रा-खेद-आलस-गतिम् सचिह्नम् सरसव्रणम् |
एवंविधम् प्रियम् दृष्ट्वा वैमनस्यम् भवेत् स्त्रिया : || २६७ ||

**अन्वय : –** निद्राखेदालसगतिम् सचिह्नम् सरसव्रणम् एवंविधम् प्रियम् दृष्ट्वा स्त्रिया: वैमनस्यम् भवेत् |

**अर्थ –** प्रियकर झोप असेल, तो पश्चात्ताप करीत असेल, आळशी असेल, रतिचिह्ने व ताजे व्रण असलेल्या प्रियकराचे शरीर पाहून स्त्रियांमध्ये वैमनस्य म्हणजेच नैराश्य उत्पन्न होते .

**निद्राभ्यसूयितावेक्षणेन रोषप्रकम्पमानाङ्गया |**
**साध्विति सुष्ठ्विति वचनै: शोभत इत्येवमभिनेयम् || २६८ ||**

**पदच्छेद :–** निद्रा-अभ्यसूयित-अवेक्षणेन रोष-प्रकम्पमान-अङ्गया |
साधु इति सुष्ठु इति वचनै : शोभते इति एवम् अभिनेयम् || २६८ ||

**अन्वय : –** निद्राभ्यसूयितावेक्षणेन रोषप्रकम्पमानाङ्गया साधु इति सुष्ठु इति शोभते इति वचनै: एवम् अभिनेयम् |

**अर्थ –** क्रोध व ईर्ष्येने निरीक्षण करीत, रागाने शरीर कंपित करून "छान, हे खूप चांगले केले तुम्ही . " असे टोमणे मारत नायिकेने अभिनय करावा .

**बहुधा वार्यमाणोऽपि यस्तस्मिन्नेव दृश्यते |**
**संघर्षमत्सरात्तत्र व्यलीकं जायते स्त्रिया: || २६९ ||**

**पदच्छेद :-** बहुधा वार्यमाण : अपि य : तस्मिन् एव दृश्यते |
संघर्षमत्सरात् तत्र व्यलीकम् जायते स्त्रिया : || २६९ ||

**अन्वय : -** बहुधा वार्यमाण : अपि य : तस्मिन् एव दृश्यते तत्र संघर्षमत्सरात् स्त्रिया : व्यलीकम् जायते |

**अर्थ** – वारंवार थांबविण्यानंतरही तो त्याच ठिकाणी दिसत असेल तेव्हा संघर्ष व मत्सरामुळे स्त्रिया खोटू बोलू लागतात .

**कृत्वोरसि वामकरं दक्षिणहस्तं तथा विधुन्वन्त्या |**
**चरणविनिष्ठम्भेन च कार्योऽभिनयो व्यलीके तु || २७० ||**

**पदच्छेद :-** कृत्वा उरसि वामकरम् दक्षिणहस्तम् तथा विधुन्वन्त्या |
चरण-विनिष्ठम्भेन च कार्य : अभिनय : व्यलीके तु || २७० ||

**अन्वय : -** वामकरम् उरसि कृत्वा तथा दक्षिणहस्तम् विधुन्वन्त्या चरणविनिष्ठम्भेन च व्यलीके अभिनय : कार्य : |

**अर्थ** – डावा हात छातीवर ठेवत आणि उजवा हात रागाने हलवत, पाय आपटून तिथेच थांवत, स्तंभित होऊन नायिकेने व्यलीकाचा अभिनय करावा .

**❖ 'विप्रिय' ❖**

**जीवन्त्यां त्वयि जीवामि दासोऽहं त्वं च मे प्रिया |**
**उक्त्वैवं योऽन्यथा कुर्याद्विप्रियं तत्र जायते || २७१ ||**

**पदच्छेद :-** जीवन्त्याम् त्वयि जीवामि दास : अहम् त्वम् च मे प्रिया |
उक्त्वा एवम् य : अन्यथा कुर्यात् विप्रियम् तत्र जायते || २७१ ||

**अन्वय : -** त्वयि जीवन्त्याम् जीवामि, अहमदास :, त्वम् च मे प्रिया एवम् उक्त्वा य : अन्यथा कुर्यात् तत्र विप्रियम् जायते |

**अर्थ** – "तू जिवंत आहेस म्हणूनच मी जीवंत आहे . मी तुझा दास आहे, तू माझी प्रियतमा आहेस" असे सांगून जेव्हा नायक विरूद्ध आचरण करतो, तेव्हा त्यास 'विप्रिय' असे म्हणतात .

### ❖ विप्रियाचा अभिनय ❖

**दूतीलेखप्रतिवचनभेदनैः क्रोधहसितरुदितैश्च |**
**विप्रियकरणेऽभिनयः सशिरःकम्पैश्च कर्तव्यः || २७२ ||**

**पदच्छेदः-** दूतीलेख-प्रतिवचन-भेदनैः क्रोध-हसित-रुदितैः च |
विप्रियकरणे अभिनयः सशिरःकम्पैः च कर्तव्यः || २७२ ||

**अन्वयः -** दूतीलेखप्रतिवचनभेदनैः क्रोधहसितरुदितैः च सशिरःकम्पैः च विप्रियकरणे अभिनयः कर्तव्यः |

**अर्थ -** दूतीचे पत्र आणि प्रत्युत्तर यात तफावत दर्शविण्यासाठी राग करणे, हसणे, रडणे, मान हलविणे इत्यादींद्वारे विप्रियाचा अभिनय करावा.

### ❖ 'मन्यु' ❖

**प्रतिपक्षसकाशात्तु यः सौभाग्यविकत्थनः |**
**उपसर्पेत्सचिह्नस्तु मन्युस्तत्रोपजायते || २७३ ||**

**पदच्छेदः-** प्रतिपक्ष-सकाशात् तु यः सौभाग्य-विकत्थनः |
उपसर्पेत् सचिह्नः तु मन्युः तत्र उपजायते || २७३ ||

**अन्वयः -** यः प्रतिपक्षसकाशात् सौभाग्यविकत्थनः तु सचिह्नः उपसर्पेत् तत्र तु मन्युः उपजायते |

**अर्थ -** जेव्हा नायक दुसऱ्या नायिकेकडे जाऊन सौभाग्याची प्रशंसा करतो आणि शरीरावर रतिचिह्ने घेऊन नायिकेकडे परत येतो तेव्हा त्या नायिकेच्या मनात 'राग' निर्माण होतो.

### ❖ मन्युचा अभिनय ❖

**वलयपरिवर्तनैरथ सुशिथिलमुत्क्षेपणेन रशनायाः |**
**मन्युस्त्वभिनेतव्यः सशङ्कितं बाष्पपूर्णाक्ष्या || २७४ ||**

**पदच्छेदः-** वलय-परिवर्तनैः अथ सुशिथिलम् उत्क्षेपणेन रशनायाः |
मन्युः तु अभिनेतव्यः सशङ्कितम् बाष्पपूर्ण-अक्ष्या || २७४ ||

**अन्वय: –** अथ वलयपरिवर्तनै: रशनाया: सुशिथिलम् उत्क्षेपणेन बाष्पपूर्णाक्ष्या सशङ्कितम् तु मन्यु: अभिनेतव्य: |

**अर्थ –** बांगड्या भिरकावणे, कमरेवरचा अलंकार सैल करून वर फेकणे, अश्रुपूर्ण नेत्रांनी साशंकतेने पाहणे इत्यादी अनुभावांनी नायिकेने मन्युचा अभिनय करावा .

**दृष्ट्वा स्थितं प्रियतमं सशङ्कितं सापराधमतिलज्जम् |**
**ईर्ष्यावचनसमुत्थै: खेदयितव्यो ह्युपालम्भै: || २७५ ||**

**पदच्छेद: –** दृष्ट्वा स्थितम् प्रियतमम् सशङ्कितम् सापराधम् अतिलज्जम् |
ईर्ष्या-वचन-समुत्थै: खेदयितव्य: हि उपालम्भै: || २७५ ||

**अन्वय: –** प्रियतमम् सशङ्कितम् सापराधम् अतिलज्जम् स्थितम् दृष्ट्वा ईर्ष्यावचनसमुत्थै: उपालम्भै: हि खेदयितव्य: |

**अर्थ –** प्रियकराला शंकित, अपराधी व लज्जित झालेले पाहून नायिकेने ईर्ष्यापूर्ण वाक्यांचा वापर करून अपमानास्पद शब्दांनी त्याला दु:खी करावे .

**न च निष्ठुरमभिभाष्यो न चाप्यतिक्रोधनस्तु परिहास: |**
**बाष्पोन्मिश्रैर्वचनैरात्मोपन्याससंयुक्तै: || २७६ ||**
**मध्याङ्गुल्यङ्गुष्ठाग्रविच्यवात्पाणिनोरसि कृतेन |**
**उद्वर्तितनेत्रतया प्रततैरभिवीक्षणैश्चापि || २७७ ||**
**कटिहस्तविवर्तनया विच्छिन्नतया तथाञ्जले: करणात् |**
**मूर्धभ्रमणनिहञ्चितनिपातसंश्लेषणाच्चापि || २७८ ||**
**अवहित्थवीक्षणाद्वा अङ्गुलिभङ्गेन तर्जनैर्ललितै: |**
**एभिर्भावविशेषैरनुनयनेष्वभिनय: कार्य: || २७९ ||**

**पदच्छेद: –** न च निष्ठुरम् अभिभाष्य: न च अपि अतिक्रोधन: तु परिहास: |
बाष्प-उन्मिश्रै: वचनै: आत्म-उपन्यास-संयुक्तै: || २७६ ||
मध्याङ्गुली-अङ्गुष्ठाग्र-विच्यवात् पाणिना उरसि कृतेन |
उद्वर्तित-नेत्रतया प्रततै: अभिवीक्षणै: च अपि || २७७ ||

कटिहस्त-विवर्तनया विच्छिन्नतया तथा अञ्जले: करणात् |
मूर्धभ्रमण-निहञ्चित-निपातसंश्लेपणात् च अपि || २७८ ||
अवहित्थ-वीक्षणात् वा अङ्गुलि-भङ्गेन तर्जनै: ललितै: |
एभि: भावविशेपै: अनुनयनेपु अभिनय: कार्य: || २७९ ||

**अन्वय: –** न च निष्ठुरम् अभिभाष्य:, न अतिक्रोधन: परिहास: तु (कार्य:) | वाष्पोन्मिश्रै: आत्मोपन्यासंयुक्तै: वचनै:, मध्याङ्गुल्यङ्गुष्ठाग्रविच्यवात् उरसि कृतेन पाणिना उद्वर्तितनेत्रतया प्रततै: अपि च अभिवीक्षणै:, कटिहस्तविवर्तनया विच्छिन्नतया तथा अञ्जले: करणात् अपि च मूर्धभ्रमणनिहञ्चितनिपातसंश्लेपणात् अवहित्थवीक्षणात् वा अङ्गुलिभङ्गेन ललितै: तर्जनै: एभि: भावविशेपै: अनुनयनेपु अभिनय: कार्य: |

**अर्थ –** निर्दयी होऊन प्रियकराला कुठलेही कठोर अभद्र असे वचन बोलू नये, खूप राग येईल अशी थट्टा करू नये. अश्रुपूर्ण नेत्रांनी स्वत:लाच घालूनपाडून बोलण्याचा अभिनय करावा. अंगठ्याने मधल्या बोटाला दाबून हात छातीवर ठेवावा, डोळे गरगर फिरवत नायिकेने जमिनीवर पडण्याचा आणि एकटक पाहण्याचा अभिनय करावा. कमरेवर हात ठेवत गोल फिरवित किंचित वाकवलेला असा अंजलिहस्त क्षमा मागण्याच्या दृष्टीने डोक्यावरून फिरवत खाली आणावा, आणि भाव लपवित दृष्टिक्षेप करावा, तसेच बोटे मोडत लालित्यपूर्ण शाब्दिक फटकाऱ्यांसह विशेष भावांद्वारे नायिकेने नायकासमोर अभिनय करावा.

**शोभसे साधु दृष्टोऽसि गच्छ त्वं किं विलम्बसे |**
**मा मां स्प्राक्षी: प्रिया यत्र तत्र या ते हृदि स्थिता || २८० ||**
**गच्छेत्युक्त्वा परावृत्य विनिवृत्तान्तरेण तु |**
**केनचिद्वचनार्थेन प्रहर्ष योजयेत्पुन: || २८१ ||**

**पदच्छेद: –** शोभसे साधु दृष्ट: असि गच्छ त्वम् किम् विलम्बसे |
मा माम् स्प्राक्षी: प्रिया यत्र तत्र या ते हृदि स्थिता || २८० ||
गच्छ इति उक्त्वा परावृत्य विनिवृत्तान्तरेण तु |
केनचित् वचनार्थेन प्रहर्षम् योजयेत् पुन: || २८१ ||

**अन्वय:** – "शोभसे साधु दृष्ट: असि, त्वम् गच्छ, किम् विलम्बसे, माम् मा स्प्राक्षी :, यत्र ते हृदि स्थिता या प्रिया तत्र गच्छ" इति उक्त्वा विनिवृत्तान्तरेण परावृत्य तु केनचित् वचनार्थेन पुन: प्रहर्षम् योजयेत्।

**अर्थ** – "छान दिसतोयस तू. जा तू. का उशीर करतोयस? हात लावू नकोस मला. जिथे तुझ्या हृदयात असलेली प्रेयसी आहे तिथेच जा." असे बोलून नायिका लगेच विचार बदलून मागे फिरून कोणत्यातरी अन्य शब्दांद्वारे पुन्हा आनंदाची योजना करावी.

**रभसग्रहणाच्चापि हस्ते वस्त्रे च मूर्धनि।**
**कार्यं प्रसादनं नार्या ह्यपराधं समीक्ष्य तु ॥ २८२ ॥**

**पदच्छेद:** – रभसग्रहणात् च अपि हस्ते वस्त्रे च मूर्धनि।
कार्यम् प्रसादनम् नार्याम् हि अपराधम् समीक्ष्य तु ॥ २८२ ॥

**अन्वय:** – अपराधम् तु समीक्ष्य अपि च हस्ते वस्त्रे मूर्धनि च रभसग्रहणात् नार्याम् हि प्रसादनम् कार्यम्।

**अर्थ** – आपली चूक झाली आहे हे कळल्यावर नायकाने नायिकेचा हात, वस्त्र आणि केस बलपूर्वक पकडून तिला प्रसन्न करायचा प्रयत्न करावा.

### ❖ नायक-नायिकेच्या प्रतिक्रिया ❖

**हस्ते वस्त्रेऽथ केशान्ते नार्याप्यथ गृहीतया।**
**कान्तमेवोपसर्पन्त्या कर्तव्यं मोक्षणं शनै: ॥ २८३ ॥**

**पदच्छेद:** – हस्ते वस्त्रे अथ केशान्ते नार्या अपि अथ गृहीतया।
कान्तम् एव उपसर्पन्त्या कर्तव्यम् मोक्षणम् शनै: ॥ २८३ ॥

**अन्वय:** – अथ हस्ते वस्त्रे अपि केशान्ते गृहीतया अथ कान्तम् एव उपसर्पन्त्या नार्या शनै: मोक्षणम् कर्तव्यम्।

**अर्थ** – यानंतर जिचा हात, वस्त्र आणि केस पकडले गेले आहेत आणि प्रियकराच्या जवळ जाणारी आहे अशा त्या नायिकेने हळूहळू स्वत:चा हात, वस्त्र, केस सोडवण्याचा प्रयत्न करावा.

**गृहीतयाथ केशान्ते हस्ते वस्त्रेऽथवा पुन: |**
**हुं मुञ्चेत्युपसर्पन्त्या वाच्य: स्पर्शालसं प्रिय: || २८४ ||**

**पदच्छेद:** – गृहीतया अथ केशान्ते हस्ते वस्त्रे अथवा पुन: |
हुम्मुञ्च इति उपसर्पन्त्या वाच्य: स्पर्शालसम् प्रिय: || २८४ ||

**अन्वय:** – प्रिय: अथवा पुन: केशान्ते हस्ते वस्त्रे गृहीतया अथ "हुम् मुञ्च" इति उपसर्पन्त्या स्पर्शालसम् वाच्य: |

**अर्थ** – प्रियकराने पुन्हा हात, वस्त्र आणि केस धरल्यावर नायिकेने "हुं सोड मला ." असे म्हणत नायकाजवळ जात असताना त्याच्या स्पर्शसुखाविषयी तिने अगदीच नावड दर्शवावी आणि तसे बोलूनही दाखवावे .

**पादाग्रस्थितया नार्या किञ्चित्कुट्टमितोत्कटम् |**
**अस्वक्रान्तेन कर्तव्यं केशानां मोक्षणं शनै: || २८५ ||**

**पदच्छेद:** – पादाग्र-स्थितया नार्या किञ्चित् कुट्टमितोत्कटम् |
अश्वक्रान्तेन कर्तव्यम् केशानाम् मोक्षणम् शनै: || २८५ ||

**अन्वय:** – पादाग्रस्थितया नार्या किञ्चित् कुट्टमितोत्कटम् अश्वक्रान्तेन शनै: केशानाम् मोक्षणम् कर्तव्यम् |

**अर्थ** – पायाच्या पंजावर उभे राहत नायिकेने प्रियकराचा तिरस्कार करून अश्वक्रान्ता चारीने चालत हळूहळू स्वत:चे केस त्याच्या तावडीतून सोडवावे .

**अमुच्यमाने केशान्ते संजातस्वेदलेशया |**
**हं हु मुञ्चापसर्पेति वाच्य: स्पर्शालसाङ्गया || २८६ ||**

**पदच्छेद:** – अमुच्यमाने केशान्ते संजात-स्वेद-लेशया |
हम् हु मुञ्च अपसर्प इति वाच्य: स्पर्शालस-अङ्गया || २८६ ||

**अन्वय:** – अमुच्यमाने केशान्ते संजातस्वेदलेशया स्पर्शालसाङ्गया "हं हु मुञ्च अपसर्प" इति वाच्य: |

**अर्थ** – प्रियकर केस सोडतच नसल्याने थोडा घाम आलेल्या, स्पर्शाच्या बाबतीत अंग संकुचित करणाऱ्या नायिकेने "हं हु सोडा मला, जा तुम्ही ." असे बोलावे .

**गच्छेति रोषवाक्येन गत्वा प्रतिनिवृत्य च |**
**केनचिद्वचनार्थेन वाच्यं यास्यसि नेति च || २८७ ||**

**पदच्छेद :–** गच्छ इति रोषवाक्येन गत्वा प्रतिनिवृत्य च |
केनचित् वचनार्थेन वाच्यम् यास्यसि न इति च || २८७ ||

**अन्वय :** – गच्छ इति रोषवाक्येन गत्वा प्रतिनिवृत्य च केनचित् च वचनार्थेन न यास्यसि इति वाच्यम् |

**अर्थ** – "जा ." असे रागाने बोलल्यानंतर दूर जाऊन आणि परत येऊन काहीतरी बोलण्यासाठी "नाही जाणार का?" असे विचारावे .

**विधूननेन हस्तेन हुंकारं संप्रयोजयेत् |**
**स चावधूनने कार्य: शपथैर्व्याज एव च || २८८ ||**

**पदच्छेद :–** विधूननेन हस्तेन हुंकारम् संप्रयोजयेत् |
स : च अवधूनने कार्य : शपथै : व्याज : एव च || २८८ ||

**अन्वय :** – विधूननेन हस्तेन हुंकारम् संप्रयोजयेत् | स : च अवधूनने शपथै : एव च व्याज : कार्य : |

**अर्थ** – नायकाने हात हलवित 'हुंकाराचा' प्रयोग करावा आणि हात हलविताना शपथ घेऊन नंतर तिच्याशी लाडीगोडी करावी .

**अक्ष्णो: संवरणे कार्य पृष्ठतश्चोपगूहनम् |**
**नार्यास्त्वपहृते वस्त्रे दीपच्छादनमेव च || २८९ ||**

**पदच्छेद :–** अक्ष्णो : संवरणे कार्यम् पृष्ठत : च उपगूहनम् |
नार्या : तु अपहृते वस्त्रे दीपच्छादनम् एव च || २८९ ||

**अन्वय :** – अक्ष्णो : संवरणे पृष्ठत : उपगूहनम् कार्यम् | नार्या : तु अपहृते वस्त्रे दीपच्छादनम् एव च |

**अर्थ** – नंतर प्रेयसीचे डोळे झाकत प्रियकराने तिच्या मागे लपावे . नायिकेचे वस्त्र दूर करत लगेच दिवा विजवावा .

**तावत्खेदयितव्यस्तु यावत्पादगतो भवेत् |**
**ततश्चरणयोर्याते कुर्याद्दूतीनिरीक्षणम् ||२९०||**

**पदच्छेद :-** तावत् खेदयितव्य : तु यावत् पादगत : भवेत् |
तत : चरणयो : याते कुर्यात् दूतीनिरीक्षणम् || २९० ||

**अन्वय : –** तावत् तु खेदयितव्य: यावत् पादगत: भवेत् | तत: चरणयो: याते दूतीनिरीक्षणम् कुर्यात् |

**अर्थ –** अशाप्रमाणे नायिकेने नायकाला तोवर त्रास द्यावा जोपर्यंत तो तिच्या पाया पडत नाही आणि नायकाने पाया पडल्यावरोबर नायिकेने दूतीला इशारा करावा .

**उत्थाप्यालिङ्गयेच्चैव नायिका नायकं तत: |**
**रतिभोगगता हृष्टा शयनाभिमुखी व्रजेत् ||२९१||**

**पदच्छेद :-** उत्थाप्य आलिङ्गयेत् च एव नायिका नायकम् तत : |
रतिभोग-गता हृष्टा शयन-अभिमुखी व्रजेत् || २९१ ||

**अन्वय : –** तत : नायिकानायकम् उत्थाप्य एव च आलिङ्गयेत् | रतिभोगगता हृष्टा शयनाभिमुखी व्रजेत् |

**अर्थ –** त्यानंतर पायाशी असलेल्या नायकाला उठवून नायिकेने आलिंगन द्यावे आणि रतिभोगासाठी आनंदी झालेल्या नायिकेने शयनकक्षाकडे जावे .

**❖ शृंगारयुक्त वातावरणासाठीचे उपकरण ❖**

**एतद्गीतविधानेन सुकुमारेण योजयेत् |**
**यदा शृङ्गारसंयुक्तं रतिसंभोगकारणम् || २९२ ||**

**पदच्छेद :-** एतत् गीतविधानेन सुकुमारेण योजयेत् |
यदा शृङ्गार-संयुक्तम् रतिसंभोग-कारणम् || २९२ ||

**अन्वय : –** एतत् सुकुमारेण गीतविधानेन योजयेत् यदा रतिसंभोगकारणम् शृङ्गारसंयुक्तम् (भवेत्) |

**अर्थ –** यासाठी सुकुमार गीतांची योजना करावी ज्याद्वारे रतिसंभोगासाठी शृंगारयुक्त वातावरण निर्माण होईल .

**यदा चाकाशपुरुषपरस्थवचनाश्रयम् |**
**भवेत्काव्यं तदा ह्येष कर्तव्योऽभिनयः स्त्रिया || २९३ ||**

**पदच्छेद :–** यदा च आकाशपुरुष-परस्थ-वचनाश्रयम् |
भवेत् काव्यम् तदा हि एष : कर्तव्य : अभिनय : स्त्रिया || २९३ ||

**अन्वय : –** यदा च आकाशपुरुषपरस्थवचनाश्रयम् काव्यम् भवेत् तदा हि स्त्रिया एष: अभिनय: कर्तव्य : |

**अर्थ –** जेव्हा आकाशपुरुष, परपुरुषावर आधारित काव्य असेल तेव्हादेखील स्त्रीपात्राने असाच अभिनय करावा .

**यदन्त:पुरसंबन्धं काव्यं भवति नाटके |**
**शृङ्गाररससंयुक्तं तत्राप्येष विधिर्भवेत् || २९४ ||**

**पदच्छेद :–** यत् अन्त :पुर-संबन्धम् काव्यम् भवति नाटके |
शृङ्गाररस-संयुक्तम् तत्र अपि एष : विधि : भवेत् || २९४ ||

**अन्वय : –** नाटके यत् अन्त :पुरसंबन्धम् शृङ्गाररससंयुक्तम् काव्यम् भवति तत्र अपि एष: विधि: भवेत् |

**अर्थ –** जेव्हा नाटकात अंत:पुराविषयीचे शृंगाररसयुक्त काव्य असेल तेथेदेखील हा विधी योजावा .

**न कार्यं शयनं रङ्गे नाट्यधर्मं विजानता |**
**केनचिद्वचनार्थेन अङ्कच्छेदो विधीयते || २९५ ||**

**पदच्छेद :–** न कार्यम् शयनम् रङ्गे नाट्यधर्मम् विजानता |
केनचित् वचनार्थेन अङ्कच्छेद : विधीयते || २९५ ||

**अन्वय : –** नाट्यधर्मम् विजानता रङ्गे शयनम् न कार्यम् | केनचित् वचनार्थेन अङ्कच्छेद: विधीयते |

**अर्थ** – नाट्यधर्म जाणणाऱ्यांनी रंगमंचावर झोपू नये . कुठल्यातरी विलक्षण अर्थपूर्ण वाक्यांनी अंकच्छेद करावा असे सांगितले आहे .

**यद्वा शयीतार्थवशादेकाकी सहितोऽपि वा |**
**चुम्बनालिङ्गनं चैव तथा गुह्यं च यद्भवेत् || २९६ ||**

**पदच्छेद :** – यत् वा शयीतार्थ-वशात् एकाकी सहित: अपि वा |
चुम्बन-आलिङ्गनम् च एव तथा गुह्यम् च यत् भवेत् || २९६ ||

**अन्वय :** – यत् वा शयीतार्थवशात् एकाकी सहित: अपि वा तथा च यत् गुह्यम् चुम्बनालिङ्गनम् एव च भवेत् |

**अर्थ** – किंवा नायिका झोपली असल्याने नायक जर एकटाच असेल किंवा तो नायिकेसह असेल तर नायक गुप्तपणे चुंवन, आलिंगनपण करू शकतो .

**❖ रंगमंचावरील प्रतिबंधित दृश्यांचे नियम ❖**

**दन्तच्छेद्यं नखच्छेद्यं नीवीसंस्रनमेव च |**
**स्तनान्तरविमर्द च रङ्गमध्ये न कारयेत् || २९७ ||**

**पदच्छेद :** – दन्तच्छेद्यम् नखच्छेद्यम् नीवी-संस्रनम् एव च |
स्तनान्तर-विमर्दम् च रङ्गमध्ये न कारयेत् || २९७ ||

**अन्वय :** – दन्तच्छेद्यम् नखच्छेद्यम् नीवीसंस्रनम् एव च स्तनान्तरविमर्दम् च रङ्गमध्ये न कारयेत् |

**अर्थ** – दाताने चावणे, नखाने ओरवाडणे, नीऱ्या सोडणे व स्तनांचे मर्दन याचा अभिनय रंगमंचावर करू नये .

**भोजनं सलिलक्रीडा तथा लज्जाकरं च यत् |**
**एवंविधं भवेद्यद्यत्तत्तद्रङ्गे न कारयेत् || २९८ ||**

**पदच्छेद :** – भोजनम् सलिलक्रीडा तथा लज्जाकरम् च यत् |
एवंविधम् भवेत् यत् यत् तत् तत् रङ्गे न कारयेत् || २९८ ||

**अन्वय:** – भोजनम् सलिलक्रीडा तथा च यत् लज्जाकरम् भवेत् एवंविधम् यत् यत् तत् तत् रङ्गे न कारयेत् |

**अर्थ** – जेवण जलक्रीडा आणि तसेच जे जे लज्जास्पद कार्य असेल, ते ते रंगमंचावर दाखवू नये .

**पितापुत्रस्नुषाश्वश्रूदृश्यं यस्मात्तु नाटकम् |**
**तस्मादेतानि सर्वाणि वर्जनीयानि यत्नत: || २९९ ||**

**पदच्छेद:** – पिता-पुत्र-स्नुषा-श्वश्रू-दृश्यम् यस्मात् तु नाटकम् |
तस्मात् एतानि सर्वाणि वर्जनीयानि यत्नत: || २९९ ||

**अन्वय:** – यस्मात् तु पितापुत्रस्नुषाश्वश्रूदृश्यम् नाटकम् तस्मात् एतानि सर्वाणि यत्नत: वर्जनीयानि |

**अर्थ** – कारण पिता, पुत्र, सून, सासू हे सर्व एकत्र बसून नाटक बघत असतात, आणि म्हणून नाटककारांनी काळजीपूर्वक ही दृश्ये टाळावीत .

**वाक्यै: सातिशयै: श्रव्यैर्मधुरैर्नातिनिष्ठुरै: |**
**हितोपदेशसंयुक्तैस्तज्ज्ञ: कुर्यात्तु नाटकम् || ३०० ||**

**पदच्छेद:** – वाक्यै: सातिशयै: श्रव्यै: मधुरै :न अतिनिष्ठुरै : |
हितोपदेशसंयुक्तै: तज्ज्ञ: कुर्यात् तु नाटकम् || ३०० ||

**अन्वय:** – तज्ज्ञ: तु सातिशयै: श्रव्यै: मधुरै: हितोपदेशसंयुक्तै: न अतिनिष्ठुरै: वाक्यै: नाटकम् कुर्यात् |

**अर्थ** – नाटककारांनी अतिशय समृद्ध, सुश्राव्य, मधुर, हितोपदेशाने युक्त आणि निष्ठुरतारहित वाक्य असणारे नाटक प्रदर्शित करावे .

**एवमन्त:पुरकृत: कार्यस्त्वभिनयो बुधै: |**

**पदच्छेद:** – एवम् अन्त:पुरकृत: कार्य: तु अभिनय: बुधै: |

**अन्वय:** – एवम् तु बुधै: अन्त:पुरकृत: अभिनय: कार्य: |

**अर्थ** – याप्रमाणे विद्वानांनी अंत:पुरातील प्रसंगाचा अभिनय करावा .

❖ स्त्रियांद्वारे प्रियकराविषयीची संबोधने ❖

**समागमेऽथ नारीणां वाच्यानि मदनाश्रये || ३०१ ||**
**प्रियेषु वचनानीह यानि तानि निबोधत |**
**प्रिय: कान्तो विनीतश्च नाथ: स्वाम्यथ जीवितम् || ३०२ ||**
**नन्दनश्चेत्यभिप्रीते वचनानि भवन्ति हि |**
**दु:शीलोऽथ दुराचार: शठो वामो विकत्थन: || ३०३ ||**
**निर्लज्जो निष्ठुरश्चैव प्रिय: क्रोधेऽभिधीयते |**

**पदच्छेद:** – समागमे अथ नारीणाम् वाच्यानि मदनाश्रये || ३०१ ||
प्रियेषु वचनानि इह यानि तानि निबोधत |
प्रिय: कान्त: विनीत: च नाथ: स्वामि अथ जीवितम् || ३०२ ||
नन्दन: च इति अभिप्रीते वचनानि भवन्ति हि |
दु:शील: अथ दुराचार: शठ: वाम: विकत्थन: || ३०३ ||
निर्लज्ज: निष्ठुर: च एव प्रिय: क्रोधे अभिधीयते |

**अन्वय:** – अथ नारीणाम् मदनाश्रये समागमे इह यानि वचनानि प्रियेषु वाच्यानि तानि निबोधत | अथ अभिप्रीते हि प्रिय: कान्त: विनीत: च नाथ: स्वामि जीवितम् नन्दन: च इति वचनानि भवन्ति | अथ प्रिय: क्रोधे दु:शील: दुराचार: शठ: वाम: विकत्थन: निर्लज्ज: निष्ठुर: एव च अभिधीयते |

**अर्थ** – स्त्रियांनी कामुक झाल्यावर आणि समागमाच्या वेळी प्रियकराला कोणत्या शब्दाने संबोधावे, हे आता नीट समजून घ्या . प्रिय, कांत, विनीत, नाथ, स्वामी, जीवित, नंदन इत्यादी शब्द प्रियकरासाठी वापरावे आणि रागाच्या भरात नायिका प्रियकराला दु:शील, दुराचार, शठ, वाम, विकत्थन, निर्लज्ज, निष्ठुर शब्दांनी वाक्ताडन करू शकते .

❖ प्रिय ❖

**यो विप्रियं न कुरुते न चायुक्तं प्रभाषते || ३०४ ||**
**तथार्जवसमाचार: स प्रियस्त्वभिधीयते |**

**पदच्छेद:-** य: विप्रियम् न कुरुते न च अयुक्तम् प्रभापते || ३०४ ||
तथा आर्जवसमाचार: स: प्रिय: तु अभिधीयते |

**अन्वय: -** य: विप्रियम् न कुरुते अयुक्तम् च न प्रभापते तथा आर्जवसमाचार: स: तु प्रिय: अभिधीयते |

**अर्थ -** जो कोणाचे वाईट करत नाही, वाईट बोलत नाही, तसेच मृदु आचरण करतो त्यास 'प्रिय' म्हणतात .

**❖ कान्त ❖**

**अन्यनारीसमुद्भूतं चिह्नं यस्य न दृश्यते || ३०५ ||**
**अधरे वा शरीरे वा स कान्त इति भाष्यते |**

**पदच्छेद:-** अन्यनारी-समुद्भूतम् चिह्नम् यस्य न दृश्यते || ३०५ ||
अधरे वा शरीरे वा स: कान्त: इति भाष्यते |

**अन्वय: -** यस्य अधरे वा शरीरे वा अन्यनारीसमुद्भूतम् चिह्नम् न दृश्यते स: कान्त: इति भाष्यते |

**अर्थ -** ज्याच्या ओठांवर किंवा शरीरावर संभोगाच्या वेळी परस्त्रीद्वारे केलेली रतिचिह्ने दिसत नाहीत, त्यास 'कांत' असे म्हणतात .

**❖ विनीत ❖**

**संक्रुद्धेऽपि हि यो नार्या नोत्तरं प्रतिपद्यते || ३०६ ||**
**परुषं वा न वदति विनीत: सोऽभिधीयते |**

**पदच्छेद:-** संक्रुद्धे अपि हि य: नार्या न उत्तरम् प्रतिपद्यते || ३०६ ||
परुषम् वा न वदति विनीत: स: अभिधीयते |

**अन्वय: -** नार्या संक्रुद्धे अपि हि य: उत्तरम् न प्रतिपद्यते परुषम् वा न वदति स: विनीत: अभिधीयते |

**अर्थ -** स्त्री रागावली तरी जो प्रत्युत्तर देत नाही किंवा कठोरपणे बोलत नाही त्यास 'विनीत' असे म्हणतात .

**❖ नाथ ❖**

**हितैषी रक्षणे शक्तो न मानी न च मत्सरी || ३०७ ||**
**सर्वकार्येष्वसंमूढः स नाथ इति संज्ञितः |**

**पदच्छेद :–** हितैषी रक्षणे शक्तः न मानी न च मत्सरी || ३०७ ||
सर्वकार्येषु असंमूढः सः नाथः इति संज्ञितः |

**अन्वय : –** हितैषी रक्षणे शक्तः न मानी न च मत्सरी सर्वकार्येषु असंमूढः सः नाथः इति संज्ञितः |

**अर्थ –** जो शुभचिंतक आहे, जो रक्षण करण्यास समर्थ आहे, जो मानी नाही आणि जो कोणाची ईर्ष्या करीत नाही, जो सर्व कामात हुशार असतो त्यास 'नाथ' असे म्हणतात .

**❖ स्वामी ❖**

**सामदानार्थसंभोगैस्तथा लालनपालनैः || ३०८ ||**
**नारीं निषेवते यस्तु स स्वामीत्यभिधीयते |**

**पदच्छेद :–** सामदानार्थ-संभोगैः तथा लालन-पालनैः || ३०८ ||
नारीम् निषेवते यः तु सः स्वामि इति अभिधीयते |

**अन्वय : –** सामदानार्थसंभोगैः तथा लालनपालनैः यः तु नारीम् निषेवते सः स्वामी इति अभिधीयते |

**अर्थ –** जो साम, दान, अर्थ, संभोग तसेच लालन पालन इत्यादींद्वारे स्त्रीला आनंद देतो, त्यास 'स्वामी' असे म्हणतात .

**❖ जीवित ❖**

**नारीप्सितैरभिप्रायैर्निपुणं शयनक्रियाम् || ३०९ ||**
**करोति यस्तु संभोगे स जीवितमिति स्मृतः |**

**पदच्छेद :–** नारीप्सितैः अभिप्रायैः निपुणं शयनक्रियाम् || ३०९ ||
करोति यः तु संभोगे सः जीवितम् इति स्मृतः |

**अन्वय : –** यः तु संभोगे नारीप्सितैः अभिप्रायैः शयनक्रियां निपुणं करोति सः जीवितम् इति स्मृतः |

**अर्थ –** जो संभोगाच्या वेळी स्त्रीच्या इच्छेप्रमाणे तिच्या म्हणण्याप्रमाणे चतुराईने शयनक्रिया करतो त्यास 'जीवित' असे म्हणतात .

❖ नंदन ❖

**कुलीनो धृतिमान्दक्षो दक्षिणो वाग्विशारद: || ३१० ||**
**श्लाघनीय: सखीमध्ये नन्दन: सोऽभिधीयते |**
**एते वचनविन्यासा रतिप्रीतिकरा: स्मृता: || ३११ ||**

**पदच्छेद:–** कुलीन: धृतिमान् दक्ष: दक्षिण: वाग्विशारद: || ३१० ||
श्लाघनीय: सखीमध्ये नन्दन: स: अभिधीयते |
एते वचनविन्यासा: रतिप्रीतिकरा: स्मृता: || ३११ ||

**अन्वय: –** (य:) कुलीन: धृतिमान् दक्ष: दक्षिण: वाग्विशारद: सखीमध्ये श्लाघनीय: स: नन्दन: अभिधीयते | एते वचनविन्यासा: रतिप्रीतिकरा: स्मृता: |

**अर्थ –** जो कुलीन आहे, धैर्यशाली आहे, दक्ष आहे, सर्व गोष्टीत जो उजवा आहे, जो बोलण्यात हुशार आहे, जो मैत्रिणींमध्ये कौतुकास्पद आहे (आवडता आहे), त्यास 'नंदन' असे म्हणतात . ही सर्व संबोधने प्रेमामध्ये योजावीत असे सांगितले आहे .

**तथा चाप्रीतिवाक्यानि गदतो मे निबोधत |**

**पदच्छेद:–** तथा च अप्रीतिवाक्यानि गदत: मे निबोधत |

**अन्वय: –** तथा च अप्रीतिवाक्यानि गदत: मे निबोधत |

**अर्थ –** आता रागामध्ये कोणती संबोधने वापरावीत ते जाणून घ्या .

❖ दु:शील ❖

**निष्ठुरश्चासहिष्णुश्च मानी धृष्टो विकत्थन: || ३१२ ||**
**अनवस्थितचित्तश्च दु:शील इति स स्मृत: |**

**पदच्छेद:–** निष्ठुर: च असहिष्णु: च मानी धृष्ट: विकत्थन: || ३१२ ||
अनवस्थितचित्त: च दु:शील: इति स: स्मृत: |

**अन्वय: –** निष्ठुर: च असहिष्णु: मानी धृष्ट: विकत्थन: च अनवस्थितचित्त: च स: दु:शील: इति स्मृत: |

**अर्थ** – जो निष्ठुर, असहनशील, मानी, गर्विष्ठ, बढाई मारणारा आणि जो चंचल स्वभावाचा आहे त्यास 'दु:शील' असे म्हटले गेले आहे.

**❖ दुराचारी ❖**

**ताडनं बन्धनं चापि यो विमृश्य समाचरेत् ॥ ३१३ ॥**
**तथा परुषवाक्यश्च दुराचार: स तन्यते ।**

**पदच्छेद:** – ताडनम् बन्धनम् च अपि य: विमृश्य समाचरेत् ॥ ३१३ ॥
तथा परुषवाक्य: च दुराचार: स: तन्यते ।

**अन्वय:** – य: ताडनम् अपि च बन्धनम् विमृश्य समाचरेत् तथा च परुषवाक्य:(अस्ति) स: दुराचार: तन्यते ।

**अर्थ** – जो ताडन आणि बंधन यांचा नीट विचार करून त्याप्रमाणे आचरण करतो तसेच कठोर शब्दांचा वापर करतो, त्यास 'दुराचारि' असे म्हणतात.

**❖ शठ ❖**

**वाचैव मधुरो यस्तु कर्मणा नोपपादक: ॥ ३१४ ॥**
**योषित: किञ्चिदप्यर्थं स शठ: परिभाष्यते ।**

**पदच्छेद:** – वाचा एव मधुर: य: तु कर्मणा न उपपादक: ॥ ३१४ ॥
योषित: किञ्चित् अपि अर्थम् स: शठ: परिभाष्यते ।

**अन्वय:** – य: तु वाचा एव मधुर: कर्मणा तु न उपपादक: तथा योषित: किञ्चित् अपि अर्थम् (न करोति) स: शठ: परिभाष्यते ।

**अर्थ** – ज्याची वाणी मधुर आहे परंतु काम मात्र पूर्ण करीत नाही तसेच स्त्रीला अपेक्षित असे कोणतेही कार्य करत नाही त्यास 'शठ' असे म्हणतात.

**❖ वाम ❖**

**वार्यते यत्र यत्रार्थे तत्तदेव करोति य: ॥ ३१५ ॥**
**विपरीतनिवेशो च स वाम इति संज्ञित: ।**

**पदच्छेद:–** वार्यते यत्र यत्र अर्थे तत् तद् एव करोति य: || ३१५ ||
विपरीतनिवेश: च स: वाम: इति संज्ञित: |

**अन्वय: –** यत्र यत्र अर्थे वार्यते तत् तत् एव य: करोति तथा विपरीतनिवेश: च स: वाम: इति संज्ञित: |

**अर्थ –** जो वारंवार 'नाही' म्हटल्यानंतर देखील परत परत तेच कार्य करतो किंवा विपरीत कार्य करण्याचा आग्रह धरतो त्यास 'वाम' म्हणतात.

**❖ विकत्थन ❖**

**सरसव्रणचिह्नो य: स्त्रीसौभाग्यविकत्थन: || ३१६ ||**
**अतिमानी तथा स्तब्धो विकत्थन इति स्मृत: |**

**पदच्छेद:–** सरस-व्रण-चिह्न: य: स्त्रीसौभाग्य-विकत्थन: || ३१६ ||
अतिमानी तथा स्तब्ध: विकत्थन: इति स्मृत: |

**अन्वय: –** य: सरसव्रणचिह्न: स्त्रीसौभाग्यविकत्थन: अतिमानी तथा स्तब्ध: (स:) विकत्थन: इति स्मृत: |

**अर्थ –** ज्याच्या शरीरावर ताजे दंतक्षत आणि नखांची चिह्ने असतात आणि जो स्वत:च्या स्त्रीच्या सौभाग्याविषयी बढाई मारतो, तसेच अतिमानी बनून जो गप्प राहतो त्यास 'विकत्थन' असे म्हणतात.

**❖ निर्लज्ज ❖**

**वार्यमाणो दृढतरं यो नारीमुपसर्पति || ३१७ ||**
**सचिह्न: सापराधश्च स निर्लज्ज इति स्मृत: |**

**पदच्छेद:–** वार्यमाण: दृढतरम् य: नारीम् उपसर्पति || ३१७ ||
सचिह्न: सापराध: च स: निर्लज्ज: इति स्मृत: |

**अन्वय: –** दृढतरम् वार्यमाण: सचिह्न: सापराध: य: नारीम् उपसर्पति च स: निर्लज्ज: इति स्मृत: |

**अर्थ –** वळजवरी दूर केले तरीही रतिचिह्ने शरीरावर असलेला, अपराध करणारा जो निलाजरेपणाने स्वत:च्या स्त्रीजवळ जातो त्यास 'निर्लज्ज' म्हणतात.

❖ निष्ठुर ❖

**योऽपराद्धस्तु सहसा नारीं सेवितुमिच्छति || ३१८ ||**
**अप्रसादनबुद्धिश्च निष्ठुरः सोऽभिधीयते |**

**पदच्छेद :-** यः अपराद्धः तु सहसा नारीम् सेवितुम् इच्छति || ३१८ ||
अप्रसादनबुद्धिः च निष्ठुरः सः अभिधीयते |

**अन्वय :** – यः तु अपराद्धः सहसा नारीम् सेवितुम् इच्छति अप्रसादनबुद्धिः च (अस्ति) सः निष्ठुरः अभिधीयते | (सहसेति अप्रसाद्य | अ. भा.)

**अर्थ** – जो अपराधी प्रियकर, स्त्रीला प्रसन्न न करता तिच्या इच्छेविरूद्ध संभोगाची इच्छा करतो आणि तिला आनंद देण्याचा विचारसुद्धा करीत नाही त्यास 'निष्ठुर' म्हणतात.

**एते वचनविन्यासाः प्रियाप्रियविभाषिताः || ३१९ ||**
**नर्तकीसंश्रिताः कार्या बहवोऽन्येऽपि नाटके |**

**पदच्छेद :-** एते वचनविन्यासाः प्रिय-अप्रिय-विभाषिताः || ३१९ ||
नर्तकीसंश्रिताः कार्याः बहवः अन्ये अपि नाटके |

**अन्वय :** – एते प्रियाप्रियविभाषिताः नर्तकी-संश्रिताः बहवः अन्ये अपि वचनविन्यासाः नाटके कार्याः |

**अर्थ** – नर्तकीवर आधारित असलेले, प्रिय आणि अप्रिय अवस्थेमध्ये म्हणजेच प्रेमामध्ये आणि रागामध्ये बोलले जाणारे इतर अनेक वचनविन्यास नाटकामध्ये वापरावेत.

❖ शृंगाररसातील वचनविधी ❖

**एष गीतविधाने तु सुकुमारे विधिर्भवेत् || ३२० ||**
**शृङ्गाररससंभूतो रतिसंभोगखेदनः |**

**पदच्छेद :-** एषः गीतविधाने तु सुकुमारे विधिः भवेत् || ३२० ||
शृङ्गार-रस-संभूतः रतिसंभोग-खेदनः |

**अन्वय :** – एष : शृङ्गाररससंभूत : रतिसंभोगखेदन : विधि : तु सुकुमारे गीतविधाने भवेत् |

**अर्थ** – शृंगाररसातून निर्माण होणारा, रतिसंभोगातून खेद देणारा हा विधी सुकुमार अशा गीतांमध्येही योजावा .

**यच्चैवाकाशपुरुषं परस्थवचनाश्रयम् || ३२१ ||**
**शृङ्गार एवं वाच्यं स्यात्तत्राप्येष क्रमो भवेत् |**

**पदच्छेद :** – यत् च एव आकाशपुरुषम् परस्थ-वचनाश्रयम् || ३२१ ||
शृङ्गारे एवम् वाच्यम् स्यात् तत्र अपि एष : क्रम : भवेत् |

**अन्वय :** – यत् एव च परस्थवचनाश्रयम् आकाशपुरुषं शृङ्गारे एवम् वाच्यम् स्यात् तत्र अपि एष : क्रम : भवेत् |

**अर्थ** – आणि दुसऱ्याच्या बोलण्यावर आधारित असलेले, आकाशपुरुषाशी निगडीत असणारे वचनविन्यास शृंगारामध्ये दाखवायचे असताना हाच विधीक्रम असावा .

**यद्वा पुरुषसंबन्धं कार्यं भवति नाटके ||३२२||**
**शृङ्गाररससंयुक्तं तत्राप्येष क्रमो भवेत् |**

**पदच्छेद :** – यत् वा पुरुषसंबन्धम् कार्यम् भवति नाटके || ३२२ ||
शृङ्गाररस-संयुक्तम् तत्र अपि एष : क्रम : भवेत् |

**अन्वय :** – यत् वा नाटके पुरुषसंबन्धम् शृङ्गाररससंयुक्तम् कार्यम् भवति तत्र अपि एष : क्रम : भवेत् |

**अर्थ** – जेव्हा नाटकामध्ये पुरुषांशी संबंधित असलेले शृंगाररसाने युक्त असे जे कार्य असते त्यात देखील हाच क्रम असतो .

**एवमन्त : पुरगत : प्रयोज्योऽभिनयो भवेत् || ३२३ ||**

**पदच्छेद :** – एवम् अन्त : पुरगत : प्रयोज्य : अभिनय : भवेत् || ३२३ ||

**अन्वय :** – एवम् अन्त : पुरगत : अभिनय : प्रयोज्य : भवेत् |

**अर्थ** – याप्रमाणे अन्त :पुरात अभिनय प्रयुक्त केला जावा .

❖ दिव्यांगनांचे भाव ❖

**दिव्याङ्गनानां तु विधिं व्याख्यास्याम्यनुपूर्वशः |**
**नित्यमेवोज्ज्वलो वेषो नित्यं प्रमुदितं मनः ||३२४||**
**नित्यमेव सुखः कालो देवानां ललिताश्रयः |**
**न चेर्ष्या नैव च क्रोधो नासूया न प्रसाधनम् ||३२५||**

**पदच्छेदः –** दिव्य-अङ्गनानाम् तु विधिम् व्याख्यास्यामि अनुपूर्वशः |
नित्यम् एव उज्ज्वलः वेषः नित्यम् प्रमुदितम् मनः || ३२४ ||
नित्यम् एव सुखः कालः देवानाम् ललिताश्रयः |
न च ईर्ष्या न एव च क्रोधः न असूया न प्रसाधनम् || ३२५ ||

**अन्वयः –** दिव्याङ्गनानाम् तु विधिम् अनुपूर्वशः व्याख्यास्यामि | नित्यम् एव उज्ज्वलः वेषः, मनः नित्यम् प्रमुदितम् (तथा च) नित्यम् एव देवानाम् ललिताश्रयः सुखः कालः च (भवेत्) | (यतः) न ईर्ष्या न क्रोधः न असूया न च प्रसाधनम् (अस्ति) |

**अर्थ –** आता दिव्यांगनांविषयीचा विधी क्रमशः सांगतो. देवांचा वेष नेहमी उज्ज्वल असतो, त्यांचे मन नेहमी प्रसन्न असते, देवांच्या ललित क्रीडांमुळे त्यांचा काळ नेहमी सुखमय असतो, कारण देवांमध्ये ईर्ष्या नसते, राग नसतो, असूया नसते आणि बाह्य दिखावा देखील नसतो.

(श्लोक ३२५ मध्ये अर्थाच्या दृष्टीने 'गायकवाड ओरिएण्टल सीरिज'मधील 'प्रसादनम्' या शब्दाऐवजी या 'निर्णयसागर काशी' या आवृत्तीमध्ये असणारा 'प्रसाधनम्' हा पाठ अधिक योग्य वाटतो जो याठिकाणी स्वीकारण्यात आला आहे.)

**दिव्यानां दृश्यते पुंसां शृङ्गारे योषितां तथा |**
**ये भावा मानुषाणां स्युर्यदङ्गं यच्च चेष्टितम् || ३२६ ||**
**सर्वं तदेव कर्तव्यं दिव्यैर्मानुषसङ्गमे |**
**यदा मानुषसंभोगो दिव्यानां योषिता भवेत् || ३२७ ||**
**तदा सर्वाः प्रकर्तव्या ये भावा मानुषाश्रयाः |**

**शापभ्रंशात्तु दिव्यानां तथा चापत्यलिप्सया || ३२८ ||**
**कार्यो मानुषसंयोग: शृङ्गाररससंश्रय: |**

**पदच्छेद: –** दिव्यानाम् दृश्यते पुंसाम् शृङ्गारे योषिताम् तथा |
ये भावा: मानुषाणाम् स्यु: यत् अङ्गम् यत् च चेष्टितम् || ३२६ ||
सर्वम् तत् एव कर्तव्यम् दिव्यै: मानुष-सङ्गमे |
यदा मानुष-संभोग: दिव्यानाम् योषिता भवेत् || ३२७ ||
तदा सर्वा: प्रकर्तव्या: ये भावा: मानुषाश्रया: |
शाप-भ्रंशात् तु दिव्यानाम् तथा च अपत्य-लिप्सया || ३२८ ||
कार्य: मानुषसंयोग: शृङ्गाररससंश्रय: |

**अन्वय: –** शृङ्गारे दिव्यानाम् पुंसां ये भावा: दृश्यते तथा योषिताम् स्यु: | मानुषाणाम् यत् अङ्गम् यत् च चेष्टितम् सर्वम् तदेव दिव्यै: मानुषसङ्गमे कर्तव्यम् | यदा दिव्यानां योषितां मानुषसंभोग: भवेत् तदा ये सर्वा: मानुषाश्रया: भावा: (ते) प्रकर्तव्या: | शापभ्रंशात् तु तथा च अपत्यलिप्सया दिव्यानां शृङ्गाररससंश्रय: मानुषसंयोग: कार्य: |

**अर्थ –** शृंगारविषयी दिव्य पुरुषांचे जे भाव दिसतात तसेच भाव दिव्य स्त्रियांमध्येही दिसून येतात. मनुष्यांच्या ज्या आंगिक चेष्टा आणि व्यवहार असतात ते सर्व, मानवजातीशी संगम होत असताना दिव्य पुरुषांमध्ये दिसून येतात. जेव्हा दिव्य स्त्रियांचा मनुष्यावरोबर संभोग होतो तेव्हा मानवाश्रित जे भाव असतात ते त्यावेळी दर्शवावेत. शापामुळे पदच्युत झाले असताना तसेच पुत्रप्राप्तीची इच्छा असताना दिव्य लोकांच्या बाबतीत शृंगाररसावर आधारित असा मानवी व्यवहार दाखवावा.

**पुष्पैर्भूषणजै: शब्दैरदृश्यापि प्रलोभयेत् || ३२९ ||**
**पुन: संदर्शनं दत्त्वा क्षणादन्तरिता भवेत् |**

**पदच्छेद: –** पुष्पै: भूषणजै: शब्दै: अदृश्या अपि प्रलोभयेत् || ३२९ ||
पुन: संदर्शनम् दत्त्वा क्षणात् अन्तरिता भवेत् |

**अन्वय: –** अदृश्या अपि पुष्पै: भूषणजै: शब्दै: प्रलोभयेत् | पुन: संदर्शनम् दत्त्वा क्षणात् अन्तरिता भवेत् |

**अर्थ –** अदृश्य (दिव्य) नायिकेने फुलांद्वारे किंवा आभूषणांच्या झंकाराने नायकाला प्रलोभित करावे आणि पुन्हा दर्शन देऊन क्षणभरात अंतर्धान पावावे.

**वस्त्राभरणमाल्याद्यैर्लेखसंप्रेषणैरपि || ३३० ||**
**ईदृशैरुपचारैस्तु समुन्माद्यस्तु नायकः |**
**उन्मादनात्समुद्भूतः कामो रतिकरो भवेत् || ३३१ ||**
**स्वभावोपगतो यस्तु नासावत्यर्थभाविकः |**

**पदच्छेदः –** वस्त्र-आभरण-माल्याद्यैः लेख-संप्रेषणैः अपि || ३३० ||
ईदृशैः उपचारैः तु समुन्माद्यः तु नायकः |
उन्मादनात् समुद्भूतः कामः रतिकरः भवेत् || ३३१ ||
स्वभाव-उपगतः यः तु न असौ अत्यर्थ-भाविकः |

**अन्वयः –** वस्त्राभरणमाल्याद्यैः लेखसंप्रेषणैः अपि ईदृशैः तु उपचारैः नायकः तु समुन्माद्यः | उन्मादनात् समुद्भूतः कामः रतिकरः भवेत् | यः तु स्वभावोपगतः असौ अत्यर्थभाविकः न (अस्ति) |

**अर्थ –** वस्त्र, दागिने, माळा इत्यादींद्वारे, तसेच अनेक पत्र पाठवणे यांसारख्या अनेक उपायांनी नायकाला वेड लावावे . कारण उन्मत्त अवस्थेतून होणारा काम रतिसुख प्रदान करणारा असतो . जो काम निसर्गतः निर्माण होतो आणि तो बहुतांशपणे भविष्याचा विचार करणारा नसतो .

**एवं राजोपचारे हि कर्तव्योऽभ्यन्तराश्रयः || ३३२ ||**
**बाह्यामप्युपचारं तु प्रवक्ष्याम्यथ वैशिके |**

**पदच्छेदः –** एवम् राजोपचारे हि कर्तव्यः अभ्यन्तराश्रयः || ३३२ ||
बाह्याम् अपि उपचारम् तु प्रवक्ष्यामि अथ वैशिके |

**अन्वयः –** एवम् हि राजोपचारे अभ्यन्तराश्रयः कर्तव्यः | अथ वैशिके बाह्याम् अपि तु उपचारम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** याप्रमाणे राजाविषयीचा हा कामोपचार त्याच्या अंतःपुरामध्ये करावा आणि बाह्य उपचाराविषयी मी वैशिक प्रकरणामध्ये सांगीन .

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे सामान्याभिनयो नामाध्यायो द्वाविंशः ||**

**|| अशाप्रकारे भरतमुनिविरचित नाट्यशास्त्रातील 'सामान्य अभिनय' नावाचा बावीसावा अध्याय संपला ||**

# तेविसावा अध्याय

## वैशिकोपचार



# तेविसावा अध्याय

## वैशिकोपचार

### ❖ वैशिक पुरुषाचे स्वरूप ❖

**विशेषयेत्कला: सर्वा यस्मात्तस्मात्तु वैशिक:।**
**वेशोपचारे साधुर्वा वैशिक: परिकीर्तित: ॥ १ ॥**

**पदच्छेद:** – विशेषयेत् कला: सर्वा: यस्मात् तस्मात् तु वैशिक:।
वेशोपचारे साधु: वा वैशिक: परिकीर्तित: ॥ १ ॥

**अन्वय:** – यस्मात् सर्वा: कला: विशेषयेत् तस्मात् तु वैशिक:। वेशोपचारे साधु: वा वैशिक: परिकीर्तित:।

**अर्थ** – जो पुरुष सर्व कलांचे वर्णन वैशिष्ट्याने करतो त्याला वैशिक पुरुष म्हणतात किंवा वेश्याव्यवसायामध्ये कुशल व्यक्तिला 'वैशिक' म्हणतात.

**यो हि सर्वकलोपेत: सर्वशिल्पविचक्षण: ।**
**स्त्रीचित्तग्रहणाभिज्ञो वैशिक: स भवेत्पुमान् ॥ २ ॥**

**पदच्छेद:** – य: हि सर्व-कला-उपेत: सर्व-शिल्प-विचक्षण:।
स्त्रीचित्त-ग्रहण-अभिज्ञ: वैशिक: स: भवेत् पुमान् ॥ २ ॥

**अन्वय:** – य: हि सर्वकलोपेत: सर्वशिल्पविचक्षण: स्त्रीचित्तग्रहणाभिज्ञ: स: पुमान् वैशिक: भवेत्।

**अर्थ** – जो सर्व कलांनी युक्त असेल, सर्व शिल्पकलांमध्ये हुशार असेल आणि जो स्त्रियांचे चित्त चोरण्यामध्ये निष्णात असेल तो पुरुष 'वैशिक' म्हणून ओळखला जातो.

### ❖ वैशिक पुरुषाचे गुण ❖

**गुणास्तस्य तु विज्ञेया: स्वशरीरसमुत्थिता:।**
**आहार्या: सहजाश्चैव त्रयस्त्रिंशत्समासत: ॥ ३ ॥**

**पदच्छेद: –** गुणा: तस्य तु विज्ञेया: स्वशरीर-समुत्थिता: |
आहार्या: सहजा: च एव त्रयस्त्रिंशत् समासत: || ३ ||

**अन्वय: –** तस्य तु स्वशरीरसमुत्थिता: त्रयस्त्रिंशत् गुणा: आहार्या: एव च सहजा: (इति) समासत: विज्ञेया: |

**अर्थ –** त्या वैशिक पुरुषाचे शारीरिक, आहार्य आणि स्वाभाविक असे तेहतीस (३३) गुण आहेत.

**शास्त्रविच्छिल्पसम्पन्नो रूपवान्प्रियदर्शन: |**
**विक्रान्तो धृतिमांश्चैव वयोवेषकुलान्वित: || ४ ||**
**सुरभिर्मधुरस्त्यागी सहिष्णुरविकत्थन: |**
**अशङ्कित: प्रियभाषी चतुर: शुभद: शुचि: || ५ ||**
**कामोपचारकुशलो दक्षिणो देशकालवित् |**
**अदीनवाक्य: स्मितवान्वाग्मी दक्ष: प्रियंवद: || ६ ||**
**स्त्रीलुब्ध: संविभागी च श्रद्धधानो दृढस्मृति: |**
**गम्यासु चाप्यविस्रम्भी मानी चेति हि वैशिक: || ७ ||**

**पदच्छेद: –** शास्त्रवित् शिल्पसम्पन्न: रूपवान् प्रियदर्शन: |
विक्रान्त: धृतिमान् च एव वयो-वेष-कुलान्वित: || ४ ||
सुरभि: मधुर: त्यागी सहिष्णु: अविकत्थन: |
अशङ्कित: प्रियभाषी चतुर: शुभद: शुचि: || ५ ||
कामोपचार-कुशल: दक्षिण: देशकालवित् |
अदीनवाक्य: स्मितवान् वाग्मी दक्ष: प्रियंवद: || ६ ||
स्त्रीलुब्ध: संविभागी च श्रद्धधान: दृढस्मृति: |
गम्यासु च अपि अविस्रम्भी मानी च इति हि वैशिक: || ७ ||

**अन्वय: –** शास्त्रवित् शिल्पसम्पन्न: रूपवान् प्रियदर्शन: विक्रान्त: धृतिमान् एव च वयोवेषकुलान्वित: सुरभि: मधुर: त्यागी सहिष्णु: अविकत्थन: अशङ्कित: प्रियभाषी

चतुर: शुभद: शुचि: कामोपचारकुशल: दक्षिण: देशकालवित् अदीनवाक्य: स्मितवान् वाग्मी दक्ष: प्रियंवद: स्त्रीलुब्ध: संविभागी श्रद्धधान: दृढस्मृति: गम्यासु अविस्रम्भी मानी च इति हि वैशिक:|

**अर्थ** – शास्त्र जाणणारा, शिल्पकलेमध्ये निपुण, रूपसंपन्न, दिसायला अतिशय गोड, पराक्रमी, धैर्यसंपन्न, वय वेषभूषा आणि उच्च कुल असणारा, सुगंधित अत्तर वापरणारा, मधुर स्वभावाचा, त्यागशील, सहिष्णू, विडंबना न करणारा, निश्शंक, गोड बोलणारा, चतुर, शुभदायी, पवित्र, कामव्यवहारामध्ये कुशल, उदार, देश-काळाचे ज्ञान असणारा, वाईट वाटेल असे न बोलणारा, नेहमी हसरा चेहरा असलेला, वक्ता, जागरूक, प्रिय बोलणारा, स्त्रीसाठी लोभ करणारा, समभागांमध्ये विभागणी करणारा, श्रद्धाळू, दृढ स्मृती असणारा, गम्या स्त्रीवर विश्वास न ठेवणारा आणि मानी हे सर्व 'वैशिक' पुरुषाचे गुण आहेत.

**❖ वैशिक पुरुषाच्या मित्राचे सहा गुण ❖**

**अनुयुक्त: शुचिर्दक्षो दक्षिण: प्रतिपत्तिमान् |**
**भवेच्चित्राभिधायी च वयस्यस्तस्य तद्गुण: || ८ ||**

**पदच्छेद:** – अनुयुक्त: शुचि: दक्ष: दक्षिण: प्रतिपत्तिमान् |
भवेत् चित्राभिधायी च वयस्य: तस्य तद्गुण: || ८ ||

**अन्वय:** – तस्य वयस्य: तद्गुण: भवेत् यथा - अनुयुक्त: शुचि: दक्ष: दक्षिण: प्रतिपत्तिमान् चित्राभिधायी च |

**अर्थ** – त्याच्या मित्राचे सहा गुण असतात. १) अनुरक्त २) शुचि (पवित्र) ३) जागरूक ४) उदार ५) प्रतिपत्तिमान ६) चित्राभिधायी (वक्रोक्तिकुशल).

**❖ दूतीची लक्षणे ❖**

**विज्ञानगुणसम्पन्ना कथिनी लिङ्गिनी तथा |**
**प्रातिवेश्या सखी दासी कुमारी कारुशिल्पिनी || ९ ||**

**धात्री पाषण्डिनी चैव तथा रङ्गोपजीविनी |**
**प्रोत्साहनेऽथ कुशला मधुरकथा दक्षिणाथ कालज्ञा || १० ||**
**लडहा संवृतमन्त्रा दूती त्वेभिर्गुणैः कार्या |**
**तयाप्युत्साहनं कार्यं नानादर्शितकारणम् || ११ ||**

**पदच्छेद:** – विज्ञान-गुण-सम्पन्ना कथिनी लिङ्गिनी तथा |
प्रातिवेश्या सखी दासी कुमारी कारुशिल्पिनी || ९ ||
धात्री पाषण्डिनी च एव तथा रङ्गोपजीविनी |
प्रोत्साहने अथ कुशला मधुरकथा दक्षिणा अथ कालज्ञा || १० ||
लटहा संवृतमन्त्रा दूती तु एभि: गुणै: कार्या |
तया अपि उत्साहनम् कार्यम् नाना-दर्शित-कारणम् || ११ ||

**अन्वय:** – विज्ञानगुणसम्पन्ना कथिनी लिङ्गिनी तथा प्रातिवेश्या सखी दासी कुमारी कारुशिल्पिनी धात्री पाषण्डिनी च रङ्गोपजीविनी अथ प्रोत्साहने कुशला मधुरकथा दक्षिणा कालज्ञा लटहा संवृतमन्त्रा एभि: गुणै: तु दूती कार्या | तया अपि नानादर्शितकारणम् उत्साहनम् कार्यम् |

**अर्थ** – जी विज्ञान गुणांनी युक्त असते, मोठमोठ्या कथा सांगण्यात आणि ऐकण्यात हुशार असते, चित्रकला जाणते, जवळच राहते, जी मैत्रीण, दासी, कुमारी, कारुशिल्पिनी, धात्री, व्रतिनी तसेच धोब्याची किंवा चारणाची पत्नी आहे, नायकास किंवा नायिकेला प्रोत्साहन देण्यामध्ये हुशार असते, जी गोड बोलते, जी उदार आहे, काळाचे भान असलेली, सुखकारक आहे, मंत्रणास गुप्त ठेवते इत्यादी गुणांनी युक्त अशी जी स्त्री असते तिला दूती बनवावे . तिनेही विविध वस्तु दाखवून नायकास प्रोत्साहन द्यावे .

**यथोक्तकथनं चैव तथा भावप्रदर्शनम् |**
**न जडं रूपसम्पन्नं नार्थवन्तं न चातुरम् || १२ ||**
**दूतं वाप्यथवा दूतीं बुधः कुर्यात्कदाचन |**

**पदच्छेद :-** यथा-उक्त-कथनम् च एव तथा भाव-प्रदर्शनम् |
न जडम् रूपसम्पन्नम् न अर्थवन्तम् न चातुरम् || १२ ||
दूतम् वा अपि अथवा दूतीम् बुध : कुर्यात् कदाचन |

**अन्वय : -** यथोक्तकथनम् तथा एव च भावप्रदर्शनम् भवेत् | बुध : कदाचन जडम् न रूपसम्पन्नम् न अर्थवन्तम् न चातुरम् दूतम् अथवा दूतीम् कुर्यात् |

**अर्थ –** वर सांगितल्याप्रमाणेच, दूत देखील त्याच प्रकारचे भाव व्यक्त करणारा असला पाहिजे . बुद्धिमान माणसाने मूर्ख, रूपवान, श्रीमंत, धनवान आणि चतुर व्यक्तीला दूत किंवा दूतीच्या कामासाठी निवडू नये .

**कुलभोगधनाधिक्यै: कृत्वाऽधिकविकत्थनम् || १३ ||**
**दूती निवेदयेत्काममर्थांश्चैवानुवर्णयेत् |**

**पदच्छेद :-** कुल-भोग-धन-आधिक्यै : कृत्वा अधिक-विकत्थनम् || १३ ||
दूती निवेदयेत् कामम् अर्थान् च एव अनुवर्णयेत् |

**अन्वय : -** दूती कुलभोगधनाधिक्यै: अधिकविकत्थनम् कृत्वा कामम् निवेदयेत् अर्थान् च एव अनुवर्णयेत् |

**अर्थ –** दूतीने कुळाचा गौरव आणि वैभव इत्यादींविषयी अतिशयोक्ती करून कामेच्छा सांगावी आणि अर्थाचे वर्णनही करावे .

**न चाकामप्रवृत्ताया: क्रुद्धाया वापि सङ्गम: || १४ ||**
**नानुपाय: प्रकर्तव्यो दूत्या हि पुरुषाश्रय: |**

**पदच्छेद :-** न च अकामप्रवृत्ताया : क्रुद्धाया : वा अपि सङ्गम : || १४ ||
न अनुपाय : प्रकर्तव्य : दूत्या हि पुरुष-आश्रय : |

**अन्वय : -** अकामप्रवृत्ताया : क्रुद्धाया : दूत्या : च सङ्गम : पुरुषाश्रय : अनुपाय : न प्रकर्तव्य : |

**अर्थ –** कामभावनेने प्रवृत्त न होणाऱ्या आणि रागीट नायिकेसोबत संगम होण्यासाठी दूतीने पुरुषाला उपयोगी होणार नाही, असा उपाय सांगू नये .

**❖ समागमाची योग्य वेळ ❖**

**उत्सवे रात्रिसञ्चार उद्याने मित्रवेश्मनि ||१५||**
**धात्रीगृहेषु सख्या वा तथा चैव निमन्त्रणे |**
**व्याधितव्यपदेशेन शून्यागारनिवेशने ||१६||**
**कार्य: समागमो नृणां स्त्रीभि: प्रथमसङ्गमे |**
**एवं समागमं कृत्वा सोपायं विधिपूर्वकम् || १७ ||**

**पदच्छेद :–** उत्सवे रात्रिसञ्चारे उद्याने मित्रवेश्मनि ||१५||
धात्रीगृहेषु सख्या वा तथा च एव निमन्त्रणे |
व्याधित-व्यपदेशेन शून्यागार-निवेशने ||१६||
कार्य : समागम : नृणाम् स्त्रीभि : प्रथमसङ्गमे |
एवम् समागमम् कृत्वा सोपायम् विधिपूर्वकम् ||१७||

**अन्वय : –** उत्सवे रात्रिसञ्चारे उद्याने मित्रवेश्मनि धात्रीगृहेषु सख्या निमन्त्रणे वा व्याधितव्यपदेशेन शून्यागारनिवेशने नृणां स्त्रीभि: एवं समागमं कृत्वा प्रथमसङ्गमे सोपायं विधिपूर्वकं समागम : कार्य : |

**अर्थ** – उत्सवामध्ये, रात्री फिरताना, बागेत फिरताना, मित्राच्या घरी, धात्रीच्या घरी, सखीच्या आमंत्रणाच्या वेळी, आजारपणाचे वहाणे करून, घरामध्ये एकटे असताना पुरुषांनी स्त्रियांशी समागम करावा. पहिल्या समागमाच्या वेळी योग्य उपाय करून विधिनुसार समागम करावा.

**❖ अनुरक्त व विरक्त स्त्रियांची लक्षणे ❖**

**अनुरक्तां विरक्तां वा लिङ्गाकारैस्तु लक्षयेत् |**
**स्वभावभावातिशयैर्नारी या मदनाश्रया ||१८||**
**करोति निभृतां लीलां नित्यं सा मदनातुरा |**
**सखीमध्ये गुणान्ब्रूते स्वधनं च प्रयच्छति ||१९||**

**पदच्छेद : –** अनुरक्ताम् विरक्ताम् वा लिङ्गाकारै : तु लक्षयेत् |
स्वभाव-भाव-अतिशयै : नारी या मदन-आश्रया || १८ ||
करोति निभृताम् लीलाम् नित्यम् सा मदन-आतुरा |
सखीमध्ये गुणान् ब्रूते स्वधनम् च प्रयच्छति || १९ ||

**अन्वय : –** अनुरक्ताम् विरक्ताम् वा लिङ्गाकारै : तु लक्षयेत् | या नारी मदनाश्रया सा मदनातुरा स्वभावभावातिशयै : नित्यम् निभृताम् लीलाम् करोति | सखीमध्ये गुणान् ब्रूते स्वधनम् च प्रयच्छति |

**अर्थ –** अनुरक्त किंवा विरक्त स्त्रीला पुढील चिह्नांवरून ओळखावे . जी नारी कामवश आहे ती कामातुर स्त्री स्वभावानुसार सुरतक्रीडेमध्ये नखांचे ओरखडे सहन करीत नेहमी एकांतामध्ये विविध लीला करते आणि सखींना प्रियकराचे गुण सांगते आणि स्वत:चे पैसे पण देते .

**पूजयत्यस्य मित्राणि द्वेष्टि शत्रुजनं सदा |**
**गमागमे सखीनां या हृष्टा भवति चाधिकम् || २० ||**
**तुष्यत्यस्य कथाभिस्तु सस्नेहं च निरीक्षते |**
**सुप्ते तु पश्चात्स्वपिति चुम्बिता प्रतिचुम्बति || २१ ||**
**उत्तिष्ठत्यपि पूर्वं च तथा क्लेशसहापि च |**
**उत्सवे मुदिता या च व्यसने या च दु:खिता || २२ ||**
**एवंविधैर्गुणैर्युक्ता त्वनुरक्ता तु सा स्मृता |**

**पदच्छेद : –** पूजयति अस्य मित्राणि द्वेष्टि शत्रुजनम् सदा |
गमागमे सखीनाम् या हृष्टा भवति च अधिकम् || २० ||
तुष्यति अस्य कथाभि : तु सस्नेहम् च निरीक्षते |
सुप्ते तु पश्चात् स्वपिति चुम्बिता प्रतिचुम्बति || २१ ||
उत्तिष्ठति अपि पूर्वम् च तथा क्लेश-सहा अपि च |
उत्सवे मुदिता या च व्यसने या च दु:खिता || २२ ||
एवंविधै : गुणै : युक्ता तु अनुरक्ता तु सा स्मृता |

**अन्वय : –** अस्य मित्राणि पूजयति शत्रुजनम् सदा द्वेष्टि | या सखीनाम् गमागमे हृष्टा भवति अधिकम् च तुष्यति | अस्य कथाभि : तु सस्नेहम् च निरिक्षते | सुप्ते तु पश्चात् स्वपिति चुम्बिता प्रतिचुम्बति | अपि च पूर्वम् उत्तिष्ठति तथापि च क्लेशसहा | या च उत्सवे मुदिता या च व्यसने दु:खिता | एवंविधै : तु गुणै : युक्ता सा अनुरक्ता तु स्मृता |

**अर्थ –** जी स्त्री प्रियकराच्या मित्रांचा मान ठेवते, प्रियकराच्या शत्रूंचा द्वेष करते, मैत्रिणीच्या येण्याजाण्याने ती खुश होते आणि अधिकच आनंदी होते, प्रियकराच्या गोष्टींनी ती प्रेमाने त्याला न्याहाळते, प्रियकर झोपल्यानंतर निजते, चुंबन केल्यावर प्रतिचुंबन करते, तसेच प्रियकराच्या अगोदर उठते, त्रास सहन करते, जी उत्सवामध्ये आनंदी असते आणि संकटामध्ये दु:खी होते अशा गुणांनी युक्त जी स्त्री असते तिला अनुरक्त स्त्री असे म्हटले जाते .

**विरक्तायास्तु चिह्नानि चुम्बिता नाभिचुम्बति || २३ ||**
**अनिष्टां च कथां ब्रूते प्रियमुक्तापि कुप्यति |**
**प्रद्वेष्टि चास्य मित्राणि भजतेऽरिजनं तथा || २४ ||**
**शेते पराङ्मुखी चापि शयने पूर्वशायिनी |**
**सुमहत्युपकारेऽपि न तोषमुपयाति च || २५ ||**
**क्लेशं न सहते चापि तथा कुप्यत्यकारणात् |**
**या स्यादेवंप्रकारा तु विरक्तां तां विनिर्दिशेत् || २६ ||**

**पदच्छेद : –** विरक्ताया : तु चिह्नानि चुम्बिता न अभिचुम्बति || २३ ||
अनिष्टाम् च कथाम् ब्रूते प्रियम् उक्ता अपि कुप्यति |
प्रद्वेष्टि च अस्य मित्राणि भजते अरिजनम् तथा || २४ ||
शेते पराङ्मुखी च अपि शयने पूर्वशायिनी |
सुमहति उपकारे अपि न तोषम् उपयाति च || २५ ||
क्लेशम् न सहते च अपि तथा कुप्यति अकारणात् |
या स्यात् एवंप्रकारा तु विरक्ताम् ताम् विनिर्दिशेत् || २६ ||

**अन्वय :** – विरक्तायाः तु चिह्नानि - चुम्बिता न अभिचुम्बति | अनिष्टाम् च कथाम् ब्रूते | प्रियम् उक्ता अपि कुप्यति | अस्य मित्राणि च प्रद्वेष्टि तथा अरिजनम् भजते | शयने पराङ्मुखी शेते अपि च पूर्वशायिनी (अस्ति) | सुमहति उपकारे अपि च तोषम् न उपयाति | क्लेशम् न सहते तथा अपि च अकारणात् कुप्यति | या तु एवंप्रकारा स्यात् ताम् विरक्ताम् विनिर्दिशेत् |

**अर्थ** – विरक्ता नारीची लक्षणे पुढीलप्रमाणे - जी चुंबन केल्यावर प्रतिचुंबन करत नाही, जी अनिष्ट बोलते, गोड बोलल्यावर पण रागावते, प्रियकराच्या मित्रांचा द्वेष करते आणि शत्रूंची सेवा करते, तोंड फिरवून पाठ दाखवून झोपते आणि प्रियकर झोपण्याच्या आधीच झोपते, खूप सारे उपकार केल्यावर सुद्धा कायम असंतुष्ट असते, दु:ख सहन करत नाही, विनाकारण रागावते, अशा प्रकारची जी स्त्री तिला 'विरक्ता' म्हणून ओळखली जाते .

**❖ नायिकेचे हृदय जिंकण्याचे उपाय ❖**

**हृदयग्रहणोपायमस्या व्यापारचेष्टितम् |**
**अर्थप्रदर्शनं चैव उपदानं पुनर्भवेत् ||२७||**

**पदच्छेद :** – हृदय-ग्रहण-उपायम् अस्याः व्यापार-चेष्टितम् |
अर्थ-प्रदर्शनम् च एव उपदानम् पुनः भवेत् || २७ ||

**अन्वय :** – पुनः अस्याः हृदयग्रहणोपायम् व्यापारचेष्टितम् अर्थप्रदर्शनम् उपदानम् एव च भवेत् |

**अर्थ** – नायिकेचे हृदय जिंकण्याचा उपाय म्हणून अनुकूल व्यवहार, कृती आणि संपत्तीचे प्रदर्शन किंवा एखादा उपहार या गोष्टी होऊ शकतात .

**अकारणमुपन्यासस्तथैव व्याधितापि च |**
**व्याजात्त्यागोऽथ निकटाद्भावोपक्षेप एव च || २८ ||**

**पदच्छेद :** – अकारणम् उपन्यासः तथा एव व्याधिता अपि च |
व्याजात् त्यागः अथ निकटात् भाव-उपक्षेपः एव च || २८ ||

**अन्वय :** – अकारणम् उपन्यासः तथा एव व्याधिता अपि च व्याजात्त्यागः अथ निकटाद्भावोपक्षेपः एव च | (उपन्यासः अन्यमुखेन काचित् अनुरक्तस्य अङ्गना अस्ति इति कथनम् |

व्याधिता इति विचित्रा आधयो यस्य तस्य भावः | विचित्राभिप्रायदर्शनव्याजेन तन्निकटादपसर्पणम् इति यावत् व्याजात्परित्याग इति | एषोऽन्यत्र रागी इति अन्यमुखेन अभिधानं भावोक्षेपः | - अ . भा . )

**अर्थ** – "ही कोणातरी अनुरक्त पुरुषाची पत्नी आहे" असे विनाकारण दुसऱ्याच्या तोंडून वदविणे, विचित्र मानसिक आजारपण दाखवणे, दुसरे बहाणे सांगून निघून जाणे, किंवा हा दुसरीकडे अनुरक्त आहे असे दुसऱ्याकडून सांगणे इत्यादी भाव यामध्ये दाखविले जातात .

**दारिद्र्याद्व्याधितो दु:खात्पारुष्याद्दु:श्रवात्तथा |**
**प्रवासगमनादेव ह्यतिलोभादतिक्रमात् || २९ ||**
**अतिवाभिगमाच्चापि तथा विप्रियकारणात् |**
**एभिः स्त्री पुरुषो वापि कारणैस्तु विरज्यते || ३० ||**

**पदच्छेद: –** दारिद्र्यात् व्याधितः दु:खात् पारुष्यात् दु:श्रवात् तथा |
प्रवासगमनात् एव हि अतिलोभात् अतिक्रमात् || २९ ||
अतिवाभिगमात् च अपि तथा विप्रियकारणात् |
एभिः स्त्री पुरुषः वा अपि कारणैः तु विरज्यते || ३० ||

**अन्वय: –** दारिद्र्यात् व्याधितः दु:खात् पारुष्यात् दु:श्रवात् तथा प्रवासगमनात् एव हि अतिलोभात् अतिक्रमात् तथा अपि च अतिवाभिगमात् अपि वा विप्रियकारणात् एभिः तु कारणैः स्त्री पुरुषः विरज्यते |

**अर्थ** – दारिद्र्यामुळे आजारी असलेला, विविध प्रकारच्या दु:खामुळे, कठोरपणामुळे, कर्कश गोंगाटामुळे, दूरदेशी गेल्याने, अतिलोभामुळे, अतिक्रमणामुळे, अतिसंभोग केल्याने तसेच अप्रिय कृत्य केल्यामुळे स्त्री किंवा पुरुष एकमेकांपासून विरक्त होतात .

**भावग्राहीणि नारीणां कार्याणि मदनाश्रये |**
**तुष्टिमेति यथा नारी प्राप्यते पुरुषैरथ || ३१ ||**

**पदच्छेद :-** भावग्राहीणि नारीणाम् कार्याणि मदन-आश्रये |
तुष्टिम् एति यथा नारी प्राप्यते पुरुषै : अथ || ३१ ||

**अन्वय : -** मदनाश्रये नारीणाम् भावग्राहीणि कार्याणि नारी तुष्टिम् एति | अथ यथा पुरुषै : नारी प्राप्यते |

**अर्थ -** कामुक झाल्यावर स्त्रियांचे मनोभाव जाणून कार्य केल्याने स्त्री संतुष्ट होते . अशा रीतीने पुरुष नारीला प्राप्त करू शकतात .

**लुब्धामर्थप्रदानेन कलाज्ञानेन पण्डिताम् |**
**चतुरां लडहत्वेन ह्यनुवृत्त्या च मानिनीम् || ३२ ||**
**भूषणग्रहणाच्चापि शृङ्गारमुखरो भवेत् |**
**पुरुषद्वेषिणीमिष्टै: कथायोगैरुपक्रमै : || ३३ ||**
**उपक्रीडनकैर्बालां भीरुमाश्वासनेन च |**
**गर्वितां नीचसेवाभिरुदात्तां शिल्पदर्शनै : || ३४ ||**

**पदच्छेद :-** लुब्धाम् अर्थप्रदानेन कलाज्ञानेन पण्डिताम् |
चतुराम् लडहत्वेन हि अनुवृत्त्या च मानिनीम् || ३२ ||
भूषण-ग्रहणात् च अपि शृङ्गार-मुखर : भवेत् |
पुरुष-द्वेषिणीम् इष्टै : कथा-योगै : उपक्रमै : || ३३ ||
उपक्रीडनकै : बालाम् भीरुम् आश्वासनेन च |
गर्विताम् नीचसेवाभि : उदात्ताम् शिल्पदर्शनै : || ३४ ||

**अन्वय : -** (अस्या : कथं तुष्टिरित्याह लुब्धामित्यादि | - अ . भा . )
अर्थप्रदानेन लुब्धाम्, कलाज्ञानेन पण्डिताम्, लडहत्वेन हि चतुराम्, अनुवृत्त्या च मानिनीम् भूषणग्रहणात् शृङ्गारमुखर : भवेत् | इष्टै : कथायोगै : उपक्रमै : पुरुषद्वेषिणीम्, उपक्रीडनकै : बालाम्, आश्वासनेन च भीरुम्, नीचसेवाभि : गर्विताम्, शिल्पदर्शनै : उदात्ताम् सन्तुष्टाम् कुर्यात् | (पण्डितामिति कलाविदाम् | लडहत्वेन प्रागल्भ्येन | नीचसेवाभिरिति पादस्पर्शनादिभि : | शिल्पदर्शनैरिति विस्मयहेतुभिरित्यर्थ : | - अ . भा . )

**अर्थ** – (नारीला संतुष्ट कसे करावे यासाठी लुब्धाम् इत्यादी श्लोक म्हटला आहे.)
लोभी स्त्रीला धन देऊन संतुष्ट करावे. पंडिता स्त्रीला कलेचे ज्ञान देऊन, चतुर स्त्रीला प्रगल्भतेने आणि मानिनी नायिकेला आज्ञाधारक होऊन खुश करावे. कधीकधी एखादा अलंकार घेऊन नायकाने तिच्याजवळ शृंगाराविषयी बोलावे. आवडेल अशा गोष्टी सांगून अनेक उपक्रमांद्वारे पुरुषाचा द्वेष करणाऱ्या स्त्रीला प्रसन्न करावे. कुमारिकेला खेळणी देऊन, घाबरट नायिकेला आश्वस्त करून, गर्विता नायिकेस तिचे पाय दाबून आणि उदात्त नायिकेला आश्चर्यकारक गोष्टी दाखवून खुश करावे.

**❖ स्त्रियांचे तीन प्रकार ❖**

**सर्वासामेव नारीणां त्रिविधा प्रकृतिः स्मृता |**
**उत्तमा मध्यमा नीचा वेश्यानां तु स्वभावजाः || ३५ ||**

**पदच्छेदः** – सर्वासाम् एव नारीणाम् त्रिविधा प्रकृतिः स्मृता |
उत्तमा मध्यमा नीचा वेश्यानाम् तु स्वभावजाः || ३५ ||

**अन्वयः** – सर्वासाम् एव नारीणाम् उत्तमा मध्यमा नीचा (इति) त्रिविधा प्रकृतिः स्मृता | वेश्यानाम् तु स्वभावजाः (प्रकृतयः सन्ति) |

**अर्थ** – सर्व स्त्रियांच्या तीन प्रकारच्या प्रकृती असतात - उत्तमा, मध्यमा आणि अधमा. परंतु वेश्यांची प्रकृती ही त्यांच्या स्वभावानुसार असते.

**❖ उत्तमा स्त्री ❖**

**या विप्रियेऽपि तिष्ठन्तं प्रियं वदति नाप्रियम् |**
**न दीर्घरोषा च तथा कलासु च विचक्षणा || ३६ ||**
**शीलशोभाकुलाधिक्यैः पुरुषैर्या च काम्यते |**
**कुशला कामतन्त्रेषु दक्षिणा रूपशालिनी || ३७ ||**
**गृह्णाति कारणाद्रोषं विगतेर्ष्या ब्रवीति च |**
**कार्यकालविशेषज्ञा सुरूपा सा स्मृतोत्तमा || ३८ ||**

**पदच्छेद :-** या विप्रिये अपि तिष्ठन्तम् प्रियम् वदति न अप्रियम् |
न दीर्घ-रोषा च तथा कलासु च विचक्षणा || ३६ ||
शील-शोभा-कुल-आधिक्यै : पुरुषै : या च काम्यते |
कुशला कामतन्त्रेषु दक्षिणा रूपशालिनी || ३७ ||
गृह्णाति कारणात् रोषम् विगत-ईर्ष्या ब्रवीति च |
कार्यकाल-विशेषज्ञा सुरूपा सा स्मृता उत्तमा || ३८ ||

**अन्वय :-** या विप्रिये तिष्ठन्तम् अपि प्रियम् वदति अप्रियम् न | तथा च दीर्घरोषा न (अस्ति) | या च कलासु विचक्षणा शीलशोभाकुलाधिक्यै : पुरुषै : काम्यते | कामतन्त्रेषु कुशला दक्षिणा रूपशालिनी कारणात् रोषम् गृह्णाति विगतेर्ष्या ब्रवीति च | (या) कार्यकालविशेषज्ञा सुरूपा सा उत्तमा स्मृता |

**अर्थ –** जी स्त्री अप्रिय बोलणाऱ्या बरोबर देखील गोड बोलते, कटुवचनांचा वापर करत नाही, खूप वेळपर्यंत रागवत नाही, कलेमध्ये हुशार असणाऱ्या जिची शील, शोभा, संपन्नता आणि कुलीन पुरुषांद्वारे कामना केली जाते, जी कामतंत्रामध्ये हुशार, उदार आणि रूपसंपन्न असते, काही कारणामुळे रुसते, ईर्ष्या न ठेवता बोलते, कार्य केव्हा करायचे याविषयीचे तिला विशेष ज्ञान असते, अशी स्व-रूपास साजेशी स्त्री 'उत्तमा स्त्री' म्हणून ओळखली जाते .

**❖ मध्यमा स्त्री ❖**

**पुरुषै: काम्यते या तु तथा कामयते च तान् |**
**कामोपचारकुशला प्रतिपक्षाभ्यसूयिनी || ३९ ||**
**ईर्ष्यातुरा त्वनिभृता क्षीणक्रोधातिगर्विता |**
**क्षणप्रसादा या चैव सा नारी मध्यमा स्मृता ||४०||**

**पदच्छेद :-** पुरुषै : काम्यते या तु तथा कामयते च तान् |
काम-उपचार-कुशला प्रतिपक्ष-अभ्यसूयिनी || ३९ ||

ईर्ष्या-आतुरा तु अनिभृता क्षीणक्रोधा अतिगर्विता |
क्षणप्रसादा या च एव सा नारी मध्यमा स्मृता || ४० ||

**अन्वय:** – पुरुषै: या तु काम्यते तथा च तान् कामयते | या च कामोपचारकुशला प्रतिपक्षाभ्यसूयिनी ईर्ष्यातुरा तु अनिभृता क्षीणक्रोधा अतिगर्विता क्षणप्रसादा सा एव नारी मध्यमा स्मृता |

**अर्थ** – पुरुष जिची कामना करतात आणि जी स्वत: देखील पुरुषांची कामना करते, जी कामव्यवहारामध्ये अतिकुशल असते, शत्रूंवर असूया ठेवते, ईर्ष्येसाठी आतुर असते, जी शांत बसत नाही, आणि जी लगेच रागावते, जी अतिगर्विष्ठ असते, जी क्षणातच खुश होते, ती मध्यमा स्त्री असते .

**❖ अधमा स्त्री ❖**

**अस्थानकोपना या तु दुष्टशीलातिमानिनी |**
**चपला परुषा चैव दीर्घरोषाधमा स्मृता || ४१ ||**

**पदच्छेद:** – अस्थान-कोपना या तु दुष्ट-शीला अतिमानिनी |
चपला परुषा च एव दीर्घरोषा अधमा स्मृता || ४१ ||

**अन्वय:** – या तु अस्थानकोपना दुष्टशीला अतिमानिनी चपला परुषा एव च दीर्घरोषा (सा नारी) अधमा स्मृता |

**अर्थ** – जी अयोग्य ठिकाणी रागावते, जी वाईट चारित्र्यपूर्ण असते, अतिशय मानिनी असते, जी चंचल आणि कठोर शब्दांनी बोलते आणि जिचा राग खूप काळ राहतो, तिला अधमा स्त्री म्हणतात .

**❖ स्त्रीयौवनाचे टप्पे ❖**

**सर्वासां नारीणां यौवनभेदा: स्मृतास्तु चत्वार: |**
**नैपथ्यरूपचेष्टागुणेन शृङ्गारमासाद्य || ४२ ||**

**पदच्छेद:** – सर्वासाम् नारीणाम् यौवनभेदा: स्मृता: तु चत्वार: |
नैपथ्य-रूप-चेष्टा-गुणेन शृङ्गारम् आसाद्य || ४२ ||

**अन्वयः** – शृङ्गारम् आसाद्य सर्वासाम् नारीणाम् नेपथ्यरूपचेष्टागुणेन तु चत्वारः यौवनभेदाः स्मृताः। (सर्वासामिति प्रथमं यौवनं यावद्विंशति। एवं त्रिंशच्चत्वारिंशत्पञ्चाशदिति विभागः। अन्ये तु षोडशपञ्चविंशतिपञ्चत्रिंशत्पञ्चचत्वारिंशदिति विभागमाहुः। - अ. भा.)

**अर्थ** – शृंगार भावातून उत्पन्न होणाऱ्या, नेपथ्य रूप चेष्टा आणि गुण यांनुसार सर्व स्त्रियांच्या यौवनाचे चार टप्पे सांगितले आहेत. (प्रथम तारुण्याचा टप्पा वीस वर्षापर्यंत, दुसरा टप्पा वयवर्षे वीस ते तीस, तीस ते चाळीस तृतीय टप्पा आणि चाळीस ते पन्नास वर्ष चतुर्थ टप्पा असे सांगितले आहे. काही विद्वानांच्या मते वय वर्षे सोळा, पंचवीस, पस्तीस आणि चाळीस असे स्त्रीच्या तारुण्याचे चार टप्पे मानले जातात. - अ. भा.)

### ❖ स्त्री तारुण्याचा पहिला टप्पा ❖

**पीनोरुगण्डजघनाधरस्तनं कर्कशं रतिमनोज्ञम्।**
**शृङ्गारसमुत्साहं प्रथमं तद्यौवनं ज्ञेयम् ॥ ४३ ॥**

**पदच्छेदः** – पीन-ऊरु-गण्ड-जघन-अधर-स्तनम् कर्कशम् रतिमनोज्ञम्।
शृङ्गार-समुत्साहम् प्रथमम् तत् यौवनम् ज्ञेयम् ॥ ४३ ॥

**अन्वयः** – कर्कशं पीनोरुगण्डजघनाधरस्तनं रतिमनोज्ञं शृङ्गारसमुत्साहं तत् प्रथमं यौवनं ज्ञेयम्।

**अर्थ** – पुष्ट मांड्या, गाल, जांघा, ओठ, स्तन हे अत्यंत दृढ असणे, रतिक्रीडेविषयी मनातील विचार ओळखणारी, शृंगारासाठी नेहमी उत्साही अशी नारीच्या यौवनाची प्रथम अवस्था असते.

### ❖ स्त्री तारुण्याचा दुसरा टप्पा ❖

**गात्रं पूर्णावयवं पीनौ च पयोधरौ नतं मध्यम्।**
**कामस्य सारभूतं यौवनमेतद्द्वितीयं तु ॥ ४४ ॥**

**पदच्छेदः** – गात्रम् पूर्णावयवम् पीनौ च पयोधरौ नतम् मध्यम्।
कामस्य सारभूतम् यौवनम् एतत् द्वितीयम् तु ॥ ४४ ॥

**अन्वय:** – पूर्णावयवं गात्रं, पीनौ पयोधरौ, नतं मध्यम् च एतत् कामस्य सारभूतं द्वितीयं तु यौवनम् |

**अर्थ** – शरीराचे सर्व अवयव पूर्ण विकसित झालेले असतात, दोन्ही स्तन पुष्ट असतात, कटी ही झुकलेली असते, रतिक्रीडेसाठी योग्य, मदनाचे सार अनुभवणारी अशी ही नारीच्या यौवनाची दुसरी अवस्था समजावी.

### ❖ स्त्री तारुण्याचा तिसरा टप्पा ❖

**सर्वश्रीसंयुक्तं रतिकरणोत्पादनं रतिगुणाढ्यम् |**
**कामाप्यायितशोभं यौवनमेतत्तृतीयं तु || ४५ ||**

**पदच्छेद:** – सर्वश्री-संयुक्तम् रतिकारण-उत्पादनम् रति-गुणाढ्यम् |
काम-अप्यायित-शोभम् यौवनम् एतत् तृतीयम् तु || ४५ ||

**अन्वय:** – सर्वश्रीसंयुक्तम् रतिकारणोत्पादनम् रतिगुणाढ्यम् कामाप्यायितशोभम् एतत् तु तृतीयम् यौवनम् |

**अर्थ** – सर्व प्रकारच्या कांतीने युक्त, रतिसाठी कारणीभूत होणारी, रतिगुणांनी संपन्न, कामक्रीडेसाठी सौंदर्य प्राप्त झालेली अशी नारीच्या यौवनाची तिसरी अवस्था सांगितली आहे.

### ❖ स्त्री तारुण्याचा चौथा टप्पा ❖

**नवयौवने व्यतीते तथा द्वितीये तृतीयके वापि |**
**शृङ्गारशत्रुभूतं यौवनमेतच्चतुर्थं तु || ४६ ||**

**पदच्छेद:** – नवयौवने व्यतीते तथा द्वितीये तृतीयके वा अपि |
शृङ्गार-शत्रु-भूतम् यौवनम् एतत् चतुर्थम् तु || ४६ ||

**अन्वय:** – नवयौवने तथा द्वितीये तृतीयके अपि वा व्यतीते शृङ्गारशत्रुभूतम् एतत् चतुर्थम् तु यौवनम् |

**अर्थ** – नवतारुण्य तसेच दुसरी आणि तिसरी अवस्था सरल्यावर शृंगारास शत्रू ठरणारी ती यौवनाची चौथी अवस्था आहे.

### ❖ स्त्री तारुण्याच्या चार टप्प्यांतील अनुभव ❖

**अम्लानगण्डजघनाधरस्तनं किञ्चिदूनलावण्यम् |**
**कामं प्रति नोच्छ्वासं यौवनमेतच्चतुर्थ तु || ४७ ||**

**पदच्छेद :-** अम्लान-गण्ड-जघन-अधर-स्तनम् किञ्चित्-ऊनलावण्यम् |
कामम् प्रति न-उच्छ्वासम् यौवनम् एतत् चतुर्थम् तु || ४७ ||

**अन्वय : -** अम्लानगण्डजघनाधरस्तनम् किञ्चित् ऊनलावण्यम् कामम् प्रति नोच्छ्वासम् एतत् तु चतुर्थ यौवनम् |

**अर्थ -** ज्यामध्ये गाल, कंबर, ओठ, मांड्या, स्तन शिथिल नसतात, परंतु किंचित् लावण्यहीन होतात आणि रतिक्रीडेविषयी उत्साह उरत नाही ही यौवनाची चौथी अवस्था सांगितली आहे .

**नात्यर्थ क्लेशसहा न कुप्यति न हृष्यति स्त्रीभ्य: |**
**सौख्यगुणेष्ववसक्ता नारी नवयौवना ज्ञेया || ४८ ||**

**पदच्छेद :-** न अत्यर्थम् क्लेशसहा न कुप्यति न हृष्यति स्त्रीभ्य : |
सौख्यगुणेषु अवसक्ता नारी नवयौवना ज्ञेया || ४८ ||

**अन्वय : -** (या) अत्यर्थं क्लेशसहा न (अस्ति) स्त्रीभ्य: न कुप्यति न हृष्यति सौख्यगुणेषु अवसक्ता (सा) नारी नवयौवना ज्ञेया |

**अर्थ -** जी रतिक्रीडेच्या वेळी होणारा त्रास सहन करण्यास असमर्थ असते, तसेच जी इतर स्त्रियांवर रागवतही नाही आणि आनंदीही होत नाही, जी केवळ सुखात रममाण होते ती नारी नवतरुणी समजावी .

**किंचित्करोति मानं किंचित्क्रोधं च मत्सरं चैव |**
**क्रोधे च भवति तूष्णीं यौवनभेदे द्वितीये तु || ४९ ||**

**पदच्छेद :-** किंचित् करोति मानम् किंचित् क्रोधम् च मत्सरम् च एव |
क्रोधे च भवति तूष्णीम् यौवनभेदे द्वितीये तु || ४९ ||

**अन्वय:** – यौवनभेदे द्वितीये तु किंचित् मानम् एव च किंचित् क्रोधम् मत्सरम् च करोति | क्रोधे च तूष्णीम् भवति |

**अर्थ** – तारुण्याच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये स्त्री थोडा मान बाळगते, थोडा राग करते आणि कधी कधी थोडीशी ईर्ष्या देखील करते, आणि राग आल्यावर गप्प राहते .

**रतिसंभोगे दक्षा प्रतिपक्षासूयिनी रतिगुणाढ्या |**
**अनिभृतगर्वितचेष्टा नारी ज्ञेया तृतीये तु || ५० ||**

**पदच्छेद:** – रति-संभोगे दक्षा प्रतिपक्ष-असूयिनी रति-गुणाढ्या |
अनिभृत-गर्वित-चेष्टा नारी ज्ञेया तृतीये तु || ५० ||

**अन्वय:** – रतिसंभोगे दक्षा प्रतिपक्षासूयिनी रतिगुणाढ्या अनिभृतगर्वितचेष्टा नारी तु तृतीये ज्ञेया |

**अर्थ** – तारुण्याच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये स्त्री रतिसंभोगामध्ये दक्ष असते, सवतीवर नजर ठेवते, रतिसाठी आवश्यक गुणांनी परिपूर्ण असते आणि उघडपणे गर्विष्ठ कृती करणारी नारी ही तारुण्याच्या तिसऱ्या पायरीवर आहे असे समजावे .

**चित्तग्रहणसमर्था कामाभिज्ञा त्वमत्सरोपेता |**
**अविरहितमिच्छति सदा पुरुषं नारी चतुर्थे तु || ५१ ||**

**पदच्छेद:** – चित्तग्रहण-समर्था काम-अभिज्ञा तु अमत्सर-उपेता |
अविरहितम् इच्छति सदा पुरुषम् नारी चतुर्थे तु || ५१ ||

**अन्वय:** – चतुर्थे तु चित्तग्रहणसमर्था कामाभिज्ञा तु अमत्सरोपेता नारी सदा अविरहितम् पुरुषम् इच्छति |

**अर्थ** – प्रियकराच्या हृदयाला समजून घेण्यास जी समर्थ असते, कामक्रियेमध्ये तिला इच्छा असते, मत्सर नसलेली ती नेहमी पुरुषाचा अविरह इच्छिते म्हणजेच पुरुषाचा विरह तिला सहन होत नाही, ही नारीच्या यौवनाची चौथी अवस्था होय .

**यौवनभेदास्त्वेते विज्ञेया नाटकेषु चत्वार: |**
**पुनरेव तु पुरुषाणां च कामतन्त्रे प्रवक्ष्यामि || ५२ ||**

**पदच्छेद :–** यौवनभेदा : तु एते विज्ञेया : नाटकेषु चत्वार : |
पुन : एव तु पुरुषाणाम् च कामतन्त्रे प्रवक्ष्यामि || ५२ ||

**अन्वय : –** नाटकेषु एते चत्वार : तु यौवनभेदा : विज्ञेया : | एव तु पुन : कामतन्त्रे पुरुषाणाम् च (भेदा :) प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** नाटकामध्ये हे तारुण्याचे चार प्रकार समजून घ्यावेत . आता कामतंत्रामध्ये पुरुषांचे प्रकार सांगीन .

**❖ कामतंत्रामध्ये पुरुषांचे पाच प्रकार ❖**

**चतुरोत्तमौ तु मध्यस्तथा च नीच: प्रवृत्तकश्चैव |**
**स्त्रीसंप्रयोगविषये ज्ञेया: पुरुषास्त्वमी पञ्च || ५३ ||**

**पदच्छेद :–** चतुर-उत्तमौ तु मध्य : तथा च नीच : प्रवृत्तक : च एव |
स्त्रीसंप्रयोग-विषये ज्ञेया : पुरुषा : तु अमी पञ्च || ५३ ||

**अन्वय : –** स्त्रीसंप्रयोगविषये तु चतुरोत्तमौ मध्य : नीच : प्रवृत्तक : च अमी पञ्च पुरुषा : तु ज्ञेया : |

**अर्थ –** स्त्रियांशी संबंध ठेवण्याविषयीच्या दृष्टीने चतुर, उत्तम, मध्यम, नीच आणि प्रवृत्तक हे पुरुषांचे पाच प्रकार सांगितले आहेत .

**❖ चतुर पुरुष ❖**

**समदु :खक्लेशसह: प्रणयक्रोधप्रसादने कुशल: |**
**योऽर्थी नात्मच्छन्दो दक्षश्चतुर: स बोद्धव्य: || ५४ ||**

**पदच्छेद :–** समदु :ख-क्लेशसह : प्रणय-क्रोध-प्रसादने कुशल : |
य : अर्थी न आत्मच्छन्द : दक्ष : चतुर : स : बोद्धव्य : || ५४ ||

**अन्वय : –** य : समदु :खक्लेशसह : प्रणयक्रोधप्रसादने कुशल : अर्थी न आत्मच्छन्द : दक्ष : स : चतुर : बोद्धव्य : |

**अर्थ –** जो प्रेमिकेचे दु :ख आणि त्रास समबुद्धीने सहन करतो, प्रणयातील रागावलेल्या

नायिकेला खुश करण्यामध्ये हुशार असतो, स्वत:चे ईप्सित पूर्ण करतो, स्वत:तच खुश नसतो तर हवे ते मिळवण्यासाठी नेहमी जागरूक असतो, असा नायकाला 'चतुर' समजावे.

❖ ज्येष्ठ पुरुष ❖

**यो विप्रियं न कुरुते नार्या: किंचिद्विरागसंज्ञातम् |**
**अज्ञातेप्सितहृदय: स्मृतिमान्धृतिमान्स तु ज्येष्ठ: || ५५ ||**

**पदच्छेद:–** य: विप्रियम् न कुरुते नार्या: किंचित् विराग-संज्ञातम् |
अज्ञात-ईप्सित-हृदय: स्मृतिमान् धृतिमान् स: तु ज्येष्ठ: || ५५ ||

**अन्वय: –** य: अज्ञातेप्सितहृदय: स्मृतिमान् धृतिमान् नार्या: विरागसंज्ञातम् किंचित् विप्रियम् न कुरुते स: तु ज्येष्ठ: |

**अर्थ –** जो पुरुष स्त्रीचे हृदय कधीच जाणून घेत नाही, कायम स्मरणशील, धैर्यवान असतो, नारीचा वेष-विराग जाणून देखील काहीच विप्रिय करत नाही, तो 'ज्येष्ठ' म्हणून ओळखला जातो.

❖ उत्तम पुरुष ❖

**मधुरस्त्यागी रागं न याति मदनस्य चापि वशमेति |**
**अवमानितश्च नार्या विरज्यते चोत्तम: स पुमान् || ५६ ||**

**पदच्छेद:–** मधुर: त्यागी रागम् न याति मदनस्य च अपि वशम् एति |
अवमानित: च नार्या विरज्यते च उत्तम: स: पुमान् || ५६ ||

**अन्वय: –** (य:) मधुर: त्यागी रागम् न याति अपि च मदनस्य वशम् एति अवमानित: च नार्या विरज्यते च स: पुमान् उत्तम: |

**अर्थ –** जो मधुर आहे, त्यागी आहे, ज्याला राग येत नाही, जो कामदेवाला वश जातो आणि अपमानित झाल्यावर स्त्रीपासून विरक्त होतो तो 'उत्तम पुरुष' होय.

❖ मध्यम पुरुष ❖

**सवर्थिर्मध्यस्थो भावग्रहणं करोति यो नार्या: |**
**किंचिद्दोषं दृष्ट्वा विरज्यते मध्यम: स भवेत् || ५७ ||**

**पदच्छेद:–** सवर्थि: मध्यस्थ: भावग्रहणम् करोति य: नार्या: |
किंचित् दोषम् दृष्ट्वा विरज्यते मध्यम: स: भवेत् || ५७ ||

**अन्वय: –** य: सवर्थि: मध्यस्थ: नार्या: भावग्रहणम् करोति किंचित् दोषम् दृष्ट्वा विरज्यते स: मध्यम: भवेत् |

**अर्थ –** जो सर्वप्रकारे मध्यस्थ असतो, ज्याला स्त्रीच्या भावना कळतात, जो किंचित दोष पाहून विरक्त होतो तो 'मध्यम' पुरुष होय .

**काले दाता ह्यवमानितोऽपि न क्रोधमतितरामेति |**
**दृष्ट्वा व्यलीकमात्रं विरज्यते मध्यमोऽयमपि || ५८ ||**

**पदच्छेद:–** काले दाता हि अवमानित: अपि न क्रोधम् अतितराम् एति |
दृष्ट्वा व्यलीकमात्रम् विरज्यते मध्यम: अयम् अपि || ५८ ||

**अन्वय: –** (य:) काले हि दाता, अवमानित: अपि क्रोधम् न अतितराम् एति, व्यलीकमात्रम् दृष्ट्वा विरज्यते, अयम् अपि मध्यम: |

**अर्थ –** जो योग्य वेळी दान करतो, अपमान झाल्यावर सुद्धा रागवत नाही, जो थोडीशी विसंगती पाहून विरक्त होतो त्यालादेखील 'मध्यम पुरुष' म्हणतात .

❖ अधम पुरुष ❖

**अवमानितोऽपि नार्या निर्लज्जतयाभ्युपैत्यविकृतास्य: |**
**अन्यतरं संक्रान्तां स्नेहपरावृत्तभावश्च || ५९ ||**
**अभिनवकृते व्यलीके प्रत्यक्षं रज्यते दृढतरं य: |**
**मित्रैर्निवार्यमाणो विज्ञेय: सोऽधम: पुरुष: || ६० ||**

**पदच्छेद :-** अवमानित : अपि नार्या निर्लज्जतया अभ्युपैति अविकृत-आस्य : |
अन्यतरम् संक्रान्ताम् स्नेह-परावृत्त-भाव : च || ५९ ||
अभिनव-कृते व्यलीके प्रत्यक्षम् रज्यते दृढतरम् य : |
मित्रै : निवार्यमाण : विज्ञेय : स : अधम : पुरुष : || ६० ||

**अन्वय : –** नार्या अवमानित : अपि (य :) निर्लज्जतया अविकृतास्य : अभ्युपैति | (य :) अन्यतरम् संक्रान्ताम् स्नेहपरावृत्तभाव : च य : मित्रै : निवार्यमाण : अभिनवकृते व्यलीके प्रत्यक्षं दृढतरम् रज्यते स : अधम : पुरुष : विज्ञेय : |

**अर्थ –** जो स्त्रीकडून अपमानित झाल्यावर सुद्धा निर्लज्जपणे हावभाव लपवतो, जो दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात पडून आधीच्या प्रेमापासून दूर जातो, मित्रांनी अडविल्यानंतरही नवीन खोटेपणाने प्रत्यक्ष आणि ठामपणे अनुरक्त होतो त्याला 'अधम' प्रकृतीचा पुरुष म्हटले आहे .

**❖ संप्रवृत्त पुरुष ❖**

**अविगणितभयामर्षो मूर्खप्रकृतिः प्रसक्तहासश्च |**
**एकान्तदृढग्राही निर्लज्जः कामतन्त्रेषु || ६१ ||**
**रतिकलहसंप्रहारेष्वकर्कशः क्रीडनीयकः स्त्रीणाम् |**
**एवंविधस्तु तज्ज्ञैर्विज्ञेयः संप्रवृत्तस्तु || ६२ ||**

**पदच्छेद :-** अविगणित-भय-अमर्ष : मूर्खप्रकृति : प्रसक्तहास : च |
एकान्त-दृढग्राही निर्लज्ज : कामतन्त्रेषु || ६१ ||
रतिकलह-संप्रहारेषु अकर्कश : क्रीडनीयक : स्त्रीणाम् |
एवंविध : तु तज्ज्ञै : विज्ञेय : संप्रवृत्त : तु || ६२ ||

**अन्वय : –** अविगणितभयामर्ष : मूर्खप्रकृति : प्रसक्तहास : एकान्तदृढग्राही कामतन्त्रेषु निर्लज्ज : रतिकलहसंप्रहारेषु अकर्कश : स्त्रीणाम् क्रीडनीयक : च एवंविध : तु तज्ज्ञै : संप्रवृत्त : तु विज्ञेय : |

**अर्थ** – जो कोणत्याही प्रकारच्या भीतीची किंवा रागाची पर्वा करत नाही, जो स्वभावाने मूर्ख आहे, जो हसवण्यात गुंग असतो, एकांतामध्ये घट्ट पकडतो, कामतंत्रामध्ये निर्लज्ज आहे आणि रतिकलहामधील संघर्षामध्ये असहनीय नाही, जो स्त्रियांचं खेळणं बनून रहातो अशा प्रकारच्या पुरुषाला कामशास्त्रात 'संप्रवृत्त' असे म्हणतात .

**❖ विविध चारित्र्य असलेल्या स्त्रियांशी कामक्रिया ❖**

**नानाशीला: स्त्रियो ज्ञेया गूढार्थहृदयेप्सिता: |**
**विज्ञाय तु यथासत्त्वमुपसर्पेत्तथैव ता: || ६३ ||**

**पदच्छेद: –** नानाशीला: स्त्रिय: ज्ञेया: गूढार्थ-हृदय-ईप्सिता: |
विज्ञाय तु यथासत्त्वम् उपसर्पेत् तथा एव ता: || ६३ ||

**अन्वय: –** गूढार्थहृदयेप्सिता: नानाशीला: स्त्रिय: ज्ञेया: | यथासत्त्वम् तु विज्ञाय तथा एव ता: उपसर्पेत् | (यथासत्त्वमिति यथाशयम् | - अ . भा . )

**अर्थ** – ज्यांच्या हृदयातील इच्छा अव्यक्त आहेत अशा नाना चारित्र्य असलेल्या स्त्रियांना जाणून घ्यावे व त्यानंतर आशय जाणून मगच तिच्याशी संबंध ठेवण्यास प्रवृत्त व्हावे .

**भावाभावौ विदित्वाऽथ तत्र तैस्तैरुपक्रमै: |**
**पुमानुपचरेन्नारीं कामतन्त्रं समीक्ष्य तु || ६४ ||**

**पदच्छेद: –** भाव-अभावौ विदित्वा अथ तत्र तै: तै: उपक्रमै: |
पुमान् उपचरेत् नारीम् कामतन्त्रम् समीक्ष्य तु || ६४ ||

**अन्वय: –** अथ भावाभावौ विदित्वा तत्र तै: तै: उपक्रमै: कामतन्त्रम् तु समीक्ष्य पुमान् नारीम् उपचरेत् |

**अर्थ** – भाव आणि अभाव म्हणजे राग आणि विरक्तपणा जाणून त्या त्या क्रियांद्वारे कामतंत्र नीट समजून पुरुषाने स्त्रीजवळ जावे .

**साम चोपप्रदानं च भेदो दण्डस्तथैव च |**
**उपेक्षा चैव कर्तव्या नारीणां विषयं प्रति || ६५ ||**

**पदच्छेद:-** साम च उपप्रदानम् च भेद: दण्ड: तथा एव च |
उपेक्षा च एव कर्तव्या नारीणाम् विषयम् प्रति || ६५ ||

**अन्वय: -** नारीणाम् विषयम् प्रति साम उपप्रदानम् भेद: दण्ड: तथा एव च उपेक्षा कर्तव्या |

**अर्थ -** स्त्रियांशी विषयानुरक्त असताना कधी साम, प्रदान, भेद, दंड तर कधी उपेक्षेचा वापर करावा .

**❖ साम ❖**

**तवास्मि मम चैवासि दासोऽहं त्वं मे प्रिया |**
**आत्मोपक्षेपणकृतं यत्तत्सामेति कीर्तितम् || ६६ ||**

**पदच्छेद:-** तव अस्मि मम च एव असि दास: अहम् त्वम् मे प्रिया |
आत्मोपक्षेपणकृतम् यत् तत् साम इति कीर्तितम् || ६६ ||

**अन्वय: -** तव अस्मि मम एव च असि अहम् दास: त्वम् मे प्रिया यत् आत्मोपक्षेपणकृतम् तत् साम इति कीर्तितम् | (आत्मन उपक्षेप निजभावप्रदर्शनम् | - अ . भा . )

**अर्थ -** 'मी तुझाच आहे', 'तू माझीच आहेस', 'मी तुझा दास आहे', 'तू माझी प्रिया आहेस', अशा प्रकारे जो स्वत:च्या मनातील भाव व्यक्त करतो, त्याला 'साम' म्हटले आहे .

**❖ प्रदान ❖**

**काले काले प्रदातव्यं धनं विभवमात्रया |**
**यन्निमित्तान्तरकृतं प्रदानं नाम तत्स्मृतम् || ६७ ||**

**पदच्छेद:-** काले काले प्रदातव्यम् धनम् विभव-मात्रया |
यत् निमित्तान्तर-कृतम् प्रदानम् नाम तत् स्मृतम् || ६७ ||

**अन्वयः** – विभवमात्रया काले काले धनम् प्रदातव्यम् यन्निमित्तान्तरकृतम् तत् प्रदानम् नाम स्मृतम् |

**अर्थ** – आपल्याकडे असलेल्या संपत्तीप्रमाणे वेळोवेळी तिला धन द्यावे . अन्य निमित्ताने जे दिले जाते त्याला 'प्रदान' असे म्हणतात .

❖ दंड ❖

**भेदः स्यात्तत्प्रियस्येह सोपायं दोषदर्शनम् |**
**बन्धनं ताडनं चापि दण्ड इत्यभिधीयते || ६८ ||**

**पदच्छेदः** – भेदः स्यात् तत् प्रियस्य इह सोपायम् दोषदर्शनम् |
बन्धनम् ताडनम् च अपि दण्डः इति अभिधीयते || ६८ ||

**अन्वयः** – इह सोपायम् प्रियस्य दोषदर्शनम् भेदः स्यात् | तथा बन्धनम् ताडनम् च तत् दण्डः इति अभिधीयते |

**अर्थ** – काही निमित्त काढून प्रियकराचा दोष दाखवणे यास 'भेद' असे म्हणतात . तसेच बांधणे आणि मारणे यास 'दंड' म्हणतात .

❖ भेद ❖

**मध्यस्थामानयेत्साम्ना लुब्धां चोपप्रदानतः |**
**अन्यावबद्धभावां च भेदेन प्रतिपादयेत् || ६९ ||**

**पदच्छेदः** – मध्यस्थाम् आनयेत् साम्ना लुब्धाम् च उपप्रदानतः |
अन्य-अवबद्ध-भावाम् च भेदेन प्रतिपादयेत् || ६९ ||

**अन्वयः** – मध्यस्थाम् साम्ना लुब्धाम् च उपप्रदानतः आनयेत् | अन्यावबद्धभावाम् च भेदेन प्रतिपादयेत् |

**अर्थ** – मध्यस्था स्त्रीला सामाद्वारे, लोभी स्त्रीला धन देऊन प्रसन्न करावे आणि परपुरुषाच्या प्रेमात पडलेल्या स्त्रीशी भेदाने वागावे .

### ❖ दंड ❖

**दुष्टाचारे समारब्धे त्वन्यभावसमुत्थिते |**
**दण्डः पातयितव्यस्तु मृदुताडनबन्धनैः || ७० ||**

**पदच्छेदः–** दुष्ट-आचारे समारब्धे तु अन्यभाव-समुत्थिते |
दण्डः पातयितव्यः तु मृदु-ताडन-बन्धनैः || ७० ||

**अन्वयः –** अन्यभावसमुत्थिते दुष्टाचारे समारब्धे तु मृदुताडनबन्धनैः दण्डः तु पातयितव्यः |

**अर्थ –** परपुरूषा प्रति रतिभाव उत्पन्न झालेली नारी जर दुष्ट आचरण करत असेल तर तिला हळुवारपणे मारणे किंवा बंदिस्त करणे अशा स्वरूपाचा 'दंड' द्यावा.

### ❖ नायिकेला हळुवारपणे ताडन ❖

**नायकः पुरुषो वाच्यो नायिकां ताडयेच्च ताम् |**
**ताडयेत्तां बुधो नारीं रज्ज्वा वेणुदलेन वा || ७१ ||**

**पदच्छेदः–** नायकः पुरुषः वाच्यः नायिकाम् ताडयेत् च ताम् |
ताडयेत् ताम् बुधः नारीम् रज्ज्वा वेणुदलेन वा || ७१ ||

**अन्वयः –** यदि केनापि नायकः पुरुषः वाच्यः यत् भवान् ताम् नायिकाम् ताडयेत् च (इति) | बुधः ताम् नारीम् रज्ज्वा वेणुदलेन वा ताडयेत् |

**अर्थ –** नायक पुरूषाला जर कोणी सांगितले कि तू त्या नायिकेला मार. अशा वेळी बुद्धिमान नायकाने नारीला दोरीने आणि वांबूच्या पानाने हलकेच मारावे.

### ❖ नायिकेची उपेक्षा ❖

**सामादीनां प्रयोगे तु परिक्षीणे यथाक्रमम् |**
**न स्याद्या च समापन्ना तामुपेक्षेत बुद्धिमान् || ७२ ||**

**पदच्छेद :–** साम-आदीनाम् प्रयोगे तु परिक्षीणे यथाक्रमम् |
न स्यात् या च समापन्ना ताम् उपेक्षेत बुद्धिमान् || ७२ ||

**अन्वय : –** सामादीनाम् प्रयोगे तु यथाक्रमम् परिक्षीणे च समापन्ना न स्यात् बुद्धिमान् ताम् उपेक्षेत |

**अर्थ –** क्रमानुसार साम इत्यादींचा प्रयोग झाल्यावरही जर नायिका प्राप्त होत नसेल तर बुद्धिमान नायकाने तिची उपेक्षा करावी .

### ❖ वैशिक व वेश्या ❖

**मुखरागेण नेत्राभ्यां विज्ञेयो भावचेष्टितै: |**
**द्वेष्यो वापि प्रियो वापि मध्यस्थो वापि योषिताम् || ७३ ||**

**पदच्छेद :–** मुख-रागेण नेत्राभ्याम् विज्ञेय : भाव-चेष्टितै : |
द्वेष्य : वा अपि प्रिय : वा अपि मध्यस्थ : वा अपि योषिताम् || ७३ ||

**अन्वय : –** योषिताम् मुखरागेण नेत्राभ्याम् अपि वा भावचेष्टितै: द्वेष्य: प्रिय: अपि वा मध्यस्थ: अपि वा विज्ञेय: |

**अर्थ –** स्त्रियांच्या चेहऱ्यावरील रंगशोभेवरून किंवा डोळ्यांद्वारे अथवा भाव आणि कृतींद्वारे नायिकेसाठी नायक हा द्वेषास पात्र आहे की, प्रिय आहे की उदासीन आहे हे जाणून घ्यावे .

**अर्थहेतोस्तु वेश्यानां प्रियो वा यदि वाप्रिया |**
**गम्य एव नरो नित्यं मुक्त्वा दिव्यनृपस्त्रिय: || ७४ ||**

**पदच्छेद :–** अर्थ-हेतो : तु वेश्यानाम् प्रिय : वा यदि वा अप्रिया |
गम्य : एव नर : नित्यम् मुक्त्वा दिव्य-नृप-स्त्रिय : || ७४ ||

**अन्वय : –** दिव्यनृपस्त्रिय : मुक्त्वा वेश्यानाम् प्रिय : यदि वा अप्रिया वा अर्थहेतो : तु नर : नित्यम् एव गम्य : |

**अर्थ –** दिव्यांगना आणि महाराणी वगळून सर्व वेश्यांनी एखादा पुरुष प्रिय असो वा अप्रिय, त्यांनी पैशासाठी त्या पुरुषाकडे जावे .

**द्वेष्यं तु प्रियमित्याहु: प्रियं प्रियतरं तथा |**
**सुशीलमिति दुश्शीलं गुणाढ्यमिति निर्गुणम् || ७५ ||**

**पदच्छेद:** – द्वेष्यम् तु प्रियम् इति आहु: प्रियम् प्रियतरम् तथा |
सुशीलम् इति दुश्शीलम् गुणाढ्यम् इति निर्गुणम् || ७५ ||

**अन्वय:** – द्वेष्यम् तु प्रियम् इति प्रियम् प्रियतरम् तथा दुश्शीलम् सुशीलम् इति निर्गुणम् गुणाढ्यम् इति आहु: |

**अर्थ** – पैसा मिळत असेल तर वेश्यांना द्वेष्य पण प्रिय होतात, प्रिय पुरुप अधिक प्रिय होतो, दु:शील पण सुशील होतो आणि निर्गुणदेखील गुणसंपन्न होतो .

**प्रहसन्ती च नेत्राभ्यां यं दृष्ट्वोत्फुल्लतारका |**
**प्रसन्नमुखरागाच्च लक्ष्यते भावरूपणै: || ७६ ||**

**पदच्छेद:** – प्रहसन्ती च नेत्राभ्याम् यम् दृष्ट्वा उत्फुल्ल-तारका |
प्रसन्न-मुख-रागात् च लक्ष्यते भाव-रूपणै: || ७६ ||

**अन्वय:** – यम् दृष्ट्वा नेत्राभ्याम् च प्रहसन्ती उत्फुल्लतारका प्रसन्नमुखरागात् च भावरूपणै: लक्ष्यते |

**अर्थ** – नायिकेचे डोळे ज्याला पाहून हसतात व बुबुळे विकसित होतात, आनंदी मुखावरील रंगाने आणि भावांनी नायिका खुश आहे, असे लक्षात येते .

**भावाभावौ विदित्वैव निरस्तैस्तैरुपक्रमै: |**
**यत्नादुपचरेन्नारीं कामतन्त्रं प्रतीक्ष्य तु || ७७ ||**

**पदच्छेद:** – भाव-अभावौ विदित्वा एव निरस्तै: तै: उपक्रमै: |
यत्नात् उपचरेत् नारीम् कामतन्त्रम् प्रतीक्ष्य तु || ७७ ||

**अन्वय:** – भावाभावौ विदित्वा एव तै: निरस्तै: उपक्रमै: कामतन्त्रम् प्रतीक्ष्य तु यत्नात् नारीम् उपचरेत् |

**अर्थ** – याप्रमाणे भाव अभावाला जाणूनच त्या त्या चिरंतन कृतींद्वारे कामतंत्राचा विचार करून प्रयत्नपूर्वक नारीच्या जवळ जावे .

**उपचारबलत्वाच्च विप्रलम्भात्तथैव च |**
**तासु निष्पद्यते काम: काष्ठादग्निरिवोत्थित: || ७८ ||**

**पदच्छेद:** – उपचार-बलत्वात् च विप्रलम्भात् तथा एव च |
तासु निष्पद्यते काम: काष्ठात् अग्नि: इव उत्थित: || ७८ ||

**अन्वय:** – उपचारबलत्वात् तथा एव च विप्रलम्भात् च तासु काष्ठात् उत्थित: अग्नि: इव काम: निष्पद्यते |

**अर्थ** – नारीशी वागणूक अधिक बलवत्तर असेल आणि जर विरह असेल तर लाकडामधून जसा अग्नी प्रकट होतो तसा स्त्रियांमध्ये कामभावना उद्दीपित होते .

**योषितामुपचारोऽयं यथोक्तो वैशिकाश्रय: |**
**कार्य: प्रकरणे सम्यग्यथायोगं च नाटके || ७९ ||**

**पदच्छेद:** – योषिताम् उपचार: अयम् यथा उक्त: वैशिक-आश्रय: |
कार्य: प्रकरणे सम्यक् यथायोगम् च नाटके || ७९ ||

**अन्वय:** – अयम् यथा योषिताम् वैशिकाश्रय: उपचार: उक्त: यथायोगम् प्रकरणे च नाटके सम्यक् कार्य: |

**अर्थ** – स्त्रियांशी वैशिकाने कसा व्यवहार ठेवावा ते मी सांगितले . असा व्यवहार विशिष्ट परिस्थितीत प्रकरण आणि नाटकामध्ये करावा .

**एवं वेश्योपचारोऽयं तज्ज्ञै: कार्यो द्विजोत्तमा: |**
**अत ऊर्ध्वं प्रवक्ष्यामि प्रकृतीनां तु लक्षणम् || ८० ||**

**पदच्छेद :–** एवम् वेश्योपचार : अयम् तज्ज्ञै : कार्य : द्विजोत्तमा : |
अत : ऊर्ध्वम् प्रवक्ष्यामि प्रकृतीनाम् तु लक्षणम् || ८० ||

**अन्वय : –** द्विजोत्तमा :, एवम् तज्ज्ञै : अयम् वेश्योपचार : कार्य : | अत : ऊर्ध्वम् प्रकृतीनाम् तु लक्षणम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो! विद्वानांनी वेश्यांशी अशा प्रकारे व्यवहार करावा. यापुढे स्त्रीपुरुषांच्या प्रकृतींविषयीची लक्षणे मी तुम्हांला सांगणार आहे .

**|| इति भारतीये नाट्यशास्त्रे वैशिकोपचारो नाम त्रयोविंशोऽध्याय : ||**

**|| अशाप्रकारे भारतीय नाट्यशास्त्रातील 'वैशिकोपचार' नावाचा तेवीसावा अध्याय संपला ||**

# चोवीसावा अध्याय

# पुंस्त्र्युपचार



# चोवीसावा अध्याय

## पुंस्त्र्युपचार

**❖ त्रिविध प्रकृती ❖**

**समासतस्तु प्रकृतिस्त्रिविधा परिकीर्तिता |**
**पुरुषाणामथ स्त्रीणामुत्तमाधममध्यमा: || १ ||**

**पदच्छेद:** – समासत: तु प्रकृति: त्रिविधा परिकीर्तिता |
पुरुषाणाम् अथ स्त्रीणाम् उत्तम-अधम-मध्यमा: || १ ||

**अन्वय:** – उत्तमाधममध्यमा: (इति) पुरुषाणाम् अथ स्त्रीणाम् त्रिविधा प्रकृति: तु समासत: परिकीर्तिता: |

**अर्थ** – उत्तम, मध्यम आणि अधम असे पुरुषांचे आणि स्त्रियांचे तीन प्रकारचे स्वभाव थोडक्यात सांगितले आहेत .

**❖ पुरुष प्रकृतीचे प्रकार ❖**

**❖ उत्तम प्रकृती ❖**

**अथ पुरुषप्रकृति:**
**जितेन्द्रियज्ञानवती नानाशिल्पविचक्षणा |**
**दक्षिणाधमहालक्ष्या भीतानां परिसान्त्वनी || २ ||**
**नानाशास्त्रार्थसंपन्ना गाम्भीर्यौदार्यशालिनी |**
**स्थैर्यत्यागगुणोपेता ज्ञेया प्रकृतिरुत्तमा || ३ ||**

**पदच्छेद:** – जितेन्द्रिय-ज्ञानवती नानाशिल्प-विचक्षणा |
दक्षिणाध-महालक्ष्या भीतानाम् परिसान्त्वनी || २ ||
नाना-शास्त्रार्थ-संपन्ना गाम्भीर्य-औदार्य-शालिनी |
स्थैर्य-त्याग-गुणोपेता ज्ञेया प्रकृति: उत्तमा || ३ ||

**अन्वय:** – जितेन्द्रियज्ञानवती, नानाशिल्पविचक्षणा, दक्षिणाधमहालक्ष्या, भीतानाम् परिसान्त्वनी, नानाशास्त्रार्थसम्पन्ना गाम्भीर्यौदार्यशालिनी, स्थैर्यत्यागगुणोपेता प्रकृति: 'उत्तमा' इति ज्ञेया |

**अर्थ** – जितेंद्रिय, ज्ञानवती, विविध शिल्पांमध्ये विचक्षण, दानाच्या बाबतीत महालक्ष्मी, घाबरलेल्याला सांत्वना देणारी, विविध शास्त्रार्थाची जाणकार, गांभीर्य आणि औदार्य युक्त, स्थैर्य व त्यागादी गुणांनी संपन्न अशा पुरुषांच्या प्रकृतीला 'उत्तम प्रकृति' म्हणतात.

**❖ मध्यम प्रकृती ❖**

**लोकोपचारचतुरा शिल्पशास्त्रविशारदा |**
**विज्ञानमाधुर्ययुता मध्यमा प्रकृति: स्मृता || ४ ||**

**पदच्छेद:** – लोक-उपचार-चतुरा शिल्प-शास्त्र-विशारदा |
विज्ञान-माधुर्य-युता मध्यमा प्रकृति: स्मृता || ४ ||

**अन्वय:** – लोकोपचारचतुरा शिल्पशास्त्रविशारदा विज्ञानमाधुर्ययुता प्रकृति: मध्यमा स्मृता |

**अर्थ** लोकव्यवहारामध्ये चतुर, शिल्पशास्त्रामध्ये विशारद, विशेष ज्ञान आणि माधुर्याने युक्त अशी 'मध्यम' पुरुषप्रकृती होय.

**❖ अधम प्रकृती ❖**

**रूक्षवाचेऽथ दु:शीला: कुसत्त्वा: स्थूलबुद्धय: |**
**क्रोधना घातकाश्चैव मित्रघ्नाश्छिद्रमानिन: || ५ ||**
**पिशुनास्तूद्धतैर्वाक्यैरकृतज्ञास्तथालसा: |**
**मान्यामान्याविशेषज्ञा स्त्रीलोला: कलहप्रिया: || ६ ||**
**सूचका: पापकर्माण: परद्रव्यापहारिण: |**
**एभिर्दोषैस्तु संपन्ना भवन्तीहाधमा नरा: || ७ ||**

**पदच्छेद:** – रूक्ष-वाच: अथ दु:शीला: कुसत्त्वा: स्थूल-वुद्धय: |
क्रोधना: घातका: च एव मित्रघ्ना: छिद्र-मानिन: || ५ ||
पिशुना: तु उद्धतै: वाक्यै: अकृतज्ञा: तथा अलसा: |
मान्य-अमान्य-अविशेषज्ञा: स्त्रीलोला: कलह-प्रिया: || ६ ||
सूचका: पापकर्माण: परद्रव्य-अपहारिण: |
एभि: दोषै: तु संपन्ना: भवन्ति इह अधमा: नरा: || ७ ||

**अन्वय:** – अथ इह रूक्षवाच:, दु:शीला:, कुसत्त्वा:, स्थूलवुद्धय:, क्रोधना:, घातका:, मित्रघ्ना:, छिद्रमानिन:, पिशुना:, उद्धतै: वाक्यै: अकृतज्ञा: तथा अलसा:, मान्यामान्याविशेषज्ञा:, स्त्रीलोला:, कलहप्रिया:, सूचका:, पापकर्माण:, परद्रव्यापहारिण: एभि: दोषै: तु अधमा: नरा: संपन्ना: भवन्ति |

**अर्थ** – रूक्ष बोलणारा, दुष्ट स्वभावाचा, कुत्सित मन असलेला (कुचक्या स्वभावाचा), जड बुद्धीचा, क्रोधी, घातकी, मित्रद्रोही, नेहमी दोष शोधणारा, पाशवी, उद्धट वाक्ये बोलणारा, केलेल्याची जाण न ठेवणारा, आळशी, मान्य आणि अमान्य गोष्टींविषयी जाण नसणारा, स्त्रीलंपट, कलहप्रिय असणारा, चुगली करणारा, पापकर्मे करणारा, दुसऱ्याचे धन चोरणारा इत्यादी दोषांनी परिपूर्ण असा अधम लोकांचा स्वभाव असतो .

**एवं तु शीलतो नृणां प्रकृतिस्त्रिविधा स्मृता |**
**स्त्रीणां पुनश्च प्रकृतिं व्याख्यास्याम्यनुपूर्वश: || ८ ||**

**पदच्छेद:** – एवम् तु शीलत: नृणाम् प्रकृति: त्रिविधा स्मृता |
स्त्रीणाम् पुन: च प्रकृतिम् व्याख्यास्यामि अनुपूर्वश: || ८ ||

**अन्वय:** – एवम् तु शीलत: नृणाम् त्रिविधा प्रकृति: स्मृता | पुन: च स्त्रीणाम् प्रकृतिम् अनुपूर्वश: व्याख्यास्यामि |

**अर्थ** – याप्रमाणे चारित्र्यानुसार माणसांच्या तीन प्रकृती सांगितल्या आहेत. तरीही स्त्रियांविषयीच्या प्रकृतीविषयी आता सांगत आहे .

**❖ स्त्री प्रकृतीचे प्रकार ❖**

**❖ उत्तम प्रकृती ❖**

**अथ स्त्रीप्रकृति:-**

**मृदुभावा चाचपला स्मितभाषिण्यनिष्ठुरा |**
**गुरूणां वचने दक्षा सलज्जा विनयान्विता || ९ ||**
**रूपाभिजनमाधुर्यैर्गुणै: स्वाभाविकैर्युता |**
**गाम्भीर्यधैर्यसंपन्ना विज्ञेया प्रमदोत्तमा || १० ||**

**पदच्छेद:-** मृदु-भावा च अचपला स्मित-भाषिणी अनिष्ठुरा |
गुरूणाम् वचने दक्षा सलज्जा विनय-अन्विता || ९ ||
रूप-अभिजन-माधुर्यै: गुणै: स्वाभाविकै: युता |
गाम्भीर्य-धैर्य-संपन्ना विज्ञेया प्रमदा उत्तमा || १० ||

**अन्वय: –** मृदुभावा, अचपला, स्मितभाषिणी, अनिष्ठुरा, गुरूणाम् वचने दक्षा, सलज्जा, विनयान्विता, रूपाभिजनमाधुर्यै: स्वाभाविकै: गुणै: युता, गाम्भीर्यधैर्यसंपन्ना प्रमदा 'उत्तमा' विज्ञेया।

**अर्थ –** मृदु आणि हळव्या स्वभावाची, स्मित करून बोलणारी, कठोर वचन न बोलणारी, गुरूजनांविषयी आदर बाळगणारी, बोलण्यात हुशार, विनयशील, रूपसंपन्न, कुलीन आणि मधुर इत्यादी स्वाभाविक गुणांनी युक्त, गांभीर्य आणि धैर्याने संपन्न अशी जी स्त्री तिला 'उत्तम' समजावे .

**❖ मध्यम प्रकृती ❖**

**नात्युत्कृष्टैरनिखिलैरेभिरेवान्विता गुणै: |**
**अल्पदोषानुविद्धा च मध्यमा प्रकृति: स्मृता || ११ ||**

**पदच्छेद:-** न अत्युत्कृष्टै: अनिखिलै: एभि: एव अन्विता गुणै: |
अल्पदोषा अनुविद्धा च मध्यमा प्रकृति: स्मृता || ११ ||

**अन्वय: –** न अत्युत्कृष्टै: अनिखिलै: एभि: एव गुणै: अन्विता, अल्पदोषा अनुविद्धा च प्रकृति: मध्यमा स्मृता |

**अर्थ –** उत्कृष्टतेवर न पोचलेली, परंतु वर सांगितलेल्या गुणांनी युक्त आणि अल्प दोषांनी युक्त असलेली स्त्रियांची प्रकृती 'मध्यम' म्हणून ओळखली जाते .

**❖ अधम प्रकृती ❖**

**अधमा प्रकृतिर्या तु पुरुषाणां प्रकीर्तिता |**
**विज्ञेया सैव नारीणामधमानां समासत: || १२ ||**

**पदच्छेद: –** अधमा प्रकृति: या तु पुरुषाणाम् प्रकीर्तिता |
विज्ञेया सा एव नारीणाम् अधमानाम् समासत: || १२ ||

**अन्वय: –** या तु पुरुषाणाम् अधमा प्रकृति: प्रकीर्तिता सा एव समासत: अधमानाम् नारीणाम् विज्ञेया |

**अर्थ –** पुरुषांची जी अधम प्रकृती सांगितली आहे, तशीच अधम प्रकृती स्त्रियांची देखील असते .

**❖ नपुंसक, अधम व संकीर्ण पात्र ❖**

**नपुंसकस्तु विज्ञेय: संकीर्णोऽधम एव च |**
**प्रेष्यादिरपि विज्ञेया संकीर्णा प्रकृतिद्विजा: || १३ ||**

**पदच्छेद: –** नपुंसक: तु विज्ञेय: संकीर्ण: अधम: एव च |
प्रेष्य-आदि: अपि विज्ञेया संकीर्णा प्रकृति-द्विजा: || १३ ||

**अन्वय: –** नपुंसक: तु संकीर्ण: एव च अधम: विज्ञेय: | प्रेष्यादि: अपि संकीर्णा प्रकृतिद्विजा: विज्ञेया | (प्रेष्यांश्च संकीर्णा इति स्वामिचित्तानुरोधात् | - अ . भा . )

**अर्थ –** नपुंसक व्यक्ती मिश्र आणि अधम प्रकृतीचा असतो हे जाणून घ्या . जो संदेशवाहक इत्यादी जे संकीर्णजातीचे पात्र आहेत हे स्वामीच्या चित्तानुसार वागणारे असतात म्हणून त्यांचीदेखील अधम प्रकृती सांगितली आहे .

**शकारश्च विटश्चैव ये चान्येप्येवमादयः |**
**संकीर्णास्तेऽपि विज्ञेया ह्यधमा नाटके बुधैः || १४ ||**

**पदच्छेद :-** शकार : च विट : च एव ये च अन्ये अपि एवम् आदय : |
संकीर्णा : ते अपि विज्ञेया : हि अधमा : नाटके बुधै : || १४ ||

**अन्वय : -** नाटके शकार : विट अपि च ये अन्ये आदय : संकीर्णा : ते अपि बुधै : अधमा : हि विज्ञेया : |

**अर्थ -** नाटकामध्ये शकार, वीट तसेच अन्य जे कोणी इतर संकीर्ण पात्र असतात त्यांना देखील बुद्धिमान लोकांनी अधम प्रकृतीचे समजावे .

**एता ज्ञेयाः प्रकृतयः पुरुषस्त्रीनपुंसकैः |**
**आसां तु संप्रवक्ष्यामि विधानं शीलसंश्रयम् || १५ ||**

**पदच्छेद :-** एता : ज्ञेया : प्रकृतय : पुरुष-स्त्री-नपुंसकै : |
आसाम् तु संप्रवक्ष्यामि विधानम् शीलसंश्रयम् || १५ ||

**अन्वय : -** पुरुषस्त्रीनपुंसकै : एता : प्रकृतय : ज्ञेया : | आसाम् तु शीलसंश्रयम् विधानम् संप्रवक्ष्यामि |

**अर्थ -** स्त्री, पुरुष आणि नपुंसक पात्रांनी ह्या प्रकृती जाणून घ्याव्यात . आता 'चारित्र्या'वर आधारित त्यांची लक्षणे सांगतो .

**❖ चार प्रकारचे नायक ❖**

**अत्र चत्वार एव स्युर्नायकाः परिकीर्तिताः |**
**मध्यमोत्तमप्रकृतौ नानालक्षणलक्षिताः || १६ ||**

**पदच्छेद :-** अत्र चत्वार : एव स्यु : नायका : परिकीर्तिता : |
मध्यम-उत्तम-प्रकृतौ नाना-लक्षण-लक्षिता : || १६ ||

**अन्वय : -** अत्र मध्यमोत्तमप्रकृतौ नानालक्षणलक्षिता : चत्वार : एव नायका : परिकीर्तिता : स्यु : |

**अर्थ -** (या ठिकाणी म्हणजे) नाट्यशास्त्रामध्ये मध्यम आणि उत्तम प्रकृतींवर आधारित, विविध लक्षणांनी युक्त असे चार प्रकारचे नायक सांगितले आहेत .

**❖ नायकांचे प्रकार ❖**

**धीरोद्धता धीरललिता धीरोदात्तास्तथैव च |**
**धीरप्रशान्तकाश्चैव नायका: परिकीर्तिता: || १७ ||**

**पदच्छेद:–** धीर-उद्धता: धीर-ललिता: धीर-उदात्ता: तथा एव च |
धीर-प्रशान्तका: च एव नायका: परिकीर्तिता: || १७ ||

**अन्वय: –** धीरोद्धता: धीरललिता: धीरोदात्ता: धीरप्रशान्तका: च नायका: परिकीर्तिता: |

**अर्थ –** धीरोद्धत, धीरललित, धीरोदात्त आणि धीरप्रशांत हे नायक सांगितले गेले आहेत .

**देवा धीरोद्धता ज्ञेया: स्युर्धीरललिता नृपा: |**
**सेनापतिरमात्यश्च धीरोदात्तौ प्रकीर्तितौ || १८ ||**

**पदच्छेद:–** देवा: धीरोद्धता: ज्ञेया: स्यु: धीरललिता: नृपा: |
सेनापति: अमात्य: च धीरोदात्तौ प्रकीर्तितौ || १८ ||

**अन्वय: –** देवा: धीरोद्धता: ज्ञेया: | नृपा: धीरललिता: स्यु: | सेनापति: अमात्य: च धीरोदात्तौ प्रकीर्तितौ |

**अर्थ –** देवांना धीरोद्धत, राजांना धीरललित म्हटले आहे . सेनापति व अमात्य यांना धीरोदात्त म्हटले गेले आहे .

**धीरप्रशान्ता विज्ञेया ब्राह्मणा वणिजस्तथा |**
**एतेषां तु पुनर्ज्ञेयाश्चत्वारस्तु विदूषका: || १९ ||**

**पदच्छेद:–** धीरप्रशान्ता: विज्ञेया: ब्राह्मणा: वणिज: तथा |
एतेषाम् तु पुन: ज्ञेया: चत्वार: तु विदूषका: || १९ ||

**अन्वय: –** ब्राह्मणा: तथा वणिज: धीरप्रशान्ता: विज्ञेया: | पुन: तु एतेषाम् (नायकानाम्) चत्वार: तु विदूषका: ज्ञेया: | (सुरतविषये संबन्धिग्रहणे विग्रहं वा सन्धिना दूषयति इति विदूषक: | विप्रलम्भनत्वे (कथा) विनोदने (नि:) दूषयन्ति विस्मारयन्ति | - अ . भा . )

**अर्थ** – ब्राम्हण आणि व्यापारी यांना धीरप्रशांत समजावे. अशा या चार प्रकारच्या नायकांसाठी चार प्रकारचे विदूपक असावेत. (प्रेमाच्या विषयामध्ये संबंध किंवा नातं निर्माण करण्यासाठी नाट्यसंधिमध्ये गोंधळ घालतो तो विदूपक होय. विप्रलंभ शृंगारामध्ये राजाला कथा सांगून करमणुकीद्वारे त्याचे दु:ख विसरायला लावतो तो विदूषक होय.)

**❖ विदूषकांचे प्रकार ❖**

**लिंगी द्विजो राजजीवी शिष्यश्चेति यथाक्रमम् |**
**देवक्षितिभृतामात्यब्राम्हणानां प्रयोजयेत् || २० ||**

**पदच्छेद:** – लिंगी द्विज: राजजीवी शिष्य: च इति यथाक्रमम् |
देव-क्षितिभृत-अमात्य-ब्राम्हणानाम् प्रयोजयेत् || २० ||

**अन्वय:** – देवक्षितिभृतामात्यब्राम्हणानाम् लिंगी द्विज: राजजीवी शिष्य: च इति यथाक्रमम् प्रयोजयेत् | (लिङ्गी ऋषि: देवानाम्, द्विजो वीर: सेनापते:, राजजीवी राज्ञ:, शिष्यो ब्राम्हणस्य | - अ. भा.)

**अर्थ** – देवता, राजा, अमात्य आणि ब्राम्हण यांसाठी क्रमश: ऋषी, द्विज, राजजीवी आणि शिष्य यांना विदूपक नेमावे.
(अभिनवाच्या मतानुसार मात्र राजाचा विदूपक राजोपजीवी आणि सेनापतीचा विदूपक द्विज म्हणजे वीर मनुष्य असावा.)

**विप्रलम्भसुहृदोऽमी संकथालापपेशला: |**
**व्यसनी प्राप्य दु:खं वा युज्यतेऽभ्युदयेन य: || २१ ||**
**तथा पुरुषमाहुस्तं प्रधानं नायकं बुधा: |**
**यत्रानेकस्य भवतो व्यसनाभ्युदयौ पुन: || २२ ||**
**सपुष्टौ यत्र तौ स्यातां न भवेत्तत्र नायक: |**

**पदच्छेद:** – विप्रलम्भ-सुहृद: अमी संकथा-आलाप-पेशला: |
व्यसनी प्राप्य दु:खम् वा युज्यते अभ्युदयेन य: || २१ ||

तथा पुरुषम् आहु: तम् प्रधानम् नायकम् बुधा: |
यत्र अनेकस्य भवत: व्यसन-अभ्युदयौ पुन: || २२ ||
सपुष्टौ यत्र तौ स्याताम् न भवेत् तत्र नायक: |

**अन्वय:** – विप्रलम्भसुहृद: अमी संकथालापपेशला: | यदा नायक: व्यसनी दु:खम् प्राप्य वा तम् नायकम् य: अभ्युदयेन युज्यते तम् बुधा: 'प्रधानम् पुरुषम्' इति आहु: | यत्र पुन: अनेकस्य व्यसनाभ्युदयौ भवत: | यत्र तौ सपुष्टौ स्याताम् तत्र नायक: न भवेत् |

**अर्थ** – विप्रलंभ शृंगारामध्ये नायकाच्या हृदयाचे मर्म जाणणारे (मित्रासमान असणारे हे विदूषक) वार्ताकथन करण्यामध्ये (संकथा) व संभाषणामध्ये (आलाप) कुशल असतात. जेव्हा नायक संकटग्रस्त किंवा दु:खी होतो तेव्हा जो त्या नायकाला उत्कर्षाकडे घेऊन जातो, त्या विदूषकाला विद्वानांनी 'प्रधान पुरुष' असे म्हटले आहे. ज्याठिकाणी अनेक नायकांचे संकट आणि उत्कर्ष होत असतो आणि जिथे संकट व उत्कर्ष हे दोन्ही अधिक बलवत्तर असतील, तिथे नायक नसतो.

**❖ नायिकांचे प्रकार ❖**

**दिव्या च नृपपत्नी च कुलस्त्री गणिका तथा || २३ ||**
**एतास्तु नायिका ज्ञेया नानाप्रकृतिलक्षणा: |**
**धीरा च ललिता च स्यादुदात्ता निभृता तथा || २४ ||**

**पदच्छेद:** – दिव्या च नृप-पत्नी च कुलस्त्री गणिका तथा || २३ ||
एता: तु नायिका: ज्ञेया: नाना-प्रकृति-लक्षणा: |
धीरा च ललिता च स्यात् उदात्ता निभृता तथा || २४ ||

**अन्वय:** – दिव्या, नृपपत्नी, कुलस्त्री तथा च गणिका एता: नानाप्रकृतिलक्षणा: नायिका: ज्ञेया: | एषा धीरा, ललिता, उदात्ता तथा च निभृता स्यात् |

**अर्थ** – दिव्या, नृपपत्नी, कुलांगना आणि गणिका या विविध प्रकृती असणाऱ्या नायिकांची लक्षणे विद्वानांनी जाणून घ्यावीत. त्या धीर, ललित, उदात्त आणि निभृत अशा असतात.

**दिव्या राजाङ्गनाश्चैव गुणैर्युक्ता भवन्ति हि |**
**उदात्ता निभृता चैव भवेत्तु कुलजाङ्गना || २५ ||**
**ललिते चाभ्युदात्ते च गणिकाशिल्पकारिके |**

**पदच्छेद :–** दिव्या : राज-अङ्गना : च एव गुणै : युक्ता : भवन्ति हि |
उदात्ता निभृता च एव भवेत् तु कुलजा-अङ्गना || २५ ||
ललिते च अभ्युदात्ते च गणिका-शिल्पकारिके |

**अन्वय : –** दिव्या: राजांगना: च गुणै: युक्ता: भवन्ति हि | उदात्ता निभृता च कुलजाङ्गना तु भवेत् | गणिकाशिल्पकारिके ललिते च अभ्युदात्ते च स्याताम् |

**अर्थ –** यापैकी ज्या नायिका दिव्य आणि नृपपत्नी असतात, त्या अनेक गुणांनी युक्त असतातच . परंतु जी नायिका कुलस्त्री असते ती उदात्त आणि निभृत स्वभावाची असते . गणिका आणि शिल्पकारिका असणाऱ्या दोन्ही नायिका ललित, उदात्त स्वभावाच्या असतात .

**❖ प्रजेचे गमनागमन ❖**

**प्रकृतीनां तु सर्वासामुपचाराद्द्विधा स्मृता: || २६ ||**
**बाह्यश्चाभ्यन्तरश्चैव तयोर्वक्ष्यामि लक्षणम् |**

**पदच्छेद :–** प्रकृतीनाम् तु सर्वासाम् उपचारात् द्विधा स्मृता : || २६ ||
वाह्य : च आभ्यन्तर : च एव तयो : वक्ष्यामि लक्षणम् |

**अन्वय : –** सर्वासाम् प्रकृतीनाम् तु उपचारात् द्विधा स्मृता : | वाह्य: एव च आभ्यन्तर: च तयो: लक्षणम् वक्ष्यामि |

**अर्थ –** सर्व प्रजेचे गमनागमन दोन प्रकारचे सांगितले जाते १) वाह्य उपचार २) आभ्यंतर उपचार . या दोघांची लक्षणे आता सांगेन .

**तत्र राजोपचारो यो भवेदाभ्यन्तरो हि स: || २७ ||**
**ततो वाक्योपचारस्तु यस्य बाह्य: स उच्यते |**

**पदच्छेद:** – तत्र राज-उपचार: य: भवेत् आभ्यन्तर: हि स: || २७ ||
तत: वाक्य-उपचार: तु यस्य बाह्य: स: उच्यते |

**अन्वय:** – तत्र य: राजोपचार: स: हि आभ्यन्तर: भवेत् | तत: यस्य वाक्योपचार: स: तु बाह्य: उच्यते |

**अर्थ** – यातील राजाचे गमनागमन हा आभ्यंतर असतो आणि त्याहून वेगळ्यांचे गमनागमन हे बाह्य असते.

**❖ राजांचे उपचार (गमनागमन) ❖**

**अथ राजोपचारे च राज्ञामन्त:पुराश्रितम् || २८ ||**
**स्त्रीविभागं प्रवक्ष्यामि विभक्तमुपचारत: |**
**राजोपचारं वक्ष्यामि ह्यन्त:पुरसमाश्रयम् || २९ ||**

**पदच्छेद:** – अथ राजोपचारे च राज्ञाम् अन्त:पुर-आश्रितम् || २८ ||
स्त्रीविभागम् प्रवक्ष्यामि विभक्तम् उपचारत: |
राजोपचारम् वक्ष्यामि हि अन्त:पुर-समाश्रयम् || २९ ||

**अन्वय:** – अथ राजोपचारे च राज्ञाम् उपचारत: अन्त:पुराश्रितम् विभक्तम् स्त्रीविभागम् प्रवक्ष्यामि | अन्त:पुरसमाश्रयम् हि राजोपचारम् वक्ष्यामि |

**अर्थ** – आता राजोपचारामध्ये, प्रथम राजांच्या अंत:पुरात असणाऱ्या स्त्रियांच्या वेगवेगळ्या कक्षांविषयी सांगेन आणि त्यानंतर अंत:पुरामधील राजांच्या गमनागमनाविषयी सांगेन.

**❖ राजाच्या अंत:पुरातील स्त्रीविभाग ❖**

**महादेवी तथा देव्य: स्वामिन्य: स्थापिता अपि |**
**भोगिन्य: शिल्पकारिण्यो नाटकीया: सनर्तका: || ३० ||**
**अनुचारिकाश्च विज्ञेयास्तथा च परिचारिका: |**
**तथा संचारिकाश्चैव तथा प्रेषणकारिका: || ३१ ||**
**महत्तर्य: प्रतीहार्य: कुमार्य: स्थविरा अपि |**
**आयुक्तिकाश्च नृपतेरयमन्त:पुरो जन: || ३२ ||**

**पदच्छेद :-** महादेवी तथा देव्य : स्वामिन्य : स्थापिता : अपि |
भोगिन्य : शिल्पकारिण्य : नाटकीया : सनर्तका : || ३० ||
अनुचारिका : च विज्ञेय : तथा च परिचारिका : |
तथा संचारिका : च एव तथा प्रेषणकारिका : || ३१ ||
महत्तर्य : प्रतीहार्य : कुमार्य : स्थविरा : अपि |
आयुक्तिका : च नृपते : अयम् अन्त :पुर : जन : || ३२ ||

**अन्वय :-** महादेवी, देव्य :, स्वामिन्य :, स्थापिता :, भोगिन्य :, शिल्पकारिण्य :, नाटकीया :, सनर्तका :, अनुचारिका :, परिचारिका :, संचारिका :, प्रेषणकारिका :, महत्तर्य :, प्रतीहार्य :, कुमार्य :, स्थविरा : अपि च आयुक्तिका : अयम् नृपते : अन्त :पुर : जन : विज्ञेय : |

**अर्थ -** महादेवी, देवी, स्वामिनी, स्थापिता, भोगिनी, शिल्पकारिणी, नाटकीया, नर्तकी, अनुपचारिका, परिचारिका, संचारिका, प्रेषणकारिका, महत्तरी, प्रतीहारी, कुमारिका, म्हातारी, आणि आयुक्तिका हा राजाच्या अंत :पुरातील स्त्रीजनसमूह विद्वानांनी जाणून घ्यावा .

(महादेवीपासून आयुक्तिकेपर्यंत स्त्रियांचे १७ विभाग आहेत आणि नपुंसकादिंचा अठरावा विभाग सांगितला आहे . म्हणून अठरा प्रकारचे अंत :पुर सांगितले जातात . हा सर्व राजाच्या अंत :पुराचा परिवार समजला जातो . )

**❖ १ . महादेवी ❖**

**अत्र मूर्धाभिषिक्ता या कुलशीलसमन्विता |**
**गुणैर्युक्ता वयस्स्था च मध्यस्थाक्रोधना तथा || ३३ ||**
**मुक्तेर्ष्या नृपशीलज्ञा सुखदु :खसहा समा |**
**शान्तिस्वस्त्ययनैर्भर्त्तुस्सततं मङ्गलैषिणी || ३४ ||**
**शान्ता पतिव्रता धीरा अन्त :पुरहिते रता |**
**एभिर्गुणैस्तु संयुक्ता महादेवीत्युदाहृता || ३५ ||**

**पदच्छेद :–** अत्र मूर्धा-अभिषिक्ता या कुल-शील-समन्विता |
गुणै : युक्ता वयस्था च मध्यस्था अक्रोधना तथा || ३३ ||
मुक्त-ईर्ष्या नृपशीलज्ञा सुख-दु :ख-सहा समा |
शान्ति-स्वस्ति-अयनै : भर्त्तु : सततम् मङ्गल-एषिणी || ३४ ||
शान्ता पतिव्रता धीरा अन्त :पुर-हिते रता |
एभि : गुणै : तु संयुक्ता महादेवी इति उदाहृता || ३५ ||

**अन्वय : –** अत्र या मूर्धाभिषिक्ता, कुलशीलसमन्विता, गुणै : युक्ता, वयस्था, मध्यस्था, अक्रोधना, मुक्तेर्ष्या, नृपशीलज्ञा, सुखदु :खसहा, समा, शान्तिस्वस्त्ययनै: भर्त्तु: सततम् मङ्गलैषिणी, शान्ता, पतिव्रता, धीरा, अन्त :पुरहिते रता, एभि : गुणै : तु संयुक्ता (सा) महादेवी इति उदाहृता |

**अर्थ –** नाट्यशास्त्रामध्ये त्या स्त्रिला 'महादेवी' म्हटले जाते, जिच्या मस्तकावर अभिषेक झालेला असतो . ती उच्च कुळातील असून चारित्र्यसंपन्न असते . ती अनेक गुणांनी युक्त असते . ती वयाने प्रौढ असते . सर्वांमध्ये ती आदरणीय आणि श्रेष्ठ असते . ती क्रोध न करणारी आणि कोणाविषयी ईर्ष्या न बाळगणारी असते . ती राजाचे चारित्र्य जाणणारी असते . शांती आणि कल्याणाच्या मार्गाने ती नेहमी पतीचे मंगल इच्छिणारी असते . ती शांत, पतिव्रता, धीर आणि अंत :पुराच्या हितासाठी मग्न असते . असे अनेक गुण महादेवीमध्ये असतात .

### ❖ २ . देवी ❖

**एभिरेव गुणैर्युक्तास्तत्संस्कारविवर्जिता: |**
**गर्विताश्चातिसौभाग्या: पतिसंभोगतत्परा: || ३६ ||**
**शुचिनित्योज्ज्वलाकारा: प्रतिपक्षाभ्यसूयका: |**
**वयोरूपगुणाढ्या यास्ता देव्य इति भाषिता: || ३७ ||**

**पदच्छेद :–** एभि : एव गुणै : युक्ता : तत्संस्कार-विवर्जिता : |
गर्विता : च अतिसौभाग्या : पति-संभोग-तत्परा : || ३६ ||

शुचि-नित्य-उज्ज्वल-आकारा: प्रतिपक्ष-अभ्यसूयका:।
वयो-रूप-गुणाढ्या: या: ता: देव्य: इति भाषिता:॥ ३७॥

**अन्वय: –** या: एभि: एव गुणै: युक्ता: (परं) तत्संस्कारविवर्जिता:, अतिसौभाग्या: गर्विता:, पतिसंभोगतत्परा:, शुचिनित्योज्ज्वलाकारा:, प्रतिपक्षाभ्यसूयका:, वयोरूपगुणाढ्या: ता: 'देव्य:' इति भाषिता:।

**अर्थ –** ज्या स्त्रियांमध्ये वरील गुण असतात परंतु महादेवीप्रमाणे संस्कार नसतात. जिला सौभाग्याचा गर्व असतो. पतीसह संभोगासाठी तत्पर असते. पावित्र्य, नियमितपणे उज्ज्वल वेष धारण करते. सवतीवर ईर्ष्या करणारी असते. तारुण्य, सौंदर्य आणि गुणांची खाण असलेल्या ज्या स्त्रिया त्यांना 'देवी' म्हटले जाते.

**❖ ३. स्वामिनी ❖**

**सेनापतेरमात्यानां भृत्यानामथवा पुन: ।**
**भवेयुस्तनया यास्तु प्रतिसम्मानवर्जिता: ॥ ३८॥**
**शीलरूपगुणैर्यास्तु संपन्ना नृपतेर्हिता: ।**
**स्वगुणैर्लब्धसम्माना स्वामिन्य इति ता: स्मृता: ॥ ३९॥**

**पदच्छेद: –** सेनापते: अमात्यानाम् भृत्यानाम् अथवा पुन:।
भवेयु: तनया: या: तु प्रतिसम्मान-वर्जिता:॥ ३८॥
शील-रूप-गुणै: या: तु संपन्ना: नृपते: हिता:।
स्वगुणै: लब्ध-सम्माना: स्वामिन्य: इति ता: स्मृता:॥ ३९॥

**अन्वय: –** या: सेनापते: अमात्यानाम् अथवा भृत्यानाम् तनया: भवेयु:, प्रतिसम्मानवर्जिता:, या: शीलरूपगुणै: तु संपन्ना: नृपते: हिता:, स्वगुणै: लब्धसम्माना: ता: स्वामिन्य: इति स्मृता:।

**अर्थ –** ज्या सेनापती, अमात्य किंवा सेवकांच्या कन्या असतात, प्रत्येकवेळी सन्मानापासून वंचित राहिल्या असल्या तरी त्यांच्यामध्ये चारित्र्य, सौंदर्य व अनेक गुण असतात, राजाच्या हितासाठी तत्पर असतात, आणि स्वत:च्या गुणांनी समाजामध्ये सन्मान मिळवितात त्या स्त्रियांना 'स्वामिनी' म्हटले जाते.

### ❖ ४. स्थापिता ❖

**रूपयौवनशालिन्यः कर्कशा विभ्रमान्विताः |**
**रतिसंभोगकुशलाः प्रतिपक्षाभ्यसूयिकाः ||४०||**
**दक्षा भर्तुश्च चित्तज्ञा गन्धमाल्योज्ज्वलास्सदा |**
**नृपतेश्छन्दवर्त्तिन्यो न हीर्ष्यामानगर्विताः ||४१||**
**उत्थिताश्च प्रमत्ताश्च त्यक्तालस्या न निष्ठुराः |**
**मान्यामान्यविशेषज्ञाः स्थापिता इति ताः स्मृताः ||४२||**

**पदच्छेदः –** रूप-यौवन-शालिन्यः कर्कशाः विभ्रमान्विताः |
रति-संभोग-कुशलाः प्रतिपक्ष-अभ्यसूयिकाः ||४०||
दक्षाः भर्तुः च चित्तज्ञाः गन्ध-माल्य-उज्ज्वलाः सदा |
नृपतेः छन्दवर्त्तिन्यः न हि ईर्ष्या-मान-गर्विताः ||४१||
उत्थिताः च प्रमत्ताः च त्यक्तालस्याः न निष्ठुराः |
मान्य-अमान्य-विशेषज्ञाः स्थापिताः इति ताः स्मृताः ||४२||

**अन्वयः –** (याः) रूपयौवनशालिन्यः, कर्कशाः, विभ्रमान्विताः, रतिसंभोगकुशलाः, प्रतिपक्षाभ्यसूयिकाः, दक्षाः, भर्तुः चित्तज्ञाः, सदा गन्धमाल्योज्ज्वलाः, नृपतेः छन्दवर्त्तिन्यः, न ईर्ष्यामानगर्विताः, उत्थिताः, प्रमत्ताः, त्यक्तालस्याः, न निष्ठुराः, मान्यामान्यविशेषज्ञाः ताः 'स्थापिताः' इति स्मृताः | (सौभाग्यगर्वेण कर्कशा |- अ.भा.)

**अर्थ –** ज्या नायिका सौंदर्य व तारुण्याने परिपूर्ण असतात, सौभाग्यामुळे अत्यंत गर्विष्ठ असतात, रतिसंभोगामध्ये कुशल असतात, सवतीवर मत्सर करणाऱ्या असतात, जागरूक आणि पतीचे मन ओळखून असतात, नेहमी सुगंधी माळ व भडक कपडे धारण करतात, राजाच्या इच्छेनुसार वागणाऱ्या असतात, ज्यांना ईर्ष्या मान व गर्व नसतो, ज्यांना कोणीतरी उचलून आणलेले असते, ज्या अतिशय उन्मत्त असतात, ज्यांनी आळस झटकून दिलेला असतो, ज्या निष्ठूर नसतात, ज्यांना सन्माननीय व सन्मान नसलेल्या लोकांविषयी विशेष ज्ञान असते त्यांना 'स्थापिता' असे म्हटले आहे.

### ❖ ५. भोगिनी ❖

**कुलशीललब्धपूजामृदवो नातिचोद्भटाः ।**
**मध्यस्था निभृताः क्षान्ता भोगिन्य इति ताः स्मृताः ॥ ४३ ॥**

**पदच्छेदः –** कुल-शील-लब्ध-पूजा-मृदवः न अति च उद्भटाः ।
मध्यस्थाः निभृताः क्षान्ताः भोगिन्यः इति ताः स्मृताः ॥ ४३ ॥

**अन्वयः –** (याः) कुलशीललब्धपूजामृदवः, न अत्युद्भटाः, मध्यस्थाः, निभृताः, क्षान्ताः ताः 'भोगिन्यः' इति स्मृताः ।

**अर्थ –** कुळ आणि चारित्र्यामुळे आदर मिळाल्याने ज्या हळूवार स्वभावाच्या असतात, अतिशय उद्धत नसतात, सर्वांमध्ये राहतात, घरात राहतात आणि शांत म्हणजे क्षमाशील असतात त्यांना 'भोगिनी' असे म्हणतात.

### ❖ ६. शिल्पकारिणी ❖

**नानाकलाविशेषज्ञा नानाशिल्पविचक्षणाः ।**
**गन्धपुष्पविभागज्ञा लेख्यालेख्यविकल्पिकाः ॥ ४४ ॥**
**शयनासनभागज्ञाश्चतुरा मधुरास्तथा ।**
**दक्षाः सौम्याः स्फुटाः श्लिष्टा निभृताः शिल्पकारिकाः ॥ ४५ ॥**

**पदच्छेदः –** नाना-कला-विशेषज्ञाः नाना-शिल्प-विचक्षणाः ।
गन्ध-पुष्प-विभागज्ञाः लेख्य-आलेख्य-विकल्पिकाः ॥ ४४ ॥
शयन-आसन-भागज्ञाः चतुराः मधुराः तथा ।
दक्षाः सौम्याः स्फुटाः श्लिष्टाः निभृताः शिल्पकारिकाः ॥ ४५ ॥

**अन्वयः –** याः नानाकलाविशेषज्ञाः, नानाशिल्पविचक्षणाः, गन्धपुष्पविभागज्ञाः, लेख्यालेख्य-विकल्पिकाः, शयनासनभागज्ञाः, चतुराः तथा मधुराः, दक्षाः, सौम्याः, स्फुटाः, श्लिष्टाः, निभृताः शिल्पकारिकाः सन्ति ।

**अर्थ** – ज्या विविध कलांमध्ये प्रवीण असतात, अनेक प्रकारच्या शिल्पांच्या बाबतीत बुद्धिमती असतात, सुगंध आणि फुलांविषयीचे विशेष ज्ञान असते, ज्यांना लेखन आणि रेखाटन यातील फरक माहित असतो, ज्या शयनाचे आणि आसनाचे विविध प्रकार शिकलेल्या असतात, ज्या बोलण्यात चतुर आणि मधुर असतात, स्वभावाने अतिशय सौम्य पण स्पष्टपणे बोलणाऱ्या असतात, ज्या शब्दांची व्यंजनाशक्ती जाणतात आणि विनम्र असतात त्यांना 'शिल्पकारिका' असे म्हणतात.

**❖ ७. नाटकीया ❖**

**ग्रहमोक्षलयज्ञा या रसभावविकल्पिका: |**
**चतुरा नाट्यकुशलाश्चोहापोहविचक्षणा: ||४६||**
**रूपयौवनसंपन्ना नाटकीयास्तु ता: स्मृता: |**

**पदच्छेद:** – ग्रह-मोक्ष-लय-ज्ञा: या: रस-भाव-विकल्पिका: |
चतुरा: नाट्य-कुशला: च ऊहापोह-विचक्षणा: || ४६ ||
रूप-यौवन-संपन्ना: नाटकीया: तु ता: स्मृता: |

**अन्वय:** – ग्रहमोक्षलयज्ञा:, रसभावविकल्पिका:, चतुरा:, नाट्यकुशला:, ऊहापोहविचक्षणा:, रूपयौवनसंपन्ना: ता: तु नाटकीया: (इति) स्मृता: |

**अर्थ** – ज्या स्त्रिया तालातील ग्रह, मोक्ष आणि लय या संकल्पना जाणणाऱ्या आहेत, रस आणि भाव यांमधील फरक जाणणाऱ्या आहेत, चतुर आहेत, नाट्यकलेमध्ये हुशार आहेत, ऊहापोह करण्यात तरबेज आहेत, सौंदर्य आणि तारुण्याने संपन्न आहेत, अशा त्या स्त्रियांना 'नाटकीय' म्हणून ओळखले जाते.

**❖ ८. नर्तकी ❖**

**हेलाभावविशेषाढ्या सत्त्वेनाभिनयेन च ||४७||**
**माधुर्येण च संपन्ना ह्यातोद्यकुशला तथा |**
**अङ्गप्रत्यङ्गसंपन्ना चतुष्षष्ठिकलान्विता ||४८||**

**चतुराः प्रश्रयोपेताः स्त्रीदोषैश्च विवर्जिताः |**
**सदा प्रगल्भा च तथा त्यक्तालस्या जितश्रमा || ४९ ||**
**नानाशिल्पप्रयोगज्ञा नृत्तगीतविचक्षणा |**
**अथ रूपगुणौदार्यधैर्यसौभाग्यशीलसंपन्ना || ५० ||**
**पेशलमधुरस्निग्धानुनादिकलचित्रकण्ठा च |**
**समागतासु नारीषु रूपयौवनकान्तिभिः || ५१ ||**
**न दृश्यते गुणैस्तुल्या यस्याः सा नर्तकी स्मृता |**

**पदच्छेद :-** हेला-भाव-विशेष-आढ्या सत्त्वेन अभिनयेन च || ४७ ||
माधुर्येण च संपन्ना हि आतोद्य-कुशला तथा |
अङ्ग-प्रत्यङ्ग-संपन्ना चतुष्षष्ठि-कला-अन्विता || ४८ ||
चतुराः प्रश्रय-उपेताः स्त्रीदोषैः च विवर्जिताः |
सदा प्रगल्भा च तथा त्यक्त-आलस्या जितश्रमा || ४९ ||
नानाशिल्प-प्रयोगज्ञा नृत्तगीत-विचक्षणा |
अथ रूप-गुण-औदार्य-धैर्य-सौभाग्य-शीलसंपन्ना || ५० ||
पेशल-मधुर-स्निग्धा अनुनादिकल-चित्रकण्ठा च |
समागतासु नारीषु रूप-यौवन-कान्तिभिः || ५१ ||
न दृश्यते गुणैः तुल्या यस्याः सा नर्तकी इति स्मृता |

**अन्वय :-** हेलभावविशेषाढ्या, सत्त्वेन अभिनयेन माधुर्येण च संपन्ना, आतोद्यकुशला, अङ्गप्रत्यङ्गसंपन्ना, चतुष्षष्ठिकलान्विता, चतुराः, प्रश्रयोपेताः, स्त्रीदोषैः विवर्जिताः, सदा प्रगल्भा, त्यक्तालस्या, जितश्रमा, नानाशिल्पप्रयोगज्ञा, नृत्तगीतविचक्षणा, रूपगुणौदार्यधैर्यसौभाग्यशीलसंपन्ना, पेशलमधुरस्निग्धा, अनुनादिकलचित्रकण्ठा, समागतासु नारीषु रूपयौवनकान्तिभिः गुणैः यस्याः तुल्या न दृश्यते सा 'नर्तकी' स्मृता |

**अर्थ –** हाव, भाव, हेला यांचे विशेष ज्ञान असणारी , सात्त्विक अभिनयाने आणि माधुर्याने संपन्न असणारी, वाद्य वाजविण्यात प्रवीण असणारी, अंग-प्रत्यंगांनी परिपूर्ण असणारी, ६४ कलांचे ज्ञान असणारी, चतुर, नम्रतेने झुकलेली, स्त्रीदोष नसणारी,

नेहमी प्रगल्भ असणारी, आळस सोडून दिलेली, श्रमांवर मात करणारी, विविध शिल्पांचा प्रयोग जाणणारी, नृत्य-गीतामध्ये तज्ज्ञ असणारी, सौंदर्य, गुण, औदार्य, धैर्य, सौभाग्य आणि शीलयुक्त असणारी, विशेष गोड आणि प्रेमळ असणारी, हाकेला ओ देणारी, गोड गळा असलेली, एकत्र येणाऱ्या नारींमध्येही सौंदर्य, तारुण्य, तेज इत्यादी गुण असलेल्या तिच्याशी कोणाचीच तुलना होऊशकत नाही अशा त्या स्त्रीला 'नर्तकी' असे म्हणतात.

### ❖ ९. अनुचारिका ❖

**सर्वावस्थोपचारेषु या न मुञ्चति पार्थिवम् ॥ ५२ ॥**
**विज्ञेया दक्षिणा दक्षा नाट्यज्ञैरनुचारिका ।**

**पदच्छेद :-** सर्व-अवस्था-उपचारेषु या न मुञ्चति पार्थिवम् ॥ ५२ ॥
विज्ञेया दक्षिणा दक्षा नाट्यज्ञैः अनुचारिका ।

**अन्वय :-** सर्वावस्थोपचारेषु या पार्थिवं न मुञ्चति (सा) दक्षिणा दक्षा नाट्यज्ञैः 'अनुचारिका' (इति) विज्ञेया ।

**अर्थ -** जी सर्व परिस्थितीत राजाला एकटे सोडत नाही, त्या सरळ स्वभावाच्या आणि दक्ष स्त्रीला नाट्यविद्वान 'अनुचारिका' असे म्हणतात.

### ❖ १०. परिचारिका ❖

**शय्यापाली छत्रधारी तथा व्यजनधारिणी ॥ ५३ ॥**
**संवाहिका गन्धयोक्त्री तथा चैव प्रसाधिका ।**
**तथाभरणयोक्त्री च माल्यसंयोजिका तथा ॥ ५४ ॥**
**एवंविधा भवेयुर्याः ता ज्ञेयाः परिचारिकाः ।**

**पदच्छेद :-** शय्या-पाली छत्र-धारी तथा व्यजन-धारिणी ॥ ५३ ॥
संवाहिका गन्ध-योक्त्री तथा च एव प्रसाधिका ।
तथा आभरण-योक्त्री च माल्य-संयोजिका तथा ॥ ५४ ॥
एवंविधाः भवेयुः याः ताः ज्ञेयाः परिचारिकाः ।

**अन्वयः** – शय्यापाली, छत्रधारी, व्यजनधारिणी, संवाहिका, गन्धयोक्त्री, प्रसाधिका, आभरणयोक्त्री, माल्यसंयोजिका याः एवंविधाः भवेयुः ताः 'परिचारिकाः' इति ज्ञेयाः।

**अर्थ** – पलंग नेटनेटका ठेवणारी, छत्र धरणारी, पंखा धरणारी, विविध प्रकारच्या वस्तू इथून तिथे घेऊन जाणारी, सुगंधी द्रव्याची व्यवस्था लावणारी, सौंदर्यप्रसाधनास मदत करणारी, विविध अलंकार परिधान करण्यास मदत करणारी, माळांची व्यवस्था करणारी अशी जी स्त्री असते तिला 'परिचारिका' असे जाणावे.

### ❖ ११. संचारिका ❖

**नानाकक्ष्याविचारिण्यः तथोपवनसंचराः ॥५५॥**
**देवतायतनक्रीडाः प्रासादपरिचारिकाः ।**
**यामकिन्यस्तथा चैव याश्चैवंलक्षणाः स्त्रियः ॥५६॥**
**संचारिकास्तु विज्ञेया नाट्यज्ञैः समुदाहृताः ।**

**पदच्छेदः** – नाना-कक्ष्या-विचारिण्यः तथा उपवन-संचराः ॥५५॥
देवता-आयतन-क्रीडा प्रासाद-परिचारिकाः।
यामकिन्यः तथा च एव याः च एवम्-लक्षणाः स्त्रियः ॥५६॥
संचारिकाः तु विज्ञेयाः नाट्यज्ञैः समुदाहृताः।

**अन्वयः** – नानाकक्ष्याविचारिण्यः, उपवनसंचराः, देवतायतनक्रीडाः, प्रासादपरिचारिकाः, यामकिन्यः याः च एवंलक्षणाः नाट्यज्ञैः समुदाहृताः स्त्रियः 'संचारिकाः' इति विज्ञेयाः।

**अर्थ** – राजाच्या महालातील विविध खोल्यांमध्ये ये-जा करणाऱ्या, तसेच बागेत विहार करणाऱ्या, मंदिरामध्ये खेळणाऱ्या, महालात सेवा करणाऱ्या, प्रहर बदलण्याची जाणीव करून देणाऱ्या अशा लक्षणांनी युक्त असलेल्या ज्या स्त्रिया असतात त्यांना 'संचारिका' समजावे असे नाट्य जाणणाऱ्यांनी सांगितले आहे.

### ❖ १२. प्रेषणकारिका ❖

**प्रेषणेऽकामसंयुक्ते गुह्यागुह्यसमुत्थिते ॥५७॥**
**नृपैर्यास्तु नियुज्यन्ते ताः ज्ञेयाः परिचारिकाः।**

**पदच्छेद :–** प्रेषणे अकाम-संयुक्ते गुह्य-अगुह्य-समुत्थिते ||५७||
नृपै : या : तु नियुज्यन्ते ता : ज्ञेया : परिचारिका : |

**अन्वय : –** अकामसंयुक्ते गुह्यागुह्यसमुत्थिते प्रेषणे नृपैः याः नियुज्यन्ते ताः 'परिचारिकाः' इति ज्ञेयाः |

**अर्थ –** कामवासनेशी निगडीत नसलेले, गुप्त संदेश किंवा गुप्त नसलेले संदेश पोहोचवण्यासाठी राजा ज्यांची निवड करतात, त्यांना 'प्रेषण परिचारिका' असे जाणावे. हिलाच 'प्रेषणकारिका' असेही म्हटले आहे.

❖ १३. महत्तरा ❖

**सर्वान्त:पुररक्षासु स्तुतिस्वस्त्ययनेन च || ५८ ||**
**या वृद्धिमभिनन्दन्ति ता विज्ञेया महत्तराः |**

**पदच्छेद :–** सर्व अन्त:पुर-रक्षासु स्तुति-स्वस्ति-अयनेन च ||५८||
या : वृद्धिम् अभिनन्दन्ति ता : विज्ञेया : महत्तरा : |

**अन्वय : –** सर्वान्त:पुररक्षासु याः स्तुतिस्वस्त्ययनेन वृद्धिम् च अभिनन्दन्ति ताः 'महत्तराः' इति विज्ञेयाः |

**अर्थ –** संपूर्ण अंत:पुराची सुरक्षा व्हावी म्हणून ज्या स्त्रिया देवाची स्तुती आणि स्वस्तिवचन म्हणतात, तसेच राजाच्या वृद्धीचे अभीष्टचिंतन करतात त्या स्त्रियांना 'महत्तरा' असे जाणावे.

❖ १४. प्रतिहारी ❖

**सन्धिविग्रहसंबद्धनानाचारसमुत्थितम् ||५९||**
**निवेदयन्ति याः कार्यं प्रतिहार्यस्तु ताः स्मृताः |**

**पदच्छेद :–** सन्धि-विग्रह-संबद्ध-नाना-आचार-समुत्थितम् ||५९||
निवेदयन्ति या : कार्यम् प्रतिहार्य : तु ता : स्मृता : |

**अन्वय : –** याः सन्धिविग्रहसंबद्धनानाचारसमुत्थितम् कार्यम् निवेदयन्ति ताः प्रतिहार्यः (इति) स्मृताः |

**अर्थ** – संधि, विग्रह, यान, आसन, शंका आणि मनाची द्विधा अवस्था यांच्याशी निगडीत परिस्थिती असताना कुठे कसे वागावे याची माहिती ज्या सांगतात त्यांना 'प्रतिहारी' असे म्हणतात .

**❖ १५ . कुमारी ❖**

**अप्राप्तरससंभोगा न संभ्रान्ता न चोद्भटाः || ६० ||**
**निभृताश्च सलज्जाश्च कुमार्यो बालिकाः स्मृताः |**

**पदच्छेदः –** अप्राप्त-रस-संभोगाः न संभ्रान्ताः न च उद्भटाः || ६० ||
निभृताः च सलज्जाः च कुमार्यः बालिकाः स्मृताः |

**अन्वयः –** अप्राप्तरससंभोगाः, न संभ्रान्ताः, न च उद्भटाः, निभृताः, सलज्जाः च बालिकाः 'कुमार्यः' (इति) स्मृताः |

**अर्थ** – ज्यांना संभोगात रस नाही, ज्या संभ्रांत नाहीत, ज्या उद्धट नाहीत, ज्या विनम्र असतात आणि ज्या लाजाळू असतात त्या लहान मुलींना 'कुमारी' असे म्हणतात .

**❖ १६ . वृद्धा ❖**

**पूर्वराजनयज्ञा याः पूर्वराजाभिपूजिताः || ६१ ||**
**पूर्वराजानुचरितास्ता वृद्धा इति सुज्ञिताः |**

**पदच्छेदः –** पूर्व-राज-नयज्ञाः याः पूर्व-राज-अभिपूजिताः || ६१ ||
पूर्व-राज-अनुचरिताः ताः वृद्धाः इति सुज्ञिताः |

**अन्वयः –** याः पूर्वराजनयज्ञाः पूर्वराजाभिपूजिताः पूर्वराजानुचरिताः ताः वृद्धाः इति सुज्ञिताः |

**अर्थ** – ज्या पूर्वी होऊन गेलेल्या राजांच्या नीतिविषयी जाणतात . आधीच्या राजांकडून ज्यांचा सन्मान झालेला असतो आणि ज्या पूर्वीच्या राजांना अनुसरण करणाऱ्या असतात त्या स्त्रियांना 'वृद्धा' असे संबोधिले जाते .

**❖ १७ . आयुक्तिका ❖**

**भाण्डागारेष्वधिकृताश्चायुधाधिकृतास्तथा || ६२ ||**
**फलमूलौषधीनां च तथा चैवान्ववेक्षिकी |**

**गन्धाभरणवस्त्राणां माल्यानां चैव चिन्तिका ||६३||**
**बह्वाश्रये तथा युक्ता ज्ञेया ह्यायुक्तिकास्तु ता: |**
**इत्यन्त:पुरचारिण्य: स्त्रिय: प्रोक्ता: समासत: || ६४ ||**

**पदच्छेद: –** भाण्डागारेषु अधिकृता: च आयुध-अधिकृता: तथा || ६२ ||
फल-मूल-औषधीनाम् च तथा च एव आन्ववेक्षिकी |
गन्ध-आभरण-वस्त्राणाम् माल्यानाम् च एव चिन्तिका || ६३ ||
बहु-आश्रये तथा युक्ता: ज्ञेया: हि आयुक्तिका: तु ता: |
इति अन्त:पुर-चारिण्य: स्त्रिय: प्रोक्ता: समासत: || ६४ ||

**अन्वय: –** भाण्डागारेषु अधिकृता:, आयुधाधिकृता:, फलमूलौषधीनाम् आन्ववेक्षिकी, गन्धाभरणवस्त्राणाम् माल्यानाम् च चिन्तिका, बह्वाश्रये युक्ता:, ता: 'आयुक्तिका:' हि ज्ञेया: | इति अन्त:पुरचारिण्य: स्त्रिय: समासत: प्रोक्ता: |

**अर्थ –** भांडाराची, आयुधांची देखरेख करणाऱ्या, फळे कंदमुळे आणि औषधी वनस्पती इत्यादींची जाण असलेल्या, सुगंध आभूषणे वस्त्र इत्यादींविषयी निरंतन चिंतन करणाऱ्या, खूप साऱ्यांना आधार देणाऱ्या अशा ज्या स्त्रिया असतात त्यांना 'आयुक्तिका' असे ओळखावे .

अशा प्रकारे अंत:पुरात ये-जा करणाऱ्या स्त्रियांविषयी मी तुम्हांला थोडक्यात सांगितले .

### ❖ राजाच्या अंत:पुरातील स्त्रियांची लक्षणे ❖

**विशेषणविशेषेण तासां वक्ष्यामि वै द्विजा: |**
**अनुरक्ताश्च भक्ताश्च नानापार्श्वसमुत्थिता: || ६५ ||**
**या नियुक्ता नियोगेषु कार्येषु विविधेषु च |**
**न चोद्भटा असंभ्रान्ता न लुब्धा नापि निष्ठुरा: || ६६ ||**
**दान्ता: क्षान्ता: प्रसन्नाश्च जितक्रोधा जितेन्द्रिया: |**
**अकामा लोभहीनाश्च स्त्रीदोषैश्च विवर्जिता: || ६७ ||**
**सा त्वन्त:पुरसंचारे योज्या पार्थिववेश्मनि |**

**पदच्छेद :–** विशेषण-विशेषेण तासाम् वक्ष्यामि वै द्विजा : |
अनुरक्ता : च भक्ता : च नाना-पार्श्व-समुत्थिता : || ६५ ||
या : नियुक्ता : नियोगेषु कार्येषु विविधेषु च |
न च उद्भटा : असंभ्रान्ता : न लुब्धा : न अपि निष्ठुरा : || ६६ ||
दान्ता : क्षान्ता : प्रसन्ना : च जित-क्रोधा : जित-इन्द्रिया : |
अकामा : लोभ-हीना : च स्त्रीदोषै : च विवर्जिता : || ६७ ||
सा तु अन्त :पुर-संचारे योज्या पार्थिव-वेश्मनि |

**अन्वय : –** हे द्विजा :, तासां लक्षणानि विशेषणविशेषेण वक्ष्यामि, या : अनुरक्ता :, भक्ता :, नानापार्श्वसमुत्थिता :, नियोगेषु विविधेषु कार्येषु च नियुक्ता :, न उद्भटा :, असंभ्रान्ता :, न लुब्धा :, न अपि निष्ठुरा : दान्ता : क्षान्ता : प्रसन्ना : च जितक्रोधा : जितेन्द्रिया : अकामा : लोभडीना : च स्त्रीदोषै : च विवर्जिता : सा तु अन्त :पुरसंचारे पार्थिववेश्मनि योज्या |

**अर्थ –** हे ब्राह्मणांनो, आता मी अंत :पुरातील राजाच्या घरात वावरणाऱ्या स्त्रियांची लक्षणे विशेषण विशेष्यासह तुम्हांला सांगतो . ज्या अनुरक्त आहेत, भक्त आहेत, विविध बाजूने सतत तयार आहेत, नियोगकार्यासाठी आणि विविध कामासाठी नियुक्त केल्या गेलेल्या आहेत, ज्या उद्धट नाहीत, संभ्रांत नाहीत, लोभी पण नाहीत व निष्ठुरही नाहीत ज्या दानी, शांत, प्रसन्न, क्रोधाला जिंकलेल्या, जितेंद्रिय, कामयुक्त नसलेल्या, लोभ नसलेल्या आणि इतर स्त्रीसुलभ दोष नसलेल्या ज्या स्त्रिया असतात त्या अंत :पुरातील स्त्रिया राजाच्या महालामध्ये वावर करण्यास योग्य आहेत .

**कारुका : कञ्चुकीयाश्च तथा वर्षवरा : पुन : || ६८ ||**
**औपस्थायिकनिर्मुण्डा स्त्रीणां प्रेषणकर्मणि |**
**रक्षणं च कुमारीणां बालिकानां प्रयोजयेत् || ६९ ||**

**पदच्छेद :–** कारुका : कञ्चुकीया : च तथा वर्षवरा : पुन : || ६८ ||
औपस्थायिक-निर्मुण्डा स्त्रीणाम् प्रेषणकर्मणि |
रक्षणं च कुमारीणाम् बालिकानाम् प्रयोजयेत् || ६९ ||

**अन्वय: –** कारुका: कञ्चुकीया: तथा च वर्षवरा: पुन: औपस्थायिकनिर्मुण्डा: स्त्रीणाम् प्रेषणकर्मणि कुमारीणाम् बालिकानाम् च रक्षणम् प्रयोजयेत्|

**अर्थ –** कुंभार, कंचुकी, नपुंसक, अंगरक्षक, टकलू अशा लोकांना स्त्रियांसोबत पाठविण्यासाठी आणि कुमारिकांच्या, लहान मुलींच्या रक्षणासाठीदेखील यांचा उपयोग करावा .

**अन्त:पुराधिकारेषु राजचर्यानुवर्त्तिनाम् |**
**सर्ववृत्तान्तसंवाहा: पत्यागारे नियोजयेत् || ७० ||**

**पदच्छेद: –** अन्त:पुर-अधिकारेषु राजचर्य-अनुवर्त्तिनाम्|
सर्ववृत्तान्त-संवाहा: पति-आगारे नियोजयेत्||७०||

**अन्वय: –** अन्त:पुराधिकारेषु राजचर्यानुवर्त्तिनाम् सर्ववृत्तान्तसंवाहा: पत्यागारे नियोजयेत्|

**अर्थ –** अंत:पुरामध्ये राजाच्या आचरणाप्रमाणे अनुसरण करणाऱ्या आणि सर्व बातम्या घेऊन येजा करणाऱ्या सेवकांची नियुक्ती राजाच्या महालात करावी .

**विनीता: स्वल्पसत्त्वा ये क्लीबा वै स्त्रीस्वभाविका:|**
**जात्या न दोषिणश्चैव ते वै वर्षवरा: स्मृता: || ७१ ||**

**पदच्छेद: –** विनीता: स्वल्पसत्त्वा: ये क्लीबा: वै स्त्रीस्वभाविका:|
जात्या: न दोषिण: च एव ते वै वर्षवरा: स्मृता:||७१||

**अन्वय: –** ये विनीता:, स्वल्पसत्त्वा:, क्लीबा:, स्त्रीस्वभाविका:, जात्या: एव न दोषिण: च ते वर्षवरा: स्मृता:|

**अर्थ –** विनयशील, स्वल्प पराक्रमी असलेल्या, नपुंसक, स्त्रीसारखा स्वभाव असलेल्या, जन्मत: दोषपूर्ण नसलेल्या व्यक्तीला 'वर्षवर' असे म्हटले गेले आहे .

**ब्राह्मणा: कुशला वृद्धा: कामदोषविवर्जिता: |**
**प्रयोजनेषु देवीनां प्रयोक्तव्या नृपै: सदा || ७२ ||**

**पदच्छेद: –** ब्राह्मणा: कुशला: वृद्धा: कामदोष-विवर्जिता:|
प्रयोजनेषु देवीनाम् प्रयोक्तव्या: नृपै: सदा||७२||

**अन्वय: –** नृपै: देवीनाम् प्रयोजनेषु सदा कुशला:, वृद्धा:, कामदोषविवर्जिता: ब्राह्मणा: प्रयोक्तव्या: |

**अर्थ –** राजांनी महाराणींच्या कार्यासाठी कुशल, वृद्ध आणि कामदोष नसलेल्या ब्राह्मणांचा वापर करावा .

**❖ बाह्योपचार ❖**

**एतदष्टादशविधं प्रोक्तमन्त:पुरं मया |**
**अत: परं प्रवक्ष्यामि बाह्यं पुरुषसंभवम् || ७३ ||**

**पदच्छेद: –** एतत् अष्टादशविधम् प्रोक्तम् अन्त:पुरम् मया |
अत: परम् प्रवक्ष्यामि बाह्यम् पुरुषसंभवम् || ७३ ||

**अन्वय: –** मया एतत् अष्टादशविधम् अन्त:पुरम् प्रोक्तम् | अत: परम् पुरुषसंभवम् बाह्यम् प्रवक्ष्यामि |

**अर्थ –** याप्रमाणे अठरा प्रकारच्या अंत:पुरातील लोकांविषयी मी तुम्हांला सांगितले . यानंतर पुरुषांद्वारे होणाऱ्या बाह्योपचाराविषयी मी तुम्हांला सांगीन .

**❖ बाह्यपरिवार ❖**

**राजा सेनापतिश्चैव पुरोधा मन्त्रिणस्तथा |**
**सचिवा: प्राड्विवाकाश्च कुमाराधिकृतास्तथा || ७४ ||**
**एके चान्ये च बहवो मान्या ज्ञेया नृपस्य तु |**
**विशेषमेषां वक्ष्यामि लक्षणेन निबोधत || ७५ ||**

**पदच्छेद: –** राजा सेनापति: च एव पुरोधा मन्त्रिण: तथा |
सचिवा: प्राड्विवाका: च कुमाराधिकृता: तथा || ७४ ||
एके च अन्ये च बहव: मान्या: ज्ञेया: नृपस्य तु |
विशेषम् एषाम् वक्ष्यामि लक्षणेन निबोधत || ७५ ||

**अन्वय: –** राजा, सेनापति:, पुरोधा:, मन्त्रिण:, सचिवा:, प्राड्विवाका:, कुमाराधिकृता:, एके अन्ये बहव: मान्या: नृपस्य ज्ञेया:|
एषाम् विशेषम् वक्ष्यामि लक्षणेन निबोधत|

**अर्थ –** आता बाह्यपरिवाराविषयी सांगतो - राजा, सेनापति, मुख्य पुजारी, मंत्री, सचिव, न्यायाधीश, कुमार आणि कुमारांच्या रक्षणांसाठी नियुक्त असलेले अधिकारी, आणि इतर अनेक मान्यवर लोक राजाने जाणून घ्यावेत. आता पुढे त्यांची वैशिष्ट्ये लक्षणांसह मी सांगणार आहे.

**❖ राजा ❖**

**बलवान् बुद्धिसंपन्न: सत्यवादी जितेन्द्रिय: |**
**दक्ष: प्रगल्भो धृतिमान् विक्रान्तो मतिमांञ्छुचि: || ७६ ||**
**दीर्घदर्शी महोत्साह: कृतज्ञ: प्रियवाङ्मृदु: |**
**लोकपालव्रतधर: कर्ममार्गविशारद: || ७७ ||**
**उत्थितश्चाप्रमत्तश्च वृद्धसेव्यर्थशास्त्रवित् |**
**परभावेङ्गिताभिज्ञ: शूरो रक्षासमन्वित: || ७८ ||**
**ऊहापोहविचारी च नानाशिल्पप्रयोजक: |**
**नीतिशास्त्रार्थकुशलस्तथा चैवानुरागवान् || ७९ ||**
**धर्मज्ञोऽव्यसनी चैव गुणैरेतैर्भवेन्नृप: |**

**पदच्छेद: –** बलवान् बुद्धिसंपन्न: सत्यवादी जितेन्द्रिय:|
दक्ष: प्रगल्भ: धृतिमान् विक्रान्त: मतिमान् शुचि: || ७६ ||
दीर्घदर्शी महोत्साह: कृतज्ञ: प्रियवाङ्मृदु:|
लोकपाल-व्रतधर: कर्ममार्ग-विशारद: || ७७ ||
उत्थित: च अप्रमत्त: च वृद्धसेवी अर्थशास्त्रवित्|
परभाव-ईङ्गित-अभिज्ञ: शूर: रक्षा-समन्वित: || ७८ ||
ऊहापोह-विचारी च नानाशिल्प-प्रयोजक:|

नीति-शास्त्रार्थ-कुशल : तथा च एव अनुरागवान् ||७९||
धर्मज्ञ : अव्यसनी च एव गुणै : एतै : भवेत् नृप : |

**अन्वय : –** बलवान्, बुद्धिसंपन्न :, सत्यवादी, जितेन्द्रिय :, दक्ष :, प्रगल्भ :, धृतिमान्, विक्रान्त :, मतिमान्, शुचि :, दीर्घदर्शी, महोत्साह :, कृतज्ञ :, प्रियवाड्मृदु :, लोकपालव्रतधर :, कर्ममार्गविशारद :, उत्थित :, अप्रमत्त :, वृद्धसेवी, अर्थशास्त्रवित्, परभावेङ्गिताभिज्ञ :, शूर :, रक्षासमन्वित :, ऊहापोहविचारी, नानाशिल्पप्रयोजक :, नीतिशास्त्रार्थकुशल :, अनुरागवान्, धर्मज्ञ :, अव्यसनी एतै : गुणै : नृप : भवेत्। (अनुरागो हि सार्वगुण्यमिति कौटिल्य : | - अ . भा . )

**अर्थ –** बलवान, बुद्धिसंपन्न, सत्यवादी, जितेंद्रिय, दक्ष, प्रगल्भ, धाडसी, पराक्रमी, मतिमान, पवित्र, दूरदर्शी, प्रचंड उत्साही, कृतज्ञ, गोड व प्रिय बोलणारा, लोकरक्षणाचे व्रत घेतलेला, कर्ममार्गामध्ये हुशार, कायम जागरूक, उन्माद नसलेला, वृद्धांची सेवा करणारा, अर्थशास्त्रामध्ये विद्वान, दुसऱ्यांचे मनोभाव आणि खाणाखुणा ओळखणारा, शूरवीर आणि प्रजेच्या रक्षणासाठी झटणारा, चांगले व वाईट याविषयांवर विचारविनिमय करणारा, विविध प्रकारच्या शिल्प इत्यादी कलांना प्रोत्साहन देणारा, नीति आणि शास्त्रार्थामध्ये कुशल, सर्वगुणसंपन्न असणारा, धर्म जाणणारा, व्यसनांपासून दूर राहणारा अशा गुणांनी युक्त असा राजा असावा .

### ❖ मंत्री ❖

**कुलीना बुद्धिसंपन्ना नानाशास्त्रविपश्चिता : ||८०||**
**स्निग्धा : पौरैरहार्याश्च न प्रमत्ताश्च देशजा : |**
**अलुब्धाश्च विनीताश्च शुचयो धार्मिकास्तथा ||८१||**
**पुरोधो मन्त्रिणस्त्वेभिर्गुणैर्युक्ता भवन्ति हि |**

**पदच्छेद : –** कुलीना : बुद्धिसंपन्ना : नानाशास्त्र-विपश्चिता : ||८०||
स्निग्धा : पौरै : अहार्या : च न प्रमत्ता : च देशजा : |
अलुब्धा : च विनीता : च शुचय : धार्मिका : तथा ||८१||
पुरोध : मन्त्रिण : तु एभि : गुणै : युक्ता : भवन्ति हि |

**अन्वय: –** कुलीना:, बुद्धिसंपन्ना:, नानाशास्त्रविपश्चिता:, स्निग्धा:, परै: अहार्या:, न प्रमत्ता:, देशजा:, अलुब्धा:, विनीता:, शुचय:, धार्मिका:, पुरोधा: एभि: गुणै: मन्त्रिण: हि तु युक्ता: भवन्ति | (परैरहार्या: इति अभेद्या: | - अ. भा.)

**अर्थ –** चांगल्या कुळातला, बुद्धिसंपन्न, विविध शास्त्रांमध्ये विद्वान असणारे, प्रेमळ, शत्रूंकडून कधीच न फुटले जाणारे, उन्मत्त नसलेले, स्वत:च्या देशात जन्मलेले, निर्लोभी, विनयशील, पवित्र, धार्मिक, पुरोगामी इत्यादी अनेक गुण असलेले व्यक्ती मंत्री म्हणून योग्य असतात.

**❖ सचिव ❖**

**बुद्धिमान्नीतिसंपन्नस्त्यक्तालस्य: प्रियंवद: || ८२ ||**
**पररन्ध्रविधिज्ञश्च यात्राकालविशेषवित् |**
**अर्थशास्त्रार्थकुशलो ह्यनुरक्त: कुलोद्भव: || ८३ ||**
**देशवित्कालविच्चैव कर्तव्य: क्षितिपै: सदा |**

**पदच्छेद: –** बुद्धिमान् नीतिसंपन्न: त्यक्त-आलस्य: प्रियंवद: || ८२ ||
पररन्ध्र-विधिज्ञ: च यात्राकाल-विशेषवित् |
अर्थशास्त्रार्थ-कुशल: हि अनुरक्त: कुल-उद्भव: || ८३ ||
देशवित् कालवित् च एव कर्तव्य: क्षितिपै: सदा |

**अन्वय: –** बुद्धिमान्, नीतिसंपन्न:, त्यक्तालस्य:, प्रियंवद:, पररन्ध्रविधिज्ञ:, यात्राकालविशेषवित्, अर्थशास्त्रार्थकुशल:, अनुरक्त:, कुलोद्भव:, देशवित् कालवित् च (सचिव:) क्षितिपै: सदा कर्तव्य: |

**अर्थ –** बुद्धिमान, नीतिमान, आळस नसलेला, गोड बोलणारा, शत्रूच्या उणीवा जाणणारा, यात्रेची वेळ तसेच मुहूर्त जाणणारा, अर्थशास्त्रामध्ये विद्वान, अनुरक्त, चांगल्या कुळातला, देश आणि काळ जाणणारा जो व्यक्ती त्यालाच राजांनी नेहमी 'सचिव' बनविले पाहिजे.

**❖ न्यायाधीश ❖**

**व्यवहारार्थतत्त्वज्ञा बुद्धिमन्तो बहुश्रुता: || ८४ ||**
**मध्यस्था धार्मिका धीरा: कार्याकार्यविवेकिन: |**

**क्षान्ता दान्ता जितक्रोधा सर्वत्र समदर्शिनः ||८५||**
**ईदृशः प्राड्विवाकास्तु स्थाप्या धर्मासने द्विजाः |**

**पदच्छेदः –** व्यवहारार्थ-तत्त्वज्ञाः बुद्धिमन्तः बहुश्रुताः ||८४||
मध्यस्थाः धार्मिकाः धीराः कार्य-अकार्य-विवेकिनः |
क्षान्ताः दान्ताः जितक्रोधाः सर्वत्र समदर्शिनः ||८५||
ईदृशः प्राड्विवाकाः तु स्थाप्याः धर्मासने द्विजाः |

**अन्वयः –** द्विजाः, व्यवहारार्थतत्त्वज्ञाः, बुद्धिमन्तः, बहुश्रुताः, मध्यस्थाः, धार्मिकाः, धीराः, कार्याकार्यविवेकिनः, क्षान्ताः, दान्ताः, जितक्रोधाः, सर्वत्र समदर्शिनः, ईदृशः प्राड्विवाकाः इति धर्मासने स्थाप्याः |

**अर्थ –** हे ब्राह्मणांनो, व्यवहार आणि अर्थविषयक तत्त्व जाणणाऱ्या, बुद्धिमान, बहुश्रुत, मध्यस्थ, धार्मिक, धीर, कार्य आणि अकार्य (चांगले आणि वाईट) याविषयीची विवेकबुद्धी असणाऱ्या, शांत, दानवीर, क्रोधाला जिंकलेल्या, सर्वत्र समदृष्टी असणाऱ्या वकील आणि न्यायाधीशाला धर्मासनावर बसवावे .

**❖ राजकुमारांची रक्षा करणारे अधिकारी ❖**

**उत्थिताश्वाप्रमत्ताश्च त्यक्तालस्या जितश्रमाः ||८६||**
**स्निग्धाः क्षान्ता विनीताश्च मध्यस्था निपुणास्तथा |**
**नयज्ञा विनयज्ञाश्च ऊहापोहविचक्षणाः ||८७||**
**सर्वशास्त्रार्थसंपन्नाः कुमाराधिकृतास्तथा |**
**बृहस्पतिमतादेषां गुणांश्चाभिकांक्षयेत् ||८८||**

**पदच्छेदः –** उत्थिताः च अप्रमत्ताः च त्यक्त-आलस्याः जितश्रमाः ||८६||
स्निग्धाः क्षान्ताः विनीताः च मध्यस्थाः निपुणाः तथा |
नयज्ञाः विनयज्ञाः च ऊहापोह-विचक्षणाः ||८७||
सर्वशास्त्रार्थ-संपन्नाः कुमार-अधिकृताः तथा |
बृहस्पति-मतात् एषाम् गुणान् च अभिकांक्षयेत् ||८८||

